Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रिटिशांचा इतिहास

खंड पहिला

[इ. स. पू. ५५ ते इ. स. १६०३]

...क पब्लिशिंग हाउस, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श–अँग्लो-सॅक्सन काळ–इ. स. ४१०–१०६६.

↑ काल	महत्त्वाच्या गोष्टी — इंग्लंड	प्रसिद्ध — व्यक्ति	महत्त्वाच्या गोष्टी (हिंदुस्थान)
इ.स. ४१०			इ. ४०५–११ फाहाएनचा प्रवास
४४९	ज्यूटांची इंग्लंडवर १ ली स्वारी	हेंजिस्ट व होर्सा	
४७७	सॅक्सनांची १ ली स्वारी		
इ.स. ५१०			–५०० ज्योतिषी वराहमिहरचा जन्म
इ.स. ६१० – ५९७	सेंट ऑगस्टिनचें इंग्लं. आगमन	सेंट ऑगस्टिन	–६०६-६४७ राजा हर्षवर्धन
६३३	हॅटफील्डची लढाई	एडविन, पडा	–६२९–४५ ह्युएनत्संगाचा प्रवास
६६४	व्हिटबीची धर्मसभा	आसवी	
इ.स. ७१०			–७१२ अरबांची सिंधवर स्वारी
			–७३० बाप्पा रावळ चक्रवर्ती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

LIBRARY,
GURUKULA KANGRI.

	–७९७			
	–८००	डेन्सांची इंग्लंडवर १ ली स्वारी		
इ.स. ८१०—		शार्लमन रोमचा बादशाह		
	–८७१			
	–८७८	ॲशडाऊनची लढाई	आल्फ्रेड–गथ्रम	
इ.स. ९१०—	–९०१	वेडमोरचा तह आल्फ्रेडचा मृत्यु	आल्फ्रेड–गथ्रम	
		सेंट ब्राईसची कत्तल	गझनीचा महमद	–१००१–१०२४ गझनीच्या महमुदच्या स्वाऱ्या
इ.स. १०१०–	–१००२ १०१४-१०३५ राजा कन्यूट			
	–१०५१	नॉर्मंडीच्या विल्यमची इंग्लं. भेट		–१०२५ सोमनाथवर स्वारी
	–१०६६	हेस्टिंग्जची लढाई	विजयी विल्यम, हॅरोल्ड	

स्केल — एका इंचाला शभर वर्षे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म् ❀

पुस्तक-संख्या ४१म/१५क

पंजिका-संख्या २०१८६

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रिटिशांचा इतिहास

खंड पहिला

[इ. स. पू. ५५ ते इ. स. १६०३]

लेखक

विष्णु सिताराम चितळे, बी. ए., बी. टी. (मुंबई),
टी. डी. (लंडन), एम्. आर्. एस्. टी. (इंग्लंड),
' हिंदुस्थानची शासनपद्धति ' या पुस्तकाचा कर्ता,
असिस्टंट सुपरिंटेंडेंट, न्यू. इं. स्कूल, पुणें.

LIBRARY
GURUKULA KANGRI

KARNATAK PUBLISHING HOUSE
BOMBAY 2

मूल्य दीड रुपया

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

First edition: 1939

Printed by M. N. Kulkarni at the Karnatak Printing Press, Chira Bazar, Bombay 2, and published by him at the Karnatak Publishing House, Chira Bazar, Bombay 2.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना

इतिहासाच्या अभ्यासानें मुलांना तत्वबोध होईल, त्यांची कल्पनाशक्ति फाकून तिला तेज चढेल, त्यांची स्मरणशक्ति वाढेल, त्यांच्या तर्कपद्धतीला विशिष्ट वळण लागेल, त्यांच्यांत चिकित्सक बुद्धि जागृत होईल, व त्यामुळें खऱ्याखोट्याचा न्याय-निवाडा करण्याची त्यांच्यांत खरी धमक येईल ! परंतु आज शाळेंत ज्याप्रकारचें शिक्षण दिलें जातें, त्यामुळें वरील सर्व गोष्टी खरोखर घडतील कां ? सध्यांच्या इतिहास-शिक्षणानें वरील हेतु क्वचितच साध्य होत असतील; कारण आमच्या शाळांतील इतिहास-शिक्षणाची दिशाच चुकीची आहे. शिवाय ज्यांना इतिहास शिकवावयाचा त्यांच्या मनाची ठेवण व मनाच्या प्रवृत्ती काय आहेत हें लक्षांत न घेतांच विषय शिकविला जातो ! इतिहास-शिक्षणानें विद्यार्थ्यांच्या बुद्धीला वळण लागावें अगर त्यांच्या मनोविकासास शिक्षण कारणीभूत व्हावें; केवळ याच हेतूनें इतिहास शिकवणें चूक होणार नाहीं का ? कारण इतिहासांत मुलांना मनुष्याचीं अचाट कृत्यें, त्याचा जीविताशीं झालेला झगडा, त्याचा विकास, त्याची प्रगति, त्याचा पराभव या व अशा गोष्टींच्या ज्ञानामुळें जो आनंद मिळतो तो कल्पनातीत असतो. इतिहास शिकतांना अगर वाचतांना भिन्न जगांत, भिन्न परिस्थितींत, भिन्न समाजांत, भिन्न लोकांत व भिन्न संस्कृतींत विद्यार्थ्याला वावरावें लागतें; परंतु त्यामुळेंच त्याला अपरिमित आनंद मिळत असतो. तो तशा भिन्न परिस्थितींत वावरत असतांही आपण आपल्या पूर्वजांच्या अगर त्यांच्या वेळच्या इतर लोकांच्या सुखदुःखाच्या गोष्टी वाचत आहोंत याची त्याला पूर्ण जाणीव असते व यामुळेंच त्या त्या वेळच्या लोकांच्या सुखामुळें त्याला सुख होतें, दुःखामुळें दुःख होतें व त्यांच्या जयापजया-मुळें त्याला आनंद अगर दुःख होतें. या त्याच्या समरसतेमुळेंच त्याला खरा आनंद होतो; आणि तोही कशाकरितां, तर त्या पूर्वींच्या लोकांशीं आपलें अल्पस्वल्प नातें जोडून त्यांचीं सुखदुःखें त्याला समरसतेनें अनुभवावयास मिळतात म्हणून.

मुलांचा हा आनंद टिकवावयाचा असेल अगर त्यास तो अनुभविण्यास मिळावा अशी इच्छा असेल तर इतिहास-शिक्षणाची दिशाच पार बदलावयास नको काय ? एक काळ असा होता कीं, मुलांच्या वरील प्रकारच्या नैसर्गिक प्रवृत्तींकडे दुर्लक्ष करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व राष्ट्राच्या केवळ लष्करी उन्नतीकडेच लक्ष देऊन इतिहास शिकविण्याची व लेखनाची प्रथा रूढ होती. अर्थात् इतिहासाच्या इंग्रजी पाठ्य पुस्तकांतून व त्यांस आधारून लिहिलेल्या मराठी पाठ्य पुस्तकांतून राष्ट्राच्या राजकीय व परराष्ट्रीय उलाढालींवरच सर्व लक्ष केंद्रीभूत होत असे. यामुळें राजकीय घडामोडींची उकल, लष्कराचे पराक्रम, त्याच्या हालचाली व डावपेंच, युद्धांतील लढायांचीं प्रात्यक्षिकें व त्यांतील मोहि-मांचीं रसाळ व भावनोद्दीपक वर्णनें, मोहिमांचे कार्यक्रम, लढाईच्या वेळचे सैन्यरच-नेचे नकाशे यांची रेलचेल शालेय पाठ्य-पुस्तकांतून असे. वरीलप्रमाणेंच राजघरा-ण्यांतील पुरुषांच्या जन्ममृत्यूंच्या नोंदी, सनावळ्या, तहनामे, वेढे, खून-मारामाऱ्या, अत्याचार, पार्लमेंटचे कायदे यांचीं रूक्ष वर्णनेंही पुस्तकांतून अगदीं इत्थंभूत देण्यांत येत. अर्थात् त्याच गोष्टींवर वर्गांतून शिक्षक भर देत असतील, यांत नवल तें कसलें ! वरील सर्व गोष्टींना इतिहासाच्या अध्यापनांत स्थान नाहीं असें नाहीं; परंतु त्यांचाच केवळ अतिरेक होऊन कसा चालेल ? कारण वरील गोष्टीच शाळांतून शिकविल्या गेल्यानें विद्यार्थी उत्तम सैनिक म्हणून कदाचित् तयार होईल; परंतु उत्तम नागरिक बनण्यास लागणारे गुण त्याच्यांत उतरतीलच असें सांगतां येईल काय ?

ही विचारसरणी मान्य केल्यास मनुष्याची हळुहळु उत्क्रांति व प्रगति कसकशी होत गेली, त्यानें कोणकोणतीं अचाट कृत्यें केलीं, त्याला कोणकोणत्या संकटांशीं तोंड द्यावें लागलें, त्यांतून तो सहीसलामत कसा निघाला, त्यानें कोणकोणत्या संस्था स्थापन केल्या व आपल्या समाजाचें पाऊल कसकसें पुढें नेलें हें इतिहासाच्या अध्ययनानें मुलांस समजण्यास नको काय ? त्याचप्रमाणें मनुष्याच्या आचाराविचा-रांत, राहणींत, व्यवहारांत, राजकारणांत–अर्थात् समाजाच्या आर्थिक, राजकीय, धार्मिक, लष्करविषयक व सामाजिक परिस्थितींत निरनिराळ्या काळांत कसकसा बदल होत गेला व प्रत्येक युगांत समाजाचें पाऊल कसकसें पुढें पडत गेलें हें इतिहासाशिवाय दुसरा कोणता विषय समजावून देणार आहे ? या प्रत्येक स्थित्यंत-राच्या वेळीं त्या त्या वेळच्या स्त्री-पुरुषांनीं आपलें आचरण कसें ठेवलें, आपल्या चळवळी कशा चालविल्या व आपल्या संस्था स्थापून व जगवून, त्यांची प्रगति कशी करून घेतली, हें समजल्यानें विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं निसर्गतःच असलेल्या भावना एकवटून त्यांस खात्रीनें आनंद होईल. एवढेंच नव्हे, तर त्यांच्या बुद्धीचा विकास होऊन राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें ते कार्यक्षम होतील. सारांश, इतिहासाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेखन काय किंवा त्याचें अध्यापन काय, मानवी उत्क्रांति व मानव्याचा विकास लक्षांत घेऊनच करावयास पाहिजे.

या सर्व गोष्टी लक्षांत घेतां इतिहास-लेखनाचें अगर त्याच्या अध्यापनाचें कार्य किती बिकट होऊन बसतें हें समजून येण्यासारखें आहे. इतिहास हा जात्याच एक रुक्ष विषय समजला जातो व असल्या विषयाच्या लेखनाचें व अध्यापनाचें काम एखाद्या रुक्ष मनुष्यानें करावयाचें म्हटल्यास कोणता अनवस्थाप्रसंग गुदरेल हें सांगणें कठिणच ! त्याच्या अध्यापनांत जिवंतपणा उत्पन्न करण्याकरितां किती यातायात करावी लागते तें खऱ्या इतिहास-अध्यापकासच माहीत ! आणि तो जर तसा असेल तर अनेक प्रकारच्या उपलब्ध साधनांनीं तो आपला विषय अत्यंत चित्ताकर्षक रीतीनें समजावून देऊन मुलांमध्यें त्या विषयाबद्दल नुसती आवडच नव्हे, तर प्रत्येक गोष्टीचें यथायोग्य व व सोपपत्तिक ज्ञान तो मुलांस करून देऊन त्यांस तो आनंदवील. एवढेंच नव्हे तर, 'मेलेले मुडदे उकरून काढूनही' त्यांना तो आपल्या मुलांपुढें जिवंतपणें नाचवील व त्यांच्यांत चेतना उत्पन्न करून त्यांच्या बुद्धीला, मनाला व आचरणाला उत्तम प्रकारचें वळण देईल.

इतिहासाच्या अध्यापनांत अशा प्रकारचा जिवंतपणा उत्पन्न करावयाचा असल्यास विद्यार्थ्यांपुढें अनेक प्रकारच्या साधनांची शिधा-सामुग्री मांडावी लागते. त्या त्या काळच्या पुरुषांचीं, स्थळांचीं, देखाव्यांचीं, जहाजांचीं, इमारतींचीं चित्रें, मूळ व अस्सल दस्तऐवज, पत्रसंग्रह, हकीकती, निरनिराळीं नाणीं वगैरेंची तर अत्यंत जरूरी असतेच, पण जुनीं ऐतिहासिक स्थळें, किल्ले, संस्था वगैरेंस प्रत्यक्ष भेटी देणेंही रास्त व उपयुक्त असतें. मूळ व अस्सल उतारे हे नेहमींच उत्तम मार्गदर्शक समजले जातात व त्यावरून विद्यार्थ्यांस योग्य तो बोध झाल्याशिवाय रहात नाहीं. कारण हे उतारे थोडे जुनाट व त्यामुळें थोडे चमत्कारिक भासले तरी ते सोपे व तत्कालिन परिस्थिति नीट समजावून घेण्यास व देण्यास बहुमोल व यथायोग्य असतात. त्यामुळेंच विद्यार्थ्यांना–त्यांतल्या त्यांत मोठ्या विद्यार्थ्यांना–ते फार आवडतात व त्यांत त्यांचें मन सदैव रमतें. मात्र हे उतारे योग्य तऱ्हेनें शोधून काढण्यास थोडें कौशल्य लागतें. या उताऱ्यांवरून त्या त्या वेळच्या लोकांच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीची यथार्थ जाणीव होते. तसेंच चित्रांवरूनही लोकांचे पोषाख, उद्योग-धंदे, चालीरीति वगैरे गोष्टींचा बोध होण्यास मदत होते. ऐति-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हासिक स्थळांस भेटी दिल्यानें मुलांस अनेक प्रकारचें ज्ञान प्राप्त होतें; व विद्यार्थ्यांच्या चौकसपणास वाव मिळून तो वाढतो. त्याचप्रमाणें ऐतिहासिक प्रसंगावर उभारलेले वादविवाद व नाट्यरूप संवाद यांमुळें तो तो ऐतिहासिक प्रसंग विद्यार्थ्यांपुढें जिवंतपणें उभा करतां येतो. याशिवाय मुलांच्या हस्तव्यवसायास मार्गदर्शक व उपकारक होणारींही अनेक साधनें आहेत. शिक्षकांनीं आपल्या विद्यार्थ्यांकडून त्या त्या वेळचीं व प्रसंगांचीं चित्रें काढून घेतलीं, घरांचे, होड्यांचे, किल्ल्यांचे, यंत्रसामुग्रीचे कागदी, लाकडी अगर मातीचे उत्तम नमुने तयार करून घेतले तरी त्यांपासूनही मुलांस ऐतिहासिक ज्ञान आपोआप होऊन त्यांस खरा आनंद प्राप्त होईल. निरनिराळ्या प्रकारचे आलेख, कालादर्श, नकाशे प्रत्यक्ष काढवून घेण्यानेंही अमोलिक साहाय्य मुलांस लाभेल. आधुनिक काळांत नभोवाणी, मॅजिक लँटर्न, एपिडायास्कोप, सिनेमा वगैरेंच्या मदतीनें कितीतरी ऐतिहासिक माहिती थोड्या वेळांत व थोड्या श्रमानें विद्यार्थ्यांना मिळूं शकेल. अशा तऱ्हेच्या साधनांचा उपयोग केला असतां इतिहासाच्या अध्यापनांत जिवंतपणा कां येणार नाहीं ? मात्र योजक तितका कुशल व चतुर पाहिजे.

या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन व जितक्या आधुनिक उपलब्ध साधनांचा उपयोग करून घेतां येईल तितका तो करून घेऊन, प्रस्तुत पुस्तक इंग्रजी चौथी व पांचवी या इयत्तांतील व इतर विद्यार्थ्यांकरितां लिहिलें आहे. बहुतेक सर्व आधुनिक तंत्रांचा उपयोग करून मूळ विषय मीं रंगविला आहे. ज्या ज्या तऱ्हांनीं पुस्तक मार्गदर्शकच नव्हे, तर मनोरंजक व चटकदार होईल त्या त्या तऱ्हांनीं तें तसें करण्याचा मीं प्रयत्न केला आहे. भाषा साधी, सोपी व मुलांस सहज समजेल अशी वापरली असून साधारण विद्यार्थ्यांप्रमाणेंच बुद्धिमान् विद्यार्थ्यांच्या बुद्धीलाहि योग्य प्रकारची चालना मिळेल, अशी आशा आहे. विषयाचें विवेचन सहज समजावें अशीच त्याची मुद्देसूद मांडणी केली आहे. प्रत्येक धड्याच्या शेवटीं अनेक प्रकारचे प्रश्न अभ्यासाकरितां व मुलांची विवेचकशक्ति जागृत व्हावी म्हणून दिलेले आहेत. त्यामुळें मुलांच्या हस्तव्यवसायास, नाट्याभिनयास अगर वादविवादांसही वाव मिळण्यासारखा आहे. ते सगळे अगर त्यांतील निवडक प्रश्न वर्गांत अगर अन्य प्रकारांनीं शिक्षकांनीं मुलांकडून करून घेतल्यानेंही उत्तम काम होण्यासारखें आहे. अत्यंत खटपट करून मिळविलेलीं अनेक प्रकारचीं सुमारें शेंदीडशें चित्रें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या पुस्तकांत ठिकठिकाणीं विखुरलेलीं दिसतील. त्यांमुळें मुलांस त्या त्या वेळच्या लोकांचे पोशाख, चालीरीति, खेळ, उद्योगधंदे वगैरे गोष्टींसंबंधीं ज्ञान होण्यास मदत होणारी आहे. शिवाय मूळ व अस्सल उताऱ्यांचीं मराठीमध्यें सुमारें तीस-चाळीस रूपांतरें दिल्यानें पुस्तकाचें महत्त्व वाढलें आहे. त्या त्या युगांतील लोकांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय जीवनावर प्रकाश पाडील, असा अनेक प्रकारचा मजकूर या पुस्तकांत समाविष्ट केल्यानें इंग्रजांच्या राहणींत, जीवनांत, उद्योगधंद्यांत, चालीरीतींत, आचारांविचारांत, युद्धपद्धतींत कसकसा फरक होत गेला, हें विद्यार्थ्यांस सहज समजून येणार आहे. तसेंच प्रत्येक धड्याच्या शेवटीं व अन्य ठिकाणीं सुमारें तीस-चाळीस कालादर्श, वीस-पंचवीस नकाशे व आलेख व निरनिराळे वंशवृक्ष दिल्यानें पुस्तकाच्या अंतरंगाचें सौंदर्य वाढेल असें मला वाटतें. युद्धविषयक कंटाळवाण्या हकीकती अत्यंत आटोपशीर पद्धतीनें सांगितल्यानें त्या मुलांस आवडतील अशी आशा आहे. थोडक्यांत म्हणजे पुस्तकाची उपयुक्तता व सौंदर्य वाढविण्याचा व पुस्तकाचें नांव सार्थ करण्याचा शक्य तों कसोशीचा प्रयत्न केला आहे; तो सर्वांस पसंत पडल्यास मला खात्रीनें जास्त उमेद येऊन आनंद होईल.

पुस्तकाच्या शेवटच्या पानाकडे नजर फेकल्यास एवढें मोठें पुस्तक शाळांतून पाठ्य-पुस्तक असणें योग्य आहे काय, असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होणार. पण हें पुस्तक लहानच आहे हेंच त्याला माझें उत्तर. आजपर्यंत लहान लहान पुस्तकें, मराठी बोधभाषा असूनही, मुलांच्या हातीं दिल्यानें त्यांची दृष्टी आकुंचित करण्याचाच प्रयत्न केला गेला. तसें होऊं नये ही माझी इच्छा. तसेंच या पुस्तकांतील प्रत्येक गोष्ट शिक्षकानें विद्यार्थ्यांस शिकविलीच पाहिजे असें नाहीं. युक्तायुक्त विचार केला व तारतम्य वापरलें तर आपल्या विद्यार्थ्याला कोणता भाग शिकविणें योग्य व कोणता शिकविणें अयोग्य हें शिक्षकाला सहज समजून येणारें आहे. अर्थात् शिक्षकाच्या पसंती-नापसंतीस व त्याच्या निवडीला वाव देणेंही रास्त होतें. शिवाय एखाद्या लोकांच्या सर्वांगीण उन्नतीची व प्रगतीची आधुनिक तंत्रासहित मांडणी करावयाची तर तो मोठाच ग्रंथ होणार आहे. तशांतच चित्रांनीं, उपयुक्त व मार्गदर्शक प्रश्नांनीं व मूळ अस्सल उताऱ्यांनींही व निरनिराळ्या युगांतील ब्रिटिशांच्या सामाजिक, आर्थिक व धार्मिक घडामोडींच्या वर्णनांनींच प्रस्तुत पुस्तकाचीं निम्मीं अधिक पानें व्यापिलेलीं आहेत. आणि ही वाढ अनावश्यक कशी म्हणतां येईल?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या सर्व गोष्टींचा विचार करतां पुस्तक दिसायला मोठें दिसत असलें, तरी त्याची वाढ युक्तच आहे व ज्या हेतूनें तें लिहिलें आहे त्यालाही तें पोषकच आहे. त्यामुळें सर्व प्रकारच्या साधनांनीं व माहितीनें परिपूर्ण असें हें मराठींतील पहिलेंच पाठ्यपुस्तक आहे, असें म्हणणें फारसें धाष्टर्याचें होणार नाहीं असें वाटतें. माझी ही कृती सर्वांस पसंत पडल्यास माझ्या श्रमांचें व माझ्या गेल्या दहा-पंधरा वर्षांच्या अध्यापनक्षेत्रांतील अनुभवाचें चीज झालें असें मी कां समजूं नये ?

इतक्या मोठ्या पुस्तकाची छपाई-प्रकाशनाची जबाबदारी व्यक्तिशः अंगावर घेणें मला शक्य नव्हतें. त्यांतून मला मोकळें केल्याबद्दल मुंबईच्या कर्नाटक पब्लिशिंग हौसचे मालक श्री. मंगेशराव कुलकर्णी यांचे नुसते कोरडे आभार मानून त्यांच्या ऋणांतून मी मुक्त होणार नाहीं. त्यांनीं हरघडी वाटेल त्या प्रकारची मला मदत दिली नसती तर हें पुस्तक माझ्या हातून लिहून तयारही झालें नसतें. लंडनच्या ब्रिटिश म्यूझियमच्या ट्रस्टींनीं व नॅशनल पोर्ट्रेट गॅलरी व सायन्स म्यूझियमच्या डायरेक्टरांनीं मोठ्या उदार अंतःकरणानें अनेक चित्रें या पुस्तकांत घालण्यास परवानगी दिली, याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होणार आहेत. माझे स्नेही श्री. शि. आ. आंबर्डेकर यांनीं सुवाच्य व सुंदर अशी हस्तलिखित प्रत तयार करून दिली, श्री. प. कृ. लेले यांनीं सुंदर चित्रें व रेखीव नकाशे व आलेख तयार करून दिले व श्री. कृ. के. केळकर यांनींही बरींच चित्रें काढून दिलीं, या सर्व कामाबद्दल त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें.

शेवटची विनंती इतकीच कीं, या पुस्तकांत अनेक प्रकारच्या उणीवा, चुका, व दोष राहणें शक्य आहे. पुस्तकाच्या चांगुलपणाचा तेवढा मी फायदा घ्यावयाचा, मग त्यांतील दोषांचा वाटा मी कां घेऊं नये ? अर्थात् त्या सर्वांची जबाबदारी मी माझ्या स्वतःवर अत्यंत संतोषानें घेण्यास तयार आहें. मात्र सर्वांनीं ते मला कळवावे. त्याबद्दल मी त्यांचा शतशः आभारी होईन.

पुणें शहर,
मंगळवार, ता. २ मे १९३९.

वि. सि. चितळे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

		पृष्ठांक
१.	रोमन छत्राखालीं	३–१९
२.	अँग्लो-सॅक्सन छत्राखालीं	२०–३०
३.	थोर आल्फ्रेड : डॅनिश लोकांशीं झगडा	३१–४२
४.	डेन्स लोकांचें वर्चस्व–क्न्यूट	४३–४९
५.	अँग्लो-सॅक्सन घराण्याची अखेर	५०–५६
६.	अँग्लो-सॅक्सन राजवटींत	५७–६५
७.	नॉर्मन घराणें–विजयी विल्यम	६६–७५
८.	विजयी विल्यमनंतरचे नॉर्मन राजे	७६–८६
९.	नॉर्मन काळांतील इंग्लंड	८७–१००
१०.	अँजेव्हिन ऊर्फ प्लँटॅजेनेट घराणें–दुसरा हेन्री	१०१–११०
११.	स्वातंत्र्याची सनद ऊर्फ मॅग्ना कार्टा	११०–१२१
१२.	तिसरा हेन्री–पार्लमेंटची स्थापना	१२२–१२९
१३.	स्कॉटलंडशीं लढा–पहिला एडवर्ड	१३०–१४१
१४.	दुसरा एडवर्ड	१४२–१४६
१५.	शतसांवत्सरिक युद्धास प्रारंभ–तिसरा एडवर्ड	१४७–१६०
१६.	दुसरा रिचर्ड	१६१–१६७
१७.	मध्ययुगांतील धर्माचें वर्चस्व व धार्मिक जीवन	१६८–१७४
१८.	अँजेव्हिन ऊर्फ प्लँटॅजेनेट काळांतील कांहीं ठळक विशेष ...	१७५–१८२
१९.	अँजेव्हिन ऊर्फ प्लँटॅजेनेट राजवटींत	१८३–१९१
२०.	शतसांवत्सरिक युद्धास पुन्हां सुरुवात	१९२–१९९
२१.	गुलाबांच्या युद्धास सुरुवात–सहावा हेन्री	२००–२१२
२२.	यॉर्क घराण्यांतील राजे–गुलाबांच्या युद्धाचा शेवट ...	२१३–२१८
२३.	चौदाव्या व पंधराव्या शतकांतील इंग्लंड ...	२१९–२३१
२४.	नव्या युगाचा उषःकाल	२३२–२४५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

पृष्ठांक

२५. नवविचारांचे कांहीं प्रवर्तक व संशोधक २४६–२५५
२६. अनियंत्रित राजसत्तेची घटस्थापना—सातवा हेन्री ... २५६–२६९
२७. आठवा हेन्री व वूल्सेचा उदयास्त २७०–२८१
२८. युरोपियन धर्मक्रांति व धर्मसुधारणा २८२–२८९
२९. आठवा हेन्री व इंग्लंडमधील धर्मक्रांति २९०–२९७
३०. टॉमस क्रॉम्वेलचा उदय व धर्ममठांचा अस्त २९८–३०५
३१. हेन्रीचा अनियंत्रित कारभार व शेवट ३०६–३१३
३२. धर्मसुधारणेचा विकास ३१४–३२६
३३. धर्मसुधारणेची कलती कमान : इंग्लंडांत पुन्हां कॅथॉलिक धर्म !... ३२७–३३५
३४. धर्मसुधारणेची चढती कमान : प्रॉटेस्टंट पंथ कायम रुजला ... ३३६–३४६
३५. एलिझाबेथ व स्कॉटलंडची राणी मेरी ३४७–३५४
३६. इंग्लिश आरमाराची वाढ : समुद्रावरील कुत्रे ३५५–३६४
३७. एलिझाबेथचें परराष्ट्रीय धोरण : अजिंक्य आरमाराचा धुव्वा ... ३६५–३८०
३८. एलिझाबेथची अखेर ३८१–३८८
३९. एलिझाबेथचा काल : सुवर्णयुग ३८९–३९६
४०. ट्यूडर राजांची अनियंत्रित सत्ता ३९७–४०२
४१. ट्यूडर काळांतील समाजस्थिति ४०३–४०८
४२. ट्यूडर काळांतील उद्योगधंदे व व्यापार ४०९–४१९
४३. ट्यूडर काळांतील लोकांची राहणी ४२०–४४०
आधारभूत ग्रंथांची यादी ४४७–४४८
सूची. १–८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

पृष्ठ

१. ब्रिटनचा मूळ रहिवाशी ३
२. पहिली अग्निकृति ३
३. दगडी कुऱ्हाडी (Trustees of the British Museum) ४
४. शिडांच्या जहाजांची उत्क्रांति (By Courtesy of the Director of the Science Museum) ५
५. भाल्यांचीं टोकें (Trustees of the British Museum) ६
६. ब्रिटनांच्या पूर्वीची वाहतुक (From the Diorama in the Science Museum, London) ७
७. ज्यूलियस सीझर (Trustees of the British Museum) ९
८. रोमन योद्धा ९
९. रोमन जहाजें (By Courtesy of the Director of the Science Museum) १०
१०. बोडेशिया ११
११. रोमन काळची वाहतुक (By Courtesy of the Director of the Science Museum) १२
१२. रोमन युद्धरथ १३
१३. रोमन स्त्री-पुरुष १४
१४. रोमन काळची वाहतुक (From the Diorama in the Science Museum १५
१५. व्हायकिंग योद्धा ३१
१६. व्हायकिंग जहाज ३२
१७. अँग्लो—सॅक्सन नाणीं (Trustees of the British Museum) ३८
१८. समुद्रावरील वाहतुक साधनांतील फरक ६०
१९. सॅक्सन घर ६३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

पृष्ठ

२०. विजयी विल्यम (Trustees of the British Museum) ... ६७
२१. लंडन टॉवर (Trustees of the British Museum) ... ७२
२२. दुसरा विल्यम (Trustees of the British Museum) ... ७६
२३. वेस्ट मिन्स्टर दिवाणखाना ८०
२४. पहिला हेन्री (Trustees of the British Museum) ... ८१
२५. स्टीफन (Trustees of the British Museum) ... ८३
२६. नॉर्मन किल्ला ८९
२७. घरें बांधणींतील फरक ९९
२८. खेड्याची रचना दाखविणारा काल्पनिक नकाशा ९३
२९. बहिरी ससाण्याची शिकार (Trustees of the British Museum) ९७
३०. चेंडूफळीचा खेळ (Trustees of the British Museum) ९८
३१. दुसरा हेन्री (Trustees of the British Museum) ... १०१
३२. पहिला रिचर्ड (Trustees of the British Museum) ... १११
३३. जॉन (Trustees of the British Museum) ... ११३
३४. मॅग्नाकार्टाचा एक भाग (Trustees of the British Museum) ११८
३५. तिसरा हेन्री (Trustees of the British Museum) ... १२२
३६. वेस्ट मिन्स्टर ॲबे १२३
३७. पहिला एडवर्ड (Trustees of the British Museum) ... १३०
३८. पहिल्या एडवर्डनें बांधलेला किल्ला १३५
३९. तेराव्या शतकांतील जहाज (From a model in the Science Museum) १३५
४०. दुसरा एडवर्ड (Trustees of the British Museum) ... १४२
४१. तिसरा एडवर्ड (Trustees of the British Museum) ... १४७
४२. कृष्णकुमाराच्या विजयार्थ नाणीं (Trustees of the British Museum) १५१
४३. तिसऱ्या एडवर्डचीं नाणीं (Trustees of the British Museum) १५४
४४. तिसरा एडवर्ड (Trustees of the British Museum) ... १५५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पृष्ठ

४५. नांगरणी (Trustees of the British Museum) ... १५७
४६. पेरणी (Trustees of the British Museum) ... १६०
४७. कुळवणी (Trustees of the British Museum) ... १६३
४८. दुसऱ्या रिचर्डची शरणागति (Trustees of the British Museum) १६५
४९. कापणी व पेंढ्या बांधणी (Trustees of the British Museum) १७४
५०. टूर्नामेंट (Trustees of the British Museum) ... १७८
५१. डोंबारी खेळ (Trustees of the British Museum) ... १८४
५२. ससाची पारध (Trustees of the British Museum) ... १८५
५३. हॉकीसारखा खेळ (Trustees of the British Museum) १८६
५४. मध्ययुगांतील वाहतुक (From the Diorama in the Science, Museum) १८८
५५. नऊ टांचण्यांचा खेळ (Trustees of the British Museum) १८९
५६. बहिरी ससाण्याची शिकार (Trustees of the British Museum) १९०
५७. कुस्ती (Trustees of the British Museum) ... १९१
५८. चौथा हेन्री (National Portrait Gallery) ... १९२
५९. पांचवा हेन्री (National Portrait Gallery) ... १९५
६०. 'जोस्ट' नामक लटकी लढाई (Trustees of the British Museum) १९८
६१. सहावा हेन्री (National Portrait Gallery) २००
६२. वाहतुकीच्या साधनांतील फरक २०६
६३. सोन्याचीं नाणीं (Trustees of the British Museum)... २११
६४. पांचवा एडवर्ड (Trustees of the British Museum) ... २१६
६५. तिसरा रिचर्ड (National Portrait Gallery)... ... २१७
६६. रानडुकराची पारध (Trustees of the British Museum) २२०
६७. पंधराव्या शतकांतील माग (Trustees of the British Museum) २२२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

पृष्ठ

६८. पायांतील बूट (Trustees of the British Museum) २२५

६९. चॉसर (Trustees of the British Museum) २२७

७०. ईटन शालागृह २२९

७१. वास्को–ड–गामाचें जहाज (By Courtesy of the Director of the Science Museum) २४१

७२. इरॅस्मस २४६

७३. जॉन कॉलेट २४७

७४. सर टॉमस मूर २४८

७५. जॉन गटेन्बर्ग २४९

७६. गॅलीलियो २५१

७७. सँटा मेरिया (From a model in the Science Museum) २५२

७८. वास्को–ड–गामा २५३

७९. सातवा हेन्री (National Portrait Gallery) ... २५६

८०. यॉर्कची एलिझाबेथ (National Portrait Gallery) ... २५६

८१. आठवा हेन्री (Trustees of the British Museum) ... २७१

८२. टॉमस वूल्से (Trustees of the British Museum) ... २७२

८३. आठव्या हेन्रीचें डोव्हरहून फ्रान्सकडे प्रयाण (By Courtesy of the Director of the Science Museum, London) २७६

८४. मार्टिन ल्यूथर २८४

८५. इग्नेशस लायोला... ... ... २८८

८६. टॉमस क्रॅन्मर २९३

८७. धर्मसुधारणेप्रीत्यर्थ आठव्या हेन्रीचें पदक (Trustees of the British Museum) २९४

८८. टॉमस क्रॉम्वेल २९८

८९. धर्मसंरक्षक जथा ३०२

९०. आठव्या हेन्रीचीं नाणीं (Trustees of the British Museum) ३०७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पृष्ठ.

९१. आठव्या हेन्रीचीं आरमारी जहाजें (Trustees of the British Museum) ३०८
९२. 'हेन्री ग्रेस' नामक आठव्या हेन्रीचें मोठें जहाज (Trustees of the British Museum) ३०९
९३. सहावा एडवर्ड (National Portrait Gallery) ... ३१४
९४. धर्ममंदिरांतील बायबल ३१६
९५. मेरी ३२७
९६. मेरी व फिलिप यांची मुद्रा (Trustees of the British Museum) ३३२
९७. एलिझाबेथ (Trustees of the British Museum) ... ३३६
९८. सर विल्यम सेसिल (Trustees of the British Museum) ३३८
९९. जॉन नॉक्स ३४५
१००. स्कॉटलंडची राणी मेरी (Trustees of the British Museum) ३४८
१०१. सर जॉन हॉकिन्स (Trustees of the British Museum) ३५७
१०२. फ्रॅन्सिस ड्रेक (Trustees of the British Museum) ... ३५८
१०३. सर वॉल्टर रॅले (Trustees of the British Museum) ३६०
१०४. गिलबर्ट ३६१
१०५. फ्रॉबिशर ३६१
१०६. सर रिचर्ड ग्रेनव्हिल (National Portrait Gallery) ... ३६२
१०७. 'आर्क रॉयल'—एलिझाबेथच्या आरमारांतील मोठें जहाज (Trustees of the British Museum) ३६३
१०८. लेस्टरच्या आगमनाप्रीत्यर्थ काढलेलें पदक (Trustees of the British Museum) ३६७
१०९. अजिंक्य आरमाशीं युद्ध, १५८८ (By Courtesy of the Director of the Science Museum) ३७२
११०. अजिंक्य आरमाराचा पाठलाग (Trustees of the British Museum) ३७३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पृष्ठ

११११. आरमारी विजयार्थ पदक (Trustees of the British Museum) ३७४
११२. केडीझचा पाडाव १५९६ (By Courtesy of the Director of the Science Museum) ३७५
११३. आरमारी विजयार्थ पदक (Trustees of the British Museum) ३७७
११४. एलिझाबेथ (National Portrait Gallery) ३८६
११५. फिलिप सिडने (National Portrait Gallery) ... ३९३
११६. शेक्सपियर ३९४
११७. मायकेल एन्जेलो ३९५
११८. नांगरणी, पेरणी, कुळवणी (Trustees of the British Museum) ४१०
११९. सराफ कट्टा (Trustees of the British Museum) ... ४१८
१२०. एलिझाबेथकालीन घर ४२१
१२१. ट्यूडर काळची वाहतुक (From the Diorama in the Science Museum) ४२३
१२२. ट्यूडरकालीन गाडी ४२५
१२३. फेरीवाला ४२५
१२४. ट्यूडर कालीन घर ४२७
१२५. ट्यूडरकालीन पलंग ४२८
१२६. मानखोडा ४३०
१२७. पायखोडा ४३०
१२८. अस्वलाची झुंज ४३५
१२९. हॅरो—शालागृह ४३७
१३०. हॅरो—जुना वर्ग... ... ... ४३८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नकाशे – आलेख – अनुक्रमणिका

	पृष्ठें
१ इंग्लंड इ. स. १०६६–१४८५ (नकाशा)	२
२ ट्यूटनांच्या स्वाऱ्यांचे मार्ग (नकाशा)	२१
३ अँग्लो सॅक्सन राज्यें (नकाशा)	२४
४ वेडमोरच्या तहानंतर (नकाशा)	३३
५ दुसऱ्या हेन्रीचें फ्रेंच राज्य (नकाशा)	१०३
६ स्कॉटलंड (नकाशा)	१३३
७ ब्रेटिनीच्या तहानंतर (नकाशा)	१५२
८ राष्ट्रीय धर्माची प्रगति (आलेख)	१६९
९ सहाव्या हेन्रीचा फ्रेंच मुलुख (नकाशा)	२०१
१० लोकसंख्येची वाढ (आलेख)	२२४
११ जगाचा कल्पनिक नकाशा (नकाशा)	२३६
१२ संशोधकांचे जलमार्ग (नकाशा)	२३८
१३ ट्यूडर काळांतील धर्मक्रांति (आलेख)	३४३
१४ एलिझाबेथकालीन संशोधकांचे जलमार्ग (नकाशा) ...	३५९
१५ अजिंक्य आरमाराचा मार्ग (नकाशा)	३७१
१६ राजा व पार्लमेंट यांच्या सत्तेंतील फरक (आलेख) ...	४००
१७ किंमतींतील वाढ दाखविणारा (आदर्श)	४१३
१८ इंग्लंडच्या व्यापाराची वाढ (आदर्श)	४४२
१९ ब्रिटिश राजघराणीं (आदर्श)	४४३
२० ब्रिटिश राजघराणीं (आदर्श)	४४४

वंशवृक्ष

१ अँग्लो–सॅक्सन राजघराणें (इ. स. ८०२–१०६६) ...	१९
२ इंग्लंडचें डॅनिश राजघराणें (इ. स. १०१७–१०६६) ...	४९
३ नॉर्मन घराणें (इ. स. १०६६–११५४)	६५
४ अँजेव्हिन–प्लँटॅजेनेट घराणें (इ. स. ११५४–१३९९) ...	१००
५ लँकॅस्टर व यॉर्क घराणें (इ. स. १३९९–१४८५) ...	१६७
६ ट्यूडर घराणें (१४८५–१६०३)	२३१
७ स्टुअर्ट घराणें (इ. स. १६०३–१७१४)	४४१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पारिभाषिक शब्दांचा कोष

Free holder—मिरासदार

Lord of the Manor—देशमुख, जहागिरदार

Copy-holder—पट्टेदार

Guild—व्यापारीमंडळ

Guild-Hall—संघगृह, महाजनवाडी

Domesday Book—नोंदणी पुस्तक

Act of Praemunire—राज्ञावज्ञेचा कायदा

Act of Supremacy—धार्मिक श्रेष्ठत्वाचा कायदा

Act of Uniformity—एकरूपतेचा कायदा

Commutation—बदला पद्धति

Livery—भडक गणवेश

Maintenance—सांभाळ

Counter Reformation—कॅथॉलिक संघटनेची चळवळ

Pilgrimage of Grace—धर्मसंरक्षक जथा

Bill of Attainder—राजद्रोहाचा कायदा

Feudal System—सरंजामी पद्धति

Manorial court—देशमुखाचें कोर्ट

Scutage—ढालपट्टी

Assize of Arms—हत्यारांचा कायदा

Knight—शिलेदार

Jewry—ज्यू वाडी

Justices of Peace—शांतता-रक्षक अधिकारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रिटिशांचा इतिहास

खंड पहिला

(इ. स. पू. ५५ ते इ. स. १६०३)



पार्लमेंट-गृह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१. रोमन छत्राखालीं

१. पहिलें अश्मयुग :—सुमारें दोन हजार वर्षांपूर्वींची गोष्ट. जगाच्या दोन टोंकांस दोन देश होते. एक हिंदुस्थान व दुसरा ब्रिटन. हिंदुस्थान वैभवाच्या व सुधारणेच्या शिखरावर मोठ्या तोऱ्यानें मिरवत होता; तर इंग्लंड निबिड अरण्यें व रानटी लोक यांनीं भरून गेला होता ! त्या वेळीं सध्यांचीं ब्रिटिश बेटें युरोपला जोडलेलीं होतीं व उत्तर समुद्राच्या जागीं एक मोठें पठार असून ऱ्हाइन नदीनें त्याला नंदनवन बनविलें होतें. टेम्स, हंबर वगैरे सध्यांच्या इंग्लिश नद्या ऱ्हाइनच्या उपनद्या होत्या. तथील हवा नेहमीं चंचल असे. ती कधीं अति ऊष्ण, तर कधीं अति थंड होती. त्या देशांत लोक सहसा राहत नसल्यानें केंसाळ हत्ती, सिंह, वाघ वगैरे हिंस्र पशूंचीच जास्त वस्ती तेथें होती. ज्याला मनुष्य म्हणतां येईल अशीं वानरें मात्र या देशांत भरपूर होतीं. हीं माणसें जंगलांतून रानोमाळ भटकत व खाद्यपेयें हुडकून त्यांवर आपली गुजराण करीत. ते गुहांतून राहात. हळूहळू त्यांच्यांत थोडथोडी सुधारणा होऊं लागून आपले विचार दुसऱ्यास कळविण्याच्या हेतूनें त्यांनीं कांहीं शब्द बोलण्यास सुरुवात केली होती. लाकडाचे तुकडे एकमेकांवर घांसून अग्नि उत्पन्न करण्याची कृति त्यांना माहीत होती. या अग्नीच्या साहाय्यानें थंडीपासून आपल्या शरीराचें ते निवारण करीत,

ब्रिटनचा मूळ रहिवाशी

पहिली अग्निकृती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अन्न शिजवीत व हिंस्र पशूंना भिववीत. पुढें अनेक वर्षांनीं गारेच्या साहाय्यानें ते अग्नि उत्पन्न करूं लागले व दगडांचीं शस्त्रास्त्रें बनवून त्यांच्या साहाय्यानें आत्मसंरक्षण करूं लागले. त्यांना धातु माहित नव्हत्या. भांड्यांकुड्यांकरितांही ते दगडांचाच उपयोग करीत. विणकाम अगर मातीकाम त्यांना येत नसलें तरी दगडांच्या साहाय्यानें मोठमोठ्या दगडांवर अगर खडकांवर दगडानेंच प्राण्यांच्या आकृति ते काढीत असत. या युगांतील रानटी लोक सर्व प्रकारच्या कामाला दगडांचा उपयोग करीत असल्यानें त्या युगाला 'अश्मयुग' असें म्हणतात.


दगडी कुऱ्हाडी

२. दुसरें अश्मयुग:—पुढें अनेक वर्षांनीं वरील स्थितींत फरक पडला. उत्तर ध्रुवाकडून मोठमोठ्या हिमनद्या ब्रिटनच्या बाजूनें वाहात आल्या व त्यामुळें उत्तर समुद्र बनून ब्रिटन देश युरोपापासून भिन्न व अलग झाला. हा फरक केव्हां झाला तें नक्की सांगतां येत नाहीं; परंतु त्यानंतर युरोपांतील कांहीं लोक ब्रिटनमध्यें वसाहत करून राहूं लागले. या लोकांतही फारशी सुधारणा झालेली नव्हती. जुन्या लोकांप्रमाणेंच हे लोकही आपल्या सर्व कामाकरितां दगडांचाच उपयोग करीत असत. दगडांच्या नाना आकृति, धनुष्यांच्या बाणांचीं टोंकें, सुऱ्या, करवती वगैरे सर्व प्रकार दगडांचेच बनविले जात. मातीचीं भांडींकुंडीं करण्याची कृतीही त्यांना माहीत होती. मृत मनुष्यास पुरण्याची चाल त्यावेळीं रूढ होती. जमिनीची मशागत करून धान्य पिकविणें, विणणें, घरें बांधणें वगैरे गोष्टी त्यांस येत असत. हीं माणसें खुजीं असून तीं रंगानें काळसर होतीं. शेतीला उपयुक्त अशा प्राण्यांना व कुत्र्यांना माणसाळवून ते त्यांस जवळ बाळगीत. त्यांस सौंदर्य-दृष्टि मुळींच नव्हती. त्यामुळें त्यांचीं सर्व कामें ओबडधोबडच होत. पंच-महाभूतांची आराधना व उपासना करण्याची त्यांची पद्धति होती. या युगांतील लोकांस 'आयबेरियन' लोक असें म्हणतात. ब्रिटनमध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



शिडांच्या जहाजांची उत्क्रांती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येण्यापूर्वी पश्चिम युरोपांतील बास्क प्रांतांत ते राहात असा विद्वानांचा समज आहे.

३. ताम्रयुग (इ. स. पू. ७५०–४००):–या नंतर पुष्कळ वर्षांनीं व इ. स. पू. २००० च्या सुमारास आर्य लोकांच्या टोळ्या ब्रिटन देशावर स्वाऱ्या करूं लागल्या. आशिया खंडांतून भटकत भटकत हे आर्यवंशीय युरोपांत येऊन राहिले व तेथून ते ब्रिटनमध्यें इ. स. पू. ७५० च्या सुमारास आले असा समज आहे. यांच्या निरनिराळ्या टोळ्या ब्रिटनमध्यें आल्या. पहिल्या टोळींतील लोकांस 'गेल लोक' व दुसऱ्या टोळींतील लोकांस 'ब्रिटन लोक' असें म्हणतात. या सर्व लोकांस 'केल्ट लोक' असेंही नांव आहे. ते आर्यवंशीय असून उंच, धिप्पाड शरीराचे, सुंदर बांध्याचे व गोरे होते. आयबेरियन लोकांचा पराभव करून केल्ट लोकांनीं त्यांस आपलें दास्यत्व पत्करण्यास लाविलें; परंतु पुढें पुढें आयबेरियन व केल्ट लोकांत रोटी-बेटी व्यवहारही सुरू होता असें म्हणतात. केल्ट लोकांना शेतीची आवड असून धान्य पिकवून त्यावर ते आपला उदरनिर्वाह करीत. यांना धातूंचा उपयोग माहीत असून तांबें व कथील यांच्या मिश्रणापासून ब्राँझ नांवाची एक धातु ते तयार करीत असत; या धातूंचीं निरनिराळीं तीक्ष्ण हत्यारें ते बनवीत. यावरून त्या युगाला 'ब्राँझ युग' अथवा 'ताम्रयुग' असेंही म्हणतात. दगडांचा उपयोग या काळांत जवळ-जवळ नाहींसा झालेला होता. मृताला पुरण्याची पद्धति त्यांच्यांत होती. निरनिराळ्या प्रकारचीं हत्यारें, भांडींकुंडीं व दागिनेही उत्तम रीतीनें तयार केले जात. अरण्यांतील एखाद्या सोइस्कर जागीं झोंपड्या बांधून हे लोक गांव वसवीत. या गांवाभोंवतीं खंदकही खणीत. डोंगरी किल्ले बांधण्याची कलाही त्यांना माहीत होती.



भाल्याचीं टोंकें

४. लोहयुग (इ. स. पू. ५००–२००):–ब्रिटनच्या दक्षिणेकडील भागांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जे केल्ट लोक राहत होते ते इतरांपेक्षां जास्त सुधारलेले होते. त्यांना ‘ ब्रिटन ’ म्हणत. यांनीं गेल लोकांचा पराभव करून त्यांना ब्रिटनच्या उत्तर बाजूस हुसकून लावलें. त्यांपैकीं कांहीं आयर्लंडांत गेले. जे गेल लोक अंगास रंग लावीत त्यांस ‘ पिक्ट ’ असें म्हणत व जे आयर्लंडच्या स्कॉशिया प्रांतांत



ब्रिटनांच्या पूर्वींची वाहतुक

राहात त्यांस ‘ स्कॉट ’ असें म्हणत. ब्रिटन लोकांना लोखंडाचा उपयोग माहीत होता. यामुळें ब्रॉंझपेक्षां लोखंडाचाच ते जास्त उपयोग करूं लागले. हत्यारें, भांडीं वगैरेही लोखंडाचींच बनविलेलीं असत. यामुळें त्या काळाला ‘ लोहयुग ’ असें म्हणतात. ब्रिटन लोकांना उत्तम प्रकारची शेती अवगत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होती. गांवें व शहरें वसवून तेथें ते राहत. रस्ते तयार करण्याचा प्रघात त्यांच्यावेळीं सुरू झाला. दररोजच्या व्यवहारांत ते तांब्याच्या व सोन्याच्या नाण्यांचाही उपयोग करीत. घोड्यांच्या रथांतून प्रवास करण्याचा श्रीमान ब्रिटनांस शोक होता. गाई, बैल, कुत्रे, घोडे वगैरे प्राणी ते पाळीत असत. गव्हाची निपज कशी करावी हें ब्रिटनांस माहीत होतें. फोनेशियन लोकांशीं ते व्यापारही करीत. ब्रिटनलोक मोठे शूर व लढवय्ये होते. भाला, बरची, ढाल, तरवार हीं त्यांचीं प्रमुख हत्यारें होतीं. डोक्यास शिरस्त्राणही ते घालीत असत. ब्रिटन लोकांत आपापसांतील यादवी नेहमीं माजे व त्यामुळें त्यांना आपले युद्धरथ नेहमीं सज्ज ठेवावे लागत.

५. धर्म व चालीरीती :–ब्रिटन लोकांच्या धर्मासंबंधींच्या कल्पना थोड्या विचित्र होत्या. ' ओक ' नांवाच्या झाडाला ते फार पवित्र व पूज्य मानीत. त्याचप्रमाणें त्या झाडावर वाढलेल्या ' मिसलटो ' नांवाच्या वेलीसही ते पवित्र मानीत. ' ओक ' वृक्षाच्या छायेंत बसून सर्व धार्मिक विधि व पूजा-अर्चा होई. त्यांच्यांत सूर्योपासना व मूर्तिपूजाही होती. ओक वृक्षाला ' डू ' म्हणत. त्यामुळें त्यांच्या धर्माला ' डुइडपंथ ' व धर्मोपदेशकाला ' डुइड ' असें म्हणत. हा डुइड सर्वगामी होता. धार्मिक विधि चालविणारा तोच, शिक्षण देणारा शिक्षक तोच व वेळ पडल्यास न्यायनिवाडा करणारा न्यायाधीशही तोच! भक्तीनें पूजन करून देवाला प्रसन्न करून घेतलें म्हणजे आपल्याला सुख लागेल अशी त्यांची कल्पना होती. देवादिकांना प्रसन्न करून घेण्याकरितां पशूचा बली देण्याची चाल त्यांच्यांत रूढ होती. माणसांना बळी दिल्यानेंही देव प्रसन्न होतो असें त्यांस वाटत होतें. यामुळेंच लढाईतील कैदी अगर गुन्हेगार यांना मोठ्या समारंभानें ते बळी देत! आत्मा अमर असून मनुष्याच्या मृत्यूनंतर तो परकाया प्रवेश करून अन्य देह धारण करतो अशी त्यांची समजूत होती. धर्मभोळेपणा व अंधश्रद्धा त्यांच्या पांचवीला पूजिलेली असे! अरण्यांत भुतांखेतांची वस्ती असल्यानें तेथील झाडें तोडल्यास त्यांचा आपल्यावर कोप होईल अशी त्यांची समजूत होती. आपलीं शरीरें गोंदवून तीं सुशोभित करण्याची त्यांस हौस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होती. त्याचप्रमाणें लढाईच्या वेळीं निळसर रंग अंगाला लावला तर शत्रु भितो अशी त्यांची खुळी कल्पना होती.

६. रोमन लोकांच्या स्वाऱ्या :—केल्ट व ब्रिटन लोक आपापसांत नेहमीं भांडत असत व एखाद्या टोळीवर शत्रूचा हल्ला आला तरीही त्याला दुसऱ्या टोळींतील लोक सहसा मदत करीत नसत. यामुळें परकीय शत्रूकडून त्यांचा पराभव होत असे. इ. स. पू. ५५ च्या सुमारास रोमन लोकांचा प्रसिद्ध योद्धा ज्यूलियस सीझर यानें गॉल देशावर—सध्यांचा फ्रान्स—स्वारी केली. त्या वेळीं ब्रिटन लोकांनीं त्या देशांतील आपल्या धर्मबांधवांना मदत केली. या गोष्टीनें चिडून जाऊन सीझरनें ब्रिटनवर स्वारी करण्याचें ठरवून दहा हजार सैन्यासह त्यानें ब्रिटनवर स्वारी केली. प्रथमतः ब्रिटन लोकांनीं मोठ्या धैर्यानें रोमन लोकांना किनाऱ्या-वरच थोपवून ठेवलें; परंतु नंतर त्यांचा नाइलाज झाला व सीझर आपल्या सैन्यासह 'डील' नामक बंदरीं उतरला. केंट परगण्यांत सुमारें १५–२० दिवस राहून व ब्रिटन लोकांकडून खंडणी वसूल करून सीझर गॉल देशाला परत आला. ब्रिटन

सीझर

लोकांविषयीं सीझर लिहितो, 'केंट परगण्यांतील ब्रिटन लोक सुधारलेले आहेत. ब्रिटनमधील इतर लोक मागासलेले असून दूध व मांस यांवरच ते उदरनिर्वाह करतात. कपड्यांऐवजीं शरीर झांकण्याकरितां ते कातड्यांचा उपयोग करितात.' पुढल्याच वर्षी (इ. स. पू. ५४) सुमारें वीस हजार सैन्य, दोन हजार घोडे-स्वार व आठशें जहाजें यांच्या साहाय्यानें ज्यूलियस सीझरनें ब्रिटनवर पुन्हां स्वारी केली. या वेळीं कोण-ताही विरोध न होतां सीझर ब्रिटनमध्यें उतरला. कॅसिव्हेलॉनस या ब्रिटनांच्या राजाच्या नेतृत्त्वाखालीं सर्व ब्रिटन लोक एकत्रित झाले; व या शूर लोकांनीं



रोमन योद्धा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सीझरला चांगलीच लढाई दिली. रोमन लोकांची शिस्त उत्तम असल्यानें ब्रिटन लोकांचा पराभव झाला. तेव्हां त्यांच्याकडून खंडणी घेऊन सीझर गॉल देशाला निघून गेला. सीझरनें ब्रिटनमध्यें रोमन वसाहती स्थापन केल्या नाहींत; व त्याच्यानंतर सुमारें शंभर वर्षें ब्रिटनवर रोमन लोकांच्या स्वाऱ्या झाल्या नाहींत. सीझरनें ब्रिटन लोक व त्यांचा देश यांच्यासंबंधीं जी माहिती लिहून ठेविली ती महत्त्वाची आहे.

७. रोमन अंमलाखालीं :—सन ४३ मध्यें रोमन साम्राज्यावर क्लॉडियस नांवाचा बादशाह राज्य करीत असतां ब्रिटन देश जिंकण्याकरितां त्यानें चाळीस हजार सैन्यासह प्लॉटियस नामक सेनानीस ब्रिटनवर पाठविलें. त्यावेळीं ब्रिटनमध्यें कॅरेक्टेकस नांवाचा एक राजा राज्य करीत होता. रोमन हल्ला येणार असें कळतांच त्यानें सैन्याची जमवाजमव केली व रोमन सैन्याशीं निकराचा सामना दिला. दुर्दैवानें त्याचा पराभव झाला व कैदी म्हणून त्याला रोमला धाडण्यांत आलें. ही मोहीम चालू असतां क्लॉडियस बादशाह स्वतः ब्रिटनमध्यें आला होता. कॅरेक्टेकसला रोममध्यें क्लॉडियस-पुढें उभें करण्यांत आलें, तेव्हां त्याचें बाणेदार उत्तर ऐकून त्यानें त्याची फांशीची शिक्षा रद्द करून त्याला कैदेंत टाकलें. वरील विजयानें ब्रिटन देशाच्या दक्षिणेकडील बहुतेक सर्व भाग रोमन साम्राज्यांत समाविष्ट झाला.



रोमन जहाजें

यापुढें सुमारें साडेतीनशें वर्षें हा भाग रोमन साम्राज्यांतच होता. यानंतर हळूहळू हंबर व मर्सी या नद्यांच्या दक्षिणेकडील सर्व भाग रोमन लोकांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काबीज केला. आपलें गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याकरितां ब्रिटन लोक वारंवार प्रयत्न करीत; परंतु त्यांस कधींच यश प्राप्त झालें नाहीं. ब्रिटनचा राज्यकारभार करण्याकरितां व तेथें शांतता स्थापन करण्याकरितां रोमन बादशाह ब्रिटनवर गव्हर्नर नेमीत असत; व सैन्याच्या जोरावर ते आपला कारभार करीत असत.

७. राणी बोडेशिया :—रोमन गव्हर्नर ब्रिटन लोकांवर अतिशय जुलूम करीत असत. त्याच्या निषेधार्थ ब्रिटन लोक चवताळून रोमन लोकांवर हल्लेही करीत. स्वेटोनियस पॉलीनस नांवाचा रोमन सरदार ब्रिटनचा गव्हर्नर असतां रोमन लोकांच्या जुलुमास नुसता ऊत आला होता! ड्रुइड लोकांचें एकच एक आश्रयस्थान म्हणजे अँगल्सी बेट. तें पॉलिनस काबीज करीत होता. तेथील ड्रुइड लोकांच्या एका पवित्रस्थानाचा त्यानें विध्वंस केला व त्या लोकांचे हाल केले. यामुळें ब्रिटन लोकांना भयंकर संताप आला. याच वेळीं इसेनी प्रांताचा राजा प्रेसुटेगस याला पुत्रसंतान नव्हतें. म्हणून त्याचें राज्य रोमन लोकांनीं खालसा केलें व त्याची राणी बोडेशिया हिचा भयंकर अपमान केला. तिच्या मुलींचाही छळ करण्यांत आला. यामुळें बोडेशिया राणीला चीड आली व तिनें आपल्या लोकांस बंडास प्रवृत्त केलें. या बंडाचें नेतृत्व स्वतः राणीनेंच स्वीकारलें; व अँगल्सीच्या युद्धांत पॉलीनस गुंतला असतांच बंडवाल्यांनीं कोलचेस्टरवर हल्ला करून तें शहर उध्वस्त केलें. पुढें बंडवाल्यांनीं लंडन शहराचीही तीच अवस्था केली. हें कळतांच पॉलीनस बंडवाल्यांवर चाल करून गेला, व त्यानें त्यांचा निःपात केला. मानहानी व विटंबना टाळण्याकरितां बोडेशिया राणीनें विषप्राशन करून आत्महत्या केली (सन ६१).



बोडेशिआ

८. ॲग्रिकोला (सन ७८–८५):—या बंडानें रोमन लोक बऱ्याच शहाणपणानें राज्य करूं लागले. सन ७८ मध्यें ॲग्रिकोलाची ब्रिटनचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली. त्यानें उत्तम प्रकारें कारभार हांकला. चांगल्या लोकांच्या सल्ल्यानें वागून त्यानें ब्रिटनमध्यें शांतता निर्माण केली. ब्रिटन लोकांवरील कर त्यानें कमी केले. तो मोठा राजकारस्थानी होता. चांगल्या चांगल्या रोमन कायद्यांची ब्रिटनमध्यें त्यानें अंमलबजावणी करून लोकांना

रोमनकाळची वाहतुक.

निःपक्षपातबुद्धीनें न्याय दिला. ब्रिटनांशीं वागण्याची त्याची पद्धतीही सलोख्याची होती. आपल्या सात वर्षांच्या कारकीर्दीत ॲग्रिकोलानें बहुतेक सर्व उत्तर ब्रिटन, स्कॉटलंडचा कांहीं भाग व उत्तर वेल्स हे प्रांत आपल्या अंमलाखालीं आणले. ठिकठिकाणीं लष्करी–ठाणीं स्थापून उत्तम उत्तम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शहरें वसविण्याचा त्यानें चांगला प्रयत्न केला. नवीन वसविलेल्या शहरांतून ब्रिटन लोकांनीं घरें बांधलीं; नवे नवे रस्तेही तयार केले व आपल्या शेतींत सुधारणा घडवून आणली. ब्रिटन लोकांच्या मुलांच्या शिक्षणाचीही ॲग्रिकोलानें थोडी सोय केली होती. यामुळें त्यांना लॅटिन भाषेचें ज्ञान होऊं लागलें. या सर्व गोष्टींमुळें ॲग्रिकोलाच्या राजवटींत ब्रिटन लोकांमध्यें बरीच सुधारणा झाली असें मानण्यास हरकत नाहीं. त्याची आणखी एक उत्कृष्ट कामगिरी म्हणजे यॉर्कपासून एडिंबरोपर्यंत एक पक्की सडक बांधणें ही होय. त्याचप्रमाणें क्लाइड व फर्थ या नद्यांच्या मधील भागांत त्यानें चांगले बळकट किल्लेही बांधले. सन ८५ मध्यें ॲग्रिकोला रोमला परत गेला. त्याच्यानंतर जे रोमन गव्हर्नर झाले त्यांची कारकीर्द साधारणपणें शांततेची झाली.

९. हॅड्रियनची भिंत (इ. स. १२०):—पुढें सन १२० मध्यें रोमन बादशाह हॅड्रियन यानें ब्रिटनला भेट दिली. त्यावेळीं स्कॉटलंडमध्यें राहणाऱ्या लोकांकडून ब्रिटनवर एकसारखे हल्ले येत. ते थांबविण्याच्या हेतूनें त्यानें टाइन व सॉलवे फर्थ यांना जोडणारी एक भली मोठी भिंत बांधून घेतली. तिच्या



रोमन युद्धरथ

भोंवतीं एक मोठा खंदकही खणण्यांत आला होता. ही भिंत सुमारें ७५ मैल लांब, सतरा फूट उंच व सात फूट रुंद होती; व तिच्या आजूबाजूला सुमारें १०,००० सैनिक ठेवण्यांत आले होते. ब्रिटनमधील रोमन साम्राज्याची ही उत्तर सरहद्द मानण्यांत येत असे. या भिंतीचा अवशेष अजूनही इंग्लंडमध्यें दिसून येतो. या भिंतीला ‘ हॅड्रियनची भिंत ’ असें म्हणतात. या भिंतीमुळें ब्रिटनची उत्तरेकडील बाजू निर्धास्त झाली; व पुढें दोनशें वर्षें उत्तरेकडील रानटी शत्रूपासून रोमन ब्रिटनचें या भिंतीनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संरक्षण केलें. पुढें कांहीं वर्षांनीं ही भिंत नादुरुस्त झाली असतां सेव्हरस या गव्हर्नरनें ती दुरुस्त करून तिला जास्त मजबुती आणली (२१०).

१०. रोमन-साम्राज्याचा नाशः—रोमन लोकांनीं यापुढें सुमारें दोनशें वर्षें ब्रिटनवर सत्ता गाजविली. परंतु तिसऱ्या शतकामध्यें रोमन-साम्राज्याचीं छकलें होऊं लागलीं. त्याचे निरनिराळे प्रांत स्वतंत्र होऊं लागले; व त्यामुळें रोमन साम्राज्याची शक्ति, सामर्थ्य व स्थैर्य यांचा लोप होऊं लागला. तिसऱ्या शतकाच्या शेवटीं शेवटीं ट्यूटन नामक लोकांनीं रोमन साम्राज्या-वर हल्ले करून तें खिळखिळें केलें. याच सुमारास सॅक्सन जातीच्या ट्यूटन लोकांनीं ब्रिटनवर हल्ले चढविण्यास सुरुवात केली. त्यावेळीं रोमन बादशाह-कडून ब्रिटनमधील रोमन गव्हर्नरला मदत मिळेनाशी झाली. सॅक्सन लोकांशीं लढण्याचें सामर्थ्य ब्रिटनमधील रोमन सैन्यांत नव्हतें. व शिवाय खुद्द ब्रिटनमध्यें रोमन लोकांच्या शत्रूंनीं त्यांस सतावून सोडलें. याच सुमारास ट्यूटन लोकांनीं खुद्द इटलींत प्रवेश करून रोम शहरही काबीज केलें; तेव्हां राजधानीच्या संरक्षणाकरितां म्हणून ब्रिटनमधील सर्व रोमन सैनिक रोमला निघून गेले (सन ४१०). रोमन लोकांनीं ब्रिटन सोडल्या-वर तेथें बंडाळी माजली, ब्रिटन लोक असहाय झाले व या स्थितीचा ट्यूटन लोकांनीं पुरेपूर फायदा घेतला.

रोमन स्त्री पुरुष

११. रोमन राज्यकारभाराचें समालोचनः—रोमन लोकांची सत्ता संपुष्टांत आली तरी रोमन लोकांनीं ब्रिटनवर अनेक उपकार करून ठेवले आहेत. देशांत सुराज्य व शांतता नांदत असल्यानें ब्रिटनचा व्यापार वाढला व लंडनला व्यापारी महत्त्व प्राप्त झालें. व्यापाराच्या व दळणवळणाच्या सोयीचे अनेक रस्ते व सडका त्यांनीं बांधल्या. सैन्याच्या हालचालीकरितां या सडका प्रथमतः बांधण्यांत आल्या असल्या तरी त्यामुळें व्यापाराची भरभराट होण्यास मदत झाली. शेतीची सुधारणा झाली व शिसें, लोखंड, कथील वगैरे खनिज संपत्तीची पैदास होऊं लागली. दलदलीच्या प्रदेशाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुधारणा करून व अरण्याची तोड करून त्यांनीं तो प्रदेश लागवडीखालीं आणला. चेसनट, चेरी, पॉपलर, गुलाब, कमळें, कोबी, मटार वगैरे अनेक प्रकारचीं झाडें व भाज्या यांची लागवड रोमन राजवटींत नवीनच होऊं लागली.



रोमन काळची वाहतुक

मोठमोठीं शहरें वसविण्याचा रोमन लोकांचा आवडता छंदच होता. चेस्टर, कोलचेस्टर, यॉर्क, बाथ वगैरे अनेक मोठीं शहरें रोमन लोकांनींच बांधलीं. लंडन शहराची पुनर्रचना करून त्या शहराचें महत्त्व त्यांनीं वाढविलें. या शहरांतून उत्तमोत्तम व सुंदर इमारती, देवळें, तळीं रोमन लोकांनीं बांधून आपलें नांव अजरामर केलें. ब्रिटन लोकांस शिक्षण देऊन त्यांनीं त्यांस सुधारलें. ख्रिस्तीधर्माची स्थापनाही ब्रिटनमध्यें रोमन राजवटींत झाली होती. लंडन, यॉर्क वगैरे अनेक ठिकाणीं ख्रिस्ती धर्ममठ स्थापले गेले होते. ब्रिटन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांनीं रोमन लोकांची भाषा, त्यांच्या उत्तम चालीरिती व त्यांची संस्कृतीही आत्मसात् केली. यामुळें त्यांची सुधारणा झाली. रोमन लोकांची न्यायदानाची पद्धति उत्तम असे. एकंदरींत रोमन राजवटीनें ब्रिटिशांचा फायदा झाला तरी त्यांची राष्ट्रीय-वृत्ति नष्ट करण्यांत आली होती. तसेंच रोमन राजवटींत स्वास्थ्य व शांतता लाभल्यानें ब्रिटन लोकांच्या अंगची वीरश्री नाहींशी होऊन त्यांचा आत्मविश्वास व त्यांचें धाडस लयास गेलें होतें. यामुळें रोमन लोक ब्रिटन सोडून जातांच नवीन शत्रूंना तोंड देण्याचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं न राहिल्यानें त्यांना विपन्नावस्था प्राप्त झाली !

अभ्यास

१. खालील व्यक्तींबद्दल थोडक्यांत माहिती सांगा :—
ज्यूलियस सीझर, ॲग्रिकोला, बोडेशिया, कॅरेक्टेकस.

२. आयबेरियन लोकांसंबंधीं माहिती द्या.

३. केल्ट लोक मूळचे कोठले रहाणारे ? आयबेरियन लोकांपेक्षां ते सुधारलेले होते का ? कशावरून ? फरक स्पष्ट करा.

४. ड्रुइड धर्मासंबंधीं माहिती द्या.

५. ब्रिटन लोकांसंबंधीं माहिती सांगा. हिंदुस्थानांतील आर्य लोक व ब्रिटन लोक यांच्यांत तुम्हांस कोणतें साम्य आढळतें ? स्पष्ट करा.

६. रोमन लोकांसंबंधीं या धड्यांत सांगितलेली माहिती सांगा.

७. हॅड्रियनची भिंत कोणीं बांधली ? तिचा काय उपयोग झाला ? असल्या भिंती आणखी कोणत्या देशांत बांधीत असत ?

८. रोमन राजवटीमुळें ब्रिटिशांचा काय फायदा झाला ? ब्रिटिश अमदानीमुळें हिंदुस्थानचा जो फायदा झाला त्यांत व वरील फायद्यांत कांहीं साम्य आहे का ? स्पष्ट करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उतारे

१. सीझरचें ब्रिटन लोकांसंबंधीं मत

ब्रिटनची हवा समशीतोष्ण आहे. त्या देशांतील ब्रिटन लोक तेथील मूळचे रहिवाशी असावेत. तेथील वस्ती दाट असून ब्रिटन लोक आपलीं घरें गॉल लोकांप्रमाणेंच चांगलीं बांधतात. ते लोक गुरांचे मोठमोठे कळप पाळतात. ससे, कोंबड्या, बदकें, वगैरे प्राण्यांचें मांस खाणें पाप समजण्यांत येत असल्यानें ते प्राणी केवळ करमणुकी करितांच पाळले जातात. जरा अंतर्भागांतील लोक मात्र धान्य न पेरतां दूध व मांस यांवरच आपली उपजीविका करतात. 'केंट' मधील लोक जास्त सुधारलेले दिसतात. ब्रिटन लोक तांबें व सोनें यांचीं नाणीं वापरतात; तरीही विवक्षित वजनाच्या लोखंडाच्या चिपा पैशाच्या ऐवजीं वापरण्याची त्यांच्यांत चाल आहे. ते डोक्यावर लांब केस ठेवतात; त्यांतच लढाईचे वेळीं सर्वांगास निळा रंग ते फांशीत असल्यानें ते फारच क्रूर दिसतात.

प्रश्न :—१ वरील उतारा वाचून ब्रिटन लोकांसंबंधीं तुम्हांस काय वाटतें ?

२ ते लोक कोणाचें मांस खात नसत ? कां ? मध्यभागांतील लोक काय खात ?

३ ब्रिटन लोक कोणत्या धातू वापरीत ? लोखंडावर त्यांची भिस्त कां असे ?

२. बोडेशियान सैनिकांस उद्देशून केलेलें भाषण

रोमन लोकांचा लोभ व त्यांची हाव इतकी वाढली आहे कीं तिच्या तावडींतून आतां कांहींही सुटणार नाहीं. लढाईंत सामर्थ्यवान ठरलेला पक्ष जितपक्षाला लुटतो व लुबाडतो. परंतु सध्यां नामर्द व भ्याड लोकांचीच सद्दी आहे ! व त्यामुळें आपल्या घरांदारांचा सत्यानाश होत आहे, आपल्या डोळ्यांदेखत आपल्या मुलांना ठार करण्यांत येत आहे व आपल्यावर रोमन लष्करांत शिरण्याची सक्ती करण्यांत येत आहे. परंतु दुसऱ्याकरितां लढण्यापेक्षां, स्वतःच्या स्वातंत्र्य-रक्षणार्थ आम्ही आमचे प्राण कां वेचूं नयेत ? आजच्या युद्धांत मारीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंवा मरेन या कृतनिश्चियानेंच मी रणांगणावर जात आहें. हा एका अबलेचा निश्चय आहे. ज्यांना त्याप्रमाणें आज लढायचें नसेल त्यांनीं आजन्म रोमन लोकांचें दास्य खुशाल स्वीकारावें !

प्रश्न :—१ वरील उताऱ्यावरून बोडेशियाबद्दल तुम्हांस काय वाटतें ? कशावरून ?

२ रोमन लोकांनीं कोणकोणते अत्याचार केले होते ? त्यांचा परिणाम काय झाला ?

३ राणीनें कोणता निश्चय केला होता ? तिनें पुरुषांना काय सांगितलें ?

कालादर्श—इ. स. पू. ७३ पासून इ. स. ४१० पर्यंत

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ती	हिंदुस्थान-महत्त्वाच्या गोष्टी
इ.स.पू.७३-२८		राजा देवभूमी; वसुदेव	मगधला कण्व–घराणें स्थापन
इ. स. पू. ५७			विक्रमसंवत् सुरू
इ.स.पू.५५-५४	सीझरची ब्रिटनवर स्वारी	सीझर	
इ. स. ७८	ॲग्रिकोला ब्रिटनचा गव्हर्नर	ॲग्रिकोला, तक्षशिलेचा राजा पहिला कडफायसिस	शालिवाहन शक सुरू पहिल्या कडफायसिसचा मृत्यु
इ. स. १२०	हॅड्रियनची ब्रिटनला भेट	हॅड्रियन; कनिष्क	कनिष्क तक्षशिलेचा राजा
इ. स. २५०	सॅक्सन चाच्यांचे हल्ले सुरू		आंध्रसाम्राज्याचा शेवट.
इ. स. ३२०		चंद्रगुप्त-पहिला गुप्त राजा	गुप्त साम्राज्याची स्थापना
इ. स. ४१०	रोमन लोकांचा ब्रिटनत्याग	कालीदास; फाहाएन चंद्रगुप्त-विक्रमादित्य.	विक्रमादित्याची कारकीर्द (इ. स. २७५–४१३)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१. वंशवृक्ष—अँग्लो-सॅक्सन राजघराणें (इ. स. ८०२–१०६६)



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. अँग्लो-सॅक्सन छत्राखालीं

१. ट्यूटनांचा ब्रिटनमध्यें शिरकाव :—रोमन लोक ब्रिटन देश सोडून गेल्यावर त्या देशांत सर्वत्र गोंधळ व बजबजपुरी माजली. ब्रिटिश लोक सामर्थ्यहीन होऊन त्यांच्यांतील क्षात्रतेज लोप पावलें होतें. अंतस्थ भांडणा-मुळें त्यांच्यांतील एकी नष्ट झाली होती. या संधीचा फायदा घेऊन पिक्ट व स्कॉट लोकांनीं त्यांजवर हल्ल्यांवर हल्ले चढवून त्यांस सतावून सोडलें. रोमन राजवटींत मोठ्या आनंदानें काळ कंठणाऱ्या ब्रिटन लोकांवर एकदम आकाशाची कुऱ्हाडच कोसळली व आपल्या शत्रूंकडून आपलें संरक्षण कसें करावें हें त्यांस समजेना. तेव्हां त्यांनीं रोमन लोकांकडे मदतीची याचना केली; परंतु रोमन लोक स्वतःच्या संरक्षणांत गुंतलेले असल्यानें त्यांच्या-कडून मदत मिळणें दुरापास्त होतें. अशा स्थितींत ब्रिटनांच्या केंटच्या बलाढ्य व्हॉर्टिजर्न राजानें स्कॉट व पिक्ट यांच्या हल्ल्यांपासून संरक्षण करण्याचे हेतूनें ज्यूटन लोकांची मदत मागितली. लगेच सन ४४९ च्या सुमारास हेंजिस्ट व होर्सा या ज्यूट लोकांच्या पुढाऱ्यांनीं आपल्या सैन्यासह केंटमध्यें उतरून व्हॉर्टिजर्नला मदत केली व पिक्ट व स्कॉट लोकांपासून त्यांचें संरक्षण केलें. परंतु त्यानंतर त्यांनीं व्हॉर्टिजर्नशीं लढाई चालू केली. त्यांत व्हॉर्टिजर्नचा पराभव झाला. होर्सा मारला गेल्यानें हेंजिस्ट केंटचा राजा झाला व व्हॉर्टिजर्नला मदत करण्याकरितां आलेल्या ज्यूटन लोकांनीं ब्रिटनमध्यें आपली कायमची वसाहत स्थापन केली.

२. ट्यूटन लोक :—ट्यूटन लोक आर्यवंशीय होते. आशिया खंडांतून भटकत भटकत हे लोक युरोपांत आले व त्यांनीं मध्य युरोप आक्रमून टाकिला. ते गौरकाय, बांधेसूद व धिप्पाड शरीराचे, अत्यंत मजबूत व आडदांड होते. हे सर्व लोक मोठे दर्यावर्दी असून संकटांची फिकीर न करतां उत्तर समुद्रांत चांचेगिरी करीत. आपल्या पुढाऱ्याच्या आज्ञा ते अंतःकरणपूर्वक मानीत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

४१ म/१८(क)
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शब्दाचे पक्के असून आपला देश, आपल्या बायका व मुलें यांवर त्यांची अढळ निष्ठा असे. देशद्रोह व पापाचरण म्हणजे घोर गुन्हे होत अशी त्यांची समजूत असे. पंचमहाभूतांची ते आराधना व उपासना करीत. सूर्य, चंद्र, इंद्र, मेघराज वगैरे त्यांच्या उपास्य देवतांवरूनच आठवड्याच्या



ट्यूटनांच्या स्वाऱ्यांचे मार्ग दाखविणारा नकाशा.

वारांचीं इंग्रजीं नांवें पडलीं असा समज आहे. ते फारसे सुधारलेले नसल्यानें खिस्ती लोक त्यांस रानटी समजत. या ट्यूटन लोकांपैकीं जे लोक जर्मनी-मध्यें गेले त्यांस 'ज्यूट', सॅक्सनीमध्यें गेले त्यांस 'सॅक्सन' व अँगलमध्यें

LIBRARY,
GURUKULA KANGRI.
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेले त्यांना 'आंग्ल' असें म्हणत. ब्रिटनमध्यें आलेल्या लोकांत आंग्ल लोकांचा भरणा फार होता; म्हणून त्या देशाला आंग्ल लोकांचा देश ऊर्फ 'इंग्लंड' असें म्हणण्यांत येऊं लागलें. या सर्व लोकांना अँग्लो-सॅक्सन लोक म्हणत. एकामागून एक असे हजारों लोक इंग्लंडांत आले व त्यांनीं ब्रिटन लोकांचा पिच्छा पुरवून त्यांस देशोधडीस लाविलें.

३. ब्रिटन लोकांची पीछेहाट :—ब्रिटन देश अतिशय सुपीक असून ब्रिटन लोक नेभळे व भित्रे आहेत असें कळतांच अँग्लो-सॅक्सनांचे अनेक हल्ले ब्रिटनवर होऊं लागले. ब्रिटनमध्यें आपल्या वसाहती स्थापून तें राज्य गिळंकृत करण्याकरितां अँग्लो-सॅक्सन लोक ब्रिटनमध्यें आले व हळू हळू बहुतेक सर्व ब्रिटन देश त्यांनीं व्यापून टाकला. आपलें राज्य व स्वातंत्र्य टिकविण्याकरितां ब्रिटन लोकांनीं आटोकाट प्रयत्न केले, पण ते सर्व निष्फळ ठरले. अँग्लो-सॅक्सन लोकांबरोबर त्यांचे जे अनेक युद्धप्रसंग झाले त्यांत त्यांचा पराभव झाला. प्रत्येक वेळीं ते मागें हटत हटत गेले व पश्चिमेकडील वेल्स प्रांताचा आश्रय करून तेथें त्यांनीं आपलें राज्य स्थापन केलें. प्रत्येक पराभवाचे वेळीं अनेक ब्रिटन लोक ठार मारले गेले व जे शत्रूच्या हातीं सांपडले त्यांचा अँग्लो-सॅक्सन लोकांनीं निर्दयपणें शिरच्छेद केला. ब्रिटन लोकांचा समूळ निःपात करण्याचा अँग्लो-सॅक्सनांनीं जणूं चंगच बांधला होता! परंतु ती गोष्ट झाली नाहीं; कारण ब्रिटन लोक वेल्स, कॉर्नवॉल, फ्रान्समधील ब्रिटनी वगैरे प्रांतांत आपल्या स्वातंत्र्याचा उपभोग घेत व अँग्लो-सॅक्सन लोकांशीं झगडत सुमारें दीडशें वर्षें राहिले. वेल्स प्रांतांत ब्रिटन लोक असतांच त्यांचा प्रसिद्ध राजा आर्थर यानें आपलें स्वतंत्र राज्य बरींच वर्षें टिकविलें. राजा आर्थर व त्याचें गोलमेज व शिलेदार यांच्या अनेक आख्यायिका इंग्लिश भाषेंत अजूनही वाचावयास मिळतात. आर्थर अति शूर व दूरदर्शी योद्धा होऊन गेला. त्यानें सॅक्सनांना बरेच वेळां पराभूत केलें. ब्रिटनांपैकीं जे लोक शत्रूला शरण गेले त्यांनीं त्यांचें दास्यत्व स्वीकारून आपले जीव वांचविले. पुढें पुढें ब्रिटन स्त्रियांशीं अँग्लो-सॅक्सन लोकांनीं लग्नेंही केलीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. अँग्लो-सॅक्सन राज्यें :—अँग्लो-सॅक्सन लोकांनीं ब्रिटनांचा पराभव केल्यावर ते आपलीं राज्यें स्थापण्याच्या विचारास लागले. त्यांच्यापैकीं प्रथमतः ज्यूट लोक इंग्लंडांत आले व त्यांनीं केंटमध्यें आपलें राज्य स्थापिलें; त्यानंतर सॅक्सन लोकांनीं इकडे येऊन टेम्स नदीच्या उत्तरेच्या इसेक्स प्रांतांत राज्यकारभार सुरू केला. सरतेशेवटीं येऊन आंग्ल लोकांनीं इंग्लंडच्या ईशान्य भागांत तळ दिला. या सर्व लोकांत पुढें शंभर वर्षें एकसारखा झगडा चालू होता. त्यानंतर मात्र इंग्लंडमध्यें वेसेक्स, मर्शिया, नॉर्दंब्रिया अशीं तीन सामर्थ्यवान् राज्यें स्थापन झालीं. टेम्स नदीच्या दक्षिणेकडील बहुतेक भाग वेसेक्स राज्यांत मोडत असे. नॉर्दंब्रिया-मध्यें इंग्लंडमधील हंबर नदीपासून फर्थ नदीपर्यंतचा भाग होता, व वेसेक्स व नॉर्दंब्रिया यांच्यामध्यें मर्शिया असून बहुतेक सर्व मध्य इंग्लंड त्या राज्यांत सामील होता. या राज्यांचे राजे अधिराजत्वाकरितां आपापसांत एकसारखे झगडत, भांडत व युद्धप्रसंगही करीत. वेसेक्स प्रांतांत सॅक्सन लोकांचें राज्य असून बाकीचीं दोन्ही राज्यें आंग्ल लोकांचीं होतीं. अधि-राज्याकरितां त्यांनीं जे झगडे चालविले त्यांत कधीं मर्शिया, कधीं वेसेक्स, तर कधीं नॉर्दंब्रिया यशस्वी होई. इ. स. ६०० ते ७०० च्या काळांत नॉर्दंब्रिया विशेष सामर्थ्यवान ठरलें व पिक्टांचा व वेल्समधील ब्रिटनांचा पराभव करून तेथील राजानें आपली सरहद्द वाढविली.

५. नॉर्दंब्रियाचें अधिराज्य :—नॉर्दंब्रियाच्या राजांपैकीं एडविन हा राजा मोठा कर्तृत्ववान निघाला. त्यानें आपल्या राज्याची सरहद्द स्कॉट-लंडमधील फर्थ नदीपर्यंत भिडविली. आपल्या नांवानें तेथें त्यानें 'एडिंबरो' नांवाचा एक बळकट किल्ला बांधून एक गांवही वसविला. एडविनचें लग्न केंटच्या राजकन्येशीं—एथलबर्गाशीं—झालें होतें. तिनें ख्रिस्तीधर्म स्वीकारला होता; व लग्न झाल्यावर आपल्याबरोबर कांहीं ख्रिस्ती धर्मगुरू तिनें नॉर्दं-ब्रियामध्यें नेले होते. याच सुमारास पॉलीनस नांवाचा एक ख्रिस्ती धर्मगुरू नॉर्दंब्रियामध्यें आला. तेव्हां सन ६२७ मध्यें एडविननें त्याच्याकडून बातिस्मा घेऊन ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. राजानें ख्रिस्ती धर्म स्वीकारला असें पाहून त्याच्या राज्यांतील अनेक लोकांनींही तो धर्म स्वीकारला. इंग्लंडचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अधिराज असें एडविन स्वतःला म्हणवून घेत असे. परंतु त्याचें अधिराज्य त्याच्या बरोबरच संपलें ! त्यानें इ. स. ६१७–३३ पर्यंत राज्य केलें. एडविननें खिस्तीधर्माचा स्वीकार केला ही गोष्ट अनेकांना रुचली नाहीं व उत्तर वेल्समधील राजानें मर्शियाच्या पेंडा राजाशीं संगनमत करून एडविनशीं हॅटफील्ड येथें लढाई दिली. त्या लढाईंत एडविन मारला गेला



अँग्लो–सॅक्सन राज्यें

व त्याच्याबरोबरच नॉर्दंब्रियामधून खिस्ती धर्माचीही हकालपट्टी झाली (इ. स. ६३३).

६. मर्शीयाचें अधिराज्य :—पेंडा राजानें एडविनचा पराभव केल्यानंतर मर्शीया सामर्थ्यवान् ठरला व अधिराजाचा मान त्याच्याकडे आपोआप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आला. सन ६५५ पर्यंत पेंडानें राज्यकारभार पाहिला. त्याच सालीं तो मरण पावला. त्याच्यानंतर मर्शियाचा मोठा पराक्रमी अधिराज म्हणजे ' ओफा ' होय. या राजानें इ. स. ७५७ पासून ७९६ पर्यंत राज्य केलें व मर्शियाच्या अधिराज्याची सीमा पुष्कळच वाढविली. त्यानें ख्रिस्तीधर्माचा स्वीकार केला होता. रोमचा बादशाह शार्लमान याच्याशीं त्याचा चांगलाच स्नेह होता. तो स्वतःही रोमला गेला होता. इ. स. ७८४ मध्यें चेस्टर व चेपस्टो यांमध्यें त्यानें बळकट खंदक खणला. त्याला ' ओफाचा खंदक ' असें म्हणतात. त्याच्यानंतर मर्शियाचें राज्य जवळजवळ संपुष्टांत आलें.

७. **वेसेक्सचें अधिराज्य**:—आठव्या शतकाच्या अखेरीस वेसेक्सनें डोकें वर काढलें. त्याचा प्रमुख राजा एग्बर्ट होय. इ. स. ८०२ पासून ८३९ पर्यंत त्यानें राज्य केलें. राजा होण्यापूर्वी शार्लमान बादशहाच्या दरबारीं तो राहिला असल्यानें तो मोठा राजकारणकुशल बनला होता. विंचेस्टर ही त्याच्या राज्याची राजधानी होती. तो जसा राजकारणकुशल होता, तसाच शूर व पराक्रमी असल्यानें त्यानें बहुतेक सर्व इंग्लंड पादाक्रान्त केला; व इंग्लंडमध्यें प्रथमच एकछत्री अंमल सुरू केला. वेल्स प्रांतांतील ब्रिटन लोकांकडूनही त्यानें खंडणी वसूल केली होती. त्याच्या हयातींतच डॅनिश लोकांचे हल्ले इंग्लंडवर येऊं लागले; व एग्बर्टला त्यांच्यांशीं झगडावें लागलें. एग्बर्ट मोठा धोरणी व शाहणा राजा होता; व त्यानें राज्यकारभारही उत्तम रीतीनें हांकला. युरोपच्या अनेक राजांशीं त्यानें स्नेहसंबंध जोडून त्यांची मैत्रीही संपादन केली होती. एग्बर्टनें संपादन केलेलें अधिराज्य आणखी बरींच वर्षें टिकलें असतें; परंतु त्याच्या वेळेपासून डॅनिश लोकांचे हल्ले इंग्लंडवर होऊं लागल्यानें वेसेक्सच्या अधिराज्यास ग्रहण लागून त्याच्या अधिराज्याखालील बहुतेक सर्व प्रांत डॅनिश लोकांनीं पादाक्रान्त केले. डॅनिश परचक्राला तोंड देण्याचें भरपूर सामर्थ्य वेसेक्समध्यें असल्यानें तें राज्य मात्र पुढें पुष्कळ वर्षें टिकलें.

८. **अँग्लो-सॅक्सन वर्चस्वाचा काळ**:—अँग्लो-सॅक्सन लोकांनीं इंग्लंड देश पादाक्रांत करून तेथें आपल्या वसाहती कायम स्थापल्या. त्यामुळें ब्रिटन लोक देशोधडीस लागले. अँग्लो-सॅक्सन लोक रोमन लोकां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतके सुधारलेले नसल्यानें रोमन लोकांच्या चांगल्या चांगल्या संस्था त्यांनीं नामशेष केल्या. त्याबरोबरच रोमन लोकांची न्यायदानाची पद्धति नष्ट झाली. त्यांचीं शहरें उध्वस्त होऊन लॅटिन भाषा शिकविणाऱ्या शाळांचा नाश झाला व रोमन लोकांनीं केलेल्या मोठमोठ्या सडकाही नादुरुस्त झाल्या. अत्यंत निर्दयपणानें वागवून त्यांनीं कित्येक ब्रिटनांना कंठस्नान घातलें व कित्येकांना आपले दास बनविलें; परंतु हळू हळू ब्रिटन व अँग्लो-सॅक्सन लोकांत रोटी–बेटी व्यवहार सुरू झाला. आजचे इंग्रज लोक आपल्याला अँग्लो–सॅक्सनांचे वंशज मानतात. अर्थात् त्यांच्यांतील गुण-दोष अँग्लो–सॅक्सनांमधूनच त्यांच्यांत उतरलेले आहेत. अँग्लो-सॅक्सनांची भाषाही प्रभावी ठरली. आजच्या इंग्रजी भाषेची ती जननी समजली जाते. अँग्लो-सॅक्सनांच्या राज्यतंत्राचाही इंग्लंडच्या राज्यकारभारावर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. अँग्लो-सॅक्सन राजे 'वितन' नामक मंडळाच्या साहाय्यानें राज्यकारभार चालवीत असत. हीच परंपरा इंग्लंडमध्यें अजूनही दिसून येते. त्या लोकांनीं खेडेगांवांतही स्वायत्त सत्ता सुरू केली होती व खेडेगांवाच्या सुधारणेकरितां त्यांनीं आटोकाट प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांची खूण अजूनही दिसून येते. दलदलीच्या प्रदेशांतून पाणी काढून टाकून व दाट अरण्यांची खची करून तो प्रदेश अँग्लो-सॅक्सनांनीं लागवडी-खालीं आणला. अशा तऱ्हेनें अँग्लो-सॅक्सन वर्चस्वापासून ब्रिटनचा पुष्कळच फायदा झाला असें म्हणतां येईल. त्या लोकांचे रीतरिवाज, त्यांची भाषा, त्यांची राज्यकारभाराची पद्धति वगैरेंचा इंग्लंडवर इतका पगडा बसला कीं, अजूनही त्यांचे अवशेष ठिकठिकाणीं दिसून येतात.

९. **ख्रिस्तीधर्माचा इंग्लंडांत प्रसार** :—अँग्लो-सॅक्सन राजवटींत जी अत्यंत महत्त्वाची गोष्ट घडली ती म्हणजे ख्रिस्तीधर्माचा प्रसार ही होय. प्रथमतः अँग्लो-सॅक्सन लोक ख्रिस्ती नव्हते. इंग्लंडमध्यें ते आले, त्यावेळीं ब्रिटनमध्यें ख्रिस्तीधर्माचा पुष्कळ प्रसार झाल्याचें त्यांना आढळून आलें. ब्रिटन लोकांनींही आपल्या मनाविरुद्ध तो धर्म स्वीकारलेला होता. इंग्लंडमध्यें आल्यावर अँग्लो-सॅक्सन लोकांनीं ख्रिस्ती लोकांचा छळ करण्यास सुरुवात केली. ख्रिस्ती धर्ममंदिरांचा विध्वंस केला व त्यांची संपत्तीही लुटली. यानंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लंडमध्यें स्थिरस्थावर झाल्यावर निरनिराळ्या अँग्लो-सॅक्सन घराण्यांनीं निरनिराळ्या प्रांतांवर राज्य केलें. त्या काळांत ग्रेगरी हा रोमला पोपच्या गादीवर होता. इंग्लंडमध्यें खिस्तीधर्माची स्थापना करण्याची त्याची तीव्र मनीषा होती; व तो अनुकूल कालाची वाट पहात होता. सहाव्या शतकाच्या अखेरीस केंटच्या राज्यावर एथलबर्ट नांवाचा राजा राज्य करीत असतां अनुकूल संधि प्राप्त झाली व तिचा ग्रेगरीनें फायदा घेण्याचें ठरविलें. एथलबर्टनें बर्था नामक एका फ्रेंच राजकन्येशीं लग्न केलें होतें. ती खिस्ती-धर्माची अनुयायी असल्यानें तिनें आपल्याबरोबर कांहीं खिस्ती पाद्री इंग्लंड-मध्यें केंटला नेले होते. ही संधि साधून पोप ग्रेगरीनें सेंट ऑगस्टीन नामक धर्मगुरूला धर्मप्रसाराकरितां इंग्लंडांत पाठवून दिलें. सन ५९७ मध्यें तो इंग्लंडांत आला. एथलबर्टनें त्याचें योग्य प्रकारानें स्वागत केलें, स्वतः खिस्तीधर्माची दीक्षा घेतली व आपल्या राज्यांत खिस्ती धर्माचा उपदेश व प्रसार करण्याची ऑगस्टीनला मोकळीक दिली; त्यानेंही त्याचा फायदा घेऊन थोड्याच वर्षांत केंट राज्यांतील बहुतेक सर्वांस बातिस्मा देऊन खिस्ती बनविलें. केंट नंतर नॉर्दंब्रियामध्यें धर्मप्रसार पॉलिनसनें केला. त्याचें वर्णन मागें आलेंच आहे.

१०. केल्टिक खिस्ती मिशनरी:—ट्यूटन लोकांनीं इंग्लंडवर हल्ले केले त्यावेळीं अनेक खिस्ती धर्मगुरू आयर्लंडमध्यें जाऊन राहिले होते. त्यांतील सेंट पॅट्रिक नांवाचा एक प्रसिद्ध साधु मोठा कीर्तिवान निघाला. त्यानें खिस्ती धर्मप्रसाराचें काम आपल्या अनेक शिष्यांकरवीं करून घेतलें, अनेक धर्ममठ स्थापन केले व आपल्या धर्माचें तेज तेवत ठेवलें. यावेळीं आयर्लंड मध्यें अनेक उत्तमोत्तम धर्मगुरू निर्माण झाले. सेंट कोलंबा नांवाच्या एका महान् साधूनें आयोना येथें एक मठ स्थापन केला. तेथूनच खिस्ती धर्म-प्रसाराचा ओघ स्कॉटलंडमध्यें व नॉर्दंब्रियामध्येंही वाहत राहिला. नार्दंब्रिया-मध्यें सेंट ऐडन नामक धर्मगुरूनें धर्मप्रसार केला. दक्षिण इंग्लंडमध्यें रोमन खिस्तीधर्माचा प्रसार झाला होता. या दोन्ही धर्मपंथांत फारसा फरक नव्हता. केल्टिक लोक रोमच्या पोपची सत्ता मानावयास तयार नव्हते व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें दोन्ही धर्मपंथांत तेढ उत्पन्न झाली होती. शेवटीं नॉर्देंब्रियाचा राजा ऑसवी यानें व्हिटबी येथें एक धर्मसभा बोलावून केल्टिक व रोमन धर्मगुरूंमध्यें समेट घडवून आणला (सन ६६४); व केल्टिक धर्मगुरूंनीं रोमच्या पोपची सत्ता मान्य केली. हा समेट घडून आल्यानें इंग्लंडमध्यें एकच धर्मगुरू, पोपच्या सत्तेखालीं धर्मप्रसाराचें काम करूं लागला; इंग्लिश लोकांना युरोपीय संस्कृतीचीं व विद्येचीं दालनें खुलीं झालीं व इंग्लंडांतील धर्मपंथांतील दुही नाश पावून त्यांची एकी झाली. यानंतर थिओडोर नामक एका ग्रीक धर्मगुरूची इंग्लंडमध्यें पोपनें रवानगी केली. त्यानें इंग्लिश धर्मपीठाची योग्य ती सुधारणा केली व ठिकठिकाणीं धर्ममठ स्थापून धर्मगुरूंमध्यें शिस्त राखण्याची खटपट केली. या सर्व कामांत त्याला उत्तम यश आलें. इंग्लंडमध्यें कँटरबरी येथें त्यानें एक मुख्य धर्मपीठ व इंग्लंडच्या उत्तरेस यॉर्क शहरीं एक दुय्यम धर्मपीठ स्थापन केलें. या दोन्ही ठिकाणच्या ऑर्चबिशपांची नेमणूक रोमच्या पोपच्या अनुमतीनें व्हावी असें ठरलें. अशा तऱ्हेनें अँग्लो-सॅक्सन काळांत ख्रिस्तीधर्माचा सर्व इंग्लंडभर प्रसार होऊन धार्मिक दृष्टीनें तरी इंग्लंडचें एकीकरण झालें असें म्हणतां येईल.

अ भ्या स

१. ज्यूट, सॅक्सन व आंग्ल लोकांसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.

२. खालील व्यक्तींसंबंधीं थोडी हकीकत सांगा :—
व्हॉर्टिजर्न, एडविन, एग्बर्ट, ओफा, ग्रेगरी, एथलबर्ट.

३. खालील व्यक्तींसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
पॉलीनस, शार्लमन, थिओडर, सेंट पॅट्रिक, ऑगस्टीन, ऑसवी, कोलंबा, हेंजिस्ट, ऐडन, होर्सा, एथलबर्गा, पेंडा.

४. इंग्लंडमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रसार कसकसा झाला ?

५. अँग्लो-सॅक्सन राज्यकारभाराचे इंग्लंडवर काय परिणाम झाले ?

६. इंग्लंडचा नकाशा काढून त्यांत खालील ठिकाणें भरा :—
विंचेस्टर, यॉर्क, कँटरबरी, लंडन, व्हिटबी, हॅटफील्ड.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. अँग्लो-सॅक्सन काळाचा एक लहानसा कालादर्श तयार करा.

८. इंग्लंडचा नकाशा काढून त्यांत ज्यूट, सॅक्सन, पिक्ट, स्कॉट, वेल्स, आंग्ल या लोकांच्या वर्चस्वाखालील प्रदेश दाखवा.

उतारे

१. टॅसिटसनें केलेलें ट्यूटन लोकांचें वर्णन

त्यांचे डोळे निळे व केस तांबडे आहेत. त्यामुळें ते फार उग्र दिसतात. त्यांचीं शरीरें फारच अवजड असून आकस्मिक हल्ल्याच्या उपयोगाचीं आहेत. अर्थात फार श्रमाचें काम त्यांच्याकडून होणेंच अशक्य ! उकाडा व तहान त्यांस असह्य होते; मात्र भूक व थंडी त्यांस चांगलीच मानवते. प्रत्येकजण आपल्या-जवळ एक अरुंद व लहान तोंडाचा भाला नेहमीं बाळगतो. वजनाला तो इतका हलका व त्याची धार इतकी तीक्ष्ण असते कीं वेळ पडेल त्याप्रमाणें त्याचा हमखास उपयोग व्हायचाच. घोडेस्वाराजवळ ढाल व भाला नेहमीं असतो. चिलखतांचा उपयोग मात्र क्वचितच करण्यांत येतो. हे लोक आपल्या आंगाभोवतीं एक पोकळ व सैल असा अंगरखा गुंडाळतात व त्याचीं टोकें चिमट्यानें अगर काट्यानेंही जोडतात. याशिवाय त्यांचें बाकीचें शरीर उघडेंच असतें. स्त्रियाही असाच पोषाक करितात; परंतु त्यांचीं वस्त्रें तागाचीं असून त्यांवर कशिदा व जांभळ्या वेलबुट्या असतात.

प्रश्न :—१. ट्यूटन लोक कसे दिसत ? त्यांच्या भाल्याचें वैशिष्ट्य काय ?
२. ट्यूटन सैनिक कसा दिसे ? त्याच्या पोशाखाचें वर्णन करा.

---

२. सॅक्सनांचे कायदे

१. एकानें दुसऱ्याला ठार मारलें तर त्याला शंभर शिलिंग दंड होईल.

२. एखाद्यानें दुसऱ्याची चोरी केली तर चोरीच्या मालाच्या तिप्पट त्याला दंड होईल; हा दंड व त्याची जप्त केलेली चीजवस्त राजाला मिळेल.

३. जर कोणीं एखाद्याचा डोळा काढला तर त्याचा डोळा काढण्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येईल; दांताला दांत; हाताकरितां हात; पायाकरितां पाय; व जाळला तर जो जाळील त्याला जाळण्यांत येईल.

४. स्वतंत्र नागरिकाला जो पळवील व त्याला विकील त्याला फाशीं देण्यांत येईल.

५. जर कोणीं दुसऱ्याचा बैल चोरला, ठार मारला, विकला तर त्याबद्दल त्यानें त्याला दोन बैल द्यावे; एका मेंढीबद्दल चार द्याव्या; त्याच्याजवळ देण्यासारखें कांहीं नसल्यास त्यानें स्वतःस विकून पैसा उभा करावा.

प्रश्न :—१. त्यावेळीं शिक्षा कोणत्या प्रकारची देण्यांत येई ?
२. त्यावेळीं स्वतंत्र नागरिकाचे हक्क कोणकोणते होते ?

कालादर्श—इ. स. ४००–८००

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ति	हिंदुस्थान–महत्त्वाच्या गोष्टी
इ.स. ४१०	रोमनांचा ब्रिटनत्याग		
४४९	इंग्लिशांचें आगमन	हेंजिस्ट–होर्सा	
४५०			श्वेतहूणांच्या हिंदुस्थानावर स्वाऱ्या.
४५५			स्कंधगुप्त मगधचा राजा होतो.
५००			तोरमण माळव्याचा राजा होतो.
५९७	ऑगस्टीनचें इंग्लंडांत आगमन	ऑगस्टीन; एडविन	
६००			वराहमिहीराचा जन्म.
६०६		हर्षराजा	राजा हर्षवर्धन (६०६-६७४)
६६४	व्हिटबीची धर्मसभा		ह्यूएनत्संगाचा मृत्यु.
७००		भवभूती	भवभूती (७००-७५०)
७५०	(पोपच्या सार्वभौमत्वास आरंभ)		
८००	शार्लमन–रोमन सम्राट	पोप लियो तिसरा; शार्लमन	शंकराचार्य (७८८–८५०)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. थोर आल्फ्रेड : डॅनिश लोकांशीं झगडा

१. नॉर्थमेन ऊर्फ डेन्स :—वेसेक्सचा राजा एग्बर्ट विंचेस्टरला राज्य करीत असतांच इंग्लंडवर एका नवीन शत्रूकडून हल्ले येऊं लागले होते हें मागें सांगितलेंच आहे. सुमारें पांचव्या शतकापासून या लोकांचा ओघ इंग्लंडकडे वळला होता. हळू हळू त्याची वाढ होऊं लागून नवव्या शतकामध्यें सर्व इंग्लंडभर त्यांचा प्रसार होऊन इंग्लिश लोकांच्या पोटांत धडकीच भरली! या नव्या लोकांस 'नॉर्थ मेन' ऊर्फ 'डेन्स' असें म्हणत. नॉर्वे, स्वीडन व डेन्मार्क या देशांत एकाच राजाच्या छत्राखालीं असणारे हे लोक शूर लढवय्ये, धाडसी दर्यावर्दी पण रुधिरप्रिय होते ! दारिद्र्य व वाढती लोकसंख्या यांमुळें त्यांना देशत्याग करावा लागला; व त्यांनीं उत्तर समुद्रांत चांचेगिरीस सुरवात केली. भरपूर उंचीचे, भुऱ्या केसांचे, धिप्पाड शरीराचे डेन्स लोक आपल्या बोटींतून अचानकपणें येत, जाळपोळ व लुटालूट करीत व निघून जात. अशा तऱ्हेनें इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड, फ्रान्स, रशिया वगैरे अनेक देशांवर त्यांची टोळधाड येई व थोड्याच वेळांत तो देश बेचिराख होई ! त्यांचे पाय जमिनीला लागले कीं, प्रथमतः ते घोडे पकडीत व मग त्यांवर स्वार होऊन जाळपोळ, लुटालूट, कत्तल या आपल्या आवडत्या उद्योगास लागत ! इंग्लिश ख्रिस्ती लोकांचा ते फार द्वेष करीत असल्यानें इंग्लंडच्या पूर्व किनाऱ्यावर ते उतरत त्यावेळीं सांपडतील ते धर्मगुरू ते पकडीत, त्यांचा निर्दयपणानें वध करीत, मंदिरांचा

व्हायकिंग योद्धा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विध्वंस करून अपार संपत्ति लुटीत व वाटेंत सांपडणाऱ्या ख्रिस्ती लोकांस कंठस्नान घालून आपल्या देशाला केव्हांच निघून जात! यामुळें ख्रिस्ती लोक इतके भेदरून गेले होते कीं, ख्रिस्ताची प्रार्थना करतांना प्रत्यहीं



व्हायकिंग जहाज

त्याला आळवून म्हणत, "देवा, या क्रूर व राक्षसी डेन्स लोकांपासून आमचें संरक्षण कर." ते ज्या प्रदेशांत असत तेथील नदी-मुखें ते आच्छादित–अर्थात तेथें आपलें सामान लपवून ठेवीत–म्हणून त्यांना 'व्हायकिंग' असेंही म्हणत. त्यांच्यापैकीं कांहीं लोक ग्रीनलंडला व तेथून कांहीं अमेरिकेलाही गेले होते असें म्हणतात!

२. डेन्स लोकांच्या स्वाऱ्या :—सन ७८९ मध्यें या लोकांनीं इंग्लंडवर जोराचा पहिला हल्ला चढविला. त्यावर्षीं 'जिकडे तिकडे वादळें झालीं, विजा चमकूं लागल्या, कृष्णसर्प पाण्यावर उडूं लागले व देशांत अभूतपूर्व दुष्काळानें लोक गांजून निघाले.' त्यानंतर सन ८३९ व ८५५ मध्यें इंग्लंडवर त्यांनीं जोरजोराचे हल्ले केले, व त्यांनीं नॉर्दंब्रियामध्यें आपला तळ दिला व तो कायमचाच. यॉर्क शहर त्यांच्या राजधानीचें नगर होतें. हळू हळू या डॅनिश लोकांनीं नॉर्दंब्रिया, मर्शिया, ईस्ट आंग्लिया, केंट वगैरे राज्यें काबीज करून त्यांनीं आपली सरहद्द वेसेक्सच्या राज्याला भिडविली. असें सांगतात कीं, डेन्स लोकांनीं ईस्ट आंग्लियाचा राजा एडमंड याचा अत्यंत निर्दयपणें खून केला तेव्हां 'रानटी माणसांनीं त्याचा खून केल्यानें तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठा हुतात्मा ठरून लोक त्याला सेंट सेबॅस्टियन म्हणूं लागले.' थोड्याच वेळांत डेन्स लोकांनीं बहुतेक सर्व इंग्लंड आपल्या अधिराज्याखालीं आणला.



वेडमोरच्या तहानें झालेली राज्याची विभागणी

मात्र वेसेक्सनें त्यांना चांगलेंच पाणी दाखवून आपलें स्वातंत्र्य कायम राखलें. इंग्लंडमधील आपापसांतील दुहीमुळेंच डेन्स लोकांचें फावलें!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. वेसेक्सशीं सामना :—इ. स. ८७१ पासूनच डेन्स लोकांचे वेसेक्सच्या राज्यावर हल्ले सुरू झाले होते. त्या सालीं वेसेक्सवर डॅनिश लोकांनीं हल्ला केला तेव्हां वेसेक्सचा राजा एथलरेड यानें मोठें सैन्य जमा करून आपला कर्तबगार व शूर भाऊ आल्फ्रेड याच्या मदतीनें त्यांचा अॅशडाऊन व विल्टन येथें जबरदस्त पराभव केला. त्यामुळें डेन्स लोक चिडून गेले. या लढाईंत एथलरेड मारला गेल्यानें त्याचा भाऊ आल्फ्रेड वेसेक्सचा राजा झाला. मध्यंतरींच्या काळांत डेन्स लोकांनीं पुन्हां जमवाजमव करून सन ८७५ मध्यें वेसेक्सवर पुन्हां जोराचा हल्ला केला. त्यावेळीं आल्फ्रेडचा पराभव होऊन त्याला भटकावें लागलें. परंतु थोड्याच दिवसांत त्यानें पुन्हां आपली चांगली तयारी करून सन ८७७ मध्यें डॅनिश लोकांचा एक्झिटर येथें पूर्ण पराभव केला व डॅनिश लोकांना हुसकून लावलें. पुढच्याच वर्षी डॅनिश लोकांनीं आल्फ्रेडवर जोराचे हल्ले सुरू केले. परंतु आल्फ्रेडनें एथनडन व चिपनहॅम येथील लढायांत डॅनिश लोकांचा पुरा मोड करून डॅनिश लोकांना वेडमोर येथें तह करावयास भाग पाडलें. त्या तहानें डॅनिश लोकांच्या राजानें—गथ्रमनें—खिस्तीधर्म स्वीकारण्याचें कबूल केलें; व दोघांनींही आपल्या राज्याची सरहद्द ठरवून घेतली. यानंतर थोडीं वर्षे शांततेचीं गेलीं. परंतु सन ८८६ मध्यें गथ्रमनें आल्फ्रेडवर पुन्हां स्वारी केली. त्यावेळींही डॅनिश लोकांचा मोठा पराभव झाला. नंतर तह झाला व त्या तहानें मिडलसेक्स, वेसेक्स, मर्शियाचा बराचसा भाग, केंट, लंडन वगैरे भाग आल्फ्रेडला मिळून इंग्लंडचा बाकीचा भाग डेन्स लोकांना मिळाला. या वेळीं डेन्स लोकांच्या राज्याला 'डेनलॉ' असें नांव पडलें. या तहामुळें इंग्लंडमध्यें शांतता निर्माण झाली, आल्फ्रेडला आपल्या राज्यांत निरनिराळ्या सुधारणा करण्यास वेळ मिळाला व डेन्स व इंग्लिश लोकांचें सख्य झाल्यानें ते एकजीव झाले.

४. आल्फ्रेड :—सन ८४९ मध्यें आल्फ्रेडचा जन्म झाला. एग्बर्टचा तो नातू. वयाच्या चौथ्या वर्षी त्याच्या बापानें त्याला रोमला पाठविलें होतें. तेथें तो सुमारें दोन वर्षे राहिला होता. त्यानंतर तो इंग्लंडमध्यें परत आला. सन ८७१ मध्यें त्याचा भाऊ एथलरेड अॅशडाऊनच्या लढाईंत मेल्यावर तो राजा झाला. तो राजा होण्यापूर्वी इंग्लंड दुर्दशेच्या चक्रामध्यें सांपडलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. जिकडे तिकडे डॅनिश लोकांनीं धुमाकूळ माजवून इंग्लिश खेडीं उध्वस्त केलीं, बायका-मुलांच्या कत्तली केल्या, धर्ममंदिरें जमीन-दोस्त करून धर्म-गुरूंना कंठस्नान घातलें व त्यांची संपत्ति लुटली; व कला, विद्या, शिक्षणसंस्था यांचा सत्यानाश केला. अशा असहाय स्थितींत इंग्लंड सांपडलें असतां आल्फ्रेड वेसेक्सचा राजा झाला. प्रकृतिस्वास्थ्य नसतांही न डगमगतां राज्य-कारभाराची धुरा त्यानें आपल्या हातीं घेऊन त्रस्त झालेल्या आपल्या प्रजेला सर्व संकटांतून सोडविलें व उत्तम योद्धा, राजकारणकुशल, उत्तम न्यायाधीश, आपल्या लोकांचा थोर नेता व गुरु व स्वार्थत्यागानें वागून आपल्या प्रजेचें संरक्षण करणारा राजा, अशी त्यानें कीर्ति मिळविली. राज्यपद हातीं आल्या-वर आल्फ्रेडला डेन्स लोकांशीं अत्यंत निकरानें झगडावें लागलें. त्याचें वर्णन वर आलेंच आहे. स्वतःचा पराभव झाला असतां न डगमगतां कांहीं काळ त्यानें अज्ञातवासांतही काढला व त्यानंतर दुप्पट हुरुपानें व तयारीनें डॅनिश लोकांशीं लढून, आपलें गेलेलें राज्य त्यानें परत मिळविलें.

५. आल्फ्रेडचा कारभार :—आल्फ्रेडनें सन ८७१ पासून सन ९०१ पर्यंत राज्य केलें. इंग्लंडांत जे अनेक नामांकित राजे होऊन गेले त्यांत आल्फ्रेडची गणना होते. डेन्स लोकांशीं तह झाल्यावर त्याला देशांत सुधारणा करण्यास वेळ मिळाला. डेन्स लोकांचा पराभव करून त्यानें जी एक गोष्ट साधली ती म्हणजे खिस्तीधर्माचें संरक्षण ही होय. एवढेंच नव्हे तर, जे डॅनिश लोक खिस्तीधर्माचा उच्छेद करीत होते त्यांनाही त्यानें त्या धर्माची दीक्षा दिली. या त्याच्या महनीय कामगिरीमुळें सर्व खिस्तीसमाजा-कडून त्याच्यावर स्तुतीचा वर्षाव होत होता. डॅनिश लोकांशीं लढत असतांच आपले अनेक दोष त्याच्या निदर्शनास आले होते, व ते सुधार-ण्याचा त्यानें निश्चय केला होता. डॅनिश लोकाचें सामर्थ्य त्यांच्या आरमारा-मुळें वाढतें, असें आढळून आल्याबरोबर त्यानें आपलें आरमार सामर्थ्यवान करण्याकरितां शंभर नवीन जहाजें बांधविलीं. त्यांचीं जहाजें 'डॅनिश लोकांच्या जहाजांपेक्षां लांबीनें दुप्पट मोठीं असूनही तीं अत्यंत जलद व संथपणानें चाल-णारीं होतीं.' यामुळें आल्फ्रेडला इंग्लिश आरमाराचा जनक असेंही म्हणतात. आरमाराप्रमाणें आपल्या सैन्याचीही त्यानें उत्तम व्यवस्था लावून दिली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या वेळीं सैन्य असें नव्हतेंच. लढाईच्या वेळीं शेतकऱ्यांनाच सैनिक बनवीत. हें जाणून आल्फ्रेडनें प्रत्येक परगण्यांत सैन्याच्या दोन दोन तुकड्या उभारून त्यांनीं आळीपाळीनें शेतीचें काम संभाळून लष्करी शिक्षण घ्यावें असें ठरविलें. यामुळें युद्धप्रसंगीं लष्कराची तयारी उत्तम राहूं लागली. शत्रूपासून संरक्षण व्हावें म्हणून लंडनभोवतीं व इतर महत्त्वाच्या शहराभोंवतीं तटबंदी केली. पूर्वीचे सर्व कायदे एकत्रित करून त्यानें त्यांचें एक कोड तयार केलें. तो विद्येचा भोक्ता असून विद्वानांचा आश्रयदाता होता. डेन्स लोकांनीं इंग्लिश लोकांच्या धर्ममठांचा विध्वंस केल्यानें शिक्षणाचें कार्य जवळ जवळ बंदच पडलेलें होतें. आल्फ्रेडनें पुन्हां धर्ममठ स्थापन करून त्यांच्याकडून विद्यादान करण्यास सुरवात केली. अनेक शाळा स्थापून तेथें लॅटिन भाषेचा अभ्यास त्यानें सुरू केला. तो स्वतः विद्वान होता. अनेक लॅटिन व ग्रीक ग्रंथांचीं भाषांतरें करून तीं त्यानें प्रसिद्ध केलीं, अनेक उत्तमोत्तम पंडित परदेशांहून इंग्लंडास आणले व त्यांच्याकडून शिक्षणाचें काम करवून घेतलें. त्याला ललितकलांची फारच आवड होती. तो मोठा कल्पकही होता. अनेक प्रकारच्या कल्पना त्यानें लोकांस दिल्या. दररोजची वेळ समजण्याचें साधन त्यावेळीं नव्हतें. आल्फ्रेडनें बरोबर एक तास जळेल एवढी मेणवत्ती तयार करविली व त्यावरूनच त्या वेळीं वेळ ओळखिला जाई. लोकांत चौकसबुद्धि वाढावी म्हणून त्यानें आपल्या प्रजाजनांना प्रवासाची चटक लावून दिली. आपल्या देशच्या व्यापाऱ्यांसही अनेक प्रकारें उत्तेजन देऊन आपला व्यापार त्यानें वाढविला. पूर्वींचा इतिहास त्या वेळीं उपलब्ध नव्हता. ही अडचण ओळखून आल्फ्रेडनें आपल्या वेळचा इतिहास लिहिण्याची प्रथा पाडली. या इतिहासास ' ॲंग्लो-सॅक्सन क्रॉनिकल ' उर्फ ॲंग्लो-सॅक्सन लोकांचा इतिहास असें नांव देण्यांत आलें होतें. त्यामुळें त्या वेळचा इतिहास समजूं लागला. एकंदरींत पाहतां आल्फ्रेडची कारकीर्द लोकांना अतिशय आवडली; व त्यांनीं त्याला ' थोर ' अशी सार्थ पदवी दिली. तो सन ९०१ मध्यें मृत्यु पावला. ' मी सर्व आयुष्यभर अत्यंत नेकीनें वागण्याचा व माझ्यानंतर माझ्या उत्तम कामगिरीची लोकांना आठवण राहावी असा प्रयत्न केला आहे ' असें आल्फ्रेड म्हणत असे. त्याचा हा आत्मविश्वास तंतोतंत खरा ठरला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. **आल्फ्रेडनंतर** :—आल्फ्रेडनंतर त्याचा मुलगा एडवर्ड याला गादी मिळाली. तो मोठ्या जोरदार धोरणाचा असून आपलें राज्य वाढविण्याच्या हेतूनें प्रथमतः त्यानें आपल्या राज्याची मजबुती चालविली. त्याची बहीण एथलफ्रेडा हिचें लग्न मर्शियाच्या राजाबरोबर झालें होतें. तिच्या साहाय्यानें त्यानें डेन्स लोकांचा निःपात करण्याचें ठरवून त्यांच्यावर त्यानें शस्त्र उपसलें. थोडक्याच अवधींत त्यानें बहुतेक सर्व डॅनिश राज्य जिंकून आपल्या राज्याची सरहद्द पुष्कळच वाढविली. एथलफ्रेडा सन ९१८ त मरण पावल्यावर एडवर्डनें सर्व मर्शिया आपल्या राज्यास जोडून घेतला. थोड्याच अवधींत एडवर्डनें डॅनिश मर्शिया, पूर्व आंग्लिया वगैरे प्रांत आपल्या राज्यास जोडून त्याची सरहद्द हंबर नदीपर्यंत नेऊन भिडविली. जो जो भाग एडवर्ड जिंकीत असे तेथें तेथें त्यानें मजबूत किल्ले बांधून तो प्रांत त्यानें निर्भय केला. तो इंग्लिश लोकांचा पहिला राजा म्हणून मान्यता पावला. वेल्स, नॉर्दंब्रिया वगैरे प्रांतांच्या राजांनींही त्याचें मांडलिकत्व स्वीकारलें होतें. त्याला 'एडवर्ड दि एल्डर' ऊर्फ ज्येष्ठ एडवर्ड असेंही म्हणत. तो सन ९२५ मध्यें मृत्यु पावला. त्याला भिऊन अनेक डेन्स लोक फ्रान्समध्यें पळाले व त्यांनीं तेथें एक राज्य स्थापन केलें. त्याच लोकांना पुढें नॉर्मन ही संज्ञा प्राप्त झाली. त्याच्यानंतर त्याचा मुलगा एथलस्टन राज्यावर बसला व त्यानें इ. स. ९२५ पासून ९४० पर्यंत राज्य केलें. तो बापापेक्षांही वरचढ निघाला. सन ९३७ मध्यें डेन्स, स्कॉट, वेल्स या तिघांचाही ब्रनांगवर्ग येथें पुरा मोड करून त्यानें नॉर्दंब्रिया आपल्या राज्याला जोडला. त्याच्या बहिणींचीं लग्नें युरोपांतील निरनिराळ्या राजांशीं झाल्यानें त्याला युरोपीय दरबारीं बराच मान मिळत असे. त्याच्यानंतर त्याचा सावत्रभाऊ एडमंड (इ. स. ९४०–४६) यानें राज्य करून कंबरलंड प्रांत काबीज केला. त्याचा सल्लागार डन्स्टन हा पुढें फारच प्रसिद्धी पावला. त्याच्यानंतर बारा-तेरा वर्षें एकदोन राजांनीं राज्यकारभार केला; व त्यांच्यानंतर सन ९५९ मध्यें एडगर राजा झाला.

७. **शांत एडगर** (इ. स. ९५९–७५) :—त्याचें धोरण शांततेचें होतें. डन्स्टन त्याचा मुख्य सल्लागार होता. बहुतेक सर्व इंग्लिश लोकांनीं त्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

126

ANGLO-SAXON COINS.

1, VIIIth Century Sceat; 2. Offa of Mercia; 3. Æthelberht of East Anglia; 4. Wigmund, Archbp. of York (gold); 5. Alfred of Wessex; 6. Halfdan; 7. Olaf Quaran; 8. Edward the Elder; 9. Æthelred II; 10. Edward the Confessor

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सत्ता मान्य केली होती. वेल्स प्रांतांतील लोकही त्याला शरण येऊन त्यांनीं त्याला दरसाल तीनशें लांडग्यांचीं मुंडकीं खंडणीदाखल देण्याचें ठरविलें! वेल्स प्रांतांत लांडग्यांचा उपद्रव पुष्कळच होत होता, व त्यामुळें त्या देशांत शेतीला वावच नसल्यासारखें झालें होतें. ही अट वेल्स लोकांवर लादल्यानें त्या लोकांमध्यें लांडगे मारण्याबद्दल अहमहमिका सुरू झाली व थोड्याच दिवसांत वेल्स प्रांतांतील बहुतेक लांडगे मारले गेल्यानें तो देश शेतीस उपयुक्त झाला. कित्येक अपराध्यांसही ठराविक लांडग्यांची शिकार करण्याची शिक्षा होत असे. यामुळें शेतीची पुष्कळच सुधारणा झाली. एडगरनें सर्व लोकांस सारखें वागविण्याचें धोरण स्वीकारल्यामुळें डेन्स, सॅक्सन, वेल्स, आंग्ल वगैरे सर्व प्रकारचे लोक त्याच्या राज्यांत अत्यंत समाधानानें राहात असत. मोठमोठ्या अधिकाराच्या जागींही त्यानें डेन्स, सॅक्सन, आंग्ल वगैरे लोक नेमले होते. यावरून तो अत्यंत न्यायी व निःपक्षपाती राजा आहे अशी त्या वेळच्या लोकांची खात्री झाली होती. राज्यकारभारांत त्यानें बऱ्याच सुधारणा केल्या होत्या. कायद्याचें त्यानें एक कोडही तयार केलें होतें. आपल्या राज्यांत न्यायाची अंमलबजावणी योग्य रीतीनें होते किंवा नाहीं हें तो स्वतः हिंडून पहात असे. त्या वेळीं देशांत चोऱ्यामाऱ्या व दरोडे होत नसत. त्यांच्या काळांत इंग्लंडच्या दक्षिण टोकापासून उत्तर टोकापर्यंत आपल्या खिशांत सोन्याचा कसा घेऊन कोणीही गेला तरीही तो सुरक्षित राही असें म्हणतात! एडगर सन ९७५ सालीं मृत्यु पावला. आल्फ्रेडच्या वेळेपासून एडगरच्या मृत्यूपर्यंतच्या काळास ‘ सुवर्णयुगाचा काळ ’ असें म्हणतात.

८. **डन्स्टन** (इ. स. ९२५-८८) :—डन्स्टन हा एक मोठा धर्माधिकारी होऊन गेला. ग्लॅस्टनबरी येथें त्याचा जन्म सन ९२५ मध्यें झाला. तो हळू हळू वाढत जाऊन ग्लॅस्टनबरीचा ॲबट झाला होता. त्यानंतर तो वूर्स्टर व लंडन येथील बिशप व सन ९६० मध्यें कँटरबरीचा आर्चबिशप झाला. त्याच्या सुमारास एक मोठा वाद इंग्लंडमध्यें सुरू झाला होता. धर्माधिकाऱ्यांनीं ब्रह्मचर्य पाळून संन्यस्तवृत्तीनें धर्ममठांतून धर्माचें अध्ययन व अध्यापन करावें असें कांहीं म्हणत; तर कांहीं लोकांचें म्हणणें असें कीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रपंचांत पडूनही परमार्थ साधतां येत असल्यानें धर्माधिकाऱ्यांनीं ब्रह्मचर्य पालन करण्याची अगर संन्यस्तवृत्ति स्वीकारण्याची मुळींच जरूरी नाहीं. डन्स्टननें पहिलें मत ग्राह्य मानलें होतें व तो त्याच तत्त्वाचा नेहमीं पुरस्कार करी. आर्चबिशप झाल्यावर लग्नें करणाऱ्या अनेक धर्मगुरूंना त्यानें आपल्या वृत्त्या सोडावयास लावल्या, डेन्स लोकांनीं उध्वस्त केलेले अनेक मठ पुन्हां स्थापन केले व अनेक धर्ममंदिरांना पैसा पुरविला. तो स्वतः मोठा विद्वान असून त्याला ग्रीक व लॅटिन भाषा येत असत. लोकांस शिक्षण देण्याकरितां त्यानें कांहीं शाळाही स्थापन केल्या. एडगरचा सल्लागार असतांना डेन्स लोकांना आपल्या कारभारापुरतें स्वातंत्र्य देण्याचा सल्ला त्यानेंच एडगरला दिला. डेन्स व इंग्लिश लोकांत सख्य घडवून आणण्याचा त्यानें आटोकाट प्रयत्न केला. धर्मगुरू असूनही ज्यांचीं नांवें मुत्सद्दी म्हणून इंग्लंडच्या इतिहासांत नमूद आहेत त्यांत डन्स्टनची गणना होते. तो सन ९८८ मध्यें मरण पावला.

अभ्यास

१. नॉर्थमेन कोठें राहत? त्यांनीं इंग्लंडवर स्वाऱ्या कां केल्या? त्यांच्यासंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा. त्यांस क्रूर कां म्हणत?
२. आल्फ्रेडचें चरित्र थोडक्यांत द्या.
३. आल्फ्रेडच्या राज्यकारभाराचें वर्णन करून त्याला 'थोर' कां म्हणतात तें सांगा.
४. डेन्स लोकांशीं आल्फ्रेडनें केलेल्या युद्धप्रसंगांचें वर्णन करा.
५. खालील लोकांची कामगिरी सांगा :—
ज्येष्ठ एडवर्ड, एडमंड, डन्स्टन, एडगर.
६. खालील सनांचें महत्त्व सांगा :—
८७१, ८७८, ८८६, ७८९, ९०१, ९३७.
७. आल्फ्रेडच्या कारकीर्दीपासून एडगरच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंतच्या काळाला 'सुवर्णयुग' असें कां म्हणतात? कारणांसह हकीकत सांगा.
८. खालील व्यक्तींसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण हकीकत सांगा :—
एडमंड, एथलरेड, गथ्रम, एथलफ्लेडा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. इंग्लंडचा एक नकाशा काढून त्यांत खालील राज्यविभाग व ठिकाणें भरा :—
यॉर्क, आल्फ्रेडचें राज्य, एक्झिटर, ॲशडाऊन, वेडमोर, एडगरचें राज्य.

उतारे

१. आल्फ्रेडच्या चौदाव्या वर्षी

एकदां काय झालें कीं, आल्फ्रेडच्या आईनें एक कवितांचें पुस्तक आणलें; आणि ती तें आपल्या मुलांस दाखवून म्हणाली, " तुमच्यापैकीं जो हें पुस्तक लवकर अभ्यासून पाठ करील त्याला मी तें बक्षिस देईन. " पुस्तकाचें मुखपृष्ठ फारच सुंदर असल्यानें आल्फ्रेडला तें फारच आवडलें व आईच्या बोलण्यानेंही त्याला फार आनंद झाला; परंतु त्याला एक शंका आली व तो आईला म्हणाला, "आई, खरोखरच का ग तूं हें पुस्तक आम्हांपैकीं कोणाला तरी देणार आहेस ? म्हणजे जो प्रथम व लौकर पाठ करील त्याला तूं देशील ना ? " या प्रश्नानें आईला त्याचें मोठें कौतुक वाटलें व हंसून तिनें आपल्या वरील म्हणण्याला पुष्टि दिली. लगेच आपल्या शिक्षकाकडे जाऊन आल्फ्रेडनें तें अभ्यासिलें व आईला घडाघड पाठ म्हणून दाखवून तिच्याकडून शाबासकी व बक्षिसही मिळविलें. यावरून आल्फ्रेडबद्दल तुम्हांस काय वाटतें ? कशावरून ?

२. आल्फ्रेडच्या अज्ञातवासांत

राजा आल्फ्रेड अज्ञातवासांत काळ कंठीत असतां एके दिवशीं त्याला एक महात्मा स्वप्नांत दिसला व 'तुला तुझें गेलेलें राज्य परत मिळेल' असें त्यानें राजाला सांगितलें. यानंतर थोड्याच दिवसांनीं एक मोठा धाडसी प्रयत्न राजानें केला. एका अत्यंत विश्वासु मित्राला बरोबर घेऊन व स्वतः एका खुषमस्कऱ्याचा पोषाक करून तो डेन्स लोकांच्या राजाच्या छावणींत गेला. खुषमस्कऱ्याला कोठेंही मज्जाव नसेच ! त्यामुळें आल्फ्रेडला सर्वत्र जातां येत असे व प्रत्येक ठिकाणीं जीं खलबतें गुप्तरीतीनें चालत तीं त्याला ऐकावयास मिळत. अशा तऱ्हेनें बरेच दिवस तेथें राहून व डेन्स लोकांचे अनेक गुप्त बेत समजून घेऊन तो आपल्या ठिकाणीं परत आला. तेथें त्यानें आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वामिनिष्ठ सैनिकांबरोबर अनेक खलबतें केलीं व सैन्याची जमवाजमव करून त्यानें अत्यंत बेसावध असतांच डेन्स लोकांवर अचानक हल्ला केला व विजय मिळविला. या गोष्टीवरून आल्फ्रेडच्या ठिकाणीं तुम्हांस कोणकोणते गुण दिसतात? त्या गुणांचा त्याला कसा फायदा मिळाला?

कालादर्श इ. स. ८००–१०००

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ती	हिंदुस्थान–महत्त्वाच्या गोष्टी
८००	डेन्स लोकांचे इंग्लंडवर हल्ले	स्वेन	इ. स. ८१० धर्मपालानें कनोज घेतलें.
८१४	शार्लमनचा मृत्यु.		
८४९	आल्फ्रेडचा जन्म.		
८७१	आल्फ्रेड राजा होतो.	आल्फ्रेड	या काळांत एकछत्री राज्य हिंदुस्थानांत नव्हतें. अनेक लहान लहान राज्यें होतीं.
८७७	एक्झीटरची लढाई	गथ्रम	
८७८	वेडमोरचा तह		
९०१	आल्फ्रेडचा मृत्यु		
९५९	शांत एडगर राजा होतो	डन्स्टन	
९८८	डन्स्टनचा मृत्यु		
१०००			

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. डेन्स लोकांचें वर्चस्व—कन्यूट

१. मूर्ख एथलरेडः—एडगरच्यानंतर त्याचा मुलगा एडवर्ड हा अल्पवयीच वारला. त्याची कारकीर्द छोटी झाली तरी त्यांत धर्माधिकाऱ्यांनीं ब्रह्मचर्य स्वीकारून संन्यस्तवृत्तीनें वागावें किंवा नाहीं या वादानें डोकें वर काढलें; व धर्मगुरूंमध्यें भांडणें सुरू झालीं. शेवटीं आर्चबिशप डन्स्टननें एका क्लृप्तीनें विरोधकांचीं तोंडें बंद करून धर्माधिकाऱ्यांनीं लग्नें करूं नयेत असा निकाल ठरवून घेतला. याच्या कारकीर्दींत प्लेगला सुरुवात झाली. प्लेग इतकाच दुसरा संहारक प्रकार म्हणजे डेन्स लोकांचे इंग्लंडवर हल्ले सुरू झाले, हा होय. याच सुमारास एडवर्डचा खून झाला व त्याचा भाऊ मूर्ख एथलरेड इंग्लंडचा राजा झाला (सन ९७८). इंग्लंडच्या गादीवर जे अत्यंत नालायक राजे बसले त्यांत या राजाची गणना होते. त्याच्या अंगीं अनेक दुर्गुण असल्यानें व शाहण्या लोकांचा सल्ला त्यानें अनेकवार झिडकारल्यानें त्याच्या राज्याचा सत्यानाश झाला. त्याच्या वेळची एकंदर परिस्थितीच वाईट होती. इंग्लंडवर स्थापन केलेलें आपलें राज्य नष्ट झाल्यानें डेन्स लोक चिडून गेले होते; व त्यांनीं इंग्लंड काबीज करण्याकरितां चंग बांधून स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली होती. इंग्लंडमधील नार्दंब्रिया, मार्शिया, वेसेक्स वगैरे राज्यांत आपापसांत वैमनस्यें उत्पन्न होऊन इंग्लंडांत एकीची बेकी झाली होती. डन्स्टननें अनेक सरदारांस स्वातंत्र्य दिलें होतें; त्याचा दुरुपयोग सुरू होऊन ते एथलरेडचा अधिकार मानावयास तयार नव्हते. अशा स्थितींत डेन्स लोकांनीं इंग्लंडवर स्वाऱ्या करण्यास सुरुवात करून इंग्लिशांना 'त्राहि भगवन्' करून सोडलें. मध्यंतरींच्या काळांत डेन्स लोकांनीं आपलें लष्करी व आर्थिक सामर्थ्य वाढविलें व इंग्लंडमधील आपल्या असंतुष्ट जातभाईंना आपल्याकडे वळवून घेऊन एथलरेडला भंडावून सोडलें. अशा स्थितींत मूर्ख एथलरेडनें अनेक चांगल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चांगल्या सल्लागारांस कामावरून दूर केलें. त्यांत डन्स्टनसारखा हुशार मुत्सद्दीही होता. देशांतील इंग्लिश सरदारही विश्वासघातकी निघाले. संकटें येऊं लागलीं म्हणजे तीं एकामागून एक येतात तीं अशीं ! या संकटांतून पार पडण्यास राजाच्या अंगीं जे गुण लागतात ते एथलरेडच्या अंगीं नसल्यानें त्याचा तर नाश झालाच पण त्याबरोबर देशही पारतंत्र्यांत बुडाला !

२. एथलरेड व डॅनिश स्वाऱ्या :—या वेळीं डेन्स लोकांचा राजा स्वेन हा एक प्रभावशाली राजा होऊन गेला. त्यानें इंग्लंडमधील गेलेली सत्ता पुन्हां मिळविण्याचा उद्योग सुरू केला. या वेळीं एथलरेड ख्यालीखुशालींत न रमतां आपल्या सैन्याची व आरामाराची योग्य रीतीनें त्यानें जुळवणी केली असती, तर स्वेनचा त्याला पराभवही करतां आला असता; पण त्याच्या हातून तसें घडलें नाहीं व स्वेनचें फावलें. सन ९८० त डेन्स लोकांच्या इंग्लंडवर स्वाऱ्या होऊं लागल्या व त्या सन ९९१ पर्यंत एकसारख्या होत राहिल्या. प्रत्येक वेळीं एथलरेडची तयारी नसे व डेन्स लोकांचा हल्ला परतविण्याकरितां त्याला लष्करही उभें करतां येईना. तेव्हां त्यानें एक नवीनच युक्ति शोधून काढिली. सन ९९१ मध्यें त्यानें 'डेन्जेल्ड' नांवाचा कर आपल्या राज्यांतील शेतकऱ्यांवर लादला व त्या कराचे पैसे डेन्स लोकांना देऊन त्यानें त्यांस कसेंबसें वाटेस लाविलें ! अशा प्रकारची लांच मिळते असें कळतांच डेन्स लोक इंग्लंडवर अधिकच हल्ले करूं लागले. सन ९९४ त स्वेन राजानें स्वारी करून सुमारें दहा हजार पौंड एथलरेडकडून मिळविले; पैशाकरितां अनेकदां स्वाऱ्या करून स्वेन राजानें एकंदर साडेआठ लक्ष पौंड मिळविले असें म्हणतात ! शेवटीं एथलरेड या त्रासाला कंटाळला व त्यांतून स्वतःची सुटका करून घेण्याकरितां व आपल्याला एखादा मित्र मिळावा म्हणून त्यानें फ्रान्समधील नार्मंडी प्रांतावर स्वारी केली. तेथील राजानें त्याशीं तह करून आपली बहीण इमा हिचें त्याच्याशीं लग्न करून दिलें. पण या पलीकडे त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. शेवटीं डॅनिश हल्ल्यांना कंटाळून जाऊन सर्व डॅनिश लोकांचा कांटा काढण्याकरितां त्यानें एक मूर्खपणाचा डाव टाकला, पण तो त्याच्या अंगाशीं आला. दरसाल नोव्हेंबर महिन्याच्या तेरा तारखेस सेंट ब्राइसची पुण्यतिथी साजरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्यांत येई. सन १००२ च्या वरील उत्सवप्रसंगीं अनेक डेन्स जमले असतां एथलरेडनें त्या सर्वांची कत्तल करविली. त्यांत स्वेन राजाची वहीण गनहिल्डा हीही प्राणास मुकली ! ही वातमी कळतांच स्वेन राजाला अतिशय संताप आला व या गोष्टीचें उट्टें काढण्याकरितां एथलरेडवर हल्ले करण्यास त्यानें सुरवात केली. सुमारें दहा वर्षें हा झगडा चालू राहिला. शेवटीं सन १०१३ मध्यें स्वेननें आपला मुलगा कन्यूट याला बरोबर घेऊन मोठ्या सैन्यासह इंग्लंडवर जोराचा हल्ला केला; व एथलरेडचा पराभव करून त्यानें इंग्लंडचें राज्य मिळविलें. तेव्हां एथलरेड नार्मंडीला पळून गेला. सन १०१४ मध्यें स्वेननें आपल्या नांवानें इंग्लंडमध्यें द्वाही फिरवून तो इंग्लंडचा राजा झाला. पुढें थोड्याच दिवसांनीं स्वेन मेल्यानें त्याचा एकोणीस वर्षांचा मुलगा कन्यूट इंग्लंडचा राजा झाला.

३. एडमंडचा पराक्रम :—कन्यूट इंग्लंडचा राजा झाला ही गोष्ट अनेकांना आवडली नाहीं. त्यांनीं एथलरेडला बोलावणें पाठविलें. त्याप्रमाणें तो इंग्लंडमध्यें आला व कन्यूटच्या सैन्याशीं निकरानें लढून त्यानें त्याला पिटाळून लाविलें (सन १०१५). या जयानंतर एथलरेड थोड्याच दिवसांनीं मेला (१०१६). ही संधि साधून कन्यूट आपल्याबरोबर मोठें सैन्य घेऊन इंग्लंडवर चालून आला. यावेळीं एथलरेडचा मुलगा एडमंड यानें सैन्याची जमवाजमव करून कन्यूटच्या सैन्याशीं मोठ्या धैर्यानें झगडा सुरू केला. शेवटीं सन १०१६ मध्यें एडमंड व कन्यूट यांच्यामध्यें युद्ध चालू असतां एड्रिक स्ट्रेओना यानें विश्वासघात करून एडमंडचा पक्ष सोडला व तो कन्यूटला आपल्या मोठ्या सैन्यानिशीं मिळाला. यामुळें कन्यूटची बाजू जड झाली. तरीही न डगमगतां एडमंडनें कन्यूटशीं झगडा चालू ठेवला. शेवटीं दोघांनाही लढाईचा कंटाळा आल्यानें कन्यूट व एडमंड ह्यांच्यामध्यें ‘आल्ने’ येथें तह झाला. त्या तहानें इसेक्स, वेसेक्स व पूर्व आंग्लिया हे प्रांत एडमंडला मिळून कन्यूटला मर्शियाचें व नॉर्दंब्रियाचें राज्य मिळालें. डेन्जेल्ड कर दोघांनींही वसूल करून कन्यूटनें त्याचा उपयोग करावा असेंही ठरलें. अशा तऱ्हेनें आपल्या बापानें मूर्खपणानें घालविलेलें राज्य एडमंडनें मोठ्या पराक्रमानें मिळवून आपल्या वाडवडिलांचें नांव राखिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्या शौर्यावरून एडमंडला 'वज्रदेही' म्हणत. यानंतर थोड्याच महिन्यांनीं तो मरण पावला (सन १०१६).

४. राजा कन्यूट (इ. स. १०१६–१०३५):—वज्रदेही एडमंड मृत्यु पावल्यानंतर त्याच्या प्रजेनें कन्यूटला आपला राजा म्हणून मान्य केलें. यामुळें कन्यूट इंग्लंडचा राजा झाला. लहानपणीं अत्यंत क्रूर व निर्दय म्हणून कन्यूटची प्रसिद्धी होती. अनेकांचीं नाकें व हात कापून व कित्येकांस कंठस्नान घालून त्यानें अनेकांचीं मनें दूषित केलीं होतीं. परंतु आपल्या पुढच्या आयुष्यांत मोठा धर्मशील, न्यायबुद्धीचा व निःपक्षपाती बनून व आपला कारभार अत्यंत नेमस्तपणानें करून त्यानें चांगलीच कीर्ति मिळविली. प्रथमतः गादीवर आल्यावर एथलरेडच्या कुटुंबियांचा निःपात करून त्यानें आपलें आसन स्थिर केलें. विश्वासघातकी एड्रिक स्ट्रेओनाचाही त्यानें वध करविला. याप्रमाणें आपला मार्ग निष्कंटक करून तो राज्यकारभार करूं लागला. इंग्रजांचें प्रेम संपादण्याकरितां आपल्या डॅनिश लष्कराची त्यानें डेन्मार्कला रवानगी करून स्वसंरक्षणाकरितां फारच थोडी डॅनिश फौज त्यानें इंग्लंडमध्यें ठेवून दिली. एडगरनें केलेले कायदे राज्यांत जारी करून इंग्लिश व डेन्स यांनीं त्याप्रमाणें वागलें पाहिजे असें त्यानें ठरविलें. त्याच्या कारकीर्दीमध्यें इंग्लंडांत एकंदरींत शांतता व स्वास्थ्य नांदत होतें. लोकांपासून त्यानें योग्य कर घेतले व न्यायाची अंमलबजावणी अत्यंत निःपक्षपातबुद्धीनें केली. इंग्लिश व डेन्स लोकांना त्यानें सैन्यांत दाखल करून घेऊन एक खडी फौज निर्माण केली. व्यापारास अनेक प्रकारें उत्तेजन देऊन त्यानें इंग्लंडची आर्थिक स्थिति सुधारली. आपल्या राज्याचे त्यानें चार विभाग पाडून प्रत्येकावर बडे बडे सरदार नेमले. यांपैकीं गॉडविन या एका उत्तम सरदाराची त्यानें वेसेक्स प्रांतावर नेमणूक केली होती. याच्या मदतीचा त्याला पुष्कळच उपयोग झाला. आपल्या उतार वयांत तो धर्मनिष्ठ बनला होता. त्यामुळें त्यानें ख्रिस्ती धर्माच्या प्रसारार्थ बराच प्रयत्न केला. धर्ममठांना त्यानें मोठमोठ्या देणग्या दिल्या, धर्ममंदिरें बांधलीं व दानधर्मही पुष्कळ केला. डेन्मार्कमध्यें ख्रिस्तीधर्माचा प्रसार होण्याचें पुष्कळसें श्रेय कन्यूटलाच दिलें पाहिजे. सन १०२७ मध्यें तो रोमलाही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेला होता व त्यानें पोपशीं सख्य जोडलें. त्याचें परराष्ट्रीय धोरणही जोरदार होतें. नॉर्वे देश जिंकून त्यानें आपल्या राज्याला जोडला. स्कॉटलंडचा राजा माल्कम याच्याबरोबर युद्ध करून त्यानें त्यास आपलें मांडलिकत्व स्वीकारण्यास लावलें. तसेंच स्वीडनच्या सरदारांस लांच भरून त्यांना आपल्या अंकित केलें. अशा तऱ्हेनें राज्यकारभार करून तो सन १०३५ मध्यें मरण पावला.

५. हॅरोल्ड व हार्डी कन्यूट :—कन्यूटला दोन राण्या होत्या. त्याच्या पहिल्या बायकोपासून त्याला स्वेन व हॅरोल्ड असे दोन मुलगे झाले. इंग्लंडचें राज्य मिळाल्यावर एथलरेडची बायको इमा हिच्याशीं त्यानें पुनर्विवाह केला होता, व तिच्यापासूनही त्याला हार्डी कन्यूट नांवाचा मुलगा झाला होता. त्यांपैकीं स्वेननें नॉर्वेचें राज्यपद स्वीकारल्यानें हॅरोल्ड इंग्लंडचा राजा झाला. परंतु हार्डी कन्यूटशीं भांडण टळावें म्हणून त्यानें कन्यूटच्या राज्याची विभागणी करून हॅरोल्डनें मर्शिया, पूर्व आंग्लिया व नार्दंब्रिया या प्रांतांवर राज्य करावें व हार्डी कन्यूटनें वेसेक्सवर राज्य करावें असें ठरलें. या वेळीं हार्डी कन्यूट डेन्मार्कमध्यें मजा मारीत होता. इंग्लंडच्या राज्याचा भाग मिळूनही तो इंग्लंडमध्यें आला नाहीं. तेव्हां हॅरोल्डच इंग्लंडचा राजा झाला. परंतु तो सन १०४० मध्यें वारला. तेव्हां हार्डी कन्यूट इंग्लंडला आला व तो इंग्लंडचा राजा झाला. तो अत्यंत क्रूर व जुलमी होता. त्यामुळें त्याची प्रजा अत्यंत कंटाळून गेली. सन १०४२ मध्यें तो एकाएकीं वारला. त्याच्यानंतर एडवर्ड हा इंग्लंडचा राजा झाला.

अभ्यास

१. एथलरेड इंग्लंडचा राजा झाला त्या वेळची इंग्लंडची परिस्थिति वर्णा.

२. एथलरेडच्या अंगचे दुर्गुण सांगा. त्यामुळें त्याजवर कोणते प्रसंग ओढवले ?

३. स्वेन राजानें इंग्लंडवर हल्ला कां केला ? त्याचे परिणाम काय झाले ?

४. राजा कन्यूटच्या कारकीर्दीची हकीकत थोडक्यांत सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. आल्फ्रेड व कन्यूट यांत श्रेष्ठ कोण ? कारणें द्या.

६. खालील व्यक्तींबद्दल एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा. डन्स्टन, गनहिल्डा, एड्रिक स्ट्रेओना, माल्कम, इमा, हॅरोल्ड, हार्डी कन्यूट.

७. (अ) एडमंडच्या पराक्रमाचें वर्णन करा. (आ) डेन्जेल्ड म्हणजे काय ? त्याला कोणीं सुरवात केली ? त्याचा परिणाम काय झाला ? अशाच तऱ्हेचा कर हिंदुस्थानांत कोणी लादला होता काय ?

८. अँग्लो-सॅक्सन घराण्याची वंशावळ सनांसकट तुमच्या वहींत लिहा.

९. कालक्रम लक्षांत घेऊन पुढील नांवें लिहा :—
स्वेन, डन्स्टन, इमा, एड्रिक, एथलरेड, हॅरोल्ड, कन्यूट.

१०. खालील कालादर्श पूर्ण करा:—

कालादर्श—इ. स. ९५०–१०४२

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	प्रमुख व्यक्ती	हिंदुस्थान–महत्त्वाच्या गोष्टी
९८०			
९९१			
१००२			१००१–१०२४
१०१४			
१०१६			
१०३५			१०२५
१०४२			

कन्यूटची गोष्ट

राजा कन्यूट अत्यंत न्यायी व सत्यप्रिय होता. एके दिवशीं आपल्या दरबारी लोकांसह तो समुद्रकिनारीं सहल करीत असतां त्यांनीं त्याचें ऐश्वर्य व सामर्थ्य यांची अवास्तव स्तुति चालविली. एकानें तर असें दडपून सांगितलें कीं समुद्र व वाराही त्याचे हुकुम मानील ! कन्यूटला हा तोंडपुजेपणा आवडला नाहीं; व त्यांना धडा शिकविण्याच्या हेतूनें त्यानें एकास खुर्ची आणावयास सांगून ती समुद्राच्या कांठीं ठेवविली. लगेच त्यानें समुद्राला हुकुम केला, "हे सागरा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मी तुझा स्वामी आहें ! तेव्हां माझा तुला असा हुकुम आहे कीं तुझ्या लाटांनीं माझे पाय भिजतां कामा नये !" परंतु त्याचा कांहींही उपयोग न होतां समुद्राच्या लाटा एकसारख्या त्याच्या अंगावर उसळूं लागल्या ! हें पाहून त्याचे दरबारी हांजीखोर खजील झाले. तेव्हां राजा त्यांस म्हणाला, 'मी मोठा असेन परंतु माझ्यापेक्षांही एक मोठी शक्ती आहे; व ती म्हणजे परमेश्वर. तोच या जगाचा खरा मालक.'

प्रश्न १.— कन्यूटनें आपल्या दरबारी लोकांस कोणती महत्त्वाची गोष्ट शिकविली व त्यांना कोणता धडा दिला ? हा धडा शिकविण्याचें कारण काय ?

२. वंशवृक्ष—इंग्लंडचें डॅनिश राजघराणें



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. अँग्लो-सॅक्सन घराण्याची अखेर

धर्मशील एड्वर्ड (१०४२–६६) : हेस्टिंग्जची लढाई.

१. धर्मशील एडवर्ड :—एथलरेड राजाला इमा राणीपासून झालेला एडवर्ड, हार्डी कन्यूटनंतर इंग्लंडच्या गादीवर बसला. हार्डी कन्यूटचा जुलमी राज्यकारभार इंग्रजांना पसंत पडला नाहीं; व त्यामुळें इंग्लंडच्या गादीवर इंग्रज असावा म्हणून एडवर्डची निवडणूक झाली. गादीवर आला त्यावेळीं तो चाळीस वर्षांचा होता. त्याची आई नॉर्मन घराण्यांतील होती; त्यामुळें त्याचें बहुतेक सर्व बालपण नॉर्मंडीमध्येंच गेलेलें होतें; त्यामुळें तेथील रीतरिवाज त्यानें उचलले व आत्मसात केले. जन्मानें इंग्रज असला तरी शिक्षणानें तो नॉर्मन होता. अनेक नॉर्मन सरदार व धर्मगुरू त्याचे स्नेही व चाहते बनले होते. एडवर्डला इंग्लंडचें राज्यपद मिळालेलें पाहतांच त्या सर्वांना अत्यंत आनंद झाला व स्वार्थ साधण्याकरितां अनेक नॉर्मन सरदार व धर्मगुरू इंग्लंडमध्यें आले. हळू हळू एडवर्डनें अनेक नॉर्मन सरदारांना इंग्लंडमधील जमिनी दिल्या व मोठमोठ्या जागांवर व अधिकाराच्या ठिकाणीं त्यानें नॉर्मन लोक नेमले. नॉर्मन धर्मगुरूंनाही इंग्लंडमध्यें नव्या नव्या अधिकाराच्या जागा मिळून त्यांच्या वृत्ति सुरू झाल्या. एवढेंच नव्हे तर दरबारची भाषाही फ्रेंच ठरून इंग्लंडांत फ्रेंच भाषेला महत्त्व येऊं लागलें. एरव्हीं एडवर्ड अत्यंत धर्मशील, मोठ्या उदार अंतःकरणाचा व दयाळू होता. परंतु इंग्लंडमध्यें नॉर्मन लोकांचा सुळसुळाट होत असलेला पाहून इंग्रजांना वाईट वाटूं लागलें व त्यांच्यामध्यें नॉर्मन विरोधी असा एक पक्ष बळावत चालला. या नॉर्मन विरोधि पक्षाचा मुख्य नेता गॉडवीन होता.

२. अर्ल गॉडविन :—गॉडविनचा जन्म एका उच्च कुळांत झालेला होता. मोठा योद्धा म्हणून त्याची कीर्ति होती. त्यामुळें कन्यूट राजाची त्याच्यावर बहाल मर्जी होती. कन्यूट ज्या वेळीं डेन्मार्क अगर रोमला गेला त्यावेळीं गॉडविननेंच राज्यकारभार पाहिला होता. गोथा नामक कन्यूटच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बहिणीशीं त्यानें लग्न केलें होतें. कन्यूटच्या वेळींच त्याला वेसेक्सचा अर्ल करण्यांत आलें होतें. कन्यूटच्या मृत्यूनंतर हॅरोल्ड व हार्डी कन्यूट यांच्यामध्यें इंग्लंडच्या गादीबद्दल वाद माजला असतां गॉडविननें हार्डी कन्यूटच्या हक्काचा पुरस्कार केलेला होता. धर्मशील एडवर्डला गादी मिळवून देण्यांतही त्यानें पुढाकार घेतलेला होता. हें स्मरून असो किंवा अन्य कारणानें असो एडवर्डनें गॉडविनची मुलगी एडिथ हिच्याबरोबर लग्न केलें व तिच्या भावांना मोठमोठ्या सरदारक्याही दिल्या. या गोष्टीमुळें गॉडविनचें प्रस्थ इंग्लंडांत पुष्कळ माजलें. एडवर्डवर गॉडविनचें वजन चांगलेंच होतें. एडवर्ड मोठा धर्मशील असल्यानें दररोजच्या धार्मिक प्रार्थना व अनेक धर्मविधि यांतच त्याचें मन सदैव गुरफटलेलें असे. शिवाय नवीं नवीं धर्ममंदिरें बांधण्यांत त्यानें पुष्कळ पैसा खर्च केला होता. लंडनचें सुप्रसिद्ध मंदिरही–वेस्ट मिन्स्टर ॲबे–एडवर्डनेंच बांधण्यास सुरुवात केली होती. या त्याच्या धर्मनिष्ठेचें गॉडविनला फारसें वाटलें नाहीं. परंतु राजानें राजदरबारीं नॉर्मन लोकांचें प्रस्थ माजूं दिल्यानें इंग्रज लोक मागें पडतील असें त्यास वाटूं लागलें होतें. त्याच्या या देशभक्तीच्या बुडाशीं त्याचा स्वतःचा स्वार्थही असणें साहजिक होतें. तेव्हां राजाच्या धोरणाचा उघड उघड निषेध करून त्यानें नॉर्मनविरोधी पक्ष इंग्लंडांत सुरू केला. यामुळेंच राजाची त्याच्यावर गैरमर्जी होऊं लागली; ती आणखी एका गोष्टीनें जास्तच वाढली.

३. गॉडविनची हद्दपारीः—एडवर्डचा मेहुणा–बहिणीचा नवरा-यूस्टेस हा डोव्हर शहरीं असतां तेथील लोकांनीं आपल्या शिपायांस शिधासामुग्री फुकट द्यावी अशी इच्छा त्यानें प्रदर्शित केली व त्याप्रमाणें त्याचे लोक शिधा मागूंही लागले. डोव्हरच्या लोकांना ही गोष्ट न पटून त्यांनीं लढण्याची तयारी दाखविली. तेव्हां मारामारी होऊन अनेक लोक जखमी झाले. डोव्हर केंट परगण्यांत मोडत होतें; व त्या परगण्यावर गॉडविनचा अधिकार चालू होता. तेव्हां वरील हकीकत कळल्यावर ‘डोव्हरच्या लोकांस शिक्षा करा’ असा राजानें गॉडविनला हुकूम पाठविला. परंतु तसें न करतां ‘यूस्टेसला माझ्या स्वाधीन करा; त्याची चौकशी करणें जरूर आहे’ असा गॉडविननें राजाला उलट जबाब पाठविला. एवढेंच नव्हे तर राजाशीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युद्ध करण्याचीही त्यानें धमकी दिली. यामुळें गॉडविन व राजा यांचें बरेंच बिनसलें. गॉडविनचें नॉर्मनविरोधी धोरण त्याला पसंत नव्हतें. गॉडविन व त्याचे मुलगे इंग्लंडांत मोठे सामर्थ्यवान आहेत हेंही राजाला माहीत होतें. अशा स्थितींत गॉडविनचा नक्षा उतरविला पाहिजे असेंही राजास वाटूं लागलें. यामुळेंच वरील क्षुल्लक कारण दाखवून राजानें गॉडविनला व त्याच्या मुलांनाही हद्दपार केलें (इ. स. १०५१). गॉडविनला हद्दपार केल्यानें इंग्लंडमधील नॉर्मन लोकांस हायसें झालें ! गॉडविनची मुलगी–राजाची राणी–हिलाही राजवाड्यांतून काढून एका मठांत ठेवण्यांत आलें. गॉडविनच्या हद्दपारीनंतर थोड्याच दिवसांत नॉर्मंडीचा ड्यूक विल्यम एडवर्डच्या भेटीकरितां इंग्लंडमध्यें आला होता. त्यावेळीं एडवर्डनें त्याला इंग्लंडचें राज्यपद देण्याचें वचन दिलें होतें असें म्हणतात !

४. गॉडविनचें पुनरागमन:—नॉर्मंडीचा विल्यम इंग्लंडमध्यें येऊन गेल्यानें नॉर्मन लोकांचें इंग्लंडांत चांगलेंच प्रस्थ माजलें. गॉडविन इंग्लंडमध्यें असतांनाच रॉबर्ट ज्यूमिजस नांवाच्या एका नालायक नॉर्मन धर्मगुरूस त्यानें कँटरबरीचा आर्चबिशप नेमलें होतें (१०५०). हीही गोष्ट इंग्लिश लोकांना आवडली नाहीं. त्यामुळें इंग्लंडमध्यें नॉर्मनविरोधी पक्ष बळावत जाऊन गॉडविनला परत बोलावून त्याला आपलें पुढारीपण देण्याची त्यांनीं इच्छा दर्शविली. यावेळीं गॉडविन फ्लँडर्समध्यें होता. इंग्लंड-मध्यें परत येण्यास परवानगी मिळावी म्हणूनही त्याची खटपट चालू होती. एडवर्डनें त्याला परवानगी दिली नाहीं तेव्हां लोकांच्या बोलावण्याचा अव्हेर न करतां आपण इंग्लंडांत जावें असें त्यानें ठरविलें व तो सन १०५२ मध्यें इंग्लंडांत आला. ही बातमी कळल्यानें नॉर्मन लोकांच्या मनांत धडकीच भरली ! लढाई होणार व आपला सूड उगविला जाणार या भीतीनें अनेक नॉर्मन लोकांनीं देशत्याग केला. कँटरबरीचा आर्चबिशप रॉबर्ट ज्यूमिजस हाही पळून गेला. एडवर्डला रक्तपात नको होता. तेव्हां त्यानें गॉडविनशीं कसेंबसें सख्य जमविलें, त्याच्या मुलांना पूर्वीच्या जागीं नेमलें व राणीलाही पुन्हां राजवाड्यांत आणलें. अशा तऱ्हेनें गॉडविन इंग्लंडांत आल्यावर इंग्लिश लोकांना हायसें झालें. पण गॉडविन आपला जम बसवून स्थिरस्थावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होत असतांच सन १०५३ मध्यें मृत्यु पावला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हॅरोल्ड याचें इंग्लंडच्या राज्यकारभारांत चांगलेंच प्रस्थ वाढून त्याच्या सल्ल्याप्रमाणें एडवर्ड राज्यकारभार करीत असे.

५. हॅरोल्डचा कारभार व एडवर्डचा मृत्युः—हॅरोल्डच्या हातीं राज्यकारभार आल्यावर नॉर्मन लोकांचें प्रस्थ कमी होऊं लागलें. त्याचा भाऊ टॉस्टिग याला त्यानें नॉर्दंब्रियाची सरदारकी दिली. त्यानें वेल्स प्रांतावर हल्ला करून तेथील राजाबरोबर मित्रत्वाचा तह केला (१०५५), व पुढें सन १०६३ मध्यें त्यानें वेल्स प्रांतावर स्वारी करून तो प्रांत काबीज केला. याच सुमारास हॅरोल्डनें एक शत्रु उत्पन्न करून ठेवला होता. त्याचा भाऊ टॉस्टिग हा अत्यंत जुलमी होता. नॉर्दंब्रियाच्या लोकांना त्याचा जुल्म सहन झाला नाहीं. त्यांनीं एडवर्ड राजाकडे त्याच्याविरुद्ध तक्रारी करण्यास सुरवात केली व त्याला काढून टाकण्याबद्दल राजाला विनंति केली. तेव्हां राजानें हॅरोल्डच्या सल्ल्यानें टॉस्टिगला दूर केलें (१०६५). यामुळें हॅरोल्डचा सूड घेण्याच्या निश्चयानें टॉस्टिग फ्लँडर्समध्यें निघून गेला व पुढें तो नॉर्मंडीच्या विल्यमला जाऊन मिळाला. सन १०६४ मध्यें हॅरोल्ड समुद्रांतून प्रवास करीत असतां त्याचें जहाज फुटलें; व तो नॉर्मंडीच्या किनाऱ्यास–अर्थात विल्यमच्या हातीं–लागला. त्या वेळीं एडवर्डच्यानंतर विल्यमला इंग्लंडची गादी मिळवून देण्याची हॅरोल्डनें खटपट करण्याचें विल्यमला वचन दिलें व आपली सोडवणूक करून घेतली असा समज आहे. यानंतर सन १०६६ सालीं एडवर्ड मेला; व वितननें हॅरोल्डला राज्यपद दिल्यानें तो राजा झाला. एडवर्डनें सुमारें चोवीस वर्षें राज्य केलें. तो मोठा धर्मशील व शांत स्वभावाचा असल्यानें त्याच्याकडून लोकांवर जुल्म झाला नाहीं. पूर्वींच्या राजांचे चांगले चांगले कायदे त्यानें एकत्रित करून त्यांचें एक कोड तयार केलें होतें. अनेक जाचक कर त्यानें रद्द केले व डेन्जेल्ड करही त्यानें बंद केला.

५. हॅरोल्ड (इ. स. १०६०):—एडवर्डच्या मृत्यूनंतर हॅरोल्डला राज्याभिषेक करण्यांत आला होता. राज्यकारभारास लागणारे बरेच गुण हॅरोल्डच्या आंगीं होते. तो मोठा शूर, उत्तम योद्धा व मुत्सद्दी होता. अत्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणीबाणीची वेळ असल्यानें या वेळीं एका शूर पुरुषाची इंग्लंडच्या गादीवर स्थापना झाल्यानेंच इंग्लंडांत शांतता नांदेल व इंग्रजांचें स्वातंत्र्य राहील अशी लोकांची कल्पना होती. म्हणूनच हॅरोल्डला राज्याभिषेक करण्यांत आला होता. परंतु हॅरोल्डला राज्यपद मिळाल्यानें अनेक सरदारांस त्याचा हेवा वाटूं लागला. तशांत त्याचा भाऊ टॉस्टिग हॅरोल्डविरुद्ध सैन्याची उभारणी करण्यांत गुंतला होता. त्यालाही आपल्या भावावर सूड उगवून घ्यावयाचा होता. तसेंच हॅरोल्डला इंग्लंडची गादी मिळालेली पाहून नॉर्मंडीचा ड्यूक विल्यम हाही चिडून गेला होता. इंग्लंडचें राज्य मिळावें म्हणून त्यानेंही आपल्या लष्कराची व आरमाराची सुधारणा करून तें सज्ज ठेवलें.

६. स्टॅफर्डब्रिजची लढाई (सन १०६६):—इकडे टॉस्टिगही आपली तयारी करीतच होता. प्रथमतः त्यानें विल्यमच्या मदतीची अपेक्षा केली. त्याची बायको विल्यमच्या बायकोची बहीण असल्यानें त्याला विल्यमच्या मदतीची खात्री होती; परंतु ती फोल ठरली. मात्र विल्यमनें त्याला कांहीं जहाजें देऊन हॅरोल्डला सतावून सोडण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें इंग्लंडच्या दक्षिण भागावर हल्लाही केला; पण त्याचा पराभव झाला. तेव्हां त्यानें नॉर्वेचा राजा हारड्राडा याची मदत मागितली. त्यालाही इंग्लंडवर स्वारी करून तो देश पादाक्रांत करावयाचा होता. त्याला ही संधि उत्तम आहे असें वाटून त्यानें टॉस्टिगला मदत करण्याचें ठरविलें. तेव्हां तीनशें जहाजें बरोबर घेऊन हारड्राडा व टॉस्टिग नॉर्दब्रियाकडे निघाले; व थोड्याच दिवसांनीं इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरून त्यांनीं यॉर्क शहर घेतलें. ही बातमी कळतांच हॅरोल्ड मोठें सैन्य घेऊन उत्तरेकडे निघाला. तिकडे गेल्यावर दोन्ही सैन्यांची गांठ पडून स्टॅफर्डब्रिज येथें मोठें तुंबळ युद्ध झालें (१०६६) व त्यांत नॉर्वेचा राजा हारड्राडा व टॉस्टिग असे दोघेही मारले गेले. या विजयानें शत्रु उरला नाहीं असें हॅरोल्डला क्षणभर वाटलें. परंतु तो या युद्धांत गुंतला असतांच नॉर्मंडीच्या विल्यमनें इंग्लंडवर हल्ला केल्याचें त्याला कळलें. तेव्हां मोठ्या त्वरेनें तो दक्षिणेकडे आला.

७. हेस्टिंग्जची लढाई (१०६६):—स्टॅफर्डब्रिजच्या लढाईत हॅरोल्डचे अनेक वीर रणांगणावर पडले होते व होते तेही फार थकलेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्यानें त्याच्या लष्कराची चांगलीशी तयारी नव्हती. केवळ वेसेक्सच्या लष्करावर भिस्त ठेवून त्यानें विल्यमच्या लष्कराला तोंड देण्याचें ठरविलें. याच्या उलट विल्यमचें सैन्य ताजेंतवानें असून त्याची तयारीही चांगली झालेली होती. त्याच्याकडील शिबंदीही उत्तम होती. उत्तमोत्तम तिरंदाज व घोडेस्वार यांचा भरपूर भरणा त्याच्या लष्करांत होता. हेस्टिंग्ज येथें विल्यमनें आपल्या सैन्याचा तळ दिला होता. दोन्ही सैन्यांची समोरासमोर गांठ पडून युद्धाला सुरुवात झाली. इंग्रज लोक अत्यंत शूर व खरे योद्धे होते. स्वातंत्र्याकरितां 'मारीन कीं मरेन' या भावनेनें प्रत्येकजण लढण्यास सिद्ध झाला असल्यानें विल्यमच्या लोकांचें त्यांच्यापुढें कांहीं चालेना. हॅरोल्डचा भाऊ गिर्थ यानें खुद्द विल्यमला गांठून त्याचा घोडा ठार केला. त्यामुळें नॉर्मन सैन्यांत 'विल्यम मेला' या कल्पनेनें एकच धांदल उडाली! परंतु झालेल्या जखमांकडे दुर्लक्ष करून 'मी जिवंत आहें' असें विल्यमनें ओरडून सांगून आपल्या सैन्याला थोपवून धरलें. त्यामुळें नॉर्मन लोक अधिकाधिकच निकरानें लढूं लागले. परंतु इंग्रजांवर त्याचा कांहींही परिणाम होत नाहीं असें पाहून विल्यमनें एक युक्ति केली. आपण पळून जात आहोंत अशी बतावणी करण्यास त्यानें आपल्या सैन्याला आज्ञा केली. त्याप्रमाणें ते पळूंही लागले. तेव्हां इंग्रज सैन्यानें त्यांचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. तावडतोब सर्व नॉर्मन सैन्य इंग्लिश सैन्यावर तुटून पडलें. एक बाण सूं सूं करीत येऊन हॅरोल्ड राजाच्या डोळ्यांत रुतला. तसाच तो उपटून तो लढूं लागला. तों काय! नॉर्मन सैन्यानें इंग्लिश सैन्याची नुसती लांडगेतोड चालविली होती! शेवटीं आपल्या निशाणाचें रक्षण करीत असतांच हॅरोल्ड खालीं पडला तो कायमचाच! इंग्रजांचा राजा मेला, अनेक सरदार प्राणांस मुकले, शेंकडो सैनिक कापले गेले व नॉर्मंडीच्या विल्यमला विजय प्राप्त झाला. लौकरच त्यानें आपल्याला राज्याभिषेक करवून घेऊन तो इंग्लंडचा राजा झाला. जगांत ज्या अनेक क्रांतिकारक लढाया झाल्या त्यांत हेस्टिंग्जच्या लढाईची गणना करतात. विल्यमच्या सैन्याची शिस्त, त्याची धडाडी व युद्धकलेचें त्यानें दाखविलेलें उत्तम ज्ञान यांमुळेंच त्याला विजय मिळाला. शिवाय इंग्लिश लोकांमध्येंही एकी नसल्यानें त्यांचा पराभव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला, त्यांचें स्वातंत्र्य नष्ट झालें व इंग्लंडमध्यें परकीय सत्ता स्थापन झाली.

अभ्यास

१. गॉडविनचें चरित्र थोडक्यांत लिहा.
२. एडवर्डचें धोरण कोणत्या प्रकारचें होतें? त्याचा परिणाम काय झाला?
३. हेस्टिंग्जच्या लढाईचें थोडक्यांत वर्णन करा. त्यांत विल्यमला विजय मिळण्याचें कारण काय?
४. टॉस्टिग व हॅरोल्ड यांचें भांडण होण्याचें कारण काय? त्याचा परिणाम काय झाला?
५. विल्यमनें इंग्लंडवर स्वारी कां केली?
६. जगाच्या इतिहासांत ज्या क्रांतिकारक लढाया झाल्या त्यांचीं नांवें सांगा.
७. खालील कालादर्श तयार करा :—

कालादर्श—इ. स. १०४२–१०६६

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	प्रमुख व्यक्ती	हिंदुस्थान–महत्त्वाच्या गोष्टी
१०४२			
१०५१			
१०५३			
१०६३			
१०६४			
१०६५			
१०६६			

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. अँग्लो-सॅक्सन राजवटींत

१. अँग्लो-सॅक्सन वसाहती :—अँग्लो-सॅक्सन लोक इंग्लंडांत आले व त्यांनीं आपल्या अनेक वसाहती त्या देशांत स्थापन केल्या. ते टोळया करून राहत. प्रत्येक टोळीमध्यें एका रक्ताचे व नात्याचे लोक असत; व त्यांच्या मुख्य टोळींत जो मुख्य व वडील पुरुष असे तो त्यांच्या टोळीचा पुढारी असे. अँग्लो-सॅक्सन टोळयांना रोमन लोकांप्रमाणें शहरांतून राहणें आवडत नसल्यानें त्यांनीं लहान लहान खेडीं स्थापन करून तेथें राहण्यास सुरुवात केली. एका खेड्यामध्यें बहुधा एका रक्ताच्या कुटुंबांतीलच लोक राहात व ते आपल्या कुटुंबाचेंच नांव आपल्या खेड्याला देत असत. याप्रमाणें बर्मिंगहॅम, नॉटिंगहॅम, नॉर्टन, किंग्जटन वगैरे सॅक्सनांनीं वसविलेलीं अनेक गांवें आजही आपल्याला दिसत आहेत. 'हॅम' व 'टन' या शब्दांचा अर्थ गांव असा आहे. निरनिराळीं खेडीं मिळून परगणा होई. परगण्यांनाही ससेक्स (South Saxons), वेसेक्स (West Saxons), इसेक्स (East Saxons), मिडलसेक्स अशीं सॅक्सन नांवें देण्यांत आलीं होतीं. अँग्लो-सॅक्सन लोक खेड्यांतून राहत असल्यामुळें त्या काळीं खेड्यांनाच फार महत्त्व आलें होतें. एक खेडेगांव म्हणजे थोड्याशा घरांचा समुदाय असें म्हणतां येईल. या खेड्यांतील घरें एकेकापासून अगदीं स्वतंत्र व अलग असत; व तीं माती, गवत व लाकूड यांचींच बांधलेलीं असत. कांहीं कांहीं तर निवळ गवताच्या झोंपड्याच असत ! या घरांतूनच लोक आपलीं माणसें, मुलें-बाळें, नोकर–चाकर, गाई-बैल, डुकरें वगैरे जनावरें व कोंबड्या यांच्यासह मोठ्या आनंदानें राहात. घरांच्या आंतील भिंतींवर भाले, तरवारी, ढाली, धनुष्यें वगैरे युद्धोपयोगी सामानाबरोबरच ताग, अंबाडी वगैरे टांगलेली दिसे. यावरून त्या लोकांचा मुख्य धंदा शेतीचा असला तरीही ते लोक बाण्यानें क्षत्रिय होते हेंच सिद्ध होतें. वरीलशिवाय शेतीला उपयुक्त असें अनेक प्रकारचें सामान घरांतून भरलेलें असे. याच घरांतून हातमागही असत. एका खेड्यांतून साधारणतः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंचवीस कुटुंबें असत. त्यांच्या मुख्य पुढाऱ्याचें घर खेड्याच्या मध्यभागीं असे; व तें चांगलें मजबूत असे.

२. ग्रामव्यवस्था :—प्रत्येक खेड्याच्या लगत कुरणें, चराऊ गांवरानें, पडिक जमीन व लागवड जमीन असे. खेड्यांत राहणाऱ्या प्रत्येकाला लागवड जमिनीचा थोडा तरी भाग मिळे व तो वरचेवर बदलण्यांत येई. यामुळें कोणालाही कुरकुरावयास जागा नसे. गांवरानांत चरण्याकरितां कोणी किती गुरें न्यावीं हेंही ठरलेलें असे. गांवाशेजारच्या एकंदर जमिनीचे तीन मोठे भाग करण्यांत येत. प्रत्येक भागाचे एकेका एकराचे अनेक पट्टे तयार करीत व कुटुंबाच्या मानानें त्याला कमीअधिक जमीन देण्यांत येई. प्रत्येक वर्षी एका भागांत गहूं, दुसऱ्यांत ओट अगर बार्ली लावीत व तिसरा भाग तसाच गुरांकरितां ठेवीत; परंतु दरवर्षी हा क्रम बदलण्यांत येत असे. किंबहुना कोठें काय पेरावें हें गांवसभा ठरवीत असे. नांगरणी, लागवड, मळणी व कापणी वगैरेसारख्या प्रत्येक वेळीं खेड्यांतील सर्व लोक शेतावर जाऊन एकमेकांस मदत करीत असत. एका गांवांत एखाद-दुसराच, गांवलोहारानें तयार केलेला नांगर असे व नांगरणीच्या वेळीं प्रत्येकाला आपले बैल दुसऱ्याला द्यावे लागत. एक नांगर ओढण्यास आठ-दहा बैल लागत. सॅक्सन लोकांचीं खेडीं बहुधा दऱ्याखोऱ्यांतून अगर नदीकांठीं वसलीं असल्यानें त्यांच्या शेतीला पाण्याचा तुटवडा बहुधा पडत नसे.

३. फोकमूट अथवा **गांवसभा :**—प्रत्येक खेड्याच्या शेजारींच एक हिरवळ असे. या हिरवळीवर गांवांतील सर्व लहानमोठे लोक जमत, व आपल्या खेड्यासंबंधाच्या प्रत्येक गोष्टीबद्दल चर्चा करीत. या सभा ज्या ठिकाणीं भरत तें ठिकाण अत्यंत पवित्र समजण्यांत येत असे. जमिनीची लागवड कशी करावी, कोठें काय पेरावें, कोणाचें कोणाशीं लग्न व्हावें, वगैरे गोष्टींची या सभेंत चर्चा होई. तसेंच अपराध्याची चौकशी करून त्याला शिक्षा देणें, भांडणतंटा मिटविणें, दुसऱ्या गांवाशीं लढाई अगर तह करणें, तरुण पिढीपैकीं लोकांनीं गांव सोडून जावा किंवा नाहीं व त्यांनीं वसाहत कोठें स्थापावी वगैरे अनेक गोष्टींचा खल या सभेंत होत असे, व त्यांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निकाल लावण्यांत येई. गुन्हेगाराला तुरुंगांत न धाडतां त्याच्या गुन्ह्यामुळें झालेलें नुकसान त्याला भरून द्यावें लागे. गुन्ह्याच्या मानाप्रमाणें दंडाची रक्कमही ठरवून देण्यांत आली होती. साध्या माणसाच्या वधाबद्दल दोनशें शिलिंग अथवा तेहतीस बैल व जमीनदाराच्या वधाबद्दल बाराशें शिलिंग ठरलेले होते. या सभेच्या अध्यक्षाला 'रीव्ह' व सभेला गांवसभा उर्फ 'फोकमूट' असें म्हणत.

४. राज्यविभाग:—अँग्लो-सॅक्सन लोकांच्या जमाती जसजशा एकत्र येऊं लागल्या तसतसें त्यांच्या राज्याचें क्षेत्रफळही वाढूं लागलें व त्याबरोबरच खेड्यांचीही वाढ झाली. आत्मसंरक्षणाकरितां निरनिराळ्या खेड्यांतील लोकांना एकत्र यावें लागे. यामुळें निरनिराळ्या दहा खेड्यांचा एक जमाव होऊं लागला व त्याला 'टायथिंग' असें नांव मिळालें. दहा टायथिंग म्हणजे एक हंड्रेड ऊर्फ तालुका व अनेक हंड्रेड मिळून एक कौंटी ऊर्फ शायर (जिल्हा) होत असे. अशा रीतीनें राज्यकारभाराच्या सोयीकरितां सर्व निरनिराळे भाग पाडण्यांत येत असत. शत्रूपासून रक्षण करण्याकरितांही या व्यवस्थेचा फार उपयोग होई. प्रत्येक हंड्रेडमध्यें ग्रामसभेप्रमाणेंच 'हंड्रेड-मूट' व प्रत्येक शायरमध्यें 'शायरमूट' असे. शायरमूटमध्यें 'शेरीफ' व 'अल्डरमन' हे राजाचे अधिकारी समजण्यांत येत. हंड्रेडमूटमध्यें प्रत्येक खेड्यातर्फे चार प्रतिनिधि व हंड्रेडमधील सर्व जमीनदार येत व आपल्या विभागांतील ग्रामसभेप्रमाणेंच सर्व गोष्टींची चर्चा करून निकाल लावीत. त्याचप्रमाणें प्रत्येक शायरमूटमध्यें प्रत्येक हंड्रेडतर्फे कांहीं व शायरमधील सर्व जमीनदार असत.

५. शहरांची वाढ:—सॅक्सन लोक बहुधा खेड्यांतूनच राहात असल्यानें त्यांच्या वेळीं शहराची फारशी वाढ झालेली नव्हती; परंतु पुढें पुढें त्यांची वाढ होऊं लागली. शहराची व्यवस्था पाहण्याकरितांही 'टाऊनमूट' नांवाची शहरसभा असे. डॅनिश लोकांच्या हल्ल्यांना लहान खेड्यांना नीट तोंड देतां येत नसे; त्यामुळें सॅक्सनांनीं शहरें बांधण्यास सुरुवात केली होती. व तींही टेंकड्यांच्या शिखरांवर अगर त्यांच्याजवळ. या शहरांभोंवतीं खेड्यांभोंवतीं असलेल्या खंदकांप्रमाणें तटबंदीही बांधण्यांत येई. यामुळें व्यापाराचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संरक्षण उत्तम रीतीनें होई. या गोष्टीमुळें पुढें पुढें हीं शहरें व्यापाराचीं केंद्रें बनलीं. डेन्स लोकांनीं इंग्लंडमध्यें आपलें राज्य स्थापन केल्यानंतर त्यांनींही



समुद्रावरील वाहतुक-साधनांतील फरक

अनेक मोठमोठीं तटबंदी शहरें स्थापन केलीं. पुढें पुढें ज्या ठिकाणीं मठ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थापन होऊं लागले तीं ठिकाणें मोठीं केंद्रस्थानें मानण्यांत येऊन तेथील शहरांनाही महत्त्व प्राप्त झालें. या ठिकाणीं मोठमोठ्या शोभिवंत व भव्य इमारतीही बांधण्यांत येऊं लागल्या.

६. दळणवळण–व्यापार :—एका गांवाहून दुसऱ्या गांवाला जाण्याकरितां त्यावेळीं चांगलेसे रस्ते नसत. रोमन लोकांनीं चांगले रस्ते बांधून घेतलेले असले तरी अँग्लो-सॅक्सन लोकांनीं त्यांचा फारसा उपयोग केला नाहीं. त्यांचीं खेडीं नदीकांठीं अगर समुद्राजवळ असल्यानें ते नदींतून होड्यांवरून प्रवास करीत किंवा मालाची ने-आण करीत. यामुळें दळणवळण व व्यापार बेताचाच होता, असें म्हणतां येईल. आल्फ्रेडच्या सुमारास लंडनला मात्र व्यापारामुळें थोडें महत्त्व आलें होतें. लंडन बंदरीं अनेक जहाजें नांगरून पडलेलीं असत. या जहाजांतून दारू, मासे, सागवानी लांकूड, कापड व संसारोपयोगी सामान लंडनला नेहमीं येई. हा माल निरनिराळ्या ठिकाणीं नेऊन व्यापारी विकीत. प्रत्येक ठिकाणीं त्यांना सरकारला थोडी जकातही द्यावी लागत असे.

७. वस्त्रें-भूषणें व खाद्य-पेयें—त्या वेळची राहणी अत्यंत साधी असे. छानछोकी मुळींच नसे. बाह्यांचा अगर बिनबाह्यांचाही आंगरखा पुरुष अंगांत घालीत व त्यावरून दुसरा एक बिनबाहीचा आंगरखा घालीत. पायांत तुमानी अगर विजारी असत. पायमोजांऐवजीं पायांवर गरम पट्टे बांधण्याची पद्धति होती. बहुतेक सर्व कपडे लोकरीचे अगर तागाचेच असत. पुरुषांप्रमाणें स्त्रियाही अंगरखेच घालीत; मात्र त्यांना बाह्या असत व डोक्यावर घेण्याकरितां ओढणीसारखा एक प्रकार असे. कंबरेला कंबरपट्टा असे. या कंबरपट्ट्याला एक लहानशी सुरी, किल्ल्यांचा जुडगा व टांचण्या व सुईदोरा यांची डबी नेहमीं अडकविलेली असे. चांगले चांगले कलाकुसरीचे डागडागिनेही त्या वेळीं वापरण्यांत येत असत.

वस्त्रांप्रमाणेंच खाद्य-पेयेंही साधीं असत. प्रत्येक घरामध्यें सर्वसाधारणतः कोंबडीचें व डुकराचें मांस, मासे, फळें, गहूं, बार्ली, ओट यांचा फार उपयोग करण्यांत येत असे. 'मीड' नांवाची दारू त्या वेळीं फार लोकप्रिय असे. ती दारू पिऊन लोक सर्व रात्रभर कधीं कधीं झिंगूनही पडत. जेवणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टेबलावरच होत असत. जेवणाच्या वेळीं अतिथींचा योग्य सत्कार करण्याकडे सॅक्सन लोक चांगलें लक्ष देत. जेवणानंतर हास्यविनोद, गोष्टी सांगणें-ऐकणें व संगीतश्रवण यांत ते दंग असत.

८. **समाज-व्यवस्था** :—(अ) समाजाचा धुरीण राजाच असे; त्यामुळें त्याला समाजांत मोठें मानाचें स्थान मिळे. त्याच्या हातीं फारशी सत्ता नसे. राजधानीचें ठिकाण असें त्या वेळीं नव्हतेंच. त्यामुळें राजा आपल्या राज्यांत एकसारखा संचार करून लोकस्थिति समजावून घेई. त्याच्याबरोबर त्याचा लवाजमा नेहमीं तयार असे, व ज्या ठिकाणीं त्याचा मुक्काम होई, त्या ठिकाणाला राजधानीचें स्वरूप येई. राजाची स्वतंत्र जहागीर असे व त्यावरील मुख्य अंमलदाराला 'स्ट्युअर्ट' अथवा 'रीव्ह' म्हणत. सर्व प्रकारचे कर गोळा करणें व जहागिरीचा बंदोबस्त करून तेथील कारभार करणें हें त्याचें मुख्य काम असे. पुढें पुढें कांहीं शहरांना राजधानीचें स्वरूप आपोआप येऊं लागलें. राजाचें स्वतःचें असें फारच थोडें सैन्य असे. आपल्या सरदारांना, उमरावांना व इतरांना तो लढाईचे वेळीं सैन्यांत ससैन्य दाखल करी, व तेवढी वेळ भागवून घेई. 'वितन' नांवाचें विद्वान लोकांचें एक मंडळ राजाला राज्यकारभारांत मदत करण्याकरितां नेमण्यांत येत असे. या मंडळांत मुख्य मुख्य सरदार, आर्चबिशप व जमीनदार वगैरे वजनदार लोक असत व राजा त्या मंडळाचा अध्यक्ष असे. न्याय देणें, कायदे करणें, कर बसविणें, लढाई पुकारणें अगर तह करणें वगैरे महत्त्वाचीं कामें या मंडळाकडून केलीं जात. अंमलबजावणीचें कामही या मंडळाकडून बजावण्यांत येई. कोणत्याही महत्त्वाच्या गोष्टीची चर्चा करून धोरण ठरविण्याचा अधिकार या मंडळाकडेच असल्यानें राजा बहुधा नामधारीच असे. या मंडळाकडून राजाची नेमणूकही होत असे. (आ). राजाच्या खालोखाल समाजांत सरदारांना मान असे. त्यांना 'अर्ल' असें म्हणत. ते उच्चकुलीन असून त्यांची मालमत्ताही पुष्कळ असे. टेकड्यांवर मोठमोठे दगडी वाडे बांधून, त्यांच्याभोंवतीं तटबंदी करून, त्यांत ते राहात. समाजांतील खालच्या वर्गांतील लोकांचें शत्रूकडून संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असे; व त्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितां त्यांना मोठमोठ्या जमिनी व जहागिरी मिळत. लढाईच्या वेळीं राजाला सैन्यही तेच पुरवीत. सरदारांच्या खालोखाल 'थेन' समजले जात. त्यांचा पेशा क्षत्रियाचा असे. त्यांच्या कामाकरितां त्यांनाही थोडी जहागीर होती. त्यांच्या खालोखाल स्वतंत्र जमीनदार ऊर्फ 'सर्ल.' सर्व शेतकरी बहुधा याच वर्गांत मोडत असत. प्रथमतः सर्व जमीन यांच्या मालकीची होती; पण पुढें स्वसंरक्षणाकरितां त्यांनीं ती उमरावांना व जहागिरदारांना देऊन टाकली; व त्याच्या मोबदल्यांत त्यांनीं यांचें संरक्षण केलें पाहिजे असें ठरलें. जमिनीची मशागत करून उत्पन्नाचा थोडा भाग शेतकऱ्यांनीं आपल्या सरदाराला–जहागिरदाराला–द्यावा असें ठरलेलें होतें. उलट लढाईचे वेळीं शेतकऱ्यांनीं लष्करांत दाखल होऊन सरदाराला मदत करावी व शत्रूपासून संरक्षण करून घ्यावें असें ठरलेलें होतें. समाजाच्या अत्यंत कनिष्ठ वर्गांत गुलामांचा समावेश करण्यांत आलेला होता. त्यांना 'सर्फ' असें म्हणत. जिंकलेले ब्रिटन लोक, कैदी, कर्जबाजारी व निर्वाहाचें स्वतंत्र साधन नसलेले लोक यांचा या वर्गांत समावेश होई. वरिष्ठ वर्गांतील लोकांची सेवा करणें हा यांचा मुख्य धर्म. यांना जमीन विकत घेतां येत नसे. जातिव्यवस्था त्यावेळीं नव्हती व स्वपराक्रमानें समाजांतील मोठें मानाचें स्थान कोणालाही पटकावितां येई.


सॅक्सन-घर

९. **न्यायदान**:—त्यावेळीं शिक्षागृहें जवळ जवळ नव्हतींच. खुनाच्या गुन्ह्याबद्दलही जबरदस्त दंड होई हें वर सांगितलेंच आहे. गांवसभा, हंड्रेड-सभा, शायरसभा, शहरसभा वगैरे सभांकडून न्यायनिवाडा होत असे; व शिक्षा सुनावण्यांत येऊन त्यांची अंमलबजावणीही होई. प्रत्येक आरोपी, समाजांतील वजनदार पुरुषांना आपल्यातर्फे साक्षीदार म्हणून न्यायसभेपुढें आणी. त्यानें आरोपी निर्दोषी असल्याचें शपथपूर्वक सांगितलें तर आरोपीस सोडून देत. साक्षीदाराच्या सामाजिक दर्जावरच त्याच्या शपथेचें महत्त्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अवलंबून असे. कोणा आरोपीला साक्षीदार मिळाले नाहींत तर हातावर विस्तव घेणें, आधणाच्या पाण्यांत हात घालणें, तापलेल्या लोखंडावर चालणें, नदींत उडी मारणें वगैरे दिव्यें त्याला करावीं लागत. तीन दिवसांत त्याच्यावर या गोष्टीचा परिणाम झाला तर त्यास दोषी ठरवून दंड करीत; झाला नाहीं तर त्यास निरपराधी समजून सोडून देत. हें न्यायाचें काम पंचांतर्फे चालत असे.

१०. धार्मिक स्थिति:—अँग्लो–सॅक्सन लोक ज्या वेळीं इंग्लंडांत आले त्यावेळीं ते थॉर, ओडिन वगैरे देवांचे उपासक होते व ख्रिस्ती धर्माचे शत्रु समजले जात. इंग्लंडांतील ख्रिस्तीधर्माची त्यांनीं प्रथमतः हकालपट्टी केली होती; परंतु त्यानंतर ख्रिस्तीधर्माचा इंग्लंडमध्यें प्रसार कसा झाला त्याचा थोडा इतिहास मागें दिलाच आहे. अँग्लो-सॅक्सन राजवटींत कॅथॉलिक धर्माचा जोरांत प्रसार होऊं लागला. मध्यंतरीं डेन्स लोकांनीं या धर्मपंथावर जोराचा हल्ला करून इंग्लंडांतील त्या पंथाचीं पाळेंमुळें खणून टाकण्याचा प्रयत्न केला; पण तो अयशस्वी ठरला. अँग्लो-सॅक्सन काळांत बहुतेक सर्व खेड्यांतून चर्च बांधण्यांत आलें होतें; व तेथें ख्रिस्तीधर्मानुसार प्रार्थना व धार्मिक विधी मोठ्या समारंभानें चालत. प्रत्येक खेड्यांत एखादा 'प्रीस्ट' म्हणजे पाद्री असे; व त्याला त्याच्या उदरनिर्वाहापुरतें उत्पन्नही तोडून मिळत असे. त्याचप्रमाणें धर्ममठांची त्या काळांत स्थापना होऊं लागली. निर्जन प्रदेशांत हे मठ स्थापले जात, व मठांच्या आजूबाजूची जमीन नांगरून व पेरून मठवासी त्यावर उपजीविका करीत. प्रार्थना व समाजसेवा हें या मठवासीयांचें ब्रीद असे. या मठांकडून शिक्षणाचीही सोय करण्यांत येत असे; कारण त्या काळीं शिक्षणाकरितां स्वतंत्र शाळा मुळींच अस्तित्वांत नव्हत्या. या मठवासीयांची राहणी उच्च प्रकारची असल्यानें समाजाकडून त्यांना प्रथम प्रथम पुष्कळच उत्तेजन व मदत मिळत असे. या मठांवर लोकांचा विश्वास इतका बसला होता कीं, आपापलें जडजवाहीर, दागदागिने व पैसा शत्रूच्या हातीं लागूं नये म्हणून सर्व लोक मठांमध्यें तो ठेवून देत. एकंदर पाहतां ख्रिस्तीधर्मावर लोकांचा चांगलाच विश्वास बसलेला होता, असें म्हणतां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. ॲंग्लो-सॅक्सन राजवटींत खेडीं कोठें वसविण्यांत येत ? कां ? त्या खेड्यांतील जमिनीच्या संबंधाची व्यवस्था कशी करण्यांत आली होती ?

२. त्यावेळीं ग्रामव्यवस्था कशी होती ?

३. शहरांची वाढ होण्याचीं कारणें कोणतीं ? निरनिराळे राज्यविभाग सांगून त्यांची व्यवस्था कशी होत असे तें सांगा.

४. न्यायदानाची सोय कशी होती ? त्यांची न्यायदानाची पद्धति तुम्हांस विचित्र वाटते का ? कां म्हणून ?

५. ॲंग्लो-सॅक्सनांची समाजस्थिति वर्णन करा. त्यांतील निरनिराळ्या घटकांचीं कामें सांगा.

६. त्यावेळीं सॅक्सनांनीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार कां केला ? त्याचा परिणाम काय झाला ?

७. सॅक्सनांचा व्यापार, अन्न, पोषाख यांसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.

---

३. वंशवृक्ष–नॉर्मन घराणें–इ. स. १०६६–११५४

विजयी विल्यम–(१०६६–१०८७)

- रॉबर्ट मृत्यु (११३४)
  - विल्यम मृत्यु ११२८
- **दुसरा विल्यम** (१०८७–११००)
- **पहिला हेन्री**×मॅटिल्डा (११००–११३५)
  - विल्यम मृ. ११२०
  - मॅटिल्डा मृ. ११६७ × १ रोमन बादशाह, २ ॲंज्यूचा जिऑफ्रे
    - **दुसरा हेन्री** ११५४–११८९
- अडेला×स्टीफन
  - **स्टीफन** ११३५-११५४
  - हेन्री, विंचेस्टरचा बिशप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नॉर्मन घराणें

७. विजयी विल्यम (इ. स. १०६६–८७).

१. नॉर्मन लोक:—नॉर्थमेन ऊर्फ डेन्स लोकांनीं इंग्लंडवर हल्ले केले होते, हें आपल्याला माहीत आहे. त्यांनाच 'व्हायकिंग्ज' असेंही म्हणत. या लोकांपैकींच कांहीं लोक फ्रान्सच्या राजाच्या संमतीनें नॉर्मंडीमध्यें जाऊन राहिले होते. त्या वेळच्या युरोपांतील सर्व लोकांमध्यें अत्यंत शाहणे, धूर्त, काटक, आपल्या वक्तृत्वानें दुसऱ्यावर छाप टाकणारे असे हे लोक होते. ज्या ज्या प्रांतांत ते जात तो तो प्रांत ते चटकन हस्तगत करीत, तेथील रीतरिवाज आत्मसात करीत, तेथील लोकांवर स्तुतिस्तोत्रांचा अवास्तव वर्षाव करीत व अशा रीतीनें त्यांना आपल्याकडे वळवून घेत. जात्याच ते अत्यंत आडदांड व उच्छृंखल असत; व त्यामुळें त्यांना कायद्याच्या दड-पणाखालीं नेहमीं ठेवावें लागे. कोणतेंही काम करणें झाल्यास तहान व भूक यांची पर्वा न करितां ते तें काम अत्यंत कसोशीनें तडीस नेत. नॉर्मंडीमध्यें असतांच त्यांनीं ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता. ते पोपला फार मानीत व भजत. वाङ्मय व कला यांची वृद्धि करणें, मोठमोठ्या इमारती बांधणें, उत्तम शिस्तीचें सैन्य तयार करणें वगैरे गोष्टींकडे त्यांचें लक्ष सदैव असे. फ्रेंच रीतरिवाज, रोमन कायदे व फ्रेंच भाषा त्यांनीं नॉर्मंडीमध्यें असतांच आत्मसात केली होती.

२. विजयी विल्यमः स्वभाव:—सन १०६६ च्या सुमारास त्यांचा पुढारी विल्यम हा नॉर्मंडीचा ड्यूक व फ्रान्सच्या राजाचा मांडलीक होता. भरपूर उंचीचा विल्यम अंगानें चांगला सशक्त व बळकट होता. त्याच्या डोक्याला टक्कल पडलेलें होतें. त्याचा आवाज मोठा खणखणीत होता. इतका कीं ऐकल्याबरोबर लोकांच्या उरांत धडकीच भरे! परंतु तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वतः लाजाळू असल्यानें एकलकोंडेपणाची त्याला फार आवड असे. त्याला आपल्या मुलांचा फारच लळा होता; व त्यांच्यावर तो इतकें प्रेम करी कीं, त्यामुळेंच तीं बिघडलीं असेंही कांहीं लोक म्हणतात. मोठा करारी व निश्चयी असल्यानें त्याची लोकांना एकप्रकारें मोठी भीतीच वाटे. मनुष्याची पारख त्याला चांगली असल्यानें राजनिष्ठांशीं मोठ्या साजन्यानें व प्रेमानें वागून इतरांशीं तो अत्यंत कठोरपणानें वागे. या त्याच्या वागण्यामुळेंच कोणीही त्याच्याविरुद्ध जाण्याचा धीर करीत नसे. अधिकारलालसा त्याच्या अंगीं जबरदस्त होती. तो मोठा शूर योद्धा होता. लढाईतील डावपेचांत तो कुशल असल्यानें त्यानें अनेक लढाया जिंकल्या. मोठा धर्मशील असल्यानें त्याचें आचरण अत्यंत पवित्र व शुद्ध असे. मुत्सद्दीपणांत त्याचा हात धरणारा त्या वेळीं इंग्लंडांत कोणी नव्हता. शिकारीची त्याला अत्यंत आवड असे. विल्यम मोठा धूर्त, धोरणी, दूरदर्शी, व्यवहारदक्ष, तल्लख बुद्धीचा, व धैर्यवान होता. या गुणांनीं युक्त असा विल्यम अविश्रांत श्रम करण्यास कधींही माघार घेत नसे. विजयानें तो उन्मत्त होत नसे. निर्दयपणा, लोभीपणा व क्रौर्य हे त्याच्या आंगचे दुर्गुण होते; परंतु त्याच्या आंगच्या गुणांच्या जोरावरच त्यानें यश मिळविलें. राज्यकारभाराच्या दृष्टीनें त्यानें आपलें धोरण स्पष्टपणें आंखून टेवलें होतें. नॉर्मन सरदारांना देणग्या व जहागिरी देऊन खूष ठेवावयाचें; परंतु त्यांना सामर्थ्यवान होऊं न देतां इंग्लंडवर आपलें स्वामित्व राखावयाचें हें त्याच्या धोरणाचें गमक होतें.

विजयी विल्यम

३. इंग्रजांचीं बंडें :—हेस्टिंग्जची लढाई जिंकल्यावर विल्यमला इंग्लंडचें राज्यपद मिळालें असलें तरी त्याचें राज्य निष्कंटक झालेलें नव्हतें. इंग्रजांचा दुर्दम्य देशाभिमान नॉर्मनांचें वर्चस्व त्यांस मानूं देईना. यामुळें इंग्रजांनीं इ. स. १०६७ पासून १०७१ पर्यंत बंडें करून विल्यमला त्रास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिला. याला कारणेंही तशींच झालीं होतीं. इंग्रजांवर कोणत्याही प्रकारचा विश्वास न दाखवितां त्यानें सर्व प्रकारच्या अधिकाराच्या जागा नॉर्मन लोकांस दिल्या. आपल्या नॉर्मन सरदारांस त्यानें पुष्कळ इंग्रजांच्या जमिनी वांटून दिल्या. राज्याभिषेकानंतर तो नॉर्मंडीस गेला असतां त्यानें इंग्लंडचा राज्यकारभार ओडो व फिट्स्‌ऑस्बर्न यांच्याकडे सोंपविला होता. त्यांनीं इंग्रजांना अत्यंत निर्दयपणें वागविलें, त्यांच्या बायकामुलांचा अपमान केला, त्यांचीं घरेंदारें लुटून जाळलीं व त्यांवर अनेक प्रकारें जुलूम सुरू केला. यामुळें इंग्रज लोक चिडले व त्यामुळें अनेक बंडें झालीं. केंट व हेरेफर्ड-मधील लोकांनीं बंड केलें तें वरील अधिकाऱ्यांनीं मोडलें; परंतु त्यानंतर अनेक बंडें इंग्लंडांत उत्पन्न झालीं. तेव्हां विल्यम इंग्लंडांत आला व प्रथमतः त्यानें पश्चिमेकडील बंडवाल्यांचा एक्झिटर येथें पुरा मोड केला. नंतर एडविन व मॉर्सर यांनीं मर्शियामध्यें बंड केलें होतें. त्यांचाही त्यानें नायनाट केला व यॉर्क शहर काबीज केलें. नॉर्दंब्रियामध्यें एडगर अॅथ-लिंग यानें बंड केलें; पण तेंही मोडण्यांत आलें. तेव्हां बंडवाले स्कॉटलंडच्या राजाच्या आश्रयार्थ निघून गेले. स्कॉटलंडचा राजा माल्कम यानें त्यांस मदत दिली. तसेंच डेन्मार्कचा राजा स्वेन यानेंही बंडवाल्यांच्या मदती-करितां अडीचशें जहाजें दिलीं. अशा तयारीनिशीं इंग्रज बंडवाल्यांचा पुढारी वॉलथॉप यॉर्क प्रांतावर चालून आला व तो प्रांत त्यानें जिंकूनही घेतला. ही बातमी समजतांच बंडवाल्यांचें सामर्थ्य कमी करण्याच्या हेतूनें प्रथमतः विल्यमनें स्वेन राजाला लांच देऊन डेन्मार्कला पाठविलें; व नंतर बंड-वाल्यांवर स्वारी करून अत्यंत निर्दयपणानें त्यानें बंडवाल्यांची लांडगेतोड केली (सन १०६९). त्यानंतर भरपूर सूड उगवावा व अशा बंडांचा उद्भव पुन्हां होऊं नये म्हणून त्यानें टीज व हंबर या नद्यांमधील मुलुखाची जाळपोळ केली, शेतें उध्वस्त करून एक लाख शेतकऱ्यांची कत्तल केली व तो प्रदेश ओस पाडला. इतक्यांत पुढें याच सुमारास सन १०७१ मध्यें वेल्समधील लोकांनीं एडविन, मॉर्सर यांच्या नेतृत्वाखालीं बंड केलें; पण तें तात्काल मोडण्यांत आलें. पुढें त्याच सालीं हेरेवर्ड 'दी वेक' याच्या नेतृत्वाखालीं एलाय नांवाच्या बेटांत अनेक स्वातंत्र्यभक्त इंग्रज मिळाले व त्यांनीं बंड केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांतही बंडवाल्यांचा पुरा मोड झाला. हेरेवर्ड व मॉर्सर विल्यमला शरण आले. इ. स. १०७२ मध्यें स्कॉटलंडचा राजा माल्कमही विल्यमला शरण आला. अशारीतीनें बंडांचा निःपात करून विल्यमनें आपली गादी निर्धास्त केल्यावर तो इतर उद्योगास लागला.

४. नॉर्मन विजयाचे परिणाम :—नॉर्मन लोकांच्या विजयानें राजसत्ता अधिक बळकट होऊन इंग्लंडमधील सर्व सत्ता राजाच्या ठिकाणीं एकवटली. यामुळें पूर्वीं निरनिराळ्या सरदारांमध्यें जीं भांडणें लागत तीं नाहींशीं होऊन इंग्लंडांत एक जोरदार मध्यवर्ती सत्ता स्थापन झाली. यामुळें सरदारांच्या सत्तेला आळा बसला व इंग्रजांच्या स्वातंत्र्यप्रियतेला वाव मिळून ती वाढीस लागली. नॉर्मन लोकांचा ओढा रोमच्या पोपकडे विशेष होता. विल्यमनें इंग्लंड जिंकल्यावर अर्थातच पोपची सत्ताही इंग्लंडांत सुरू होऊन त्याच्या आज्ञा तेथें पूर्वींपेक्षांही जास्त कसोशीनें पाळल्या जाऊं लागल्या. विल्यम नॉर्मंडीचा ड्यूक होता व तो आतां इंग्लंडचा राजा झाल्यानें इंग्लंडचा युरोपांतील राष्ट्रांशीं जास्त निकटचा संबंध येऊं लागला. यामुळें इंग्लंडचा व्यापार वाढून युरोपीय युद्धांत इंग्लंडला पडावें लागलें. एकसूत्री मध्यवर्ती सत्ता सुरू झाल्यानें इंग्लंडमध्यें सर्वत्र एकाच कायद्यानें न्यायदान सुरू झालें. अँग्लोसॅक्सनांच्या संस्थांचा नॉर्मन लोकांनीं नाश केला नाहीं; व त्यामुळें त्यांच्या अनेक संस्था, विल्यमनें थोड्या सुधारणा करून, चालू ठेविल्या. थोड्याच दिवसांत नॉर्मन व इंग्लिश एकजीव होऊन गेले. नॉर्मनांची फ्रेंच भाषा इंग्लंडांत रूढ झाल्यानें इंग्रजांच्या भाषेवर फ्रेंच भाषेचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्याचप्रमाणें नॉर्मन कारागिरीचा व त्यांच्या लढण्याच्या पद्धतीचा इंग्रजांवर परिणाम झाला.

५. जमिनीची वांटणी :—बंडांचा मोड केल्यावर विल्यमला अंतस्थ कारभाराकडे लक्ष देण्यास फुरसत मिळाली. बंडें मोडण्याकरितां ज्या नॉर्मन सरदारांनीं त्याला मदत केली होती त्यांना त्यानें इंग्लंडमधील जमिनी दिल्या. हेस्टिंग्जच्या लढाईंत अनेक सरदार मारले गेल्यानें वरील गोष्ट त्याला सहज करतां आली. तसेंच बंडांत सामील झालेल्यांच्याही जमिनी नॉर्मन सरदारांना त्यानें देऊन टाकल्या. मात्र असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करतांना कोणालाही फार जमीन मिळणार नाहीं अशी त्यानें काळजी घेतली होती. यामुळें पूर्वींप्रमाणें सरदारांची सत्ता न बळावतां राजसत्ता सामर्थ्यवान् व बळकट राहण्यास मदत झाली. तसेंच ज्या नॉर्मन सरदारांना जमिनी मिळाल्या त्यांनीं त्या जमिनींच्या पूर्वीच्या मालकाच्या वारसदार विधवांशीं अगर मुलींशीं लग्नें केलीं. जे लोक विल्यमशीं स्वामिनिष्ठपणें राहण्यास तयार होते त्या इंग्रजांना राजानें त्यांच्या जमिनी त्यांनाच दिल्या. या गोष्टीमुळें देशांत शांतता राहणें शक्य झालें.

६. सरंजामी पद्धति:—इंग्लंडमधील सर्व जमिनीची वरीलप्रमाणें विल्यमनें वांटणी केली. राजा हा राज्यांतील सर्व जमिनीचा मालक असून आपल्या इच्छेप्रमाणें राजा ती जमीन कोणालाही देऊं शकेल; व ज्याला जमीन मिळेल त्यानें राजाशीं स्वामिनिष्ठ राहून युद्धप्रसंगीं राजाला लष्कराची व अन्य मदत केली पाहिजे, अशा अटी सर्व मोठमोठ्या जहागिरदारांवर अगर जमीनदारांवर लादण्यांत आल्या होत्या. लष्करी-मदतीशिवाय लग्नप्रसंगीं, कैदप्रसंगीं, अज्ञान स्थितींत, बेवारसा स्थितींत, वारसा बदलण्याचे वेळीं जमीनदारानें जमिनीच्या मालकाला म्हणजे राजाला पैसे दिले पाहिजेत असेंही ठरविण्यांत आलें होतें. मोठ्या जमीनदारानें आपल्या जमिनींचे कांहीं विभाग करून ते वरील अटींवर पोट–जमीनदारांस देण्यास हरकत नसे. हे पोट-जमीनदारही आपल्या कुळांना त्याच पद्धती-प्रमाणें जमिनी देत. अशा तऱ्हेची जमीनदारापासून साध्या शेतकऱ्यापर्यंत ही एक सांगड घालण्यांत आल्यानें कोणाही जमीनदाराला अगर सरदाराला प्रबल होतां येत नसे. तसेंच विल्यमनें कोणालाही सलग जमीन दिली नाहीं. प्रत्येकाला निरनिराळ्या परगण्यांतील जमीन मिळाल्यानें तिच्याकरितां तरी तो राजनिष्ठ राहील अशी विल्यमची योग्य कल्पना होती. वरील पद्धतीस ‘ सरंजामी पद्धति ’ असें म्हणतात.

७. नोंदणी–पुस्तक:—इंग्लंडमधील सर्व जमिनीची वरीलप्रमाणें विभागणी करून व त्याकरितां त्यानें स्वतःच्या इच्छेप्रमाणें पद्धति निर्माण करून त्या वेळीं योग्य ती कामगिरी बजावली. पुढें सन १०८६ मध्यें त्यानें सर्व जमिनीची पाहणी व मोजणी करून त्याची नोंदणी एका पुस्त-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांत करून ठेविली. त्या पुस्तकाला 'डूम्सडे बुक' ऊर्फ 'नोंदणी-पुस्तक' असें म्हणतात. या पुस्तकांत जमिनीच्या मालकांचीं व त्यांच्या कुळांचीं नांवें, कोणाकडे किती व कोणत्या प्रकारची जमीन आहे, तिचें वार्षिक उत्पन्न किती, त्यांत गुलाम किती, स्वतंत्र लोक किती, जनावरें कोणत्या प्रकारचीं व किती, जंगलें व कुरणें किती, चक्क्या किती वगैरे सर्व प्रकारची माहिती देण्यांत आली होती. यामुळें राजाला आपल्या जमीनदाराच्या बलाची व त्याच्या श्रीमंतीची योग्य कल्पना येऊं लागली; व कोणावर किती कर लादावे हेंहि त्यास कळूं लागलें. याच वेळीं सन १०८६ मध्यें सॉल्सबरी येथें लहान-मोठ्या सर्व जमीनदारांचा एक मोठा दरबार भरवून विल्यमनें प्रत्येकाकडून राजनिष्ठेची शपथ वाहून घेतली. यामुळें राजसत्ता जास्त बळकट होण्यास मदत झाली.

८. इतर गोष्टी :—विल्यमला शिकारीचा नाद फार होता. त्यावेळीं शिकार करण्यास एखादें चांगलेंसें अरण्य नव्हतें. तेव्हां त्यानें 'न्यू फॉरेस्ट' नांवाचें हॅम्शायरमध्यें एक जंगल तयार करून तेथें शिकार करण्याचा अधिकार राजा व राजघराण्यांतील मंडळीकरितां त्यानें राखून ठेविला. तेथें शिकार करण्यास कोणी गेल्यास त्याला जबरदस्त दंड द्यावा लागे. देशांतील बंडाळी नष्ट करण्याकरितां त्यानें कर्फ्यू-घंटेची व्यवस्था करून उन्हाळ्यांत सूर्यास्ताबरोबर व हिंवाळ्यांत रात्रीं आठ वाजतां सरकारी घंटा वाजल्याबरोबर सर्वांनीं दारें लावून दिवे मालविले पाहिजेत असा हुकूम केला. यामुळें सबंध रात्रभर जागून जे बंडवाले विचार करीत व एकत्र जमून कारस्थानें रचीत त्यांस आळा बसला. पूर्वीचा डेन्जेल्ड करही त्यानें बसविला होता; परंतु त्यापासून त्याला फारसें उत्पन्न मिळालें नाहीं. त्यामुळें इतर कर बसवावे लागले.

९. धर्मव्यवस्था :—इंग्लंड जिंकून घेतल्यावर विल्यमनें इंग्लिश धर्मगुरू काढून टाकून त्यांच्या जागीं नॉर्मन धर्मगुरू नेमले. यामुळें इंग्लिश धर्मपीठावरही नॉर्मनांचें वर्चस्व स्थापन झालें. सन १०७० सालीं स्टिगंड याची उचलबांगडी करून लॅन्फ्रँकला कँटरबरीचा आर्चबिशप नेमण्यांत आलें. वरील सुधारणांमुळें इंग्लंडचा फायदाच झाला. कारण नॉर्मन धर्म-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरू चांगले सुसंस्कृत असल्यानें त्यांच्यामुळें धर्मपीठाच्या बाबतींत चांगल्या सुधारणा झाल्या. या लोकांनीं निरनिराळ्या वेळीं धर्मपरिषदा भरविल्या व व धर्मगुरूंनीं ब्रह्मचर्याचें पालन करून संन्यस्तवृत्तीनें राहिलें पाहिजे असें ठरविलें. शिवाय धार्मिक कोर्ट स्थापन करून त्यांच्यापुढें धर्मगुरूंची चौकशी करण्यांत यावी अशी योजना करण्यांत आली. या सर्व सुधारणांमुळें इंग्लंडच्या धर्मपीठाचा रोमच्या पोपशीं निकट संबंध आला. तरीही पोपचें स्वामित्व मान्य करण्याचें विल्यमनें नाकारलें व धर्मपरिषदा भरविणें, पोपच्या आज्ञा मानणें, त्याचा अधिकार मानणें व जमीनदारांस धर्मबहिष्कृत करणें वगैरे गोष्टी राजाच्या संमतीशिवाय कोणीही करतां कामा नये असेंही विल्यमनें फर्माविलें. त्याच्या कारकीर्दींत अनेक धर्ममंदिरेंही बांधण्यांत आलीं.

१०. शहरांची व किल्ल्यांची वाढ :—इंग्लंडचें राज्यपद मिळविल्या-वर शहरांतून व लष्करी दृष्टीनें महत्त्वाच्या जागीं त्यानें बळकट किल्ले बांधले व ते सर्व आपल्या ताब्यांत ठेवले. हेतु एवढाच कीं सरदारांची सत्ता वाढूं नये. तसेंच सर्व किल्ल्यांवर आपल्या खात्रीचे व विश्वासाचे लोक नेमून त्यानें आपली सत्ता वाढविली. लंडनचा प्रसिद्ध टॉवर त्यानेंच बांधला. तसेंच व्यापाराच्या वृद्धीबरोबरच मोठ-मोठीं शहरेंही वाढलीं. या शहरां-कडून त्यानें रकमा वसूल करून त्यांस त्यानें अनेक प्रकारच्या सवलती व हक्कही दिले. त्यामुळें शहरांचें महत्त्वही वाढलें. या शहरांतून अनेक परकीय व्यापारी व कारागीर येऊन राहूं लागल्यानें शहरांचा व्यापारही वाढला. त्या वेळीं प्रथमतःच ज्यू लोक इंग्लंडमध्यें येऊन राहूं लागले, व त्यांनीं आपला देवघेवीचा व्यवहार इंग्लंडमध्यें सुरू केला.



लंडन टॉवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. नॉर्मन सरदारांचीं बंडें :—नॉर्मन सरदारांनीं विल्यमच्या कारकीर्दीच्या अखेरीस बंडें केलीं. विल्यम इंग्लंडचा राजा झाल्यावर आपल्याला ड्यूकचे हक्क मिळतील अशी त्यांची कल्पना होती. पण तसें न होतां त्यांची सत्ता कमी करण्याचाच विल्यमनें प्रयत्न केला. यामुळें अनेक नॉर्मन सरदारांचीं मनें असंतुष्ट झालीं होतीं. सन १०७४ मध्यें हेरेफर्डचा अर्ल, नॉर्फोकचा अर्ल वगैरे लोकांनीं बंड केलें. इंग्लंडच्या राज्याची विभागणी करून तें आपापसांत वांटून घेण्याची त्यांची इच्छा होती. हंटिंग्डनचा अर्ल वॉलथॉप याला हें कळल्यावर त्यानें विल्यमलाही ती गोष्ट कळविली. तेव्हां विल्यमनें बंडवाल्यांचा मोड केला; व आश्चर्याची गोष्ट म्हणजे कटांत सामील असल्याच्या संशयावरून वॉलथॉपलाही त्यानें फांशीं दिलें. लॅनफ्रॅंकनें वरील बंडाचा मोड केल्यावर सन १०७८ मध्येंही दुसरें बंड झालें. यांत विल्यमचा मुलगा रॉबर्ट हाही सामील होता. परंतु याही बंडाचा मोड झाला. यानंतर थोड्याच वर्षांनीं इ. स. १०८५ मध्यें घोड्यावरून पडून विल्यम मरण पावला.

अभ्यास

१. खालील व्यक्तींसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
फिटसूऑस्बर्न, वॉलथॉप, हेरेवर्ड, लॅनफ्रॅंक.

२. सरंजामी पद्धतीसंबंधीं थोडक्यांत हकीकत सांगा. महाराष्ट्रांत ती पद्धति कोणीं सुरू केली? त्यांत व विल्यमच्या पद्धतींत फरक कोणता? त्याचा परिणाम काय झाला?

३. नोंदणी पुस्तक, न्यू फॉरेस्ट, कर्फ्यू, नॉर्मन लोक यांसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

४. नॉर्मन विजयाचा इंग्लंडवर काय परिणाम झाला?

५. विल्यमच्या स्वभावाचें थोडक्यांत वर्णन करा. राजा या नात्यानें त्यानें कोणती उत्कृष्ट कामगिरी बजावली?

६. त्यानें नॉर्मन सरदारांना हाताशीं धरण्याचें कारण काय? नॉर्मन सरदार त्याच्यावर उलटण्याचें कारण काय? त्याचा परिणाम काय झाला?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. विल्यमच्या कारकीर्दीचा एक लहानसा कालादर्श तयार करा.

८. राज्याभिषेकानंतर विल्यमला कोणकोणत्या आपत्तींशीं झगडावें लागलें ? त्याचा परिणाम काय झाला ?

९. विल्यमनें जमिनीची विभागणी कशी केली होती ?

१०. इंग्लंडचा नकाशा काढून विल्यमच्या कारकीर्दीतील महत्त्वाचीं शहरें व प्रांत त्यांत भरा.

उतारे

१. नॉर्मन लोक—सन १०८७.

नॉर्मन लोकांचा पोषाख मोठा रुबाबदार व ऐटबाज आहे. त्यांचें खाणें नियमित पण मोठें नाजुक–साजूक असतें. युद्धकला त्यांच्या ठिकाणीं अभिजात आहे. किंबहुना युद्ध म्हणजे त्यांचें जीवनच ! प्रतिपक्षावर निकराचा हल्ला करण्यांत ते पटाईत आहेत; पण पराजय होतो असें दिसतांच ते युक्तीनें व ती फसल्यास लांचलुचपतीनें यश मिळविण्यास कमी करणार नाहींत. त्यांना मोठमोठ्या हवेल्यांतून राहणें आवडतें. ते काटकसरीही आहेत. आपल्याबरोबरीच्यांचा हेवा करणें व वरिष्ठांच्यावर ताण करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणें हा त्यांचा विशेष होय. आपल्या प्रजेला ते लुटतील पण शत्रूपासून तिचें संरक्षणही करतील. मालकाची नोकरी ते मोठ्या इमानें–इतबारें करतात. पण अन्याय दिसला तर केसानेंही गळा कापल्याशिवाय राहणार नाहींत. यशाच्या मापानें ते दगलबाजी मोजतात ! पैशानें त्यांचीं मनें ताबडतोब विरघळतात. एकंदरींत नॉर्मन लोक मोठे ममताळु आहेत व परकीयांचे गुण ओळखून ते त्यांना त्यांच्या लायकीप्रमाणें वागवतात.

प्रश्न :—१. नॉर्मन लोकांचे गुणावगुण सांगा. त्यांची विचारसरणी कोणत्या प्रकारची होती ?

२. लांचलुचपतीला ते महत्त्व देत असत का ? कोणत्या उद्देशानें ?

३. त्यांच्या राहणीसंबंधीं दोन चार वाक्यें सांगा.

२ नोंदणी–पुस्तक—१०८५.

ग्लॉस्टर येथें असतां आपल्या राज्यांतील एकंदर जमीन, तिची मालकी व राज्यांतील धारापद्धति याबद्दल विजयी विल्यमनें आपल्या वितन नामक सल्ला-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गार मंडळाशीं बरीच चर्चा केली. त्यानंतर त्यानें सर्व इंग्लंडभर निरनिराळ्या परगण्यांतून आपले लोक पाठवून दिले व कोणत्या परगण्यांत किती जमीन आहे, ती कोणाच्या ताब्यांत आहे, तिच्यापैकीं राजाच्या मालकीची किती, तेथें गुरेंढोरें किती, जमिनीचें उत्पन्न व सरकारधारा किती, वगैरे अनेक गोष्टींची माहिती त्यानें गोळा करण्यास सांगितलें. मालक कोण, त्यांचे नोकर किती, सरदारांच्या जमिनी किती व कोठें, बैल किती, डुकरें किती, नांगर किती, उत्पन्न काय होतें, किती होतें वगैरे बारीकसारीक व महत्त्वाच्या गोष्टींचीही नोंद आपल्या अहवालांत करण्याचा राजानें हुकूम सोडला; व ते सर्व अहवाल त्यानें आपल्याकडे मागविले.

प्रश्नः—१. नोंदणी–पुस्तक तयार करण्याचें कारण काय ?
२. त्या पुस्तकांत राजानें कशाकशाची नोंद केली होती ? तिचा उपयोग काय ?

३. नोंदणी–पुस्तकांतील एक उतारा

कार्लटन–परगणा—वॉग्रेव्ह जहागीर राजाच्या मालकीची आहे. एडिड राणीच्या मालकीची ती पूर्वीं होती. त्यावेळीं त्या जमिनींत सुमारें दोन हजार एकर जमीन होती. सध्यां त्या जमिनीला धारा नाहीं. २९ नांगरांची ती जमीन असून सदर जहागिरींत सध्यां दोन नांगर आहेत. जहागिरींत १४ स्वतंत्र शेतकरी व ४१ शेतमजूर असून त्यांच्याजवळ २५ नांगर आहेत. याशिवाय तेथें ६ गुलाम व नऊ शिलिंग दोन पेन्स किंमतीची एक चक्की आहे. तसेंच तेथें तीन ठिकाणीं मच्छीमारी चालते. सदर जहागिरींत १६ एकराचें एक कुरण असून त्याच्या-जवळच्या रानांत सुमारें शंभर डुकरें चरतात. जहागिरीचें उत्पन्न ३१ पौंड होतें; आतां २७ पौं. ६ शिं. ८ पे. आहे.

प्रश्न :—१. वरील उताऱ्यावरून कोणकोणती माहिती मिळते ?
२. त्या माहितीचा उपयोग काय ? माहिती तपशीलवार आहे का ? कशावरून ? अशी असण्यापासून फायदा काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. विजयी विल्यमनंतरचे नॉर्मन राजे

१. दुसरा विल्यम (इ. स. १०८७–११००) २. दुसरा हेन्री (इ. स. ११००–११३५). ३. स्टीफन (इ. स. ११३५–११५४).

१. दुसरा विल्यम–स्वभाव :—आपल्या मृत्यूनंतर आपल्या मुलांमध्यें इंग्लंडच्या गादीबद्दल तंटा माजूं नये म्हणून विजयी विल्यमनें इंग्लंडचें राज्य आपला दुसरा मुलगा विल्यम याला मिळावें असें ठरवून ठेवलें होतें. त्याप्रमाणें आपल्या बापाचें पत्र घेऊन विल्यम कँटरबरीचा आर्चबिशप लॅनफ्रँक याच्याकडे आला. आपला सल्ला मानण्याचें वचन घेऊन लॅनफ्रँकनें त्याला राज्याभिषेक करवून घेतला. त्याचा थोरला भाऊ रॉबर्ट याला विल्यमनें नॉर्मंडीचें राज्य दिलें होतें व धाकटा हेन्री याला फक्त पांच हजार पौंड दिले. दुसरा विल्यम दिसायला थोडा तांबुस दिसे. त्यामुळें त्याला 'रूफस' ऊर्फ रक्तवर्णी असें म्हणत. आर्चबिशप लॅनफ्रँक याच्या देखरेखीखालींच त्याचें शिक्षण झालें होतें. तो स्वभावानें अत्यंत वाईट निपजला. तो बापाप्रमाणें शूर होता. राज्यकारभाराची त्याला आवड होती. पण त्याला लागणारा मुत्सद्दीपणा अंगीं नसल्यानें त्याची कारकीर्द वाईट झाली. तो मनुष्याला जुमानीत नसे; एवढेंच नव्हे तर त्याला ईश्वराचीही कधीं भीति वाटली नाहीं. त्याच्यामधील एकच चांगला गुण म्हणजे आपल्या बापानें घालून दिलेली राज्याची घडी न विसकटतां त्यानें ती उत्तमप्रकारें राखून ठेविली. तो लोभी व दुष्ट होता व स्वार्थ

दुसरा विल्यम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साधण्याकरितां कोणीही बिशप मेल्यास त्याची जागा न भरतां त्यानें त्याचें उत्पन्न स्वतःच घेतलें. तसेंच लॅनफ्रँकच्या मृत्यूनंतरही कँटरबरीच्या आर्चबिशपच्या जागीं दुसऱ्या कोणाचीही नेमणूक न करतां त्या जागेचें उत्पन्नही त्यानें स्वतःच घेतलें. त्यानें प्रत्येकाचें मन दुखविलें व आपल्या प्रजेला आपल्या कृत्यांनीं भेदरून टाकलें. सन १०८९ मध्यें त्याचा मुख्य सल्लागार लॅनफ्रँक मेल्यावर त्यानें सर्व कारभार मन मानेल तसा केला.

२. राज्यांतील बंडें :—लॅनफ्रँकच्या मृत्यूनंतर अनेक नॉर्मन सरदारांनीं उचल केली, व विल्यमला राज्यावरून दूर करून रॉबर्टला राजा करण्याकरितां कट व बंडें केलीं. सन १०८८ मध्यें राजाचा चुलता बिशप ऑडो यानें वरील कारणांकरितां बंड उभारलें. त्याला अनेक सरदारांचें पाठबळ मिळालें होतें. त्या वेळीं इंग्लिश लोकांना निरनिराळ्या प्रकारचीं वचनें देऊन राजानें त्यांची मदत मिळविली; व ऑडोचा पराभव करून त्याला हद्दपार केलें. यानंतर विल्यमनें नॉर्मंडीमधील अनेक नॉर्मन सरदारांना वश करून घेऊन नॉर्मंडीवर हल्ला केला (सन १०९०). परंतु या लढाईचा रॉबर्टला व विल्यमलाही कंटाळा आला व दोघांमध्यें सन १०९१ मध्यें तह ठरून जो जास्त जगेल त्यानें इंग्लंड व नॉर्मंडी ह्या दोन्ही राज्यांवर राज्य करावें असें ठरविण्यांत आलें. यापुढें सन १०९६ सालीं धर्मयुद्धासाठीं रॉबर्ट निघून गेला. जातांना त्यानें नॉर्मंडी प्रांत विल्यमला गहाण टाकला. याच सुमारास रॉबर्ट मॉब्रे, नॉर्दंबरलंडचा ड्यूक, याच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडांतील अनेक सरदारांनीं बंड केलें; पण तें ताबडतोब मोडून टाकण्यांत आलें. या बंडाचें मुख्य कारण म्हणजे रॅनल्फ फ्लँबर्ड याचा राज्यकारभार होय. तो राजाचा मुख्य सल्लागार होता. नॉर्मंडीवरील लढाईत विल्यम गुंतला असतां इंग्लंडचा राज्यकारभार त्याच्याकडेच होता. राजाच्या सरंजामी अधिकारांची व हक्कांची त्यानें अत्यंत जुलमानें अंमलबजावणी केली; व प्रजेकडून त्यानें सर्व सारा अत्यंत जुलमानें वसूल करून घेतला. यामुळें राजाची तुंबडी भरली, तरी सरदार चिडले व म्हणूनच त्यांनीं बंड केलें. वरील दोन्ही बंडांत बंडवाल्यांचा पराभव झाल्यानें राजाचें सामर्थ्य लोकांच्या चांगलेंच प्रत्ययास आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. आनसेमची नेमणूक :—सन १०८९ मध्यें लॅनफ्रँक मेल्यावर कँटरबरीच्या आर्चबिशपाच्या जागेवर कोणाचीही नेमणूक न करतां त्या जागेचें उत्पन्न राजानें स्वतःच घेतलें. ही हकीकत मागें आलीच आहे. सन १०९३ मध्यें विल्यम आजारी पडला. त्याचें दुखणें जिवावरचें ठरून आपण आतां जगणार नाहीं असें त्याला वाटूं लागलें. तेव्हां देवाचा धांवा करून 'यापुढें आपण चांगले वागूं' असें तो म्हणूं लागला. त्याच वेळीं लॅनफ्रँकचा एक शिष्य आनसेम याची कँटरबरीच्या आर्चबिशपाच्या जागीं त्यानें नेमणूक केली. या त्याच्या कृत्यानें असो अगर देवानें त्याची प्रार्थना ऐकली म्हणून असो, तो दुखण्यांतून बरा झाला! परंतु बरा झाल्यावर त्याच्या दुष्कृत्यांस पुन्हां जोर चढला. राजा व आर्चबिशप याच्यामध्यें इंग्लंडांत पोपची सत्ता मानावयाची किंवा नाहीं याबद्दल वाद माजला. पोपची सत्ता मानावी असें आनसेमचें म्हणणें राजाला मान्य नव्हतें. राजाचें हें म्हणणें बरोबरही होतें. परंतु पोपनें आनसेमच्या म्हणण्यास संमति दिल्यानें राजाला जोरदार धोरण स्वीकारणें भाग पडलें. कँटरबरीचा आर्चबिशप असूनही आनसेम एक जहागिरदार होता. तेव्हां वेल्स प्रांताशीं लढण्याकरितां आर्चबिशपनें आपल्याला सैन्य पुरविलें नाहीं, या आरोपावरून राजानें आनसेमला कोर्टापुढें खेंचलें. तो हजर राहिला नाहीं. तेव्हां राजानें त्याला हद्दपार केलें (१०९७). तेव्हां तो रोमला गेला. यामुळें पोपच्या सत्तेपेक्षांही राजाची सत्ता श्रेष्ठ होय असें आपोआपच ठरलें.

४. स्कॉटलंड व वेल्स यांशीं युद्ध :—याच सुमारास विल्यमला स्कॉटलंड व वेल्स या देशांशीं युद्ध करावें लागलें. स्कॉटिश व वेल्श लोकांनीं विल्यमला एकसारखा त्रास देण्याचें व्रत अंगिकारलें होतें. विल्यमचा मुख्यप्रधान फ्लँबर्ट इंग्लंडमधील सरदारांना छळतो म्हणून त्यांची बाजू स्कॉटलंडचा राजा माल्कम यानें घेतलेली होती. तशांतच कंबरलंड व वेस्टमोरलंड हे दोन्ही परगणे एडमंड राजानें स्कॉटलंडच्या राजाला दिले असून ते दोन्ही प्रांत आपल्याला मिळावे असें तो म्हणूं लागला. तेव्हां विल्यम नॉर्मंडीमध्यें गेला असें पाहून त्यानें इंग्लंडवर स्वारी केली. नॉर्मंडीहून परत आल्यावर विल्यमनें माल्कमवर स्वारी केली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१०९२). या लढाईंत माल्कम मारला गेला. त्याच वर्षी वेल्श लोकांनीं केलेलें बंडही मोडण्यांत आलें. पुढें सन १०९७ मध्येंही वेल्श लोकांनीं पुन्हां उचल खाल्ली; त्यावेळींही विल्यमनें त्यांचा पुरा मोड केला. स्कॉटलंडवरील विजयानें विल्यमला कंबरलंड प्रांत मिळाला; व तेथें नॉर्मन लोकांची वसाहत स्थापून त्यानें तो प्रांत आपल्या राज्यास कायमचा जोडला. वेल्श लोकांचा पराभव करून त्यानें दक्षिणवेल्स प्रांत आपल्या ताब्यांत आणला.

५. धर्मयुद्धें:—दुसऱ्या विल्यमच्या कारकीर्दीतच सर्व युरोपभर धर्म-युद्धाच्या वातम्या पसरूं लागल्या. पॅलेस्टाईन प्रांतांत खिस्ती लोकांचीं धर्म-क्षेत्रें व पवित्र स्थळें आहेत. अरबांनीं तो प्रांत व खिस्ती लोकांचें जरुसलेम हें पवित्र स्थान काबीज केलें होतें; परंतु त्यांच्याकडून खिस्ती लोकांस कोणताही उपसर्ग पोंचला नाहीं. पुढें सन १०७६ मध्यें जरुसलेम तुर्क लोकांनीं काबीज करून घेतलें. तुर्क लोक खिस्ती धर्माचा द्वेष करीत; त्यामुळें खिस्ती लोकांचा ते छळ करूं लागले. जरुसलेमला जाणाऱ्या यात्रेकरूंनीं आपल्या छळाच्या हृदयद्रावक हकीकती युरोपांतील लोकांस सांगण्यास सुरुवात करून तुर्क लोकांवर सूड उगविण्याबद्दल युरोपांतील राजांस व सरदारांस ते कळवळून विनवूं लागले. इटॅलियन लोकांचा पॅलेस्टाईन प्रांतीय व्यापार बुडाल्यामुळें त्यांचेंही नुकसान होत असे. त्यांनींही तुर्कांविरुद्ध लढाई करण्यास युरोपांतील लोकांस उत्तेजन दिलें. याच सुमारास सन १०९६ मध्यें पीटर नांवाचा साधु सर्व युरोपभर हिंडला; व खिस्ती लोकांच्या हालांचें मोठें भडक वर्णन सर्व लोकांपुढें करून त्यानें जरुसलेम मुसलमानांच्या ताब्यांतून सोडवून घेतलेंच पाहिजे अशी सर्वांची खात्री केली. त्यामुळें अनेक राजे चिडून गेले व त्यांनीं आपलीं धर्मक्षेत्रें सोडवून घेण्याकरितां धर्मयुद्धें करण्याचें ठरवून त्याकरितां त्यांनीं सैन्य उभारण्यास सुरुवात केली. 'क्रॉसच्या अर्थात् खिस्ती धर्माच्या संरक्षणाकरितां तुर्कांशीं केलेलें युद्ध म्हणजे 'क्रूसेड' ऊर्फ 'धर्म-युद्ध होय,' अशी त्या वेळीं लोकांची समजूत होती. अर्बन नांवाच्या पोपनेंही खिस्ती लोकांच्या भावना चेतविण्यास सुरुवात करतांच अनेक राजे व मोठमोठे योद्धे धर्मयुद्धांत भाग घेण्यास तयार झाले. विल्यमचा भाऊ व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नॉर्मंडीचा ड्यूक रॉबर्ट हाही या धर्मयुद्धाकरितां आपला प्रांत गहाण टाकून गेला होता. हीं धर्मयुद्धें पुढें बरींच वर्षें चाललीं.

६. दुसऱ्या विल्यमचा मृत्यु—हीं धर्मयुद्धें चालू असतांच दुसरा विल्यम एकदां 'न्यू फॉरेस्ट'मध्यें शिकार करीत असतां त्याच्या छातींत बाण घुसला व त्यामुळें तो मरण पावला. कोणी म्हणतात त्याचा खून करण्यांत आला होता (११००). दुष्ट लोकांच्या सल्ल्याप्रमाणें तो वागला व



दुसऱ्या विल्यमनें बांधलेला वेस्ट मिन्स्टर दिवाणखाना. पहिला चार्ल्स, वॉरन हेस्टिंग्ज, विल्यम वॉलेस वगैरेंचे खटले येथेंच चालले.

आपल्या लोभी वृत्तीची त्यांत त्यानें भर घातली. यामुळें करांच्या ओझ्याखालीं प्रजा दडपून गेली होती. त्याच्या काळीं न्यायाचा खून झालेला होता; व त्यामुळें अनेक संकटें निर्माण झालीं. त्यामुळें प्रजेनें त्याला दुवा देण्याऐवजीं त्याच्या प्रत्येक कृत्याला नाकें मुरडलीं. त्याच्या छळानें प्रजा वैतागून गेली होती. मागें ठरल्याप्रमाणें त्याच्यामागून त्याचा भाऊ रॉबर्ट याला इंग्लंडचें राज्यपद मिळणें अगदीं योग्य होतें. परंतु रॉबर्ट धर्मयुद्धांत गुंतला आहे असें पाहून त्याचा भाऊ हेन्री यानें त्वरा करून विल्यमचा खजिना प्रथमतः ताब्यांत घेतला व मग स्वतःला राज्याभिषेक करून घेतला.

७. पहिला हेन्री (इ. स. ११००–११३५):—पहिला हेन्री इंग्लंडमध्येंच वाढल्यामुळें तो तेथें लोकप्रिय होता. तो मोठा धोरणी, कर्तबगार व शूर असल्यानें त्यानें अनेकांना आपल्या बाजूला वळवून घेऊन प्रजेचें प्रेम संपादन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलें. तो स्वतः विद्वान होता व विद्वान लोकांना आश्रय देऊन त्यानें त्यांस खूष केलें. राज्यावर आल्याबरोबर त्यानें प्रथमतः जीं सत्कृत्यें केलीं त्यामुळें तो लोकप्रिय झाला. प्रथमतः त्यानें एक जाहीरनामा काढून सर्व लोकांस कळविलें कीं, 'आपल्या भावाप्रमाणें आपण दुष्टपणें न वागतां लोकांच्या हक्कांचें आपण रक्षण करूं.' नंतर त्यानें आनसेमला रोमहून इंग्लंडांत परत बोलावून घेतलें व त्याला कँटरबरीचा आर्चबिशप केलें. फ्लँबर्ड या जुलमी अधिकाऱ्यास कामावरून दूर करून त्याला त्यानें कैदेंत टाकलें. शेवटीं आपण परकी नाहीं व इंग्लिश लोकांनाही आपण परकी मानीत नाहीं हें स्पष्ट करण्याकरितां स्कॉटलंडच्या माल्कम राजाची मुलगी एडिथ, हिच्याशीं त्यानें लग्न केलें. हिचेंच पुढें मॅटिल्डा असें नांव ठेवण्यांत आलें. वरील सर्व कृत्यांमुळें इंग्लिश प्रजेला हेन्री फारच आवडूं लागला. विशेषतः सरदारांपासूनही तो आपलें संरक्षण करील असेंही प्रजेला वाटत होतें.

पहिला हेन्री

८. रॉबर्टशीं युद्ध (इ. स. ११०१–०६):—धर्मयुद्ध संपवून रॉबर्ट परत आला. विल्यमशीं त्याचा जो करार झाला होता त्याप्रमाणें इंग्लंडचें राज्यपद त्याला मिळणें योग्य होतें. परंतु तें हेन्रीनें बळकावलेलें पाहून त्यानें नॉर्मन सरदारांच्या चिथावणीवरून इंग्लंडवर स्वारी केली. इंग्रजांना हेन्री हाच राजा हवा होता. त्यामुळें त्या लोकांची हेन्रीला मदत मिळाली. लढाई न होतां दोघां भावांत तह होऊन रॉबर्टनें नॉर्मंडीवर व हेन्रीनें इंग्लंडवर राज्य करावें असें ठरलें. परंतु सन ११०४ मध्यें नॉर्मन सरदारांच्या बोलावण्यावरून हेन्रीनें आपलें एक मोठें सैन्य नॉर्मंडीवर पाठविलें. टेंकेब्राय येथें लढाई होऊन रॉबर्टचा पूर्ण पराभव झाला (११०६). व त्याला हेन्रीचा कैदी म्हणून इंग्लंडांत रहावें लागलें. तेव्हां त्याचा नॉर्मंडी प्रांत हेन्रीनें आपल्या राज्यास जोडला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. हेन्रीचा आनसेमशीं समेट :—राज्यावर आल्यावर हेन्री व आनसेम यांच्यामध्यें थोडासा वाद विकोपास गेला होता. बिशप लोकांची नेमणूक करणें व त्यांना अधिकाराचीं वस्त्रें देणें या बाबतींत वरील तंटा होता. या वेळीं बिशपांकडे जमिनी असत व ते एकप्रकारें सरंजामी सरदार समजले जात. ही गोष्ट लक्षांत घेऊन बिशपांची नेमणूक करण्याचा व त्यांस अधिकारदान करण्याचा अधिकार पोपचा नसून तो राजाचा आहे; एवढेंच नव्हे तर सरंजामी सरदार म्हणून त्यांनीं राजाला मुजरेही केले पाहिजेत असें हेन्री म्हणत होता. आर्चबिशप आनसेम याला वरील गोष्ट मान्य नसून बिशपांची नेमणूक व त्यांचें अधिकारदान पोपकडूनच व्हावयास पाहिजे असा त्यानें हट्ट धरला. एवढेंच नव्हे तर बिशपांनीं राजाला राजनिष्ठेकरितां मुजरे करतां कामा नये असेंही मत व्यक्त केलें. भांडण विकोपास जाऊं नये म्हणून हेन्रीनें इ. स. ११०७ मध्यें आनसेमशीं तडजोड केली. यामुळें बिशपांची नेमणूक व त्यांचें अधिकारदान पोपनें करावें, पण सरंजामी सरदार म्हणून त्यांनीं राजनिष्ठेची शपथ घेतली पाहिजे असें ठरलें. या समेटामुळें नेमणुका पोपच्या हातीं गेल्या तरी बिशप सरंजामी सरदार असल्यानें त्यांच्या नेमणुका राजाला स्वेच्छेप्रमाणें करवून घेतां येत. तसेंच इंग्लंडमधील धर्मपीठाच्या सत्तेची वाढ होण्यासही या समेटानें मदत केली.

१०. हेन्रीच्या सुधारणा :—मोठा न्यायप्रिय म्हणून हेन्रीची ख्याति होती. आपल्या राज्यांतील लोकांना उत्तम प्रकारचा न्याय मिळावा म्हणून त्यानें दोन नवीन प्रकारचीं कोर्टें स्थापन केलीं. या कोर्टांत त्यानें उत्तम व विद्वान लोक नेमले होते. त्यानें 'एक्सचेकर कोर्ट' व 'क्यूरिया रेजिस' अशीं दोन कोर्टें स्थापन केलीं. आपल्या राज्यांतील सर्व प्रकारचे कर, राजाचें खासगी उत्पन्न, सरंजामी सरदारांकडील येणें वगैरे वसूल करण्याचें काम पहिल्या कोर्टाकडे सोंपवून दुसऱ्या कोर्टानें सरदारांवरील खटले चालवावें व 'शायर' व 'हंड्रेड' मधील कोर्टांना जे खटले चालवितां येणें शक्य नाहीं ते चालवावे असें त्यानें ठरविलें. म्हणजे 'क्यूरिया रेजिस' हें एक मध्यवर्ती कोर्ट होतें असें म्हटलें असतांही चालेल. वरील कोर्टांशिवाय त्यानें फिरत्या न्यायकचेऱ्या स्थापन करून, निरनिराळ्या भागांतून सरदारांचीं व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतर जीं कोर्टें असत त्यांतून न्यायदान योग्य रीतीनें होतें किंवा नाहीं हें पाहण्याचें काम त्या कोर्टाकडे सोंपविण्यांत आलें. खरोखर पाहतां हेन्रीनें 'क्यूरिया रेजिस' हें एकच कोर्ट स्थापन केलें होतें; व वसूल व न्याय याकरितां त्याच्या दोन शाखा त्यानें केल्या होत्या. वसुली वगैरे काम चाले त्या वेळीं त्याला एक्सचेकर कोर्ट म्हणत व ज्यावेळीं तें न्यायदान करी त्यावेळीं त्याला 'राजाचें कोर्ट' ऊर्फ 'क्यूरिया रेजिस' असें म्हणत.

११. **हेन्रीचा मृत्यु** (सन ११३५):—हेन्रीला दोन मुलें होतीं. त्यांपैकीं विल्यम या मुलावर त्याचें फार प्रेम होतें. नॉर्मंडीहून सन ११२० मध्यें परत येत असतां वयाच्या अठराव्या वर्षीं विल्यम इंग्लिश खाडींत बुडून मेला. यामुळें राजाला फार दुःख झालें. त्यानंतर राज्याला कोणीच वारस नसल्यानें आपल्या मागून आपली मुलगी मॅटिल्डा हिला राज्यपद मिळावें अशी त्याची इच्छा होती. त्याप्रमाणें सरदारांची संमतीही त्यानें मिळविली होती. अशा व्यवस्थेंत असतांच पहिला हेन्री सन ११३५ मध्यें मरण पावला. तो मोठा राजा होऊन गेला. त्याची कारकीर्द भरभराटीची झाली. अनेक फ्रेंच कारागीर व विणकरी त्याच्या वेळीं इंग्लंडांत येऊन स्थायिक झाले होते. त्यामुळें उद्योगधंद्यांबरोबरच शहरांचीही भरभराट होऊं लागली. इंग्लंडांतील धर्ममठांत शिक्षण देण्याची सोयही त्याच्या वेळींच सुरू झाली.

१२. **स्टीफन** (इ. स. ११३५–५४):—हेन्रीच्या नंतर मॉड ऊर्फ मॅटिल्डा हिला राणी करण्याचें ठरलें होतें; व नॉर्मन सरदारांनीं त्या गोष्टीला संमतीही दिली होती. परंतु हेन्री मेल्याबरोबर स्टीफन नांवाच्या सरदारानें उचल करून सरदारांना लांच दिला व इंग्लंडची गादी बळकावली. तो विजयी विल्यमचा नातु व पहिल्या हेन्रीचा भाचा असल्यानें राजघराण्याशीं त्याचा संबंध होता. त्याचा अधिकार मान्य करण्यांत इंग्लिश व नॉर्मन सरदारांचा स्वार्थ साधण्याचा हेतु होता. स्टीफन आपल्यांतलाच असल्यानें आपल्याला अनेक प्रकारच्या सवलती मिळून मनसोक्त राज्य-

स्टीफन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारभार करतां येईल अशी त्यांची कल्पना होती. शिवाय मॉड ऊर्फ मॅटिल्डा हिला राज्य मिळालें तर स्त्रीराज्य इंग्लंडमध्यें सुरू होणार! व तें तर इंग्रजांना वावडें! शिवाय मॉडनें अँज्यूच्या सरदाराशीं–जिऑफ्रेशीं–केलेला पुनर्विवाह लोकांना पसंत नव्हता. या सर्व कारणांमुळें स्टीफनलाच जास्त पाठबळ मिळालें व तो इंग्लंडचा राजा झाला. स्टीफन मोठा शूर वीर, दिसण्यांत सुंदर, मनाचा उदार व उत्साही होता. पण राज्यकर्त्याच्या आंगीं लागणारे गुण त्याच्या ठिकाणीं नसल्यानें त्याच्या कारकीर्दींत अनेक दुष्कृत्यें व लढाया झाल्या. राज्यावर आल्यावर त्यानें अनेक सरदारांना आपल्या जहागिरींत किल्ले बांधण्याची सवलत दिली. त्याप्रमाणें अनेकांनीं किल्ले बांधून आपलें सामर्थ्य वाढविलें व आपल्या प्रजेवर जुलुम जबरदस्ती करण्यास सुरुवात केली. सव सरंजामीपद्धतीमध्यें गोंधळ माजून सरदार लोक राजापेक्षांही प्रबळ झाल्यानें 'देशमुखी कोर्टां'ना आपल्या निकाला-प्रमाणें कायद्यांची अंमलबजावणी करतां येईनाशी झाली. श्रीमंताला पकडून त्याचा छळ करावा व मग त्याच्या संपत्तीचें हरण करावें असें धोरण सरंजामी सरदारांनीं स्वीकारल्यानें जिकडे तिकडे अनवस्था प्रसंग उत्पन्न झाला, इंग्लंडचा व्यापार बसला, शेतीवाडी होईनाशी झाली व गरीब शेतकऱ्यांचे व मजुरांचे हाल होऊं लागले. अशा स्थितींतच स्टीफन व मॉड यांच्यामध्यें इंग्लंडच्या गादीबद्दल तंटा उत्पन्न होऊन सुमारें बारा वर्षें सर्व इंग्लंडभर लढाया, मारामाऱ्या व चकमकी यांना ऊत आला!

१३. स्टीफन व मॉड :—स्टीफन राजा झाला त्यावेळीं मॉड इंग्लंडांत नव्हती. तिचा मामा, डेव्हिड, स्कॉटलंडचा राजा होता. अनेक सरदारांस तिला राज्यपद मिळावें असें वाटत होतें. या सर्व गोष्टी जमेस धरून ती इंग्लंडमध्यें आली व तिनें स्टीफनबरोबर युद्धाला सुरुवात केली. प्रथमतः मॉडच्या सैन्यानें लुटालूट व जाळपोळ करण्यास सुरुवात केली. पुढें उभय बाजूंच्या सैन्यांच्या लढाया होऊं लागल्या. त्यांत कधीं स्टीफनला तर कधीं मॉडला जय मिळत गेला. पुढें सन ११४१ मध्यें लिंकनच्या लढाईत पराभूत होऊन स्टीफन मॉडच्या हातीं लागला. त्यामुळें मॉड स्वतःला राणी समजूं लागली. मॉडचें वर्तन लोकांस कधींही पसंत पडलें नाहीं. अत्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उद्धट असल्यामुळें ती वाटेल त्याला टाकून बोलत असे. यामुळें अनेक लोक तिला सोडून जाऊं लागले. याचवेळीं स्टीफनला मदत केल्याबद्दल मॉडनें त्यांच्यावर जबर कर बसविला. त्यामुळें ते लोक चिडले. याच सुमारास स्टीफनच्या राणीनें मॉडवर चाल केली व तिला पळवून लावलें. शेवटीं मॉडला इंग्लंडमधून पळून जावें लागलें. त्या वेळीं उभय बाजूंमध्यें इ. स. ११५३ मध्यें वॉलिंगफर्ड येथें तह होऊन हयातीपर्यंत स्टीफननें राज्य करावें व त्याच्यानंतर मॉडचा मुलगा हेन्री याला इंग्लंडची गादी मिळावी असें ठरलें. वरील तहानें लढाई थांबली. परंतु या यादवीमुळें देशांतील उमरावांची सत्ता वाढण्यास मदत झाली. त्यामुळें मध्यवर्ती सत्ता कमकुवत असल्यानें देशांत अनवस्था प्रसंग कसा उत्पन्न होतो हें सिद्ध झालें. परकीय भाडोत्री सैन्याच्या जोरावर स्टीफननें यादवी युद्ध लढविलें होतें. ते स्वार्थ साधण्याकरितां इंग्लंडमध्यें आले असल्याकारणानें त्यांनीं मन मानेल तसा हात मारून पैसा गांठीं मारला व त्याकरितां अनेकांचा छळ करून लोकांस सतावून सोडलें. स्टीफनचें हें धोरण सपशेल चुकलें. त्यानंतर स्टीफन फार दिवस जगला नाहीं. सन ११५४ मध्यें तो मरण पावला व ठरल्याप्रमाणें हेन्रीला राज्याभिषेक झाला.

अ भ्या स

१. दुसऱ्या विल्यमचा स्वभाव वर्णा. त्याच्या दुर्गुणांमुळें त्याचें नुकसान काय झालें ?

२. आनसेम व विल्यम यांच्यामधील तंट्याचें स्वरूप काय ? त्याचा शेवट काय झाला ?

३. हेन्री व आनसेम यांचा लढा व त्याचा शेवट यासंबंधीं माहिती सांगा.

४. धर्मयुद्धें उत्पन्न होण्याचें कारण काय ? युरोपियन लोक या युद्धांत कां पडले ?

५. पहिला हेन्री व रॉबर्ट यांच्यामधील तंट्याचें कारण काय ? त्याचा शेवट काय झाला ?

६. प्रथमतः हेन्री लोकप्रिय कां झाला ? त्याच्या सुधारणा सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. स्टीफनच्या चुका सांगून त्या चुका सुधारण्याकरितां तुम्हीं काय केलें असतें तें सांगा.

८. नॉर्मन घराण्याच्या काळाचा एक कालादर्श तयार करा.

उतारा

१. पहिल्या धर्मयुद्धाचे वेळीं धर्मयोद्ध्यांना पोपनें केलेला उपदेश :—

आपल्या धर्मावर घाला घालणाऱ्यांविरुद्ध जी जंगी मोहीम सुरू होणार आहे त्याकरितां तुम्ही सिद्ध व्हा. धर्माचा प्रसार व त्याचें संरक्षण करण्याकरितां तुम्ही जात आहांत हें दर्शविण्याकरितां आपल्या धर्माची खूण म्हणून तुम्ही आपल्या खांद्यावर 'क्रॉस' नेहमीं वापरीत जा. या तुमच्या बहिरंगाप्रमाणेंच तुमचें अंतरंगही धर्मतेजानें चमकलें पाहिजे हें लक्षांत ठेवा. आपापसांत लढण्यामध्यें अथवा द्वंद्वयुद्धामध्यें ज्या तरवारी तुम्ही नेहमीं रक्ताळीत असतां त्या आतां आपल्या धर्माच्या शत्रूवर यापुढें चालवा. या मोहिमेंत तुम्ही जी धडाडी व जो उत्साह दाखवाल त्यामुळें तुमचीं सर्व पापें धुऊन जातील यांत शंका नाहीं. ज्यांना आपल्या पापाबद्दल व दोषांबद्दल मनापासून वाईट वाटत असेल, त्यांनीं या युद्धांत भाग घेतल्यास, त्यांना त्यांच्या सर्व अपराधांची आम्ही पूर्णपणें माफी करूं. ज्यांचें आचरण अगोदरच शुद्ध आहे त्यांना आमचें एवढेंच सांगणें आहे कीं या सत्कृत्यानें तुम्ही मोक्षाप्रत एकेका पाउलानें पुढें पुढें जात आहां. जा, शूर योद्ध्यांनों, सर्व जगभर आपली कीर्ति वाढवा; मृत्यूपासून निर्भय असा. तुम्ही जे हाल सोसणार आहांत त्यांची भविष्यकाळीं होणाऱ्या तुमच्या उज्वल कीर्तीशीं कधींही तुलना होणें शक्य नाहीं.

प्रश्नः—१. वरील उपदेश कोणीं, केव्हां व कशाकरितां केला ?

२. त्या उपदेशाचें थोडक्यांत सार सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. नॉर्मन काळांतील इंग्लंड

१. लोकस्थिति :—नॉर्मनांनीं इंग्लंड जिंकून घेतला ही गोष्ट इंग्रजांना आवडली नाहीं व त्यामुळें ते नॉर्मनांचा द्वेष करीत. परकीय नॉर्मन लोकांनीं आपले हक्क हिरावून घेतले, आपल्या जहागिरी काढून घेतल्या, आपल्या धर्मसंस्थांच्या वृत्ति नाहींशा केल्या व त्या सर्वांचें दान परकीयांना केलें म्हणून इंग्रज लोक नेहमीं चरफडत! इंग्रजी भाषा जाऊन राजदरबारीं नॉर्मन-फ्रेंच भाषा रूढ झाली, त्यामुळेंही त्यांना चीड येई. परंतु या सर्व गोष्टी जित इंग्रजांनीं त्या वेळीं सहन केल्या. नॉर्मन लोक अत्यंत व्यवहार-दक्ष व मिळून-मिसळून व अत्यंत गोडीगुलाबीनें वागणारे असल्यानें ते इंग्रजांशीं व त्यांच्या देशाशीं आत्मीयतेच्या भावनेनें वागू लागले. पुढें पुढें त्यांनीं इंग्रजांशीं रोटी-बेटी व्यवहारही सुरू केले; व इंग्रजांना त्यांनीं हळू हळू राजकारणांतही हक्क व अधिकार देण्यास सुरुवात केली. त्यामुळें नॉर्मनांसंबंधाचा इंग्रजांचा ग्रह पालटूं लागला. अर्थात् अगदीं पहिल्या नॉर्मन राजवटींत खून, मारामाऱ्या, लुटालूट, जाळपोळ यांना जरी ऊत आलेला असला तरी त्याला पुढें आळा पडला व देशाची स्थिति चांगली सुधारली.

२. सामाजिक स्थिति :—अँग्लो-सॅक्सनांच्या वेळची स्थिति नॉर्मनांच्या वेळींही चालू होती. परंतु त्यांत नॉर्मनांनीं बराच फरक घडवून आणलेला होता. त्यावेळींही राजा हाच समाजाचा नेता व मुख्य पुढारी समजला जाई; परंतु त्याचें बूड मात्र एका ठिकाणीं कधींही स्थिर नसे. अन्नाकरितां व करवसुलीकरितां आपल्या लव्याजम्यासह राजा सर्व देशभर एकसारखा भटकत असे. त्यामुळें तो ज्या ठिकाणीं राही त्या ठिकाणाला राजधानीचें महत्त्व प्राप्त होत असे. राजनिष्ठ सरदार तेथें येऊन त्याला भेटत; राज-कारणाची चर्चा करीत, आपला करभार देत, व त्याचा मानमरातब राखून त्याच्या अन्नपाण्याचीही सोय करीत. अशा तऱ्हेनें राजाचा मुक्काम एके

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठिकाणीं महिना महिना पडे! त्यामुळें त्या ठिकाणच्या आजूबाजूच्या खेड्यांतील लोकांना मात्र नकोसें होई! कारण त्याच्या लव्याजम्यांतील लोक त्या खेड्यांतून जात, हक्कानें व जबरदस्तीनेंही तेथील घरांतून खुशाल रहात, तेथील खाद्यपेयांवर यथेच्छपणें खुशाल ताव मारीत व गाड्या–बैल–घोडीं वेठीस धरून नेत! या त्रासामुळें राजाचा मुक्काम हालला कीं खेड्यांतील लोकांना हायसें वाटे! राजा सर्वांचें रक्षण करणारा आहे अशी भावना असल्यानें लोकांना हा त्रास सहन करावा लागे!!

राजाच्या खालोखाल सरदार–उमराव–जहागिरदार–धर्मगुरू–देशमूख वगैरे उच्चवर्गीयांना समाजांत मान असे. राजा ज्याप्रमाणें आपल्या राज्यांतून हिंडे त्याचप्रमाणें हेही लोक आपल्या जहागिरींतून भटकत व आपल्या लोकांस उपद्रव देत असत. राजाच्या खालोखाल त्यांची ऐट व मिजास असे. या वर्गांतील बहुतेक लोक नॉर्मन असत. त्यांना राजानें मोठमोठ्या जहागिरी दिल्या होत्या. आपल्या जहागिरीच्या ठिकाणीं मोठे बळकट किल्ले बांधून ते राहत. धर्मगुरूंनाही नॉर्मन राजांनीं मोठमोठ्या जहागिरी दिल्या होत्या. या सर्वांना राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागे व लढाईच्या वेळीं राजाला सैन्याची मदत करावी लागे. त्यांच्या जहागिरीला ‘ मॅनॉर ’ ऊर्फ ‘ देशमुखवाडी ’ असें म्हणत. यानंतर शिलेदारांचा वर्ग होता. या वर्गांत कांहीं सरदारही असत. हे शिलेदार दोन प्रकारचे होते. धंदेवाईक शिलेदार व शेती वगैरे करून शिलेदारी बाण्यानें राहणारे योद्धे. मोठमोठे जहागिरदार पगार देऊन आपल्या पदरीं धंदेवाईक शिलेदार बाळगीत असत. युद्धप्रसंगीं आपल्या मालकाच्या, आज्ञेप्रमाणें कामगिरी बजावणें हें यांचें मुख्य काम असे. दुसऱ्या प्रकारचा शिलेदार हा योद्धा असे; शांततेच्या वेळीं शेतीचें काम करून तो पोट भरी व युद्धप्रसंगीं आपल्या सरदाराच्या मदतीस हजर राही. पुढें पुढें हे शिलेदार धर्मयुद्धांतही भाग घेऊं लागले होते. शिलेदारांनंतर समाजांत मध्यम वर्गांतील लोक मोडत. यांचा पेशा व्यापारी, उदमी, शेतकरी वगरे असे; व त्यांना ‘ स्वतंत्र ’ समजण्यांत येई. त्यांचें वास्तव्य खेड्यांत असे. व्यापारी व उद्योगधंदेवाले नुकत्याच उदयास येणाऱ्या शहरांतून रहात. त्यांच्या खालोखाल गुलामांचा वर्ग असे. सरदारांची व जहागिरदारांची पडेल ती चाकरी करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपली उपजीविका करण्याकडेच यांचें सदैव लक्ष असे. या वर्गांतील लोकांवर मात्र वरींच बंधनें असत.

३. किल्ले व त्यांचें महत्त्व :—नॉर्मन राजवटींत आत्मसंरक्षणार्थ सरदार व जहागिरदार मोठमोठे बळकट किल्ले बांधूं लागले होते. आपल्या जहागिरीच्या केंद्रस्थानीं डोंगरीकिल्ले अथवा भुइकोट किल्ले बांधून हे लोक आपल्या जहागिरीचा बंदोबस्त ठेवीत. शत्रूपासून संरक्षण व्हावें म्हणून या किल्ल्याभोंवतीं बळकट दगडी भिंत अगर तटबंदी असे; व त्याच्या भोंवतीं खंदकही असत. जाण्यायेण्याचे वेळीं काढता-घालता पूल उपयोजिण्यांत येत असे. खुद्द किल्ल्यांतही उत्तम प्रकारची शिबंदी ठेवण्यांत येई. शिबंदींतील सैनिकांचा योग्य तो सांभाळ करण्याची सर्व जबाबदारी जहागिरदारावर असे. या किल्ल्यावर सरदाराचा मोठा वाडा असून त्याच्या भोंवतींही तटबंदी व क्वचित् प्रसंगीं खंदकही खोदीत. त्या वाड्याला ‘ कीप ’ असें म्हणत. त्यांत अनेक प्रकारच्या सुखसोई असून तो दुमजली असे. वाड्याच्या मुख्य दरवाजावर सदैव पहारा असे. या किल्ल्यामुळें जहागिरदारांची सत्ता वाढण्यास मदत झाली व वेळेनुसार राजाशीं लढण्याचा प्रसंग आल्यास किल्ल्याच्या आश्रयानें राहून सरदार आत्मरक्षण करूं शकत. आपल्या शिपायांच्या साहाय्यानें शेजारच्या जहागिरदारांच्या कुरापती काढून आपल्यावर युद्धप्रसंग ओढवून घेण्याची हुकी या जहागिरदारांना कधीं कधीं येत असे. तसेंच शेजारच्या शेतकऱ्यांस छळण्याकरितांही या किल्ल्यांचा फार उपयोग होई. यामुळेंच कांहीं कांहीं किल्ल्यांना ‘ सैतानांचीं निवासस्थानें ’ अगर ‘ चोरांच्या गुहा ’ असेंही मानण्यांत येई.



नॉर्मन किल्ला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. शहरांची वाढ :—नॉर्मन राजवटींत शहरांची वाढ होण्यास खरी सुरुवात झाली. जसजसा व्यापार वाढूं लागला तसतशीं उद्योगधंद्यांतील



नॉर्मन कालापर्यंत घरें बांधण्याच्या पद्धतींत झालेला फरक (खालून वर पहा.)

केंद्रेंही वाढलीं. किल्ल्यांच्या आजूबाजूला असलेल्या खेड्यांतील लोकांना किल्ल्यांत राहणाऱ्या लोकांना अन्न-वस्त्र व शस्त्रास्त्रें पुरवून संपत्ति मिळे;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें त्या खेड्यांना शहरांचें स्वरूप येऊं लागलें. कारण तेथें अनेक कारागीर व व्यापारी येऊन राहूं लागले होते. तसेंच ज्या ठिकाणीं धर्ममठ असत तेथेंही बाजारपेठा वसूं लागल्या व त्यामुळें तेथेंही शहरें निर्माण होत. या कारणामुळें लंडनप्रमाणेंच विंचेस्टर, ब्रिस्टल, नॉर्विच, चेस्टर, लिंकन, साऊथॅम्प्टन, यॉर्क वगैरे अनेक नवीन नवीन शहरें अस्तित्वांत आलीं. या सर्व शहरांसभोंवतीं भक्कम भिंत बांधण्याची त्या काळीं चालच पडून गेली होती. त्यामुळें शहरांतील उद्योगधंदे सुरळीत चालून वेळेनुसार शत्रूपासून लोकांचें संरक्षण होत असे. कांहीं कांहीं शहरांच्या भोंवतीं भिंतीबाहेर खंदकही असत. भिंतीबाहेर शेतें, कुरणें, गायरानें असत. शहरांतील घरें साधारणतः लांकूड व माती यांचींच असत. व त्यांवर गवताचें छप्पर असे. श्रीमंतांचीं घरें मात्र दगडाचीं असून त्यांवर कौलें असत. हीं घरें साधारणतः दुमजली असून पहिल्यावर दुकान व दुसऱ्यावर घरमालक व त्याचें कुटुंब राही. भिंतीला लहान लहान लाकडी खिडक्या असत. रात्रीं अगर फार थंडी असेल तेव्हां या खिडक्या बंद करीत. धुराड्यांची पद्धति नसल्यानें धूर घरभर पसरे व लोकांस त्रास देई! घरांतील फर्निचर अगदीं साधें व मोजकें असे. रस्ते अत्यंत अरुंद व अस्वच्छ होते. रस्त्यांच्या बाजूला 'पायवाटा'ही असत. नाना प्रकारचे आवाज व दुर्गंध यांनीं सर्व रस्ते दुमदुमून जात! शहरांतील लोक आपल्या हक्कांस चांगलेच जपत. ते स्वतंत्र म्हणून समजले जात. त्या त्या शहराच्या सरदाराकडून त्यांना त्यांच्या हक्कांची सनद मिळे व त्याबद्दल ते त्याला ठरीव खंडणी आपापसांत गोळा करून देत. आपल्या शहराचा कारभारही तेच पहात. अपराध्यांची चौकशी करून त्यांना शिक्षा करण्याकरितां प्रत्येक शहरीं एक कोर्टही असे. तसेंच प्रत्येक शहरांत एक मार्केट ऊर्फ शहरबाजार असे; तेथें अनेक जिनसा विकत मिळत.

५. उद्योगधंदे व व्यापार:—व्यापारामुळें शहरांची वाढ झाली. तसेंच नॉर्मन राजांची नॉर्मंडीला एकसारखी जा—ये चाले; त्यामुळें अनेक परकी व्यापारी त्यांच्याबरोबर इंग्लंडांत येत. यामुळें नॉर्मंडी, फ्लँडर्स वगैरे देशांतून अनेक व्यापारी, विणकरी व कारागीर इंग्लंडांत आले होते. हे व्यापारी मसाले, दारू, रेशीम, लोकर, तलम कापड, कांच, कातडी बूट, शस्त्रास्त्रें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तागाचें कापड, हिरे–मोतीं, सोन्याचांदीचे दागदागिने वगैरे अनेक प्रकारचा माल इंग्लंडांत आणीत; व उलट लोकर, कातडीं, कथील वगैरे कच्चा माल इंग्लंडच्या बाहेर पाठवीत. त्यावेळीं एका ठिकाणाहून दुसरीकडे जाण्यास सोयीस्कर असे रस्ते नसत. त्यामुळें सर्व व्यापारी आपला माल घोड्यावरून अगर जमल्यास जहाजांतूनही खेडोपाडीं नेऊन विकीत. एकंदरींत पाहतां इंग्लंडचा व्यापार फारसा तेजीचा नव्हता असेंच म्हणावें लागतें. कारण नॉर्मन काळांतही इंग्लंड शेतीप्रधानच देश असल्यानें एकंदर लोकांचें शेतीकडेच जास्त लक्ष असे. यावेळीं व्यापाऱ्यांना भांडवलासाठीं रोख रकमा लागत. त्या देण्याची ऐपत त्यावेळीं लोकांत फारशी नसे. देवघेवीचा हा सावकारी धंदा हातीं घेण्याकरितां अनेक ज्यू लोक या कामीं इंग्लंडांत येऊन राहूं लागले होते. शहरांतून त्यांना स्वतंत्र भाग राहण्याला देत व त्याला ‘ज्यूअरी’ ऊर्फ ‘ज्यू वाडा’ असें म्हणत. प्रथमतः ज्यू लोकांची सावकारी चांगली चाले; परंतु पुढें पुढें लोक त्यांचा द्वेष करूं लागल्यानें त्यांचा फार छळ होई.

८. खेड्यांची व्यवस्थाः—अँग्लो-सॅक्सन काळांतील लोकांप्रमाणेंच नॉर्मन काळांतील खेड्यांची स्थिति होती. तेथें शेतीचाच धंदा होता; व शेतकऱ्यांच्या रीतिरिवाजांत कोणताही फरक नव्हता. दिवसा शेतावर काम करावें व रात्रीं मातीच्या व कामट्यांच्या घरांत राहून डुकराचें मांस, रायची अगर गव्हाची भाकरी, लोणी, अंडीं, मटार, पावटे, मासे वगैरे पदार्थांवर आपली गुजराण करून विश्रांतीसाठीं जनावरांच्या कातड्याच्या अगर लव्हाळ्यांच्या बनविलेल्या अंथरुणावर झोंप घ्यावी, हा प्रकार सर्व खेड्यांतून अजूनही रूढ होता. मेंढ्यांच्या लोंकरीचीं वस्त्रें विणून ते अंगावर घालीत व पायांत ओबडधोबड बूट वापरीत. क्रयविक्रयाचे वेळीं ते वस्तूंची अदलाबदल करीत. पैशाचा उपयोग सहसा होत नसे. आपल्या खेड्याच्या जहागिरदाराच्या आश्रयानें राहून सुखांत दिवस काढावे एवढेंच त्या लोकांना माहीत होतें! नॉर्मनांनीं इंग्लंड जिंकल्यावरही वरील स्थितींत फारसा फरक पडलेला नव्हता. पूर्वींप्रमाणेंच नॉर्मनांच्या वेळींही प्रत्येक खेड्यांत मुख्य अशीं तीन मोठीं शेतें असत. त्या शेताचे अनेक तुकडे केलेले असत, व देवाचा कौल मागून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणाकडे किती तुकडे असावेत हें ठरविण्यांत येई. मात्र जहागिरदाराच्या जमिनी ठरलेल्या असत. त्या तो आपल्या कुळांकडे लागवडीस देई. मुख्य शेताच्या पलीकडे कुरणें, गायरानें व समाईक पडिक जमीन असे. त्यावर



खेड्याची रचना दाखविणारा एक काल्पनिक नकाशा

शेतकऱ्यांचीं गुरें चरत. शेतीकरितां घोड्यांपेक्षां बैलांचाच उपयोग काटकसरीच्या दृष्टीनें उपयुक्त ठरला होता. नांगरणीकरितां साधारणतः निदान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चार तरी बैल लागत. जास्त लागल्यास जहागिरदार अथवा गांवचा देशमुख पुरवी. प्रत्येक शेतकऱ्याला स्वतःच्या शेतावरील कामाव्यतिरिक्त देशमुखाच्या शेतावरही थोडेंबहुत काम करावें लागे. गुरांचें शेण हेंच उत्तम खत मानलें जाई. शेतीला योग्य असे आठ महिने असत. त्या वेळीं लोकांस अन्न व गुरांस चारा मिळे. परंतु तो हिंवाळ्यांत मिळत नसे. यामुळें हिंवाळ्यामध्यें मांस मिळावें म्हणून डिसेंबरमध्यें गुरें ठार मारून त्यांचें मांस खारवून ठेवण्याची पद्धति होती. नॉर्मन काळांत जो एक मोठा फरक झाला होता तो म्हणजे बहुधा प्रत्येक खेड्यांत देशमुख अथवा 'मॅनॉरचा लॉर्ड' जातीनें राहत असे. तो राजाचा एकनिष्ठ सेवक व त्या गांवाचा राजा असे. गांवच्या सर्व जमिनीचा निम्मा भाग त्याच्या मालकीचा असे व तो ती जमीन कांहीं अटींवर कुळांकडे सोंपवी. गांवाच्या मध्यावर त्याचा चांगला बळकट दगडीवाडा असे. गांवांतील पिठाची गिरणी त्याच्या मालकीची असे; व सर्वांनीं आपलें धान्य तेथें दळून घेऊन देशमुखाच्या भट्टीवर आपल्या भाकरी भाजून घेतल्या पाहिजेत असा दंडक होता. त्या भाकरी व आपलीं शेतें कोणाही शेतकऱ्याला देशमुखाच्या परवानगीशिवाय विकतां येत नसत. खेड्यांतील शेतकऱ्यांचे मिरासदार शेतकरी व शेतमजूर असे दोन प्रकार होते. शेतीचा खंड जे रोखीनें देत अगर लढाईचे वेळीं देशमुखाच्या सैन्यांत दाखल होऊन त्याला जे मदत करीत त्यांना मिरासदार शेतकरी समजत. या व्यतिरिक्त असलेल्या शेतकऱ्यांस मजूर समजत. ते गुलामां-प्रमाणें वागविले जात. त्यांना खुद्द देशमुखवाडींतील शेतीचें काम अथवा देशमुखाच्या घरचें काम करावें लागे. त्यांना जमीन मिळत नसे; व मिळा-लीच तर उत्तम नोकरी बजावल्यास देशमुखाच्या कृपेनें अगदीं थोडी मिळे! खुद्द देशमुख अगर स्ट्युअर्ट, बेलीफ वगैरे त्याचे अधिकारी त्यांच्याकडून चोपून फुकट काम करून घेत. प्रत्येक खेड्यांत एक कोर्टही असे. त्याचा अध्यक्ष स्वतः देशमुखच असे; व गांवाच्या सर्व मिरासदार शेतकऱ्यांनीं या कोर्टाच्या बैठकीच्या वेळीं हजर राहिलें पाहिजे असा त्या वेळीं दंडक असे. कोणी गैरहजर राहिल्यास त्याला दंड होई. कोणाही शेतमजुरानें आपलें काम योग्य केलें नाहीं तर त्याला या कोर्टापुढें खेंचीत व त्याचा गुन्हा शाबीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्यास त्याला योग्य ती शिक्षा करीत. तसेंच त्यांचे भांडण–तंटेही या कोर्टा-पुढें निवाड्याकरितां येत. कोणास दंड झाल्यास तो देशमुखाला मिळे. देश-मुखाचें हें कोर्ट नॉर्मनांनीं स्थापन केल्यामुळें पूर्वीची गांवसभा नाहींशी झाली.

७. धार्मिक स्थिति :––नॉर्मन लोक खिस्ती धर्माचे कट्टे अनुयायी होते त्यामुळें इंग्लंडमधील धर्ममठांचा अगर धर्ममंदिरांचा त्यांनीं विध्वंस न करतां त्यांच्या वृत्ति चालू ठेविल्या व नव्हत्या त्यांना दिल्या. मात्र विजयी विल्यमनें आपल्या विश्वासांतील नॉर्मन धर्मगुरूंची अशा ठिकाणीं नेमणूक केलेली होती. विल्यम मोठा धार्मिक असल्यानें त्यानें अनेक मंदीरें बांधलीं, धर्ममठ स्थापन केले व त्यांना वृत्ति सुरू केल्या. त्याशिवाय अनेक मठांना व धर्ममंदिरांनाही त्यानें गांवांची देशमुखी दिली. यामुळें धर्मगुरूही देशमुख असत. इतर देशमुखांप्रमाणेंच त्यांची सत्ताही त्यांच्या देशमुखवाडींत चालत असे. धर्मगुरूंचें नेहमींचें काम म्हणजे धर्मोपदेश करून लोकांस धार्मिक शिक्षण देणें हें होय. परंतु त्याबरोबरच कांहीं कांहीं धर्ममठांतून यावेळीं विद्या-दान होत असे. अनेक विद्यार्थी या मठांतून शिकून तयार होत. धर्मगुरू चांगलीं चांगलीं पुस्तकें लिहून व लिहवून घेऊन त्यांचा प्रसार करीत. यामुळें स्वतंत्र शाळा अगर विद्यापीठें नसल्यानें या धर्ममठांनाच विद्यापीठांइतकी मान्यता आली होती. धर्ममठांत शांतता विपुल असल्यानें धर्मगुरूंना शांत मनानें प्रार्थना, उपासना व इतर धर्मविधी करतां येत. रोमचा पोप खिस्तीधर्माचा आद्यगुरु मानण्यांत येई. कँटरबरीचा आर्चबिशप हा त्याचा इंग्लंडमधील मुख्य प्रतिनिधी होय. अर्थात् त्याला पोपच्या आज्ञा मानाव्या लागत. खुद्द इंग्लंड-मध्यें धार्मिक बाबतींत त्याचा अधिकार श्रेष्ठ मानण्यांत येत असे. त्याच्या खालोखाल यॉर्कचा आर्चबिशप समजण्यांत येई. मोठमोठ्या शहरीं जीं मंदिरें असत, तेथें बिशप नांवाचा धर्मगुरू असे. बिशपांच्या अधिकाराखालीं चालणाऱ्या मंदिराला ‘ कॅथीड्रल ’ असें म्हणत. या बिशपाचें अधिकार-क्षेत्र ठरवून दिलेलें असे, व त्याला ‘ डायोसिस ’ म्हणत. त्यांत अनेक खेडीं असत. प्रत्येक खेड्यांत मंदीर असे, व त्यावरील धर्माधिकाऱ्याला ‘ पाद्री ’ म्हणत. आपल्या अधिकारक्षेत्रांतील मंदिरांची व्यवस्था कशी चालते तें पाहण्याकरितां बिशप स्वतः त्या प्रांतांतून फिरत व चौकशी करीत किंवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'आर्चडीकन' नांवाच्या आपल्या प्रतिनिधीतर्फेंही ते तें काम उरकून घेत. या व्यवस्थेमुळें पाद्री लोकांचे अपराध व पापें उघडकीस येत, त्यांचीं असत्कृत्यें नजरेस येत व त्यांच्यावर एक प्रकारचा दाब बसल्यानें त्यांच्याकडून धार्मिक कृत्यें चोख होत. मठांतून अनेक जोग–जोगिणी व भिक्षु–भिक्षुणी असत. त्यांच्याकडूनही धर्मपालनाचें व धर्मप्रसाराचें काम होई. धर्मगुरूंची चौकशी करण्याकरितां स्वतंत्र धर्मकोर्टेंही असत. त्या कोर्टांपुढें अधार्मिक भिक्षु–भिक्षुणींची व पाद्र्यांची चौकशी होऊन त्यांस दंड होत असे. एकंदरींत त्या वेळची धर्मव्यवस्था चांगली होती; परंतु धर्मगुरूंनीं लग्नें करावीं कीं नाहीं व धर्मखात्यावर राजाचा अधिकार चालावा कीं पोपचा, याबद्दल राजा व धर्मगुरू यांच्यामध्यें नेहमीं खटके उडत. नॉर्मन काळांतच धर्मयुद्धें सुरू झालीं होतीं व इंग्लंडमधील अनेक शिलेदार व योद्धे नांव व कीर्ति मिळविण्याकरितां या धर्मयुद्धांत भाग घेत असत.

८. **पोशाख वस्त्रें व अलंकार**:—त्या वेळचे शिलेदार व सरदार अंगालगत 'ट्यूनिक' नांवाचा कंबरेपर्यंत पोंचणारा अंगरखा घालीत व त्याच्यावर कातड्याचें चिलखत वापरीत. या चिलखताला जोडूनच शिरस्त्राणही असे. चिलखतावर मधून मधून लोखंडाच्या कड्याही असत. जे फार श्रीमंत असत ते लोखंडाचें जाळीदार चिलखतही वापरीत असत. शिरस्त्राण थोडें निमूळतें असे. पायांत कातड्याचे बूट व पोटऱ्यांवर पट्टे असून त्यावर मांडचोळणा येई. स्वतःचें संरक्षण करतां यावें म्हणून प्रत्येक शिलेदाराजवळ एक चौकोनी ढाल असे. भाला व दुधारी तरवार हीं त्यांचीं हत्यारें समजलीं जात. लढाईच्या वेळचा हा त्यांचा पोशाख ठरूनच गेलेला होता; परंतु लढाई नसल्यास सरदार अगर शिलेदार ट्यूनिक अंगरखा घालून त्यावरून झगा वापरीत. सामान्य मनुष्याचाही पोशाख असाच असे. त्यावेळचे लोक आपले केस गळ्यापर्यंत कापून घेत व मिशा ठेवीत. दाढी ठेंवण्याची त्यावेळीं पद्धति नव्हती. इंग्लंडमध्यें नॉर्मन येऊन राहिल्यावर सॅक्सनांचे लांब सडक केस त्यांनीं पाहिले. ती पद्धति त्यांना आवडल्यामुळें नॉर्मन लोक आपले केस तसे ठेवूं लागले. त्या वेळच्या स्त्रिया अंगांत बाह्यांचीं तंग पोलकीं व त्यांवर पायांपर्यंत पोंचणारा झगा घालीत. हिरेजडीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कंबरपट्टे वापरण्याची पद्धति त्यावेळीं श्रीमंतांत रूढ होऊं लागली होती. स्त्रियांचे केस चांगले लांब सडक असत. आपली वेणी पाठीवर सोडण्यांत त्या भूषण मानीत. या वेणीवर कांहीं अलंकार घालण्यासही त्या वेळीं थोडी सुरुवात झाली होती. ज्यांचे केस कमी असत त्या स्त्रिया गंगावनेंही वापरीत असत. लोकरीचे, रेशमाचे अथवा तागी कपडे वापरण्यासही त्या काळांत सुरुवात झाली होती. धर्मगुरूंचा पोषाख पीठानें ठरवून दिलेला असे. तोच त्यांनीं वापरला पाहिजे असा दंडक होता.

९. खेळ व करमणुकीचीं साधनें :—लटक्या लढाया खेळण्याचें खूळ नॉर्मन लोकांच्या वेळेपासून इंग्लंडांत सुरू झालें होतें. 'टूर्नमेंट' नांवाचा खेळही थोड्याफार प्रमाणांत चालू होता. यामुळें मनुष्याची तयारी दिसे; तसेंच वैरही वाढे. पण या द्वंद्वयुद्धामुळें योद्धयाला दिगंत कीर्ति मिळे!



बहिरी ससाण्याची शिकार

स्त्रियांना या प्रकारांत भाग घेतां येत नसे. शिकारीचा नाद पुरुषांना व स्त्रियांना सारखाच होता. विशेषतः बहिरी ससाण्याच्या मदतीनें शिकार करणें त्या वेळच्या स्त्री–पुरुषांस फार आवडे. शिकारीकरितां विजयी विल्यमनें एक अरण्य स्वतःकरितां राखून ठेवलें होतें. त्यावरून राजेरजवाड्यांनाही त्या वेळीं शिकारीचा फार नाद होता हें सिद्ध होतें. या अरण्यांतून पशु–पक्ष्यांची शिकार करण्यांत येई. रानडुकरें, लांडगे, हरीण, ससे यांची शिकार उत्तम समजली जाई. संगीत व नृत्य हे करमणुकीचे प्रकार सदैव चालत. भाटांच्या लावण्या व शाहीरांचे पोवाडे ऐकणेंही लोकांना फार आवडे. मोठमोठ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मेजवान्यांचे वेळीं या प्रकारास तर ऊत येई ! लहान मुलांना चेंडूचा खेळ आवडूं लागला होता.



चेंडूफळीचा खेळ

अभ्यास

१. नॉर्मन काळांतील किल्ल्यांना महत्त्व प्राप्त कां झालें ? हे किल्ले कोठें व कोण बांधीत असत ?

२. खेडेगांवांतील जमिनीच्या वांटणीसंबंधीं व शेतकऱ्यांसंबंधीं थोडक्यांत हकीकत सांगा.

३. नॉर्मन काळांत धार्मिक व्यवस्था कशी होती ?

४. शहरांची वाढ होण्यास कोणतीं कारणें झालीं ? शहरांतील घरें व खेड्यांतील घरें यांची तुलना करा.

५. शहराभोंवतीं व किल्ल्याभोंवतीं खंदक कां खणीत असत ? आपल्या इकडे अशी पद्धति होती का ? केव्हां ? कशाकरितां ? त्याचा काय उपयोग ?

६. त्या वेळच्या इंग्लंडच्या व्यापाराचें थोडक्यांत वर्णन करा.

७. देशमुखाच्या हक्कांचें थोडक्यांत वर्णन करून शेतकऱ्यावर त्याचा ताबा कसा चाले तें सांगा.

८. खालील प्रश्नांचीं उत्तरें द्या :—

(अ) त्या काळीं राजधानी कां नसे ? राजाला भटकण्याचें कारण काय ? त्याचा परिणाम काय होत असे ? (आ) शिलेदारीसंबंधीं हकीकत सांगा. (इ) इंग्रज नॉर्मनांचा द्वेष कां करीत असत ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(ई) त्या वेळीं शिक्षणाची व्यवस्था काय होती? (उ) गुलामांवर कोणतीं बंधनें असत? त्या वेळच्या लोकांच्या करमणुकींचीं कोणतीं साधनें होतीं? (ए) त्या वेळच्या लोकांच्या पोशाखाचें वर्णन करा.

९. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख कराः—
बिशप, आर्चबिशप, आर्चडीकन, पाद्री, मॅनॉर, कीप, देशमुख-कोर्ट, डायोसिस, ट्यूनिक, मिरासदार शेतकरी, शेतमजूर, कॅथीड्रल.

कालादर्श—१०६६–११५४

वर्ष	इंग्लंड—महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ती	हिंदुस्थान—महत्त्वाच्या गोष्टी
१०६६	नॉर्मनांनीं इंग्लंड जिंकलें—हेस्टिंग्जची लढाई	विल्यम, हॅरोल्ड	माळव्याचा राजा भोज (१०२८–६०)
१०८६	नोंदणीपुस्तक पुरें झालें, सॉल्सबरीची सभा		विक्रमादित्य (चालुक्य राजा) १०७६–११२६
१०९६	पहिलें धर्मयुद्ध		
११०७	हेन्री व आनसेम यांची तडजोड	आनसेम	
११३५	पहिल्या हेन्रीचा मृत्यु		१०३० सुलतान महमुद मेला
११४१	लिंकनची लढाई		
११५३	वॉलिंगफर्डचा तह	स्टीफन, मॉड, हेन्री	१०४८ आल्बेरूणीचा मृत्यु
११५४	स्टीफनचा मृत्यु		११५२ गझनीच्या राज्याचा शेवट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. वंशवृक्ष–अँजेव्हिन–प्लँटॅजेनेट घराणें–इ. स. ११५४-१३९९

- **दुसरा हेन्री**–(११५४–११८९)
  - हेन्री मृ. ११८३
  - **पहिला रिचर्ड** (११८९–११९९)
  - जिऑफ्रे
    - आर्थर
  - **जॉन** (११९९–१२१६)
    - **तिसरा हेन्री** (१२१६–१२७२)
      - **पहिला एडवर्ड** (१२७२–१३०७)
        - **दुसरा एडवर्ड** (१३०७–१३२७)
          - **तिसरा एडवर्ड** (१३२७–१३७७)
            - एडवर्ड-कृष्णकुमार
              - **दुसरा रिचर्ड** (१३७७–१३९९)
            - लायोनेल क्लॅरेन्सचा ड्यूक
            - गाँटचा जॉन
              - **चौथा हेन्री** (१३९९–१४१३)
            - एडमंड यार्कचा ड्यूक
            - ग्लॉस्टरचा ड्यूक
      - एडमंड लँकॅस्टरचा अर्ल
      - मार्गारेट
    - जोन
    - एलीनॉर
    - रिचर्ड
  - एलीनॉर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. अँजेव्हिन ऊर्फ प्लँटॅजेनेट घराणें

दुसरा हेन्री (इ. स. ११५४–८९).

१. दुसरा हेन्री : स्वभाव :—स्टीफनच्या मागून इंग्लंडच्या गादीवर दुसरा हेन्री आला. त्याच्या राज्याचा विस्तार बराच मोठा होता. मॉडचा मुलगा म्हणून त्याला इंग्लंड, नॉर्मंडी व मेन हे प्रांत मिळाले. त्याच्या बापाकडून त्याला अँज्यू व टूरेन व त्याच्या राणीकडून त्याला पॉइट्यू, गिनी, व गॅस्कनी हे प्रांत मिळाले. म्हणजे त्यावेळच्या फ्रान्सच्या राजापेक्षांही त्याचें फ्रान्समधील राज्य मोठें होतें. हेन्री अँज्यूचा ड्यूक असल्यानें हेन्रीच्या घराण्यास 'अँजेव्हिन' घराणें असें म्हणतात. तसेंच त्याचा बाप जिऑफ्रे आपल्या टोपींत 'प्लँटाजेनिस्टा' नामक झाडाचा तुरा लावीत असल्यानें हेन्रीच्या घराण्यास 'प्लँटॅजेनेट घराणें' असेंही नांव पडलें.

दुसरा हेन्री

या घराण्यांतील राजांनीं सुमारें अडीचशें वर्षें इंग्लंडवर राज्य केलें. त्याचा संस्थापक दुसरा हेन्री होय. राज्यावर आला त्यावेळीं त्याचें वय अवघें एकवीस वर्षांचें होतें. तो शरीरानें मजबुत, मोठा कर्तबगार, हुषार, शूर, उत्साही व धोरणी होता. युद्धकला त्याच्या अंगीं पूर्णपणें बाणलेली होती. मुत्सद्दीपणांत मुरलेला हेन्री थोडा रागीट व उतावळा होता; व त्याचा हा स्वभावदोष त्याच्या अंगलट आल्याशिवाय राहिला नाहीं. मनुष्यस्वभावाची उत्तम पारख असल्यानें कोणाशीं कसें वागावें हें त्याला चांगलें समजत असे. मोठा लाघवी वक्ता असल्यानें त्याची दुसऱ्यावर सहजच छाप पडे. त्याला वाचनाची आवड इतकी असे कीं, 'त्याच्या हातांत पुस्तकें तरी असत अगर धनुष्यबाण असे.' तो धर्मभोळा नव्हता; परंतु धर्माच्या बाबतींत त्यानें कोणालाही राजापेक्षां वरचढ होऊं दिलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. त्याचें धोरणही उघड व स्पष्ट होतें. स्टीफनच्या कारकीर्दीत इंग्लंडांत जो गोंधळ माजला होता तो नाहींसा करून इंग्लंडांत सामर्थ्यवान मध्यवर्ती सरकार निर्माण करणें व फ्रान्समधील आपलें राज्य शाबूत ठेवणें असा त्याचा दुहेरी हेतु होता.

२. प्रारंभींची कामगिरी :—राज्यकारभारांतील अनेक दोष काढून टाकून देशांतील अंदाधुंदी नाहींशी करणें हें मोठें कार्य करणें हेन्रीला जरूर होतें; व त्याकरितां त्यानें जे सल्लागार नेमले ते लायक पुरुष होते. टॉमस बेकेट या नांवाचा त्याचा मुख्य सल्लागार मोठ्या योग्यतेचा व कर्तबगार पुरुष होता. लंडनच्या एका व्यापाऱ्याचा तो मुलगा असून थिओबाल्ड नामक एका पंडिताच्या नेतृत्वाखालीं त्याचें शिक्षण झालेलें होतें. थिओबाल्ड कँटरबरीचा आर्चबिशप असून राजाला पदोपदीं सल्ला देत असे. रिचर्ड ल्यूसी हा हेन्रीचा मुख्य प्रधान होता. अशारीतीनें आपल्या सल्लागारांचा उत्तम संच तयार करून तो आपल्या कार्यास मोठ्या जोमानें व उत्साहानें लागला. स्टीफननें जे भाडोत्री सैनिक आणले होते त्यांना त्यानें प्रथम रजा दिली; नंतर स्टीफनच्या कारकीर्दीत ज्या सरदारांनीं परवानगीवांचून किल्ले बांधले होते ते त्यानें जमिनदोस्त करविले, व त्यांची सत्ता कमी केली. भेसळ नाण्यांचा झालेला सुळसुळाट त्यानें बंद करविला व त्यांच्याऐवजीं चांगलीं नाणीं पाडून व्यापाराला मदत केली. स्टीफननें ज्या जमिनी व जहागिरी लोकांस दिल्या होत्या त्या त्यानें परत घेतल्या. क्यूरिया रेजिस व फिरतीं कोर्टें यांचें काम बंद पडलें होतें, तें त्यानें पुन्हां सुरू केलें. स्कॉटलंडचा राजा डेव्हिड यानें कंबरलंड व नॉर्दंब्रिया हे प्रांत बळकावले होते. ते त्यानें त्याच्याकडून परत मिळवून त्याला आपलें मांडलिकत्व स्वीकारण्यास भाग पाडलें. वेल्स प्रांतांतील बंडें मोडून टाकून तेथील राजासही त्यानें आपलें मांडलिकत्व स्वीकारण्यास लावलें.

३. स्कूटेज कराची स्थापना (सन ११५९) :—वरील प्रमाणें सुधारणा केल्यावर देशांत बरीच स्थीरस्थावरता उत्पन्न झाली. तेव्हां त्याला दुसरीकडे लक्ष देण्यास सवड मिळाली. सन ११५९ मध्यें टुलूज परगण्यावरील आपला वारसा सिद्ध करून घेण्याकरितां त्यानें त्या प्रांतावर स्वारी केली. टुलूज हा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फ्रान्समधील परगणा होता. हेन्रीच्या राणीला तो वारशानें मिळावयाचा होता; म्हणूनच त्यावर त्यानें स्वारी केली व त्या परगण्याच्या सरदाराचा त्यानें पराभवही केला. इतक्यांत त्या सरदारानें फ्रान्सच्या राजाची मदत मागितली. त्याचाही हेन्रीनें पराभव केला असता; परंतु हेन्री फ्रान्सच्या



राजाचा अंकित सरदार होता. आपण राजाचा पराभव केल्यास आपल्या इतर सरदारांस आपणच वाईट धडा घालून दिल्यासारखें होईल असें वाटल्यानें त्यानें लढाई थांबविली. या लढाईच्या वेळीं त्याला पैशाची टंचाई वाटूं लागली, म्हणून त्यानें एक कर आपल्या सरंजामी सरदारांवर लादला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला 'स्कूटेज कर' असें म्हणतात. राजा लढाईवर निघाला असतां प्रत्येक सरंजामी सरदारानें निदान चाळीस दिवस तरी राजाबरोबर स्वतःच्या खर्चानें आपल्या सैन्यासह गेलें पाहिजे असा नियम होता. इंग्लंडच्या बाहेर जाणें म्हणजे सरंजामी सरदारांस मोठा खर्च करावा लागणार. तेव्हां ज्याला राजाला लष्करी मदत करतां येणार नाहीं त्यानें सैनिकागणिक चाळीस शिलिंग राजाला द्यावेत असें हेन्रीनें फर्माविलें. यालाच 'स्कूटेज कर' ऊर्फ 'ढाल–पट्टी' असें म्हणतात. यामुळें राजाला पैसे मिळत गेले, सरंजामी सरदारांचें लष्करी सामर्थ्य लयास जाऊं लागलें व राजाला हुकुमी सैन्य मिळूं लागलें. सरदारांचें लष्करी सामर्थ्य कमी झाल्यानें त्यांच्याकडून होणारा त्रासही कमी होऊं लागला व राजसत्ता जोरकस झाली.

४. टॉमस बेकेट :—स्कूटेज कराची योजना टॉमस बेकेटची होती. तेव्हां त्याच्यावर सुप्रसन्न होऊन थिओबाल्डच्या मरणानंतर हेन्रीनें बेकेटला कँटरबरीचा आर्चबिशप नेमिलें (११६२). देशांत राजसत्ता प्रभावी करण्याकरितां राजाचे प्रयत्न चाललेले होतेच. धर्मपीठाच्या बाबतींतही त्याला राजसत्ता सामर्थ्यवान करावयाची होती. या हेतूनें आपल्या विश्वासांतील म्हणून व आपल्या हेतूच्या सिध्यर्थ बेकेटची आपल्याला मदत होईल म्हणून बेकेटला त्यानें आर्चबिशप नेमलें. आर्चबिशपच्या जागीं नेमणूक झाल्याबरोबर टॉमस बेकेटच्या वृत्तींत फरक पडला. अगोदरच तो अत्यंत धार्मिक वृत्तीचा होता व या नव्या नेमणुकीनंतर त्याची राहणी अत्यंत साधी झाली. तो आर्चबिशप झाल्याबरोबर त्याचे व हेन्रीचे खटके उडूं लागले, व त्याचें पर्यवसान बेकेटच्या खुनांत झालें ! धर्मगुरूंची चौकशी कोणीं करावी यावरून भांडणास तोंड लागलें. पहिल्या विल्यमच्या वेळेपासूनच धार्मिक कोर्टापुढें धर्मगुरूंची चौकशी करण्याचा प्रघात पाडण्यांत आला होता; परंतु धार्मिक कोर्टांना देहदंडाची शिक्षा करण्याचा अधिकार नसल्यानें त्यांस फक्त दंड अगर कैद करतां येई. त्यामुळें अनेक अनीतिमान धर्मगुरू व पाद्री सुटत. हें हेन्रीला पटत नसल्यानें इतरांप्रमाणें धर्मगुरूंसही योग्य शासन होणें जरूर आहे असें त्याचें म्हणणें पडलें. बेकेट म्हणें, 'अनीतिमान धर्मगुरूला प्रथम अपराधाचे वेळीं मुक्त करावें व त्याची वृत्ति नष्ट करावी; त्यानें तशाच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकारचा गुन्हा पुन्हां केला तर मग त्याला फांशीं द्यावें.' म्हणजे बेकेटच्या म्हणण्याप्रमाणें धर्मगुरूनें दोन खून केल्यावर त्याला फाशीं द्यावें व इतरांस एका खुनाबद्दलच फांशीं द्यावें ! ही विचारसरणी हेन्रीस पसंत पडली नाहीं; व त्यानें क्लॅरेंडन येथें एक परिषद भरवून तिच्या फलश्रुतीवर आधारलेला एक कायदा पास केला (११६४). त्याला 'क्लॅरेंडनची घटना' असें म्हणतात. धर्मगुरूंवरील खटल्यांची चौकशी साध्या कोर्टांनीं करावी, तो गुन्हेगार ठरल्यास त्यास इतर साध्या कैद्यांप्रमाणेंच शिक्षा व्हावी, राजाच्या परवानगीखेरीज धर्मगुरूंनीं परदेशीं जाऊं नये, व पोपकडेही अपील करूं नये, धर्मगुरूंच्या नेमणुका राजानेंच कराव्या वगैरे सोळा कलमें वरील घटनेंत होतीं. तीं सर्व कलमें बेकेटला पसंत नव्हतीं. धर्मगुरूंची चौकशी साध्या गृहस्थाकडून होणें हा एक निंद्य प्रकार होय व या कायद्यानें धर्मगुरूंना दुहेरी शिक्षा होते असें बेकेटचें म्हणणें पडलें. त्यामुळें त्यानें त्या कायद्याला प्रथम संमति दिली नाहीं. पुढें अनेक धर्मगुरू त्याच्या हातीं–पायीं पडल्यानें त्यानें ती दिली. ही गोष्ट कळतांच पोप रागावला. तेव्हां बेकेटनें आपली संमति नाकारली. त्यामुळें त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप करून राजानें त्याला आपल्याकडे बोलावलें. परंतु बेकेट फ्रान्सच्या राजाच्या आश्रयास पळून गेला (११६४).

५. **बेकेटचा खून** :—पुढें सहा वर्षांनीं त्या दोघांमध्यें सलोखा झाल्यानें बेकेट सन ११७० मध्यें इंग्लंडांत परत आला. बेकेटच्या गैरहजेरींत यॉर्कचा आर्चबिशप रॉजर यानें जर्मन पद्धतीप्रमाणें राजाच्या सांगण्यावरून युवराजास राज्याभिषेक केला होता. ही गोष्ट न साहून बेकेटनें त्याला व त्याच्या मदतनिसांस धर्मबहिष्कृत केलें. या वेळीं हेन्री नॉर्मंडीमध्यें होता. ही गोष्ट समजतांच त्याला अत्यंत चीड आली व त्याच्या भरांतच तो म्हणाला, "माझे लोक इतके नादान झाले अं ? या पाद्याच्या त्रासांतून मला कोणीही सोडविणार नाहीं काय ?" बेकेटच्या वाईटावर टपलेल्या चार नॉर्मन सरदारांनीं राजाचे हे शब्द ऐकले व ते ताबडतोब कँटरबरीला गेले. त्या वेळीं बेकेट प्रार्थनामंदिरांत प्रार्थना करीत असतांच त्यांनीं त्याचा खून केला (११७०). या खुनानें सर्व युरोपला धक्का बसला व इंग्लंडची व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या देशाच्या राजाची जगभर नाचक्की झाली ! बेकेटला हुतात्म्याची कीर्ति मिळून मोठ्या पुण्यश्लोक साधूंत त्याची गणना होऊं लागली. आपल्या सहज बोलण्याचा असा विपरीत परिणाम होईल, असें राजाला वाटलें नाहीं. आपल्यामुळें बेकेटचा वध झाला असें वाटून तोही हळहळला. क्लॅरेंडनच्या कलमांची अंमलबजावणी करण्याचें थांबवून त्यानें पोपशीं नमतें घेतलें व धर्मगुरूंची चौकशी धार्मिक कोर्टांनींच करावी या तत्त्वास त्यानें संमति दिली. आपल्या पापाच्या क्षालनार्थ धर्मयुद्धांत भाग घेण्याचेंही त्यानें कबूल केलें. मात्र कबूल केल्याप्रमाणें पुढें तो धर्मयुद्धांत पडला नाहीं, ही गोष्ट वेगळी !

६. न्यायखात्यांतील सुधारणा :—हेन्री व बेकेट यांच्यामधील लढा चालू असतांच हेन्रीनें न्यायखात्याची सुधारणा चालविलेली होती; व त्याच्या या सुधारणांमुळेंच त्याला इंग्लिश न्यायपद्धतीचा जनक म्हणतात. जहागिरदारांच्या जहागिरींत पूर्वी लहान-सहान गुन्ह्यांची चौकशी करण्याचें काम देशमुखांच्या ऊर्फ जहागिरदारांच्या कोर्टांकडून होत असे. ह्या कोर्टांतून जहागिरदारच जज्जाचें काम करी ! तसेंच प्रत्येक हंड्रेडमध्यें व शायरमध्येंही महत्त्वाचे खटले चालविण्याकरितां कोर्टें होतीं. या सर्व कोर्टांतून राजाला फारसें महत्त्व नसून जहागिरदार अगर बडे जमीनदार यांनाच होतें. तेव्हां वरील सर्व कोर्टांतून वरील लोकांचें महत्त्व कमी करून राजाचें महत्त्व वाढविण्याकरितां त्यानें फिरते न्यायाधीश नेमून त्यांच्याकडून महत्त्वाचे दिवाणी व फौजदारी खटले चालविण्याची पद्धति सुरू केली. तसेंच ज्यूरीची पद्धतीही त्यानें प्रथमच सुरू केली. दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही स्वरूपाच्या खटल्यांत या ज्यूरीचा उपयोग करण्यांत येऊं लागला. मात्र ही ज्यूरी, ज्यूरर व साक्षीदार असें दुहेरी काम करीत असे ! दिव्य करून अगर द्वंद्वयुद्ध खेळून खटल्याचा निकाल करण्याची पद्धति ज्यूरी-पद्धतीमुळें बंद पडली. सन ११७८ पासून क्यूरिया रेजिसकडे खालच्या कोर्टांच्या निकालाविरुद्ध अपील करण्याची परवानगी मिळाली. यामुळें जहागिरदारांच्या न्यायदानावर राजाचा दाब बसूं लागला. धर्मखात्यांच्या कोर्टांचा अधिकार काढून घेण्याकरितां त्यानें सन ११६४ मध्यें क्लॅरेंडनची घटना पास केली होती. त्याचें वर्णन मागें आलेंच आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. आयर्लंडसंबंधीं धोरण :—हेन्रीच्या कारकीर्दीच्या सुरुवातीसच त्यानें पोप हॅड्रियन याच्याकडून आयर्लंड जिंकून घेण्याचें आज्ञापत्र मिळवून ठेवलेलें होतें. त्याचप्रमाणें तेथील धर्मव्यवस्थेंत क्रान्ति घडवून आणून तेथील धर्मपीठ पोपच्या वर्चस्वाखालीं आणण्याचा त्याचा विचार होता. मध्यंतरीं त्याला या गोष्टीला वेळ मिळाला नाहीं; परंतु त्यावेळीं अनेक नॉर्मन सरदारांनीं हेन्रीच्या संमतीनें सन ११६९ मध्यें आयर्लंडांत जाऊन डब्लिनजवळ 'पेल' नामक एक वसाहत स्थापन केली होती. त्यामुळें आयर्लंडांत इंग्लिश व आयरिश यांच्यांत खटके उडूं लागले. शिवाय तेथील राजांमध्येंही यादवी चालू होती. याचा फायदा घेण्याच्या हेतूनें व आपला उद्देश सिद्धीस नेण्याच्या विचारानें सन ११७१ मध्यें हेन्री ससैन्य आयर्लंडांत गेला. तेथें त्याचें उत्तम प्रकारें स्वागत झालें; व सर्व सरदारांनीं त्याचें स्वामित्व मान्य केलें. तसेंच आयरिश धर्मपीठाकडून त्यानें पोपचा अधिकार मान्य करवून घेतला. यामुळें त्याच्यावर पोप खूष झाला. आपला मुलगा जॉन याला त्यानें आयर्लंडचा गव्हर्नर नेमलें.

८. राजपुत्रांची बंडाळी :—हेन्रीच्या राज्याचा विस्तार मोठा असल्या-मुळें त्याच्या संरक्षणाकरितां त्याला अनेक लढाया कराव्या लागल्या. सन ११७३ मध्यें हेन्रीच्या विरुद्ध एक मोठा कट रचण्यांत आला होता. त्यांत प्रमुख भाग हेन्रीच्या मुलांचा होता. त्यांना मदत करण्याकरितां फ्रान्सचा राजा लुई, स्कॉटलंडचा राजा विल्यम व हेन्रीवर नाखूष असलेले अनेक सरदार त्यांत सामील झाले होते. त्याच वर्षी त्या कटाचें रूपांतर बंडांत झालें. ही गोष्ट समजतांच हेन्रीनें फ्रान्सच्या राजावर स्वारी करून ब्रेटन या ठिकाणीं त्यानें त्याचा पराभव केला. त्याच वेळीं स्कॉटलंडचा राजा विल्यम यानें इंग्लंडवर स्वारी केल्याचें वृत्त त्याला कळलें. तेव्हां तो इंग्लंडांत आला व तेथील जनतेचा पाठिंबा मिळवून त्यानें स्कॉटलंडच्या राजावर स्वारी केली, व त्याला कद करण्यांत आलें. अनेक सरदारांनीं केलेली बंडाळीही यानंतर नष्ट करण्यांत आली. स्कॉटलंडच्या राजानें हेन्रीचें मांडलिकत्व कबूल केलें; व सरहद्दीवरील कांहीं किल्ले देण्याचें कबूल करून त्यानें आपली सुटका करून घेतली. (११७४). मध्यंतरीं फ्रान्सचा राजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लुई मेला, व त्याच्यानंतर त्याचा मुलगा फिलिप फ्रान्सचा राजा झाला. त्यानंतर हेन्रीचे दोन मुलगे हेन्री व जिऑफ्रे मेले. तेव्हां तिसरा मुलगा रिचर्ड याला त्यानें आपला वारस नेमावा असें फिलिप म्हणत असतां हेन्रीनें त्याचें म्हणणें मान्य केलें नाहीं. यामुळें फिलिपनें रिचर्डला हाताशीं धरून नॉर्मंडीवर स्वारी केली (११८८), हेन्रीचा पराभव केला व इंग्लंडच्या राज्यावरील रिचर्डचा वारसा व फ्रान्समधील मुलुखाबद्दल फ्रेंच राजाचें स्वामित्व या गोष्टी त्याला मान्य करावयास लावल्या. यावेळीं हेन्रीला आपल्या धाकट्या मुलाची–जॉनची–फार आशा होती; परंतु तोही बंडांत सामील झाल्यानें हेन्रीची निराशा झाली. यानंतर हेन्री फार दिवस वांचला नाहीं. तो सन ११८९ मध्यें मरण पावला.

९. **हेन्रीची योग्यता** :—हेन्री हा मोठ्या योग्यतेचा राजा होऊन गेला. देशांतील अशांतता नष्ट करून त्यानें निरनिराळ्या प्रकारच्या सुधारणा केल्या. सरदारांच्या सत्तेवर दाब ठेवून त्यानें त्यांचें सामर्थ्य कमी केलें. 'हत्यारांचा कायदा' करून स्वतःच्या शक्तीप्रमाणें प्रत्येकानें आपल्याजवळ हत्यारें बाळगलीं पाहिजेत असें त्यानें ठरविलें. त्यामुळें आपोआप राष्ट्रीय सैन्य निर्माण झालें. व त्याला सरदारांच्या लष्करावर अवलंबून राहावें लागलें नाहीं. त्याच्या वेळीं धर्मयुद्धें पुन्हां चालू झालीं होतीं. त्याला धर्मयुद्धांत भाग घ्यावासा वाटे; परंतु तें शक्य झालें नाहीं. तेव्हां त्यानें त्याकरितां आर्थिक मदत पाठविण्याचें ठरवून इंग्लंडमधील ज्या लोकांनीं धर्मयुद्धांत भाग घेतला नाहीं त्यांच्यावर 'सलॅडिन' नामक कर बसविला. त्यापासून आलेला पैसा त्यानें धर्मयुद्धाच्या मदतीकरितां दिला. एकंदरींत पाहतां त्याची कारकीर्द फार चांगली झाली. सरदारांना धाकांत ठेवून त्यानें राजसत्ता बळकट केली. देशांत शांतता निर्माण झाल्यानें इंग्लंडचा व्यापारही वाढीस लागला. त्यानें मध्यमवर्गास हातीं धरल्यानें त्या वर्गाच्या लोकांची भरभराट झाली. ज्यूरीची पद्धति सुरू करून व न्यायखात्यांत अनेक प्रकारच्या सुधारणा करून त्यानें प्रजेचें प्रेम संपादिलें व त्यामुळेंच स्वायत्त राज्यकारभाराचें लोकांस शिक्षण मिळून भावी लोकशाहीचें बीज हेन्रीनें पेरलें असें म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. दुसऱ्या हेन्रीच्या स्वभावाचें वर्णन करून त्याचें धोरण सांगा.
२. टॉमस बेकेटचें चरित्र थोडक्यांत सांगा.
३. स्कूटेज कर, सलॅडिन कर, ज्यूरीपद्धति, पेल यासंबंधीं थोडक्यांत हकीकत सांगा.
४. हेन्रीनें केलेल्या न्यायखात्यांतील सुधारणा सांगा.
५. खालील प्रश्नांचीं उत्तरें सांगा :—
(अ) हेन्रीच्या वंशाला प्लँटॅजेनेट कां म्हणतात ? (आ) दिव्य करून निरपराधित्व सिद्ध करण्याची पद्धति चांगली कीं वाईट ? कां ? ती बंद कशी पडली ? (इ) बेकेटला हुतात्म्याची कीर्ति मिळण्याचें कारण काय ? (ई) बेकेट व हेन्री यांच्या भांडणाचीं मुख्य कारणें कोणतीं ? (उ) राजपुत्र रिचर्डनें बंड कां केलें ? त्याचा परिणाम काय झाला ?
६. सरदारांची सत्ता कमी करण्याकरितां हेन्रीनें कोणकोणते उपाय योजले ?
७. खालील व्यक्तींबद्दल एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा:—
बेकेट, थिओबॉल्ड, रिचर्ड ल्यूसी, डेव्हिड, फिलिप, राजपुत्र जॉन, रॉजर.
८. इंग्लंड व फ्रान्स यांचा नकाशा काढून त्यांत हेन्रीच्या राज्याचा विस्तार दाखवा.

उतारा

१. केवढें क्रौर्य हें !

टॉमस बेकेटचा खून करण्याकरितां कांहीं सरदार येत आहेत असें दिसतांच महंतांनीं मंदिराचीं दारें लावून घेतलीं. बेकेटला तें आवडलें नाहीं व 'मंदिराचा—खिस्ताच्या मंदिराचा—किल्ला बनविण्याची माझी इच्छा नाहीं. तें उघडें असलें तरीही मी आपलें स्वतःचें रक्षण करूं शकतों,' असें म्हणून त्यानें सर्व दारें उघडण्यास सांगितलीं. त्याबरोबर 'कुठें आहे तो राजद्रोही बेकेट ?' असा प्रश्न आला. त्याला त्यानें उत्तर दिलें नाहीं. तेव्हां 'कुठें आहे तो आर्च-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बिशप ' असा प्रश्न आला असतां तो पुढें झाला व ' हा पहा मी तुमच्यापुढें आहें; पण मी राजद्रोही नसून एक धर्मगुरू आहें ' असें तो उत्तरला. हें ऐकतांच त्या मारेकऱ्यांनीं त्याला धरलें व धर्ममंदिराबाहेर त्याला नेण्याकरितां ते त्याची ओढाताण करूं लागले; परंतु बेकेट एका खांबाला घट्ट धरून होता. त्यावेळीं तो मंदिराबाहेर येत नाहीं असें पाहून मारेकऱ्यांनीं त्याच्यावर शस्त्र उपसलें. त्यावेळीं बेकेटनें हात जोडून देवाची प्रार्थना करण्यास सुरुवात केली. तो थोडी प्रार्थना संपवितो न संपवितो तोंच एका मारेकऱ्यानें त्याच्या डोक्यावर शस्त्रप्रहार केला ! बेकेटनें तो सहन केला. त्यानंतर त्याच्यावर दुसरा प्रहार झाला. त्यावेळींही तो शांत व धीरगंभीर होता. तिसऱ्या प्रहारासरशीं तो खालीं पडला. त्यावेळीं तो पुटपुटत होता ' जीझसकरितां व धर्माच्या रक्षणाकरितां मी मरण्यास तयार आहें. ' यानंतर चौथ्या प्रहारानें बेकेट मेला. त्यावेळीं एका पाद्र्यानें त्याच्या मानेवर आपला एक पाय जोरानें दाबून त्याचा मेंदू बाहेर काढला व फरशीवरील रक्ताच्या पाटांत तो त्यानें फेंकून दिला ! केवढें क्रौर्य हें ! ! एवढें कृत्य केल्यावर तो म्हणाला, ' आर्चबिशप आतां उठणें शक्य नाहीं. चला, आतां. '

प्रश्नः—१. बेकेटचा खून करण्याचें कारण काय ? त्याचा खून कोणीं केला ? तो कोठें करण्यांत आला ? त्यावेळीं बेकेटचें वर्तन कसें होतें ? कशावरून ? त्यामुळें त्याच्याबद्दल तुम्हांस काय वाटतें ? त्यानें आत्मदान कशाकरितां केलें ? ज्यानें त्याचा मेंदू बाहेर काढला त्याला तुम्ही काय म्हणाल ? कां ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. स्वातंत्र्याची सनद ऊर्फ मॅग्नाकार्टा

१. पहिला रिचर्ड (इ. स. ११८९–९९) :—दुसऱ्या हेन्रीनंतर त्याचा मुलगा रिचर्ड राजा झाला. तो मोठा उद्योगी, चलाख व उदार मनाचा होता. दिसण्यांत उग्र व क्रूर असा रिचर्ड मन मानेल तसा वागे. अत्यंत शूर व निधड्या छातीचा योद्धा म्हणून त्याची ख्याती होती. यामुळेंच त्याला 'सिंहहृदयी' असें म्हणत. रिचर्ड स्वार्थत्यागी व उल्हसित वृत्तीचा असे. रणक्षेत्र हेंच त्याचें घर व भाला आणि तरवार हीं त्याच्या व्यायामाचीं साधनें ! गर्विष्ठ व उधळ्या वृत्तीचा रिचर्ड कुशल सेनानी होता. त्याचा सगळा ओढा धर्मयुद्धाकडे होता. त्याची मोठी महत्त्वाकांक्षा म्हणजे धर्मयुद्धांत जातीनें भाग घेऊन कीर्ति मिळविणें ही होय. ही महत्त्वाकांक्षा पुरी करण्याकरितां त्याला पैसा हवा होता. त्याकरितां त्यानें इंग्लंडांत पैसा उभा करण्याचें ठरवून तो त्यानें अनेक प्रकारांनीं मिळविला. त्यानें राज्यांतील अधिकाराच्या मोठ्या जागा विकल्या. यामुळें अनेकांनीं पैसे देऊन मोठमोठ्या जागा पटकावल्या. स्कॉटलंडच्या राजाकडून मोठी रक्कम घेऊन त्यानें त्याला मांडलिकत्वापासून मुक्त करून त्याचें स्वातंत्र्य त्याला दिलें. ज्यू लोकांकडून बळजबरीनें मोठमोठ्या रकमा त्यानें उपटल्या. राजाचा हा धडा लोकांनीं गिरवून लंडन, यॉर्क, नॉर्विच वगैरे ठिकाणच्या लोकांनीं ज्यू लोकांचा छळ केला. राजाच्या खासगी जमिनी त्यानें विकावयास काढल्या, पदव्यांचा लिलांव केला व मोठमोठे किल्लेही विकले. अशारीतीनें त्यानें पैसा उभा करून फ्रान्सचा राजा फिलिप याच्याबरोबर धर्मयुद्धाकरितां तो पॅलेस्टाईनला गेला.

पहिला रिचर्ड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. तिसरें धर्मयुद्धः—यावेळीं तिसरें धर्मयुद्ध चालू होतें. सलॅडिन हा तुर्कांचा राजा पॅलेस्टाईन प्रांत जिंकून बसला होता; व त्याच्याकडून तो प्रांत घेण्याकरितां युरोपियन राजांनीं चंग बांधला होता. सन ११९१ मध्यें रिचर्ड पॅलेस्टाईनला पोंचला. मोठा पराक्रम करून त्यानें चांगलीच कीर्ति मिळविली. तेथें रिचर्डचें फिलिपशीं व ऑस्ट्रियाच्या ड्यूकशीं न पटल्यानें त्यांचें भांडण झालें. ऑस्ट्रियाच्या ध्वजाचा रिचर्डनें अपमान केल्यानें त्याचें उट्टें काढण्याचें ठरवून ऑस्ट्रियाचा ड्यूक परत गेला. तसेंच कांहीं दिवसांनीं फ्रान्सचा फिलिपही परत फिरला. त्यामुळें रिचर्ड एकटाच राहिला. त्यानें मोठा पराक्रम करून सलॅडिनला स्तिमीत केलें. शेवटीं दोघांमध्यें तह होऊन सलॅडिननें ख्रिस्ती यात्रेकरूंस त्यांच्या पवित्र क्षेत्रांची यात्रा करण्याची परवानगी दिली. पॅलेस्टाईनमधील लोकांना रिचर्डची इतकी धास्ती बसली होती कीं, आया मुलांना "गप्प हं, उगा रहा; तो बघ रिचर्ड आला !" असें म्हणून भिववीत; तर घोडेस्वार आपला घोडा बिचकलेला पाहून रिचर्डला पाहूनच तो असें करतो असें समजत ! तह झाल्यावर रिचर्ड इंग्लंडला परतला. वाटेंत त्याचें जहाज फुटलें व तो ऑस्ट्रियाच्या किनाऱ्यास लागला. तेव्हां ऑस्ट्रियाच्या ड्यूकच्या हुकुमानें त्याला कैद करण्यांत आलें. पुढें इंग्लंडच्या लोकांनीं सुमारें दीड लाख पौंड खंडणी भरून आपल्या राजाला सोडवून आणलें. इंग्लंडमध्यें परत आल्यावर तेथें त्यानें आपल्याला पुन्हां राज्याभिषेक करून घेतला; व बळजबरीनें व अन्य उपायांनीं बराच पैसा उभा करून तो नॉर्मंडीला गेला. त्याचा भाऊ जॉन यानें तेथें बरीच बंडाळी माजविली होती. रिचर्ड आला असें कळतांच जॉन त्याला शरण गेला. त्यानंतर त्यानें फ्रान्सचा राजा फिलिप याच्यावरही स्वाऱ्या करून त्याचा अनेक वेळां पराभव केला. रिचर्ड पुढें फार दिवस जगला नाहीं. आपल्या एका सरंजामी सरदाराशीं लढत असतांच तीर लागून तो सन ११९९ मध्यें मेला. त्याच्यानंतर त्याचा भाऊ जॉन इंग्लंडचा राजा झाला.

३. रिचर्डच्या कारकीर्दीचा परिणाम:—रिचर्डच्या गैरहजेरींत लॉंगचॅंप हा मुख्य प्रधान होता. तो जुलुमी व हीन कुळीचा असल्यानें इंग्लिश सरदार त्याचा द्वेष करीत. त्यामुळें त्याला त्यांनीं विरोध करून अधिकारा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरून हुसकून लावलें. त्यानंतर ह्यूबर्ट वॉल्टर हा सन ११९४ मध्यें मुख्य प्रधान झाला. त्याच्या वेळीं शिलेदारीला महत्त्व प्राप्त होऊन त्यांच्या वर्गास प्राधान्य मिळालें. स्थानिक स्वराज्य संस्थांस जास्त स्वायत्त अधिकार देण्यांत आले. तसेंच निवडणुकीच्या तत्त्वाला प्रथमतः सन ११९४ व नंतर सन ११९८ मध्यें सुरुवात झाली. वॉल्टरनें कित्येक शहरांना आपले न्यायाधीश निवडण्याचा अधिकार दिला. यामुळें शेरीफांची सत्ता कमी झाली. कॅरूकेज नांवाचा कर त्यानें जमीनदारांपासून घेण्यास सुरुवात केली. यामुळेंही सरदारांची व जमीनदारांची सत्ता कमी होण्यास मदत झाली. रिचर्डच्या कारकीर्दीत व्यापार व संपत्ति यांच्या वाढीमुळें शहरांना महत्त्व प्राप्त झालें. लंडनमध्यें व्यापारावर योग्य नियंत्रण ठेवण्याकरितां व्यापारीमंडळें स्थापन होऊं लागलीं होतीं. या मंडळांतर्फेंच गरिबांस फार कर द्यावे लागतात अशी प्रथमतः तक्रार करण्यांत आली व त्याकरितां विल्यम फिट्झ–ऑसबर्ट यानें बंडही केलें; पण त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. एकंदरींत पाहतां रिचर्डची कारकीर्द व त्याची गैरहजेरी इंग्लंडला उपकारकच ठरली. दुसऱ्या हेन्रीची न्यायदानपद्धति देशांत मुरण्यास सवड सांपडल्यानें ती चांगली रुजली. निवडणुकीचें तत्त्व सुरू झाल्यानें लोकांस नवीन प्रकारचें राजकीय शिक्षण मिळूं लागलें व त्यामुळें लोकशाहीचा प्रसार होण्यास एक प्रकारें मदत झाली.

जॉन

४. राजा जॉन:—(इ. स. ११९९–१२१६) इंग्लंडच्या राज्यावर जे दुष्ट राजे बसले त्यांचा मुकुटमणि म्हणजे राजा जॉन. कृतघ्न, दुष्ट व जुलमी म्हणून त्याची कीर्ति आहे. पुतण्याचा खरा वारसा असूनही जॉननें त्याला हालहाल करून ठार मारलें. सुमारें बावीस लोकांस एका किल्ल्यांत कोंडून ठेवून व त्यांची उपासमार करून त्यानें त्यांस जिवें मारलें! या दोन्ही गोष्टींवरून तो अत्यंत क्रूर व निर्दय होता हें उघड आहे. त्याचा कारभार अत्यंत पोरकट झाला. तो आपल्या भावांशीं भांडला, प्रधानांशीं भांडला, सरदारांशीं भांडला, प्रजेशीं भांडला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व पोपशींही भांडला. धर्मावर कोणत्याही प्रकारची श्रद्धा नसतांही त्याचा धर्मभोळेपणा मात्र कमालीचा होता! त्याचा दुष्ट स्वभाव, त्याचा कपटीपणा व त्याचें भ्याडपण यांमुळें त्याचें व त्याच्या राज्याचें अत्यंत नुकसान झालें. राजाच्या आंगीं असाव्या लागणाऱ्या गुणांपैकीं एकही गुण त्याच्या ठिकाणीं वसत नसल्यानें त्याची कारकीर्द अत्यंत वाईट झाली.

५. फ्रान्सशीं युद्ध (इ. स. १२०३–०४) :—राज्यावर आल्यावर जॉनच्या घटस्फोटाचें प्रकरण उत्पन्न झालें. त्याची इंग्लिश राणी हॅडविसा हिच्याशीं घटस्फोट करून इसाबेला नामक एका फ्रेंच सरदारकन्येशीं त्यानें विवाह केला. यामुळें फ्रेंच व इंग्लिश रागावले. फ्रेंच सरदारांनीं फ्रान्सचा राजा फिलिप याची मदत मागून जॉनवर स्वारी करण्याचें ठरविलें. फिलिपलाही जॉनवर स्वारी करून त्याचें फ्रेंच राज्य मिळवावयाचें होतें. याच सुमारास जॉननें आपला पुतण्या आर्थर याचा खून केल्याचें वृत्त फिलिपला कळलें. जिऑफ्रेचा मुलगा व जॉनचा पुतण्या आर्थर यानें इंग्लंडच्या गादीवर आपला हक्क सांगूं नये म्हणून जॉननें त्याला कैद केलें. एके दिवशीं रागाच्या भरांत जॉननें आर्थरला दगड मारिला व त्यानें आर्थर मेला असें म्हणतात! एवढेंच नव्हे तर आर्थर मेल्यावर या निर्दय व दुष्ट राजानें आर्थरचें प्रेत नदींत फेंकून दिलें!! ही वार्ता कानीं येतांच फ्रेंच राजा फिलिप याचा राग दुणावला, व जॉनवर सूड उगविण्याचें ठरवून त्यानें नॉर्मंडीवर हल्ला केला. युद्ध सुरू होऊन थोड्याच वेळांत फिलिपनें जॉनच्या ताब्यांतील नॉर्मंडी, अँज्यू वगैरे फ्रेंच प्रांत हस्तगत केले, व आपल्या राज्यांत सामील केले. या विजयानें फ्रेंच राजाची सत्ता वाढली व जॉनच्या मूर्खपणानें त्याच्या हातून नॉर्मंडी प्रांत गेल्यानें जगभर त्याची नाचक्की झाली. इंग्लिश राजांची नॉर्मंडीवर फार भक्ति असे. त्यामुळें त्यांचें इंग्लंडच्या राज्यकारभारावरील लक्ष विचलित होई; परंतु आतां तो प्रांत गेल्यानें इंग्लिश राजांना केवळ इंग्लंडच्या कारभाराकडेच सर्व लक्ष देण्यास सवड मिळूं लागली. जे नॉर्मन सरदार इंग्लंडांत येऊन स्थायिक झाले होते ते इंग्लंडचे कायमचे रहिवासी झाले व त्यामुळें इंग्लिशांमध्यें एकराष्ट्रियत्वाची जाणीव उत्पन्न होण्यास मदत झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. पोपशीं भांडण (इ. स. १२०५–१३):—फ्रेंच युद्धांतून जॉन मोकळा होतो न होतो तोंच जॉन व पोप यांच्यामध्यें झगडा सुरू झाला. सन १२०५ मध्यें कँटरबरीचा आर्चबिशप ह्यूबर्ट मेला. तेव्हां त्याच्या जागीं स्टीफन लँग्टन नामक एका हुशार व बुद्धिमान गृहस्थाची नेमणूक करण्या-बद्दल पोपनें कँटरबरीच्या धर्मगुरूंचीं मनें वळविलीं; व लँग्टनची कँटर-बरीचा आर्चबिशप म्हणून नेमणूक केली. या बाबतींत आपला सल्ला विचारांत घेतला नाहीं म्हणून जॉनला अत्यंत राग आला व लँग्टनचें इंग्लंडांत स्वागत करावयाचें नाहीं व त्याची सत्ता मान्य करावयाची नाहीं असें त्यानें ठरविलें. त्यामुळें पोप, तिसरा इनोसंट, रागावला व त्यानें इंग्लंडला धर्मबहिष्कृत केलें. यामुळें इंग्लंडमधील सर्व धर्मविधि थांबले, मंदिरें ओस पडूं लागलीं, प्रार्थना बंद पडल्या; इतकेंच काय पण मृतांचे धर्मविधीही होईनासे झाले ! अशा स्थितींत जॉननें धर्मगुरूंची मालमत्ता जप्त करण्याचा हुकूम सोडून धनाढ्य धर्माधिकाऱ्यांना लुटलेंही ! पुढें सन १२०९ मध्यें पोपनें खुद्द जॉनलाच धर्मबहिष्कृत केलें. यानें डगमगून न जातां जॉननें विरोधी धर्माधिकाऱ्यांचा छळ करण्यास सुरुवात केली. शेवटीं सन १२१२ मध्यें जॉनला पदच्युत केल्याचें पोपनें जाहीर केलें व फ्रान्सचा राजा फिलिप यानें इंग्लंडवर स्वारी करून तेथील राज्यपद स्वीकारावें, अशी त्यानें त्याला आज्ञा केली. यानें जॉन चांगलाच वठणीवर आला व लँग्टनची नेमणूक त्यानें मान्य केली; आणि धर्माधिकाऱ्यांचा लुबाडलेला पैसाही त्यानें परत देण्याचें कबूल केलें. एवढेंच नव्हे तर त्यानें आपलें सर्व राज्यहि पोपला देऊन टाकलें ! पोपनें त्याचें राज्य त्याला परत दिलें. तेव्हां जॉननें दरसाल एक हजार मार्क खंडणी म्हणून देण्याचें कबूल केलें. यामुळें पोपनें त्याच्यावरील धर्मबहिष्कार उठविला व फ्रान्सच्या फिलिपनें इंग्लंडवर स्वारी करूं नये असें त्याला कळविलें. या सर्व कृत्यांमुळें इंग्लंडचा राजा पोपचा दास बनला. तरी राजसत्ता किती सामर्थ्यवान असूं शकतें हें कळून आलें. जुलमी व अप्रिय असूनही जॉनला त्याच्या प्रजेचा पाठिंबा मिळाला व म्हणूनच त्याला पोपशीं दोन हात करतां आले.

७. सरदारांशीं भांडण :—जॉनचा राज्यकारभार अत्यंत जुलमी होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें त्याचे सरदार त्याच्यावर कधींच खूष नसत. अनेक सरदारांचे हक्कही त्यानें नष्ट केले होते. तशांतच त्यानें पोपचें दास्यत्व स्वीकारल्याचें ऐकून सर्व सरदारांचें धाबें दणाणलें. यामुळें आपल्यावर आणखी कांहींतरी नवी आपत्ति ओढवेल असें सर्व सरदारांस वाटूं लागलें. खुद्द स्टीफन लँग्टनलाही जॉननें पोपचें दास्यत्व स्वीकारलें हें आवडलें नाहीं. त्यामुळें सर्व इंग्रज सरदारांमध्यें जागृति करण्याचें ठरवून त्यानें सर्वांस आपल्या हक्कांची व अधिकारांची जाणीव करून दिली; व राजसत्तेला मर्यादा घातली नाहीं तर राजा जास्तच जुलमी होईल असें त्यानें सर्वांस पटवून दिलें. अशा स्थितींत सर्व सरदारांच्या विचारानें त्यानें त्यांच्या व इतर प्रजाजनांच्या हक्कांचें संरक्षण करण्याकरितां एक सनद तयार केली. ही सनद राजाला सादर करून तिला राजाची मान्यता मिळविण्याकरितां जोराची तयारी करण्यांत आली. ही वार्ता ऐकून जॉन घाबरून गेला व सरदारांचें पारिपत्य करण्याचें त्यानें ठरविलें. शेवटीं सरदारांनीं जॉनला विंडसर शेजारच्या रनीमीडच्या कुरणावर गांठून त्याला त्या सनदेवर सही करण्यास भाग पाडलें (१२१५). प्रथमतः राजाला अतिशय संताप आला; व त्यानें सही करण्याचेंही नाकारलें; परंतु सर्व देश आपल्या विरुद्ध आहे हें ओळखून अगदीं जुलमानें, आपल्या मनाविरुद्ध त्यानें त्या सनदेवर सही केली.

८. **स्वातंत्र्याची सनद** ऊर्फ **मॅग्नाकार्टा** (इ. स. १२१५) :—या सनदेंत एकंदर त्रेसष्ट कलमें होतीं. सरदार, धर्माधिकारी, व्यापारी व सामान्य जनता यांच्या हक्कांचा व अधिकारांचा समावेश त्यांत असून इंग्रजांच्या स्वातंत्र्याचा व प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा पाया म्हणून तिचा उल्लेख करण्यांत येतो. सनदेंतील मुख्य कलमांचा सारांश असा :—

(१) कायद्याप्रमाणें चौकशी झाल्याशिवाय अगर त्याच्या बरोबरीच्या व योग्यतेच्या लोकांनीं अपराधी ठरविल्याशिवाय कोणाही स्वतंत्र मनुष्यास राजानें कैद करूं नये, हद्दपार करूं नये, बंडखोर ठरवूं नये अगर दुसरी शिक्षा देऊं नये. (२) न्यायदानाच्या बाबतींत न्यायाची विक्री, बंदी अगर अळंटळं राजानें कधींही करूं नये. (३) इंग्लंडच्या धर्मपीठाचें स्वातंत्र्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानण्यांत यावें. (४) स्कूटेज कर व तत्सम इतर कर लोकांच्या अगर 'मोठ्या मंडळाच्या' संमतीशिवाय लोकांपासून घेऊं नयेत. (५) राज्यांत सर्वत्र वजनें व मापें सारखीं असावींत. (६) सरंजामी सरदारांचे पूर्वापार हक्क मान्य करण्यांत यावे व सरंजामी सरदारांच्या 'अज्ञानांच्या' मालमत्तेपासून राजानें पालक या नात्यानें स्वतः फायदा करून घेऊं नये; त्यांच्या दर्जाप्रमाणें त्यांचीं लग्नें व्हावीं; मोठ्या मंडळाच्या सभेस त्यांस व्यक्तिशः राजानें बोलवावें व या मंडळाच्या संमतीखेरीज कोणतेही कर लादूं नयेत. सरंजामी सरदारांनीं आपलीं कोर्टें चालू ठेवावीं व आपल्या कुळांना त्यांनीं न्यायानें वागवावें. (७) लंडन व इतर मोठ्या शहरांचे पूर्वींचे हक्क चालवावे. (८) राजानें भाडोत्री सैन्य रद्द करावें. (९) या सनदेची योग्य व्यवस्था व अंमलबजावणी व्हावी म्हणून पंचवीस उमरावांची एक कमिटी नेमावी. एकंदरींत पाहतां या स्वातंत्र्यसनदेमुळें इंग्लिश लोकांचें स्वातंत्र्य मान्य करण्यांत येऊन राजसत्तेला मर्यादा घालण्यांत आली. ही सनद म्हणजे ब्रिटिश राज्यघटनेच्या कमानीचा मधला चिरेबंदी दगड. आजही ही स्वातंत्र्यसनद लंडनमधील ब्रिटिश म्यूझियममध्यें पाहण्यास मिळते.

९. **जॉनचा मृत्यु** (१२१६):—जॉननें केवळ नाइलाजानें या सनदेवर सही करून तिला मान्यता दिली असली तरी थोड्याच दिवसांत तो त्या सनदेंत दिलेल्या वचनांविरुद्ध वागूं लागला. याकरितां त्यानें पोपचीही मदत मागितली व आपल्याला वचनांतून मुक्त करण्याबद्दल त्यानें पोपची याचना केली. पोपनेंही मोठ्या उदार अंतःकरणानें त्याची याचना मान्य केली. तेव्हां प्रथमतः जॉननें भाडोत्री फौज आपल्या पदरीं बाळगून उमरावांचा नक्षा उतरविण्याचा घाट घातला. यामुळें चिडून जाऊन उमरावांनींही तयारी केली; व आपल्या मदतीकरितां फ्रेंच राजाची मदत मागितली; व त्याकरितां त्याला इंग्लिश राजपदही देऊं केलें. फ्रेंच राजपुत्र लुई हा सैन्यासह इंग्लंडांत आलाही! त्याचा पराभव करण्याच्या हेतूनें उत्तरेकडून मोठें सैन्य बरोबर घेऊन जॉन येत असतां एका नदींत त्याचें सर्व सामान-सुमान व जड-जवाहीर वाहून गेलें. त्यामुळें तो संतापला, चिडला. शेवटीं तशा स्थितींतच त्या रात्रीं त्याला ताप भरून तो सन १२१६ मध्यें मृत्यु पावला. त्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्या मुलास–हेन्रीस–घाईघाईनें राज्याभिषेक करण्यांत येऊन सर्व सरदार



मॅग्नाकार्टाचा एक भाग

फ्रेंच राजपुत्र लुई याजशीं लढण्यास सज्ज झाले. शेवटीं सन १२१७ मध्यें लुईचा पराभव झाल्यानें तो फ्रान्समध्यें परत गेला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. पहिला रिचर्ड व जॉन यांच्या स्वभावांचें थोडक्यांत वर्णन करून त्यांच्यांतील भेद सांगा.

२. पहिल्या रिचर्डच्या गैरहजेरीचा इंग्लंडच्या राज्यकारभारावर कोणता परिणाम झाला ?

३. खालील प्रश्नांचीं थोडक्यांत उत्तरें द्या :—

   १. रिचर्डनें धर्मयुद्धाकरितां पैसा कोणत्या मार्गांनीं उभा केला ?

   २. ऑस्ट्रिया व रिचर्ड यांचें वांकडें येण्याचें काय कारण ? त्याचा परिणाम काय झाला ? त्या वेळीं इंग्रजांनीं आपल्या राजाला कोणती मदत केली ?

   ३. रिचर्डच्या गैरहजेरींत जॉनचें वर्तन कसें होतें ?

   ४. जॉनच्या कारकीर्दींत फ्रान्सशीं युद्ध होण्याचें कारण काय ? त्याचा परिणाम काय झाला ?

   ५. जॉनच्या आंगचे मुख्य दोष सांगा.

४. स्वातंत्र्याची सनद लोकांनीं कशी मिळविली ? त्याचा परिणाम काय झाला ?

५. स्वातंत्र्याच्या सनदेंतील महत्त्वाच्या गोष्टी सांगा.

६. तुमच्यांपैकीं एकजण जॉन व बाकीचे राजाचे सरदार आहेत अशी कल्पना करून सरदार राजाला—जॉनला—स्वातंत्र्याच्या सनदेवर सही करण्याचा आग्रह करीत आहेत असें समजा. त्या वेळीं तुम्हांमध्यें जो संवाद होईल तो लिहा.

७. तुम्ही स्वतः जॉन आहांत अशी कल्पना करा. तुम्हीं स्वातंत्र्याची सनद मान्य केली असती ? कां नाहीं ? त्या वेळीं तुम्ही स्वतः कारभार कसा सुधारला असता ?

८. पोपशीं झालेल्या जॉनच्या भांडणाचा थोडा इतिहास सांगा.

९. खालील व्यक्तींसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :— सलॅडिन, लॅंगचॅंप, ह्यूबर्ट वॉल्टर, फिट्झ ऑसबर्ट, आर्थर, हॅडविसा, तिसरा इनोसंट, स्टीफन लॅंग्टन.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. खालील गोष्टींचीं कारणें सांगा :—
ज्यू लोकांचा छळ, शिलेदारी, कॅरूकेज कर, फिलिपचें जॉनशीं युद्ध.

११. या वेळीं रॉबिनहुड नांवाचा एक बंडखोर शेरवुडच्या जंगलांत राहत असे. त्याच्या संबंधाच्या अनेक मजेदार गोष्टी आहेत. त्यांपैकीं कांहीं तुमचे शिक्षक तुम्हांस सांगतील.

उ ता रा

१. अपमानाची फेड !

पॅलेस्टाईनमध्यें लढत असतांच पहिल्या रिचर्डनें मोठा पराक्रम करून एकर येथें मोठा विजय संपादन केला. त्यावेळीं ऑस्ट्रियाचा ड्यूक, लिओपोल्ड, यानें आपलें निशाण तेथें रोविलें. तें न साहून रिचर्डनें त्या झेंड्याचे तुकडे तुकडे केले ! आपल्या झेंड्याचा रिचर्डनें अपमान केला ही गोष्ट लिओपोल्डला आवडली नाहीं व त्याबद्दल रिचर्डचा सूड उगविण्याचें त्यानें ठरविलें. पुढें युद्ध संपवून रिचर्ड इंग्लंडला परत येत असतां त्याचीं जहाजें फुटलीं व तो व्हेनिस बंदरीं उतरला. त्यावेळीं त्याच्या पोशाखावरून तो ओळखला गेला. ही गोष्ट रिचर्डला कळली व आपण पकडले जाऊं नये म्हणून त्यानें एका व्यापाऱ्याचा पोषाख केला व बरोबर फक्त एकच नोकर घेऊन तो व्हिएन्नास जाण्यास निघाला. वाटेंतही त्यानें अतोनात पैसा खर्च केला. त्यामुळें तो ओळखला गेला. शेवटीं प्रवासाच्या श्रमांनीं थकून गेल्यानें एका लहानशा खेड्यांतील एका खोपटांत तो झोपीं गेला. इकडे त्याचा सेवक कांहीं खाद्यपदार्थ आणण्याकरितां बाजारांत गेला असतां त्यानें इंग्लिश नाणीं दुकानदारास दिलीं. त्यामुळें तो ओळखला गेला. लगेच ही बातमी ऑस्ट्रियाच्या ड्यूकला समजून माग काढीत तो रिचर्ड झोपला होता तेथें ससैन्य आला व मागील अपमानाचें उट्टें काढण्याकरितां त्यानें रिचर्डला कैद केलें.

प्रश्नः—१. ऑस्ट्रियाचा ड्यूक व रिचर्ड यांचें वाकडें येण्याचें कारण काय ?
२. त्याचा परिणाम काय झाला ?
३. प्रवासांत असतां रिचर्ड कसा ओळखला गेला ? त्याचा परिणाम काय झाला ? ती गोष्ट त्याला टाळतां आली असती ? कशी ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—इ. स. ११५०–१२१५			
वर्ष	इंग्लंड–महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ती	हिंदुस्थान—महत्त्वाच्या गोष्टी
११५०	११५४–८९ दुसरा हेन्री		
११५९	स्कूटेज कराची स्थापना		
११६४	क्लॅरेंडनची घटना	बेकेट	
११७०	आर्चबिशप बेकेटचा खून		११७० पृथ्वीराजास दिल्लीचें राज्य
११८९	तिसरें धर्मयुद्ध, पहिला रिचर्ड राजा		
११९१		पृथ्वीराज चव्हाण जयचंद, महमद [घोरी	११९१ स्थानेश्वरची लढाई पृथ्वीराज विजयी
	११९९-१२१५ राजा जॉन		
१२०३			१२०३ बखत्यार खिलजीनें बंगाल घेतला
१२०५	आर्चबिशप ह्यूबर्ट मेला	स्टीफन लँग्टन	कुतुबमिनारास सुरवात
१२१५	मॅग्नाकार्टा	जॉन	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. तिसरा हेन्री (१२१६–१२७२)–पार्लमेंटची स्थापना

१. बालराजा तिसरा हेन्री :—जॉनच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हेन्री याला राज्यपद मिळालें. त्या वेळीं तो केवळ नऊ वर्षांचा होता. जुलमी राजाचा व नादान बापाचा पुत्र असला तरी तो स्वभावानें चांगला होता. अत्यंत प्रामाणिक व दयाळू अंतःकरणाचा तो असल्यानें त्याच्या नातेवाईकांस चांगलेंच सुख मिळालें. तो मोठा धर्मशील होता. त्याला लहानपणीं शिक्षणही चांगलें मिळालें होतें. तो सौंदर्याचा उपासक असल्यानें त्याला कलाकुसरीचें काम आवडे. वेस्टमिन्स्टर ॲबे नांवाचें धर्ममंदीर त्यानें पुरें केलें. तें त्याचें जिवंत स्मारक होय. परंतु राजा या नात्यानें त्याची योग्यता अत्यंत कमी प्रतीची आहे.

तिसरा हेन्री

तो उधळ्या व खर्चिक असल्यानें त्यानें लोकांवर अनेक प्रकारचे कर लादून पैसा उकळला. त्याचें मन लोण्याहूनही मृदु होतें व कानाचा तो हलका असल्यानें त्याचें अत्यंत नुकसान झालें. त्याचा राज्यकारभार परकीयांच्या सल्ल्यानें चालल्यामुळें अत्यंत दुर्बळ असा झाला. त्याचा पोकळ डौल, कपटीपणा व बेइमानीपणा यामुळें त्याच्यावर त्याची प्रजा अत्यंत नाराज व नाखूष असे. यामुळेंच त्याच्या छपन्न वर्षांच्या कारकीर्दींत त्याला अनंत हालअपेष्टा व अपमान सहन करावे लागले.

२. पालकमंडळ :—सुरुवातीस राजा अल्पवयी असल्यानें राज्यकारभाराचें काम एका पालकमंडळाकडे सोंपविण्यांत आलें होतें. पेंब्रोकचा ड्यूक विल्यम मार्शल, पीटर-ड्-रॉचेस, ह्यूबर्ट-ड्-बर्ग व पोपचा प्रतिनिधि गायलो यांचा या मंडळांत समावेश करण्यांत आला होता. या मंडळानें राजाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यावर बसविलें व फ्रेंच राजपुत्र लुई याचा पराभव करून त्याला फ्रान्स-मध्यें पळवून लावलें. त्यानंतर त्या मंडळानें पंचवीस सभासदांचें मंडळ नेमण्यासंबंधींचीं व करांसंबंधींचीं कलमें वगळून बाकी सर्व कलमांसह



वेस्ट मिन्स्टर ॲबे

मॅग्नाकार्टा प्रसिद्ध केला. याला पोपच्या प्रतिनिधीची मान्यता मिळाल्यानें पालकमंडळाला जोर चढला. यानंतर सन १२१९ मध्यें विल्यम मार्शल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मेल्यानें ह्यूबर्ट बर्ग सर्वसत्ताधारी झाला. या नव्या पालकमंडळानें देशांत शांतता निर्माण करून लोकांचें जीवित व मालमत्ता यांचें संरक्षण करण्याकरितां देशांत पुंडाई माजविणाऱ्या सरदारांचा व परकीयांचा मोड करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्या मंडळानें त्यांचा बंदोबस्त करून राजाचे अनेक किल्ले त्याला परत मिळवून दिले, व अनेक परकीयांना इंग्लंडांतून हांकलण्यांत आलें.

३. हेन्रीचा कारभार :—सन १२२७ मध्यें हेन्री वीस वर्षांचा झाला व त्यानें पालकमंडळ रद्द करून सर्व कारभार आपल्या हातीं घेतला. ह्यूबर्ट बर्गला त्यानें आपला मुख्य प्रधान नेमलें. थोड्याच वर्षांत त्याचा प्रतिस्पर्धी पीटर रॉचेस इंग्लंडमध्यें आला. त्यानें हेन्रीच्या कानीं लागून ह्यूबर्टसारख्या हुषार प्रधानाला पदभ्रष्ट करविलें; व त्यानंतर कोणताही प्रधान न नेमतां हेन्रीनें सर्व कारभार आपल्याच हातीं घेतला. मात्र रॉचेस त्याचा सल्लागार राहिला. हेन्रीचा राज्यकारभार अगदीं वाईट झाला. आपल्याला पोपमुळेंच राज्य मिळालें अशी त्याची समजूत असल्यानें पोप ज्या ज्या वेळीं पैशाची मागणी करी त्या त्या वेळीं तो त्याला मोठमोठ्या रकमा देऊं लागला. शिवाय राजाही स्वतः पाण्यासारखा पैसा खर्च करी. यामुळें त्याला अतोनात कर्ज झालें. अशा स्थितींतच हेन्रीनें एलिनॉर नांवाच्या एका फ्रेंच सरदारकन्येशीं लग्न केलें. त्याचवेळीं त्याच्या विधवा आईनेंही एका फ्रेंच सरदाराशीं विवाह केला. या दोन्ही लग्नांमुळें अनेक परकीय लोक इंग्लंडमध्यें आले व राजदरबारीं त्यांचें अतोनात प्रस्थ माजूं लागलें. त्यांचा मानमरातब वाढूं लागला. त्यांना पदव्या, मोठमोठ्या नोकऱ्या व जहागिरी मिळूं लागल्या. यामुळें इंग्लिश सरदार राजावर नाखूष होऊं लागले. परकीय लोक त्यांना विचारीनात; राजाही त्यांना विचारीना. 'मॅग्नाकार्टा हें एक चिटोरें असून त्याला किंमतही तितकीच,' असेंही परकीय लोक म्हणूं लागले. अशा स्थितींतच परकीय लोकांच्या सल्ल्यानें व फ्रान्समधील आपलें गेलेलें राज्य परत मिळवावें म्हणून हेन्रीनें फ्रान्सशीं युद्ध आरंभिलें (१२४२). पण त्यांत त्याला हार खावी लागली. या युद्धांतही त्यानें पैसा उधळला. अशा एकंदर कारभारामुळें देशांत अशांतता उत्पन्न झाली; चोऱ्या मारामाऱ्या होऊं लागल्या व दंग्याधोप्यांना ऊत आला. असें असूनही हेन्रीचे डोळे उघडले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहींत. कारण सन १२५४ मध्यें पोपनें सिसिलीचें राज्य देऊं केलें असतां आपल्या मुलाकरितां तें त्यानें पन्नास हजार पौंडांस विकत घेतलें. मात्र त्याला किंवा त्याच्या मुलालाही सिसिलीचें तोंडही पाहण्यास मिळालें नाहीं, व पैसे गेले ते गेलेच! या उधळपट्टीनें इंग्लंडमधील धर्मगुरूही हेन्रीवर चिडून गेले होते.

४. ऑक्सफर्डची सभा :—हेन्रीच्या राज्यकारभाराकडे जनतेनें प्रथमतः डोळेझांक केली असली, तरी यापुढें तसें करणें शक्य नाहीं असें लोकांस वाटूं लागलें. सन १२५४ मध्ये मोठ्या मंडळाची सभा हेन्रीनें बोलाविली होती. त्यांत प्रत्येक शायरतर्फे दोन प्रतिनिधि बोलाविण्यांत आले होते. या मंडळापुढें राजानें पैशाची मागणी केली असतां सर्व सभासदांनीं हेन्रीला आपलीं गाऱ्हाणीं ऐकविलीं. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां सर्व उमरावांनीं आपले हक्क राखण्याकरितां व राज्यकारभार सुधारण्याकरितां राजाला विरोध करण्याचें ठरविलें. लेस्टरचा अर्ल-सायमन--ड–मॉटफर्ड याच्या नेतृत्वाखालीं सर्व सरदार ऑक्सफर्ड येथें जमा झाले व त्यांनीं आपल्या गाऱ्हाण्यांचा एक अर्ज तयार करून तो राजाला सादर केला. आपल्या सरदारांची लष्करी तयारी लक्षांत घेऊन हेन्रीनें त्याला आपली संमति दिली. या अर्जांत ज्या सूचना सरदारांनीं राजाला केल्या होत्या त्यांतील मुख्य अशा :—(१) लोकांच्या तक्रारी समजून घेण्याकरितां राजा व सरदार यांनीं निवडलेल्या चोवीस सभासदांची एक कमिटी असावी. (२) या कमिटीच्या सभासदांपैकीं पंधराजणांचें एक मंडळ राजाला राज्यकारभारांत मदत करण्याकरितां असावें. (३) राजानें वर्षांतून तीन वेळां पार्लमेंट बोलवावें. (४) परराष्ट्रांशीं राजानें युद्ध करूं नये. (५) परकीयांना मानाच्या व महत्त्वाच्या नोकऱ्यांवरून कमी करावें. (६) कौंटींच्या शेरीफांची निवडणूक दरसाल व्हावी. (७) राजाचे किल्ले इंग्लिशांचे हातीं असावे. अशारीतीनें राजसत्तेवर सरदारांचें नियंत्रण बसलें व इंग्लंडमधील राजसत्ता नियंत्रित झाली. राजाच्या बगलबच्यांनीं ऑक्सफर्ड येथें भरलेल्या सरदारांच्या या सभेला 'खुळी पार्लमेंट' असें नांव दिलें.

५. यादवी युद्ध (इ. स. १२६४) :—राजसत्ता नियंत्रित झाली हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक सरदारांनाही आवडलें नाहीं. राजालाही एकंदर प्रकार पसंत न पडून आपल्या वचनांतून पोपनें आपल्याला मुक्त करावें म्हणून त्यानें त्याची याचना केली. तेव्हां पोपनें त्याला वचनांतून मुक्त केलें; व राजानेंही 'दिलेलीं वचनें मी पाळणार नाहीं' असें सांगितलें. जे लोक सायमनवर नाराज होते ते राजाला मिळाले, व अशारीतीनें देशांतील उमरावांमध्यें दोन तट पडून यादवी माजली. प्रजापक्षाच्या बाजूनें सायमननें मोठें लष्कर जमा करून लेविस येथें राजपक्षाशीं लढाई दिली (१२६४). त्यांत राजाचा पराभव होऊन राजाला सायमननें कैद केलें. यानंतर सायमननें सर्व सत्ता आपल्या हातीं घेऊन राज्यकारभारांतील घोटाळे काढून टाकण्याची शर्थ केली.

६. पहिली पार्लमेंट सभा (१२६५):—यानंतर सायमननें सन १२६५ मध्यें पहिली पार्लमेंट सभा बोलाविली. यापूर्वी मोठ्या मंडळांत फक्त सरंजामी सरदार व धर्मगुरूच असत; परंतु सायमननें राष्ट्रांतील प्रतिनिधी बोलावून त्या मंडळाला राष्ट्राचें प्रातिनिधिक मंडळ बनविलें. अशा तऱ्हेची पूर्ण प्रातिनिधिक सभा ही पहिलीच होय; व म्हणूनच तिला इंग्लंडच्या हल्लींच्या पार्लमेंटची जननी असें म्हणतात. सायमननें बोलाविलेल्या पार्लमेंटमध्यें प्रत्येक शायरतर्फे दोन शिलेदार, प्रत्येक मोठ्या शहरातर्फे दोन प्रतिनिधी, एकंदर तेवीस उमराव व एकशेंवीस धर्मगुरू राजकारणाची चर्चा करण्याकरितां एकत्र आले. या पार्लमेंटनें एक नवीन राज्यघटना तयार करून राजाला सल्ला देण्याकरितां नऊ जणांचें एक सल्लागारमंडळ असावें व या मंडळानेंच प्रधानांच्या नेमणुका कराव्या वगैरे गोष्टी ठरविल्या. या पार्लमेंटमध्यें सायमनचे साथीदारच पुष्कळ होते; म्हणून या पार्लमेंटला पूर्णपणें प्रातिनिधिक स्वरूप नव्हतें, असें कांहींचें म्हणणें आहे. तरी पण मध्यमवर्गाचे प्रतिनिधी याच पार्लमेंटमध्यें प्रथम बोलाविले गेले.

७. सायमन–ड–मॉंटफर्ड :—सायमन–ड–मॉंटफर्ड हाही एक परकीयच होता. त्याचा जन्म फ्रान्समध्यें सन १२०८ च्या सुमारास झाला. दिसण्यांत तो मोठा सुंदर व रुबाबदार दिसे. मनानें धार्मिक असून तो मोठा कसलेला सेनानी व शूर योद्धा होता. इंग्लंडमध्यें आल्यावर त्यानें हेन्रीची बहीण एलिनॉर हिच्याशीं लग्न केलें; त्यामुळें त्याचें महत्त्व वाढलें. थोड्याच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिवसांत इंग्लिश रीतरिवाजांत तो इतका मुरला कीं त्याला इंग्लिश लोक व त्यांचा देश यांबद्दल आपलेपणा वाटूं लागला. त्यामुळें हेन्रीचा उधळपट्टीचा व अव्यवस्थित कारभार पाहून त्यानें त्याची चांगलीच कानउघाडणी केली; पण त्याचा परिणाम चांगला झाला नाहीं. गॅस्कनी प्रांताचा तो गव्हर्नर असतां तेथील लोकांनीं त्याच्याविरुद्ध राजाकडे विनाकारण तक्रारी केल्या. तें सायमनला आवडलें नाहीं व तो राजाला विरोध करण्याची संधि पाहूं लागला. पुढें राजाच्या वाईट कारभाराला सर्व लोक कंटाळले आहेत असें पाहून सायमन विरोधी पक्षाचा पुढारी झाला. लोकांचा पुढारी झाल्यावर त्यानें कोणकोणत्या महत्त्वाच्या गोष्टी केल्या त्या वर आल्याच आहेत. लेविसच्या लढाईच्या वेळींच राजपुत्र एडवर्ड सायमनच्या सैन्याच्या हातून निसटला होता. हेकट स्वभावामुळें सायमनच्या पक्षांतील बरेचसे लोक फुटले होते. ही संधि साधून राजपुत्र एडवर्ड यानें राजपक्षाचे अनेक लोक एकत्र जमा केले; व तो सायमनवर चाल करून आला. ईव्हशॅम येथें दोन्ही सैन्यांत लढाई झाली (१२६५). त्यांत सायमनचा पराभव होऊन तो रानोमाळ भटकला व वेल्सच्या राजाच्या आश्रयार्थ गेला. तेथें त्याचा पाठलाग करून एडवर्डच्या लोकांनीं त्याला गांठलें. तेव्हां मोठी लढाई झाली. त्यांतच मोठ्या वीरश्रीनें लढतां लढतां सायमन-ड-मॉटफर्ड मेला (१२६५). सायमन बंडखोर ठरला तरी परकीयांच्या जंजाळांतून इंग्लंडला कायमचें सोडविणें, पोपचें इंग्लंडवरील अधिराज्य नष्ट करणें व इंग्लंडमध्यें प्रातिनिधिक राज्यपद्धति स्थापन करणें याकरितां तो इंग्लंडच्या इतिहासांत प्रसिद्धी पावला.

८. **हेन्रीचा शेवट** (इ. स. १२७२):—इंग्लंडमध्यें स्थीरस्थावर केल्यावर व आपल्या बापाला पुन्हां राज्यावर बसविल्यावर राजपुत्र एडवर्ड पॅलेस्टाइनमध्यें चालू असलेल्या धर्मयुद्धाकरितां निघून गेला. यानंतरचा बहुतेक काळ शांततेचा गेला. हेन्री सन १२७२ मध्यें मृत्यु पावला. त्याचे आंगीं दूरदर्शीपणाचा अभाव व मनाचें चांचल्य हे दोन मोठे दुर्गुण असल्यामुळें त्याला दुर्दशेच्या फेऱ्यांत सांपडावें लागलें. त्याच्या कारकीर्दींत चांगल्या चांगल्या इमारती बांधल्या गेल्या; दगडी कोळशाच्या खाणी खणल्या जाऊं लागल्या,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तागाचें कापड तयार होऊं लागलें, लांकडी मशालींच्या ऐवजीं मेणबत्त्यांचा उपयोग होऊं लागला व सोन्याचें नाणें प्रथमतःच उपयोगांत येऊं लागलें. त्याच्यानंतर त्याचा मुलगा एडवर्ड याला इंग्लंडची गादी मिळाली.

अभ्यास

१. तिसऱ्या हेन्रीच्या स्वभावासंबंधीं थोडी माहिती सांगा.

२. सायमन-ड-मॉंटफर्ड याचें थोडक्यांत चरित्र सांगून त्याच्या कार्याची महती वर्णा.

३. हेन्रीचा कारभार अत्यंत वाईट झाला असें तुम्हांस वाटतें कां? कोणत्या कारणांकरितां?

४. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा:—
(१) ऑक्सफर्डची सभा. (२) खुळी पार्लमेंट. (३) पहिली पार्लमेंट सभा. (४) राजपुत्र एडवर्ड (५) हेन्रीच्या कारकीर्दीतील नव्या गोष्टी व शोध. (६) लेविसची लढाई.

५. पालकमंडळाच्या कामगिरीचें वर्णन करा.

६. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा:—
वेस्ट मिन्स्टर ॲबे, ईव्हशॅम, लेविस, पीटररॉचेस, सायमन.

७. तिसरा हेन्री अप्रिय कां झाला? त्याचा परिणाम काय झाला?

८. पुढील कालादर्श पूर्ण करा. तुम्हांस वाटल्यास आणखी जास्त सन घ्या.

इंग्लंड–महत्त्वाच्या गोष्टी	वर्ष	हिंदुस्थान–महत्त्वाच्या गोष्टी
	१२१९	
	१२४२	
	१२५४	
	१२६४	
	१२६५	
	१२७२	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उतारा

१. लेविसची लढाई–१२६४.

आपल्या साठ हजार सैन्यासह राजा लेविस येथें आला. त्याच्या विरोधी-पक्षाच्या सैन्यांत उमदे व तरुण असे पन्नास हजार सैनिक होते. त्यांचे पुढारी अत्यंत उत्साही व तडफदार होते. या विरोधीपक्षाच्या मदतीला अननुभवी लंडनवासी लोक आले होते. लढाई न होतां तह व्हावा अशी अनेक सरदारांची इच्छा होती व त्याप्रमाणें त्यांनीं राजाशीं बोलणेंही केलें; पण तें फसल्यानें सायमनच्या पक्षानें लढाईची जोरानें तयारी केली व राजपक्षाच्या शिबिरावर हल्ला करण्याची हिंमत धरली. त्यावेळीं राजपक्षाचे सैनिक आपल्या अंथरुणांतून उठलेलेही नव्हते! अशावेळीं अचानकपणें हल्ला करणें युद्धनीतीच्या विरुद्ध व हल्ला करणाराला कमीपणा आणणारें आहे म्हणून तो बेत रद्द झाला. तेव्हां शत्रुसैन्याची वाट पहाण्याचें ठरलें. नंतर राजपुत्र एडवर्ड अननुभवी लंडन-वासीयांच्या तुकडीवर जोरानें चाल करून आला. तेव्हां ते सर्व लोक घाबरून पळूं लागले. त्यांचा पाठलाग करून एडवर्डच्या सैनिकांनीं अनेकांस कापून काढलें. इकडे सरदारपक्षीयांनीं राजाच्या सैन्यावर जोराचा हल्ला करून राजाला व त्याच्या अनेक साथीदार सरदारांना कैद केलें; संधी साधून अनेक सरदार पळाले. इतक्यांत आपण मोठा विजय संपादन केला अशा भावनेनें राजपुत्र एडवर्ड समरांगणावर आला; तेव्हां त्याचा निभाव लागेना व सरदारपक्षीयांनीं त्याच्या सैन्याचा पाठलाग करून अनेकांस कंठस्नान घातलें. या लढाईंत एकंदर तीस हजार उमदे लोक कामास आले; लढाईच्यां आधीं किती मेले व समुद्रांत बुडून किती मेले त्यांचा पत्ताच नाहीं!

प्रश्न :—१. लेविसची लढाई कोणामध्यें झाली ? केव्हां झाली ? कां झाली ?
२. एडवर्डनें कोणता पराक्रम केला ? त्याची फजिती कशी झाली ?
३. राजावर एकदम हल्ला कां झाला नाहीं ? या लढाईंत किती लोक मेले ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३. स्कॉटलंडशीं लढा—पहिला एडवर्ड

(इ. स. १२७२–१३०७)

१. पहिला एडवर्ड :—तिसरा हेन्री मृत्यु पावला त्यावेळीं त्याचा मुलगा एडवर्ड धर्मयुद्धांत गुंतलेला होता. आपल्या बापाच्या मृत्यूची बातमी कळतांच तो इंग्लंडांत आला व त्याला राज्याभिषेक झाला (१२७४). तो मोठा रुबाबदार दिसे. पुरे पूर उंचीचा व धिप्पाड शरीराचा एडवर्ड शुद्ध अंतःकरणाचा, त्यागी, ममताळू, धार्मिकवृत्तीचा व मोठा कष्टाळू होता. तो थोडा हट्टी व तापट होता. त्याला मर्दानी खेळ आवडत. विद्या व कला यांची त्याला अभिरुची होती. तो स्वतः उत्तम योद्धा होता; व या गुणांवर त्यानें अनेक मोठमोठीं युद्धें जिंकलीं. प्रजेशीं अत्यंत ममतेनें वागून तिच्या साहाय्यानें राज्यकारभार केल्यास यश दूर नाहीं असें त्यास नेहमीं वाटे व या तत्त्वाप्रमाणें वागून त्यानें यश व कीर्ति मिळविली. 'आपले जीव ज्या लोकांनीं आमच्या हातीं दिले आहेत त्यांचें संरक्षण करणें हें आमचें कर्तव्य आहे' असें तो नेहमीं म्हणे. तो उत्तम मुत्सद्दी व कायदेपंडित होता. त्याची धार्मिकवृत्ती व युद्धकौशल्य पाहून एकजण लिहितो, "पहिला एडवर्ड म्हणजे ख्रिस्तीधर्माचें एक उत्फुल्ल, तेजस्वी व नयनमनोहर पुष्प होय. काय त्याचें शौर्य आणि काय त्याचें युद्धकौशल्य !" प्रजेच्या गळ्यांतील तो एक लाडका ताईत होता. इंग्लंडमध्यें सुराज्य स्थापन करून साधल्यास ब्रिटिश बेटांचें एकीकरण करणें व त्याचप्रमाणें युरोपियन राजकारणांत मोठी मान्यता मिळवून इंग्लंडच्या हिताचें संरक्षण करणें हा त्याचा मुख्य हेतु होता. आपल्या हेतूच्या सिद्ध्यर्थ त्यानें जिवापाड खटपट करून बरेंचसें यश मिळविलें.

पहिला एडवर्ड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. वेल्स प्रांताशीं युद्ध (इ. स. १२७७–८४) :—वेल्स प्रांत इंग्लंडच्या राज्यांत मोडत नसला तरी तेथील राजानें इंग्लिश राजाचें मांडलिकत्व पत्करलेलें होतें. ही गोष्ट तेथील राजांस आवडत नसे, व संधि साधून ते इंग्रजी राज्यावर आक्रमण करून आपलें स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न करीत. एडवर्ड राजा झाला तेव्हां लिवेलिन नामक वेल्सचा राजा होता. त्यानें एडवर्डचें मांडलिकत्व स्वीकारण्याचें नाकारलें. तेव्हां एडवर्डनें त्याच्यावर स्वारी करून त्याला आपलें स्वामित्व मान्य करण्यास लावलें. परंतु ही गोष्ट वेल्श लोकांना पसंत न पडून त्यांनीं आपल्या राजाचा भाऊ



एडवर्डनें बांधलेला किल्ला

डेव्हिड याच्या नेतृत्वाखालीं बंड उभारून एडवर्डशीं युद्ध आरंभिलें. त्यांत लिवेलिनही सामील झाला. तेव्हां एडवर्डनें त्यांच्यावर जोराचा हल्ला केला. मोठी लढाई होऊन लिवेलिन मारला गेला व डेव्हिडला कैद करून एडवर्डनें त्याचा शिरच्छेद करविला (१२८३). शेवटीं एडवर्डनें वेल्स प्रांत आपल्या राज्याला कायमचा जोडून टाकला (१२८४). वेल्स प्रांतांतील कॉरनॅर्व्हन किल्ल्यांत राहात असतां त्याला पुत्र झाला. तेव्हां वेल्श लोकांना खूष करण्याच्या हेतूनें त्यांना त्यानें आपला मुलगा दाखवून ' हा पहा तुमचा राजा ' असें तो म्हणाला. तेव्हांपासून इंग्लंडच्या राजाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्येष्ठ राजपुत्रास ‘ वेल्सचा राजपुत्र ’ असें म्हणण्याचा प्रघात पडला. तो अजूनही कायम आहे.

३. स्कॉटलंडशीं युद्ध:—वेल्सच्या राजाप्रमाणेंच स्कॉटलंडचाही राजा इंग्लंडचा मांडलिक होता. पण पहिल्या रिचर्डनें मोठी रक्कम घेऊन स्कॉटलंडच्या राजाचें स्वातंत्र्य त्याला परत दिलेलें होतें; व पहिल्या एडवर्डची बहीण स्कॉटलंडच्या राजाला दिलेली होती. त्यामुळें त्या दोघांत सख्य होतें. पण सन १२८६ मध्यें स्कॉटलंडचा राजा अलेक्झांडर मेला. त्याला मुलगा नव्हता. मार्गारेट नांवाची एक तीन वर्षांची मुलगी होती. आपल्यामागें तिला राज्य मिळावें अशी अलेक्झांडरची इच्छा होती व त्याला स्कॉटिश सरदारांनीं मान्यताही दिली होती. पण ती मुलगी लवकरच मेली. त्यामुळें राज्यावर वारसा सांगणारे अनेक निघाले. त्यांतल्या त्यांत रॉबर्ट ब्रूस व जॉन बेलियल यांचा अत्यंत निकटचा वारसा होता. वारशाचा प्रश्न सोडविण्याची कामगिरी स्कॉटलंडच्या पार्लमेंटनें एडवर्डकडे सोंपविली. तेव्हां एडवर्डनें ‘आपलें मांडलिकत्व कबूल असेल तर तसें करतों ’ असें सांगितलें. जॉन बेलियलनें तशी कबुली दिली. तेव्हां एडवर्डनें त्याला स्कॉटलंडच्या गादीवर बसविलें. परंतु हा परावलंबीपणा बेलियलला त्रासदायक वाटूं लागला. याच वेळीं एडवर्डनें फ्रान्सशीं युद्ध पुकारलें होतें. ही संधि साधून बेलियलनें फ्रान्सचा राजा फिलिप याच्याशीं संगनमत करून स्कॉटलंडांत बंड उभारलें. अशा स्थितींत एडवर्डनें आपला भाऊ एडमंड याला फ्रान्सकडे ससैन्य पाठवून दिलें व तो स्वतः स्कॉटलंडवर चालून गेला. तेथें त्यानें बेरिक, डनबार, एडिंबरो वगैरे शहरें काबीज करून बेलियलला कैद केलें व त्याला लंडनला पाठवून दिलें (सन १२९६). स्कॉटलंडचा कारभार एका मंडळाकडे सोंपवून सरे नांवाच्या एका सरदाराला त्यानें मुख्य नेमलें. याच वेळीं स्कॉटिश राजाच्या राज्याभिषेकाच्या वेळीं वापरण्यांत येणारा दगड त्यानें इंग्लंडांत आणला.

वरीलप्रमाणें स्कॉटलंडांत स्थीरस्थावर करून एडवर्ड मोठ्या तयारीनें फ्रान्सवर चाल करणार होता; पण फिलिपच्या मार्गारेट नांवाच्या बहिणीशीं लग्न करून त्यानें फ्रान्सशीं सख्य जोडलें. याच सुमारास स्कॉटिश लोकांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विल्यम वॉलेस नांवाच्या एका शूर वीराच्या नेतृत्वाखालीं बंड पुकारलें. स्टर्लिंगच्या लढाईंत त्यानें सरेचा पराभव करून त्याला पळवून लाविलें. लगेच स्कॉटिश लोकांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें (१२९७). यामुळें



चिडून जाऊन एडवर्डनें मोठ्या सैन्यानिशीं स्कॉटलंडवर स्वारी केली. फॉलकर्क येथें वॉलेसचा पराभव करून स्कॉटलंडमध्यें त्यानें तात्पुरती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शांतता निर्माण केली. पुढें वीर वॉलेस रानावनांत भटकत असतांच फितुरीनें एडवर्डच्या हातीं लागला. एडवर्डनें त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप केला. तेव्हां या बाणेदार पुरुषानें एडवर्डला बजावलें, "मी तुझा कधींही प्रजाजन नसल्यानें मी राजद्रोही ठरतच नाहीं." एडवर्डनें त्याला सन १३०५ मध्यें फांशीं दिलें व त्याच्या शरीराचे बरोबर चार तुकडे करून ते न्यूकासल, बेरिक, स्टर्लिंग व पर्थ या गांवांच्या वेशींवर स्कॉटिश लोकांना दहशत बसण्याकरितां टांगून ठेवले! परंतु यामुळें स्कॉटिश लोकांचें रक्त जास्तच उसळलें व त्यांनीं आपल्याला स्वातंत्र्ययुद्धाला वाहून घेतलें.

४. नवे कायदे :—एडवर्ड मोठा कायदेपंडित असल्यानें त्यानें अनेक उत्तमोत्तम कायदे पास करून व जुने सुधारून चांगलीच कीर्ति मिळविली. सन १२७९ मध्यें त्यानें मॉर्टमेनचा कायदा पास करून राजाच्या संमतीशिवाय कोणाही धर्मगुरूनें जमीन विकत घेऊं नये व विकूं नये असें ठरविलें. धार्मिक संस्था व धर्ममठ यांना जमिनी दिल्या तर त्यावर राजाला कर लादतां येत नसत व त्यामुळें राजाचें उत्पन्न बुडे. ही गोष्ट लक्षांत घेऊनच एडवर्डनें वरील कायदा केला होता. सन १२७८ मध्यें त्यानें एक जाहिरनामा काढून ज्याचें वार्षिक उत्पन्न वीस पौंड असेल त्यानें शिलेदारी पत्करली पाहिजे असें ठरविलें. या जाहिरनाम्यामुळें राजाला उत्तम सैन्य बनवितां येणें शक्य झालें. विंचेस्टरचा कायदा सन १२८५ सालीं पास करून त्यानें खालील गोष्टी ठरविल्या. खेड्यांतून राहणारे लोक चोऱ्यांबद्दल जबाबदार धरले जातील; शहरांचे दरवाजे सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत बंद करण्यांत यावेत; व त्यावेळीं गांवच्या वेशींवर सहा ते बारा लोकांनीं पहारा करावा; पंधरा ते साठ वर्षांच्या प्रत्येक माणसानें आपल्याजवळ ढाल-तरवार बाळगली पाहिजे. या सर्व गोष्टींमुळेंही देशांत स्वास्थ्य व व्यवस्था नांदण्यास व चोरीमारी बंद होण्यास मदत झाली. तसेंच त्याचें लष्करही सुधारलें.

५. न्यायाची व्यवस्था :—याप्रमाणें अनेक कायदे पास करून त्यानें चांगली कामगिरी बजावली. न्यायदानाची उत्तम व्यवस्था लावण्याच्या हेतूनें त्यानें अनेक कायदे केले. मध्यवर्ती न्यायकचेरीचे त्यानें तीन विभाग केले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारी खटले व ज्यांचा राजाशीं संबंध असेल असे खटले 'किंग्ज बेंच' या न्यायकचेरींत, सरकारी वसुलासंबंधींचे खटले 'एक्स्चेकर' कोर्टानें व सार्वजनिक खटले 'कॉमनप्लीज' कोर्टानें चालवावे असें ठरविण्यांत आलें. यांपैकीं पहिली न्यायकचेरी राजाबरोबर फिरती असावी व बाकीचीं कोर्टें



१३ व्या शतकांतील जहाज

लंडनला कायम राहावीं असें त्यानें ठरविलें. खेडेगांवच्या खटल्यांची सुनावणी करण्याकरितां देशमुखांचीं कोर्टें ऊर्फ मॅनॉरकोर्टें असत. त्यांना मदत करण्याकरितां त्यानें अगदीं प्रथमच 'शांतता रक्षक न्यायाधीश' नेमले.; खेड्यांतून होणाऱ्या लहानसहान गुन्ह्यांची चौकशी करण्याचें काम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्याकडे सोंपविण्यांत आलें होतें. सन १२९० मध्यें हुकूम काढून त्यानें इंग्लंडमधील सर्व ज्यू लोकांची हकालपट्टी केली. हे ज्यू लोक प्रथमतः नॉर्मन लोकांच्या वेळीं इंग्लंडांत आले होते. धर्माज्ञेप्रमाणें खिश्चनांना व्याजबट्टा करतां येत नसे. यामुळें तो व्यवहार ज्यूंनीं स्वीकारला; पण जबर व्याजापायीं गांजलेले सर्व लोक त्यांचा द्वेष करीत. नाणीं कातरूनही ते पैसा मिळवीत. राजाला त्यांच्याकडून कराच्या रूपानें पुष्कळ पैसा मिळे. म्हणून त्यानें प्रथमतः त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें. पण पुढें लोकक्षोभास्तव त्यांची हकालपट्टी करणें एडवर्डला भाग पडलें.

६. फ्रान्सशीं सलोखा :—अनेक प्रकारच्या सुधारणा चालू असतांच एडवर्डचें फ्रान्सशीं युद्ध सुरू होतें. सन १२९३ मध्यें एक नॉर्मन गृहस्थ इंग्रजाशीं भांडत असतां प्राणास मुकला. त्याचें उट्टें काढण्याकरितां कांहीं नॉर्मनांनीं कांहीं इंग्लिश खलाशांस पकडून एका इंग्रजाला आपल्या डोल-काठीस बांधलें, व त्याच्या पायाशीं एक कुत्रें आवळून टाकलें! यामुळें इंग्लिश लोक चिडले व नॉर्मन व इंग्लिश यांच्यामध्यें अनेक वेळां चकमकी होऊं लागल्या. एके वेळीं तर सुमारें २०० फ्रेंच जहाजें इंग्रजांनीं बुडविलीं. यामुळें फ्रान्सचा राजा फिलिप संतापला. इंग्लंडचा राजा फ्रान्समधील गिनी प्रांताचा सरदार असल्यानें तो फ्रान्सच्या राजाचा सरंजामी सरदार समजला जाई. यामुळें फिलिपनें एडवर्डला जाब देण्याकरितां पॅरिसला बोलाविलें. एडवर्ड स्वतः गेला नाहीं; परंतु आपल्या भावाला–एडमंडला–त्यानें तिकडे पाठविलें. फ्रेंचांनीं त्याला भुलवून त्याच्याकडून गिनी प्रांत घेतला. ही गोष्ट कळल्यावर एडवर्डनें तो प्रांत परत मागितला असतां फिलि-पनें तो प्रांत जप्त केल्याचें त्याला कळविलें. तेव्हां एडवर्डनें इंग्लंडमध्यें येणाऱ्या फ्रेंच लोकरीवर जकात बसविली. परंतु त्यामुळें फ्रेंच लोकर इंग्लं-डांत येईनाशी होऊन इंग्लिश लोकांचे हाल होऊं लागले. या नंतर फ्रान्स-वर स्वारी करण्याच्या हेतूनें एडवर्डनें तयारी केली. परंतु एडवर्डनें फ्रान्सच्या राजाच्या बहिणीशीं–मार्गारेटशीं–लग्न करून फ्रान्सबरोबर मैत्री केली (१२९९). फिलिपनेंही पुढें त्याचा गिनी प्रांत त्याला परत दिला (१३०३).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. पार्लमेंटची स्थापना-पहिलें नमुनेदार पार्लमेंट (सन १२९५):—एडवर्डनें अनेक युद्धें केलीं. त्यामुळें त्याला पैशाची नेहमीं जरूरी भासूं लागली. त्याचप्रमाणें आपल्या शत्रूंशीं लढावयाचें झाल्यास आपल्याला राष्ट्राचा पाठिंबा मिळाला पाहिजे असें त्यास नेहमीं वाटे. कर बसवावे तर प्रजा चिडणार हें तो ओळखून होता. तेव्हां नवीन करांना राष्ट्राची संमति मिळविण्याकरितां त्यानें पार्लमेंट सभा बोलावण्याचें ठरवून निरनिराळ्या लोकांस त्यानें बोलावणें पाठविलें. या पार्लमेंटमध्यें इंग्लंडमधील बहुतेक सर्व वर्गांचे प्रतिनिधी बोलावण्यांत आले होते; व म्हणूनच या पार्लमेंटला 'नमुनेदार पार्लमेंट' म्हणण्याचा प्रघात पडला आहे. सर्व मोठमोठ्या उमरावांना व बिशपांना राजाचें खास बोलावणें असून प्रत्येक कॅथीड्रलतर्फे एक व डायोसिसतर्फे दोन प्रतिनिधी बोलावण्यांत आले होते. त्याशिवाय प्रत्येक परगण्यातर्फे दोन शिलेदार व प्रत्येक शहरातर्फे दोन प्रतिनिधी बोलावण्यांत आले. सन १२६५ मध्यें मॉंटफर्डनें अशा तऱ्हेची पार्लमेंट सभा बोलावण्याची प्रथा पाडली होती. पण त्यांत सर्वांचा समावेश नव्हता; त्यामुळें त्याच्या पार्लमेंटला थोडें गौणत्व प्राप्त झालें होतें. तें एडवर्डनें नाहींसें केलें. या पार्लमेंटमध्यें धर्मगुरू, उमराव व मध्यमवर्गीय लोक एकाच सभेंत बसत असत हा विशेष होय. या नमुनेदार पार्लमेंटनें एडवर्डला पाहिजे असलेले कर पास केले.

८. स्वातंत्र्य सनदेस पुन्हां मान्यता:—पार्लमेंटच्या मदतीनें त्यानें कर पास करून घेतले तरी त्याला युद्धाकरितां पुरेसा पैसा मिळाला नाहीं. त्यांतच धर्मगुरूंशीं त्याचा झगडा सुरू झाला. पैशाकरितां योग्यायोग्य विचार न करतां तो सर्वांकडून पैसे उकळूं लागला; तेव्हां धर्मगुरू चिडले व धर्मपीठाचें स्वातंत्र्य राखण्याकरितां व युद्धें थांबावींत म्हणून त्यांनीं एडवर्डला कोणाही धर्मगुरूनें व पाद्र्यानें पोपच्या परवानगीशिवाय कर देऊं नयेत असें ठरविलें. याला उत्तर म्हणून एडवर्डनें कोणाही धर्मगुरूचा खटला न्यायकचेरींत चालूं नये असें जाहीर केलें. यामुळें सर्व धर्मगुरू ताळ्यावर आले व त्यांनीं राजाला कर दिले. पण आर्चबिशप विंचले यानें एकही पैसा देण्याचें नाकारलें. एवढेंच नव्हे, तर ज्यांनीं राजाला पैसे दिले होते त्यांना त्यानें धर्मबहिष्कृत केलें. तेव्हां राजानें धर्मपीठाची मालमत्ता जप्त केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तरीही धर्मगुरू वठणीवर येईनात. याच सुमारास सरदार चवताळले होते. राजाची वाढती सत्ता व मॅग्नाकार्टाबद्दलची त्याची बेफिकीरी लक्षांत घेऊन सर्व सरदार एक झाले व परकीय देशांत राजाबरोबर युद्धाला जाण्याचें त्यांनीं नाकारलें. पैसा मिळेना व धर्मगुरू व सरदार आपल्याविरुद्ध गेलेले पाहून एडवर्ड हताश झाला नाहीं. त्यानें मध्यम वर्गाला व व्यापारी वर्गाला हाताशीं धरण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांच्याकडून बळजबरीनें त्यानें पैसे उकळलेले असल्यानें तेही असंतुष्टच होते. अशा तऱ्हेनें सर्व पक्षांतील व सर्व वर्गांतील लोक एडवर्डला विरोध करूं लागले; व उमरावांनीं लंडनवर चाल करून मॅग्नाकार्टाला मान्यता मिळविण्याबद्दल एडवर्डकडे तगादा लाविला. शेवटीं एडवर्डनें त्यांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याचें कबूल करून मॅग्नाकार्टालाही आपली संमति दिली (१२९७).

९. **स्कॉटलंडांत बंड व एडवर्डची अखेर** :—इंग्लंडमध्यें अशा घडामोडी चालू असतांच स्कॉटिश लोकांनीं बंड केलें. त्यांचा पुढारी विल्यम वॉलेस याचा एडवर्डनें कसा समाचार घेतला होता तें मागें सांगितलेंच आहे. वॉलेसचा पराभव झाला तरीही स्कॉटलंड देश एडवर्डला पूर्णपणें काबीज करतां आला नव्हता. रॉबर्ट ब्रूस स्कॉटलंडचा पुढारी झाला. हा रॉबर्ट जॉन बेलियलचा प्रतिस्पर्धी रॉबर्ट ब्रूस याचा नातू होय. तो एडवर्डच्या सैन्यांत होता. स्कॉटलंडचा स्वातंत्र्यवीर वॉलेस याला फांशीं दिलेलें पाहून त्याचें स्कॉटिश रक्त उसळलें व तो स्कॉटिश बंडवाल्यांचा पुढारी झाला. सन १३०६ मध्यें रॉबर्ट ब्रूसनें स्कॉटलंडचा राजा म्हणून स्वतःला राज्याभिषेकही करून घेतला. हें समजतांच एडवर्ड मोठ्या त्वरेनें स्कॉटलंडवर चालून गेला; व त्यानें ब्रूसचा पराभव करून त्याला रानोमाळ भटकण्यास लाविलें. अनेक स्कॉटिश सरदारांना एडवर्डनें कंठस्नान घालून स्कॉटलंड पादाक्रान्त करण्याचा निश्चय केला. परंतु आपला निश्चय पार पाडण्यापूर्वीच एडवर्ड सन १३०७ मध्यें स्कॉटलंडच्या सरहद्दीवर मेला. मोठा कर्तृत्ववान व कोणत्याही गोष्टीला पद्धति व वळण लावून देणारा एडवर्ड होता. त्याचे हेतु पूर्णपणें साध्य झाले नाहींत ही गोष्ट खरी; तरी इंग्लंडच्या राज्यकारभाराला लोकशाहीचें त्यानें जें वळण लावणें त्यामुळें इंग्रजांना तो आदर्श राजा वाटतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. पहिल्या एडवर्डचा स्वभाव वर्णा. त्यानें न्यायपद्धतींत कोणत्या सुधारणा केल्या ?

२. शहरांतून व खेड्यांतून शांतता व व्यवस्था राखण्याकरितां त्यानें काय केलें ?

३. (अ) वितन, (आ) राजाचें सल्लागारमंडळ, (इ) सायमनचें पार्लमेंट व (ई) पहिल्या एडवर्डचें नमुनेदार पार्लमेंट, या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन पार्लमेंटची वाढ कशी होत गेली तें सांगा.

४. खालील युद्धांचीं कारणें व परिणाम सांगा :—
(१) वेल्सशीं युद्ध; (२) फ्रान्सशीं युद्ध; (३) स्कॉटलंडशीं युद्ध.

५. स्वातंत्र्याच्या सनदेचा पुनरुच्चार करण्याची एडवर्डला कां जरूरी भासली ?

६. खालील व्यक्तींसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—
विंचले, विल्यम वॉलेस, जॉन बेलियल, फिलिप, रॉबर्ट ब्रूस, लिवेलिन, ' वेल्सचा राजपुत्र. '

७. स्कॉटलंडचा व इंग्लंडचा नकाशा काढून त्यांत खालील ठिकाणें भरा :—
न्यूकासल, एडिंबरो, फॉलकर्क, स्टर्लिंग, कॉरनॅर्व्हन, पर्थ, बेरिक, डनबार.

८. पुढील कालादर्श पूर्ण करा. तुम्हांस वाटल्यास महत्त्वाच्या आणखी गोष्टी घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लंड–महत्त्वाच्या गोष्टी	वर्ष	हिंदुस्थान–महत्त्वाच्या गोष्टी
	१२८४	
	१२८६	
	१२९५	
	१२९६	
	१२९७	
	१२९९	
	१३०५	
	१३०६	
	१३०७	

उतारे

१. पार्लमेंटचें बोलावणें–१२९५

नॉरदॅप्टनच्या शेरीफास–देशावर दिवसेंदिवस संकटें कोसळत आहेत. तीं दूर कशीं करतां येतील याचा विचार करण्याकरितां ज्याअर्थी आम्ही देशांतील अर्ल, सरदार-दरकदार व प्रमुख लोक यांना सेंट मार्टिनच्या महोत्सवानंतर वेस्टमिन्स्टरमध्यें भरणाऱ्या सभेस बोलाविलें आहे व ज्याअर्थी त्या सभेंत उपरिनिर्दिष्ट संकटांविरुद्ध उपाययोजना करून त्यांची अंमलबजावणी कशी करतां येईल याचा विचार करण्यास सांगितलें आहे, त्याअर्थी तुम्ही आपल्या परगण्यातर्फे दोन शिलेदार, परगण्यांतील प्रत्येक शहरातर्फे दोन नागरिक व प्रत्येक नगरातर्फे दोन लायक व हुषार रहिवाशी वर सांगितलेल्या वेळीं व जागीं, निवडणूक करून, पाठवावे. कोणताही विलंब या कामीं करूं नये. उपरिनिर्दिष्ट कामाचा निकाल लावण्यास विलंब लागूं नये म्हणून वरील सभेंत सर्वांच्या विचारानें जी योजना ठरेल तिची अंमलबजावणी करण्याचा पूर्ण अधिकार वर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निर्दिष्ट केलेल्या सर्वांस आहे. ही निमंत्रण-पत्रिका व सर्व प्रतिनिधींचीं नांवें दफ्तरीं दाखल ठेवावीं.

प्रश्न :—१. वरील बोलावणें कोणीं व केव्हां केलें? त्याचा उद्देश काय?

२. राजानें कोणाकोणास बोलाविलें होतें व त्यांचा अधिकार काय?

३. कोणत्या शेरीफाकडे ही पत्रिका पाठविली होती? त्याच्याकडे कां?

२. एलिनॉरची पतिनिष्ठा—१२७२.

धर्मयुद्धास जातेवेळीं एडवर्डनें आपल्या बायकोलाही पॅलेस्टाईन प्रांतांत नेलें होतें. तिचें नांव एलिनॉर; तिची आपल्या पतीवर फारच भक्ति होती. सैन्य नाहीं, पैसा नाहीं, अशा स्थितींत एडवर्ड असतां तेथील सुलतानानें एडवर्डचा नाश करण्याचा घाट घातला. आपण ख्रिस्ती होण्यास तयार आहों असें भासवून त्यानें एडवर्डकडे एकामागून एक असे दूत त्याला भेटण्याकरितां पाठविण्यास सुरवात केली. त्यामुळें त्यांच्यावर सर्वांचा विश्वास बसला व त्यांना कोणीही मज्जाव करीना. संधी साधून एके दिवशीं एक दूत एडवर्डच्या तंबूंत शिरला. आजारी असल्यामुळें एडवर्ड निजला होता; परंतु त्या दूताकडे त्याचें चांगलें लक्ष होतें. एडवर्डला प्रणाम करण्याचें सोंग करून दूत खालीं वाकला व त्यानें एका खंजीरानें एडवर्डवर हल्ला केला. ताबडतोब एडवर्डनें त्याचें मानगूट पकडून त्याला यमसदनीं पाठविलें. परंतु त्या चकमकींत त्या खंजीरानें एडवर्डला दुखापत झाली व त्याच्या अंगांतून रक्त वाहूं लागलें. तो खंजीर विषारी होता; व त्यामुळें एडवर्डच्या जीवास धोका आहे हें समजून त्याच्या बायकोनें—एलिनॉरनें—स्वप्राणांची पर्वा न करतां त्याच्या जखमेंतून येणारें विषारी रक्त चोखलें व आपल्या पतीचा जीव वाचविला. सुदैवानें तीही बचावली. या गोष्टीवरून एलिनॉरबद्दल तुम्हांस काय वाटतें? काय म्हणून?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४. दुसरा एडवर्ड (इ. स. १३०७–१३२७)

१. दुसरा एडवर्ड :—पहिल्या एडवर्डनंतर त्याचा मुलगा एडवर्ड इंग्लंडचा राजा झाला. वयानें त्या वेळीं तो तेवीस वर्षांचा असून मोठा देखणा व गुणसंपन्न होता. त्याला मर्दानी खेळांची व शिकारीची आवड असून निरनिराळ्या कलांचा तो शोकीन होता. परंतु उधळ्या, हट्टी, दुर्बल व थोडासा मूर्ख असल्यानें त्याचा कारभार अत्यंत वाईट झाला. राज्यकारभाराचें ज्ञान नसल्यानें व माणसाची त्याला पारख नसल्यानें त्याजवर अनेक आपत्ति ओढवल्या. त्याचें भाषण सभ्य व शहाणपणाचें असे; परंतु त्याला विलासांची आवड असल्यानें व मूर्ख लोकांच्या नादीं लागल्यानें त्याचें अत्यंत नुकसान झालें. पियर्स गॅव्हस्टन नांवाच्या एका रंगेल, खुषमस्कऱ्या, विलासी व ऐषारामी सरदाराच्या ठिकाणीं त्याचें मन अत्यंत रमून गेलें होतें.

दुसरा एडवर्ड

२. पियर्स गॅव्हस्टन :—पियर्स गॅव्हस्टन हा अत्यंत दुर्व्यसनी व पाजी मनुष्य होता. त्याच्या प्रत्येक कृतींत त्याची हलकट मनोवृत्ति निदर्शनास येत असे. 'दुर्वर्तनी, नादान व दुर्गुणी असल्यानें राजपुत्राच्या संगतीस नालायक' असा शिक्का मारून पहिल्या एडवर्डनें त्याला हद्दपार केलें होतें; परंतु राज्यपद मिळाल्याबरोबर दुसऱ्या एडवर्डनें या आपल्या परम मित्राला बोलावून आणलें, त्याचें आपल्या पुतणीशीं लग्न करून दिलें व त्याला आपला मुख्य कारभारी नेमलें! यामुळें इंग्लिश सरदार चिडले, संतापले. पिढीजाद सरदारवर्गांत नवीनच सामील झालेला हा उपटसुंभ सरदार आपल्या वर्गीयांशीं अत्यंत उर्मटपणें वागूं लागला व त्यानें अनेक प्रकारें त्यांची कुचेष्टा केली! यामुळें सरदार वर्गांत त्यानें स्वतःच्या मूर्ख वर्तनानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक शत्रु निर्माण केले. 'गॅव्हस्टनला हद्दपार करा,' असा राजामागें त्यांनीं लकडा लावला. त्या बाबतींत राजा टोलवाटोलवी करतो असें पाहून पार्लमेंटनें त्याला हद्दपार केलें. परंतु थोड्याच दिवसांत तो पुन्हां इंग्लंडांत आला. तेव्हां त्याच्यावर पाळत ठेवून सरदारांनीं सन १३१२ मध्यें ब्लॅकलो टेकडीवर त्याला गांठून ठार केलें! सरदारांच्या या कृत्यानें राजा एडवर्ड फार रागावला; पण त्याला फारसें कांहीं करतां आलें नाहीं.

३. स्कॉटलंडचें स्वातंत्र्ययुद्ध :—दुसरा एडवर्ड गादीवर आला त्या वेळीं स्कॉटलंडशीं युद्ध चालूच होतें. स्कॉटलंडचा राजा रॉबर्ट ब्रूस किल्ल्या-मागून किल्ले सर करीत होता; व अशारीतीनें बहुतेक सर्व स्कॉटलंड देश त्यानें जिंकून घेतला होता. एका स्टर्लिंग किल्ल्याखेरीज कोणताही भाग जिंका-वयाचा राहिलेला नव्हता. तेव्हां एडवर्ड जागा झाला व आपल्याबरोबर एक लाख सैन्य घेऊन तो ब्रूसशीं लढाई देण्याकरितां निघाला. स्टर्लि-गच्या पायथ्याजवळ बॅनॉकबर्न येथें मोठी घनघोर लढाई झाली. स्कॉटिश लोकांनीं शौर्याची शर्थ करून इंग्लिशांचा पराभव केला (१३१४). आपल्या घोडदळावर इंग्लिशांचा फार विश्वास होता. याच्या उलट स्कॉटिश सैनिकांची आपल्या पायदळावर व त्यांच्या हातांत असलेल्या भाले, बरच्या तरवारी वगैरे हत्यारांवर भिस्त होती. आपल्या दळासमोरच मोठमोठे खंदक खणून ठेवून व त्यावर पाचोळा अंथरून ते आपल्या शत्रूची वाट पहात बसले. पुष्कळसें इंग्लिश सैन्य त्यांच्यावर चाल करून येत असतां या खंदकांत पडून ठार झालें. एडवर्डही रणभूमि सोडून पळूं लागला! ब्रूसला मोठा विजय मिळून स्कॉटलंडचें स्वातंत्र्य रक्षिलें गेलें. यामुळें बॅनॉकबर्नची लढाई क्रांतिकारक ठरली.

४. सरदारांशीं भांडण :—बॅनॉकबर्नच्या लढाईत इंग्रजांचा पराभव झाल्यानें एडवर्डची नाचक्की झाली. अगोदरच गॅव्हस्टनसारख्या नादान माणसाच्या नादीं लागल्यानें सर्व सरदार बिथरले होतेच. त्या वेळीं लॅंकॅ-स्टरचा ड्यूक, टॉमस, यानें सरदारांचें नेतृत्व स्वीकारून राज्यकारभारांतील अंदाधुंदी नाहींशी करण्याकरितां एक सल्लागारमंडळ नेमलें होतें. गॅव्ह-स्टनला विरोध करून त्याचा शिरच्छेद करण्यांतही यानेंच पुढाकार घेतलेला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता. स्कॉटिश लोकांनीं पराभव केला तरीही एडवर्डचे डोळे उघडले नव्हतेच ! त्याचा अव्यवस्थित कारभार चालूच होता. तशांतच सन १३१४-१५ मध्यें इंग्लंडांत भयंकर दुष्काळ पडला व लोकांचे अतोनात हाल झाले. त्या वेळीं दंगेधोपे सुरू झाले; चोऱ्या–दरोडे जाळपोळ यांना ऊत आला ! अशा स्थितींतही एडवर्डनें राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करून नवीन दोस्तांच्या हातीं त्यानें राज्यकारभार दिला. यामुळें लँकॅस्टरच्या ड्यूकचा पक्ष बराच प्रबळ होण्यास मदत झाली. त्या वेळचा राजाचा दोस्त व सल्लागार ह्यूज डिस्पेन्सर व त्याचा मुलगा हे दोघे अत्यंत बदसल्लागार होते. त्यांनीं अनेक सरदारांचा अपमान करून त्यांना आपले शत्रू करून ठेविले होते. यामुळेंही सरदार संतापले होते. शेवटीं लँकॅस्टरचा ड्यूक व मॉर्टिमर यांच्या नेतृत्वाखालीं उत्तर इंग्लंडमधील सर्व सरदार एकत्र झाले. मध्यमवर्गीयांनींही त्यांना आपलें साहाय्य दिलें व धर्मगुरूही त्यांच्या बाजूला झुकले. अशा तऱ्हेनें लँकॅस्टरच्या ड्यूकची बाजू बरीच जड झाली होती. पितापुत्र डिस्पेन्सर यांचें व त्याचें कधींच जमलें नाहीं. शेवटीं दोन्ही पक्ष हातघाईवर आले. बरोब्रिज येथें मोठी लढाई झाली. परंतु त्यांत लँकॅस्टरपक्षाचा पराभव होऊन मॉर्टिमरला व टॉमसला कैद करण्यांत येऊन राजानें टॉमसला फांशीं दिलें (१३२२) व मॉर्टिमरला कैदेंत टाकलें. लँकॅस्टरच्या ड्यूकला फांशीं दिल्यावर यॉर्क येथें पार्लमेंटची सभा भरविण्यांत आली. या पार्लमेंटमध्यें एक अत्यंत महत्त्वाची घटना ठरली. आजपर्यंत पार्लमेंटमध्यें उमरावांचाच पक्ष प्रबळ ठरे, व प्रत्येक गोष्टींत त्यांचाच सल्ला राजाकडून विचारला जाई. त्यामुळें मध्यमवर्ग मागें पडत असे. ही गोष्ट लक्षांत घेऊन एडवर्डनें पार्लमेंटमध्यें एका नवीन तत्त्वाची घोषणा केली व सर्वांस कळविलें कीं, ‘ ज्या गोष्टींचा सर्व राष्ट्रांशीं संबंध येतो त्यांची चर्चा सर्व घटकांकडून झाली पाहिजे.’ राजाच्या या घोषणेमुळें मध्यमवर्गीयांचीही कायदे करण्याच्या कामीं सम्मति पाहिजे असें ठरून गेलें.

५. **कट, बंडाळी** व **पदच्युति** :—सन १३२५ मध्यें इंग्लंडच्या ताब्यांतील फ्रान्समधील गिनी प्रांताबद्दल तंटा उत्पन्न झाला होता. तो मिटविण्याकरितां एडवर्डनें आपल्या राणीला–इसाबेलाला–फ्रान्समध्यें पाठविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इसाबेलाचें आपल्या नवऱ्याशीं पटत नव्हतें; व शिवाय डिस्पेन्सर पिता-पुत्रांचा कारभार तिला आवडत नसे. त्यावरूनही नवरा–बायकोंत नेहमीं भांडणें होत असत. त्या वेळीं इसाबेलाचा भाऊ चार्ल्स फ्रान्सचा राजा होता. तो आपल्या बहिणीचें ऐकेल व तिची शिष्टाई फायद्याची होईल असा एडवर्डचा बेत होता. परंतु मनांतून त्याला इसाबेलाचा कांटा दूर करावयाचा होता. अशा स्थितींत आपला मुलगा एडवर्ड याला बरोबर घेऊन राणी फ्रान्सला गेली. त्या वेळीं फ्रान्सच्या राजाशीं तडजोड होऊन गिनी प्रांत राणीनें आपल्या मुलाच्या नांवें करूनही घेतला. याच वेळीं कैदेंतून पळून आलेला मॉर्टिमर राणीला भेटला. त्याच्याबरोबर लँकॅस्टरच्या पक्षांतील अनेक सरदारही होते. या सर्वांनीं एडवर्डविरुद्ध कट केला. बरोबर मोठें सैन्य घेऊन ही मंडळी इंग्लंडांत आली. त्या वेळीं राणीचे अनेक मित्र व लँकॅस्टरपक्षांतील सरदार कटवाल्यांना मिळाले. ही हकीकत कळल्यावर एडवर्ड भ्याला व तो वेल्समध्यें पळून गेला. तेव्हां त्याला पदच्युत करण्याचें कटवाल्यांनीं ठरविलें. याच वेळीं पितापुत्र डिस्पेन्सर व राजाही बंडवाल्यांचे हातीं लागला. मॉर्टिमरनें पितापुत्र डिस्पेन्सरांना ताबडतोब फांशीं दिलें व केनिलवर्थच्या किल्ल्यांत राजाला कैदेंत ठेवण्यांत आलें. इकडे राणीनें राजाचे नांवानें पार्लमेंट बोलाविलें व या पार्लमेंटनें राजाला राज्यावरून काढून टाकून त्याच्या मुलाला राज्याभिषेक करावा असा हट्ट धरला ! तो मान्य करण्यांत आला. यानंतर बर्क्लेच्या किल्ल्यांत राजाची रवानगी करण्यांत आली होती. तेथेंच त्याचा सन १३२७ मध्यें राणीच्या हुकुमावरून अत्यंत दुष्ट रीतीनें वध करण्यांत आला !

अभ्यास

१. स्कॉटिश लोकांनीं आपलें स्वातंत्र्य कसें मिळविलें तें थोडक्यांत सांगा.

२. दुसऱ्या एडवर्डचे बदसल्लागार कोण? त्यांच्यासंबंधीं थोडक्यांत हकीकत सांगा.

३. दुसऱ्या एडवर्डचा स्वभाव सांगून त्याच्या पदच्युतीला तो कितपत कारणीभूत झाला हें सांगा. त्याच्या पदच्युतीस राणी कितपत कारणीभूत झाली?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. राजाचें व सरदारांचें भांडण होण्याचें कारण काय ? त्याचा परिणाम काय झाला ?

५. खालील व्यक्तींसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—
रॉबर्ट ब्रूस, पितापुत्र डिस्पेन्सर, लँकॅस्टरचा ड्यूक, मॉर्टिमर, गॅव्हस्टन.

कालादर्श—इ. स. १२१५–१३२७.

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	प्रमुख व्यक्ति	हिंदुस्थान–महत्त्वाच्या गोष्टी
१२१५	मॅग्नाकार्टास जॉनची मान्यता	स्टीफन लँग्टन	१२१०–३६ सुलतान अल्तमश.
१२१६–७२	**तिसरा हेन्री.**		
१२५४	ऑक्सफर्डची सभा.	मॉंटफर्ड	१२४५–६६ नासिरुद्दिन.
१२६५	सायमन मॉंटफर्डचें पहिलें पार्लमेंट	चंगेजखान	११६२–१२२७ चंगेजखान.
१२७२–१३०७	**पहिला एडवर्ड**		१२७० नामदेव जन्म.
१२८४	वेल्स प्रांत काबीज.	ज्ञानेश्वर–नामदेव.	१२७५ ज्ञानेश्वर जन्म.
१२९५	नमुनेदार पार्लमेंट	रामदेवराव जाधव,	१२९५ अलाउद्दीनाची देवगिरीवर स्वारी.
१२९६	डनबारची लढाई	वॉलेस, अलाउद्दीन.	१२९६–१३१६ अलाउद्दीन खिलजी.
१३०५	वॉलेसचा वध.	पद्मिनी–	१३०३–०४ अलाउद्दीनाची चितोडवर स्वारी.
१३०७–१३२७–	**दुसरा एडवर्ड.**		
१३१४	बॅनॉकबर्नची लढाई.	रॉबर्ट ब्रूस–दुसरा	
१३२७	दुसऱ्या एडवर्डचा वध.	एडवर्ड	१३२१–२६ गियासुद्दीन तुघलक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१५. शतसांवत्सरिक युद्धास प्रारंभ–तिसरा एडवर्ड

(इ. स. १३२७–७७).

१. तिसरा एडवर्ड व पालकमंडळ :—राज्यावर आला त्या वेळीं तिसरा एडवर्ड पंधरा वर्षांचा होता. आपल्या आज्याप्रमाणें तो मोठा शूर व धैर्यवान होता. त्याला भपकेदार पोषाखाची व डामडौलाची फार आवड असे. त्याचा आत्मविश्वास फाजील असल्यानें हातीं घेतलेलीं कामें त्याच्या अंगावर आलीं. राज्यावर आला त्या वेळीं तो लहान असल्यामुळें सर्व राज्यकारभार पालकमंडळाकडे सोंपविण्यांत आला होता. त्या मंडळांत त्याची आई इसाबेला व तिचा प्रियकर रोजर मॉर्टिमर होते. त्यांच्या हातींच खरी सत्ता होती; पण त्यांनीं आपल्या सत्तेचा दुरुपयोग केला.

तिसरा एडवर्ड

२. स्कॉटलंडशीं युद्ध :—स्कॉटलंड इंग्लंडचा मांडलिक देश आहे अशी या पालकमंडळाची समजूत होती. रॉबर्ट ब्रूसला स्कॉटलंडचा राजा म्हणून इंग्लंडनें कधींही मान्य केलें नव्हतें; व त्यामुळें चिडून जाऊन ब्रूसनें दुसऱ्या एडवर्डच्या कारकीर्दीच्या शेवटीं इंग्लंडच्या उत्तर भागावर अनेक स्वाऱ्या केल्या. सन १३२७ मध्यें त्यानें असाच एक हल्ला केला असतां पालक-मंडळानें तिसऱ्या एडवर्डला ससैन्य त्याच्यावर पाठविलें. युद्धप्रसंग असा झालाच नाहीं; पण त्यामुळेंही इंग्लिश सैन्य मोठ्या जिकीरीस आलें. सन १३२८ मध्यें दोन्ही पक्षांत नॉरदॅम्प्टन येथें तह होऊन इंग्रजांनीं रॉबर्ट ब्रूसला स्कॉटलंडचा राजा म्हणून मान्य केलें. त्यामुळें स्कॉटलंडच्या स्वातं-त्र्यालाच मान्यता मिळाली. दुर्दैवानें पुढच्याच वर्षी ब्रूस मेला व त्यामुळें वारशाबद्दल स्कॉटलंडांत पुन्हां दंगल माजली. ब्रूसनंतर त्याचा सात वर्षांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलगा डेव्हिड, याला राज्याभिषेक झाला होता. पण इंग्लंडनें स्कॉटलंडचें स्वातंत्र्य मान्य केलें ही गोष्ट स्कॉटलंडमधील इंग्रज सरदारांना आवडली नाहीं. त्यांनीं स्कॉटिश लोकांचा पूर्वीचा राजा जॉन बेलियल, याच्या मुलाला–एडवर्डला–मदत देण्याचें कबूल करून त्याला डेव्हिडविरुद्ध उठविलें. प्रथमतः या बंडखोरांना जयही मिळाला. पण त्यानंतर त्यांचा पराभव झाल्यानें एडवर्ड बेलियल इंग्लंडच्या राजाच्या आश्रयार्थ गेला. तेव्हां तिसऱ्या एडवर्डनें त्याचा पक्ष स्वीकारून स्कॉटलंडवर हल्ला केला. हॅलिडन हिल येथें युद्ध होऊन स्कॉटिश लोकांचा पराभव झाला (१३३३). एडवर्ड बेलियलला राज्य मिळालें व डेव्हिड फ्रान्सच्या मदतीकरितां तिकडे पळून गेला. थोड्याच काळांत स्कॉटिश लोकांनीं बेलियलला पदच्युत करून डेव्हिड ब्रूसला राजा केलें (१३३४). यामुळें एडवर्डला राग आला व त्यानें बेलियलला पुन्हां राज्यावर बसविण्याकरितां स्कॉटलंडवर स्वारी केली. त्या वेळीं फ्रान्सच्या राजानें स्कॉटिश लोकांना इंग्रजांविरुद्ध मदत करण्याचें वचन दिलें; व त्याप्रमाणें त्यानें फ्रान्समध्यें इंग्लंडच्या ताब्यांत असलेल्या गॅस्कनी प्रांतावर हल्ला केला. यामुळें एडवर्डचें स्कॉटलंडवरील लक्ष उडून तो फ्रान्सकडे वळला. या व इतर अनेक कारणांमुळें इंग्लंड व फ्रान्स देशांत युद्ध सुरू झालें. तेंच शतसांवत्सरिक युद्ध होय.

३. शतसांवत्सरिक युद्ध-कारणें:—आपल्याविरुद्ध फ्रेंच राजानें स्कॉटिश लोकांना मदत केली याचा तिसऱ्या एडवर्डला अतिशय राग आला व फ्रान्सच्या राजाची खोडकी जिरविली पाहिजे असें त्याला वाटूं लागलें. फ्रान्सशीं युद्ध करावयास एवढेंच कारण नव्हतें. गेलीं बरींच वर्षें त्या दोन्ही देशांत एकसारखी कुरबूर सुरू होतीच. फ्लँडर्समधील लोकरीचा व्यापार इंग्लिश व्यापाऱ्यांना अतिशय फायद्याचा होत असे. हा इंग्लिश व्यापार मारण्याचा फ्रेंच राजांनीं अनेक वेळां प्रयत्न केला होता. त्यामुळें इंग्लिश व्यापारी असंतुष्ट झाले होते. ज्या ज्या वेळीं इंग्लिश व्यापारी गलबतांची फ्रेंच गलबतांशीं इंग्लिश खाडींत गांठ पडे त्या त्या वेळीं उभयतांमध्यें नेहमीं चकमकी उडत. यामुळेंही दोन्ही राष्ट्रांत चुरस लागून राहिली होती. एडवर्डनें ‘ मी इंग्लिश खाडीचा मालक आहें ’ अशी ग्वाही दिली; तिला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फ्रेंच राजानें हरकत घेतली. त्यामुळेंही एडवर्डला राग आला होता. गिनी व गॅस्कनी हे दोन प्रांत फ्रान्समध्यें असून ते इंग्लंडच्या राजाच्या मालकीचे होते. अशा गोष्टी घडत असतांच सन १३२८ मध्यें फ्रान्सचा राजा चौथा चार्ल्स मेला. त्याला पुत्रसंतान नव्हतें. फ्रान्समध्यें प्रचलित असलेल्या सॅलिक कायद्याप्रमाणें स्त्रियांना राज्याधिकार नसल्याचें माहीत असूनही आपली आई इसाबेला चौथ्या चार्ल्सची मुलगी असल्यानें तिच्यातर्फें फ्रेंच गादीवर आपला वारसा इतरांपेक्षां अधिक सरस आहे असें एडवर्डनें जाहीर केलें. त्याचा हा मुद्दा थोडासा अयोग्य असला तरी त्याला युद्धाला निमित्त पाहिजे होतें म्हणून त्यानें तो पुढें केला होता. परंतु फ्रेंच सरदारांनीं सन १३२८ मध्यें चौथ्या चार्ल्सच्या चुलत भावाला–फिलिपला–फ्रेंच गादीवर बसविलें. तेव्हां गिनी व गॅस्कनी प्रांतांचा मालक म्हणून एडवर्डला मनाविरुद्ध फिलिपचें अधिराज्य मान्य करणें भाग पडलें. याबद्दलही त्याला राग आलेला होता. अशा तऱ्हेनें कारणपरंपरा वाढत असतांच एडवर्डनें फ्रान्सवर स्वारी करण्याचें ठरविलें.

४. शतसांवत्सरिक युद्ध–सुरुवात–(सन १३३७) :—एडवर्ड अज्ञान होता तोंपर्यंत पालकमंडळाच्या हातींच सर्व कारभार होता; व त्याची आई व मॉर्टिमर हेच सर्व सत्ताधारी होते, हें मागेंच सांगितलें आहे. पण त्यांचा कारभार लोकांना अत्यंत त्रासदायक वाटला. म्हणून वयांत आल्याबरोबर सन १३३० मध्यें एडवर्डनें सर्व अधिकार आपल्या हातांत घेऊन मॉर्टिमरला फांशीं दिलें. अशा स्थितींतही फ्रान्सबरोबर होणाऱ्या युद्धाबद्दल त्याच्या मनांत विचार येत होतेच. आपल्या बेताला राष्ट्राचा पाठिंबा मिळविण्याकरितां त्यानें प्रथम पार्लमेंटसभा बोलाविली. पार्लमेंटनेंही त्याच्या बेताला संमति दिली. एवढेंच नव्हे तर सैन्य जमविण्याकरितां त्याला पैसाही पुरवला. याच सुमारास फ्रेंच राजाच्या सल्ल्यावरून फ्लँडर्सच्या राजानें फ्लँडर्समध्यें इंग्लिश लोकर येऊं देणें कायद्यानें बंद केलें. यामुळें फ्लेमिश लोकांचें नुकसान झालें. तेव्हां त्यांनीं हा कायदा उठवून फ्रान्सवर हल्ला करण्याची एडवर्डला विनंति केली. एडवर्डचीही या वेळीं बहुतेक तयारी झाली असल्यानें त्यानें सन १३३७ मध्यें फ्रान्सवर पहिला हल्ला केला. परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला यश मिळालें नाहीं. या वेळीं फ्रान्सबरोबर सुरू झालेलें हें युद्ध पुढें जवळ जवळ शंभर वर्षें चाललें म्हणून त्याला 'शतसांवत्सरिक युद्ध' असें म्हणतात. या युद्धाच्या पहिल्या आठदहा वर्षांत एडवर्डला फारसें यश मिळालें नाहीं; परंतु सन १३४६ पासून सर्व मनु पालटला. त्या सालीं एडवर्डचा मुलगा–ज्याला सर्व लोक त्याच्या अंगांत असलेल्या काळ्या चिलखतावरून 'ब्लॅक प्रिन्स' ऊर्फ 'कृष्ण राजकुमार' असें म्हणत— एडवर्ड, यानें क्रेसीच्या लढाईत अतुल पराक्रम करून जय मिळविला. या लढाईत इंग्लिश तिरंदाजांनीं व पायदळानें अतुलनीय अशी कामगिरी बजावल्यानेंच इंग्रजांना, शत्रुसैन्य तिप्पट असूनही, जय मिळाला. पुढच्याच वर्षीं त्यानें कॅलेला वेढा दिला, व तेंही शहर घेतलें. आतांपर्यंत झालेल्या युद्धानें दोन्ही बाजू थकून गेल्या. पैसा व सैन्य यांची जमवाजमव करण्याकरितां एडवर्डलाही वेळ पाहिजेच होता; म्हणून त्यानें युद्ध थांबविलें (१३४७).

५. डेव्हिड ब्रूसचा पाडाव (इ. स. १३४६):—क्रेसीची लढाई चालू असतां स्कॉटलंडचा राजा डेव्हिड ब्रूस यानें उत्तर इंग्लंडवर हल्ला चढविला. सर्व इंग्लिश सैन्य फ्रान्समध्यें असल्यानें आपल्याला खात्रीनें जय मिळेल अशी त्याची कल्पना होती. शिवाय फ्रान्सचा राजा फिलिप हा त्याचा मित्र असल्यानें या वेळीं इंग्लंडवर स्वारी केल्यास त्यालाही बरें वाटेल असें त्याला वाटलें. परंतु नेव्हिलक्रॉस येथें स्कॉटिश सैन्याचा इंग्लिशांनीं पुरा मोड केला; एवढेंच नव्हे, तर राजा ब्रूसही कैद झाला. तिसऱ्या एडवर्डनें स्कॉटलंडवर अनेक वेळां स्वाऱ्या केल्या व प्रत्येक वेळीं त्यांचा पराभव करून त्यानें स्कॉटिश लोकांची रग जिरविली. त्यामुळें तिसऱ्या एडवर्डला 'स्कॉटलंडची रग जिरविणारा राजा' असें म्हणतात.

६. युद्धाला पुन्हां सुरुवात:—सन १३४७ मध्यें फ्रान्सबरोबर तात्पुरता तह करून एडवर्डनें युद्ध थांबविलें असलें तरी इंग्लिश व फ्रेंच यांच्यामध्यें थोडी थोडी चकमक सुरू होतीच व चोरटे हल्ले व प्रतिहल्लेही चालू होतेच. तेव्हां एडवर्डनें सन १३५५ मध्यें 'कृष्णकुमारा'ला फ्रान्सवर स्वारी करण्याची आज्ञा केली. सन १३५० मध्यें फिलिप मेल्यानें त्या वेळीं त्याचा मुलगा जॉन फ्रान्सच्या राज्यावर होता. कृष्णकुमारानें ॲक्विटेन प्रांतांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिरून तो प्रांत वेचिराख करून टाकला. स्वतः एडवर्ड नॉर्मंडीमध्यें लढत होताच. त्याला मदत करण्याकरितां कृष्णकुमार उत्तरेकडे निघाला असतां स्वतः जॉन राजा त्याच्यांवर वीस हजार सैन्यानिशीं चाल करून आला. पॉइटिअर्स येथें दोन्ही सैन्यांची गांठ पडून मोठें तुंबळ युद्ध झालें. कृष्णकुमाराजवळ सात हजार सैनिक होते. तरीही न डगमगतां तो युद्धाला ठांसून उभा राहिला व त्यानें आपल्या कसलेल्या तिरंदाजांच्या मदतीनें फ्रेंचांवर मोठा जय मिळविला. सन १३५६ मध्यें झालेल्या या लढाईत कृष्णकुमारानें फ्रेंचांचा राजा व युवराज फिलिप या दोघांनाही कैद करून इंग्लंडमध्यें त्यांची रवानगी केली. यानंतर थोड्याच दिवसांत ब्रेटिनी येथें इ. स. १३६० मध्यें तह होऊन युद्ध थांबलें. या तहानें फ्रान्सच्या गादी-

EDWARD THE BLACK PRINCE
Gold Guiennois, struck at Bordeaux, 1363–1372

वरील आपला हक्क एडवर्डनें सोडून दिला. उलट गिनी, गॅस्कनी व पॉइट्यू वगैरे ॲक्विटेन प्रांतांतील जहागीर व कॅले एडवर्डच्या ताब्यांत रहावें असें फ्रेंच राजानें कबूल केलें. या तहानें इंग्लंडचें राज्य वाढलें, एडवर्डला मोठी कीर्ति मिळाली व इंग्लंडचा दरारा वाढला. याच वेळीं एडवर्डनें जॉनच्या सुटकेकरितां व स्कॉटलंडच्या राजाच्या सुटकेकरितां मोठमोठ्या खंडण्या त्या त्या लोकांकडून मागितल्या. स्कॉटिश लोकांनीं ती खंडणी भरून आपल्या राजाची सोडवणूक केली. परंतु फ्रेंच लोकांना खंडणी देतां न आल्यानें त्यांच्या राजाला मरेपर्यंत इंग्लंडमध्यें तुरुंगांत रहावें लागलें.

७. पुनश्च युद्ध :—ब्रेटिनीच्या तहानें युद्ध तात्पुरतें थांबलें तरी इंग्लिश व फ्रेंच यांच्या चकमकी होत होत्याच. कृष्णकुमाराला फ्रान्समधील इंग्लिश प्रांतांवर सुभेदार म्हणून नेमण्यांत आलें होतें. तेथें त्यानें एका स्पॅनिश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युद्धांत भाग घेतला असतां त्याला पैशाची अडचण भासूं लागली. ती दूर करण्याकरितां आपल्या प्रांतांतील लोकांवर त्यानें जबर कर बसविला. तो देण्याचें नाकारून लोकांनीं बंड केलें, व त्यांनीं फ्रान्सच्या राजाची मदत



मागितली. यामुळें इंग्लिश व फ्रेंच यांच्यांत पुन्हां युद्धाला सुरुवात झाली. तेथील हवा न मानवल्यामुळें ब्रिटिश सैन्य अगोदरच कुचकामाचें झालें होतें. खुद्द कृष्णकुमारही व्याधींनीं जर्जर झाल्यामुळें चिडखोर बनला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा स्थितींत फ्रेंचांनीं इंग्लिशांशीं एकदम समोरासमोर लढाई न देतां त्यांस अनेक हुलकावण्या देऊन दमवून टाकलें. त्यांतच सन १३७० मध्यें कृष्णकुमारानें लिमोजेस ठिकाण जिंकून घेऊन तेथील पुरुष, बायका व मुलें यांची सर्रास कत्तल करून आपल्या नांवास बट्टा लावून घेतला! त्यामुळें सर्व लोक खवळून गेले. पुढच्याच वर्षी आजारी पडून तो इंग्लंडांत परत आला व सन १३७६ मध्यें मरण पावला. मध्यंतरीच्या काळांत फ्रेंचांनीं इंग्रजांचा सर्वत्र पराभव करून एडवर्डनें ब्रेटिनीच्या तहानें फ्रान्सकडून मिळविलेले सर्व प्रांत त्यांनीं परत मिळविले; फक्त कॅले, बोलोन व बोर्डो हीं तीन फ्रेंच बंदरें इंग्रजांकडे राहिलीं.

८. पार्लमेंटच्या सत्तेंत वाढ:—फ्रान्सबरोबर चालू असलेलें युद्ध लांबल्यामुळें एडवर्डला एकसारखा पैसा लागे. त्यामुळें प्रत्येक वेळीं त्याला पैशाकरितां पार्लमेंटची मनधरणी करावी लागे. आपले अधिकारी पैसा गोळा करतात पण तो खातात असा एकदां संशय आल्यानें सन १३४० मध्यें त्यानें आपला मुख्य प्रधान रॉबर्ट स्टॅटफर्ड याला कामावरून दूर केलें. तसेंच कँटरबरीचा आर्चबिशप जॉन स्टॅटफर्ड याजवर पैसे खाल्ल्याचा आरोप ठेवून त्यानें त्याला साध्या कोर्टात खेचलें. परंतु तो सरदार असल्यानें त्या कोर्टात हजर राहण्याचें त्यानें नाकारलें. सरदाराची चौकशी त्याच्या दर्जाच्या सरदारानेंच केली पाहिजे असा इतर सरदारांनीं हट्ट धरून त्यांनीं स्टॅटफर्डला उचलून धरलें. त्यामुळें मोठ्या पेचांत पडल्यानें एडवर्डनें गय खाल्ली व सरदारांचा तो हक्क मान्य केला; एवढेंच नव्हे तर, राज्याचा हिशेब तपासणें, मंत्र्याची नेमणूक पार्लमेंटच्या संमतीनें राजानें करणें, नेमणूक झाल्यावर प्रत्येक प्रधानानें पार्लमेंटसमोर शपथविधि करणें व प्रत्येक नव्या पार्लमेंटच्या सुरुवातीस प्रधानांनीं आपला राजीनामा राजाच्या हातीं देणें वगैरे अधिकार राजानें पार्लमेंटला दिले. यामुळें राजाचे प्रधान पार्लमेंटला जबाबदार झाले व तिजोरीवर पार्लमेंटचा ताबा सुरू झाला (सन-१३४१). त्याच सुमारास पार्लमेंटच्या एका सभेच्या उमराव मंडळ व लोकसभा अशा दोन सभा झाल्या. सर्व उमराव व धर्मगुरू उमराव मंडळांत बसून चर्चा करीत व लोकसभेमध्यें मध्यमवर्गीय लोक व शिलेदार बसून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजकारणाची चर्चा करीत. सन १३५२ मध्यें राजद्रोहाच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येऊन अनेक गुन्ह्यांकरितां देहान्ताची शिक्षा ठरविण्यांत आली. सन १३७६ मध्यें भरलेल्या ' गुड पार्लमेंट'नें प्रधानांची चौकशी करण्याचा अधिकार मिळविला. यामुळें उमराव मंडळाकडे न्यायसभेचें काम व लोकसभेकडे फिर्यादीचें काम आलें; व राजाच्या प्रधानांवर पार्लमेंटचा वचक राहण्यास मदत झाली.

EDWARD III
1. Florin of 1344; 2. Noble of 1360–1369.

९. प्लेग अथवा ब्लॅकडेथ (इ. स. १३४८–४९):—क्रेसीच्या लढाईनंतर लोक आनंदांत गर्क असतांच सन १३४८ मध्यें प्लेग अथवा ब्लॅकडेथची भयंकर सांथ इंग्लंडमध्यें उद्भवली. चीनमध्यें प्रथमतः याला सुरुवात होऊन युरोपियन व्यापाऱ्यांच्या बरोबर प्लेग युरोपांत आला; व तेथून तो इंग्लंडांत आला, अशी कल्पना आहे. या सांथीनें इंग्लंडमध्यें आपला प्रभाव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चांगलाच गाजविला! खेडोपाडीं त्याचा प्रसार होऊन अनेक शेतकरी प्राणांस मुकले. शहरांतील अस्वच्छ घरांत राहणाऱ्या लोकांचा प्लेगनें जास्त संहार केला. श्रीमंत, धर्मगुरू, गरीब, व्यापारी वगैरे अनेक प्रकारचे लोक मृत्युमुखीं पडल्यानें इंग्लंडमध्यें नुसता हाहाकार उडाला! त्यामुळें इंग्लंड-मधील जवळ जवळ निम्मे शेतकरी मेल्यानें खेडीं उजाड झालीं, व शेती बंद पडली. शेतावर कामकरी न मिळाल्यानें शेतें पिकेनाशीं होऊन अन्न महाग झालें, शेतमजुरी वाढली व पार्लमेंटनें जास्त मजुरी घेण्याविरुद्ध कायदा करूनही ती वाढतच राहिली. अन्न महाग झाल्यानें व मजुरीचे दर वाढ-ल्यानें अनेक जिनसांच्या किंमतीही वाढल्या. जहागिरदारांना शेतीच्या कामा-करितां शेतमजूर न मिळाल्यानें त्यांनीं शेती बंद केली व आपल्या शेतांचीं कुरणें बनवून मेंढपाळांच्या धंद्यास सुरुवात केली. यामुळें लोकरीची पैदास जास्त होऊं लागून लोकरीच्या व्यापारास मात्र तेजी आली.

१०. धार्मिक जागृति :—तिसऱ्या एडवर्डच्या कारकीर्दींत आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडून आली. ती म्हणजे राष्ट्रांत धर्मजागृति उत्पन्न झाली ही होय. आपण दिलेल्या पैशाचा बराच मोठा भाग पोपकडून फ्रेंच राजाला मिळतो म्हणून इंग्लंडनें पोपला पैसे देऊं नयेत असें लोकमत झालें होतें. एकंदरींत पोपबद्दल लोकांच्या मनांत तिरस्कार उत्पन्न झालेला होता. या गोष्टीचा फायदा घेऊन पार्लमेंटनेंही सन १३५१ मध्यें 'ॲक्ट ऑफ प्रोव्हायजर्स' नांवाचा कायदा पास करून पोपनें दिलेलीं वर्षासनें व केलेल्या नेमणुका रद्द केल्या. तसेंच सन १३५३ मध्यें राज्ञा-वज्ञेचा ऊर्फ 'प्रेमुनायरचा' कायदा पास करून राजाच्या परवानगीशिवाय

तिसरा एडवर्ड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धार्मिक बाबतींत पोपकडे अपील करण्यास मनाई करण्यांत आली. व हा कायदा उल्लंघिल्यास हद्दपारीची शिक्षा ठरविण्यांत आली. यामुळें इंग्लंडमधील पोपच्या सत्तेस चांगलाच लगाम बसला. तसेंच त्या वेळचे धर्मगुरू राजकारणांत भाग घेत व धर्मकारणाकडे दुर्लक्ष करीत हें लोकांना आवडेनासें झालें होतें. राजकारणांत धर्मगुरूंनीं मोठमोठ्या मानाच्या व अधिकाराच्या जागा अडकवून ठेविल्यानेंही लोक त्यांचा तिरस्कार करीत. धर्मगुरु आपल्या श्रीमंतीच्या गुर्मीत असल्यानें त्यांचें वर्तनही असावें तसें नव्हतें, असा लोकांचा कटाक्ष होता. धर्मगुरूंचा आळस व त्यांचा स्वार्थसाधूपणा यामुळें सर्व लोक चिडले होते. अर्थात् धार्मिक बाबतींत सुधारणा होणें आवश्यक आहे असें लोकांस वाटूं लागलें होतें.

११. जॉन विक्लिफ—लोलर्डांचा उदय :—यामुळें धर्मसुधारणावादी अनेक पंथ त्या वेळीं निघूं लागले होते. त्यांत लोलर्डपंथ फार प्रसिद्धी पावला. त्या पंथाचा प्रमुख पुढारी जॉन विक्लिफ, ऑक्सफर्ड येथें प्राध्यापक होता. धर्मशास्त्राचा त्यानें खोल अभ्यास केला होता. धर्मगुरूंचें धर्मविहीन वर्तन त्याला नापसंत असल्यानें त्यांच्या चैनी व आळशी राहणीविरुद्ध त्यानें कडक टीका करण्यास सुरुवात केली. इंग्लंडच्या धर्मपीठावर पोपची सत्ता असूं नये असेंही तो उघड उघड म्हणत असे. आपल्या तत्त्वांच्या प्रसारार्थ त्यानें एक पंथ स्थापन करून त्यांतील सभासदांकरवीं त्यानें सर्व देशभर धर्मजागृतीचें काम केलें. लोकांना समजेल असें इंग्रजीमध्यें बायबलचें त्यानें भाषांतर करून तें प्रसिद्ध केलें. आपल्या टीकेचें शस्त्र त्यानें उमरावांवरही उगारलें होतें; व धनिकांनीं आपल्या संपत्तीचा विनियोग गरिबांची स्थिति सुधारण्याकडे करावा असें त्याचें म्हणणें होतें. धर्मजागृतीचें काम उत्तमप्रकारें करून विक्लिफनें भावी धर्मसुधारणेचा पाया घातला अशी समजूत असल्यानें 'धर्मसुधारणेचा शुक्रतारा' असें त्याला संबोधण्यांत येतें. पुढें पुढें विक्लिफ व त्याचे अनुयायी (लोलर्ड—बडबड करणारे) धर्मविधींवर घसरल्यानें तो नास्तिक आहे असा लोकांचा समज होऊं लागला. व त्यामुळें लोलर्डपंथाबद्दलची लोकांची सहानुभूति कमी कमी होऊं लागली. जॉन विक्लिफ सन १३८४ मध्यें मरण पावला. त्याच्यानंतर लोलर्डपंथ फार दिवस जगला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नसला तरी त्यानें केलेली कामगिरी भरभक्कम ठरली. या कामगिरीमुळेंच ट्यूडर काळांत झालेल्या धर्मसुधारणेचा मार्ग सुकर होण्यास मदत झाली.

नांगरणी

१२. तिसऱ्या एडवर्डची अखेर :—तिसऱ्या एडवर्डचीं शेवटचीं वर्षे अत्यंत हालांत व काळजींत गेलीं. राज्यकारभारावरील त्याचें लक्ष उडून गेलें होतें. त्यांतच त्याची आवडती राणी फिलिपा व शूर पुत्र कृष्णकुमार त्याला सोडून गेल्यानें त्याचें मन उदास झालें. त्याचा तिसरा मुलगा जॉन– गॉंटचा जॉन म्हणून प्रसिद्धी पावलेला–बराच खटपट्या होता; व आपल्या बापाच्या उतार वयांत राज्यकारभाराचें सुकाणूंही त्यानें आपल्या हातीं धरलें होतें. त्याचा प्रतिस्पर्धी, विंचेस्टरचा बिशप, विकहॅमचा विल्यम होय. त्याच्याशीं त्यानें अनेक डावपेंच लढविले. त्याच्या भानगडींमुळें लोकही त्याच्यावर प्रसन्न नव्हते. अशा स्थितींतच तिसरा एडवर्ड सन १३७७ मध्यें वारला व त्याचा नातू व कृष्णकुमाराचा अल्पवयी मुलगा रिचर्ड, दुसरा रिचर्ड म्हणून, इंग्लंडच्या गादीवर बसला.

अभ्यास

१. स्कॉटलंडशीं युद्ध होण्याचें कारण काय ? त्याचा परिणाम काय झाला ?
२. शतसांवत्सरिक युद्धाचीं कारणें द्या. या युद्धांत तिसऱ्या एडवर्डला हार कां खावी लागली ?
३. कृष्णकुमारानें ज्या लढाया जिंकल्या त्यांची थोडक्यांत माहिती द्या.
४. पार्लमेंटच्या सत्तेंत वाढ होण्याचें कारण काय ? यावेळीं पार्लमेंटला कोणकोणते अधिकार मिळाले ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. जॉन विक्लिफसंबंधीं थोडक्यांत हकीकत सांगा. त्या वेळच्या धार्मिक स्थितींत सुधारणा व्हावी असें त्याला कां वाटलें ?

६. धर्मखात्यावर ताबा मिळविण्याकरितां पार्लमेंटनें काय केलें ?

७. खालीलसंबंधीं टिपणें कराः—
ब्रेटिनीचा तह, क्रेसीची लढाई, फ्लँडर्सशीं चाललेला लोकरीचा व्यापार, लिमोजेसची कत्तल.

८. प्लेगचा प्रादुर्भाव इंग्लंडांत कसा झाला ? त्याचा परिणाम काय झाला ?

९. त्यावेळचा फ्रान्सचा नकाशा काढून त्यांत एडवर्डनें मिळविलेला प्रदेश भरा.

१०. एडवर्डच्या कारकीर्दींतील ठळक ठळक गोष्टी सनांसह सांगा.

११. रॉबर्ट ब्रूस व कोळी यांची गोष्ट तुम्हांस माहीत आहे काय ? नसल्यास तुमचे शिक्षक तुम्हांस सांगतील.

उ ता रे

१. राणी फिलीपाची गोष्ट–१३४७.

क्रेसीच्या विजयानंतर तिसऱ्या एडवर्डनें सुप्रसिद्ध कॅले शहराला वेढा दिला. त्या शहरांतील लोकांनीं अनेक दिवस इंग्लिशांना दाद दिली नाहीं; परंतु कोणत्याही प्रकारची त्यांना मदत न मिळाल्यानें त्यांची उपासमार होऊं लागली. त्यांनीं शहर खालीं करण्याचें कबूल केलें. तेव्हां एडवर्ड त्यांस म्हणाला, 'तुमच्या गांवचे सहा प्रसिद्ध पुढारी उघडे-बोडके, अनवाणी, अंगांत शर्ट घालून, गळ्यांत फास अडकावून घेऊन व माझ्याकडे येऊन तुमच्या शहराच्या व किल्ल्याच्या किल्ल्या माझ्या स्वाधीन करतील तर मी सर्वांना मुक्त करीन. मात्र त्या सहांचें काय करावयाचें तें माझ्या मर्जीवर राहील.' अत्यंत नाइलाजानें त्यांनीं या अटी मान्य केल्या व मोठ्या कष्टानें त्यांनीं आपले सहा पुढारी एडवर्डच्या हवालीं केले. त्याबरोबर एडवर्ड म्हणाला, 'कॅलेच्या लोकांनीं माझे अनेक लोक ठार केले. तेव्हां या लोकांसही मी फाशीं देणार,' व त्याप्रमाणें त्यानें मारेकरीही बोलाविले. एडवर्डच्या लोकांपैकीं अनेकांनीं त्या सहा जणांचा जीव वांचावा म्हणून पुष्कळ निष्फळ रदबदली केली. शेवटीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एडवर्डची राणी फिलीपा डोळ्यांत दुःखाश्रु आणून व एडवर्डच्या पायावर डोकें ठेवून म्हणाली, 'हे आर्या, मी आपल्यापाशीं आजपर्यंत कोणतीही मागणी केली नाहीं. अत्यंत नम्रपणें मी आपल्याला पदर पसरून सांगतें कीं, परमेश्वराची लाज राखण्यासाठीं व माझ्यावर आपलें प्रेम असेल तर या सहा जणांस जीवदान द्यावें.' त्यावेळीं एडवर्डच्या हृदयाला पाझर फुटला व तो म्हणाला, 'आर्ये, तूं यावेळीं येथें नसतीस तर उत्तम झालें असतें. बरें! तें असो. माझ्या मनाविरुद्ध या सर्वांस मी तुझ्या ताब्यांत देतों. त्यांचें तूं कांहींही कर.' त्यानंतर राणीनें त्या सर्वांस उत्तम अन्नवस्त्र देऊन त्यांना सोडून दिलें.

या गोष्टीवरून राणीबद्दल तुम्हांस काय वाटतें? राजाबद्दल काय वाटतें? कां? कॅलेच्या लोकांवर तो इतका चिडला कशाकरितां? त्याच्या अटी काय होत्या? त्याची इच्छा पुरी झाली? कां नाहीं?

---

२. प्लेगनें उडविलेला कहर–१३४९.

या वर्षी प्लेगनें इंग्लंडांत नुसता कहर उडविला! गांवेंच्या गांवें उद्ध्वस्त झालीं व मनुष्यसंहार किती झाला त्याला गणतीच नाहीं! प्लेगनें लागलेला मनुष्य सपाट्यासरशीं मरे किंवा एखाददुसरा दिवस अंथरुणावर मृत्यूची वाट पहात राही! त्याच वर्षी मेंढ्याही प्लेगनें पटापट मरूं लागल्या. एका ठिकाणीं तर पांच हजारांच्यावर मेंढ्या मेल्या! त्यांची घाण मनस्वी सुटे; इतकी कीं पशुपक्षीही त्यांस शिवतना!! सर्व वस्तूंच्या किंमती एकदम उतरल्या. मृत्यूच्या भीतीनें येईल त्या किंमतीला माल विकला जाई. मालमत्तेला अगर पैशालाही कोणी विचारीना. चाळीस शिलिंगाचा घोडा साडेसहा शिलिंगास मिळूं लागला. घोड्याप्रमाणेंच उत्तम बैलास फक्त चार शिलिंग, गाईस एक शिलिंग, मेंढीस तीन पेन्स, कोकरास दोन पेन्स, डुकरास पांच पेन्स व सात शेर लोकरीला अवघे नऊ पेन्स पडत! मेंढ्या व गुरेंढोरें, मालक अगर गुराखी नसल्यानें, शेतांत रानोमाळ भटकत व अशा तऱ्हेनें भटकतां भटकतां त्यांच्यापैकीं तळ्यांत पडून किती मेल्या तें देव जाणे! गुराख्याप्रमाणेंच शेतमजूरही दुर्मिळ झाले होते. हंगामाच्या वेळीं वेळेला अन्न व आठआठ–बाराबारा पेन्स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मजुरी देऊनही शेतमजूर कामास मिळेनात. त्यामुळें शेतांची नासाडी झाली व पिकें बुडालीं.

प्रश्नः—१. प्लेगनें आपला हात कोणाकोणाला दाखविला? माणसें किती मेलीं?
२. शेतीवर त्याचा परिणाम काय झाला? शेतमजूर कां मिळेनात?
३. मालाच्या किंमतीवर काय परिणाम झाला? कशामुळें?

पेरणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१६. दुसरा रिचर्ड (इ. स. १३७७–१३९९)

१. दुसरा रिचर्ड :—इंग्लंडचा बालराजा रिचर्ड हा राज्यावर आला त्या वेळीं फक्त अकरा वर्षांचा होता. शांततेचा पुरस्कर्ता व वाङ्मय व कला यांचा तो आश्रयदाता होता. मोठ्या धीराचा व प्रसंगावधानी असल्यानें त्याची बरीच कीर्ति झाली. उमराव व सरदार यांच्या सत्तेचा बीमोड करून राजसत्ता बळकट करणें हें त्याचें ध्येय असल्यानें आपल्या कारकीर्दीत उमरावांना कह्यांत ठेवण्याचा त्यानें बराच प्रयत्न केला. काटकसरीनें राहण्यापेक्षां उधळपट्टी करण्याकडेच त्याचा कल होता. लोलर्ड पंथाचीं तत्त्वें त्याला मान्य नव्हतीं. तसेंच शेतकरी लोकांच्या चळवळीबद्दलही त्याला सहानुभूति वाटत नसे. अल्पवयांतही त्यानें लोकांवर विलक्षण छाप बसविली होती. परंतु राष्ट्रावर ठेविलेला विश्वास व त्यानें केलेला राज्यघटनाभंग या गोष्टी त्याच्या नाशास कारणीभूत झाल्या. रिचर्ड अल्पवयी असल्यानें राज्यकारभाराचें काम करण्याकरितां एका मंडळाची स्थापना करण्यांत आली होती. फ्रान्सशीं चालू असलेलें युद्ध पुन्हां सुरू करावें असा या मंडळाचा बेत होता व त्याकरितां त्या मंडळानें पैशाकरितां पार्लमेंटची कास धरली. पार्लमेंटनें पैसे दिले; परंतु ते अपुरे असल्यानें डोईपट्टीसारखे जाचक कर लोकांवर लादण्यांत आले. त्यामुळें देशांत असंतोष माजला व लोकांनीं बंडें केलीं.

२. शेतकऱ्यांचें बंड (सन १३८१)—**कारणें**:—शेतकऱ्यांच्या बंडाला डोईपट्टी हें एक तात्पुरतें कारण झालें; पण तत्पूर्वी त्याला अनेक कारणें घडून आलीं होतीं. तिसऱ्या एडवर्डच्या कारकीर्दीत प्लेगनें शेतमजुरांची दीनवाणी स्थिति केल्यानें शेतमजुरी वाढली होती. ती कमी करण्याकरितां मजुरी वाढविण्याविरुद्ध पार्लमेंटनें कायदेही केले होते; त्यामुळें शेतकऱ्यांत असंतोष माजला होता. त्याशिवाय धर्माच्या नांवाखालीं व राज्यकारभाराकरितां अनेक प्रकारांनीं शेतकऱ्यांची पिळणूक चालूच होती. फ्रान्सशीं चालू असलेल्या युद्धामुळेंही त्यांना नानाप्रकारचे कर द्यावे लागत. सरंजामी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पद्धतीप्रमाणें सक्तीनें करावीं लागणारीं कामेंही त्यांना आतां डोईजड वाटूं लागलीं होतीं व ही सक्ती कमी व्हावी म्हणून शेतकऱ्यांचे एकसारखे प्रयत्न चालूच होते. लोलर्ड लोकांच्या चळवळीमुळें त्यांच्यांत बरीच जागृति उत्पन्न झाली होती. या सर्व गोष्टी होत असतांच सन १३७९ मध्यें प्रथमतः डोईपट्टी बसविण्यांत आली; पण ती सौम्य असल्यानें शेतकऱ्यांनीं त्याची फारशी पर्वा केली नाहीं; परंतु सन १३८० मध्यें ज्या वेळीं ती सरसकट सर्वांवर लादण्यांत आली त्या वेळीं असंतोषानें उग्र रूप धारण केलें व त्याचें बंडांत पर्यवसान झालें.

३. वॅट टायलरचें बंड :—या बंडाळीचें तीव्र स्वरूप इसेक्स व केंट परगण्यांत दिसून येत होतें. जॅक स्ट्रॉ हा इसेक्समधील बंडवाल्यांचा व वॅट टायलर हा केंटमधील बंडवाल्यांचा पुढारी होता. या बंडवाल्यांचा मुख्य कटाक्ष जहागिरदारांवर असल्यानें त्यांनीं देशमुखवाड्यांस आगी लावण्यास सुरुवात केली. यामुळें प्रमुख दस्तऐवज भस्मसात् होऊन देशमुखांच्या गुलामगिरींतून आपली सुटका होईल अशी बंडवाल्यांची कल्पना होती. या बंडवाल्यांनीं अधिकाऱ्यांचेही खून पाडण्यास कमी केलें नाहीं. जाळपोळ व लुटालूट करीत हे बंडवाले लंडनवर चाल करून आले. तेथेंही त्यांनीं तुरुंग, मोठमोठे वाडे व इमारती यांना आगी लावून दिल्या; व वकील, न्यायाधीश, सरदार, बिशप वगैरे अनेकांना कंठस्नान घातलें! अशा वेळीं मोठें प्रसंगावधान राखून वाटाघाटीकरितां रिचर्ड राजा बंडवाल्यांमध्यें गेला. परंतु राजा व बंडवाले यांच्यामध्यें वाटाघाटी चालू असतांच रस्त्यांत लंडनच्या मेयरनें वॅट टायलरचा खून केला (सन १३८१). तरीही न डगमगतां जमिनी विकत घेण्याची व विकण्याची प्रत्येक शेतकऱ्याला परवानगी असावी, शेतकऱ्यांवरील कामासंबंधाची सक्ति नष्ट करावी, दर एकराला चार पेन्सप्रमाणेंच साऱ्याची आकारणी करावी वगैरे मागण्या बंडवाल्यांनीं राजापुढें सादर केल्या. या मागण्या राजानें मान्य केल्या, परंतु पार्लमेंटनें फेटाळून लावल्या. बंडामुळें शेतकऱ्यांचा फारसा फायदा झाला नाहीं ही गोष्ट खरी असली तरी त्यामुळें जहागिरदारांवर एक प्रकारचा वचक बसला व त्यामुळें गुलामगिरी नष्ट होण्यास मदत झाली. तसेंच डोईपट्टी लादणारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गॉँटचा जॉन राजकारणापासून खड्यासारखा दूर फेंकला गेला; तेव्हां तो स्पेनला पळून गेला. त्याचप्रमाणें लोलर्डपंथावरील लोकांचा विश्वास ढळण्यासही मदत झाली.

४. निर्दय पार्लमेंट (१३८८) :—गॉँटचा जॉन स्पेनमध्यें पळून गेल्यानें सफकचा अर्ल मायकेल–ड- ला- पोल हा मंत्रीमंडळांत सत्ताधारी झाला. तो शांततावादी होता. पण त्याचा प्रतिस्पर्धी ग्लॉस्टरचा ड्यूक, टॉमस, यानें युद्धाची तळी उचलून धरल्यानें देशांत दोन तट पडले. ग्लॉस्टरच्या ड्यूकच्या पक्षांत अनेक उमराव सामील होऊन त्यांनीं सफकला बडतर्फ करण्याची मागणी केली. नाइलाजानें रिचर्डनें त्यांची मागणी मान्य



कुळवणी.

केली. तेव्हां पार्लमेंट भरविण्यांत येऊन पार्लमेंटनें सफकला व त्याच्या साथीदारांस फांशीची शिक्षा फर्माविली. या कृत्यामुळें या पार्लमेंटला 'निर्दय पार्लमेंट' असें म्हणतात. सन १३८९ मध्यें वयांत आल्यानें रिचर्डनें सर्व राज्यकारभार आपल्या हातीं घेतला व ग्लॉस्टरच्या ड्यूकला बडतर्फ केलें. यामुळें तो राजाचा शत्रु बनला.

५. रिचर्डचा कारभार :—सन १३९४ मध्यें पहिली बायको वारल्यावर रिचर्डनें फ्रान्सच्या राजाची बहीण इसाबेला हिच्याशीं लग्न केलें व फ्रेंच राजाशीं तह केला. ही गोष्ट अनेक उमरावांस आवडली नाहीं. ग्लॉस्टरच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ड्यूकला व त्याच्या पक्षाला फ्रान्सबरोबर युद्ध चालू ठेवावयाचें होतें. यामुळें त्यांनीं रिचर्डला विरोध करण्याचें ठरविलें. हें समजतांच रिचर्डनें त्याला हद्दपार केलें व त्याच्या साथीदारांचीही वाट लाविली. यानतर रिचर्डनें श्रुसबरी येथें सन १३९८ मध्यें पार्लमेंटची सभा बोलाविली. या सभेनें जकातीचें उत्पन्न हयातीपर्यंत राजानें घ्यावें असें ठरविलें; व राजाच्या पक्षांतील अठरा जणांचें एक मंडळ नेमून त्याला आपले सर्व अधिकार बहाल केले. यामुळें राजा सर्वाधिकारीच बनला, व तो दडपशाही करण्यास प्रवृत्त झाला. हेरेफर्डचा ड्यूक व नॉर्फोकचा ड्यूक यांच्यामध्यें द्वंद्वयुद्ध चालू असतां त्यानें तें एकदम बंद करून दोघांनाही हद्दपारीच्या शिक्षा ठोठावल्या. पार्लमेंटमध्यें रीतसर चौकशी झाल्याशिवाय राजाला अशी शिक्षा सुनावतां येत नसे. अर्थात वरील शिक्षा सुनावल्यामुळें राजानें राज्य-घटनेविरुद्ध वर्तन केलें; तें लोकांस पसंत पडलें नाहीं. तसेंच हद्दपार केलें तरी 'तुझी मालमत्ता जप्त करणार नाहीं' असें राजानें हेरेफर्डला वचन दिलें होतें, तें राजानें मोडलें. तशांतच गाँटचा जॉन मेला. त्यावेळीं राजानें त्याचीही मालमत्ता जप्त करून ती बळकावली. याच वेळीं रिचर्डनें चेशायर-मधील उत्तम तिरंदाज आपल्या पदरीं बाळगून त्यांच्या खर्चाकरितां सक्तीचीं कर्जें लोकांकडून घेण्यास सुरवात केली. त्यामुळेंही लोक असंतुष्ट झाले.

६. रिचर्डची पदच्युति :— अशा स्थितींत आयर्लंडमध्यें बंडाळी माजली. ती नाहींशी करण्याकरितां रिचर्ड त्या देशांत जातीनें गेला. तेथील बंडाळी मोडण्यांत गुंतला असतांच लँकॅस्टरच्या ड्यूकनें इंग्लंडांत येऊन आपल्या बापाच्या–गाँटच्या जॉनच्या–मालमत्तेवर आपला हक्क सांगितला. रिचर्डचा चुलता त्या वेळीं राज्यकारभार पहात होता. त्यानें तो हक्क नाशाबित ठरविला. त्यामुळें बंडाळी माजली. ग्लॉस्टरच्या ड्यूकचे अनुयायी व ज्यांचीं ज्यांचीं मनें विटलीं होतीं ते सर्व लँकॅस्टरच्या ड्यूकला मिळाले व त्यांनीं जवळजवळ सर्व देश आपल्या ताब्यांत घेतला. रिचर्ड आयर्लंडांतून वेल्समध्यें आला. त्या वेळीं त्याला सर्व हकीकत कळली. तेव्हां शरणागतीशिवाय दुसरा मार्ग नाहीं असें पाहून तो बंडवाल्यांस शरण गेला. लगेच लँकॅस्टरनें पार्लमेंटची सभा बोलावून दुष्ट कृत्यांबद्दल रिचर्डला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पदच्युत केलें (१३९९). त्यानंतर लँकॅस्टरचा ड्यूक, हेन्री, इंग्लंडचा राजा झाला. पार्लमेंटनेंही त्याला राजा म्हणून निवडल्यानें त्याच्या राजपदाला



दुसऱ्या रिचर्डची शरणागती

बळकटी आली. पुढें कैदेंत असतांच सन १४०० मध्यें रिचर्ड मरण पावला. कोणी म्हणतात त्याचा खून झाला.

अभ्यास

१. वॅट टायलरचें बंड होण्यास कोणतीं कारणें घडलीं? बंडाचा परिणाम काय झाला?

२. दुसऱ्या रिचर्डनें स्वतःच्या नालायकीनें राज्य गमाविलें का? कारणांसह सिद्ध करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. दुसऱ्या रिचर्डबद्दल थोडक्यांत माहिती सांगा. शेतकऱ्यांबद्दल त्याला खरी सहानुभूती होती का? कशावरून? उदाहरणें द्या.

४. खालीलसंबंधीं थोडक्यांत महिती द्या :—

वॅट-टायलर, निर्दय पार्लमेंट, डोईपट्टी, ग्लॉस्टरचा ड्यूक, लँकॅस्टरचा ड्यूक.

५. आतांपर्यंत पदच्युत झालेल्या राजांचीं नांवें सांगा. त्यांना पदच्युत कां व्हावें लागलें?

६. अँजेव्हिन ऊर्फ प्लँटॅजेनेट काळाचा एक कालादर्श तयार करा.

७. खालील कालादर्श पूर्ण करा.

कालादर्श इ. स. १३२७–१४००

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ती	हिंदुस्थान–महत्त्वाच्या गोष्टी
	१३२७–१३३७		
१३२८			१३२६–१३५१
१३३७	१३३७–१४३७		१३३६.
१३४६			१३४७
१३४९			१३५१–१३८८
१३५६			
१३६०			
१३७०			
१३७६			
१३७७	१३७७–१३९९		
१३८०			
१३८१			
१३९९			१३९८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. वंशवृक्ष—लँकॅस्टर व यॉर्क घराणें



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७. मध्ययुगांतील धर्माचें वर्चस्व व धार्मिक जीवन

१. पोप व धर्मखात्याचें वर्चस्व :—त्या काळीं सर्व ख्रिस्ती राष्ट्रांतून रोमन कॅथॉलिक धर्मपंथच प्रचलित होता. सर्व ख्रिस्ती राष्ट्रें धार्मिक दृष्टीनें एकाच सत्तेखालीं वावरत असत; व त्यांची मालिका धार्मिक रज्जूनें गुंफिली जाई. या मालिकेचा मेरुमणि पोप समजला जाई. या जगावरील ख्रिस्ताचा प्रतिनिधी व सर्व ख्रिस्ती लोकांचा धर्मगुरू म्हणून पोप समजला जात असल्यानें त्याच्यावर सर्व ख्रिस्ती लोकांचा धार्मिक बाबतींत अनन्य विश्वास होता. अर्थात त्याच्या धर्माज्ञा पाळणें हें प्रत्येकाचें कर्तव्य समजण्यांत येई. पोपचें आदिधर्मपीठ रोम येथें होतें. प्रत्येक ख्रिस्ती राष्ट्राच्या राजाला त्याच्या आज्ञा पाळाव्या लागत. त्याच्या हुकुमांची आपल्या राज्यांत अंमलबजावणी करावी लागे, आपल्या राज्यांतील धर्मगुरूंची नेमणूक पोपच्या मर्जीप्रमाणेंच करावी लागे, व त्याच्या आज्ञापत्राप्रमाणें आपल्या राज्यांतील धर्मपीठाची व्यवस्था ठेवावी लागे. धार्मिक बाबतींतील खटल्यांचीं अपीलेंही पोपकडे रोमला जात व त्याचा निकाल शिरसावंद्य मानला जाई. थोडक्यांत म्हणजे पोप ही त्या कालीं एक असाधारण शक्ति समजण्यांत येऊन सर्व ख्रिस्ती राष्ट्रांना एकत्र जोडणारा तो एक मोठा शक्तिमान दुवा समजला जाई. पोपची मान्यता मिळाली नसेल तर कोणालाही आपल्या राष्ट्राचा राजा होतां येत नसे. कोणी झालाच तर त्याला पोप धर्मबहिष्कृत करी. यामुळें सर्व राजे आपली मान पोपपुढें नेहमीं तुकवीत. पोपचे हस्तक सर्व राष्ट्रांतून धर्मप्रसाराच्या नांवाखालीं, परंतु खरें पाहतां पैसे मिळविण्याकरितां, एकसारखे फिरत. ते नेहमीं पैसे खात, लोकांना छळीत व लुबाडीतही ! चर्च बांधण्याकरितां, धर्मयुद्धाकरितां अगर इतर कारणांकरितां ते पैसे उकळीत. त्याचप्रमाणें पापमुक्ततेचे पास विकूनही पैसे गोळा करीत. हे पास विकत घेतल्यानें मनुष्य पापापासून मुक्त होऊन अंतीं त्याला सद्गति मिळते असें पोपचे हस्तक सांगत. कोणीं त्यांच्यावर गहजब केलाच तर त्याला ते शिव्याशापही देण्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डरत नसत. मास्टर मार्टिन नांवाच्या एका पोपच्या हस्तकाला तिसऱ्या हेन्रीनें इंग्लंडांतून घालवून दिलें. तेव्हां तो चडफडत व शिव्याशाप देत गेला.

२. धर्मगुरू व त्यांचें वर्चस्व:—त्या काळीं पोपला इतका मान मिळण्याचें सर्वांत मोठें कारण म्हणजे लोकांचें अज्ञान होय. त्यावेळीं शिक्षणाचा प्रसार जवळ जवळ मुळींच नव्हता. ज्यांना सुशिक्षित व ज्ञानी समजत ते सर्व बिशप व पाद्री असत; व या लोकांकडून धर्मशास्त्राचें ज्ञान लोकांस होई. ते सांगतील तें प्रमाण समजण्यांत येई! यामुळें त्या काळीं धर्मगुरूंना चांगलाच मान मिळे; मग ते सद्वर्तनी असोत किंवा दुर्वर्तनी असोत! त्या



वेळचें धर्मपीठ अत्यंत श्रीमान असे. सर्व धर्मगुरूंच्या नेमणुका पोपकडून होत असल्यानें ते त्याला दबकून वागत. व आपल्या देशाच्या राजाशीं थोडे उद्दामपणें व तुटकपणें वागून क्वचित् वैरभावही ठेवीत. यामुळें त्यांचे राजाशीं नेहमीं खटके उडत. भोळ्या पण श्रीमंत लोकांनीं अनेक प्रकारांनीं देणग्या व जाहगिरी दिल्यामुळें धर्मपीठें श्रीमान बनलीं होतीं. या श्रीमंतीच्या जोरावरही धर्मगुरू आपला आब राखून घेत व अधिकार गाजवीत. शिवाय धर्मगुरूंचे खटले साध्या कोर्टांत न चालतां ते धार्मिक कोर्टापुढें चालत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळेंही सामान्य लोकांच्या वर्तनावर धर्मगुरूंना वचक ठेवतां येत असे. या कोर्टामार्फत साध्या लोकांनाही दुर्वर्तनाबद्दल कैद, फटके मारणें, एखादें दिव्य करण्यास लावणें अगर प्रायश्चित्त घेण्यास लावणें वगैरेसारख्या शिक्षा ठोठावल्या जात. यामुळें लोकांवर एक प्रकारची दहशत बसली होती. अनेक धर्मगुरू जसे विद्वान तसेच ते मोठे मुत्सद्दीही असून राजाला राज्यकार-भारांत मदत करीत. वरील सर्व कारणांकरितां धर्मखात्याची एकंदरींत चलती असून त्याची सत्ता अबाधित चाले.

३. राजे व धर्मखातें :—परंतु अँजेव्हिन राजांच्या काळांत पोपची व धर्मखात्याची सत्ता धुडकावून देणारेही राजे निघाले. आर्चबिशपचीं अगर बिशपचीं वस्त्रें कोणीं व कोणास द्यावीं याबद्दल राजा व पोप यांच्यामध्यें अनेक वेळां झगडा झाला. त्यांच्या नेमणुका राजानें कराव्या कीं पोपनें कराव्या याबद्दलही भांडणें झालीं. तसेंच जे बिशप सरंजामी सरदार होते त्यांनीं राजनिष्ठेची शपथ घेऊन राजाला मुजरा करावा कीं नाहीं याबद्दलही असाच तंटा माजला. फौजदारी गुन्हे करणाऱ्या धर्मगुरूंवर राजाच्या कोर्टांना खटले भरतां येतात किंवा नाहीं याबद्दलही भांडणें झालीं. अशा तऱ्हेनें पहिला हेन्री व दुसरा हेन्री यांच्या वेळीं झालेलीं भांडणें लक्षांत धरण्यासारखीं आहेत. त्यांचा निकालही देवाण–घेवाण या पद्धतीनेंच लागला. शेवटीं वस्त्रार्पणाचा अधिकार पोपचा असून सरंजामी सरदार म्हणून धर्मगुरूनें राजाला मुजरा केला पाहिजे असें ठरलें. बाकीच्या मुद्यां-संबंधीं सर्व अधिकार पोपचेच ठरले. असें असलें तरी पोपबद्दल लोकांना एक प्रकारचा तिरस्कारच वाटत असे. कांहीं धर्मगुरू चांगले पण पुष्कळ वाईट असत; व त्यामुळें त्यांच्याबद्दलही लोकांचीं मनें कलुषित झालीं होतीं. या गोष्टीचा फायदा घेण्यास राजे चुकले नाहींत.

४. धर्मयुद्धें व त्यांचें महत्त्व :—राजे व पोप यांच्यामध्यें अनेक वेळां खटके उडत असले तरी धर्मयुद्धांच्या बाबतींत दोघांचेंही थोडें फार पटे. जरुसलेम वगैरे ख्रिस्ती धर्मक्षेत्रें तुर्कांनीं जिंकून घेतलीं होतीं. त्यामुळें धर्म-क्षेत्रांच्या ठिकाणीं जाणाऱ्यांचे अत्यंत हाल होत. ते थांबविण्याकरितां व ख्रिस्ती धर्मक्षेत्रें जिंकून घेण्याकरितां सर्व ख्रिस्ती राष्ट्रांत अहमहमिका लागून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहिली. अनेकांनीं धर्मयुद्धांत भाग घेण्याचें ठरविलें. कोणास कांहीं प्रायश्चित्त द्यावयाचें झाल्यास त्याच्याकडून पोप धर्मयुद्धाकरितां पैसे मागे किंवा लष्करी मदत मागे. मध्ययुगांत सन १०९६, ११४७ व ११८९ मध्यें तीन मोठीं धर्मयुद्धें झालीं. प्रथमतः ख्रिस्ती लोकांनीं आपलीं धर्मक्षेत्रें परत मिळविलीं; परंतु शेवटीं तीं तुर्कांच्या हातीं गेलीं. तीं सन १९१७ पर्यंत त्यांच्याच ताब्यांत होतीं. त्या सालीं मात्र इंग्रजांनीं हिंदी, ऑस्ट्रेलियन व इंग्रज शिपायांच्या मदतीनें तीं जिंकून घेतलीं. मध्ययुगांतील धर्मयुद्धामुळें ख्रिस्ती राष्ट्रांचा मोठाच फायदा झाला. युरोपियन लोकांचा पूर्वेकडील लोकांशीं प्रथमच परिचय होऊन दळणवळणही होऊं लागलें; व त्यामुळें पूर्वेकडील लोकांचें ज्योतिष, गणित वगैरे संबंधींचें ज्ञान, कागद तयार करण्याची कला, व अरेबिक अंक व लिपी युरोपांत माहीत झाली. यामुळें पुढें झालेल्या विद्येच्या पुनरुज्जीवनास एकप्रकारें मदत झाली. तसेंच युरोपियन लोकांचा पूर्वेकडील लोकांशीं व्यापार वाढूं लागला. घरें बांधणें, फर्निचर तयार करणें, उंची पोषाख शिवणें, ऐषारामी राहणी वगैरे संबंधीं युरोपियन लोकांच्या कल्पना पार बदलून गेल्या. या सर्व गोष्टींमुळें सर्व युरोपियन राष्ट्रांत धर्मयुद्धांमुळें एकप्रकारें चेतना उत्पन्न होऊन युरोपियनांच्या राहणींत, विचारांत व व्यापारांत आमूलाग्र फरक होण्यास मदत झाली.

५. **धर्मव्यवस्था व त्यांत बदल**:—धर्मयुद्धांमुळें एकंदर जागृति झाली खरी, तरी राष्ट्रांतून पूर्वी जी धर्मव्यवस्था असे तीच चालू राहिली. परगण्यांत कॅथीड्रल हें मुख्य मंदीर व त्याच्यावरील बिशप हाच धर्मखात्यापुरता त्या परगण्यांतील मुख्य धर्मगुरू मानला जाई. याशिवाय कांहीं खेड्यांतून पाद्री असत. परंतु त्या वेळीं प्रत्येक खेड्यांत पाद्री व मंदीर असेच असें नाहीं. त्यामुळें धर्मशील लोकांची कुचंबणा होई. तशांतच पाद्री लोक आळशी व स्वार्थी बनल्यानें त्यांच्याकडून त्यांच्या खेड्यांतील लोकांस योग्य धर्मशिक्षण मिळत नसे. यामुळें तें काम करण्याकरितां मध्ययुगांत दोन नवीन सांप्रदायांची स्थापना झाली. पहिला सांप्रदाय फ्रॅन्सिस्कन लोकांचा. इटलीमधील असीसीचा फ्रॅन्सिस यानें हा पंथ काढला, म्हणून त्याला फ्रॅन्सिस्कन पंथ म्हणत व त्याच्या अनुयायांस जोगी अथवा 'फ्रायर' असें म्हणत. हे लोक शुभ्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वस्त्रें वापरीत असल्यानें त्यांना 'शुक्ल जोगी' असेंही म्हणत. डॉमिनिक नांवाच्या एका स्पॅनिश साधूनें दुसरा सांप्रदाय स्थापन केला. त्याच्या पथांतील लोक काळीं वस्त्रें वापरीत; म्हणून त्यांना 'कृष्ण जोगी' असें म्हणत. एका ठिकाणीं न राहतां हे जोगी देशभर भटकत व धर्मप्रचार व धर्मोपदेश करीत. भिक्षावृत्तीनें राहून मिळेल त्याच्यावर उदरनिर्वाह करावा व विद्यादान व धर्मोपदेश करीत राहावें अशी त्यांस आज्ञा होती. या लोकां-मुळें विद्यार्जनास नवीन वळण लागून देशांतील नास्तिकपणा नाहींसा होण्यास मदत झाली.

६. **धर्ममठांची स्थापना**:—या फिरत्या धर्मोपासकांपेक्षांही मध्ययुगांत स्थापण्यांत आलेल्या धर्ममठांनीं जास्त उपयुक्त कामगिरी केली. त्या काळीं अनेक धर्ममठ स्थापण्यांत आले होते. प्रत्येक धर्ममठांत एक महंत ऊर्फ 'ॲबट' व अनेक मठवासी जोगी असत. आपलें धर्मोपदेशाचें व विद्या-दानाचें काम हे लोक मठांतच करीत. अर्थात् फ्रॅन्सिस्कन व डॉमिनिक जोग्यांप्रमाणें ते कधींच भटकत नसत. 'मी गरीबींत राहीन, अखंड ब्रह्मचर्य पाळीन व स्थावर अथवा जंगम इस्टेट करणार नाहीं,' अशी प्रत्येकाला शपथ घ्यावी लागे. मठवासीयांची शिस्त उत्तम प्रकारची होती. अध्ययन, अध्यापन व धर्मोपदेश हेंच त्यांचें मुख्य काम असे. तरी पण पुस्त-कांच्या नकला करणें, नवीन नवीन पुस्तकें लिहिणें, मठांच्या आजूबाजूच्या जमि-नीची लागवड करणें वगैरे कामेंही मठवासीयांकडून केलीं जात. त्यांची वृत्ति धार्मिक असून अन्यायापासून ते परावृत्त झालेले असत. दुसऱ्याचें कल्याण करणें हा प्रत्येक मठवासीयाचा मुख्य धर्म मानला जात असे. दुसऱ्याला मदत करणें, मुलांस शिक्षण देणें, गरिबांना भिक्षा घालणें, अतिथि-अभ्या-गताचा सत्कार करणें, गांजलेल्यांना साहाय्य करणें वगैरे कामेंही या मठां-तर्फे होत. यामुळें अनेकांना या मठांबद्दल आपलेपणा वाटत असे; व त्यामुळें अनेक श्रीमंतांनीं आपली संपत्ति या मठांना दिली होती. परंतु या देणग्यां-मुळेंच पुढें पुढें या मठांतील जोग व जोगिणींमध्यें फरक पडत गेला. संन्यस्तवृत्तीऐवजीं त्यांच्यांत ऐषाराम आला, उद्योगाची जागा आळसानें घेतली व गुणांची जागा दुर्गुणांनीं पटकावली! यामुळें मठांबद्दल वाटणारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपलेपणा नाहींसा होऊन लोक त्यांना नांवें ठेवूं लागले. अनेक मोटमोठे मुत्सद्दी, लेखक, शूर वीर, राजकार्यधुरंधर व उत्तम धर्मोपदेशक मठांतर्फें निर्माण होऊं शकले; तरी त्यांची अवनति होत गेल्यामुळेंच आठव्या हेन्रीच्या वेळीं हे मठ जप्त करण्यांत आले व एकेकाळची ही उपयुक्त संस्था नामशेष झाली. मध्ययुगांत मठांप्रमाणेंच अनेक मंदिरें व प्रार्थनालयें इंग्लंडभर बांधण्यांत आलीं.

७. यात्रा व **यात्रेकरूः**—एकंदरींत त्यावेळच्या जीवनांत धर्माला फारच मोठें स्थान होतें; व त्यामुळें धर्मक्षेत्रांच्या ठिकाणीं पापक्षालनाकरितां जाण्याची लोकांत अहमहमिका लागलेली होती. साधूसंतांच्या पुण्यभूमीकडे व धर्मक्षेत्रांकडे अनेकांचे पाय सहज वळत. यात्रा करण्यापासून पुण्यसंचय होतो, पापाचें क्षालन होतें व आत्म्याला चिरशांति मिळते अशी अनेकांची कल्पना होती. यामुळें कँटरबरी, वॉल्सिंगहॅम, डरहॅम वगैरे पवित्रक्षेत्रीं अनेक लोक जात. रोमची यात्रा छोटी समजण्यांत येत असे; तर जरुसलेमसारख्या पवित्र क्षेत्रीं जाणें ही महायात्रा गणली जाई. ती करून येणारास समाजांत प्रतिष्ठितपणा लाभे व त्याबद्दल लोकांस आदर वाटे. त्या वेळचे रस्ते ठीक नसत; चोराचिलटांचा उपद्रवही भरपूर होई. असें असूनही क्षेत्रीं गेल्यास पुण्यसंचय होईल म्हणून यात्रेकरू सर्व त्रास सोसण्यास तयार असत. कांहीं यात्रेकरू प्रायश्चित्ताकरितांही यात्रा करीत. आजाऱ्याचा रोग बरा व्हावा म्हणूनही कांहीं जात. नवस फेडण्याकरितांही अनेक लोक यात्रा करीत. हे यात्रेकरू सर्व प्रवास पायींच करीत; रस्त्यांवरून त्यांच्याकरितां अन्नछत्रें व रुग्णालयेंही असत. एकंदरींत यात्रांचें वेड त्या वेळच्या लोकांस फार होतें असेंच म्हणावें लागेल.

अभ्यास

१. मध्ययुगांत पोपला कोणकोणत्या गोष्टी करतां येत? राजे त्याला मान देत तो कां? लोकांना त्याच्याबद्दल तिरस्कार कां वाटे?
२. पोपच्या योग्यतेचा आपल्याकडे कोणी अधिकारी होता—आहे का? त्याच्या अधिकाराची व पोपच्या अधिकाराची तुलना करून त्यांतील भेद स्पष्ट करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. पोपच्या हस्तकांसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

४. धर्मगुरूंची नेमणूक कोण करीत असे ? या बाबतींत कोणकोणत्या इंग्लिश राजांचें पोपशीं भांडण झालें ? त्याचा निकाल काय झाला ?

५. धर्मयुद्धांचीं कारणें सांगा. त्यांचा युरोपवर काय परिणाम झाला ?

६. धर्मयुद्धांत कोणत्या इंग्लिश राजांनीं भाग घेतला होता ? कशा-करितां ? कोणकोणत्या इंग्लिश राजांनीं धर्मयुद्धाला अप्रत्यक्षपणें मदत केली ? कोणत्या स्वरूपांत ? त्याबद्दल जनतेला काय वाटत होतें ?

७. त्या वेळच्या यात्रा कोणत्या कारणांकरितां केल्या जात ? यात्रेचीं ठिकाणें सांगा. यात्रेकरूस कोणत्या राष्ट्रांतून जावें लागे ?

८. तुमचीं धर्मक्षेत्रें कोठें आहेत ? तीं सोडविण्याकरितां कोणी कोणी व केव्हां केव्हां प्रयत्न केले ? त्याचा परिणाम काय झाला ? आपल्याकडे धर्मयुद्धें कधीं झालीं होतीं का ? युरोपांत कां झालीं ?

९. धर्ममठांसंबंधीं तुम्हांस माहीत असलेली सर्व माहिती सांगा.

१०. टिपणें करा :—

फ्रॅन्सिस्कनपंथ, डॉमिनिकपंथ, धार्मिक कोर्टें, यात्रा व धर्मयुद्धें.



कापणी व पेंढ्या बांधणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८. अँजेव्हिन अथवा प्लँटॅजेनेट काळांतील ठळक विशेष

१. राजसत्ता :—नॉर्मन काळाप्रमाणें या काळांतील राजाही राष्ट्राचा व समाजाचा नेता व प्रजेच्या जीविताचा व मालमत्तेचा रक्षणकर्ता समजला जात असे. नॉर्मन राजांप्रमाणें या काळांतील राजेही नेहमीं भटकत असत. त्यामुळें राजधानी अशी नव्हतीच. पहिल्या एडवर्डनें आपलें वसतिस्थान सुमारें पाऊणशें वेळां बदललें होतें ! हें भटकणें प्रजेला मात्र परवडत नसे. त्यामुळें अनेक प्रकारच्या तक्रारी होत. शेवटीं जॉन राजानें मॅग्नाकार्टाच्या वेळीं बैल, घोडे व गाड्या वेठीस धरणार नाहीं व राजाकरितां जी काय अन्नसामुग्री घेण्यांत येईल त्याबद्दल रोख पैसे दिले जातील असें कबूल केलें. परंतु हें वचन पुढील राजांनीं फारसें पाळलें नाहीं. या काळांतील आणखी एक विशेष म्हणजे नॉर्मन काळाप्रमाणेंच या काळींही मध्यवर्ती सत्ता अर्थात् राजसत्ता सामर्थ्यवान् होती. यामुळें सरदार व जहागिरदार फारसे डोईजड झाले नाहींत. परंतु राजसत्ता ज्या ज्या वेळीं बेजबाबदार, अनियंत्रित व जुलमी होऊं लागली त्या त्या वेळीं तिला पायबंद घालून ती नियंत्रित करण्याचें महत्त्वाचें काम सरदार, जहागिरदार व धर्मगुरू यांनीं केलें. यामुळेंच जॉन राजाला मॅग्नाकार्टावर सही करणें भाग पडलें; व सायमनला पार्लमेंट स्थापन करतां आलें. पार्लमेंटच्या स्थापनेमुळें राजसत्तेची प्रभा लोपूं लागली. तरी राष्ट्रांत एक नवेंच तेज दिसूं लागलें.

२. पार्लमेंटची स्थापना :—राजाच्या अनियंत्रित सत्तेस आळा घालण्याकरितां पार्लमेंटची उत्पत्ति झाली. फार पुरातन काळापासून राजाला सल्ला देणारें एक मंडळ असे. अँग्लो-सॅक्सन काळांत ‘ वितन ’ नांवाची सभा हेंच काम करी. नार्मन काळांत त्या सभेचें रूपांतर ‘ राजाच्या मंडळां ’ त करण्यांत आलें. कधीं कधीं यांत राजाच्या प्रधानांचा समावेश करण्यांत येई; तर कधीं कधीं मोठे मोठे जहागिरदारही त्याच्या बैठकीला बोलाविले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जात; परंतु या मंडळाचा राजावर फारसा दाब नसे व तो स्वतःच्या मर्जी-प्रमाणें कारभार करी. पुढें सन १२६५ मध्यें सायमन–ड–मॉटफर्डनें पार्लमेंटची प्रथम स्थापना केली; तरी खरें नमुनेदार पार्लमेंट पहिल्या एडवर्डनेंच स्थापन केलें (१२९५). या सभेंत मोठमोठे सरदार व जहागिरदार, धर्मगुरू, शिलेदार, सामान्य जनता व पाद्री या सर्वांचे प्रतिनिधि असत व त्या सर्वांच्या निरनिराळ्या सभा भरत. या सभांतून सर्व प्रकारच्या गोष्टींवर चर्चा व वादविवाद होऊन निकाल देण्यांत येत असे. राजाला युद्धाकरितां पैसा मंजूर करणें हें या पार्लमेंटचें मुख्य काम असे. हळू हळू पार्लमेंटनें आपले अधिकार वाढवून घेतले व पहिल्या एडवर्डच्या काळांत सर्व प्रकारच्या करांस पार्लमेंटची संमति असली पाहिजे असा महत्त्वाचा अधिकार राजाकडून मिळविला. यामुळें राजसत्ता थोडी नरमली व तिचा जुलमही कमी झाला. पुढें दुसऱ्या व तिसऱ्या एडवर्डच्या काळांत पार्लमेंटनें (१) राज्याचा हिशेब तपासणें (२) मंत्र्यांची नेमणूक पार्लमेंटच्या संमतीनें करणें (३) प्रत्येक कायद्याला मध्यम वर्गाची संमति असणें, वगैरे अनेक अधिकार मिळवून घेतले. यामुळें राजाच्या अनियंत्रित सत्तेस चांगलेंच नियंत्रण बसलें. पुढें धर्मगुरू, सरदार व जहागिरदार यांनीं एकत्र बसून चर्चा करण्यास सुरुवात केली व त्यांच्या मंडळाला ‘ उमराव-मंडळ ’ अथवा ‘ हाऊस ऑफ् लॉर्ड्स् ’ असें म्हणूं लागले. मध्यम वर्गीय, शिलेदार व पाद्री एकत्र बसून चर्चा करूं लागले. त्यांच्या मंडळाला ‘ लोकसभा ’ ऊर्फ ‘ हाऊस ऑफ कॉमन्स ’ असें म्हणूं लागले. मात्र ही गोष्ट नक्की केव्हां झाली हें सांगतां येणार नाहीं. परंतु या गोष्टीचा साधारण काल १३४१–४२ धरतात. पार्लमेंटमधील सरदार–जहागिरदारांची निवडणूक होत नसे. परंतु लोकसभेंतील सभासदांची निवडणूक होई. मतदानाचा अधिकार, मिरासदार शेतकऱ्यांसच असे; पण प्रत्येक शहरातर्फे जे प्रतिनिधि येत त्यांत कांहीं शेतमजुरांचेही प्रतिनिधि असत. यावरून जमिन-धारणाची त्यावेळीं अट नव्हती हें सिद्ध होतें. ती पुढें सन १४३० सालीं लादण्यांत आली; व शेतमजुरांचा मतदानाचा अधिकार काढून घेण्यांत आला. अशातऱ्हेनें पार्लमेंटची सत्ता वाढत गेल्यानें राजसत्ता मात्र निःसत्त्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नसली तरी दुर्बल होण्यास मदत झाली व सरंजामी पद्धतीलाही जोराचा धक्का बसून ती खिळखिळी झाली.

३. सरदार व जहागिरदार:—पार्लमेंटची सत्ता वाढविण्यांत, कांहीं अंशीं स्वार्थानें कां होईना, सरदार व जहागिरदार यांनीं मोठ्या प्रमाणांत भाग घेतलेला होता. राहणीच्या बाबतींत राजाची हुबेहूब नक्कल करण्यांत या वर्गांतील लोकांचा हातखंडा असे. राजा आपल्या राज्यांत भटके व प्रजेला त्रास देई; हेही आपल्या जहागिरींत भटकून आपल्या कुळांना त्रास देत! त्यांचा देशमुखवाडा प्रतिराजवाडाच असे व त्यांत सर्व प्रकारच्या सुखसोयी असत. या वाड्याभोंवतीं तटबंदी, खंदक वगैरे बांधून तो मोठा मजबूत करण्यांत येई. यामुळें कधीं कधीं या जहागिरदारांचेंही राजाला भय वाटे! कारण अशा मजबूत वाड्यांतून राहणाऱ्या जहागिरदाराजवळ शिबंदी उत्तम प्रकारची असे व तिच्या जोरावर ते राजालाही कधीं कधीं धाक दाखवीत! यामुळें अँजेव्हिन काळांत आपल्या सरदारांना व जहागिरदारांना राजा चांगलाच भीत असे. नॉर्मन काळांत सर्व सरंजामी सरदार-जहागिरदार राजाच्या धाकांत असत व राज्यकारभाराचीं सूत्रेंही त्यांच्याच हातीं असत. खुद्द पार्लमेंटमध्येंही उमरावमंडळच जोरकस ठरे. एकंदरींत सरदार-जहागिरदारांचा वर्ग सामर्थ्यवान् असल्यानेंच जॉनला मॅग्नाकार्टावर सही करावी लागली, व तिसऱ्या हेन्रीला, दुसऱ्या एडवर्डला व दुसऱ्या रिचर्डला पदच्युत व्हावें लागलें. परंतु पुढील काळांत मात्र या वर्गाची सत्ता कमी कमी होत जाऊन लोकसभा जास्त सामर्थ्यवान् ठरूं लागली.

४. शिलेदारीची स्थापना:—ज्यांच्यामुळें सरदार-जहागिरदारांची सत्ता जोरकस ठरली ते शिलेदार होत. शिलेदारांचा वर्ग स्थापन होण्यास सरंजामी पद्धति व धर्मयुद्धें कारणीभूत झालीं. मोठमोठे सरदार-जहागिरदार आपल्या पदरीं शिलेदार बाळगीत. खरें पाहतां राजाही एक मोठा शिलेदार समजला जाई व त्याचे सरदार-जहागिरदारही शिलेदारच होत; पण शिलेदारांच्या वर्गांत अनेक लष्करी शस्त्रधारी लोक मोडत. या शिलेदारांचे दोन वर्ग असत. सरदाराची लष्करी सेवा करण्याकरितां ज्याला जमीन मिळे त्यांचा एक प्रकार व पेशानेंच जो लष्करी माणूस असे व जो नक्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पगारावर सरदाराची चाकरी करी त्याचा दुसरा प्रकार. पहिल्या प्रकारचे शिलेदार शांततेच्या वेळीं शेती करीत व लढाईचे वेळीं आपल्या जहागिरदाराच्या सैन्यांत दाखल होऊन राजाला लढाईचे वेळीं मदत करीत. दोन्ही प्रकारच्या शिलेदारांना उत्तम प्रकारचें लष्करी शिक्षण मिळत असे. जे



टूर्नामेंट

आपल्याला शिलेदार म्हणवीत त्यांना कांहीं बंधनेंही पाळावीं लागत. त्यांपैकीं कांहीं खालील होत. धर्मपीठाचें रक्षण करणें, धर्मगुरू व पाद्री यांच्याबद्दल आदर बाळगणें, विश्वासघात, जुल्म व अन्याय यांचें निर्मूलन करणें, गरिबांचें रक्षण करून त्यांच्यावरील अन्यायांचें परिमार्जन करणें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या प्रांतांत शांतता स्थापणें, जगन्मातेची पूजा करून स्त्रियांबद्दल स्त्रीदाक्षिण्य दाखविणें, स्वज्ञातिबांधवांच्या रक्षणाची शर्थ करणें व वेळेनुसार त्याकरितां जिवाची पर्वाही न करणें. हीं सर्व बंधनें प्रत्येक शिलेदार पाळीतच होता असें नाहीं. या शिलेदारीमुळेंच स्त्रीदाक्षिण्याचा फैलाव होण्यास मदत झाली. शिलेदारीची पद्धति मध्ययुगांत फारच वाढली होती, व त्यामुळें देशाचाही फायदा झाला. अनेक शिलेदारांनीं धर्मयुद्धांत भाग घेऊनही उत्तम कीर्ति मिळविली. लष्करी शिलेदारांप्रमाणेंच कांहीं धर्मवीर शिलेदारही ऊर्फ 'टेंपलर' होते. तुर्कांच्या हातून ख्रिस्ती धर्मक्षेत्रें सोडविण्याकरितां आमरण लष्करी पेशा पत्करण्याची त्यांनीं शपथ घेतलेली असे. खरें पाहतां हे महंत किंवा जोगी असत; परंतु धर्म व धर्मक्षेत्रें यांच्या रक्षणाकरितांच केवळ त्यांनीं हा पेशा स्वीकारला होता. धर्मयुद्धांत त्यांनीं उत्तम कामगिरी केल्यामुळें त्यांस महत्त्वही पुष्कळ आलें होतें.

५. **युद्धप्रसंग**:—या काळांतील युद्धें अनेक वर्षें चालत. शतसांवत्सरिक युद्धच पहा. तें शंभर वर्षें टिकलें अशी समजूत आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं सैनिक शंभर वर्षें दररोज लढत होते; तर युद्धाची गतीच मंद होती. मोठे मोठे बळकट किल्ले व तटबंदी शहरें हस्तगत करण्यास अनेक वर्षें लागत. यामुळेंच त्या काळीं किल्ल्यांस विशेष महत्त्व प्राप्त झालें होतें. एकदां वेढा घालून बसलें कीं तो उठे–तों कित्येक वर्षें जात. याचें मुख्य कारण म्हणजे त्या काळीं बंदुका व तोफा नव्हत्या. भाले, कुऱ्हाडी व तरवारी यांच्या साहाय्यानेंच युद्धें खेळण्यांत येत. अर्थात् समोरासमोर लढाई झाल्यासच त्यांचा विशेष उपयोग होई. दूरच्या उपयोगाचें साधन म्हणजे धनुष्यबाण. सैन्यांत उत्तम तिरंदाज असणें म्हणजे सैन्य उत्तम आहे अशी कल्पना होती. तिरंदाजांच्या मदतीनेंच कृष्णकुमारानें क्रेसी, पॉइटियर्स वगैरे महत्त्वाच्या लढाया जिंकल्या. किल्ल्यांची तटबंदी पाडण्याकरितां त्या वेळीं मोठमोठ्या दगडांचाही उपयोग करण्यांत येत असे व त्याकरितां मनुष्यशक्तीनें चालणाऱ्या एका यंत्राचाही उपयोग करण्यांत येई. पण हें काम इतक्या मंदगतीनें चाले कीं, एका दगडानें तटबंदीला पाडलेलें भोंक दुसरा दगड येईपर्यंत सहज बंद करून टाकतां येई! या व अशा कारणांकरितांच त्या वेळीं युद्धें लांबत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. विद्यापीठांची स्थापना :—या युगाचा आणखी एक विशेष म्हणजे विद्येचा व ज्ञानाचा प्रसार हें होय. त्या वेळीं विद्यासंपन्न लोक फारच थोडे होते व जे होते त्यांच्याजवळ अध्ययन करण्याकरितां शिष्य जमत. त्या काळांत विद्येची संपत्ति धर्मगुरूंजवळच होती. अनेक धर्मगुरूंची कीर्ति, त्यांच्या ज्ञानामुळें, दूरवर पसरे. ती ऐकून त्यांच्या जवळची विद्या ग्रहण करण्याकरितां दूरदूरचे लोक येत. त्यामुळें ज्या ठिकाणीं असे विद्यासंपन्न धर्म-गुरू अध्ययन व अध्यापन करीत त्या ठिकाणालाही महत्त्व प्राप्त होई. अशा रीतीनेंच युरोपांत पॅरिस, लिस्बन, बोलोना वगैरे ठिकाणें विद्यापीठांकरितां प्रसिद्ध होतीं. खुद्द इंग्लंडमध्येंही मध्ययुगांत सन ११७० च्या सुमारास प्रथमतः ऑक्सफर्ड व नंतर पन्नास वर्षांनीं केंब्रिज हीं ठिकाणें विद्यापीठें म्हणून अस्तित्वांत आलीं. ऑक्सफर्डच्या विद्याविभूषितांनींच केंब्रिजला विद्यापीठ बनविलें असें म्हणतात. या विद्यापीठांतून व्याख्यानद्वाराच शिक्षण दिलें जात असे व त्यावर नंतर वादविवादही होई. लॅटिन भाषेच्या अभ्यासावर विशेष भर असे; परंतु तिच्या जोडीला ग्रीक भाषाही असे. त्याशिवाय लॅटिन भाषेचें व्याकरण, गणित, भूमिति, ज्योतिष, संगीत वगैरे विषयांचा सुमारें चार वर्षें अभ्यास केल्यावर विद्यार्थ्यांस बी. ए. ची पदवी मिळे व त्यानंतर आणखी तीन वर्षें अभ्यास केल्यावर एम्. ए. ची पदवी मिळे. यापेक्षांही उच्च शिक्षण पाहिजे असल्यास विद्यार्थी बोलोना, पॅरिससारख्या मोठ्या विद्यापीठांकडे धांव घेत. या विश्वविद्यालयांतून अनेक जाडे पंडित बाहेर पडले होते. त्यांत लिंकनचा बिशप ग्रॉसेटेस्ट, रोजर बेकन व एडमंड रिच हे फार प्रसिद्धी पावले. ग्रॉसेटेस्ट यानें हेब्रू, ग्रीक व लॅटिन या कठीण भाषांचा उत्तम अभ्यास करून गणित व विज्ञानशास्त्रेंही अभ्यासिलीं होतीं. रोजर बेकन यानेंही ग्रीक, हेब्रू व लॅटिन या भाषांप्रमाणेंच अरेबिक भाषेचाही अभ्यास केल्यानें त्याच्या ज्ञानांत उत्तम भर पडलेली होती. विज्ञानशास्त्राचा, ज्योतिषाचा व भूमितीचा त्यानें उत्तम अभ्यास केला असल्यानें त्याला चतुरस्र पंडित म्हणत. त्यानें अनेक प्रकारचे उत्तम ग्रंथ लिहिले व अनेक नवीन शोध लावले. बंदुकीच्या दारूचा, दुर्बिणीचा व डोळ्यांच्या चष्म्याचा त्यानें शोध लावला. मोटरगाडीची व विमानांचीही त्याला कल्पना सुचली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होती असें म्हणतात. पृथ्वीच्या आकारासंबंधींही त्यानें निश्चित सिद्धान्त मांडलेला होता. एडमंड रिच यानें तर्कशास्त्राचा उत्तम अभ्यास करून तत्त्वज्ञानांत भर टाकली. या सर्व पंडितांमुळेंच ऑक्सफर्ड व केंब्रिज या विद्यापीठांना मोठें महत्त्व प्राप्त होऊन अनेक राजांनीं त्यांना देणग्या व राजाश्रय दिला. अजूनही त्या दोन्ही विद्यापीठांनीं आपली उत्कृष्ट परंपरा राखिली आहे.

अभ्यास

१. पार्लमेंटची पूर्वपरंपरा सांगून तिची वाढ कसकशी होत गेली तें सांगा.

२. राजा व सरदार यांचे मध्ययुगांतील संबंध सांगा. सरदारांना राजा कां भीत असे? त्याचा राजसत्तेवर काय परिणाम झाला?

३. मध्ययुगांत कोणकोणतीं विद्यापीठें स्थापन झालीं? कशीं झालीं? त्या वेळीं धर्मगुरूच विद्यासंपन्न कां असत? या विद्यापीठांत कोणता व किती वर्षें अभ्यास करावा लागे?

४. शिलेदारीची उत्पत्ति कशी झाली? शिलेदारांचे प्रकार सांगून त्यांचें महत्त्व काय तें सांगा. आपल्याकडे या प्रकारचे शिलेदार कधीं होते का? केव्हां? त्यांच्यांत व इंग्लिश शिलेदारांत फरक काय?

५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—
रोजर बेकन, ग्रॉसेटेस्ट, युद्धप्रसंग, पार्लमेंटनें मिळविलेले अधिकार.

६. त्या काळच्या राजसत्तेसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९. अँजेव्हिन ऊर्फ प्लँटॅजेनेट राजवटींत

१. खेड्यांतील जीवन :—खेड्यांतील लोकांच्या राहणींत अँजेव्हिन काळांत फारसा फरक पडलेला नव्हता. त्या बाबतींत नॉर्मन काळची परंपराच चालू होती. जिवापाड मेहनत करावी व कसेंतरी पोट भरावें हेंच शेतकऱ्यांच्या जीवनाचें सार होतें ! खेड्याचा देशमूख शेतमजुरांवर अत्यंत जुलूम करीत असे व तो सहन करूनही लोकांना आपल्या खेड्यांत रहावें लागे; न राहिल्यास शिक्षाही होई. देशमुखाचें कोर्ट म्हणजे गांजणुकीची जागाच ती ! घर पडलें तर तें स्वतःच्या खर्चानें, पैसा असो नसो, प्रत्येकाला दुरुस्त करावें लागे; न केल्यास शिक्षा होई. चुकलेल्या अगर दुसऱ्याच्या शेतांत मुद्दाम घातलेल्या गुरांना कोंडवाड्यांत घातलें जाई. परंतु आपलें काम चोख बजावलें म्हणजे शेतमजुरांना देशमुखाचा फारसा त्रास होत नसे. मध्ययुगांत जिकडे तिकडे युद्धाचे ढग जमत व सर्वांस युद्धाला बोलावणें येई. यामुळें खेड्यांतील लोकांना आपल्या उद्योगाकडे लक्ष देण्यास फारसा अवसर नसे. त्यांचीं घरें पूर्वीप्रमाणेंच कोंदट, गवताचीं व मातीचीं बांधलेलीं असत. देशमुखाचा वाडा मात्र दगडी असून तो भक्कम असे. प्रत्येक शेतकऱ्याला लष्करी शिक्षण कसेंबसें मिळवावें लागे.

२. शहरीजीवन :—शहरांत राहणारे लोक स्वतंत्र, उद्योगी, उत्साही व श्रीमान असत. शहरांची लोकसंख्या मात्र फारच थोडी असे. सर्वसाधारणतः प्रत्येक शहरांत हजार ते पांच हजारांपर्यंतच वस्ती असे. प्रत्येक शहराभोंवतीं मजबूत तटबंदी असे. शहरांतील घरें माती व लाकूड यांचींच असत. नव्या नव्या शहरांतून दगडांचीं घरें बांधून त्यांवर कौलें घालण्याची प्रथा सुरू झाली होती. हीं घरें साधारणतः दोन मजली असत; व घराचा दुसरा मजला समोरच्या घराच्या मजल्याला चिकटल्यासारखा वाटे. यावरून शहरांतील रस्ते किती अरुंद, अस्वच्छ व गलिच्छ असतील याची कल्पना येईल ! वारा, हवा, उजेड यांची घरांतून व रस्त्यांतून वानवाच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे ! त्यामुळें रोगराई अनेक वेळां उद्भवे, व एकदां सुरू झाली म्हणजे ती बराच काळ राही. ड्रेनेजची पद्धति नव्हतीच. त्यामुळें अनेक ठिकाणीं घाण सांचून जी दुर्गंधी सुटे ती विचारावयासच नको ! घरें लाकडी असल्यानें आग लागल्यास ती केव्हां थांबेल तें सांगतां येत नसे. घरांना धूर जाण्याकरितां धुराडीं नसत; व त्यामुळें मन मानेल तसा प्रत्येक घरांत धूर वावरे. घराला खिडक्या जवळजवळ नसतच. आपल्या घरांपुढील पायवाटेवरील घाण काढण्याची जबाबदारी प्रत्येक घरमालकावर असे. घरांतून फर्निचर फारसें नसे. खेड्याप्रमाणेंच प्रत्येक शहरांतही देशमूख असेच. राजा, सरदार किंवा ॲबटही एखाद्या शहराचा देशमूख असूं शके. आपल्या शहरांत राहणाऱ्या लोकांचें संरक्षण करणें हें त्याचें मुख्य काम. शहराच्या बाहेर जमिनी व गायरानें असत. शेतकरी त्यावर काम करून उत्पन्नाचा ठरीव हिस्सा शहराच्या देशमुखाला देत. त्याशिवाय 'टोल' जकात, देशमुखीकोर्टातर्फे वसूल झालेला दंड, बाजाराचें उत्पन्न वगैरे प्रकारांनीं देशमुखाला उत्पन्न मिळे. प्रथमतः शहरांतील लोक स्वतंत्र नसत; परंतु पुढें पुढें शहरांतील लोकांनीं अनेक प्रकारचे अधिकार मिळवून घेतले व त्याबद्दल देशमुखाकडून त्यांना सनद ऊर्फ चार्टरही मिळे. अशा तऱ्हेची सनद प्रत्येक शहराला मिळेच असें नाहीं. ज्यांना असे अधिकार मिळत त्या प्रत्येक शहराला आपल्या गांवची व्यवस्था पाहण्याचा अधिकार मिळालेला होता. मेयर ऊर्फ अल्डरमन, त्याचा दंडधारी, कारकून व बेलीफ वगैरे अधिकारी लोकांकडून निवडले जात. मेयरला मदत करण्याकरितां चोवीस लोकांचें एक मंडळ असे; व वेळेनुसार न्यायनिवाडा करण्याकरितां ते बसत. प्रत्येक शहराला शांतता व संरक्षण याकरितां स्वतंत्र कायदेकानू करण्याचाही अधिकार असे. तसेंच प्रत्येक शहरांत आठवड्यांतून एकदां बाजार भरे व त्यावेळीं अनेक प्रकारची देवघेव होई. मात्र व्यापाराकरितां बाहेरून येणाऱ्या व्यापाऱ्यांवर सक्त नजर ठेवण्यांत येई. पेठांवार निरनिराळ्या धंद्यांचीं केन्द्रें असत. व कोणालाही वाचतां येत नसल्यानें, दुकानावर पाट्या नसून कांहीं ठराविक खुणा असत. त्यावरून दुकान कसलें तें नेमकें ओळखलें जाई !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. व्यापार, बाजार व जत्रा :—या काळांत इंग्लंडचा व्यापार फारसा जोरांत नव्हताच. कच्चा माल उत्पन्न करून तो दुसऱ्या देशांत पाठवावयाचा व निरनिराळ्या देशांतून पक्का माल आणावयाचा हा एकच महत्त्वाचा धंदा त्या वेळीं चाले. लोकर, कातडीं, जस्त, कथील वगैरे कच्चा माल इंग्लंडच्या बाहेर जाई; व लोकरीचें रंगीबेरंगी कापड, तागाचें कापड, कातडी बूट, रेशमी कापड, जरीचें कापड, तावदानाकरितां कांच, निरनिराळे हिरे, माणकें, सोनें-रुपें, दारू, सुंठ, मिरीं, दालचिनी, लवंगा वगैरे मसाल्याचे पदार्थ वगैरे अनेक प्रकारचा माल बाहेरून इंग्लंडमध्यें येत असे. व्यापाऱ्यांची सारखी धांवपळ चाले. प्रत्येक शहरांतून लहान लहान उद्योगधंदे चालू असत. परकीय देशांशीं व्यापार करणारांची चांगलीच चलती होई, व त्याला मानमरातबही चांगला मिळे. बाहेरून आलेला माल ठराविक शहरींच जाई. अशा तऱ्हेचीं लंडन, यॉर्क, विंचेस्टर, कँटरबरी, कॅले वगैरे शहरें ठरलेलीं असत. त्या ठिकाणीं त्या मालाचें मोजमाप व पाहणी होई; व मगच तो माल विक्रीकरितां ठेवला जाई. मोठमोठे व्यापारी मालाची अदलाबदल करूनच व्यापार करीत. आतांप्रमाणें पैशाची देवघेव फारच कमी प्रमाणावर होत असे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. प्रत्येक शहरीं बाजार भरेच; परंतु त्याशिवाय इतर ठिकाणींही बाजार भरे. बाजार भरविण्यास राजाची परवानगी मिळवावी लागे. बाजाराच्या दिवशीं देवघेव मोठ्या प्रमाणावर होई; व व्यापाऱ्यांनीं गिऱ्हाइकांना फसवूं नये म्हणून सरकारकडून तपासनीस नेमण्याची काळजी घेतली जाई. लबाडी केल्यास व्यापाऱ्याला शिक्षाही होई. अनेक फेरीवाले आपला माल विकण्याकरितां गांवोगांव भटकत असत. दरसाल कोणत्या ना कोणत्या ठिकाणीं वार्षिक जत्रा भरत असे. शहराच्या बाहेर अगर उघड्या


डोंबारी खेळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मैदानावर जत्रा भरत. जत्रा भरविण्याकरितांही राजाची परवानगी घ्यावी लागे. दूरदूरचे व्यापारी आपला माल खपविण्याकरितां जत्रेच्या ठिकाणीं जात. जत्रेची वेळ व मुदत अगोदरच ठरवून ठेविलेली असे. साधरणतः वसंतऋतूंत जत्रांना भर येई. प्रत्येक व्यापाऱ्याला आपल्या दुकानाचें भाडें द्यावें लागे. या जत्रांना दूरदूरचे लोक माल खरेदीकरितां येत व त्यांची एकच गर्दी होत असे ! अनेक प्रकारचा माल जत्रांतून विकला जाई.

४. पोषाख व कपडेलत्ते :—साधारणतः पुरुषाच्या पोषाखांत फारसा फरक पडला नव्हता. नॉर्मन राजवटींतील पोषाखच चालू होता. खेड्यांतील लोकांचा पोषाख साधा व त्यांच्या कामाला योग्य असाच होता. मात्र शहरांतील लोकांचा पोषाख थोडा ऐटबाज व श्रीमंती असे. ताग, रेशीम व



ससाची पारध

लोकर यांचे कपडे वापरण्याची प्रथा शहरांत फार असून खेड्यांतील लोक साधे कपडे वापरीत; पण लोकरीसह मेंढ्यांच्या कातड्यांचे कपडे करण्याची पद्धति त्या वेळीं गरिबांत फार होती. झगा व 'ट्यूनिक' नांवाचा अंगरखा हा पुरुषाचा पोषाख ठरलेला; तर सबंध अस्तन्यांचीं तंग पोलकीं व त्यावर 'स्कर्ट' अथवा परकरासारखा झगा घालण्याची स्त्रियांची पद्धति असे. बायका आपले केस मानेपर्यंतच ठेवीत व डोक्यावरून एखादें फडकें गुंडाळीत. जोगिणी अशा प्रकारचा वेष करीत. बोडकें हिंडणें त्या वेळीं असभ्य समजलें जात असल्यानें प्रत्येकजण डोकीला घातल्याशिवाय बाहेर पडत नसे.

५. अन्न व खाद्यपेयें :—त्या वेळचें अन्नही फार साधें असे. मद्य फार महाग मिळे. त्यामुळें मांस, फळें व धान्यें यांवरच लोकांची भिस्त असे. गव्हाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अथवा रायची रोटी नित्याचीच असे. गोमांस, डुकराचें अगर सशाचें मांस, कोंबडीं अथवा बदकें यांचें मांस, अंडीं, दूध, निरनिराळ्या भाज्या, फळें व रोटी हें श्रीमंत व गरीब आपापल्या ऐपतीप्रमाणें खात. मासे खाण्याचीही त्या वेळीं पद्धति होती. जिव्हालौल्य त्या वेळीं फारसें बोकाळलेलें नसल्यानें खाद्य पदार्थ ताजे पण रुचकर खाण्याकडेच सर्वांची दृष्टि होती. मद्यप्राशन करणें हें पाप समजलें जात नसलें तरी श्रीमंतांशिवाय इतरांस गरिबीमुळें मद्य क्वचितच विकत घेतां येई. त्या वेळच्या जेवणांत मोहरी, लवंगा, दालचिनी वगैरे मसाल्याचे जिन्नसही पुष्कळ प्रमाणांत वापरण्यांत येत.

६. शाळा व शिक्षण:—त्या वेळच्या लोकांना शिक्षणाची फारशी जरूरच भासत नसे. मात्र व्यापाऱ्याच्या मुलाला लिहिणें–वाचणें–हिशेब



हॉकीसारखा खेळ

ठेवणें आलें म्हणजे शिक्षणांत त्यानें फारच आघाडी मारिली असें वाटे! धार्मिक शिक्षण घेऊन ज्याला धर्मगुरू व्हावयाचें असेल त्याला मात्र शिक्षणाची आवश्यकता असे. यामुळें त्या वेळीं शिक्षणाचीं केंद्रस्थानें म्हणून धर्ममठ व मंदिरेंच समजलीं जात व तेथेंच शाळा भरत. धर्मगुरू चांगले विद्वान असल्यानें या शाळाही भरभराटीस आल्या होत्या. त्यांतून लॅटिन भाषेचें प्राथमिक ज्ञान विद्यार्थ्यांस मिळे व त्याचबरोबर संगीताचेंही थोडें-बहुत शिक्षण देण्यांत येई. याशिवाय व्याकरण पाठशाळाही बऱ्याच होत्या. त्यांतूनही लॅटिन भाषेचें प्राथमिक शिक्षण मिळे. हुषार मुलांची रवानगी विद्यापीठांकडे होत असे. मुलींना शाळांतून न पाठवितां त्यांना गृहकृत्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घरच्या घरींच तरबेज व्हावें लागे. मोठ्या सरदारकन्या मात्र मठांतून लिहिणें-वाचणें शिकत. जो तो मनुष्य आपापल्या धंद्याचें शिक्षण आपल्या मुलाला देऊन त्यांत त्याला तरबेज करीत असल्यानें बौद्धिक शिक्षणाकडे कोणाचेंही फारसें लक्ष नसे. सरदारपुत्रांचें शिक्षण मात्र प्रथमपासूनच लष्करी पेशाचें असे. घोड्यावर बसणें, तरवार चालविणें, भाला वापरणें व स्त्रियांशीं अत्यंत सभ्यतेनें बोलणें याचेंच शिक्षण त्याला देत.

७. व्यापारी मंडळें:—त्या काळचा आणखी एक विशेष म्हणजे अनेक शहरांतून व्यापारीमंडळांची स्थापना हा होय. सर्व प्रकारच्या देवघेवीवर अर्थात् व्यापारावर नियंत्रण घालण्याकरितां या संस्थेचा उदय झाला होता. निरनिराळ्या धंद्यांकरितां निरनिराळीं मंडळें स्थापण्यांत आलीं होतीं. विणकरी, कोष्टी, वाणी, शिंपी, सोनार, सुतार, लोहार, चांभार वगैरे धंद्यांत पडलेल्या माणसांचीं निरनिराळीं मंडळें असत. त्या त्या धंद्यांत असणारा त्या त्या विशिष्ट मंडळाचा सभासद असल्यानें विवक्षित धंद्यांतील सर्व लोक त्या मंडळांत येत. या मंडळाचें सभासदत्व बक्षिसही देण्यांत येत असे. स्त्रियांसही सभासद होतां येई. मात्र आपल्या धंद्यांत जे कसबी असत त्यांसच सभासद होतां येत असे. या मंडळांना कायमचें अस्तित्व मिळण्याकरितां राजमान्यतेचा शिक्का मिळवावा लागे. होतां होतां या मंडळांची संख्या बरीच वाढली व त्यामुळें त्यांचें महत्त्वही वाढलें. या मंडळाच्या सभासदांस अनेक प्रकारचे अधिकार असत. कांहीं शहरीं त्यांना टोल जकात माफ असे. त्यांचा माल खपावा म्हणून परकीय व्यापाऱ्यांवर कडक नियंत्रणें घालण्यांत येत. या मंडळांच्या श्रीमान सभासदांना शहरांत मोठा मान मिळे; व अनेक प्रसंगीं त्यांस लवाद म्हणूनही नेमीत. कामकऱ्यांच्या कामाचे तास ठरवून देण्यांत आले होते. रात्रीं व रविवारीं कोणीही काम करतां कामा नये, परकीय व्यापाऱ्याला माल कोठें मिळतो तें सांगतां कामा नये, वगैरे अनेक प्रकारचे नियम ठरविण्यांत आले होते, व ते प्रत्येक सभासदानें कसोशीनें पाळले पाहिजेत असा दंडक होता. त्या त्या धंद्यांतील माणसानें एखाद्या वाकबगार माणसाच्या हाताखालीं निदान सात वर्षें ‘ उमेदवार ’ म्हणून काम करावें व त्या धंद्यांतील कसब हस्तगत करावें. तें हस्तगत झाल्यावरच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला तो धंदा स्वतंत्रपणें करण्यास परवानगी मिळे, व मंडळाचे सभासद होतां येई. आपल्या धंद्यांतील लोक काम नीट करतात कीं नाहींत, त्यांचा माल उत्तम निघतो कीं नाहीं, तो माल योग्य किंमतीस विकला जातो कीं नाहीं वगैरे गोष्टींत मंडळांचे अधिकारी दक्षतेनें लक्ष घालीत. आजारी सभासदास मंडळ औषधपाणी देत असे; व कोणी सभासद मेल्यास त्याच्या मागें त्याच्या बायकामुलांची काळजी वहात असे. मेलेल्याचा दफनविधीही मंडळामार्फत कधीं कधीं होत असे. या मंडळांच्या सभा व्यापारीमंडळांच्या खास भव्य इमारतींत भरत.



मध्ययुगांतील वाहतुक

८. **दळणवळणाचीं साधनें**—रस्ते हेंच त्या वेळच्या व्यापाराचें मुख्य व महत्त्वाचें साधन होय. मुख्यतः पाहतां आपला धंदा सोडून व्यापाऱ्याशिवाय दुसरा कोणीही कधीं प्रवासास फारसा निघत नसे. पण निघालाच तर त्याला प्रवासांत अनेक अडचणी उत्पन्न होत. पहिली अडचण सडकांची. त्या वेळच्या सडका शक्य तितक्या वाईट असत. त्या सडकेनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गाडी जाणेंच शक्य नसे. त्यामुळें लोक व व्यापारी पायीं जात किंवा घोड्यावर बसून जात. श्रीमंत लोक मात्र गाड्यांतून प्रवास करीत. प्रवासास निघाल्यास दुसरी अडचण म्हणजे चोरांची अगर दरोडेखोरांची. यामुळें संपत्तीवरच नव्हे तर जिवावरही कधीं कधीं घाला येई. त्यामुळें कोणीही प्रवासास सहसा निघत नसे. निघाल्यास टोळ्या करून जात. एखादा प्रवास करून सुखरूप घरीं आल्यास त्याचा सत्कार होई. व त्याच्या प्रवासाच्या रम्य गोष्टी ऐकण्यास लोक नेहमीं उत्सुक असत. अर्थात् त्या वेळीं जास्त प्रवास करणारे म्हणजे यात्रेकरू व व्यापारी. परदेशांशीं व्यापार करणारांचेही फार हाल होत. समुद्रमार्गानें व्यापार करणारे फार थोडे असत. त्या वेळीं



नऊ टांचण्यांचा खेळ

परराष्ट्राशीं व्यापार करून पैसा व कीर्ति मिळविणारा प्रख्यात इटॅलियन व्यापारी म्हणजे मार्को पोलो होय. त्यानें चीनमधील कुब्लाखानाकडे जाऊन व तेथें अनेक वर्षें राहून अपार संपत्ति युरोपांत आणिली. मध्ययुगांत मोठा प्रवास करून पूर्वेकडील देशांचा त्यानेंच प्रथमतः शोध लावला असें म्हणतात. त्यानें आपलें प्रवासवर्णन मोठ्या मनोरंजकपणें लिहून ठेवलें आहे. त्याच्या पुस्तकानें लोकांत भयंकर जागृति उत्पन्न केली. कारण त्यामुळेंच पूर्वेकडील देशांचें ज्ञान युरोपीय लोकांस झालें. त्यानें ॲबिसीनिया, चीन, तार्तरी वगैरे देशांत प्रवास करून एक चौकस शोधक व जगप्रसिद्ध प्रवासी म्हणून कीर्ति मिळविली. त्यानें लिहिलेल्या पुस्तकाच्या वाचनानेंच कोलंबसाला प्रवासाची आवड उत्पन्न होऊन अज्ञात प्रदेश शोधून काढण्याची त्याला स्फूर्ति झाली असें म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. खेळ व करमणुकीचीं साधनें:—मध्ययुगांतील लोकांचा काळ युद्धांत जात असल्यानें त्यांच्या खेळांतही युद्धाचें प्रतिबिंब दिसत असल्यास नवल नाहीं. क्रौर्य हा खेळांचा विशेष समजला जाई. लटुपटीच्या लढाया ऊर्फ 'टूर्नामेंट' त्या काळीं फारच लोकप्रिय असत. या लढाया दोन विरुद्ध पक्षांत अथवा दोघा योद्ध्यांमध्येंही होत. त्या कधीं गमतीखातर होत, तर कधीं आपापसांतील वैरभाव व मत्सर यामुळेंही उत्पन्न होत. वैरभाव नसल्यास तो उत्पन्न होई हें विशेष होय. तेराव्या शतकांत टूर्नामेंटना राजानें बंदी केली होती. असें करण्यांत देशांतील यादवीचीं मुळें नाहींशीं करून शांतता निर्माण करण्याचा इंग्लिश राजांचा हेतु होता. या लढायांत स्त्रियांना भाग घेतां येत नसल्यानें त्या फक्त प्रेक्षकाचें काम करीत. कोंबड्यांची अथवा अस्वलांची अगर बैलांची झुंज लावून मजा पाहण्यांतही लोकांना आनंद वाटे! एखाद्या खांबाला बैल अथवा अस्वल बांधण्यांत येऊन त्यांवर कुत्रीं सोडीत. हीं कुत्रीं त्याला सतावून सोडीत, त्याचें अंग फाडून टाकीत व



बहिरी ससाण्याची शिकार

शेवटीं एक दोघा कुत्र्यांचा प्राण घेऊन तो अस्वल अगर बैल मरे. आणि त्यामुळें प्रेक्षकांना आनंद होई! शिकारीचा नाद मात्र स्त्री-पुरुषांना सारखाच होता. बहिरी ससाण्याची शिकार सर्वांना फार आवडे. संगीताची आवड लोकांस फार होती. त्याशिवाय नाचणें, बुद्धिबळें खेळणें, फाशांच्या साहाय्यानें जुगार खेळणें लोकांस फार आवडे. रहस्यमय पौराणिक अगर धार्मिक नाटकें पाहण्याचीही लोकांस चटक लागलेली होती. शहरांतील बाजारांत हीं नाटकें चालत. महोत्सव प्रसंगीं, क्रिस्मसमध्यें, ईस्टरमध्यें हीं नाटकें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्ममठांतून अगर कॅथीड्रलमध्येंही चालत. ‘मे’ दिन ऊर्फ ‘वसंतदिन’ मोठ्या समारंभानें साजरा करण्यांत येई. व त्या वेळीं व इतर वेळींही कुस्त्या व मुष्टियुद्धें होत. मात्र त्यामुळें दंगल फार उडे.



कुस्ती

अभ्यास

१. शहरांतील लोकांचीं घरें कशीं असत ? रस्त्यांची स्थिति कशी असे ? कांहीं शहरांना कोणकोणते अधिकार असत ? त्यांचा उपयोग काय ?
२. शहरांतून जीं व्यापारीमंडळें असत त्यासंबंधीं माहीत असलेली सर्व हकीकत सांगा. या मंडळांचा फायदा काय ?
३. त्या वेळच्या व्यापाराची स्थिति सांगा.
४. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—
बाजार, जत्रा, टूर्नामेंट, रहस्यमय नाटकें, मार्कोपोलो.
५. खेड्यांतील लोकांस देशमुखाकडून कोणत्या प्रकारचा त्रास होई ?
६. त्या वेळच्या लोकांच्या कपड्यासंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.
७. त्या वेळीं लोकांना शिक्षणाची आवश्यकता कां भासत नसे ? कोणत्या प्रकारचें शिक्षण त्या वेळीं लोकांस मिळे ? शिक्षणांत अधिक प्रगति कोणाची असे ? कां ?
८. त्या काळीं तुम्ही प्रवास करतां आहांत अशी कल्पना करा व आपल्या प्रवासाचें (त्या वेळच्या स्थितीस अनुसरून) वर्णन करा.
९. त्या वेळच्या एखाद्या माणसाकडे तुम्ही जेवावयास गेलांत अशी कल्पना करून तुम्हांस तो कोणते जिन्नस खावयास घालील तें वर्णा.
१०. त्या वेळच्या करमणुकीचीं साधनें कोणतीं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लँकॅस्टर राजवंश

२० शतसांवत्सरिक युद्धास पुन्हां सुरुवात

१. चौथा हेन्री (इ. स. १३९९–१४१३):—दुसऱ्या रिचर्डनंतर राज्याचा वारसा लँकॅस्टरच्या हेन्रीकडे आला व पार्लमेंटनेंही त्याला आपला राजा म्हणून मान्यता दिली. मार्चचा ड्यूक एडमंड मॉर्टिमर याचा खरा वारसा बाजूस सारून त्यानें राज्यपद बळकावलें होतें. "तिसऱ्या हेन्रीच्या घराण्यांत माझा जन्म झालेला असून मी इंग्लंडचें राज्य बाहुबलावर जिंकलें आहे व पार्लमेंटनेंही माझा वारसा मान्य केला आहे" असें तो सांगे. त्याच्या साथीदारांनींही त्याचीच तळी उचलली. तो लोलर्ड लोकांविरुद्ध असल्यानें धर्मगुरूंनींही त्याच्या वारशाला मान्यता दिली. एकंदरींत पाहतां त्याला इंग्लंडमधील लोकांचा, सरदारांशिवाय इतरांचा,

चौथा हेन्री

चांगला पाठिंबा मिळाला होता. धर्मासंबंधीं त्याचीं मतें पुराणमतवादी असल्यानें धर्मसंरक्षण करणें जरूर आहे असें त्याचें मत होतें. धर्मयुद्धाकरितां तो पॅलेस्टाईनमध्येंही गेलेला होता. कर्तव्यदक्ष, व्यवहारनिपुण, उद्योगी व साहसप्रिय असणारा हेन्री कधीं कधीं आपल्या भावनेच्या आहारीं ज़ात असे. 'अविश्वासानें आपण राज्य मिळविलें आहे,' अशी त्याच्या मनाला कायमची बोचणी लागलेली होती! त्यामुळें पुढें पुढें तो संशयी, ढिल्या निश्चयाचा, थोडासा सुडेल वृत्तीचा बनला. यामुळेंच त्याला पार्लमेंटला हातीं धरून कारभार हांकणें श्रेयस्कर वाटलें. कारण पार्लमेंटचा आधार तुटला तर राज्य गमावण्याची पाळी त्याच्यावर येती!

२. बंडाळी व तिचा मोडः—'हेन्रीनें राज्य बळकावलें आहे' अशी अनेकांची त्या वेळीं समजूत होती, व त्यामुळें हेन्रीला विरोध करण्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितां दुसऱ्या रिचर्डच्या वतीनें त्या वेळीं राज्यांत बंडाळी माजविण्यांत आली. रिचर्ड जिवंत असेपर्यंत आपल्याला स्तब्धता व शांतता लाभणार नाहीं असें ओळखून हेन्रीनें कैदेंत असणाऱ्या माजी राजाचा—रिचर्डचा—खून करविला असें म्हणतात! परंतु त्यानेंही बंडाळी थांबली नाहीं. रिचर्ड मेल्यावरही लोकांनीं मार्चचा ड्यूक एडमंड याच्या तर्फेनें बंडाळी माजविली. ही बंडाळी माजविण्यांत ओवेन ग्लँडोअर हा वेल्समधील एक सरदार प्रमुख होता. स्वतःला 'वेल्सचा राजपुत्र' म्हणवून घेऊन त्यानें सर्व वेल्स लोकांची सहानुभूति मिळविली; व उत्तर इंग्लंडमधील सरदारांची मदत मिळवून त्यानें हेन्रीला चांगलेंच सतावून सोडलें. तेव्हां हेन्रीनें आपला मुलगा हेन्री याला सैन्यासह त्याच्यावर पाठविलें. सन १४०३ मध्यें श्रुसबरी येथें युद्ध होऊन बंडवाल्यांचा पराभव झाला. ग्लँडोअर फ्रान्सच्या राजाच्या आश्रयास पळाला. मात्र त्याच्या साथीदारांचा वध करण्यांत आला. यानंतर सन १४०५ मध्यें उत्तरेंतील सरदारांनीं पुन्हां बंड केलें. यॉर्कचा आर्चबिशपही बंडवाल्यांस मिळाला होता. तेंही बंड हेन्रीनें मोडून टाकलें. या विजयानें देशांत शांतता प्रस्थापित होण्यास मदत झाली. परंतु ती कायमची नव्हे. पुढेंही अनेक वेळां हीं बंडें उत्पन्न होत व लयास जात. या बंडाळीच्या पोटींच पुढें झालेल्या 'गुलाबांच्या युद्धांचा' जन्म झाला असा समज आहे.

३. **हेन्री व पार्लमेंट**—हेन्रीची सर्व मदार पार्लमेंटच्या साहाय्यावरच होती; व त्यामुळेंच त्याला पार्लमेंटशीं नेहमीं नमतें घेण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. बंडाळीमुळें त्याला पैशाची नेहमीं वाण भासे. यामुळें तर त्याला प्रत्यहीं पार्लमेंटची पायधरणी करावी लागे. याचा पार्लमेंटनेंही चांगलाच फायदा करून घेतला व आपल्या हक्कांत भर घातली. प्रथमतः उधळपट्टीचा कारभार थांबवून काटकसरीचें धोरण हेन्रीनें स्वीकारलेंच होतें; कारण कर वाढविल्यास लोकांचा पाठिंबा मिळणार नाहीं हें तो जाणून होता. अशा स्थितींतच पार्लमेंटनें राज्याचा हिशेब तपासण्याचा आपला अधिकार राजाकडून सन १४०६ मध्यें मान्य करून घेतला. त्याचप्रमाणें सन १४०७ मध्यें पैशासंबंधाचीं बिलें लोकसभेमध्येंच—कॉमन्ससभेंतच—प्रथमतः चर्चेंकरितां आलीं पाहिजेत व तीं तेथें प्रथम पास झालीं पाहिजेत असा नियम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठरला व राजानेंही त्याला संमति दिली. सन १४०१ मध्यें भाषणस्वातंत्र्याचा अधिकारही पार्लमेंटनें मिळविला. सन १४०४ मध्यें व पुढें सन १४१० मध्यें राजाला सल्ला देणारें एक कायम स्वरूपाचें मंडळ पार्लमेंटनें स्थापिलें व त्यांतील सभासद पार्लमेंटनें निवडावे असें ठरलें. यामुळें राजाचे प्रधान पार्लमेंटच्या संमतीनें निवडले पाहिजेत या प्रघातास राजानें पुन्हां मान्यता दिली. पूर्वींच्या प्रिव्ही कौन्सिलची अशी पुनर्रचना झाल्यामुळें त्यावरही पार्लमेंटचा दाब राहण्यास मदत झाली.

४. लोलर्ड लोकांचा छळ :—पार्लमेंटच्या मदतीनें हेन्रीनें लोलर्ड लोकांवर हत्यार उपसलें. धर्मगुरू व सरदार यांना खूष करण्याकरितांच त्याला हें धोरण ठरविणें योग्य वाटलें. तो स्वतःही त्या पंथाविरुद्ध होताच. तेव्हां सन १४०१ मध्यें एक कायदा पास करून 'नास्तिकपणा' गुन्हा ठरविण्यांत आला व त्या अन्वयें कोणत्याही नास्तिकाला धार्मिक कोर्टांत खेचण्याचा व त्याला देहान्त शिक्षा देण्याचा अधिकार साध्या कोर्टांना देण्यांत आला. या कायद्याचा मुख्य कटाक्ष लोलर्ड लोकांविरुद्ध होता. कारण ते लोक धर्माविरुद्ध मतप्रचार करीत असत व 'सर्व लोक समान दर्जाचे आहेत.' असें सांगत. यामुळें धर्मगुरू व सरदार त्यांच्यावर रुष्ट होते. या कायद्याच्या कचाट्यांत सांपडून आपल्या धर्ममताकरितां अती छळ सोसणारा पहिला निःस्वार्थी धर्मसुधारक म्हणजे जॉन सॉट्रे हा लंडनचा एक धर्मगुरू होय. त्याच्या लोलर्डपंथीय धर्ममताकरितां त्याला खांबाला बांधून जिवंत जाळण्यांत आलें! अशाच तऱ्हेनें अनेक लोलर्ड लोकांनाही शिक्षा झाल्या. तरीही त्यांचा पंथ तगून राहिला हें विशेष होय! मात्र या कृत्यानें हेन्रीला सरदारांचा व इंग्लंडच्या धर्मपीठाचा पाठिंबा मिळाला.

५. हेन्रीचें परराष्ट्रीय धोरण :—इंग्लंडमध्यें सरदारांची बंडाळी माजली असतांच स्कॉटलंडच्या राजानें इंग्लंडवर स्वारी केली होती. हेन्रीचा वारसा आपल्याला मान्य नाहीं असें त्या देशाचा राजा म्हणत असे. यामुळें त्यानें इंग्लंडच्या सरहद्दीवर अनेक स्वाऱ्या केल्या. त्यांचा प्रतिकार करण्याचें काम पर्सी या नॉर्दंब्रियाच्या सरदाराकडे सोपविण्यांत आलें होतें. त्यानें तें काम उत्तमप्रकारें बजावलें. परंतु पकडलेल्या स्कॉटिश लोकांस हेन्रीच्या स्वाधीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केल्यानें त्याचें व हेन्रीचें वांकडें आलें. तेव्हां त्यानें आपल्या साथीदारांसह हेन्रीविरुद्ध कट रचला, पण तो मोडून टाकण्यांत आला. पुढें स्कॉटलंडचा राजपुत्र जेम्स फ्रान्सला जात असतां तो हेन्रीच्या आरमाराच्या हातीं लागला. तेव्हां त्यानें त्याला कैदेंत ठेवलें. त्यामुळें स्कॉटिश लोक त्याच्यावर चिडले. याच वेळीं फ्रान्समध्यें वरीच गडबड चालली होती. त्याचा हेन्रीनें फायदा घेण्याचें ठरविलें. फ्रेंच राजा सहावा चार्ल्स, याला वेड लागल्यानें त्या देशांत राजाचा भाऊ, ऑर्लिन्सचा लुई, याचा ऑर्लिन्स पक्ष व त्याचा व राजाचा चुलता धीरवीर फिलिप, याचा बर्गंडियन पक्ष असे दोन तट पडून त्यांच्यांत भांडणें लागलीं होतीं. हेन्रीनें कधीं या पक्षाला तर कधीं त्या पक्षाला मदत केली; व मान्यता मिळविली.

६. **हेन्रीची अखेर** (१४१३):—हेन्रीची प्रकृति अखेरी अखेरीस फारच खंगत गेली व त्यामुळें राज्यकारभाराकडेही त्याचें दुर्लक्ष होऊं लागलें. त्याचा मुख्य प्रधान आर्चबिशप अरुंडेल हा अत्यंत शाहणा व धूर्त असल्यानें त्यानें कारभार चोख केला. त्याच्या उतार वयांत राजाला त्याच्या ज्येष्ठ मुलाबद्दल वरीच चिंता उत्पन्न झाली होती. हेन्री सन १४१३ मध्यें एकाएकीं वारला. सशस्त्र लोक पदरीं बाळगण्याची सरदारांची प्रथा बंद पाडण्याकरितां त्यानें बरेच प्रयत्न केले होते. पार्लमेंटनेंही त्याविरुद्ध कायदा केला होता; परंतु हेन्रीला त्या बाबतींत फारसें यश मिळालें नाहीं. त्याच्यानंतर त्याचा मुलगा गादीवर बसला.

पांचवा हेन्री

७. **पांचवा हेन्री** (१४१३–१४२२):—राज्यावर आला त्या वेळीं त्याचें वय सव्वीस वर्षांचें होतें. मोठा शूर योद्धा व उत्तम सेनानी म्हणून त्यानें उत्तम कीर्ति मिळविलेली होती व त्या वेळचा त्याला मिळालेला युद्धाचा अनुभव त्याला फार उपयोगी पडला. लहानपणीं तो थोडा हूड असून लुच्या लोकांच्या नादीं लागलेला असल्यानें 'त्याचें कसें होईल' म्हणून त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बापाला फार काळजी लागलेली होती; परंतु राज्य मिळाल्यावर तो निवळला व मोठा कर्तव्यदक्ष, शुद्धाचरणी व कार्यंकतत्पर राजा झाला. दिसण्यांत तो नाजूक, फिकट, हळव्या मनाचा दिसत असला तरी त्याची तरतरी, स्वाभिमान व थोडा कुर्रेबाजपणा त्याला शोभून दिसत असे. तो कोणतेंही काम मोठ्या निधड्या छातीनें करीत असल्यानें त्याला सर्वत्र जय मिळत गेला. त्याच्या शौर्य–वीर्यादि गुणांबरोबरच त्याची दूरदृष्टि व संकटकाळीं डगमगून न जातां संकटांस तोंड देण्याची त्याची तयारी त्याच्या निखालस यशास कारणीभूत झाली. शिकारीचा त्याला चांगलाच शोक होता. धार्मिक बाबतींत तोही बापाप्रमाणेंच पुराणमतवादी होता. लोलर्ड पंथाबद्दल त्याचें मत चांगलें नव्हतें. त्यामुळें त्याच्या राज्यांत लोलर्ड लोकांचा छळ झाला. त्या वेळच्या लोलर्डांचा पुढारी सर जॉन ओल्डकासल याचा अत्यंत छळ झाला व पुढें त्याला फांशीही देण्यांत आलें. लोलर्डांच्या चळवळी दाबून टाकण्याचीही त्यानें शिकस्त केली व अनेकांना त्यानें फांशीं दिलें. त्यानें इंग्लंडचें आरमार सामर्थ्यवान करण्याचा बराच प्रयत्न केला, व लष्कराची व आरमाराची व्यवस्था नीट लावण्याकरितां त्यानें उत्तम प्रकारचे नियम करून दिले.

८. **फ्रान्सशीं युद्ध–कारणें** :—चौथ्या हेन्रीच्या वेळींच फ्रान्स व इंग्लंड यांच्यामध्यें धुसफूस चालू होती. बर्गंडियन पक्ष व ऑर्लिन्स पक्ष यांच्यांत त्या वेळीं फ्रान्समध्यें यादवी माजलेली होती व फ्रेंच राजा सहावा चार्ल्स याला वेड लागल्यानें वरील दोन्ही पक्षांत राजपदाकरितां मोठी चुरस लागून राहिलेली होती. अशा स्थितींत बर्गंडियन पक्षानें पांचव्या हेन्रीची मदत मागितली. तेव्हां हेन्रीनें तिसऱ्या एडवर्डच्या वेळचा फ्रान्सच्या गादीवरील आपला हक्क पुढें केला व दुसऱ्या हेन्रीच्या वेळीं इंग्लंडच्या ताब्यांत असलेल्या फ्रेंच मुलखावर व पॉइस्यू प्रांतावर आपला हक्क सांगितला. हे दोन्हीही हक्क न्याय्य नव्हते. असें असूनही पांचव्या हेन्रीनें आपला हेका सोडला नाहीं. तशांतच इंग्लंडमधील धर्मगुरूंनीं त्याचा हक्क उचलून धरून फ्रान्सबरोबर युद्ध करण्याची त्याला भर दिली. असें करण्यानें राजाचें लक्ष फ्रान्सशीं चाललेल्या युद्धांत गुंतून आपली संपत्ति व अनाचार यांजकडे त्याचें लक्ष लागणार नाहीं, असें त्यांस वाटत होतें. संपत्ति, कीर्ति व लूट यांच्या लोभानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरदारांनींही युद्धाची तळी उचलली. अशा तऱ्हेनें सर्वांनींच उचल खाल्ल्यानें हें अन्याय्य युद्ध हेन्रीला सुरू करावें लागलें. तिसऱ्या एडवर्डच्या काळीं सुरू झालेल्या शतसांवत्सरिक युद्धाचाच हा एक भाग समजला जातो.

९ फ्रान्सशीं युद्ध (सन १४१५–२२):––सर्व प्रकारची सिद्धता झाल्यावर हेन्रीनें फ्रान्सविरुद्ध १४१५ सालीं युद्ध पुकारून नॉर्मंडींतील हार्फ्लुअर हें ठाणें हस्तगत केलें. त्यानंतर तो कॅलेकडे जात असतांच अजिंकूर येथें इंग्लिश व फ्रेंच सैन्याची गांठ पडून मोठी घनघोर लढाई झाली. उपाशी व दमलेल्या नऊ हजार इंग्लिश सैन्यानें आपल्या तिरंदाजीच्या कौशल्यानें साठ हजार फ्रेंच सैन्याचा पराभव केला. या लढाईंत खुद्द ऑर्लिन्सचा ड्यूक मारला गेला. सुमारें दहा हजार फ्रेंच लोक कामास आले व चौदा हजार शत्रूच्या स्वाधीन झाले. या विजयानें फ्रेंचांचें लष्करीसामर्थ्य निःसत्त्व झालें, मोठा शूर सेनापति म्हणून हेन्रीला प्रसिद्धी मिळाली व उत्तम सैनिक म्हणून इंग्रज ओळखले जाऊं लागले. पार्लमेंटनेंही खूष होऊन पुढील युद्धाकरितां हेन्रीला आपण होऊन मोठमोठ्या देणग्या दिल्या. हेन्रीच्या पराक्रमावर त्याची प्रजा भाळूनच गेली ! यानंतर १४१७ सालीं दुसरी मोहीम सुरू करून तो नॉर्मंडींत शिरला. या वेळीं फ्रेंच यादवीला ऊत आल्यानें त्यानें नॉर्मंडी प्रांत हस्तगत केला व नंतर तो पॅरिसवर चाल करून गेला. यामुळें फ्रेंच लोक भिऊन गेले व हेन्रीशीं युद्ध न करतांच त्याच्याशीं तह करण्याची त्यांनीं तयारी दाखविली. शेवटीं सन १४१८ मध्यें ट्राइस येथें तह झाला. त्या तहानें वेड्या फ्रेंच राजाचा पांचवा हेन्री पालक झाला व फ्रेंच राज्याची मुखत्यारी त्याच्याकडे आली; तसेंच फ्रेंच राजाच्या मृत्यूनंतर हेन्रीला फ्रेंच राजपद मिळावें असें ठरलें व फ्रेंच राजकन्या कॅथरिन हिच्याबरोबर हेन्रीनें लग्न केलें. यानंतर थोड्याच दिवसांत हेन्री इंग्लंडला परत आला. पुढें सन १४२१ मध्यें त्यानें तिसरी मोहीम सुरू केली. यावेळींही त्याला सर्वत्र जय मिळाला; परंतु एकामागून एक विजय मिळत असतांच सन १४२२ मध्यें हेन्री फ्रान्समध्यें मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय अवघें पसतीस वर्षांचें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



' ज़ोस्ट ' नामक लटकी लढाई

अभ्यास.

१. लोलर्ड लोकांसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगून त्या लोकांचा छळ कशाकरितां व कोणत्या प्रकारांनीं करण्यांत आला तें सांगा.

२. राज्यावर आल्यावर चौथ्या हेन्रीला विरोध करण्याकरितां कोणीं बंडें केलीं ? त्यांचा परिणाम काय झाला ?

३. चौथ्या हेन्रीच्या कारकीर्दींत पार्लमेंटच्या अधिकारांत कोणते फरक झाले ? या वेळेपर्यंत पार्लमेंटला कोणकोणते अधिकार केव्हां केव्हां मिळाले तें तारीखवार सांगा.

४. पांचव्या हेन्रीनें फ्रान्सवर स्वारी करण्याचें कारण काय ? धर्मगुरू व उमराव यांनीं त्याला लढाईची भर कां दिली ? अजिंकूरच्या लढाईचें महत्त्व सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. पांचव्या हेन्रीचें स्वभाववर्णन करा. त्याला मोठा राजा म्हणतात तें कशाकरितां ?

६. खालीलसंबंधीं माहिती सांगा :—

ट्राइसचा तह, फ्रान्समधील बंडाळी, पर्सी, ओवेन ग्लँडोअर, सर जॉन ओल्डकासल, जॉन सॉट्रे.

७. चौथा व पांचवा हेन्री यांत तुम्हांस कोण आवडतो? कारणें द्या.

८. पहिला रिचर्ड व पांचवा हेन्री यांची तुलना करा. त्यापैकीं तुम्हांस कोण आवडतो ? कारणें द्या.

९. इ. स. १३९९–१४२२ पर्यंतचा एक कालादर्श तयार करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२१. गुलाबांच्या युद्धास सुरुवात–सहावा हेन्री

१. सहावा हेन्री (सन १४२२–१४६१)—पांचव्या हेन्रीचा सुमारें नऊ महिन्यांचा मुलगा सहावा हेन्री म्हणून गादीवर बसला. त्याचा चुलता बेडफर्डचा ड्यूक, जॉन, याला पांचव्या हेन्रीनें फ्रेंच राज्याचा पालक व इंग्लंडचा संरक्षक नेमिलें होतें. हा गृहस्थ मोठा न्यायी, हुशार व शूर होता. राजाचा दुसरा चुलता ग्लॉस्टरचा ड्यूक, हंफ्री, हा दुष्ट पुरुष होता. जॉनच्या गैरहजेरींत हंफ्रीनें इंग्लंडचा कारभार पहावा असें ठरलें होतें. राजाचा तिसरा सल्लागार म्हणजे विंचेस्टरचा बिशप, हेन्री बोफर्ट होय. राजाचा तो चुलत आजोबा लागे. तो मोठा बाका मुत्सद्दी होता. खुद्द सहावा हेन्री सत्यवादी, शुद्ध अंतःकरणाचा, साध्या वागणुकीचा, नेकीनें वागणारा व अभ्यासी असला

सहावा हेन्री

तरी राज्यकारभाराला लागणारे गुण त्याच्या अंगीं नव्हते व त्यामुळेंच त्याला आपल्या राज्याला व जीवितालाही मुकावें लागलें. आपल्या सरदारांस धाकांत ठेवणें त्याला साधलें नाहीं. यामुळें त्यांनीं इंग्लंडांत बंडाळी माजवून देशांत हैदोस घातला ! या बंडाळीबरोबरच गुलाबांच्या युद्धाची मुहूर्तमेढ रोवली गेली, असें म्हणतात. सहाव्या हेन्रीनें केंब्रिज येथें 'किंग्ज कॉलेज' व ईटनची प्रसिद्ध शाळा स्थापिली. होता त्यापेक्षांही राजाचा जरा करडा कारभार झाला असता तर उमरावांनीं बंड केलें नसतें; व फ्रेंच राज्य राजाच्या हातून गेलें नसतें ! त्याच्या इतका दुर्दैवी राजा तोच !

२. फ्रान्सशीं युद्धः आर्कची जोन—पांचव्या हेन्रीच्या पाठोपाठच फ्रान्सचा वेडा राजा सहावा चार्ल्स सन १४२२ मध्यें मरण पावला व त्यामुळें फ्रान्समध्यें पुन्हां यादवीची दंगल माजली. सहाव्या हेन्रीचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फ्रान्समधील राज्यपालक बेडफर्डचा ड्यूक अत्यंत लायक व निःस्वार्थी मुत्सद्दी होता. त्यानें इंग्लंडच्या फ्रान्समधील राज्याचें संरक्षण करण्याचा चंग बांधला होता. त्यानें बर्गंडीच्या ड्यूकशीं संगनमत करून इंग्लंडच्या फ्रेंच राज्याचें चांगलें संरक्षण व संवर्धन केलें. त्यानें अनेक लढाया मारून



इंग्लिश राज्याचा विस्तारही चांगलाच केला. पुढें सन १४२८ मध्यें ऑर्लिन्स नामक एका मोठ्या बळकट शहरावर त्यानें चाल केली. फ्रेंच सैन्य मोठ्या फिकीरींत असतां अचानकपणें त्या सैन्याला मोठी मदत मिळून ऑर्लिन्सचें संरक्षण झालें. या वेळीं ज्या स्त्रीनें मोठा पराक्रम गाजविला ती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आर्कची जोन ही होय. एका साध्या शेतकऱ्याची ती मुलगी. ती अति भाविक होती. 'आपल्या हातूनच फ्रान्सचें स्वातंत्र्य रक्षिलें जाणार' असा देवाचा आदेश झाल्याचें व 'मोठमोठ्या संतमहंतांनीं हातीं शस्त्र घेऊन आपणांस देशाचें स्वातंत्र्य रक्षिण्यास सांगितलें आहे,' असें ती लोकांस सांगूं लागली. तिच्यावर प्रथमतः कोणीही विश्वास ठेवीना. पण तिचा उत्साह, तिची कळकळ व आस्था पाहून खुद्द फ्रेंच राजपुत्रालाही मोठा अचंबा वाटला; व तिच्याकडे त्यानें आपल्या सैन्याचें आधिपत्य दिलें. शुभ्र चिलखत अंगावर चढवून व शुभ्र निशाण हातीं धारण करून एखाद्या शूर व पराक्रमी वीराप्रमाणें ती ऑर्लिन्सकडे निघाली. त्यामुळें फ्रेंच वीरांनाही स्फुरण चढलें. मोठ्या त्वेषानें लढून तिनें ऑर्लिन्सभोंवतीं इंग्रजांनीं घातलेला वेढा उठविला (१४२९); व पुढेंही अनेक लढायांत तिनें इंग्रजांचा पराभव केला. त्यामुळें इंग्रजांस ती चेटकीसारखी, फ्रेंच राजाला व उमरावांना देवदूताप्रमाणें व एकंदर फ्रेंच जनतेला प्रत्यक्ष देवतेप्रमाणें वाटली! इतका पराक्रम केल्यावर तिनें राजपुत्राला सन १४२९ मध्यें ऱ्हीम्स येथें सातवा चार्ल्स म्हणून राज्याभिषेक करविला. पुढें पॅरिस शहरास वेढा घालीत असतांच फंदफितुरी होऊन ती सन १४३१ मध्यें इंग्रजांच्या हातीं आली. तेव्हां त्यांनीं तिला चेटकी समजून जिवंत जाळलें! त्या वेळीं ती अवघी एकोणीस वर्षांची होती. याचा परिणाम म्हणूनच कीं काय यानंतर इंग्लिशांचा जिकडे तिकडे पराभव होऊं लागला. प्रांतामागून प्रांत फ्रेंच लोक सर करूं लागले; व सन १४५० च्या सुमारास कॅले बंदराखेरीज कोणताही भाग इंग्लिशांच्या ताब्यांत राहिला नाहीं. आर्कच्या जोनच्या पराक्रमानें फ्रेंच सैन्यांत जी वीरश्री संचारली त्यामुळेंच त्यांना एवढा पराक्रम करतां आला; तसेंच त्यांच्यांत राष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न होऊन त्यांच्यांत एकी उत्पन्न झाली व त्यांस आपलें स्वातंत्र्य परत मिळवितां आलें. सुमारें पांचशें वर्षांनीं या स्वातंत्र्यलक्ष्मीला रोमच्या पोपनें संतमालिकेंत सन १९१९ सालीं बसविलें! या लढायांनंतर शतसांवत्सरिक युद्ध संपलें असें मानतात.

३. शतसांवत्सरिक युद्धाचे परिणाम:—या युद्धामुळें स्कॉटलंडचें स्वातंत्र्य अबाधित राहिलें. कारण फ्रेंच युद्धांत गुंतल्यामुळें इंग्लिश मुत्स-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्यांस त्या देशाकडे पाहण्यासच वेळ मिळाला नाहीं. खुद्द फ्रान्स देशास एकीचें महत्त्व पटून त्यांच्यामध्यें राष्ट्रीयवृत्ति बाणली. आत्मसंरक्षणार्थ भाडोत्री फौजेपेक्षां खडी फौज ठेवणें श्रेयस्कर होय असें वाटल्यानें फ्रान्स-मध्यें उत्तम प्रकारची खडी फौज निर्माण झाली. त्यामुळें पुढें लष्करीदृष्टीनें फ्रान्स फार प्रबळ झाला. खुद्द इंग्लिश पार्लमेंटची सत्ता वाढण्यासही अप्रत्यक्षपणें मदत झाली; कारण पैशाकरितां सरकारला पार्लमेंटची नेहमीं पायधरणी करावीं लागे; व प्रत्येक वेळीं पार्लमेंटनें आपले अधिकार व हक्क वाढवून घेण्यास कमी केलें नाहीं. फ्रेंच युद्धांत अपयश आल्यानें सरकारावर कोणाचाही विश्वास बसेना. कराच्या रूपानें निरनिराळ्या वेळीं जनतेकडून पैसा पिळून काढल्यानेंही सर्व प्रजा असंतुष्ट झाली होती. तशांतच सशस्त्र शिपाई पदरीं बाळगून सरदारही लोकांना सतावून सोडीत. यामुळें राज्य-कारभारांतही अनेक घोटाळे माजले. युद्धांत गुंतलेले अनेक सरदार मोकळे झाले व त्यांचा युद्धाचा कैफ अजूनही उतरलेला नसल्यानें ते जास्तच चेकाळले ! तशांतच त्यांच्या पदरीं जे अनेक सशस्त्र शिपाई असत त्यांच्या सामर्थ्यावर विसंबून राहून ते सरदार आपापसांत मारामाऱ्या व लढायाही करूं लागले. यामुळें देशाचें स्वास्थ्य नष्ट झालें. कायद्याला कोणीच जुमा-नीना ! पगार थकल्यानें लष्करांतील लोकही बिथरले; व कायदा धुडकावून लावून ते चोऱ्यामाऱ्या व दंगेधोपे करूं लागले. या सर्व गोष्टींमुळें देशभर जिकडे तिकडे असंतोष पसरूं लागला; व लोक हवालदील झाले. ही अनिष्ट स्थिति वरींच वर्षे टिकली व त्यांतूनच पुढें 'गुलाबांचीं युद्धें' उत्पन्न झालीं.

४. राज्यकारभारांतील घोटाळे:—फ्रान्सशीं युद्ध चालू असतांच इंग्लंडमध्यें यादवीचीं मुळें खोलवर जाऊं लागलीं होतीं. खुद्द इंग्लंडमध्यें ग्लॉस्टरचा ड्यूक सर्वसत्ताधारी होता व फ्रेंच युद्धाचीं सर्व सूत्रें बेडफर्डचा ड्यूक हालवी. विजयाच्या भरांत त्यानें सन १४३० मध्यें सहाव्या हेन्रीला फ्रान्सचा राजा म्हणून पॅरिसला राज्याभिषेकही केला होता. परंतु बेडफर्डचा ड्यूक सन १४३५ सालीं वारला. त्याच्यानंतर इंग्लंडमध्यें ग्लॉस्टरचा ड्यूक व विंचेस्टरचा बिशप, हेन्री बोफर्ट, यांच्यामध्यें लढा लागला. सन १४४५ मध्यें बोफर्टनें अँज्यूच्या सरदारकन्येशीं—मार्गारेटशीं—सहाव्या हेन्रीचें लग्न लावून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिल्यानें बोफर्टला राणीचा पाठिंबा होता. त्यामुळें त्यानें ग्लॉस्टरवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्याला तुरुंगांत ठेवलें. तेथेंच सन १४४७ मध्यें तो मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांत हेन्री बोफर्टही मृत्यु पावल्यानें सर्व कारभार सफकचा अर्ल विल्यम पोल याच्या हातीं आला. हा मोठा धूर्त व कावेबाज होता. त्याचा कारभार लोकांना न आवडल्यानें तो लोकांत फारच अप्रिय झाला. विशेषतः फ्रेंच युद्धांत अपयश येण्यास सफकचा अयशस्वी कारभारच कारण होय अशी लोकांची दृढ समजूत झाली होती. तशांतच युद्ध थांबल्यावर देशांत जे अत्याचार माजले त्याचें खापरही त्याच्याच माथीं फोडण्यांत आलें. यामुळें पार्लमेंटपुढें त्याची चौकशी होऊन त्याला हद्दपारीची शिक्षा झाली. परंतु कॅलेला जात असतांच बोटीवर सन १४५० मध्यें त्याचा खून झाला.

५. मताधिकारांत फरक—राज्यकारभारांतील हे घोटाळे चालू असतां व देशांत दंगेधोपे व अत्याचार थैमान घालीत असतांच लोकांच्या मतदानाच्या अधिकारांत मोठा महत्त्वाचा फरक करण्यांत आला. सन १४३० मध्यें पार्लमेंटनें कायदा पास करून ज्यांचें वार्षिक उत्पन्न चाळीस शिलिंग आहे अशा सर्व मिरासदार शेतकऱ्यांस पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं मतदानाचा अधिकार दिला. या कायद्यानें पट्टेदार व शेतमजूर यांना जो मतदानाचा अधिकार पूर्वी मिळालेला होता तो नष्ट करण्यांत आला. पूर्वी मत देणारावर उत्पन्नाची अटही लादण्यांत आलेली नव्हती; ती नव्या क़ायद्यानें लादली. अर्थात् नव्या कायद्यानें लोकसभेंत फारच थोड्या लोकांचे प्रतिनिधी येऊं लागले; उमरावमंडळांत त्याहूनही थोडे असत. या नव्या कायद्याप्रमाणेंच सन १८३२ पर्यंत पार्लमेंटच्या निवडणुकी होत असत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

६. जॅक केडचें बंड (सन १४५०):—सफकच्या खुनानंतर केंट परगण्यांतील लोकांनीं बंड पुकारलें. जॅक केड नांवाचा कोणी एक आयरिश इसम बंडवाल्यांचा पुढारी बनला. तो स्वतःला मॉर्टिमर म्हणवीत असे. यॉर्कच्या ड्यूकचा तो चहाता असून त्याच्या नेतृत्वाखालीं त्यानें फ्रान्समध्यें मर्दुमकी गाजविली होती. जॅक केडनें बंड उभारल्याबरोबर केंट, सरे व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ससेक्स परगण्यांतील लोक त्याच्या निशाणाखालीं जमा झाले. या बंडाला अनेक कारणें झालीं. सफकच्या खुनानंतर यॉर्कच्या ड्यूकला प्रधानमंडळांत घेतलेलें नव्हतें. राजाच्या प्रधानमंडळाचें युद्धविषयक धोरण नीट नसल्यानेंच इंग्लंडचा युद्धांत पराभव झाला असा लोकांचा समज होता. सरकारी अधिकारी व सरदारही गरिबांकडून मोठ्या जुलुमानें पैसे उकळीत असत. तशांतच प्रधानमंडळानें बसविलेले करही जाचक होते. तेव्हां ' प्रधानमंडळ काटकसरीनें कारभार करीत नसल्यानें राज्यकारभार सुधारण्याकरितां व लोकांचीं दुःखें व त्यांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याकरितां आम्ही प्रयत्न करीत आहोंत. ' असें बंडवाले म्हणत होते. हां हां म्हणतां बंडवाल्यांची संख्या वीस हजारांवर गेली; व ते लंडनवर चालून गेले. ' सफकच्या साथीदारांस प्रधानमंडळांतून हुसकून लावावें, यॉर्कच्या ड्यूकला प्रधानमंडळांत घ्यावें, शेतकऱ्यांविरुद्ध असलेला मजुरीसंबंधाचा कायदा रद्द करावा ' वगैरे मागण्यांचा एक अर्ज बंडवाल्यांनीं राजाकडे पाठवून दिला; परंतु तो धुडकावून लावून प्रधानमंडळानें सर हंफ्री व विल्यम स्टॅफर्ड यांच्या नेतृत्वाखालीं बंडवाल्यावर सैन्य पाठवून दिलें. या सैन्याचा ' सेव्हन ओक्स ' येथें बंडवाल्यांनीं पराभव केला. विजयानें आनंदून बंडवाले लंडनमध्यें शिरले व तेथें अनेक अधिकाऱ्यांचे त्यांनीं खून केले, सावकारांचीं घरें लुटलीं व ते जाळपोळ करूं लागले. तेव्हां सर्व लंडनवासी लोक खवळून बंडवाल्यांवर चालून गेले व त्यांचा पराभव केला. जॅक केड पळून जात असतां त्यालाही पकडून ठार मारण्यांत आलें. या बंडानें राज्यकारभारास लोक किती विटले होते व त्या वेळीं राजसत्ता किती दुबळी झाली होती हें लोकांच्या चांगलेंच निदर्शनास आलें.

७. यादवीचा उद्भव :—या बंडानंतरच सॉमरसेटचा अर्ल एडमंड बोफर्ट हा मुख्य प्रधान नेमला गेला. त्यालाही राणीचा पाठिंबा होता. या वेळेपर्यंत राजाला मुलगा नसल्यानें त्याच्यामागून यॉर्कचा ड्यूक रिचर्ड हाच खरा वारस होता. राणी त्याचा दुष्टावा करी व ' तो लंडनपासून जितका दूर राहील तितका बरा,' असें तिला वाटे. त्यामुळें त्याला तिनें आयर्लंडचा गव्हर्नर म्हणून पाठविलें. त्याला राज्यपद मिळावें अशी लोकांचीही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इच्छा होती. पार्लमेंटमध्यें त्या गोष्टीसंबंधीं चर्चा झाली, परंतु त्याचा उपयोग नाहीं असें पाहून सन १४५२ मध्यें सॉमरसेटला कमी करण्याचा



इ. स. १०००-१५०० पर्यंत वाहतुकीच्या साधनांत झालेला फरक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रिचर्डनें राजाला सल्ला दिला. परंतु राजानें तो ऐकला नाहीं. याच सुमारास राजा आजारी पडला तेव्हां प्रिव्ही कौन्सिलनें सॉमरसेटला पकडून कैदेंत टाकलें व सर्व सत्ता यॉर्कच्या ड्यूकच्या हातीं आली. दुर्दैवानें सहाव्या हेन्रीला याच वेळीं मुलगा झाल्यानें इंग्लंडची गादी मिळण्याबद्दलची यॉर्कच्या ड्यूकची आशा लोपली. थोड्याच दिवसांत बरा झाल्यावर राजानें यॉर्कच्या ड्यूकला कमी करून सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली. यामुळें तो बिथरला. राणी व सॉमरसेट यांचा जम आहे तोंपर्यंत आपला जम बसणें शक्य नाहीं असें वाटल्यावरून त्यानें राजाविरुद्ध बंड पुकारलें; व आपल्या साथीदारांसह तो लंडनवर चाल करून गेला. यामुळें यादवी युद्ध सुरू झालें. यॉर्कच्या ड्यूकच्या पक्षाची खूण पांढऱ्या गुलाबाचें फूल होतें व राजाच्या पक्षाची म्हणजे लँकेस्टरपक्षाची खूण तांबड्या गुलाबाचें फूल होय. त्यावरून या दोन्ही पक्षांत जें युद्ध झालें त्याला ‘ गुलाबांचें युद्ध ’ म्हणतात. यॉर्क पक्षाचा राज्यावरील वारसा सरस असल्यानें त्या पक्षाला राष्ट्राचा पाठिंबा होता.

८. **गुलाबांचें युद्ध** (सन १४५५–१४८५):—सन १४५५ मध्यें सेंट आल्बन्स येथें दोन्ही सैन्यांची पहिली सलामी झडली. त्यांत सॉमरसेट मारला जाऊन यॉर्कच्या पक्षाला जयश्रीनें माळ घातली. राजाही त्या पक्षाच्या हातीं लागला. त्यामुळें यॉर्कच्या ड्यूकला शरण जाण्याशिवाय राजाला गत्यंतरच नव्हतें. परंतु त्याच वर्षी हेन्री आजारी पडल्यामुळें त्यानें यॉर्कच्या ड्यूकला राज्य-पालक नेमलें. पुढच्याच वर्षी हेन्री बरा झाला व राणीच्या सांगण्यावरून त्यानें यॉर्कच्या ड्यूकला कामावरून कमी केलें. त्यावरून पुन्हां लढाईस सुरुवात झाली. या वेळीं राजपक्षाला यश मिळालें. तेव्हां यॉर्कचा ड्यूक आयर्लंडांत पळून गेला. सन १४६० मध्यें झालेल्या लढाईत राजा पुन्हां पकडला गेला. तेव्हां राणी आपल्या मुलाला घेऊन स्कॉटलंडांत पळून गेली. त्यामुळें पार्लमेंटनेंही यॉर्कच्या ड्यूकचा वारसा मान्य केला. तेव्हां चिडून जाऊन राणी यॉर्क पक्षावर चालून आली. वेकफील्ड येथें लढाई होऊन यॉर्कपक्षाचा पराभव झाला व रिचर्डही कामास आला. यामुळें धीर खचूं न देतां यार्क पक्षीयांनीं रिचर्डचा मुलगा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एडवर्ड याला पुढें करून सन १४६१ मध्यें लँकॅस्टर पक्षाचा पुरा मोड केला. शेवटीं यॉर्क पक्षीयांनीं त्याच वर्षी एडवर्डला राज्याभिषेक केला. यामुळें लँकॅस्टर घराण्याचा अंत होऊन इंग्लंडांत यॉर्क राजवंश सुरू झाला. गुलाबांच्या युद्धाचा पहिला भाग समाप्त होऊन सहाव्या हेन्रीच्या दुर्दैवाच्या लीला सुरू झाल्या.

अभ्यास

१. ऑर्कच्या जोनचें चरित्र थोडक्यांत सांगा. तिच्या कामगिरीचें महत्त्व वर्णा.

२. शतसांवत्सरिक युद्धाचे परिणाम सांगा.

३. सहाव्या हेन्रीला पदच्युत होण्यास तो स्वतः, त्याची राणी व यॉर्कचा ड्यूक हे कितपत कारणीभूत झाले ?

४. गुलाबांच्या युद्धाचीं कारणें सांगा. या युद्धाला सरदारांचीं आपापसांतील वैमनस्यें व सरकारी कारभार कितपत कारणीभूत झाला ? स्पष्ट करा.

५. जॅक केडच्या बंडाचीं कारणें सांगा. बंडवाल्यांच्या मागण्या कोणत्या होत्या ? बंडाचा परिणाम काय झाला ?

६. खालील व्यक्तींसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा. आर्कची जोन, बेडफर्डचा ड्यूक, सफक, जॅक केड, ग्लॉस्टरचा ड्यूक, वोफर्ट.

७. स्थापनेपासून पार्लमेंटचा थोडक्यांत इतिहास सांगा. सहाव्या हेन्रीच्या कारकीर्दीत मतदानांत कोणता फरक झाला ? त्याचा परिणाम सांगा.

८. खालील ठिकाणें नकाशांत भरा; व एका वाक्यांत त्यांचें महत्त्व सांगा:— केंब्रिज, ईटन, ऑर्लिन्स, पॅरिस, सेंट आल्बन्स, अजिंकूर, हार्फ्लुअर, ट्राईस, श्रुसबरी, वेकफील्ड.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—इ. स. १४००–१४६१.			
वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ती	हिंदुस्थान—महत्त्वाच्या गोष्टी
१३९९–१४१३	**चौथा हेन्री**		
१४०६–७	पार्लमेंटला आर्थिक अधिकार	तैमूरलंग	१४०५ तैमूरलंगाचा मृत्यु
	१४१३–१४२२ **पांचवा हेन्री**		
१४१८	ट्राइसचा तह		१४१४–५० सैय्यद घराणें
१४२२–६१	**सहावा हेन्री**		
१४२८	ऑर्लीन्सचा वेढा	आर्कची जोन	
१४३०	मताधिकारांत फरक		
१४३१	आर्कच्या जोनला जिवंत जाळलें.	जॉन गटेन्बर्ग	
१४५०	जॅक केडचें बंड		१४५०–१५२६ लोदी घराणें
१४५५–८५	गुलाबांचीं युद्धें		१४५१–८८ बहलोल लोदी

उतारे

१. आर्कच्या जोनचा जाहीरनामा–१४२८.

'हे इंग्लंडच्या राजा, व त्याचे सरदारहो, परमेश्वराला शरण जा व तुम्ही जिंकून उध्वस्त केलेल्या शहरांच्या किल्ल्या परमेश्वरानें पाठविलेल्या या स्त्रीच्या स्वाधीन करा. ईश्वराच्या आज्ञेनुसार फ्रान्सचें राजघराणें पुन्हां स्थापन करण्या-करितां माझा अवतार आहे. न्यायानें वागण्यास तुम्ही तयार असाल तर मी तह करावयास हरकत घेणार नाहीं. मात्र तसें करण्यापूर्वी तुम्ही जी मालमत्ता लुटली ती परत करा, तुम्ही जो नाश केला त्याची भरपाई होऊं द्या व हा देश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताबडतोब सोडून आपल्या देशास जा. या गोष्टी कराल तरच तह संभवनीय आहे. ऑर्लिन्स शहरास वेढा देणाऱ्या इंग्लिश सैनिकांनो व तिरंदाजांनो, देवाची शपथ घेऊन मी असें जाहीर करतें, कीं हा देश तुम्ही न सोडाल तर तुमच्यावर आपत्ती कोसळतील व त्याही एका स्त्रीकडून हें निश्चित समजा. हे इंग्लंडच्या राजा, तूं व तुझे लोक हा देश सोडून न जातील तर फ्रान्समध्यें ते जेथें जेथें सांपडतील तेथें तेथें मी त्यांच्याशीं लढेन, त्यांचा पाठलाग करीन, त्यांना देश सोडावयास लावीन व जे माझें ऐकणार नाहींत त्यांचा शिरच्छेद करीन. तुला व तुझ्या लोकांना या देशांत फार वेळ राहतां येणें अशक्य आहे; कारण चार्ल्सनें फ्रान्सचा राजा व्हावें व तूं होऊं नयेस अशी परमेश्वराची इच्छा आहे. त्याप्रमाणें मी त्याला मोठ्या समारंभानें पॅरिसला नेऊन राज्यावर बसविल्याशिवाय कधींही राहणार नाहीं.'

प्रश्न :—१. वरील जाहीरमाम्यावरून जोनचा मुख्य हेतु कोणता दिसतो ?
२. तिच्या म्हणण्याप्रमाणें इंग्लिश लोक फ्रान्स सोडून गेले नसते तर काय झालें असतें ?
३. ती तह करावयास कोणत्या अटीवर तयार होती ? या अटी इंग्रजांनीं मानल्या असत्या का ? मानल्या का ? कां नाहीं ?

२. केवळ गुलाबांच्या फुलांमुळें !

सहाव्या हेन्रीची कारकीर्द अतीशय वाईट झाली. त्यांतच त्याला एकतीस वर्षांपर्यंत मूल न झाल्यानें त्याच्यानंतर राजा कोण होणार याबद्दल लोकांमध्यें बरीच भवती न भवती सुरु झाली. त्यावेळीं सॉमरसेटचा ड्यूक व यॉर्कचा ड्यूक या दोघांमध्यें गादीबद्दल तंटा उत्पन्न झाला. सॉमरसेटच्या ड्यूकचा वारसा पार्लमेंटनें अगोदरच अमान्य केला होता; त्यामुळें यॉर्कच्या ड्यूकला पुष्कळच आशा होती. एके दिवशीं दोघेही 'टेंपल' नांवाच्या लंडनमधील गुलाबांच्या बागेंत सहज सहल करीत असतां इंग्लंडच्या गादीवरील आपल्या वारशाबद्दल त्यांच्यामध्यें बरीच खडाजंगी उडाली. तेव्हां तेथें जमलेल्या इतर सरदारांस उद्देशून यॉर्कचा ड्यूक म्हणाला, 'माझ्या खुणेचें म्हणून मी पांढऱ्या गुलाबाचें फूल खुडीत आहें. ज्यांना माझ्याबद्दल व माझ्या यॉर्क घराण्याबद्दल आदर व प्रेम वाटत असेल ते पांढऱ्या गुलाबाचें फूल खुडून माझें चिन्ह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

128



ENGLISH GOLD COINS.

1. Henry III, gold penny; 2. Edward III, noble; 3. Henry VI, angel; 4. Henry VII, sovereign; 5. Charles II, guinea

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून वापरतील. ' त्याचवेळीं त्यांना उद्देशून सॉमरसेटचा ड्यूकही म्हणाला, ' माझी खूण तांबड्या गुलाबाचें फूल. लँकॅस्टर घराण्याबद्दल व माझ्याबद्दल ज्यांना आदर व प्रेम वाटत असेल तें तांबड्या गुलाबाचें फूल खुडून तें माझें चिन्ह म्हणून वापरतील. ' या त्यांच्या भाषणानंतर कांहींनीं पांढऱ्या व कांहींनीं तांबड्या गुलाबाचें फूल खुडून तें धारण केलें. त्यामुळें तेथें दोन्ही पक्ष उत्पन्न झाले. या दोन्ही पक्षांतच पुढें जें यादवी युद्ध झालें त्याला ' गुलाबांचें युद्ध ' असें म्हणतात. सहावा हेन्री व त्याची राणी मार्गारेट यांनीं सॉमरसेटच्या ड्यूकचा पक्ष स्वीकारला होता.

प्रश्न :— १. वरील गोष्टींमुळें तुम्हांस काय बोध होतो ? सॉमरसेटचा ड्यूक व यॉर्कचा ड्यूक यांच्यांत भांडण कां झालें ? त्याचा परिणाम काय झाला ?

२. वरील दोन्ही पक्षांमध्यें जें यादवी युद्ध झालें त्याला ' गुलाबांचें युद्ध ' कां म्हणतात ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२२. यॉर्क घराण्यांतील राजे—गुलाबांच्या युद्धांचा शेवट

१. चौथा एडवर्ड (इ. स. १४६१–१४८३):—इंग्लंडचा नवा राजा एडवर्ड मोठा कुशल योद्धा, व्यवहारनिपुण व दक्ष राज्यकर्ता होता. राज्यावर आला त्या वेळीं त्याचें वय अवघें एकोणीस वर्षांचें होतें. 'सामान्य जनतेच्या गळ्यांतील ताईत व सरदारांचा काळ' अशी त्याची कीर्ति होती व ती सार्थ होती. त्या वेळच्या अनीतिमान वातावरणांत वाढूनही तो आचरणाचा बराच निग्रही व चांगल्या वागणुकीचा होता. समरभूमीवर एखाद्या राजाप्रमाणें लढण्यापेक्षां साध्या पण शूर योद्धयाप्रमाणें लढण्यांत त्याला भूषण वाटे. तो राज्यावर आला त्यावेळीं गुलाबांचें युद्ध थांबलेलें नव्हतें; उलट त्याला तेजच चढलें. सहाव्या हेन्रीची राणी मार्गारेट ही मोठी महत्त्वाकांक्षी व धूर्त स्त्री असल्यानें तिनें त्याला सतावून सोडलें; पण तोही तिला पुरून उरला. इंग्लंडच्या उत्तरेकडील परगणे राणीच्या बाजूचे असून दक्षिणेकडील परगणे एडवर्डच्या बाजूचे होते. राज्याभिषेकानंतर थोड्याच दिवसांत लढाईस पुन्हां तोंड लागलें; व एडवर्डनें सन १४६१ मध्यें टाऊटन येथें प्रतिपक्षावर मोठा विजय मिळविला. त्यामुळें आपल्या मुलाला घेऊन नवऱ्यासह राणी स्कॉटलंडांत पळून गेली. स्कॉटलंडचा राजा व फ्रान्सचा राजा यांच्याकडून मदत मिळवून तिनें एडवर्डशीं पुन्हां लढाई दिली. तेव्हां सन १४६४ मध्यें हेन्लेमूर व हेक्झेम येथें तिचा पराभव होऊन ती फ्रान्समध्यें आश्रयार्थ आपल्या मुलासह पळून गेली. पुढच्याच वर्षीं विश्वासघातानें सहावा हेन्री एडवर्डच्या हातीं लागला व त्यानें त्याला लंडनच्या टॉवरमध्यें कैदेंत ठेवलें.

२. वॉरिकच्या अर्लशीं लढा:—आपल्या शत्रूंवर अशा तऱ्हेनें विजय मिळवीत असतांच एडवर्डला आपल्या एका सरदाराशीं दोन हात करावे लागले. लढाईच्या कामांत व राज्य मिळवून देण्याच्या कामीं त्याला मदत करणारा वॉरिकचा अर्ल होय. मोठा कर्तबगार मुत्सद्दी व उत्तम योद्धा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून त्याची कीर्ति होती. आपल्यामुळें एडवर्डला राज्य मिळाल्यानें सर्व सत्ता आपल्या हातीं असावी अशी त्याची इच्छा होती. परंतु एडवर्ड मोठा मानी असल्यानें वॉरिकच्या हातचें बाहुलें होऊन राहणें त्याला बरें वाटलें नाहीं. वॉरिकच्या मनांतून एडवर्डनें एका फ्रेंच राजकन्येबरोबर लग्न करावें असें होतें. असें घडल्यास तिच्यातर्फे सर्व राज्यकारभार आपल्या हातीं ठेवतां येईल असें वॉरिकला वाटत होतें. परंतु एडवर्डनें तें न ऐकतां एलिझाबेथ नांवाच्या एका सरदार कन्येशीं वॉरिकला न कळवतांच एकाएकीं लग्न केलें. तसेंच तो आपल्या मर्जीप्रमाणें आपले प्रधान नेमी व काढून टाकी. या गोष्टी वॉरिकला आवडत नसत व तो आपला डाव टाकण्यास संधीची वाट पहात होता. शेवटीं सन १४६९ मध्यें त्यानें एडवर्डचा भाऊ, क्लॅरेन्सचा ड्यूक, जॉर्ज, याच्याबरोबर आपल्या मुलीचें लग्न लावून दिलें. व त्याच्या साहाय्यानें एडवर्डला पदच्युत करण्याकरितां त्यानें एक कट रचला. त्यांत त्याला यश येऊन राजा त्याच्या हातीं सांपडला. तेव्हां त्यानें त्याला कैदेंत टाकलें. एडवर्डची लोकप्रियता लक्षांत घेऊन त्याला कैदेंत ठेवणें सोपें नाहीं असें आढळून आल्यानें त्यानें त्याला सन १४७० मध्यें सोडून दिलें. तेव्हां आपल्यावर एडवर्ड हत्यार उपशील या भीतीनें वॉरिक व त्याचा जांवई फ्रान्समध्यें पळून जाऊन त्यांनीं मार्गारेटशीं सलोखा जोडला; व मोठ्या सैन्यासह सन १४७१ मध्यें त्यांनीं एडवर्डवर चाल केली. पळून जाण्याशिवाय गत्यंतर नाहीं असें पाहून एडवर्ड फ्लँडर्समध्यें आपल्या मेहुण्याकडे पळून गेला. तेव्हां वॉरिकनें कैदेंतून मुक्त करून सहाव्या हेन्रीला राज्यपदावर बसविलें. औट घटकांचें हें राज्य हेन्रीला पचलें नाहीं; कारण थोड्याच दिवसांत एडवर्ड मोठ्या सैन्यासह इंग्लंडांत आला. तेव्हां अनेक यॉर्कपंथीय लोक त्याला मिळाले. त्याचा भाऊ क्लॅरेन्सचा ड्यूकही वॉरिकचा पक्ष सोडून त्याला मिळाला. या सर्वांनीं वॉरिकला बार्नेट येथें सन १४७१ मध्यें गांठून लढाई दिली त्यांत वॉरिक मारला गेला. त्याच वेळीं फ्रान्सच्या राजाची मदत घेऊन मार्गारेटही इंग्लंडांत उतरली. ट्यूकसबरी येथें मोठी लढाई झाली. तींत तिचा पराभव होऊन तिचा मुलगा मारला गेला. तिलाही एडवर्डनें कैद केलें व लंडनच्या टॉवरमध्यें ठेवून दिलें. तेथें ती चार वर्षें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

होती. सन १४७१ मध्यें दुर्दैवी राजा सहावा हेन्रीही मरण पावला. गुलाबांच्या युद्धांचा दुसरा भाग येथें संपतो.

३. एडवर्डचा कारभार :—यानंतर एडवर्डला शत्रु राहिला नाहीं. त्यामुळें त्याला स्वास्थ्य मिळालें; परंतु सन १४७५ मध्यें फ्रान्सच्या गादीवर हक्क सांगून त्या देशावर त्यानें हल्ला केला. लढाई नको म्हणून फ्रेंच राजानें त्याच्याशीं तह करून दरसाल सुमारें १३००० पौंड खंडणी देण्याचें व तहाच्या वेळीं १९००० पौंड देण्याचें त्यानें कबूल केलें. उलट मार्गारेटला कैदेंतून मुक्त करण्याचें एडवर्डनें कबूल केलें. युद्धानंतर देशांत शांतता निर्माण झाल्यानें व एडवर्डनें फ्लँडर्सच्या राजाशीं आपल्या बहिणीचें लग्न लावून दिल्यानें फ्लँडर्स व इंग्लंड या देशामधील लोकरीचा व्यापार पूर्ववत चालू झाला. हा व्यापार वाढल्यानें इंग्लंडच्या नाविक दळणवळणास प्रोत्साहन मिळालें. खुद्द इंग्लंडमधील व्यापाऱ्यांचा व्यापार, व उद्योगधंदे जोरांत चालू झाल्यानें देशांत संपत्ति खेळूं लागली. मध्यमवर्गीतील लोकांना हाताशीं धरून त्यांना पुढें आणण्याचें धोरण एडवर्डनें स्वीकारल्यानें तो वर्ग पुढें आला. गुलाबांच्या युद्धांत अनेक उमराव मारले गेले. त्यांची मालमत्ता त्यानें जप्त करून मध्यमवर्गीतील लोकांना रिकाम्या पडलेल्या सरदारक्या दिल्या. न्यायखात्याकडे तो जातीनें लक्ष देत असे. ठिकठिकाणीं काय घडतें तें आपल्याला समजावें म्हणून त्यानें हेरखातें प्रथमच स्थापन केलें. धनिक लोकांकडून पैसा उकळण्याकरितां त्यांच्याकडून नजराणे घेण्याची त्यानें प्रथमच सुरुवात केली. यामुळें पैशाकरितां त्याला पार्लमेंटवर अवलंबून राहावें लागलें नाहीं. त्या वेळच्या पार्लमेंटनेंही त्याला फारसा विरोध केला नाहीं. विद्या व कला यांची त्याला अभिरुचि असल्यानें त्यानें त्यांना राजाश्रय दिला. सन १४७६ मध्यें विल्यम कॅक्स्टननें आपला छापखाना प्रथमच लंडनमध्यें स्थापन केला. एडवर्डनें त्याचा छापखाना स्वतः पाहून त्याचा चांगलाच परामर्ष घेतला. खिशांतलीं घड्याळें व वाजाच्या पेट्या एडवर्डच्या कारकीर्दीतच प्रथम निघाल्या असें म्हणातात. त्याचप्रमाणें टपालाची व्यवस्थाही एडवर्डनेंच प्रथम सुरू केली. ऐषारामी राहणी व वैभव यांची आवड त्याला फार होती. अनेक प्रकारांनीं त्यानें पैशाची जोड चांगलीच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून ठेविली होती; व स्वतःच्या खासगी संपत्तीवर त्यानें अनेक जहाजें बांधलीं. एकंदरींत त्याचा कारभार इंग्लंडच्या हिताचाच झाला. लोकांना पाहिजे असलेलें स्वास्थ्य मिळाल्यानें तेंही आपल्या राजावर खूष होते. देशाच्या अस्वस्थतेला व शांततेला अरेरावी सरदारच कारणीभूत होत, अशी त्याची दृढ समजूत असल्यानें त्यांच्या सत्तेला शह देऊन त्यांस नामोहरम करण्याचें व मध्यम वर्गाला पुढें आणण्याचें त्यानें धोरण स्वीकारलें, व शेवटास नेलें. अर्थात् या बाबतींत तो ट्यूडर राजांचा गुरूच ठरतो. आपल्या वयाच्या बेचाळीसाव्या वर्षी तो सन १४८३ मध्यें मरण पावला.

४. पांचवा एडवर्ड (इ. स. १४८३):—चौथ्या एडवर्डचा मुलगा पांचवा एडवर्ड आपल्या वयाच्या तेराव्या वर्षी राजा झाला. राजा अल्पवयी असल्यानें राजाचा चुलता ग्लॉस्टरचा ड्यूक, रिचर्ड, याला संरक्षक नेमण्यांत आलें. चौथ्या एडवर्डचा तो एकनिष्ठ सेवक होता; परंतु सर्व सत्ता त्याच्या हातीं गेल्यावर राज्य मिळविण्याकरितां तो खटपट करूं लागला. थोड्याच दिवसांत लांचलुचपतीच्या प्रकारांनीं अनेक मोठमोठ्या सरदारांना त्यानें वश करून घेतलें व जे वश होणार नाहींत त्यांचे त्यानें खून करविले. रिचर्डला सर्वांत जास्त मदत झाली असेल तर ती बकिंगहॅमचा ड्यूक, स्टॅफर्ड, याची होय. त्याच्या मदतीनें पांचवा एडवर्ड व त्याचा धाकटा भाऊ रिचमंड यांना त्यानें कैद केलें व लंडनच्या टॉवरमध्यें ठेवून दिलें; आणि आपल्याला राज्याभिषेक करवून घेतला. यानंतर थोड्याच दिवसांनीं टॉवरमध्यें असलेल्या राजपुत्रांचा खून झाला. याला रिचर्डच जबाबदार धरला जातो; या कृष्णकृत्यानेंच त्याच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली.

पांचवा एडवर्ड

५. तिसरा रिचर्ड (इ. स. १४४३–८५):—रिचर्ड मोठा कर्तबगार, महत्त्वाकांक्षी व दीर्घोद्योगी होता. युद्धकला त्याला चांगलीच अवगत होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो शूर योद्धा होता. राज्यकर्त्यांच्या आंगीं लागणारे अनेक गुण त्याच्या ठिकाणीं वसत होते. स्वार्थसाधूपणा मात्र त्याच्या ठिकाणीं पूरेपूर बाणलेला होता. आपला स्वार्थ साधण्याकरितां भल्याबुऱ्या मार्गांचाही तो अवलंब करीत असे. राज्यावर आल्यावर त्यानें आपल्या साथीदारांस पदव्या व पैसा देऊन खूष केलें. तसेंच पार्लमेंटमध्यें कोणाकडूनही नजराणा घेणार नाहीं असें त्यानें सांगितलें. यामुळेंही तो लोकांत फार प्रिय झाला. परंतु पांचवा एडवर्ड व त्याचा भाऊ रिचमंड यांच्या वधाची माहिती लोकांस कळल्यावर त्याच्यावरील लोकांचा विश्वास ढळला.

तिसरा रिचर्ड

वरील क्रूर कर्में झालीं तेव्हांपासून रिचर्डचें मन त्यालाच खाऊं लागलें. ‘ रात्रन् रात्र त्याला झोंप येईनाशी होऊन भयंकर स्वप्नेंही पडत. ’ आपल्यावर आपले शत्रु घाला घालतील अशी त्याला एक-सारखी भीति वाटत होती. त्याचे साथीदारही त्याला भिऊन वागूं लागले; व त्यांनीं त्याच्याविरुद्ध कारस्थानें रचण्यास सुरुवात केली. याच सुमारास आपलें दिलेलें वचन विसरून तो नजराणे स्वीकारूं लागला. त्यामुळेंही लोक असंतुष्ट झाले. त्याचा परम मित्र व साहाय्यकर्ता, बकिंगहॅमचा ड्यूक हाही त्याच्यावर उलटला; व त्यानें रिचमंडचा अर्ल, हेन्री ट्यूडर, याला गादी मिळवून देण्याचें ठरविलें. हेन्रीचा इंग्लंडच्या गादीवर जवळचा वारसा पोंचतच होता. तेव्हां हेन्रीचा जानी दोस्त मॉर्टन याच्याकडे बकिंग-हॅमनें धोरण बांधून हेन्रीला इंग्लंडांत बोलाविलें. परंतु ही गोष्ट कळल्यावर रिचर्ड बकिंगहॅमवर चालून गेला व त्याला पकडून त्यानें फांशीं दिलें. इकडे हेन्री फ्रान्समध्यें ब्रिटनी प्रांतांत होता. फ्रान्सच्या राजाची मदत घेऊन लगेच तो इंग्लंडांत आला. या वेळीं लँकेस्टर व यॉर्क पक्षांत एकी घडवून आणण्याकरितां चौथ्या एडवर्डची मुलगी व रिचर्डची पुतणी एलिझाबेथ हिच्याशीं हेन्रीचें लग्न करून देण्याचें मॉर्टननें ठरविलें. ही बातमी कळतांच रिचर्डनें एलिझाबेथशीं स्वतःच लग्न करण्याचा घाट घातला. त्यामुळें सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोक खवळले. अशा वेळींच हेन्री इंग्लंडांत सन १४८५ मध्यें येऊन दाखल झाला. रिचर्डनें जमवितां येईल तितकें सैन्य जमा करून हेन्रीवर चाल केली. बॉसवर्थ येथें उभय सैन्यांमध्यें लढाई होऊन रिचर्ड मारला गेला. व विजयश्रीनें हेन्रीला माळ घातल्यानें समरांगणांत पडलेला रिचर्डचा राजमुकुट हेन्रीच्या मस्तकीं ठेवण्यांत आला. या लढाईनें गुलाबांच्या युद्धाचा तिसरा व शेवटचा भाग समाप्त झाला (१४८५), मध्ययुगावर पडदा पडला व ट्यूडर अमदानीला व नव्या युगाच्या उषःकालाला सुरुवात झाली.

अभ्यास

१. चौथा एडवर्ड व वॉरिकचा ड्यूक यांच्यामध्यें झालेला झगडा वर्णन करा. त्याचा परिणाम काय झाला ?

२. चौथ्या एडवर्डनें राज्यांत शांतता निर्माण केल्यावर देशस्थिति सुधारण्याकरितां कोणत्या गोष्टी केल्या ? त्याचा परिणाम सांगा.

३. तिसऱ्या रिचर्डचा स्वभाव सांगून त्याच्या अप्रियतेचीं कारणें सांगा. त्याचा परिणाम काय झाला ? प्रथमतः तो लोकप्रिय कां झाला ?

४. गुलाबांचीं युद्धें कशीं निर्माण झालीं ? कोणकोणत्या राजांच्या कारकीर्दींत तीं घडून आलीं ? त्याला यादवीयुद्धें असें कां म्हणतात ? अशा तऱ्हेचीं यादवी युद्धें यापूर्वींच्या इंग्लंडच्या इतिहासांत झालीं होतीं का ? केव्हां ?

५. गुलाबांच्या युद्धांचे परिणाम थोडक्यांत सांगा. इंग्लंडचा नकाशा काढून त्यांत गुलाबांच्या युद्धांतील लढायांचीं ठिकाणें भरा.

६. सन १४६१–८५ पर्यंतचा कालादर्श तयार करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२३. चौदाव्या व पंधराव्या शतकांतील इंग्लंड

१. **खेड्यांतील स्थिति**:—नॉर्मन लोकांच्या वेळेपासून सरंजामी पद्धति व देशमुखी सुरू झाली. ती अजूनही थोड्या फार प्रमाणांत मध्य-युगांत इंग्लंडभर चालूच होती. परंतु चौदाव्या व पंधराव्या शतकांत तिला जोराचा धक्का बसून ती चांगलीच मोडकळीस आली. खेड्यांतील शेत-कऱ्यांची दैन्यावस्था पूर्वीप्रमाणेंच चालू होती. त्यांचीं तीं तीन तीन प्रकारचीं शेतें, मातीचीं व लाकडाचीं अत्यंत अस्वच्छ घरें व गुलामाप्रमाणें देशमुखाच्या वरीं, छळणूक सोसूनही, चालू असलेलीं कामें यांत मुळींच फरक पडलेला नव्हता! परंतु असें असूनही सरंजामी पद्धतीचा शेवट होण्याची वेळ आली. दुसऱ्या हेन्रीनें 'स्कूटेज' कर लादून आपल्या सर-दारांना व जहागिरदारांना लष्करी नोकरीच्या ऐवजीं पैसा देण्याची सवलत दिली होती. त्यामुळें सरंजामी पद्धतीच्या मुळावरच स्कूटेज कर आला. कारण जहागिरदारांचीं कुळेंही 'लष्करी नोकरी ऐवजीं उक्ता खंड घ्या' असें म्हणूं लागलीं. देशमुखांनाही ती गोष्ट नाकारतां आली नाहीं व त्यांनीं लष्करी नोकरी ऐवजीं पैशाच्या रूपानें खंड घेण्यास सुरुवात केली. एवढेंच नव्हे, तर जमीन कसून त्याबद्दल खंड देण्याची वहिवाट या वेळीं शेतकऱ्यांनीं पाडिली. सेवा-चाकरी ऐवजीं पैशाच्या रूपानें खंड देण्याच्या या पद्धतीला 'बदला पद्धति' असें म्हणतात; व त्या पद्धतीमुळें सरंजामी पद्धति नष्ट झाली असेंच मानण्यांत येतें. देशांत शांतता स्थापन झाल्यानें व लोकांचा ओढा व्यापाराकडे वाढल्यानें पूर्वीच्या सरंजामी पद्धतीप्रमाणें सेवाचाकरी करण्यास कोणीही तयार नसत. प्लेगमुळेंही खेडेगांवांतील शेतकऱ्यांचा नाश झाला. त्यामुळें सरंजामीपद्धतीप्रमाणें शेतीचें काम करण्यास कोणीही मिळेना. या कारणामुळेंही सरंजामीपद्धतीचा अंत होण्यास मदत झाली. अर्थात् ज्यांना खेडेगांवांत काम नसे ते शहरांत जाऊन पैसा मिळवीत; व श्रीमंतीबरोबरच आपलें स्वातंत्र्य उपभोगीत. खेडेगांवच्या जीवनांत क्रान्ति घडवून आण-ण्यास आणखी एक महत्त्वाचें कारण घडलें. तें म्हणजे देशमुखांनीं आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेतांस कुंपणें घालण्यास सुरुवात करून आपल्या शेतांस कुरणांचें स्वरूप दिलें हें होय.

प्लेगनें अनेक शेतकरी व शेतमजूर मेले व होते ते दुप्पट चौप्पट मजुरी मागूं लागले. तितकी मजुरी देण्याची ऐपत देशमुखांत नसल्यानें म्हणा किंवा त्या वेळीं लोकरीला जास्त मागणी येत होती म्हणून म्हणा, त्यांनीं आपल्या शेतांत शेती बंद करून त्यांना कुंपणें घालण्यास सुरुवात केली. कुंपण घातलेल्या शेतांतून मेंढ्या चरावयास सोडावयाच्या व योग्य काळीं त्यांची लोकर कापून ती बाजारांत विकावयाची असा प्रकार रूढ झाला. लोकरीला त्या वेळीं मागणीही चांगली येई. यामुळें खेड्यांतील शेती बंद होऊन तिची जागा मेंढ्यापालनाच्या धंद्यानें घेतली. अर्थात् जसजशी या धंद्याची वाढ होत गेली तसतसे शेतकऱ्यांचे हाल होऊन त्यांची दुर्दशा झाली. बेकारांची संख्याही वाढूं लागली व सरकारला शेतांस कुंपणें घालण्याच्या पद्धतीस बंदी करावी लागली.



रानडुकराची पारध

२. शहरांतील लोकस्थिति :—शहरांची आंखणी व रचना, त्यांतील घरांची ओबडधोबड मांडणी, गलिच्छ व कोंदट रस्ते, त्या घाणेरड्या घरांतून पसरणारा तो धूर वगैरे वगैरे गोष्टी जशाच्या तशाच चालू होत्या. मात्र चौदाव्या व पंधराव्या शतकांत शहरांतील लोक, व्यापार वाढल्यानें, श्रीमंत झाले होते. या लोकांनीं मोठमोठीं नवीं घरें बांधण्यास सुरवात केली होती. हीं नवीन घरें बऱ्याच सुखसोयींनीं परिपूर्ण असत. पूर्वीप्रमाणें शहराच्या मध्यभागीं एकच बाजार असे; व तेथें जीवनोपयोगी कोणतीही वस्तु विकत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळे. स्थानिक स्वराज्याचे हक्क कांहीं शहरांना मिळाले असल्याचें मागें सांगितलेंच आहे. ते या वेळींही चालू होते. टोलजकातीची माफी असणें, बाहेरच्या व्यापाऱ्यांचा सर्व माल विकत घेणें, कायदेकानू करणें वगैरे प्रकारचे अनेक हक्क शहराच्या मिरासदार नागरिकांना मिळत. हे हक्क वाटेल त्याला मिळत नसत. त्यामुळें या लोकांत व इतरांत हक्क मिळविण्याकरितां तंटे माजत. प्रत्येक शहरांत व्यापारी मंडळें बहुधा होतींच. या मंडळांचे सभासद एकमेकांस 'बंधु, भगिनी,' म्हणून संबोधीत. व्यापाऱ्यांतील लबाडी थांबविण्याकरितां या मंडळांनीं अनेक प्रकारचे कायदे पास केले होते. लबाडी उघडकीस आली तर त्या व्यापाऱ्याला दंड, खोडा वगैरेसारख्या शिक्षाही मंडळामार्फत होत. या मंडळाकडून आपल्या सभासदांच्या घरांचीही कधीं कधीं झडती घेण्यांत येत असे, व ठरीव किंमतीपेक्षां आपला माल कमी-ज्यास्त किंमतीला कोणी विकलाच तर त्यालाही शिक्षा होई. अशा तऱ्हेनें हीं मंडळें व्यवस्थितपणें आपलें काम करीत होतीं. एका धंद्यांतील माणसें एकाच गल्लीमध्यें राहत असल्यानें प्रत्येकाला प्रत्येकाची चांगलीच ओळख असे; व त्यामुळें एकमेकांचा एकमेकांवर चांगलाच वचक वसे. 'संघगृहांत' त्यांच्या सभा भरत, नाचरंग उडत व नाटकें होत. देवळांना व गरिबांनाही त्यांची मदत होत असे. एकंदरींत पाहतां या मंडळांना त्यावेळीं समाजांत चांगलेंच स्थान मिळालेलें होतें.

३. व्यापार–उद्योगधंदे :—चौदाव्या व पंधराव्या शतकांत अनेक प्रकारच्या धंद्यांना तेजी आली. त्या वेळच्या अनेक खेड्यांतून हातमागावर विणणें, कातड्याचे जिन्नस तयार करणें, फर्निचर तयार करणें, दारू गाळणें वगैरे अनेक प्रकारचे धंदे सुरू झाले होते. खेडेगांवच्या माणसानें तयार केलेले जिन्नस थोडे ओबडधोबड असत; तरीही त्याला गिऱ्हाइक चांगलें मिळे! यामुळें त्या धंद्यांत अनेक लोक पडले; व त्यांत त्यांना प्राप्तीही बरी होई. यामुळें सरंजामीपद्धतीप्रमाणें देशमुखाची नोकरी करण्यापेक्षां धंद्यांत पडणें बरें, असें शेतकऱ्यांना व शेतमजुरांनाही वाटे. त्यामुळें त्यांची स्थिति थोडी निवळण्यास मदत झाली. शहरांतील कारागीर व धंद्यांतील लोक थोडे जास्त कुशल असल्यानें ते उत्तम व तलम कापड विणीत, उत्तम दारू

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गाळीत, चांदी–सोन्याचे दागिने तयार करीत, कातड्याचे निरनिराळे जिन्नस बनवीत, नकस काम करीत व नवीन नवीन जिनसा तयार करून चांगला पैसा मिळवीत. त्या वेळचा जरा तेजीचा व बराच भरभराटीचा व्यापार म्हणजे लोकरीचा व कापडाचा व्यापार होय. तेराव्या शतकांत इंग्लिश लोकर परदेशांत जाई व तेथून त्याचें कापड तयार होऊन येई. परंतु चौदाव्या शतकांत इंग्लंडमध्यें ठिकठिकाणीं हातमाग सुरू झाल्यानें ओबड-



१५ व्या शतकांतील विणण्याचा माग

धोबड इंग्लिश कापड फ्लँडर्समध्यें व उत्तर फ्रान्समध्यें पाठविण्यांत येऊं लागलें. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या कापडाला तेथें मागणीही बरी येऊं लागली! यामुळें इंग्लिश कारखानदारांना उत्तेजन मिळालें व ते आपला विणकऱ्याचा धंदा जोरांत चालवूं लागले. थोड्याच दिवसांत केंट, इसेक्स, नॉर्फोक, सॉमरसेट, ऑक्सफर्ड, डॉरसेट वगैरे परगणे व उत्तरेंतील यॉर्क व लिंकन परगणे लोकरीच्या धंद्याकरितां व विणकलेकरितां प्रसिद्ध झाले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुंपण घालण्याच्या पद्धतीमुळें जे शेतकरी व शेतमजूर बेकार झाले होते त्यांनाही या धंद्यामुळें उद्योग मिळूं लागला व त्यांच्या घरीं सूत कातणें, विणणें वगैरे घरच्या घरींच व फावल्या वेळांत करतां येण्यासारखे धंदे सुरू झाले. यामुळें शेतकऱ्यांची दुर्दशा टळण्यास थोडी फार मदत झाली. लोकरीच्या धंद्यांत पैसा मिळाल्यानें इतर धंदेही पुढें सरसावले व त्यांचीही झपाट्यानें वाढ होऊं लागली.

४. सडका व दळणवळणाचीं साधनें:—इंग्लंडच्या उत्तरेचा थोडा भाग, दक्षिण इंग्लंड व पश्चिम इंग्लंड या भागांत लोकरीचा धंदा वाढल्यानें त्या भागांत व्यापाऱ्यांची, धेवाऱ्यांची व मध्यस्थांची ये-जा एकसारखी सुरू असे. असें असून त्या ठिकाणचे रस्ते व सडका अत्यंत गलिच्छ व अरुंद असत; त्यामुळें व्यापारी दळणवळणाला त्रास पडे. रस्त्यांतून राडा–रोडा, माती–चिखल यांचा नुसता कचकोल माजलेला असल्यानें त्या रस्त्यांवरून प्रवास करणें जवळ जवळ अशक्यच असे. शिवाय रस्त्यांच्या शेजारीं ज्याचें शेत असे, तो शेतकरी रस्त्याचा बराचसा भाग आपल्या शेतांत ओढून घेत असे. अशा तऱ्हेनें दोन्ही बाजूंचा रस्ता शेतकऱ्यानीं घेतल्यामुळें रस्ता म्हणून ज्याला म्हणतां येईल अशी एक अरुंद, चिंचोळी व लांबच लांब पट्टी दिसे. तिचाच सडकेसारखा उपयोग करण्यांत येत असे. आणि या सडकांवरून जाणाऱ्या प्रवाशांची मालमत्ता लुटण्यास व वेळेनुसार त्यांचा जीव घेण्यासही टपलेल्या चोरांचा सुळसुळाट ! अशा एकंदर स्थितींत प्रवास कशा प्रकारचा होत असेल त्याची नुसती कल्पना केलेलीच चांगली ! असें असून त्या वेळचे इंग्लंडमधील प्रवासी व व्यापारी आपला माल घोड्याच्या पाठीवर लादून टोळ्या-टोळ्यांनीं, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं, जीव मुठींत धरून घेऊन जात. इच्छित स्थळीं सुखरूप पोहोंचल्यावर त्यांना हायसें होई !

५. जत्रा व त्यांचें महत्त्व:—प्रवासाची चांगलीशी सोय नसतांही जत्रेच्या ठिकाणीं जाण्यास अनेकांना मोठी मौज वाटे. एक तर तेथें पाहिजेत त्या वस्तु खरेदी करतां येत, अनेक इष्टमित्रांच्या भेटी होत व ख्यालीखुशालींत थोडे दिवस घालवितां येत. कारण चौदाव्या व पंधराव्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शतकांत भरणाऱ्या जत्रांमध्यें ख्यालीखुशाली वाढली होती. व्यापाऱ्यांचा माल उठत असतांच अनेक लोक चैन करीत असलेले आढळत. या जत्रांच्या ठिकाणीं जादुगारी, नाचरंग, पवाडे म्हणणें, अस्वलांचे खेळ, जुगार वगैरे अनेक तऱ्हेचे करमणुकीचे प्रकार चालत. त्यामुळेंही अनेक लोक जत्रा पाहण्यास जात. आर्थिक दृष्टीनेंही या जत्रांचें महत्त्व होतें. अनेक ठिकाणचा माल एकत्र आल्यानें चांगला कोठला, वाईट कोठला, हें लोकांना समजे, अनेक रुपयांची उलाढाल होई व कामकऱ्यांस उत्तेजन मिळून, आहे यापेक्षांही उत्तम माल काढण्यास त्यांना प्रोत्साहन मिळे.



ज्यांना या जत्रांना जातां येत नसे त्यांची मात्र एकसारखी चुळबुळ चाले. कोणी एखादा फेरीवाला आला तर त्यांना किती आनंद होई ! कारण तो अनेक प्रकारच्या बातम्या पुरवी व नाना प्रकारचे चैनीचे पदार्थ व जिनसा त्यांना विकी. या फेरीवाल्यांकडूनच त्यांना नवे नवे विचारही ऐकावयास मिळत. यामुळें कोणत्याही फेरीवाल्याला कोठेंही व कोणाच्याही घरीं मज्जाव नसे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. कपडेलत्ते व पोषाख :—चौदाव्या व पंधराव्या शतकांत व्यापारामुळें देशांत पैसा खेळूं लागला. अर्थात् कपड्यालत्त्यांत तो थोडा जास्त खर्च होऊं लागला. कलाकुसरीचीं कामें कपड्यांवर होऊं लागून चांगले कपडे वापरण्याकडे लोकांची प्रवृत्ति होऊं लागली. पुरुष तंगदार व आंखूड पण पूर्ण अस्तन्यांचा 'ट्यूनिक' नांवाचा आंगरखा व त्यावरून मोठा आंगरखा व आंत शर्ट घालूं लागला; अनेक प्रकारच्या टोप्याही अस्तित्वांत आल्या



पायांतील बूट

होत्या. एकंदरींत ऐषारामी पोषाख वापरण्याकडे लोकमत झुकत होतें. पायांतील बूट मोठे अणकुचीदार व लांबलचक असल्यामुळें लोकांना सहज चालतां येत नसे. स्त्रियांच्या पोशाखांत फारसा फरक झालेला नसला तरी नटवेपणा त्यांच्यांत येऊं लागला होता. अनेक प्रकारच्या रंगी–बेरंगी व नक्षीदार टोप्या घालण्यांत त्या वेळीं त्यांना मोठी मौज वाटे. सर्वसाधारणतः जो ज्या धंद्यांत असेल त्या धंद्याला योग्य असाच तो पोषाख करीत असे. त्यामुळें पोषाखावरूनही माणसाचा धंदा समजे. फणी व पैशाची पिशवी प्रत्येकाच्या जवळ साधारणपणें असे. परंतु ही ख्यालीखुशाली सातव्या हेन्रीच्या कारकीर्दींत लोपून साधेपणानें त्याचें स्थान पटकावलें. सरदार व त्याचे सशस्त्र शिपाई यांचा पोशाख मात्र भपकेदार असे; त्यामुळेंच पंधराव्या शतकांत त्यांचें प्रस्थ माजण्यास सवड मिळाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. सशस्त्र शिपाई :—चौदाव्या व पंधराव्या शतकांत व विशेषतः शत-सांवत्सरिक युद्ध संपल्यावर देशांत अव्यवस्था माजली होती. कोणी कोणाचें ऐकेना व कायद्यास जुमानीना ! सरदार आपापसांत लढत ! फ्रेंच युद्धांतून परत आलेल्या सैनिकांनीं देशांत नुसता धुडगूस घालण्यास सुरुवात केली ! त्यांच्या या कृतीला सरदारांचें चांगलेंच पाठबळ असे; कारण अनेक सरदारांनीं या सैनिकांना आपल्या पदरीं बाळगण्यास सुरुवात केली. या सैनिकांना आपल्या पदरीं ठेवून त्यांना ते अन्नवस्त्र पुरवीत. अर्थात् त्याचा मोबदला म्हणून हे सशस्त्र सैनिक आपल्या मालकानें दिलेला भडक गणवेश घालून त्यावर त्याचा बिल्लाही लटकावीत; व आपल्या मालकाची पडेल ती भली-बुरी चाकरी करीत. या पद्धतीला 'लिव्हरी' अगर 'भडक गणवेशाची पद्धति' म्हणतात. तसेंच त्यांच्या संरक्षणाचीही सरदार हमी घेत. त्यांच्यावर एखाद्या कृत्याबद्दल खटला झाल्यास खुद्द न्यायाधिशालाही धमक्या देऊन सरदार आपल्या शिपायांना सोडवून आणीत. यामुळें या शिपायांचें चांगलें फावे व ते देशांत धुमाकूळ माजवीत. या प्रकाराला 'सांभाळ' अथवा 'मेंटेनन्स'ची पद्धति असें म्हणतात. या सशस्त्र शिपायांच्या जोरावरच सरदारांचें प्रस्थ माजलें व त्यांनीं कायदाही धुडकावून दिल्यानें देशांत अनास्था बोकाळली. पुढें सातव्या हेन्रीनें या पद्धतीला कायमचा पायबंद घालून सरदारांची सत्ता मोडकळीस आणली व प्रजेचा दुवा घेतला.

८. इंग्लिश वाङ्मयाची उत्पत्ति :—देशाच्या अशा स्थितींतही उत्तम प्रकारच्या वाङ्मयाची उत्पत्ति सुरू झाली. या काळांत ज्यांनीं चांगलें वाङ्मय उत्पन्न केलें त्यांत चॉसर यास मोठा मान मिळतो. एका कलालाच्या कुळांत त्याचा जन्म सुमारें सन १३४० मध्यें झाला असावा. तिसऱ्या एडवर्डच्या वेळीं तो फ्रान्समध्यें लढण्यासही गेला होता. वयाच्या शेचाळी-साव्या वर्षी तो पार्लमेंटचा सभासद होता; परंतु त्यापूर्वींच त्यानें अनेक वेळां परराष्ट्रीय वकीलाचीं कामें केलीं होतीं. ज्या वेळीं इंग्लिश भाषेंतील शब्दही उच्चारणें शाळांतून मोठा प्रमाद म्हणून गणला जाई व ज्या वेळीं इंग्लिश भाषा जगते कीं मरते असें सर्वांस वाटत होतें त्या वेळीं चॉसरनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लिश भाषेंत ग्रंथ लिहिण्यास सुरुवात केली! त्याच्या अनेक ग्रंथांतून त्या वेळची इंग्लंडची स्थिति प्रतीत होते. त्याचा प्रख्यात काव्यग्रंथ म्हणजे 'कँटरबरी टेल्स' ऊर्फ 'कँटरबरीच्या कथा' हा होय. त्या कथांमध्यें त्यानें त्या वेळची सर्व परिस्थिती उत्कृष्टपणें व थोडी भडकपणानेंही वर्णिली आहे. चॉसरला इंग्लिश काव्याचा जनक म्हणतात. तो सन १४०० मध्यें मरण पावला. चॉसरप्रमाणेंच प्रसिद्धी पावलेला दुसरा ग्रंथकर्ता म्हणजे लोलर्ड लोकांचा पुढारी व त्या पंथाचा संस्थापक जॉन विक्लिफ होय (सन १३२०–८४). त्या वेळच्या

चॉसर

धर्मस्थितीवर सडेतोड विचार प्रदर्शित करून बायबलचें त्यानें इंग्रजी भाषांतर केलें. 'व्हिजन ऑफ पायर्स प्लाऊमन' ऊर्फ 'शेतकऱ्याचें स्वप्न' या काव्यग्रंथाचा कर्ता विल्यम लँगलंड (सन १३३२–१४००) यानें आपल्या काव्यांत अत्यंत हृदयस्पर्शी अशी त्या वेळच्या शेतकऱ्यांची दुर्दशा वर्णन केलेली आहे. वरील ग्रंथकारांमुळें इंग्लिश भाषेकडे लोकांचें अधिकच लक्ष लागलें. याच वेळीं विल्यम कॅक्स्टननें छापण्याची कला हस्तगत करून ती इंग्लंडांत आणली व आपल्या छापखान्यांत अनेक ग्रंथ तो छापूं लागला. यामुळें पुस्तकें स्वस्त मिळूं लागून ज्ञानप्रसार होण्यास मदत झाली. नाहींतर यापूर्वीं सर्व पुस्तकें महंत व जोगी हातांनीं लिहून काढून तीं विकीत. अर्थात् या पुस्तकांची किंमतही फार असे. त्यामुळें वाटेल त्याला पुस्तक विकत घेतां येत नसल्यानें ज्ञानप्रसार होत नसे.

९. **धार्मिक अवनति**:—वरील लेखकांचा मुख्य कटाक्ष धर्मगुरूंच्या आचरणावरच असे. धर्माचा मुख्य म्हणून पोपला अजूनही लोक भजत; परंतु त्याच्या संबंधींही लोकांच्या मनांत अढी बसूं लागली होती. त्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धार्मिक वर्तन धर्मबाह्य होतें. बिशप, महंत, पाद्री वगैरे सर्व धर्माधिकारी सुखाचे व आळसाचे सोबती झाले असून अनीतिमान आचरणांत ते दंग असत असा लोकांचा समज झालेला होता. हे धर्मगुरू धर्माच्या नांवाखालीं अनेक प्रकारांनीं लोकांकडून खुषीच्या सक्तीनें पैसा उकळीत. 'टाइथ' या नांवाचा कर (शेतकऱ्याच्या प्रत्येक प्रकारच्या उत्पन्नाचा एक दशांश भाग) पाद्र्याला मिळत असे. याशिवाय देवळाच्या दरवाजावर उभे राहून ते पेट्या फिरवीत. लग्नसमारंभ, दफनविधी, बारसें, महोत्सव या वेळींही अनेक प्रकारांनीं लोकांकडून ते पैसा उकळीत. यामुळें लोकांत त्यांच्याबद्दलचा आदर कमी झाला होता. तशांतच प्रत्येक राष्ट्रांतील लोकांमध्यें आपल्या राष्ट्राबद्दल अभिमान उत्पन्न झाल्यामुळें पोपचें धार्मिक वर्चस्व झुगारून द्यावें व आपलें राष्ट्र सर्व बाबतींत पुढें आणावें असें लोकमत होऊं लागलें. त्यांतच लोलर्ड लोकांनीं आपल्या मतांचा प्रचार चालविल्यामुळें व लोकांना विक्लिफनें केलेलें बायबलचें इंग्रजी भाषांतर वाचावयास मिळाल्यानें कांहीं लोकांना बायबलची खरी शिकवणूक कळूं लागली. त्यामुळें धर्ममठांतून जे प्रकार चालत व तेथें जें शिक्षण देण्यांत येई तें अनेक बाबतींत धर्मविहीन आहे असें लोक म्हणत. एकंदरींत पाहतां लोकांमध्यें पोपबद्दल अज्ञान भरपूर असलें तरीही त्याच्या कृत्यांबद्दल तिरस्कार बाणत चालला होता. धर्मगुरू सुखलोलुप, आळशी, चैनी व लोभी बनल्याचें लोकांस स्पष्ट दिसत होतें; व त्यामुळें लोकांचा धर्मावरील विश्वास ढळूं लागला होता.

१०. शिक्षण व शाळा :—चौदाव्या व पंधराव्या शतकांत सुशिक्षितांचेंही प्रमाण बेताचेंच होतें. शिक्षण धर्मगुरू देत व बहुधा प्रत्येक मंदिरांत शाळा असेच. या शाळांतून लिहिणें, वाचणें, संगीत व लॅटिन भाषा यांचेंच शिक्षण देण्यांत येई. धार्मिक शिक्षणावर भर फार असे. सर्व धर्मग्रंथ लॅटिन भाषेंत असल्यानें त्या भाषेच्या अभ्यासाला त्या वेळीं महत्त्व आलें होतें. घोकंपट्टीला जास्त प्राधान्य असल्यानें विद्यार्थ्यांकडून पुस्तकेंच्या पुस्तकें पाठ करून घेण्यांत येत असत! उत्तम पाद्री, महंत, जोगी व धर्मोपदेशक निर्माण करण्याच्या हेतूनेंच शिक्षण देण्यांत येत असल्यानें मध्यम वर्गाचे व व्यापारी पेशाचे लोक त्या वेळच्या शाळांतून फारसे जात नसत. व्यवहारापुरतें लिहिणें-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचणें त्यांना आलें म्हणजे त्यांचें काम भागे. सुट्या फार कमी व शाळा सकाळीं व दुपारीं भरत असल्यानें विद्यार्थ्यांना त्रास होई. शाळेच्या आवारांत असतां कोणीही विद्यार्थी लॅटिन भाषेंत न बोलतां इंग्रजी भाषेंत बोलला तर



ईटन शालागृह

त्याला शिक्षा होई ! यावरून त्या भाषेला किती महत्त्व होतें तें सहज कळून येईल. इ. स. १४४१ मध्यें ईटनचें पब्लिक स्कूल स्थापन करण्यांत आलें; तें अजूनही प्रसिद्ध आहे. शाळांतून बाहेर पडल्यावर विद्यार्थी विद्यापीठाकडे वळत व पदव्या मिळवीत. गरीब विद्यार्थ्यांना लोकांची, धनिकांची व विद्यापीठाची मदत होई. याच वेळीं छापण्याच्या कलेचा शोध लागल्यानें विद्यार्थीवर्गाचे हाल बरेच कमी झाले. थोड्या किंमतींत त्यांना पुस्तकें मिळूं लागल्यानें लोकांचे विचार व कल्पना त्यांना सहज समजूं लागल्या; व त्यामुळें त्यांच्या ज्ञानांत भर पडूं लागली. नव्या विद्येच्या प्रसाराचीही लाट याच वेळीं आली; व इतर युरोपियन राष्ट्रांप्रमाणेंच इंग्लंडही तींत सांपडून त्यानें इंग्लंडमध्यें मोठी क्रांति घडवून आणली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. नव्या युगाचा संधिकाल :—पंधराव्या शतकाच्या अंताबरोबरच मध्ययुगाचाही शेवट झाला, असें मानतात. या शतकांत अनेक बाबतींत इंग्लंडचें पाऊल पुढें पडण्यास सुरुवात झाली. प्लेग, शतसांवत्सरिक युद्धें, पार्लमेंटची प्रगति, शेतकऱ्यांत झालेली जागृति, लोलर्डांचा धर्मावरील हल्ला, बंदुकीच्या दारूचा शोध, छापण्याच्या कलेचा शोध, व्यापाराची वाढ वगैरे अनेक दृष्टींनीं पाहतां पंधरावें शतक म्हणजे नव्या युगाच्या संधिप्रकाशाचा काळ म्हणून समजण्यास हरकत नाहीं. याच शतकांत तुर्कींनीं जोर करून सन १४५३ मध्यें कॉन्स्टँटिनोपल शहर हस्तगत केलें. सर्व सुधारणेचें, ज्ञानाचें, कलांचें भांडारच त्यांच्या हातीं गेलें ! त्या शहराच्या आश्रयास राहणारे अनेक जाडे जाडे पंडित, ज्ञानी, तत्त्वज्ञानी, कलावान युरोपभर फैलावले व त्यांनीं आपलें ज्ञान लोकांना समजावून देऊन त्यांना नव्या क्रान्तीस उद्युक्त केलें. त्यांच्या मदतीला छापण्याची कला धांवून आल्यानें त्यांच्या कार्याला तेज चढलें. ज्ञानवृद्धीबरोबरच या काळीं एकराष्ट्रीयत्वाची लाट सर्व राष्ट्रांतून वाहूं लागली. त्यामुळें पवित्र रोमन बादशाही व त्याचप्रमाणें पोपची धार्मिक सत्ता डळमळूं लागली. ज्ञानवृद्धीबरोबरच लोकांचा धर्मावरील अंधविश्वास उडूं लागला व त्यामुळें धर्मांत क्रान्ति घडवून आणून त्याची योग्य पायावर उभारणी करावी असें ल्यूथरसारखे लोक बोलूं लागले. पंधराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं नौकानयनाला उत्तेजन मिळूं लागल्यानें अनेक धाडसी दर्यावर्दी आपापलीं जहाजें समुद्रांत हाकारून नवीन नवीन भूप्रदेश हुडकून काढण्यास उद्युक्त झाले. त्यांत कोलंबस, वास्को-ड-गामा, हे अग्रगण्य होत. अशा तऱ्हेनें पंधराव्या शतकाच्या शेवटीं एकटें इंग्लंडच नव्हे तर सर्व युरोपखंड नव्या युगाच्या उषःकालापूर्वीच्या संधिकालांत गुरफटून गेलेलें दिसत होतें; व नव्या युगाची मार्गप्रतिक्षा करीत सर्व लोक त्याच्या स्वागतासाठीं सुसज्ज झाले होते.

अभ्यास

१. चौदाव्या व पंधराव्या शतकांत सरंजामी पद्धति संपुष्टांत आली असें म्हणतात. कशावरून ? कारणें द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. लोकरीचा व्यापार वाढल्यामुळें इंग्लंडचा कोणता फायदा झाला ? शेतकऱ्यांचें नुकसान कितीसें झालें ?

३. दळणवळणाचीं साधनें कशीं होतीं ? त्या वेळीं खेडेगांवांत कोणकोणते धंदे चालत ?

४. लोकांचा धर्मावरील विश्वास उडण्यास काय कारणें झालीं ?

५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—
चॉसर, व्यापारीमंडळें, बदलापद्धति, जत्रा, विल्यम कॅक्स्टन, विल्यम लँगलंड, भडक पोषाखाची पद्धति, सांभाळ.

६. इंग्लंडचा एक नकाशा काढून त्यांत निरनिराळ्या उद्योगधंद्यांचीं ठिकाणें भरा.

७. त्या काळीं लॅटिन भाषेला प्राधान्य देण्याचें कारण काय ? इंग्रजी भाषा मागें कां पडली ? तिची त्यावेळची सेवा कोणीं केली ? कोणत्या प्रकारची ?

८. तुर्क लोकांनीं कॉन्स्टँटिनोपल घेतल्यानें युरोपचा फायदा झाला असें तुम्हांस वाटतें काय ? कां म्हणून ?

६. वंशवृक्ष – ट्यूडर घराणें (इ. स. १४८५–१६०३)

सातवा हेन्री–(१४८५–१५०९)

आर्थर, मृत्यु (१५०२) | **आठवा हेन्री** (१५०९–१५४७) | मार्गारेट×चौथा जेम्स | मेरी×बारावा लुई

मार्गारेट×चौथा जेम्स → पांचवा जेम्स → स्कॉटलंडची राणी मेरी मृ. १५८७ → **पहिला–(सहावा) जेम्स** १६०३–२५

मेरी×बारावा लुई → फ्रॅन्सिस → जेन ग्रे मृ. (१५५४)

आठवा हेन्री → **मेरी** (१५५३–१५५८) | **एडवर्ड** (१५४७–५३) | **एलिझाबेथ** (१५५८–१६०३)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२४. नवयुगाचा उषःकाल

१. मध्ययुगाचें महत्त्वः—मध्ययुग व अर्वाचीन युग यांचे धागेदोरे इतके निगडीत झालेले आहेत कीं, एकाचा संधिकाल व दुसऱ्याचा उषःकाल नक्की केव्हां झाला हें निश्चितपणें सांगणें जरा अवघडच आहे. असें जरी असलें तरी इंग्लंडच्या इतिहासांत मध्ययुग संपून सन १४८५ पासून अर्वाचीन युगाला सुरुवात झाली अशी सर्वसाधारण समजूत आहे. मध्ययुगांत अनेक गोष्टींस सुरुवात झाली व त्यांचा शेवट अर्वाचीन युगांत लागला. याचें एक मोठें उदाहरण म्हणजे विद्येचें पुनरुज्जीवन होय. मध्ययुगांतील लोकांनीं ज्या अनेक गोष्टी हातीं घेतल्या व ज्या घडामोडी सुरू केल्या, त्यांचा निकाल अर्वाचीन युगाच्या सुरुवातीस लागला. मध्ययुगांतील लोकांमध्यें विद्येचा प्रसार व्हावयास पाहिजे तितका झालेला नव्हता. त्यांच्यामध्यें रोमन कॅथॉलिक पंथाबद्दल अंधश्रद्धा वसत होती. व्यक्तीपेक्षां संस्थेला ते श्रेष्ठ मानीत, व तिला ते मान देत. धर्मसंस्थेविरुद्ध 'ब्र' काढणें म्हणजे पाप होय ही समजूत इतकी दृढ झालेली होती कीं, रसायनशास्त्र व ज्योतिषशास्त्र यांतील कित्येक शोधक धर्मसंस्थेच्या हुकुमांस भिऊन तिला मान देण्याकरितां आपले शोध कुजत ठेवीत असत! तरीही मध्ययुगांत वरील दोन्ही शास्त्रांत बरेच उत्तम शोध लागले.

२. कॉन्स्टँटिनोपलचा पाडावः—परंतु मध्ययुग संपून अर्वाचीन युगाला सुरुवात झाली असें ज्या महत्त्वाच्या गोष्टीमुळें मानण्यांत येतें ती गोष्ट म्हणजे विद्येचें पुनरुज्जीवन होय. मध्ययुगांतील लोकांना खडबडून जागें करण्याचें अत्यंत महत्त्वाचें काम विद्येच्या पुनरुज्जीवनानें केलें आहे. मध्ययुगांत ग्रीक व लॅटिन भाषेंत ज्ञानाचा ठेवा आहे अशी समजूत असल्यानें त्या भाषेंतील वाङ्मयाचा अभ्यास फक्त धर्मसंस्थांमधून सुरू असे. शिवाय सन १४०० पासून इटली वगैरे देशांत व पंधराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडमध्येंही लॅटिनप्रमाणेंच ग्रीक भाषेंतील वाङ्मयाचाही अभ्यास सुरू

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला. ग्रीस देश तर विद्येचें माहेरघर म्हणूनच मानला जात असे. शिल्पकला, चित्रकला व वाङ्मय यांची अभिजात निर्मिती व त्या कलांचा शोधक व चिकित्सक बुद्धीनें अभ्यास ग्रीसमध्यें होत असे. परंतु सन १४५३ मध्यें तुर्क लोकांनीं विद्येचें केवळ माहेरघर असें कॉन्स्टँटिनोपल शहर हस्तगत केल्यामुळें त्या ठिकाणीं कायमची वस्ती करून राहिलेले अनेक शास्त्रज्ञ व ज्ञानजड पंडित आपले ग्रंथ व विद्या आपल्याबरोबर घेऊन, केवळ आश्रयाकरितां व आपली विद्या आणि आपल्या कला लोकांस शिकविण्याकरितां पश्चिम युरोपांतील मोठमोठ्या व महत्त्वाच्या शहरीं येऊन राहिले.

३. नवविद्येचा प्रसार:—ग्रीक पंडितांपैकीं अनेकांनीं आपल्या वास्तव्याकरितां इटली देश पसंत करून त्यांनीं फ्लॉरेन्स, बोलोना वगैरे शहरीं आपल्याजवळील ज्ञानाचा व कलांचा प्रसार करण्यास सुरुवात केली. यामुळें इटली देश चित्रकला, शिल्पकला, अभिजात वाङ्मयनिर्मिती व तत्त्वज्ञान यांमध्यें इतका पुढें गेला कीं, त्या वेळच्या नानाविध कलाकृतींची अजूनही तारीफ करावीशी वाटते व अजूनही इटली म्हणजे कलांचें माहेरघर असें समजण्यांत येतें. उत्तर युरोपांत–विशेषतः जर्मनीमध्यें–जे विद्वान् गेले त्यांनीं लोकांची अंधश्रद्धा नाहींशी करून चिकित्सक व शोधक बुद्धि निर्माण केली. याचा परिणाम असा झाला कीं, धर्मशास्त्राचा चिकित्सक बुद्धीनें अभ्यास करून मार्टिन ल्यूथरसारखे लोक धर्मावर उघड उघड हल्ला चढवूं लागले. धर्मशास्त्रांतील सर्वच तत्त्वें खरीं नसून पोप व धर्मगुरू यांचें आचरण धर्मविहित नाहीं असें पुष्कळांस वाटूं लागलें. खुद्द इंग्लंडमध्येंही या 'नूतन ज्ञानानें' आपला प्रभाव दाखविला! त्या देशांत नवीन विद्याविभूषित असे अनेक पंडित निर्माण होऊं लागले. हॉलंडमधील रॉटरडॅमचा इरॅस्मस हा या पंडितांचा मुकुटमणि समजला जात असे. त्याचा मित्र सर टॉमस मूर, सेंट पॉल्स शाळा स्थापन करणारा जॉन कॉलेट, विंचेस्टरचा आर्चबिशप रिचर्ड फॉक्स वगैरे अनेक पंडित या वेळीं प्रसिद्धीस आले. हे सर्व ऑक्सफर्ड–सुधारक म्हणून फार प्रसिद्धी पावले होते. रिचर्ड फॉक्सनें लॅटिन, ग्रीक व हेब्रू या भाषांच्या अभ्यासाकरितां ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांत सोय केली व खुद्द ग्रीस देशांतून त्या भाषांच्या शिक्षणाकरितां मोठ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठे शिक्षक आणले. त्यांनीं ॲरिस्टॉटल, प्लेटो वगैरे ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या शिक्षणाबरोबरच ग्रीक वाङ्मयाचा अभ्यासही आपल्या विद्यार्थ्यांकडून करून घेतला व त्यांच्या विचारांस एकप्रकारें नवीन दिशा दिली. त्याचप्रमाणें इंग्लंडमध्यें निरनिराळ्या 'व्याकरण शाळा' निघून त्यांमध्यें ग्रीक व लॅटिन या भाषांचा व त्या भाषांतील वाङ्मयाचा अभ्यास अत्यंत कसोशीनें होऊं लागल्यामुळें विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीस नवचैतन्य प्राप्त होऊं लागलें. निरनिराळ्या शास्त्रांचा खोल अभ्यास होऊं लागला, अंधश्रद्धेची जागा चिकित्सक बुद्धीनें घेतली व इंग्लंडमध्यें होऊं घातलेल्या धर्मसुधारणेची पूर्वतयारी पूर्णपणें घडून येण्यास मदत झाली.

४. छपाईचा शोध:—ग्रीक व लॅटिन भाषांच्या अभ्यासामुळें विद्येच्या पुनरुज्जीवनाचें पाऊल ज्याप्रमाणें पुढें पडलें त्याचप्रमाणें आणखी कांहीं नवीन शोधांमुळेंही त्या चळवळीस चांगलेंच रूप आलें. याच वेळीं कागदाचा शोध लागला होता, त्याचाही उपयोग होऊं लागला. लोकांमध्यें ज्ञानाची अभिरुचि वाढविण्याकरितां अनेक संशोधकांची एकसारखी खटपट चालली होती. पुस्तकांचा ज्ञानप्रसाराकरितां अतिशय उपयोग होतो हें जाणून, पुस्तकें हातानें लिहिण्यापेक्षां तीं अन्य तऱ्हेनें लोकांच्या हातीं स्वस्त दरानें कशीं देतां येतील या विचारांत अनेक संशोधक या वेळीं गुंतले होते. त्यांच्या प्रयत्नास यश येऊन छापण्याच्या कलेचा शोध जर्मनींत प्रथम लागला. अशा संशोधकांत जर्मनींतील मेंझचा जॉन गटेन्बर्ग हा प्रसिद्ध होय. त्यानें आपल्या छापखान्यांत प्रथमतः बायबल छापून काढलें. त्याच्या छापखान्यांतील पुष्कळ कामगार पुढें कलोन, पॅरिस, व्हेनिस वगैरे शहरीं जाऊन त्यांनीं आपापले छापखाने तेथें सुरू केले; व त्यांत पुस्तकें छापून लोकांच्या ज्ञानलालसेची ते तृप्ति करूं लागले. याच सुमारास इंग्लंडमधील विल्यम कॅक्स्टन यानें कलोन शहरीं जाऊन छापण्याची कला हस्तगत केली. तो आपल्या छापखान्यासह इंग्लंडमध्यें आला व आपल्या छापखान्यांत पुस्तकें छापूं लागला (१४७६). त्यामुळें पुस्तकें स्वस्त मिळूं लागलीं, ज्ञानभांडारें खुलीं झालीं व लोकांच्या विचारांत क्रांति होण्यास मदत झाली.

५. शास्त्रीय शोध:—छापखान्याच्या शोधाप्रमाणेंच इतरही अनेक शोध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या वेळीं लागले व त्यांचा विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीवर अप्रत्यक्ष-रीतीनें परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. होकायंत्राचा शोध या वेळीं लागला. त्याच्या मदतीनें खलाशांस निर्भयपणानें व वाटेल तितकें लांब, समुद्रावर पर्यटन करणें सोपें झाल्यामुळें अनेक नवीन भूमींचा शोध लागण्यास मदत झाली. इतके दिवस दर्यावर्दी लोकांस आकाशांतील तारे पाहूनच दिशा हुडकून काढाव्या लागत असत; पण आतां होकायंत्र निघाल्यामुळें त्यांची पुष्कळच सोय झाली. तशांतच दुर्बिणीचाही शोध लागल्यामुळें आकाशाचें कोडें हळूहळू उलगडूं लागलें. त्यांतील ताऱ्यांची माहिती लोकांस होऊं लागली, व ज्योतिषशास्त्राचा जन्म होण्यासही मदत झाली. दुर्बिणीचा शोध लावणारा प्रसिद्ध इटॅलियन ज्योतिषी गॅलीलियो यानें गुरूला चार उपचंद्र असून सूर्यावर काळे डाग आहेत असे शोध लावून लोकांच्या विचारास जोराची चालना दिली. दुसरा एक पोलंडमधील ज्योतिषी कोपरनिकस यानें पृथ्वी वाटोळी असून ती इतर ग्रहांप्रमाणें सूर्याभोंवतीं फिरते असा शोध लावल्यामुळें 'पृथ्वी सपाट असून ती विश्वाच्या केंद्रस्थानीं कायम बसविलेली आहे' या लोकांच्या ठाम कल्पनेस मोठाच धक्का बसला.

६. **कलांची प्रगति**:—याच सुमारास व सातवा हेन्री इंग्लंडवर राज्य करीत असतां इटलीमध्यें मोठमोठे चित्रकार व शिल्पकार उदयास आले होते. फ्लॉरेन्सचा ब्रॅमॉन्ट व त्याचे अनेक शिष्य यांनीं शिल्पकलेंत क्रांतीच घडवून आणिली. फ्लॉरेन्सचा दुसरा एक मोठा नामवंत व उत्तम चित्रकार–शिल्पशास्त्री म्हणजे मायकेल एन्जेलो होय. त्यानेंच रोमचें 'सेंट पीटर्स' या नांवाचें भव्य व उत्कृष्ठ प्रार्थनामंदिर बांधलें. त्याचप्रमाणें राफेल व लिओनार्ड व्हिंची यांनीं उत्कृष्ट चित्रें काढून आपलीं नांवें अजरामर करून ठेविलीं आहेत. या सर्व चित्रकारांनीं व शिल्पकारांनीं चित्रकला म्हणजे 'लोकांच्या परिचयाच्या धार्मिक प्रसंगांवर आधारलेलीं चित्रें चर्चच्या भिंतींवर लावणें' ही लोकांची भ्रामक कल्पना नष्ट केली व निसर्गांतील सुंदर सुंदर देखावे चित्रित करणें, संसारांतील रम्य प्रसंग कलापूर्ण रीतींनीं रंगविणें, मानवी पुतळे करणें वगैरेमध्येंही कला असूं शकते असें सिद्ध करून दिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



कोलंबसाच्या शोधापूर्वीच्या जगाचा एक काल्पनिक नकाशा.

Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. नव्या जलमार्गांकरितां धडपड :—विद्येच्या पुनरुज्जीवनानें व निरनिराळ्या शोधांमुळें दर्यावर्दी लोकांच्या आंगीं एक प्रकारचा जोम व उत्साह खेळूं लागला. पृथ्वीसंबंधीं त्यांच्या अनेक भोळ्या व चमत्कारिक कल्पना नाहींशा होऊं लागल्या. सफरी करून अज्ञात भूभागाचा शोध लावावा व नवीन नवीन भूभागांतील लोकांसंबंधीं माहिती मिळवून अलोट संपत्ति व कीर्ति मिळवावी असें कित्येकांस वाटूं लागलें. त्यांचे सर्व विचार व कल्पना जागच्या जागीं राहात असत. कोणाचीही विशेष हालचाल होत नसे. पण सन १४५३ मध्यें तुर्कांनीं कॉन्स्टँटिनोपल शहर हस्तगत केल्यानें युरोपचा पूर्वेकडील जगाशीं असलेला संबंध—विशेषतः हिंदुस्थानचा संबंध—तुटल्यासारखें झालें, युरोपियन लोकांचा विशेषतः व्हेनीशियन लोकांचा मसाल्यांच्या पदार्थांचा व्यापार बसूं लागला व हिंदुस्थानाशीं होणारा त्यांचा व्यापार बंद झाल्यानें त्यांना संपत्ति मिळेनाशी झाली. या घडामोडीनेंही नव्या सफरी करून हिंदुस्थानाला जाण्याकरितां नवा जलमार्ग शोधून काढण्याची पोर्तुगीज, स्पॅनिश, इटॅलियन वगैरे युरोपियन लोकांत एक प्रकारची स्पर्धा लागून राहिली व त्यामुळें भूमध्य समुद्रांतील व्यापार थांबल्यासारखा झाल्यानें मार्सेल, जिनोआ, व्हेनिस, अलेक्झांड्रिया, कॉन्स्टँटिनोपल वगैरे व्यापारी शहरांचें महत्त्व नाहींसें झालें. या वेळीं ज्ञात जगामध्यें युरोप, आशिया मायनर, सहारापर्यंतचा उत्तर आफ्रिकेचा भाग व हिंदुस्थान यांचाच अंतर्भाव होत असे. उत्तर युरोपचा भाग, अमेरिका व पूर्व आशियाचा भाग लोकांस माहीत नव्हता. सर्व ज्ञात जगामध्यें हिंदुस्थान देशाशीं व्यापार करावयाचा व त्या देशांतील रेशमी कापड, कापसाचें तलम कापड, सोनें-मोतीं, ऐषारामाचीं अनेकविध साधनें व विशेषतः मिरीं, दालचिनी, सुंठ, मोहरी, अक्रोड, लवंगा वगैरे मसाल्याचे जिन्नस यांची आपल्या देशांत आयात करावयाची एवढाच युरोपियन व्यापाऱ्यांचा हेतु असे. यावेळीं हिंदुस्थानाला जाण्याच्या मार्गावरील प्रमुख बंदरांचा ताबा तुर्कांच्या हातीं गेल्यानें युरोपियन व्यापारी बरेचसे हताश झाले; परंतु त्यांच्यांत जे अत्यंत धाडशी होते त्यांनीं हिंदुस्थानाला जाण्याकरितां नवीन जलमार्ग शोधून काढण्याकरितां चंग बांधले व ते त्या उद्योगाला लागले. अशा लोकात स्पॅनिश व पोर्तुगीज हे अग्रगण्य होत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



संशोधकांचे जलमार्ग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. **अमेरिकेचा शोध**—पृथ्वी गोल असल्यानें आपण पश्चिमेकडे जलपर्यटन करीत गेल्यास हिंदुस्थानाच्या किनाऱ्यास खात्रीनें लागूं, असें मानणारे कित्येक दर्यावर्दी लोक होते; त्यांत जिनोआचा क्रिस्टॉफर कोलंबस हा अग्रगण्य होता. आपली कल्पना पटवून देण्यासाठीं निरनिराळ्या युरोपियन राजांची त्यानें गांठ घेतली व त्यांच्या आश्रयाची याचना केली. परंतु त्याला मूर्खांत काढून सर्वांनीं आश्रय व मदत देण्याचें नाकारलें. तेव्हां तो हताश झालेला पाहून, स्पेनची राणी इसाबेला हिला त्याची दया आली व सर्व प्रकारची मदत करण्याचें तिनें त्याला वचन दिलें. सर्व सिद्धता झाल्यावर, हिंदुस्थान शोधून काढण्याकरितां, स्पेनमधील केडीझ बंदरांतून कोलंबस निघाला व थेट पश्चिमेकडे जाण्याकरितां त्यानें आपलीं जहाजें हाकारलीं. सुमारें तीन महिन्यांनंतर त्याला जमीन दिसूं लागली ! तेव्हां आपण हिंदुस्थानाला आलों असें त्याला वाटलें ! परंतु हिंदुस्थानाऐवजीं त्याला एका नवीन भूमीचा शोध लागला. ती भूमि म्हणजे अमेरिकेजवळचीं वेस्ट इंडीज बेटें होत (सन १४९२). त्या ठिकाणीं त्यानें स्पॅनिश सत्ता प्रस्थापित केली; व तेथून साखर, दारू, रंग, क्वचित् सोनें, रुपें यांची निर्यात स्पेनकडे होऊं लागली. यानंतर कोलंबसानें निरनिराळ्या वेळीं अमेरिकेला चार जलपर्यटणें केलीं; व वेस्ट इंडीज बेटांपैकीं बहुतेक सर्व बेटें, मध्य अमेरिका वगैरे भागांचा त्यानें शोध लाविला. तो सन १५०६ मध्यें मरण पावला. त्यानंतर स्पॅनिश दर्यावर्दी बालबोआ यानें पनामाची संयोगभूमि ओलांडून पॅसिफिक महासागराचें प्रथम दर्शन घेतलें. यामुळें पनामा संयोगभूमि व तिच्या आजूबाजूचा प्रदेश स्पॅनिशांस मिळाला. त्या भागांत मोत्यांचें शिंपले सांपडत असल्यानें स्पॅनिश वसाहतवाले मोत्यांचा व्यापार करूं लागले, व त्यावर पुष्कळ श्रीमान् झाले. याच सुमारास सन १५१९ मध्यें हरनँडो कॉर्टेझ या स्पॅनिश गृहस्थानें मेक्झिको देश शोधून काढला. त्या देशांतील सोन्याचांदीच्या खाणी तेथील राजाला मारून, त्यानें हस्तगत करून घेतल्या. यामुळें तेथील द्रव्याचा ओघ स्पेनकडे एकसारखा वाहूं लागल्यानें स्पेन देश श्रीमान बनला व इंग्लंडसारखीं राष्ट्रें त्याचा मत्सर करूं लागलीं ! या संपत्तीमुळें स्पॅनिश राष्ट्र सामर्थ्यवान् व बलाढ्य झालें. प्रसिद्ध स्पॅनिश दर्यावर्दी मेगॅलिन यानें सन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१५१९ मध्यें जगाला वळसा घालण्याकरितां आपलीं जहाजें हाकारून तो दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण भूशिराजवळून ईस्ट इंडिज बेटाजवळ आला. तेथें त्याचा खून झाला. परंतु त्याचा मदतनीस डेलकॅनो त्याचीं जहाजें बरोबर घेऊन, निघाल्या दिवसापासून सुमारें तीन वर्षांनीं, केप ऑफ् गुड होपला वळसा घालून स्पेनला परत आला! सन १५३२ मध्यें फ्रॅन्सिस्को पिझॅरो यानें दक्षिण अमेरिकेच्या पूर्वेकडील किनाऱ्यानें जलपर्यटण करून पश्चिम किनारा गांठला. त्या बाजूचे चिली व पेरू हे समृद्ध प्रांत त्याला लागले. या दोन्ही देशांत सोन्याच्या खाणी सांपडल्या; व त्या भागांतूनही विपुल संपत्ति स्पेनकडे येऊं लागली.

९. **हिंदुस्थानचा नवा जलमार्ग**:—स्पॅनिश दर्यावर्दी लोकांच्या या सर्व प्रयत्नांना हिंदुस्थानचा मार्ग हुडकून काढण्याचें श्रेय मिळालें नाहीं; तें पोर्तुगिजांच्या वांट्याला आलें. या वेळीं पोर्तुगीज राजपुत्र हेन्री याच्या प्रोत्साहनानें अनेक पोर्तुगीज दर्यावर्दी लोक पुढें आलें व त्यांनीं आफ्रिकेला वळसा घालण्याचे अनेक प्रयत्न केले. सन १४८६ मध्यें बार्थलोम्यू डायझ यानें केप ऑफ् गुड होपपर्यंत टप्पा गांठला. यामुळें आफ्रिकेचा बहुतेक सर्व पश्चिम विभाग व कांगो नदीच्या आजूबाजूचा प्रदेश पोर्तुगीजांच्या हातीं आला. त्यामुळें हस्तिदंत, सोनें, निरनिराळ्या वृक्षांपासून होणारीं तेलें, हिरे वगैरे विपुल वस्तू पोर्तुगालमध्यें येऊं लागल्या. पुढें सन १५०० मध्यें अमेरिगो व्हेस्पूसी या इटॅलियन खलाशानें पोर्तुगीजांच्या मदतीनें अमेरिकेची सफर केली व मध्य अमेरिकेचा किनारा व दक्षिण अमेरिकेचा उत्तर भाग शोधून काढला. त्याच्या नांवावरूनच या नवीन जगाला 'अमेरिका' असें नांव प्राप्त झालें. त्याच्या अगोदर वास्को–ड–गामा यानें सर्वांवर ताण केली. तो केप ऑफ गुड होपवरून आफ्रिकेच्या पूर्व भागांतील नाताळपर्यंत आला व तेथील कांहीं अरब व्यापाऱ्यांच्या मदतीनें सन १४९८ मध्यें हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत या प्रसिद्ध बंदरीं उतरला. त्याच्या या कर्तबगारीनें पोर्तुगीजांना अत्यंत आनंद झाला. हिंदुस्थानाचा व्यापार आपल्या हातीं आला असेंच त्यांस वाटूं लागलें. सन १५०१ मध्यें हिंदुस्थानाला जाण्याकरितां निघालेला काब्राल वादळांत सांपडल्यामुळें दक्षिण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



वास्को-ड-गामाचें जहाज

अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्याला असणाऱ्या ब्राझील देशाला लागला; व पुढें कांहीं दिवसांनीं हिंदुस्थानास तो आला. तेथील माल आपल्या जहाजांत मोठ्या मुष्कीलीनें भरून तो आपल्या देशीं परतला. पोर्तुगीज लोकांच्या प्रयत्नास चांगलें यश आलें. हिंदुस्थानाचा नवीन समुद्रमार्ग त्यांनीं हुडकून काढल्यानें त्यांचा व्यापार चांगलाच वाढला व त्यामुळें त्यांस मान व संपत्ति यांची जोड मिळाली.

१०. **पोपची काल्पनिक रेषा** :—स्पॅनिश व पोर्तुगीज यांचे अशा तऱ्हेचे अनेक शोध सुरू असतांच त्या दोघांमध्यें नवीन प्रदेशाकरितां व तेथील संपत्तीकरितां भांडणें सुरू झालीं. या भांडणांचा निकाल लावण्याचें काम पोपकडे आलें. त्या वेळीं पोपची आज्ञा शिरसावंद्य मानण्यांत येत असल्यानें पोपचा निकाल दोन्ही राष्ट्रांनीं मान्य केला. पोपनें सन १४९३ मध्यें ॲटलां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टिक महासागरांत एक काल्पनिक रेषा आंखली. ही रेषा ग्रीनलंड, वेस्ट इंडीज बेटें, ब्राझील या प्रदेशांतून थेट दक्षिणेकडे गेली होती. या रेषेच्या पूर्वेकडील भागावर पोर्तुगीजांचा व पश्चिमेकडील भागावर स्पॅनिशांचा अंमल असावा, असें पोपनें ठरवून दिलें. यामुळें अमेरिकेचा समृद्ध व्यापार व तेथील वसाहती स्पेनच्या ताब्यांत आल्या; व अफ्रिकेचा व्यापार व तेथील वसाहती, हिंदुस्थानाचा व्यापार, ईस्ट इंडजशीं व्यापार पोर्तुगीजांकडे आला. पोपची ही काल्पनिक रेषा युरोपांतील अनेक राष्ट्रांना मान्य नव्हती, व ती ओलांडून समुद्रावर वाटेल त्याला वाटेल तेथें प्रवास व जलपर्यटण करण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे असें म्हणणारे अनेक दर्यावर्दी इंग्लंडमध्यें जन्मास आले.

११. कॅबटचा शोध :—पोर्तुगीज व स्पॅनिश लोकांचे नवीन प्रदेश व नवीन जलमार्ग शोधून काढण्याचे प्रयत्न चालू असतां इंग्लिश लोक आपला शेतीचा धंदा संभाळून स्वस्थ होते ! त्यांच्याजवळ पुरेशीं जहाजेंही नसल्यानें परदेशाशीं व्यापार करावयाचा झाल्यास त्यांना क्वचित् प्रसंगीं दुसऱ्याचीं जहाजें घ्यावीं लागत. अशा स्थितींत जॉन कॅबट व त्याचा मुलगा सबॅस्टियन कॅबट या इटॅलियन दर्यावर्दी गृहस्थांनीं सातव्या हेन्रीचा आश्रय मिळविला व त्याची मदत घेऊन सन १४९७ मध्यें पश्चिमेकडे जाण्याच्या हेतूनें त्यांनीं आपलीं जहाजें ब्रिस्टल बंदरामधून हाकारलीं. त्यांनीं न्यूफाउंडलंडचा शोध लावला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे परत आल्यावर सातव्या हेन्रीनें कॅबटला त्याच्या शोधाबद्दल फक्त दहा पौंड बक्षीस दिले ! कॅबटच्या शोधामुळें इंग्लंडचेंही नांव पुढें आलें; पण या नवीन भूमींत इंग्लिश वसाहती होण्यास पुढें शंभर वर्षें लागलीं !

१२. बंदुकीची दारू :—वरीलप्रमाणें भौगोलिक शोध लागत असतांनाच आणखी एका नवीन शोधाचा उल्लेख या ठिकाणीं करणें रास्त होईल. तो शोध म्हणजे बंदुकीच्या दारूचा होय. होकायंत्राप्रमाणेंच या दारूचाही प्रथम उपयोग चिनी लोकांनीं केला असें म्हणतात. मार्कोपोलोनें होकायंत्र युरोपांत आणलें. तसेंच बंदुकीच्या दारूचा नुसता उल्लेख प्रथमतः रोजर बेकननें युरोपांत केलेला आढळतो. सन १३४६ मध्यें क्रेसीच्या लढाईंत या दारूचा उपयोग प्रथमतः करण्यांत आला असें म्हणतात. या शोधामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युद्धकलेंत मोठीच क्रांति झाली. चिलखती सैनिकांची गरज उरली नाहीं, धनुर्धारी लोक मागें पडले, अजिंक्य व महत्त्वाचे किल्ले पटापट पडूं लागले, व दारूचा मक्ता राजानें आपल्याकडेच ठेविल्यामुळें राजाची सत्ता वाढली व सरदारांची सत्ता संपुष्टांत येऊं लागली. बंदुकीच्या जोरावरच स्पॅनिश खलाशांस अमेरिकेंत आपलें बस्तान बसवितां आलें !

१३. शोधांचा परिणाम :—स्पॅनिश व पोर्तुगीज खलाशांनीं नवीन जलमार्ग व नवीन भूभाग शोधून काढले—विशेषतः हिंदुस्थानास जाण्याचा व्यापारी मार्ग शोधून काढला—यामुळेंही क्रांति झाली. एका अज्ञात जगाचा शोध लागल्यानें तेथून अगणित संपत्ति युरोपांत येऊं लागली. स्पेन व पोर्तुगाल यांसारख्या छोट्या राष्ट्रांची संपत्ति वाढल्यानें त्यांना महत्त्व प्राप्त झालें, व तीं राष्ट्रें सामर्थ्यवान् झालीं. स्पॅनिश व पोर्तुगीज किनाऱ्यावरील बंदरांस महत्त्व आल्यानें भूमध्य समुद्रावरील व्हेनिस, जिनोआ, अलेक्झांड्रिया वगैरे बंदरें मागें पडून अँटवर्प, लिस्बन, ॲमस्टरडॅम, लंडन वगैरे बंदरें पुढें येऊं लागलीं. भूमध्य समुद्रावरील व्यापार बंद पडून तो ॲटलांटिक महासागरांतून सुरू झाला. नवीन भूमींत वसाहती स्थापन होऊं लागल्या. पूर्वेकडील माल युरोपांत येऊं लागल्यानें त्याचा तेथें सर्रास उपयोग होऊं लागला. लोकांच्या कल्पनाही विस्तृत होऊं लागून आपल्या भौगोलिक अज्ञानाची त्यांस लाज वाटूं लागली. त्यामुळें धाडसी दर्यावर्दीपणास उत्तेजन मिळून, अनेक अचाट कृत्यें हातीं धरून तीं तडीस नेण्याकडे लोकांची प्रवृत्ति होऊं लागली. जुन्या कल्पना उराशीं बाळगल्यानें शेवटीं तोटाच होतो हें कळून आल्यानें कोणत्याही गोष्टीचा निकाल अंधश्रद्धेच्या जोरावर न लावतां ती पडताळून पाहून व तिची सत्यासत्यता पटल्यावर व्यवहारांत तिचा उपयोग करावयाचा हें तत्त्व लोक शिकले व तें आचरणांत आणूं लागले. लोकांची विचारशक्ति व चिकित्सकबुद्धि जसजशी जागृत झाली तसतशा त्यांच्या धार्मिक कल्पनाही बदलूं लागल्या. पोपवरील अभंग विश्वास हळूहळू नाश पावूं लागला. त्याच्याकडून व धर्मगुरूंकडूनच खऱ्या सत्याची शिकवण मिळूं शकते असें लोकमत होतें; तें पालटून मनुष्यानें खोल अभ्यास व तोही चिकित्सकबुद्धीनें केल्यास त्याला सत्य पारखतां येतें अशी कल्पना दृढ होऊं लागली. तसेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जग नश्वर व पापांनीं पूरेपूर भरलेलें आहे, अर्थात् त्यांत सदैव डुंबत राहणाऱ्याला मोक्षप्राप्ति कधींही व्हावयाची नाहीं ही कल्पना नष्ट झाली; व जग नश्वर व पापयुक्त असलें तरी तें सुंदर व मंगल आहे व त्यांतील सुंदर सुंदर वस्तूंचा जास्तींत जास्त उपयोग करून घ्यावा व तो घेतल्यानेंच सार्थक होईल अशी विचारसरणी प्रसृत होऊं लागली. यामुळेंच इतके दिवस जो मान पोपला देण्यांत येत असे तो आतां व्यक्तीला व तिच्या विकासाला दिला जाऊं लागला.

१४. राष्ट्रीयत्वाची जाणीव:—या सर्व नवीन शोधांचा व नवीन कल्पनांचा लोकांच्या मनावर आणखी एक परिणाम होऊं लागला. यापूर्वी सर्व लोक पोपच्या आज्ञा व त्याचे हुकूम मानण्यांतच भूषण मानीत. यामुळें स्पॅनिश, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्लिश, जर्मन वगैरे सर्व देश ख्रिस्तीधर्माचा जो प्रमुख धर्माधिकारी पोप त्याच्याच अंकित असत. सर्व राष्ट्रांचे राजेही पोपला वचकून असत. यामुळें सर्व युरोपियन राष्ट्रें जणूंकाय एकाच धार्मिक सत्तेनें एकत्रित केलेलीं व जोडलेलीं दिसत! परंतु नवीन शोध, नवीन विचार व विशेषतः विद्येचें पुनरुज्जीवन यांनीं लोकांच्या खुळचट व भोळ्या धर्मकल्पनांस जोराचा धक्का दिल्यानें पोपचें वर्चस्व झुगारून देण्याकडे लोकांची प्रवृत्ति होऊं लागली. स्पॅनिश लोक स्पेनकरितां झटूं लागले; पोर्तुगीज पोर्तुगालचें सामर्थ्य वाढवूं लागले; फ्रेंच फ्रान्सकरितां व जर्मन जर्मनीकरितां जिवापाड मेहनत करूं लागले. थोडक्यांत म्हणजे सर्व युरोपियन राष्ट्रांतील लोकांमध्यें आपण स्वतंत्र असून आपल्याला जें जें करावयाचें तें तें आपल्या राष्ट्राच्या उन्नतीकरितां व त्याचें सामर्थ्य वाढविण्याकरितां करावयाचें याची जाणीव उत्पन्न होऊं लागली. तसेंच राजेही आपल्या राष्ट्राचें बल वाढविण्याचा प्रयत्न करीत; त्याला मान कसा मिळेल व त्याची प्रतिष्ठा कशी वाढेल याच विचारांत ते सदैव गुरफटलेले असत. या सर्व गोष्टींच्या बुडाशीं एकच कल्पना होती व ती म्हणजे राष्ट्रीयत्वाची जाणीव होय.

अभ्यास

१. कॉन्स्टँटिनोपलचा पाडाव झाल्यानें कोणत्या गोष्टी घडून आल्या ? त्यांचें थोडक्यांत वर्णन करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. खालील व्यक्तींसंबंधीं एक महत्त्वाची गोष्ट सांगा—मार्कोपोलो, इरॅस्मस, टॉमस मूर, गटेन्बर्ग, मायकेल एन्जेलो, रोजर बेकन, मॅगॅलिन, विल्यम कॅक्स्टन, व्हेस्पूसी, बालबोआ, पिझॅरो, डायझ, कॉर्टेझ.

३. कोलंबस ज्या मार्गानें अमेरिकेस गेला, तो मार्ग दाखविणारा एक नकाशा काढा. त्यानें हा मार्ग कां स्वीकारला ?

४. जगाचा एक नकाशा काढून त्यांत निरनिराळ्या दर्यावर्दी लोकांनीं उपयोजिलेले जलमार्ग दाखवा. त्याचप्रमाणें त्यांत त्या वेळचीं प्रसिद्ध बंदरें भरा.

५. कोलंबसाबरोबर अगर वास्को-ड-गामाबरोबर तुम्ही जलपर्यटणास गेलां होतां अशी कल्पना करून तुमच्या जलपर्यटणाचें थोडक्यांत वर्णन करा.

६. या वेळीं जे शोध लागले ते थोडक्यांत वर्णा. त्यांपैकीं तुम्हांस कोणता आवडतो ? कां ?

७. सर्व संशोधक व शोधक यांच्या शोधांचा कालक्रम लक्षांत घेऊन त्यांचा एक कालादर्श बनवा.

८. विद्येच्या पुनरुज्जीवनाची थोडक्यांत हकीकत सांगा. विद्या व कला यांची प्रगति कशी झाली तें थोडक्यांत सांगा.

९. निरनिराळ्या शोधांचा व नूतन विद्येचा लोकांवर काय परिणाम झाला ?

१०. या शोधांचा राजसत्तेवर व राष्ट्रावर काय परिणाम झाला तें सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२५. नवविचारांचे कांहीं प्रवर्तक व संशोधक

१. इरॅस्मस (१४६५–१५३६):—युरोपांत व विशेषतः इंग्लंडमध्यें विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीचे व नवीन विचारांचे अनेक विद्वान पंडित उत्पन्न झाले होते. त्या सर्वांचा मुकुटमणि हॉलंडमध्यें रॉटरडॅमला रहाणारा इरॅस्मस होय. त्या वेळीं त्याच्या इतका जाडा विद्वान् तोच होय. ग्रीक व लॅटिन भाषांवर असामान्य प्रभुत्व गाजविणारा व त्या भाषांचें ज्ञान आपल्या विद्यार्थ्यांना देणारा इरॅस्मस पुस्तकें लिहून आपली उपजीविका करीत असे. पैशाच्या विवंचनेंत सदैव

इरॅस्मस

असल्यामुळें श्रीमंताकडे द्रव्याची याचना करण्याशिवाय त्याला गत्यंतरच नव्हतें. सन १४९९ मध्यें तो इंग्लंडमध्यें आला, व कॉलेटला त्यानें बरीच मदत केली. पुढें सन १५११–१३ पर्यंत केंब्रिज विश्वविद्यालयानें धर्मशास्त्रावर व्याख्यानें देण्याकरितां प्राध्यापक म्हणून त्याची योजना केली होती. त्याची उत्कृष्ठ कामगिरी म्हणजे त्यानें सन १५१६ मध्यें ग्रीक भाषेंतील बायबलचें लॅटिनमध्यें छापलेलें भाषांतर होय. येशू ख्रिस्ताच्या धर्माचीं खरीं तत्त्वें लोकांस कळावीं व त्यांच्या धर्मभोळ्या कल्पना व खुळे विचार नाहींसे करावे या हेतूनेंच त्यानें आपल्या बायबलचें भाषांतर छापून काढलें होतें. धर्ममंदिरांतील कांहीं पाद्र्यांचें व धर्मगुरूंचें आचरण शुद्ध नसून, शास्त्रविहित गोष्टी करण्यास व बायबलचा खरा अर्थ सांगण्यास लागणारी पात्रता त्यांच्या आंगीं नाहीं असें त्याचें ठाम मत होतें. म्हणून त्यानें ‘ मूढप्रशस्ती ’ नांवाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक व्याजोक्तिपूर्ण पुस्तक लिहिलें व धर्माधिकाऱ्यांचें अज्ञान चव्हाट्यावर मांडून त्यांची खरी योग्यता लोकांच्या निदर्शनास आणण्याची कामगिरी बजावली. इंग्लंड हा त्याचा लाडका देश होता. तेथील लोक बुद्धिमान् व विचारी आहेत असें त्यास वाटे. जॉन कॉलेट व सर टॉमस मूर या इंग्रज विद्वानांवर त्याची उत्तम प्रकारची छाप पडलेली होती. कॉलेट म्हणजे प्रति प्लेटो आहे असें त्याला वाटे ! इंग्लंड, जर्मनी, इटली वगैरे देशांत त्याचे ग्रंथ प्रकाशक आनंदानें छापीत असत. युरोपांत झालेल्या धर्मक्रांतीचा तो जनक होय, अशी सर्वसाधारण समजूत असल्यानें 'धर्मक्रांतीचें बीं त्यानें पेरलें व मार्टिन ल्यूथरनें त्या झाडाला खतपाणी घालून त्याची जोपासना केली' असें म्हणतात. परंतु ल्यूथरचीं धर्मविषयक क्रांतिकारक मतें त्याला मान्य नव्हतीं; आणि म्हणूनच त्यानें त्याचा पक्ष कधींही स्वीकारला नाहीं. त्याचीं शेवटचीं वर्षें अत्यंत हालअपेष्टेंत गेलीं. तो सन १५३६ मध्यें मृत्यु पावला.

२. जॉन कॉलेट (१४६७–१५१९):–इरॅस्मसनें प्लेटो म्हणून गौरविलेला हा इंग्लिश गृहस्थ प्रथमतः आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी प्रसिद्धीस आला. धर्मशास्त्रावर स्फूर्तिदायक व्याख्यानें देऊन ऑक्सफर्डच्या लोकांस खडबडून जागें करण्याचें काम यानेंच केलें. सन १५०५ मध्यें सातव्या हेन्रीनें त्याची योग्यता ओळखून 'सेंट पॉल्स' शाळेच्या मुख्याध्यापकाच्या जागेवर त्याची नेमणूक केली. ग्रीक भाषेवर त्याचें चांगलेंच प्रभुत्व असून धर्मशास्त्राचीं खरीं तत्त्वें समजून घेण्यास त्या भाषेचें ज्ञान असणें योग्य आहे असें त्याचें मत होतें. सन १५०८ मध्यें लंडनच्या सेंट पॉल्सच्या शाळेची, स्वतःचा पैसा खर्च करून, त्यानें पुनर्घटना केली. साध्या वागणुकीचा व उच्च विचारसरणीचा

जॉन कॉलेट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कॉलेट अत्यंत टापटिपीचा होता. आठव्या हेन्रीची त्याच्यावर अत्यंत मर्जी होती. आपल्या शाळेंत लॅटिन व ग्रीक भाषांचें ज्ञान आपल्या विद्यार्थ्यांस उत्तमप्रकारें देण्याची त्यानें व्यवस्था केली होती.

३. सर टॉमस मूर (१४७८–१५३५):—मध्यम उंचीचा, सुबक बांध्याचा, फिकट चेहऱ्याचा व इरॅस्मसचा आवडता इंग्रज गृहस्थ सर टॉमस मूर हा या वेळीं असाधारण बुद्धीचा समजला जात असे. त्याच्या डोळ्यांतही त्याच्या बुद्धिमत्तेचें तेज चमकत असे. त्याचें बोलणें मोहक व विनोदप्रचुर असे. कँटरबरीचा आर्चबिशप मार्टन

सर टॉमस मूर

याच्या नेतृत्त्वाखालीं त्याचें शिक्षण झालें; व त्याच्याच उत्तेजनानें ऑक्सफर्ड येथें कायद्याचा अभ्यास करून मूर बॅरिस्टर झाला. त्याची हुशारी व विद्वत्ता पाहून आठव्या हेन्रीनें त्याला 'सर' ही पदवी देऊन त्याचा गौरव केला. 'युटोपिया' या नांवाच्या त्याच्या ग्रंथाची सर्वत्र स्तुती झाली. त्या पुस्तकांत लोकांचें समाधान व संतोष यांवर उभारलेल्या आदर्श राज्यकारभाराचें त्यानें मोठ्या खुबीदारपणें वर्णन केलेलें आहे. त्याच्या आदर्श राज्यांत गरीब लोकांना स्थान नाहीं; सर्व मुलें आनंदानें शाळांत शिक्षण घेण्यांत सौख्य मानतात; सर्वांस स्वच्छेप्रमाणें पूजा–अर्चा करतां येते व सोन्यारुप्यास काडीचीही किंमत नसून गुन्हेगारांच्या पायांतील बिड्या करण्याकडेच त्यांचा उपयोग होतो! परंतु हें पुस्तक लिहिण्यांत त्याचा मुख्य हेतु म्हणजे त्याच्या काळच्या दोषांचें उत्कृष्ट वर्णन करणें हा होय. आठव्या हेन्रीनें त्याची प्रिव्ही कौन्सिलमध्यें नेमणूक केली होती. परंतु हेन्रीचें धर्मक्रांतीसंबंधाचें धोरण त्याला पसंत नव्हतें. मूरच्या खांद्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर हात टाकून आठवा हेन्री तासन् तास चर्चा करीत वागेंतही फिरत असलेला पाहून मूरच्या जांवयानें त्याचें कौतुक केलें; परंतु मूर हेन्रीला चांगल्याप्रकारें ओळखीत असल्यामुळें त्याला त्यानें उत्तर दिलें कीं, "राजेसाहेब माझ्याशीं ठीक वागतात खरें; परंतु वेळ आल्यास फ्रान्स-मधील एखादा उत्तम किल्ला मिळत असेल तर त्याकरितां माझें डोकेंही एक दिवस उडविण्यास ते मागेंपुढें पाहणार नाहींत!" आणि मूरचें हें म्हणणें एकंदरींत खरेंच ठरलें. वुल्सेच्या अधःपातानंतर हेन्रीनें त्याला आपला मुख्य प्रधान केलें; परंतु पोपविरुद्ध शपथ घेण्याचें ज्यावेळीं मूरनें अमान्य केलें, त्यावेळीं हेन्रीनें त्याचा शिरच्छेद करविला (१५३५).

४. **विल्यम कॅक्स्टन** (१४२२–१४९१):—इंग्लंडचा पहिला प्रकाशक व छापखानेवाला म्हणून विल्यम कॅक्स्टन हा फार प्रसिद्धी पावला. इंग्लंडमधील केंट परगण्यांत सन १४२२ च्या सुमारास याचा जन्म झाला. प्रथमतः खुद्द लंडन शहरांत तो रेशमी व लोकरी कापडाच्या धंद्यांत पडला; तेथून तो फ्लॅन्डर्समध्यें गेला व तेथें आपल्या आवडत्या व्यापारांत सुमारें बारा वर्षें अविश्रांत श्रम करून मोठ्या नांवलौकिकास चढला. एक दिवस बर्गंडीच्या राणीनें—चौथ्या एडवर्डच्या बहिणीनें—त्याला 'ट्रॉयचा वेढा' या पुस्तकाचें भाषांतर करण्यास सांगितलें. तें उत्कृष्ट झाल्यानें भाषांतर करण्याचा त्याला नादच लागला; व त्यानें पुढें बऱ्याच पुस्तकांचीं भाषांतरें केलीं. अशातऱ्हेनें या लोकरीच्या व रेशमाच्या व्यापाऱ्याची वाङ्मयाकडे दृष्टि वळल्यानें त्याचा प्रसार जास्त कसा करतां येईल याकडे त्याचें चित्त वेधलें

जॉन गटेन्बर्ग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेलें. त्याच सुमारास जॉन गटेन्बर्गचा छपाईचा शोध त्याचे कानीं गेल्यानें ती कला हस्तगत करावी असें त्याला वाटूं लागलें. तेव्हां प्रथमतः कलोन शहरीं गटेन्बर्गचा शिष्य थूलरिक झेल याच्याकडे तो गेला (१४७१); व त्याच्याजवळ टाइप पाडणें, ते जुळविणें, छापणें वगैरे संबंधींचें सर्व ज्ञान तो शिकला. नंतर तो आपल्या छापखान्यासह इंग्लंडमध्यें सन १४७६ च्या सुमारास आला व लंडनला त्यानें छपाईच्या कामास सुरुवात करून 'बुद्धिबळाचा खेळ' या नांवाचें पुस्तक प्रथमतः छापिलें. ज्या लोकांना छपाईची कोणत्याही प्रकारें कल्पना नव्हती त्यांना मोठेंच आश्चर्य वाटूं लागलें व 'कॅक्स्टनला एखादा वेताळ प्रसन्न झाला असून कॅक्स्टन हा चेटकें करणारा आहे' असें पुष्कळ लोक म्हणूं लागले! कांहींनीं तर त्याच्या छापखान्यावर हल्ला करून तो जाळून टाकावा असें ठरविलें! पण कांहीं विद्वानांनीं कॅक्स्टनच्या कलेचें कौतुक केल्यानें व पुढें राजानेंही त्याला पाठिंबा दिल्यानें त्याची चांगलीच भरभराट होऊं लागली. तो सन १४९१ मध्यें मृत्यु पावला. त्यानें आपल्या हयातींत पुष्कळ नामांकित ग्रंथांचीं भाषांतरें करून ते ग्रंथ आपल्या छापखान्यांत छापले.

५. कोपर्निकस (१४७३–१५४३):—हा पोलंड देशाचा रहिवासी. त्याचा जन्म सन १४७३ मध्यें झाला. त्याचें पालनपोषण त्याच्या चुलत्यानेंच केलें. धंद्यानें तो पाद्री होता. परंतु मोठा विद्वान् व चालीरीतींनीं मोठा सभ्य अशी त्याची ख्याती होती. त्याचा ज्योतिषशास्त्राचा जाडा व्यासंग होता. सूर्यमालेसंबंधाच्या आपल्या शोधांनीं त्यानें जगाला थक्क करून सोडलें; व 'सर्व विश्वाच्या केंद्रस्थानीं पृथ्वी कायमची बसविलेली नसून ती इतर ग्रहांप्रमाणेंच गोल आहे व सूर्याभोंवती फिरते' असा आपला ठाम सिद्धान्त लोकांपुढें मांडला. पृथ्वी सपाट आहे, गोल नाहीं व ती विश्वाच्या केंद्रस्थानीं आहे, अशी सर्व लोकांची समजूत होती. तिला या सिद्धान्तानें जोरानें धक्का दिला. त्याचे सिद्धान्त लोकांना पटले नाहींत. विशेषतः पोपला तर भयंकर राग आला! आपलीं मतें व शोध पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यास तो भीत असे. शेवटीं त्यानें आपले सिद्धान्त छापवून काढले व आश्चर्याची गोष्ट कीं, तो मेला त्याच दिवशीं त्याला स्वतःच्या पुस्तकाची संपूर्ण प्रत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहावयास मिळाली. तो सन १५४३ मध्यें मरण पावला. आधुनिक ज्योतिष-शास्त्राचा तो जनक समजला जातो.

६. गॅलीलियो (१५६४–१६४२) :—कोपर्निकसनंतर सुमारें पन्नास वर्षांनीं गॅलीलियोचा उदय झाला. सन १५६४ मध्यें तो इटलीमधील पिसा गांवीं जन्मला. प्रथमतः लहान मुलांकरितां खेळणीं करावीं, यंत्रांचे लहानमोठे नमुने करावे व ते विकून त्याच्यावर आपली गुजराण करावी हाच त्याचा धंदा होता; परंतु पुढें पुढें तो फार प्रसिद्धीस आला. पादुआ या गांवीं त्याला प्राध्यापकाची जागा मिळाल्या-वर आपल्या पूर्वीच्या धंद्याची त्यानें पुष्कळच सुधारणा केली व निरनिराळे प्रयोग करून खगोलमंडलाचे शोध लावतां येतील अशी एक मोठी दुर्बीण त्यानें तयार केली. या दुर्बिणीच्या साहाय्यानेंच त्यानें 'गुरूला चार चंद्र आहेत व सूर्यावर काळे डाग आहेत' असें सिद्ध केलें. तसेंच पुढें त्याला शनीच्या कड्याचाही शोध लागला. थरमॉमीटर व लंबक यांची कल्पना त्याचीच होय. परंतु त्याचे शोध धर्माविरुद्ध आहेत व त्याचे विचार पाखंडी आहेत असें म्हणून सन १६११ मध्यें इन्किझिशन कोर्टानें त्याला कैद केलें. 'माझ्या विचारांचा मी प्रसार करणार नाहीं व ते कोणालाही शिकविणार नाहीं' असें त्यानें वचन दिल्यावर त्याची सुटका झाली. परंतु त्याप्रमाणें वागावें असें त्याचें मन त्याला सांगेना. त्यानें आपल्या शोधांचा प्रसार करण्यास पुन्हां सुरवात करतांच त्याला पुन्हां कैद झाली. पुढें त्याची सुटका झाली. गॅलीलियो उत्तम गणिती व ज्योतिषी असून तो स्वतःस कोपर्निकसचा शिष्य म्हणवी. तो सन १६४२ मध्यें मरण पावला.

गॅलीलियो

७. क्रिस्टॉफर कोलंबस (१४४६–१५०६):—या प्रसिद्ध नावाड्याचा जन्म इटलीमधील जिनोआ बंदरीं सन १४४६ सालीं झाला. त्याचा बाप अत्यंत दरिद्री होता. जन्मापासून कोलंबसाचा खलाशी होण्याकडे कल होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या घराच्या दारांत बसावें व पुढें दिसणाऱ्या समुद्राकडे दृष्टि लावून खलाशांच्या लीला मोठ्या कौतुकानें पहाव्या असा त्याचा लहानपणचा कार्यक्रम असे. वयाच्या चौदाव्या वर्षी आपल्या आवडत्या धंद्यांत तो पडला व पुढें आपल्या भावाकडे लिस्बनला गेला. तेथें त्यानें नौकानयना-संबंधीं पुष्कळ ज्ञान संपादन केलें. याच वेळीं पृथ्वी वाटोळी असून युरोपच्या थेट पश्चिमेस गेल्यास आपण आशियाच्या किनाऱ्यास पोहोंचूं असें अनेक



सँटामेरिया—कोलंबसाचें जहाज

इटॅलियन नावाड्यांस वाटत होतें. तीच कल्पना उचलून तडीस नेण्याचे प्रयत्नास कोलंबस लागला. परंतु तो पडला दरिद्री ! त्यामुळें आश्रयाकरितां त्याला देशोदेशच्या राजांच्या व धनिकांच्या मदतीची याचना करावी लागली. प्रथमतः जिनोआ व नंतर व्हेनिस येथील ड्यूकनीं त्याला थारा न दिल्यानें फ्रान्स, इंग्लंड, पोर्तुगाल वगैरे देशांच्या राजाकडे तो वळला; परंतु तेथेंही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याची डाळ शिजली नाहीं ! तेव्हां तो हताश झाला असतां स्पेनची राणी इसाबेला व राजा फर्डिनंड यांनीं त्याला सर्व प्रकारची मदत देण्याचें कबूल केलें. सर्व सिद्धता झाल्यावर कोलंबस १४९२ मध्यें आपल्या पहिल्या सफरीवर निघाला. वाटेमध्यें त्याचे पुष्कळ हाल झाले. अन्नपाणी संपलें, वादळांत सांपडून त्याचीं एकदोन जहाजेंही नाहींशीं होण्याच्या बेतांत आलीं, त्याचे लोकही त्याचा खून करण्यास प्रवृत्त झाले; पण कोलंबसानें धीर सोडला नाहीं. अखेर त्याला नवीन भूमि आढळली. पण तें हिंदुस्थान नसून इतके दिवस अज्ञात अशी एक नवीनच भूमि होती–तो बेटांचा एक समूह होता–व 'वेस्ट इंडीज' या नांवानें तो आज ओळखला जातो. तेथें त्यानें स्पेनचें निशाण रोविलें; व थोडे दिवस राहून तो स्पेनला परत आला. त्यावेळीं स्पॅनिश लोकांनीं व राजाराणीनींही त्याचें उत्तम स्वागत केलें. त्यानंतर कोलंबसानें त्या नवीन भूमीकडे चार सफरी केल्या. परंतु त्याचा उत्कर्ष अनेक लोकांना सहन झाला नाहीं ! त्यांनीं त्याच्यासंबंधीं अनेक प्रकारच्या तक्रारी राणीकडे केल्या. त्यामुळें त्याचा अधिकार काढून घेण्यांत आला. त्याची सद्दी संपली व त्याच्या नष्टचर्याला सुरुवात झाली. अखेर अत्यंत हालांत व दारिद्र्यांतच या थोर शोधकाचा अंत झाला (१५०६). ज्या देशाला त्यानें नवीन वसाहती व विपुल संपत्ती मिळवून दिली, तो देश त्याच्या विपन्नावस्थेंत त्याच्या मदतीला धांवला नाहीं याबद्दल त्याला अतोनात वाईट वाटलें !

८. **वास्को–ड–गामा** (१४६९–१५२४):—वास्को-ड-गामाचा जन्म सन १४६९ च्या सुमारास पोर्तुगालमध्यें झाला. त्याचें नाविक शिक्षण पोर्तुगालमध्येंच झालें होतें. हिंदुस्थानचा नवीन मार्ग शोधून काढण्याचा पोर्तुगीज लोकांचा उद्योग सुरू असतां बार्थलोम्यू डायझनंतर वास्को-ड-गामा आफ्रिकेच्या दक्षिण टोंकास वळसा घालून कांहीं अरब व्यापाऱ्यांच्या मदतीनें तो सन १४९८ मध्यें कालिकत बंदरीं उतरला. तेथें कांहीं महिने राहून तो पोर्तुगालला परत आला (१४९९). राजानें व लोकांनींही त्याचें उत्कृष्ट स्वागत केलें. गामानें हिंदुस्थानचा नवीन मार्ग शोधून काढल्यानें जगाच्या इतिहासांत

वास्को-ड-गामा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठीच क्रांति झाली. पोर्तुगालचें महत्त्व वाढलें. त्यानंतर गामानें सन १५०२ मध्यें दुसरी सफर केली. हिंदुस्थानांत आल्यावर त्यानें अनेक क्रूर कृत्यें केलीं व मसाल्याचे पदार्थ व इतर जिन्नस बरोबर घेऊन तो सन १५०३ मध्यें पोर्तुगालला परत आला. त्या वेळींही त्याचा उत्तम सत्कार करण्यांत आला. गामा मोठा धाडसी पण क्रूर होता. त्याचें त्याच्या सहाकाऱ्यांशीं नेहमीं जमत असेच असें नाहीं. तो सन १५२४ सालीं मेला.

अभ्यास

१. कोपर्निकस व गॅलीलियो यांचे सिद्धान्त कोणते ? ते तुम्हांस पटतात ? कां ? त्यांच्यासंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

२. विल्यम कॅक्स्टनला लोक चेट्टक करणारा कां म्हणत ? तुम्हीं त्याचें कौतुक केलें असतें का ? कां ? त्याचें चरित्र थोडक्यांत सांगा.

३. टॉमस मूरच्या युटोपिया ग्रंथाचें मर्म सांगा.

४. इरॅस्मस, कॉलेट व मूर यांनीं धर्मसुधारणा जवळ आणली असें कां म्हणतात ? कारणें द्या.

५. ऑक्सफर्ड–सुधारक व नवीन भूमीचे शोधक यांपैकीं तुम्हांस कोण जास्त आवडतो ? कां ? त्याचें थोडक्यांत चरित्र द्या.

६. तुम्हांस आवडणाऱ्या एखाद्या दर्यावर्दी मनुष्याच्या चरित्राचें सचित्र वर्णन करा (चित्रें स्वतः काढलेलीं उत्तम. हीं चित्रें त्याच्या आयुष्याच्या महत्त्वाच्या प्रसंगांवर प्रकाश पाडणारीं असावीं. त्याचें वर्णन शेजारील रकान्यांत द्यावें).

उतारा

१. रेड इंडियन लोकांसंबंधीं कोलंबसाचें मत (१४९२)

'या प्रदेशांतील लोक नग्नावस्थेंतच राहतात व वावरतात. जात्या बुजरे व भित्रे असल्यामुळें असो किंवा अन्य कारणानें असो, ते आपल्याजवळ तरवारी व इतर हत्यारें मुळींच बाळगीत नाहींत. मात्र हत्यारांच्याऐवजीं त्यांच्याजवळ वेताच्या काठ्या सदैव असतात. या काठ्यांच्या टोंकास टणक लाकडाचीं अणकुचीदार पण तीक्ष्ण बोंडें लावलेलीं असतात. असल्या काठ्यांचाही ते क्वचितच उपयोग करतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आम्हांला पाहिल्याबरोबर भीतीनें त्यांची एकच गाळण उडाली व अत्यंत लगबगीनें ते दूर पळून गेले. या धांदलींत मुलांनीं बापांची व आईबापांनीं आपल्या मुलांची मुळींच पर्वा केली नाहीं! माझ्याजवळ असलेल्या जिनसां-पैकीं हाताला येईल ती जिन्नस मी त्यांस दिली. त्यावेळींही ते मला भीत होते. त्यांची राहाणी साधी आहे. ते प्रामाणिक व उदार मनाचे आहेत. साध्या व क्षुल्लक वस्तूकरितांही ते मौल्यवान वस्तू देतात! साधीं भांडीं, बाटल्या, धनुष्याचे मोडके भाग, आरसे, कातडी पट्टे वगैरेंसारख्या हलक्या वस्तू-बद्दलही त्यांनीं आम्हांस कापूस, सोनें वगैरे मौल्यवान् चिजा दिल्या. यावरून ते मूर्खही असावेत असें माझें मत झालें. ते मूर्तीपूजक नाहींत; तरीपण ईश्वरावर त्यांचा भयंकर विश्वास आहे. सैन्य व जहाजें यांच्यासह देवानेंच त्यांच्याकडे आमची रवानगी केली आहे असें ते समजतात. त्यांची बुद्धी चांगली असून त्यांस समजूतही चांगली आहे. त्यांना आमची भाषा शिकवून त्यांच्याकडून त्यांच्या देशाची माहिती समजून घेण्याचा मीं प्रयत्न केला व तो यशस्वी झाला.'

प्रश्नः—१. रेड इंडियन लोकांचे कोणकोणते गुणावगुण कोलंबसाला दिसले?

२. त्यांच्यासंबंधीं तुमचें मत काय झालें असतें? त्यांना रेड इंडियन कां म्हणतात?

३. ते लोक हत्यारें कां बाळगीत नसत? कोलंबसाजवळ कोणतीं हत्यारें होतीं?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ट्यूडर घराणें

२६. अनियंत्रित राजसत्तेची घटस्थापना : सातवा हेन्री

(इ. स. १४८५–१५०९)

१. राजपदावरील हक्क :—सन १४८५ मध्यें बॉसवर्थ येथें झालेली लढाई अत्यंत निर्णायक ठरली. त्या लढाईमुळें लँकॅस्टर व यॉर्क घराण्यांतील गेलीं तीस वर्षें चाललेल्या लढ्याचा कायमचा निकाल लागला; व इंग्लंडचा राजा तिसरा रिचर्ड मारला गेल्यामुळें त्याचा प्रतिस्पर्धी रिचमॉंडचा ड्यूक, हेन्री, हा विजयी ठरला. लगेच पार्लमेंटनें त्याला राजा म्हणून मान्य केलें व पोपनेंही त्याच्या राज्यपदाला आपली संमति दिली. अशा रीतीनें हेन्री ट्यूडर हा सातवा हेन्री म्हणून इंग्लंडचा राजा झाला. तरीपण इंग्लंडच्या राजपदावर आपला हक्क सांगणारे कांहीं वारस यावेळीं पुढें आले. त्यामध्यें यॉर्क घराण्यांतील राजा, चौथा एडवर्ड, याची सुंदर मुलगी एलिझाबेथ ही एक होती. सातव्या हेन्रीनें तिच्याशीं लग्न करून आपलें आसन स्थिर केलें.

सातवा हेन्री

२. हेन्रीचें धोरण :—यॉर्क व लँकॅस्टर घराण्यांतील यादवी युद्धाचा–गुलाबांच्या युद्धांचा–निकाल आपल्यासारखा झाला म्हणून आनंदानें बेहोष होणारा सातवा हेन्री नव्हता. इंग्लंडला जर कोणत्या गोष्टीची आवश्यकता असेल तर ती शांततेची आहे याची त्याला पक्की जाणीव होती. गुलाबांच्या युद्धांत अनेक नामांकित सरदार

यॉर्कची एलिझाबेथ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व उमराव मेले असले तरी जे जिवंत राहिले होते ते राजाला जुमानणारे नसून वेळ आल्यास त्याला व त्याच्या सिंहासनाला धोका उत्पन्न करणारे आहेत, हें सातवा हेन्री जाणून होता. अर्थात् इंग्लंडमध्यें शांतता निर्माण करावयाची असल्यास या अरेराव सरदारांच्या शक्तीचा व लष्करी सामर्थ्याचा नाश करणेंच देशाच्या हिताचें होतें. त्यांसंबधीं त्या वेळचा एक न्यायाधीश हेन्रीला म्हणाला " आपल्या पायांखालीं कायदे तुडविणाऱ्या उमरावांना जोंपर्यंत आपण धाकांत ठेवणार नाहीं तोंपर्यंत इंग्लंडांत शांतता निर्माण होणें शक्य नाहीं. नाहींतर राजानें चांगले चांगले कायदे करावे व बेजबाबदार उमरावांनीं आपल्या बगलबच्यांना ते मोडण्यास उत्तेजन द्यावें व वेळेनुसार आपणही त्या प्रकारचें उदाहरण घालून द्यावें असा प्रकार सर्रास सुरू होईल व देशांत पुन्हां अशांततेचें वातावरण माजेल" या म्हणण्याची हेन्रीला पूर्णपणें सत्यता पटलेली होती. व म्हणूनच त्यानें सरदारांच्या सामर्थ्याचें निर्मूलन करण्याचें ठरविलें होतें. मध्यम वर्गातील लोक समाधानी असून त्यांची स्थितीही भरभराटलेली होती. मात्र सरदारांच्या त्रासांतून सोडविणारा राजा त्यांस हवा होता. सातवा हेन्री तसा असल्यानें स्वतः अरेराव असूनही बहुजन समाजाच्या पसंतीस तो उतरला.

३ **सातव्या हेन्रीचें ध्येय** :—राजा झाल्यावर राज्यकारभारांत जातीनें लक्ष घालण्याचें हेन्रीनें ठरविलें. यामुळें सरदारांचें सामर्थ्य कमी करून देशांत शांतता निर्माण करावयाची या एकाच ध्येयाला तो चिकटून राहिला नाहीं. त्याला अनेक गोष्टी साधावयाच्या होत्या. तोतये व अरेराव सरदार यांचा नायनाट करून आपलें व आपल्या वारसांचें आसन त्याला स्थिर करावयाचें होतें. आपली सत्ता दृढ व प्रबल करण्याकरितां त्याला पैसा उभा करावयाचा होता; इंग्लंडच्या व्यापाराला उत्तेजन देऊन त्याची त्याला वाढ करावयाची होती; उत्तमोत्तम खलाशांच्या धाडसी पराक्रमांस मदत देऊन इंग्लंडचें नांव त्याला पुढें आणावयाचें होतें व युरोपियन राजकारणांत प्रत्यक्ष हात घालून आंतरराष्ट्रीय बाबतींत इंग्लंडला प्रतिष्ठा व मान मिळवून देण्याची त्याची इच्छा होती. या व अशा हेतूंनीं प्रेरित होऊनच हेन्रीनें इंग्लंडच्या राज्यकारभाराची धुरा आपल्या मानेवर घेतली होती व त्यांत त्याला बरेंच यशही मिळालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. तोतयांचें पारिपत्य :—सर्व परिस्थितीचा विचार करून व त्यानंतर आपलें निश्चित असें धोरण ठरवूनच हेन्रीनें आपला पुढील मार्ग चोखाळण्यास सुरवात केली. प्रथमतः इंग्लंडच्या गादीवर आपला वारसा हक्क सांगणाऱ्यांकडे नजर फिरवून आपलें आसन स्थिर करण्याच्या उद्योगास तो लागला. अशा लोकांत मुख्यतः चौथ्या एडवर्डचा पुतण्या एडवर्ड–वॉरिकचा उमराव–व चौथ्या एडवर्डची मुलगी एलिझाबेथ यांचा समावेश होतो. त्यांपैकीं एलिझाबेथशीं त्यानें लग्न केलें; व एडवर्डला लंडनच्या टॉवर-मध्यें तुरुंगांत ठेवलें. एलिझाबेथवर त्याचें प्रेम नव्हतें; पण तिच्याशीं लग्न केल्यानें पुष्कळ लोकांचें समाधान होऊन यॉर्क व लँकॅस्टर या दोन्ही घराण्यांचें एकीकरण घडवून आणल्याचें आपल्याला श्रेय मिळेल असा जो त्याचा बेत होता तो साध्य झाला. याशिवाय इंग्लंडच्या गादीवर आपला हक्क सांगणारे कांहीं तोतये निर्माण झाले. त्यांत लँबर्ट सिम्नेल व पर्किन वॉरबेक हे बरेच प्रसिद्धीस आले होते. त्या दोघांनींही बंडें केलीं. लँबर्ट सिम्नेल हा एक लहान चौदा वर्षांचा मुलगा होता. लोकांच्या चिथावणीस भरीं पडून 'आपण वॉरिकचे उमराव आहों' असें सर्वांस भासविण्यास त्यानें सुरुवात केली. परंतु वॉरिकचा खरा उमराव हेन्रीच्या कैदेंतच होता; त्याला हेन्रीनें सर्वांस दाखविलें व लँबर्ट तोतया आहे हें लोकांच्या निदर्शनास आणलें. तेव्हां इंग्लंडमध्यें आपल्याला आश्रय मिळणार नाहीं असें समजून लँबर्टला त्याच्या लोकांनीं आयर्लंडमध्यें नेलें. तेथें यॉर्क घराण्याचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांनीं त्याची तळी उचलून धरली व त्याला राज्याभिषेकही केला. त्यांची मदत घेऊन लँबर्ट ससैन्य इंग्लंडांत उतरला; पण स्टोक येथें हेन्रीनें त्याचा पराभव करून त्याला कैद केलें. पुढें हेन्रीनें त्याला क्षमा करून आपल्या राजवाड्यांतील भटारखान्यांत नोकरीस ठेवून घेतलें !

५. पर्किन वॉरबेक :—दुसरा तोतया पर्किन वॉरबेक. यानें बराच धुमाकूळ माजविला होता. 'चौथ्या एडवर्डचा दुसरा मुलगा व यॉर्कचा ड्यूक जो रिचर्ड तो मीच आहें,' असें तो लोकांस सांगत असे. खरें पाहतां तिसऱ्या रिचर्डनें इंग्लंडचा अल्पवयी राजा पांचवा एडवर्ड व यॉर्कचा ड्यूक रिचर्ड या दोघांनाही कंठस्नान घातलें होतें. परंतु पर्किनचें म्हणणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें कीं " माझा भाऊ पांचवा एडवर्ड याला ठार मारण्यांत आलें असलें तरी मी त्यावेळीं कैदेंतून पळाल्यामुळें वांचलों; अर्थात् मी जिवंत असल्यामुळें इंग्लंडच्या गादीवर माझाच हक्क जास्त पोहोंचतो." पर्किनचें म्हणणें हेन्रीलाही खोडून काढतां येईना. त्यामुळें त्याला लोकाश्रयही बराच मिळूं लागला. प्रथमतः त्यानें आयर्लंड गांठलें. तेथें त्याचें उत्तमरीतीनें स्वागत झालें. नंतर तो फ्रान्समध्यें गेला व फ्रान्सच्या राजानेंही त्याला आश्रय दिला. तेव्हां हेन्रीनें सन १४९२ मध्यें फ्रान्सवर स्वारी केली; परंतु युद्ध झालें नाहीं. बरीच मोठी रक्कम देण्याचें व फ्रान्समधून पर्किनला हांकलून देण्याचें फ्रान्सच्या राजानें हेन्रीला अभिवचन दिल्यानें पर्किनला नेदरलंडची राणी बर्गंडीची डचेस हिचा आश्रय घेणें भाग पडलें. नेदरलंडच्या फ्लँडर्स या भागांत डचेसच्या आश्रयाखालीं पर्किन सुमारें तीन वर्षें राहिला होता. परंतु तो फ्लँडर्समध्यें आहे असें कळल्यावर हेन्रीनें इंग्लिश लोकर फ्लँडर्समध्यें पाठविणें कायद्यानें बंद केलें. आपला लोकरीचा व्यापार बंद पडणार असें वाटून बर्गंडीचा ड्यूक व नेदरलंडचा राजा फिलिप, यानें पुढें हेन्रीशीं व्यापारी तह करून पर्किनला कोणतीही मदत न देण्याचें मान्य केलें. यामुळें पर्किन पुढें स्कॉटलंडमध्यें चौथ्या जेम्सच्या आश्रयास गेला. परंतु इंग्लंडचा आपल्यावर हल्ला येईल या भीतीनें त्यानें त्याला स्कॉटलंडमधून घालवून दिलें. इतक्यांत आयर्लंडमध्यें असतां इंग्लंडांतील कॉर्नवालमधील लोकांनीं हेन्रीविरुद्ध बंड उभारल्याचें त्याला कळल्यावरून तिकडे तो गेला. परंतु त्या वेळीं हेन्रीनें बंडवाल्यांचा मोड केला होता. मोडलेलें बंड पुन्हां उभारण्याच्या खटपटींत असतां हेन्रीनें त्याचा पाठलाग करून त्याला कैद केलें व लंडनच्या टॉवरमध्यें कैदेंत टाकलें. तेथेंच वॉरिकचा उमरावहीं कैदेंत होता. त्याच्याशीं संगनमत करून तुरुंगांतून पळून जाण्याचा दोघांनींही घाट घातला; तेव्हां हेन्रीनें त्यांना फांशीं दिलें (१४९९).

६. सरदारांविरुद्ध कायदा:—इंग्लंडच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या लोकांचा व तोतयांचा निःपात करण्यांत गुंतला असला तरी हेन्रीनें आपले बाकीचे उद्देश दूर सारलेले नव्हते. देशांत शांतता निर्माण करावयाची असल्यास तिचे कट्टे वैरी जे उमराव त्यांचा बींमोड करण्याचें त्यानें ठरविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुलाबांच्या युद्धांत बरेच सरदार व उमराव मारले गेले होते; परंतु जे शिल्लक उरले होते ते राजसत्तेस विरोध करीत होते व राजानें पास केलेले कायदे मोडीत असत. त्यांना योग्य शासन होणें जरूर होतें. शिवाय हे उमराव आपल्या पदरीं अनेक सशस्त्र शिपाई बाळगून मोठ्या मिजासींत राहात. मालक देईल तो गणवेष घालून व त्याच्या घराण्याचा शिक्का आपल्या छातीवर लटकावून हे शिपाई सदा मिरवीत व अन्नवस्त्र आणि पैसा यांच्या मोबदल्यांत आपल्या मालकाचा शब्द सदैव झेलण्यांतच पुरुषार्थ मानीत. या पद्धतीस ' लिव्हरी ' अथवा 'भडक गणवेषाची पद्धति ' असें म्हणत. या लोकांच्या मदतीनें कित्येक उमरावांनीं लोकांनाही उपद्रव देण्यास कमी केलें नाहीं. आपल्या शिपायांच्या रक्षणार्थही हे सरदार झटत असत. वेळेनुसार न्यायाधीशांना व ज्यूरीलाही तंबी देऊन आपल्यासारखा न्याय मिळवीत अगर आपल्या शिपायांच्या हितांचें रक्षण करीत; व त्याच्या मोबदल्यांत त्यांच्याकडून आपलीं कामें करून घेत. या प्रकारास ' सांभाळ ' अथवा 'मेंटेनन्स' असें म्हणत. या सशस्त्र शिपायांमुळें सरदारांचें बरेंच प्रस्थ माजलें होतें. त्यांचें सामर्थ्य वाढल्यानेंही देशांत दंगेधोपे होत असत व बंडाळीही क्वचित् माजे. एका सरदारानें एकदां एक्झीटरच्या प्रार्थना-मंदिरावर आपल्या पांच हजार शिपायांसह हल्ला केला व तेथील संपत्तीही लुटली ! दुसऱ्या एकानें पांचशें लोकांसह अरण्यांत एका श्रीमंतास गांठून त्याला लुटलें व 'तूं हें बेकायदेशीर कृत्य कां केलेंस ?' असें विचारतां 'असलें कृत्य बेकायदेशीर होतें हें मला माहीत नव्हतें.' असें त्यानें निर्भयपणें व बेडरपणें भर पार्लमेंटमध्यें सांगितलें ! या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन वरील पद्धति बंद पाडण्याकरितां व सरदार–उमरावांचें सामर्थ्य व महत्त्व नाहींसें करण्याकरितां हेन्रीनें सन १३९० सालीं पार्लमेंटनें पास केलेल्या कायद्याची अंमलबजावणी विशेष कडक रीतीनें करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें पार्लमेंट-कडून तशाच तऱ्हेचा कायदा पास करून घेऊन सरदारांनीं आपल्या पदरीं सशस्त्र शिपाई ठेवूं नयेत असें त्यानें ठरविलें (१४८७).

७. ऑक्सफर्डच्या ड्यूकला दंड :—आपले कायदे नीट पाळले जातात किंवा नाहींत हें डोळ्यांत तेल घालून हेन्री पाहत असे. एकदां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऑक्सफर्डच्या ड्यूककडे हेन्री मेजवानीस गेला होता. राजपद मिळविण्याच्या बाबतींत त्यानें हेन्रीला पुष्कळ मदत केली असल्यानें राजा त्याच्यावर बराच लोभ करीत असे. मेजवानी संपल्यावर हेन्री परत निघाला. आपल्या वाटेवर दुतर्फा गणवेषांत उभे राहिलेले अनेक लोक हेन्रीनें पाहिले; तेव्हां आपल्या मित्राला तो म्हणाला, "हे सर्व सुंदर व उमदे लोक बहुधा आपले चाकर–नोकर असावेत?" तेव्हां तो सरदार हंसत हंसत म्हणाला, "सरकार, हे माझे गणवेषधारी शिपाई असून आपल्या दर्शनार्थ येथें उभे आहेत." या उत्तरानें हेन्री थोडा रागावला व म्हणाला, "माझे कायदे माझ्या देखत मोडलेले मला सहन होणार नाहीं. माझा चिटणीस या बाबतींत आपल्याशीं बोलेल." असें म्हणून हेन्री निघून गेला. राजाच्या चिटणीसानें सदर उमरावाला सशस्त्र शिपाई बाळगल्याबद्दल १५००० पौंड दंड ठोठावला! अशाच तऱ्हेनें अनेक सरदारांनीं सशस्त्र शिपाई बेकायदेशीरपणें बाळगल्यामुळें हेन्रीनें त्यांस जबर दंड केले व सरदारांचें सामर्थ्य कमी केलें.

८. **स्टार चेंबर कोर्टाची स्थापना**:—नुसते कायदे करण्यानें काम भागत नाहीं असें पाहून त्यांची अंमलबजावणी करणारें एखादें वरिष्ठ कोर्ट असावें असें हेन्रीला वाटूं लागलें. विशेषतः साध्या कोर्टांना दाद न देणारे व न्यायाधीशांस व ज्यूरीलाही तंबी देऊन अगर लांच भरून स्वतःची सोडवणूक करणारे अनेक उमराव त्या वेळीं देशांत होते. त्यांना वठणीवर आणावें व गरीब प्रजेलाही न्यायाधीशांकडून व ज्यूरीकडून योग्य न्याय मिळावा असें हेन्रीला वाटे. तेव्हां एखादें न्यायमंदीर स्थापल्यानें वरील हेतु साध्य होऊन आपल्या प्रजेला स्वास्थ्य व शांतता मिळून योग्य न्यायही मिळेल असें वाटल्यावरून हेन्रीनें सन १४८७ मध्यें पार्लमेंटच्या संमतीनें एका न्यायमंदिराची स्थापना केली. पूर्वीं राजाला मदत करण्याकरितां जें मंडळ असे त्याचेंच एक पोटमंडळ निवडून त्याच्याकडेच न्यायनिवाड्याचें काम देण्यांत आलें. राजाचे प्रमुख मंत्री व कांहीं प्रिव्ही कौन्सिलर या कोर्टांत न्यायाधीश म्हणून बसत असत; व राजा हाच मुख्य न्यायाधीश मानला जाई. प्रथमतः वेस्ट मिन्स्टरच्या राजवाड्याच्या एका दालनांत हें न्यायमंदीर भरे. त्या दालनाचें छत सुंदर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तारकांनीं सुशोभित केलेलें होतें व म्हणूनच त्या न्यायमंदिराला ‘ स्टार चेंबर कोर्ट ’ असें नांव मिळालें. राजद्रोह, कायदे मोडणें, अब्रूनुकसानी, खोटा न्यायनिवाडा करण्याबद्दल ज्यूरीची व न्यायाधीशांची चौकशी करणें, राजानें खास सोंपविलेले इतर खटले चालविणें वगैरे अनेक प्रकारचे खटले चालवून व गुन्हेगारांची चौकशी करून त्यांस जबर दंडाची शिक्षा अगर कैदही करण्याचा अधिकार या न्यायमंदिराला देण्यांत आलेला होता. स्टार चेंबर कोर्टाचा कटाक्ष विशेषतः उत्तर इंग्लंडमधील अरेराव सरदारांविरुद्ध होता. परंतु साध्या लोकांसही आपल्या फिर्यादी त्यापुढें निवाड्याकरितां मांडतां येत असत. या कोर्टाला ज्यूरीशिवाय न्यायदान करण्याचा अधिकार असल्यानें व त्याला जबर शिक्षा करण्याचा अधिकार मिळाल्यानें लोकांस चोख न्याय मिळूं लागला. साध्या कोर्टाचे न्यायाधीश व ज्यूरर्सही या कोर्टाच्या भीतीनें लांच न खातां योग्य न्याय देऊं लागले, राजाची सत्ता वाढली, सरदारांची कमी झाली, व देशांत शांतता निर्माण होऊं लागली. दंडाच्या रूपानें जो पैसा मिळे तो राजाच्या तिजोरींत जाई; यामुळेंही राजा श्रीमान अर्थात् सामर्थ्यवान झाला. एकंदरींत पाहतां हें कोर्ट राजाच्या व लोकांच्याही पुष्कळ उपयोगी पडलें. पण पुढें पुढें राजे लोक या कोर्टाचा दुरुपयोग करूं लगले तेव्हां लॉंग पार्लमेंटनें हें कोर्ट रद्द केलें (१६४१).

९. हेन्रीचा द्रव्यसंचय :—आपलें सामर्थ्य वाढविण्याकरितां सातव्या हेन्रीस ज्याप्रमाणें सरदारांना आपल्या धाकांत ठेवावें लागलें त्याचप्रमाणें त्याला पुष्कळ द्रव्यसंचयही करावा लागला. आपला राज्यकारभार अत्यंत काटकसरीनें करून दर वर्षाच्या उत्पन्नापैकीं बराचसा भाग तो संग्रहीं टाकीत असे. याशिवाय स्टार चेंबर कोर्टानें ठोठावलेल्या दंडाच्या रूपानेंही त्याच्या तिजोरींत भर पडत असे. मध्यंतरीं लोकांकडून नजराणे घेण्याची पद्धति बंद पडली होती ती हेन्रीनें पुन्हां सुरू केली. श्रीमंत लोकांनीं आपण होऊन, केवळ स्वयंस्फूर्तीनें व आपली निष्ठा दाखविण्याकरितां राजाला, मोठ्या संतोषानें व आनंदानें, दिलेली देणगी म्हणजेच नजराणे होत अशी त्या वेळची रीत होती. तिसऱ्या रिचर्डनें ही पद्धति रद्द केली होती; परंतु ‘ रिचर्डनें अन्यायानें राज्य मिळविलें असल्यानें त्याला असली चांगली पद्धत रद्द करतां येत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हती' असें हेन्री लोकांस सांगे! कित्येक वेळां लोकांकडून सक्तीचीं कर्जेंही त्यानें वसूल केलीं. फ्रान्सशीं युद्ध करावयाचें असें सांगूनही लोकांकडून त्यानें पैसे उपटले. खुद्द एकट्या लंडन शहरानें त्याला ९००० पौंड दिले. परंतु फ्रान्सच्या राजानें युद्धाच्या भीतीनें हेन्रीला भली मोठी रक्कम दिली व युद्ध टाळलें! अशा रीतीनें हेन्रीनें दोघांकडूनही पैसे लाटल्यानें लोक त्याच्यावर फारच संतापले. हेन्रीचा अर्थसचीव कँटरबरीचा ऑर्चबिशप, जॉन मॉर्टन, लोकांकडून व सरदारांकडून पैसे उकळण्यांत मोठा पटाईत होता; त्यानें अशी एक युक्ति शोधून काढली कीं, त्यायोगें पैसे देण्याच्या कचाट्यांतून कोणीही सुटूं नये. तो श्रीमंतांना सांगे कीं, "तुमच्याजवळ पैसा पुष्कळ असून तो तुम्ही ऐषारामांत व चैनींत खर्च करतां तेव्हां थोडी चैन कमी करून राजाला नजराणे द्या." बरें, एखादा काटकसरी माणूस भेटला तर तो सांगे, "तुम्ही काटकसरीनें राहतां अर्थात तुमची शिल्लकही जास्त राहणार; तेव्हां आपल्या द्रव्यसंचयांतून राजाला पैसे द्या." अशा तऱ्हेनें देणग्यांच्या कचाट्यांतून सहसा कोणीही सुटत नसल्यामुळें राजाला पुष्कळच पैसा मिळाला. मॉर्टनच्या या युक्तीला 'मॉर्टनची कात्री' असें म्हणत. परंतु निरनिराळ्या मार्गांनीं पैसे मिळवून देण्यांत हेन्रीला मुख्य साहाय्य एमसन व डडले या दोघांचेंच झालें; या वाहात्या गंगेंत आपलेही हात ते धुऊन घेत असत, असा लोकप्रवाद होता. सुरवातीसच पार्लमेंटनेंही टनेज व पौंडेज या नांवाचे कर लोकांवर बसविण्यास हेन्रीला परवानगी दिली होती. मेलेल्या सरदारांच्या मोठमोठ्या इस्टेटीवर वारसा सांगणारे कोणीही नव्हते म्हणून त्या इस्टेटीही त्यानें जप्त केल्या व पुष्कळ पैसा मिळविला. अशारीतीनें मिळवितां येईल त्या मार्गानें हेन्रीनें पैसा गांठीं मारला. असें करण्यांत स्वतःचें सामर्थ्य व बळ वाढविणें हा एक हेतु होताच; परंतु दुर्दैवानें आपल्याला राज्यत्याग करावा लागलाच तर पैशाच्या जोरावर नवीन सैन्य उभारून गेलेलें राज्य परत मिळवितां यावें हाही त्याचा एक हेतु असणें साहजिक आहे. याच हेतूनें आपला सर्व पैसा त्यानें हिरे–माणकांत ठेवलेला होता. उद्देश एवढाच कीं, वेळ आल्यास सर्व हिरे-माणकें एका लहानशा पेटींत घालून पळून जाण्याच्या वेळीं ती संपत्ति आपल्या बरोबर सहज नेतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यावी ! हा प्रसंग त्याच्यावर आला नाहीं हें खरें; परंतु त्याचा पैसा त्याच्या मुलाला पुष्कळ उपयोगी पडला व त्याला आपलें सामर्थ्य वाढवितां आलें. मृत्युसमयीं त्याच्या तिजोरींत सुमारें अठरा लक्ष पौंड होते; या रकमेची आजची किंमत त्याच्या चाळीसपट होईल ! यावरून सातव्या हेन्रीनें पैसा किती जमविला होता हें समजून येईल.

१०. व्यापार व उद्योगधंदे :—इंग्रज व डच लोकांचे संबंध केवळ व्यापारी होते. फ्लँडर्समध्यें—सध्यांचा बेल्जम—इंग्लिश लोकर पुष्कळ खपत असे, व त्याचें कापड विणून डच लोक इंग्लंडला पाठवीत असत. पण वॉरबेकला डच राणीनें आश्रय दिल्यामुळें हेन्री रागावला व त्या भरांत त्यानें फ्लँडर्समध्यें लोकर पाठवूं नये असा कायदा केला. या निर्बंधामुळें इंग्लिशांचें पुष्कळ नुकसान झालें असलें तरी पण डच लोक ताळ्यावर आले. तेव्हां आपला व्यापार बुडूं नये म्हणून फ्लँडर्सचा राजा फिलिप यानें हेन्रीशीं 'मोठा तह' करून इंग्लंड व फ्लँडर्स या देशांमधील लोकरीचा व्यापार पुन्हां पूर्ववत् चालू केला. मात्र त्या तहानें वॉरबेकला आश्रय न देण्याचें फिलिपनें मान्य केलें. अशाच तऱ्हेचा एक व्यापारी तह त्यानें इटलीमधील व्हेनिस संस्थानशीं करून इंग्रजांनीं त्यांना लोकर पुरवावी व त्यांनीं इंग्रजांना ग्रीसमध्यें होणारी उत्तम दारू पुरवावी असें ठरलें.

११. हेन्री व पार्लमेंट :—ट्यूडर घराण्याच्या अगोदरचे राजे थोड्या फार रीतीनें दरिद्रीच होते; व त्यामुळेंच त्यांना आपलें राज्य गमवावें लागलें. या सर्व गोष्टी माहीत असल्यानें हेन्रीनें आपलें सामर्थ्य वाढविण्या-करितां द्रव्यसंचय केला. या द्रव्यसंचयाचा आणखी एक मोठा फायदा झाला. तो म्हणजे, पैशाकरितां पार्लमेंटवर त्याला अवलंबून राहावें लागलें नाहीं. पैशासंबंधाची कोणतीही गोष्ट पार्लमेंटच्या संमतीशिवाय त्याला करतां येत नसे. लादल्या जाणाऱ्या प्रत्येक कराला पार्लमेंटची संमति असणें जरूर होतें. बरें, पार्लमेंटनें ती दिली तरीही तो कर वसूल करावयाचा झाल्यास अत्यंत त्रास होत असे. श्रीमंत शिरजोर म्हणून तो देत नसत; सामान्य लोकही गरीब असल्यामुळें कर देण्याची त्यांच्यांत शक्ति नसे. अशा स्थितींत हेन्रीनें स्वीकारलेला मार्गच योग्य होता असें म्हणावें लागतें; व त्यामुळेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पैशाकरितां तो पार्लमेंटवर अवलंबून राहिला नाहीं. त्याच्या राजवटीच्या आरंभींच पार्लमेंटनें त्याला 'टनेज' (आयात दारूच्या दर टनावरील कर) व 'पौंडेज' (आयात लोकरीवरील दर पौंडावरील कर) हे कर लादण्याचा हक्क तहाहयात दिलेला होता. यावांचून त्याला पार्लमेंटकडून फारशी मदत झाली नाहीं. खुद्द राज्यकारभाराच्या बाबतींतही हेन्री पार्लमेंटला फारसा मानीत नसे. पार्लमेंटपेक्षां प्रिव्ही कौन्सिलांतील लोकांच्या सल्ल्यानें तो राज्यकारभार करीत असे. परंतु वेळ प्रसंगीं पार्लमेंटचा सल्लाही तो घेत असे. स्टार चेंबर कोर्ट नेमण्यासंबंधाचा कायदा त्याच्या सांगण्यावरून पार्लमेंटनें पास केला होता. जुने सरदार मेले होते. त्यांच्या रिकाम्या सरदारक्या हेन्रीनें आपल्या आज्ञेंत राहतील अशा लोकांस दिल्या. यामुळें उमरावमंडळानें त्याला कधींही विरोध केला नाहीं. शिवाय मध्यम वर्गांतील लोकांस त्यानें हाताशीं धरल्यामुळें व त्यांना व्यापारी सवलती दिल्यानें तेही त्याला नेहमीं साहाय्य देत असत. त्या वेळचे लोक राजकारणासंबंधीं अगदीं अलिप्त असत; आपला धंदा व व्यापार नीट चालण्याकरितां आवश्यक ती शांतता त्यांना पाहिजे होती. ती शांतता हेन्रीनें त्यांना मिळवून दिल्याकारणानें त्यांनीं राजाला कधींही विरोध केला नाहीं. एकंदरींत पाहतां हेन्री पार्लमेंटवर फारसा अवलंबून नव्हता, हेंच खरें.

१२. परराष्ट्रीय संबंध :—स्वदेशांत आपली सत्ता प्रबळ करण्यांत हेन्री गुंतला होता तरी परदेशांत—अर्थात् युरोपांत—इंग्लंडला मानाचें स्थान मिळवून देऊन आपल्या राष्ट्राची प्रतिष्ठा वाढविण्याकडे त्यानें दुर्लक्ष केलें नव्हतें. शिवाय आपल्या घराण्याला युरोपियन राजांकडून त्याला मान्यता मिळवावयाची होती. या वेळीं फ्रान्स व स्पेन हीं राष्ट्रें मोठीं सामर्थ्यवान् गणलीं गेलीं होतीं व त्या दोन राष्ट्रांमध्यें इटलीमधील भाग मिळविण्याबद्दल एकसारखी चुरस लागून राहिली होती. याशिवाय जर्मन बादशाहीखालीं येणारीं राष्ट्रेंही सामर्थ्यवान् गणलीं जात. अशा स्थितींत युरोपियन राजांबरोबर युद्धप्रसंग न करतां आपलें काम भागवून घेऊन युरोपियन राजांशीं सलोख्याचें धोरण ठेवण्याकडेच सातव्या हेन्रीचें सारें लक्ष असे. फ्रान्सशीं स्नेह ठेवणें हें त्याचें मुख्य धोरण होतें. फ्रान्सचा राजा आठवा चार्ल्स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्यावर स्वारी करण्याकरितां इंग्रज लोकांकडून त्यानें बराच पैसा मिळविला व सन १४९२ मध्यें फ्रान्सवर स्वारी करण्याकरितां सैन्यही पाठविलें. परंतु चार्ल्सनें त्याला पुष्कळशी रक्कम दिली व वॉरबेकला फ्रान्समधून हाकलून देण्याचें त्यानें मान्य केल्यानें युद्धप्रसंग टळला.

युरोपियन राजघराण्यांशीं लग्नसंबंध घडवून आणूनही हेन्रीनें आपला हेतु साध्य करून घेतला होता. त्या वेळीं स्पेन देश अत्यंत बलाढ्य व संपन्न देश म्हणून ओळखला जात होता. त्या देशाचा राजा फर्डिनंड व राणी इसाबेला यांची धाकटी मुलगी कॅथराईन हिचें लग्न आपला जेष्ठ मुलगा आर्थर याजबरोबर व्हावें असा त्यानें घाट घातला. हुंडा व देण्या-घेण्यासंबंधीं बऱ्याच तक्रारी झाल्या व शेवटीं सुमारें चाळीस हजार पौंड हुंडा ठरला ! त्यामुळें स्पॅनिश लोक बरेच चिडले. शेवटीं हें लग्न झालें (नोव्हेंबर १५०१). पण लग्नानंतर थोड्याच दिवसांत आर्थर मरण पावला (एप्रिल १५०२). मोठ्या प्रयासानें स्पेनशीं घडवून आणलेला संबंध तुटेल व घेतलेला हुंडा परत द्यावा लागेल यामुळें हेन्रीही थोडा खट्टू झाला; परंतु स्पेनशीं जोडलेला हा संबंध दृढ करण्याकरितां त्यानें पुन्हां खटपट चालविली. फर्डिनंडलाही आणखी एखादी मुलगी नव्हती; अशा स्थितींत आपल्या दुसऱ्या मुलानें, हेन्रीनें, आपल्या विधवा भावजयीशीं लग्न करावें म्हणून त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें त्यानें पोपची परवानगीही मिळविली; तेव्हां कॅथराइनचें लग्न हेन्रीबरोबर सन १५०९ मध्यें झालें. स्पेनशीं सख्य ठेवण्याच्या हेतूनें हें लग्न झालें; कॅथराइन मात्र कमनशिबी ठरली !

यानंतर हेन्रीनें आपली मुलगी मार्गरेट हिचें लग्न स्कॉटलंडचा राजा चौथा जेम्स याजबरोबर सन १५०२ मध्यें लावून दिलें. या लग्नानें इंग्लंड व स्कॉटलंड या दोन देशांतील अखंड वैर नाहींसें होऊन त्या दोन राष्ट्रांत सख्य नांदेल अशी त्याला बळकट आशा होती; पण ती फोल ठरली. मात्र पुढें स्कॉटलंड व इंग्लंड यांचें एकीकरण होण्यास हाच विवाह कारणीभूत झाला.

या वेळीं फ्रान्सचा राजा आठवा चार्ल्स मोठा प्रबळ राजा म्हणून मानण्यांत येत असे; त्याचा डोळा इटलीमधील मिलन संस्थानावर असल्यामुळें तें संस्थान मिळविण्याकरितां त्याची एकसारखी धडपड चालू

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होती. सन १४९४ मध्यें त्या संस्थानावर स्वारी करून त्यानें मोठा विजय मिळविला; व इटलीचा बराचसा भाग आपल्या राज्यास जोडला. ही गोष्ट न आवडून पोप, स्पेनचा राजा फर्डिनंड व जर्मन बादशाह मॅक्झिमीलियन यांनीं फ्रान्सविरुद्ध एक मोठा संघ स्थापला व त्यांत सातव्या हेन्रीनेंही भाग घेतला. या संघाच्या वेळींच सत्तेच्या समतोलपणाचें तत्त्व प्रथम अंगीकारण्यांत आलें असें मानण्यांत येतें.

१३. हेन्री व आयर्लंड :—खुद्द आयर्लंडमध्यें सातव्या हेन्रीच्या राज्याधिकाराला मान देणारे फारच थोडे लोक होते. आयरिश लोकांचा ओढा यॉर्क घराण्याकडे असल्यामुळें हेन्रीविरुद्ध बंड पुकारणाऱ्या बंडखोरांस आयर्लंडमध्यें पुष्कळ पाठबळ मिळत असे. लँबर्ट सिम्नेलला आयरिश लोकांनीं डब्लिन येथें राज्याभिषेक केला होता व वॉरबेकलाही त्यांनीं आश्रय देऊन पुष्कळ मदत केली होती. तेव्हां आयर्लंडमध्यें बंडखोर सरदारांच्या सामर्थ्याचा बींमोड करून व तेथील यॉर्किस्ट पक्षाच्या लोकांचा पगडा नाहींसा करून तेथें शांतता निर्माण करण्याकरितां हेन्रीनें पॉयनिंग्ज या गृहस्थाची नेमणूक केली. तेथें त्यानें उत्कृष्ट प्रकारची कामगिरी करून हेन्रीची सत्ता दृढ केली. त्यानें केलेला एक अत्यंत महत्त्वाचा कायदा 'पॉयनिंग्जचा कायदा' या नांवानें प्रसिद्ध आहे (१४९४). राजाच्या संमतीवांचून आयरिश पार्लमेंट बोलावण्यांत येऊं नये, त्या पार्लमेंटनें पास केलेल्या कायद्यांस राजाची संमति असली पाहिजे व इंग्लिश पार्लमेंटनें पास केलेल्या कायद्यांस आयरिश लोकांनीं मान्यता दिली पाहिजे वगैरे महत्त्वाचीं कलमें वरील कायद्यांत होतीं. या कायद्यानें आयरिश पार्लमेंटसभा इंग्लिश राजांच्या पूर्णपणें ताब्यांत आली व आयरिश लोकांचें स्वातंत्र्य नष्ट झालें. याशिवाय आयर्लंडमधील अराजकता थांबवून पॉयनिंग्जनें तेथील सरदारांची शक्ति कमी केली व तेथें शांतता निर्माण केली. सातव्या हेन्रीचें आयर्लंडसंबंधाचें धोरण यशस्वी होऊन इंग्लंड व आयर्लंड यांचे संबंध चांगलेच निगडित झाले.

१४. सातव्या हेन्रीचें कार्य :—वेळेनुसार पार्लमेंटलाही न जुमानणारा परंतु देशांत शांतता व सुव्यवस्था स्थापन करणारा राजा इंग्रजांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हवा होता आणि हेन्री लोकांच्या कल्पनेस तंतोतंत उतरला. तोतयांचा निःपात करून त्यानें देशांत शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. त्यानें अनियंत्रितपणें राज्यकारभार हांकला ही गोष्ट खरी असली तरी लोकांचें कल्याण व देशाची भरभराट ज्यायोगें होईल असेंच धोरण त्यानें आंखलें व शेवटास नेलें. त्यानें सरदारांचा नायनाट केला, व्यापार व उद्योगधंदे यांस प्रोत्साहन दिलें, योग्य न्याय मिळण्याची व्यवस्था केली, आयर्लंडांतील बंडाळी मोडून इंग्लंड व आयर्लंड यांचे संबंध दृढ केले व परदेशाशीं व्यापारी व राजकीय तह करून इंग्लंडला परदेशीय राजकारणांत महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें. तो स्वतः फारसा विद्वान् नव्हता, तरी पण विद्वानांचा परामर्ष कसा घ्यावा, हें त्याला कळत होतें. मोठा मुत्सद्दी नसूनही प्राप्त संधीचा कसा व कोणत्या तऱ्हेनें फायदा करून घ्यावा हें त्याला माहीत होतें. अगणित संपत्ति मिळवून ती त्यानें चिकूपणानें जवळ बाळगली असा त्याच्यावर आरोप आहे; त्यांत थोडी सत्यता असली तरी त्या वेळची परिस्थिति लक्षांत घेऊन 'संपत्ति म्हणजे मोठी शक्ति आहे' हें तत्त्व ओळखूनच आपल्या संपत्तीचा तो व्यय करीत असे. नेहमीं फायद्याकडे लक्ष ठेवून वागणारा सातवा हेन्री आपल्या आयुष्याच्या अखेरीस थोडा बेतालपणानें वागला. यामुळें त्याची उत्कृष्ठ व भरीव कामगिरी डोळ्यांआड करतां येत नाहीं. ट्यूडर काळांतील अनियंत्रित राज्यकारभारचा हा जनक आपल्या वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षी सन १५०९ मध्यें मरण पावला.

अभ्यास

१. सातव्या हेन्रीनें सरदारांची सत्ता कशी कमी केली ?
२. हेन्रीनें द्रव्यसंचय करण्याकरितां कोणते उपाय योजिले ?
३. लँबर्ट सिम्नेल व वॉरबेक यांसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.
४. स्टार चेंबर कोर्टांत तुम्ही आहांत अशी कल्पना करून त्या कोर्टाची इमारत, त्यांतील न्यायाधीश, गुन्हेगार व शिक्षा यांसंबंधीं माहिती द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. 'सातवा हेन्री अनियंत्रित राज्यकारभाराचा जनक होता,' हें म्हणणें सिद्ध करा.
६. भडक गणवेष घालून तुम्ही त्या वेळीं इंग्लंडमध्यें हिंडत आहां, अशी कल्पना करून तुम्ही कोणकोणत्या गोष्टी केल्या असत्या त्या लिहा.
७. सातव्या हेन्रीचे मुख्य हेतु कोणते? ते कितपत साध्य झाले?
८. सातव्या हेन्रीच्या काळाचा एक तुलनात्मक कालादर्श तयार करा.

उतारा

१. भडक गणवेष व सांभाळ यांसंबंधीं कायदा (१४८७)

कोणाचीही पालनपोषणाची बेकायदेशीरपणें जबाबदारी घेणें, भडक गणवेष, बिल्ले, चिन्हें व खुणा यांची बेकायदा खैरात करणें, बेइमानानें वागून शेरीफाकडून खोटे खंड भरले जाणें, ज्यूरीनें लाच खाणें, देशांत दंगेधोपे होणें, बेकायदा जमाव जमविणें वगैरे गोष्टींमुळें देशांतील शांतता नष्ट झाली, राज्यकारभारही नीट चालविणें अशक्य झालें; खून, चोऱ्या, लुटालूट, खोट्या शपथा घेणें वगैरे गोष्टींना नुसता ऊत आला व त्यामुळेंच लोकांचे जीवितास धोका उत्पन्न होऊन त्यांची मालमत्ता व त्यांच्या जमिनी यांचा अपहार होऊं लागला. ज्याअर्थीं वरील सर्व गोष्टी आपल्या देशांत होत आहेत असें आपले राजे व या देशाचे राजाधिराज यांस समजून आलें आहे, त्याअर्थीं इंग्लंडचे चॅन्सलर, राजाचे खानगी चिटणीस, एक बिशप, प्रिव्ही कौन्सिलचे एक सन्माननीय सभासद व 'किंगजबेंच' व 'कॉमन प्लीज' या कोर्टांचे मुख्य न्यायाधीश यांच्या मंडळानें वरील बेकायदा गोष्टींची माहिती मिळाल्याबरोबर गुन्हेगारांची पूर्ण चौकशी करावी व कायद्यानुसार जी शिक्षा योग्य असेल ती त्यांस बेलाशक द्यावी.

प्रश्नः—१. वरील कायदा करण्याचें कारण काय? त्याविरुद्ध पार्लमेंटनें कोणती योजना केली? तिचा कोणता फायदा झाला?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२७. आठवा हेन्री व वूल्सेचा उदयास्त.

१ तत्कालीन इंग्लंडची स्थिति :—सातव्या हेन्रीनें इंग्लंडची एकंदर स्थिति चांगलीच सुधारली होती. खजिन्यांत अलोट संपत्ति होती, यादवी युद्धापासून अलिप्त राहिल्यानें इंग्लंडच्या व्यापाराची भरभराट होऊं लागली होती व एकंदर जनतेमध्यें ट्यूडर राजांबद्दल आपलेपणा उत्पन्न झाल्यानें इंग्रजांमध्यें एकराष्ट्रीयत्वाची जाणीव उत्पन्न झाली होती. यामुळें इंग्लिश राष्ट्र सामर्थ्यवान राष्ट्र होणार असें युरोपियन राष्ट्रांस वाटूं लागलें व इंग्लंडच्या मैत्रीची प्रत्येकास हांव सुटली. अशी एकंदर परिस्थिति असली तरी खुद्द इंग्लंडमध्यें बेकार, उनाड, आळशी व चोर-डाकूंचा प्रादुर्भाव बराच झालेला होता. लढाईतून घायाळ झालेले लोक, सरदारांचे पुंड, कामाच्या अभावीं उपद्रवी बनलेले बेकार यांनीं इंग्लंडमध्यें धुमाकूळ माजविलेला होता ! दुसरें असें कीं द्रव्याच्या लोभानें मोठमोठ्या जमीनदारांनीं आपल्या शेतांचीं कुरणें बनविलीं, त्यामुळेंही कित्येक शेतकरी बेकार झाले; व ही स्थिति राहिल्यास ' इंग्लंडमध्यें औषधालाही शेतकरी राहणार नाहीं, ' अशी भीतीही काहीं लोकांस वाटूं लागली होती. अशा स्थितींतच लोकांना पिळून काढून त्यांच्याकडून पैसा उकळण्याच्या नानाविध क्लृप्त्या राजाच्या प्रिव्ही कौन्सिलकडून लढविल्या जात होत्या, एकंदरींत पाहतां इंग्लंडची अंतर्गत स्थिति अतिशय हलाखीची असली तरी इतर राष्ट्रें इंग्लंडकडे अभिमानानें पाहूं लागलीं होतीं. त्याच्याशीं दोस्ती करण्याकरितां फ्रान्स, स्पेन, जर्मनी येथील राजांमध्यें अहमहमिका लागली होती.

२. आठवा हेन्री (सन १५०९–१५४७): —सातव्या हेन्रीनंतर त्याचा मुलगा हेन्री आपल्या वयाच्या अठराव्या वर्षी इंग्लंडचा राजा झाला. त्याच्या प्रजेनेंही अत्यंत उत्साहानें व आनंदानें त्याचें स्वागत केलें. तो मोठा बलशाली, देखणा, दूरदर्शी व नवीन विद्येचा अभ्यास केलेला होता. फ्रेंच, लॅटिन, इटॅलियन, स्पॅनिश व इंग्लिश या भाषांतून तो चांगलें संभाषण करी. तो संगीताचा भोक्ता असून त्याला स्वतःला कांहीं वाद्यें वाजवितां येत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असत. धर्मशास्त्राचा त्यानें अभ्यास केला होता; व त्याचा थोरला भाऊ जगून राजा झाला असता, तर हेन्री धर्मगुरूच झाला असता. त्याचें भाषण मोठें मोहक असे. भाषा सहज व ओघवती असल्यानें दुसऱ्यावर त्याची एकदम छाप पडे व त्यामुळेंच तो लोकांना प्रिय वाटे. धनुर्विद्येंत पटाईत, टेनिस खेळण्यांत कुशल, घोड्यावर बसण्यांत तरबेज, द्वंद्व युद्धांत हुषार अशी त्याची कीर्ति असल्यानें, आठवा हेन्री लवकरच अत्यंत लोकप्रिय झाला. त्याला माणसाची पारखही उत्तम होती. परंतु पुढें पुढें तो अत्यंत स्वार्थी, क्रूर, आपलपोट्या व लोभी बनला. धर्म-गुरू, प्रजा, त्याचे प्रधान व त्याच्या बायका यांना तर तो प्रती काळच वाटे! त्याच्या इतका मोठा बलिष्ठ राजा ट्यूडर घराण्यांत झाला नाहीं. इंग्लंडच्या इतिहासांत त्यानें आपलें नांव अजरामर करून ठेवलें आहे. त्याची इच्छाशक्ति अत्यंत जबर होती; व तो आपलें ध्येय वाटेल त्या भल्याबुऱ्या मार्गांनींही गांठण्यास कमी करीत नसे. कसाही असला तरी तो आपल्या प्रजेच्या गळ्यांतील लाल होऊन राहिला होता, यांत शंका नाहीं!

आठवा हेन्री

३. वूल्सेचा उदय :—युरोपियन राजकारणांत महत्त्वाची कामगिरी करून इंग्लंडचा दर्जा वाढविण्याचें हेन्रीनें ठरविलें होतें; व आपल्या बापा-पेक्षांही या बाबतींत आपल्यास पुष्कळ यश येईल अशी त्याची खात्री होती. परंतु या बाबतींत त्याला लोकांची सहानुभूति पाहिजे होती. म्हणूनच त्यानें सरदार व धर्मगुरू यांचा पाडाव करण्याचें आपल्या बापाचें धोरण ठरवून त्याप्रमाणें तो वागलाही. लोकांच्या रोषास पात्र झालेले एमसन व डडले यांना त्यानें तुरुंगांत टाकिलें व सन १५१० मध्यें त्यांचा शिरच्छेदही करविला! आपल्या बापाच्या वेळच्या बऱ्याच मंत्र्यांस त्यानें त्यांच्या पूर्वीच्या कामीं नेमलें; परंतु त्याची महत्त्वकांक्षा या बुड्या प्रधानांकडून शेवटास जाणारी नव्हती! त्याकरितां त्याला एखाद्या मेहेनती, तरतरीत व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बुद्धिमान गृहस्थाची मदत पाहिजे होती. हेन्रीला मनुष्याची पारख उत्तम असल्यानें त्याला थोड्याच दिवसांत असा मनुष्य आढळला; व तो म्हणजे टॉमस वूल्से होय. हेन्रीच्या राज्यकारभारांत सुमारें वीस वर्षें यानें हेन्रीची एकनिष्ठपणें सेवा केली.

वूल्से याचा जन्म सन १४७१ मध्यें इप्स्विच् येथें एका खाटकाच्या घराण्यांत झाला. त्याच्या बापानें त्याला उत्तम प्रकारचें शिक्षण दिल्यानें वूल्से आपल्या वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षीं ऑक्सफर्डचा बी. ए. झाला! तो मोठा हुषार व विद्वान होता. त्याच्या विद्वत्तेस मोहक वागणुकीची जोड मिळाल्यानें व तो हेन्रीच्या नजरेंत पडल्यामुळें त्याची एकसारखी बढतीच होत गेली. त्याची हुषारी पाहून सातव्या हेन्रीनेंही एका मोठ्या महत्त्वाच्या कामगिरीवर त्याला पाठविलें होतें.

वूल्से

होतां होतां वूल्से सन १५१४ मध्यें यॉर्कचा आर्चबिशप झाला. पुढच्याच वर्षीं खुद्द पोपनें त्याला कार्डिनल केलें व हेन्रीनें त्याला आपला मुख्य सल्लागार नेमिलें. १५१७ मध्यें हेन्रीच्या विशेष विनंतीवरून पोपनें वूल्सेला इंग्लंडमधील आपला प्रतिनिधि नेमलें. वूल्सेसारख्या एका महत्त्वाकांक्षी, मुत्सद्दी, बाणेदार व कर्तबगार मनुष्याचे ठिकाणीं राजकारण व धर्माचरण यांची सांगड झाल्यानें इंग्लंडची भरभराट झाली. राजाचा जानी दोस्त असल्यानें राजानें त्याच्यावर विश्वास टाकला होता. राजाचा प्रत्येक शब्द तो झेलीत असे व त्याच्या इच्छा शेवटास नेण्याची नेहमीं तत्परता दाखवीत असे. राज्यकारभाराची घडी त्यानें इतकी सुंदर बसविली होती कीं, राजाच्या खालोखाल सर्व प्रजा त्यालाच बहुमान देई. त्याची वृत्ति धार्मिक, आचार धर्मगुरूस शोभून दिसणारा व एकंदर ओढा धर्मकारणाकडे असूनही राज्यकारभाराची व परराष्ट्रीय राजकारणाची गुंतागुंत तो मोठ्या कौशल्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोडवी. तो धीर-गंभीर होता; गरिबांचा कनवाळू म्हणवून घेण्यांत त्याला भूषण वाटे; त्यांचा न्यायनिवाडा योग्यरीतीनें तो करीतही असे. परंतु ज्या सरदार–उमरावांना मागें टाकून स्वतःच्या कर्तबगारीवर एवढ्या मोठ्या योग्यतेस तो चढला ते सरदार–उमराव त्याचा अत्यंत द्वेष करीत असत. धर्मगुरू या नात्यानें त्याचें आचरण पूर्णपणें शुद्ध नसलें तरी तो विद्येचा चाहता व विद्वानांचा पोशिंदा होता. धर्मगुरू विद्वान् व्हाव अशी त्याची अतीव इच्छा होती. तो मानी पण लोभी होता; आपल्या राजाप्रमाणेंच तो भपका, ऐषाराम व विलास यांचा शोकी होता. त्याची दूरदृष्टि, राष्ट्राभिमान व त्याचे अनेक सद्गुण यांच्या योगानें राष्ट्राचें जें पाऊल पुढें पडलें तें त्याच्या अभावीं पडलें असतें कीं नसतें याबद्दल शंकाच आहे. तो मोठा महत्त्वाकांक्षी होता व त्याला अनुसरूनच राजसत्ता वाढविणें, इंग्लंडच्या धर्मपीठांची दुःस्थिति सुधारणें व शक्य झाल्यास पोपची जागा मिळविणें असे त्यानें तीन अंतीम हेतु ठरविले होते. त्याचे सर्व हेतु साध्य झाले असते तर इंग्लंड व युरोप यांच्या इतिहासास निराळेंच वळण लागलें असतें यांत शंका नाहीं.

४. परराष्ट्रीय राजकारण :—इंग्लंडची सर्व प्रकारची भरभराट करून युरोपियन राजकारणांत त्याला मोठ्या मानाचें स्थान मिळवून देण्याकरितां वूल्सेची एकसारखी खटपट चाललेली होती. या वेळीं फ्रान्सचा राजा बारावा लुई व स्पेनचा राजा फर्डिनंड यांच्यामध्यें इटलींतील संस्थानें काबीज करण्याची जणूं चुरसच लागून राहिलेली होती ! उत्तर इटलींतील बराच भाग लुईच्या ताब्यांत असून फर्डिनंडच्या ताब्यांत नेपल्स व सिसिली हे प्रांत होते. परंतु व्हेनिस प्रबळ असल्याकारणानें त्या दोघांनाही थोडी भीति वाटत होती. तेव्हां फर्डिनंड व लुई यांनीं माघार घेतली व त्या दोघांनीं एक संघ निर्माण करून त्यांत मॅक्झिमीलियन यालाही सामील करून घेतलें. परंतु हा संघ फार काळ टिकला नाहीं. तेव्हां पोप, दुसरा ज्यूलिअस, यानें एक पवित्र संघ स्थापन करून त्यांत फर्डिनंड व मॅक्झिमीलियन यांना सामील करून घेतलें. यामुळें लुई उघडा पडला. या वेळीं आपल्या सासऱ्यास–स्पेनच्या राजास–खूष करण्याकरितां, व ‘ आपल्याला फ्रान्सचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धुव्वा उडवितां येऊन, फ्रान्सचा नार्मंडी प्रांत आपल्याला हस्तगत करून घेतां येईल ' या हेतूनें आठवा हेन्री पवित्र संघांत सामील झाला. वूल्सेनें सैन्य उभारलें, फ्रान्सविरुद्ध युद्धाचें रणशिंग फुंकलें व त्याविरुद्ध आपलें सैन्यही रवाना केलें. फ्रान्सनें त्या सैन्याची दाणादाण केली ! तेव्हां आपल्या सैन्याची गेलेली अब्रू वांचविण्याकरितां हेन्री स्वतः जातीनें वूल्सेसह फ्रेंच रणभूमीवर सैन्यासह उतरला. खुद्द जर्मन बादशाह मॅक्झिमीलियन यानें आठव्या हेन्रीची गांठ घेऊन त्याला साहाय्य केलें. फ्रेंच व इंग्रज यांची गिनीगेट येथें लढाई झाली व फ्रेंचांचा पराजय झाला. या लढाईत फ्रेंच सैनिकांनीं शत्रूंना मारण्याकरितां तरवारींचा उपयोग करण्यापेक्षां रणांगणावरून लौकर निघून जाण्याकरितां घोड्यांना टांपाच जास्त मारल्या म्हणून या लढाईला ' टापांची लढाई ' असें विनोदानें संबोधण्यांत येतें (१५१३).

याच वेळीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें फ्रान्सनें स्कॉटलंडला इंग्लंडविरुद्ध चिथावून दिलें. त्यामुळें स्कॉटलंडचा राजा व आठव्या हेन्रीचा मेहुणा चौथा जेम्स यानें इंग्लंडवर अचानकपणें हल्ला केला व सरहद्दीवरील इंग्लंडचीं बरींच गांवें त्यानें हस्तगत केलीं. लॉर्ड सरे यानें त्याच्यावर प्रतिहल्ला करण्याचें ठरविलें. तेव्हां चेव्हिअट टेकडीच्या उत्तरेकडील एका टोकाच्या आधारानें जेम्सनें आपल्या सैन्याचा फ्लॉडन येथें तळ दिला. परंतु लॉर्ड सरे यानें स्कॉटलंड व जेम्स यांच्यामध्यें इंग्लिश सैन्य नेऊन लढाई दिली. तींत स्कॉटिश सैन्याचा पराजय झाला. अनेक नामांकित स्कॉटिश सरदार ठार झाले व चौथा जेम्सही मारला गेला. त्याच्यानंतर त्याचा अल्पवयी मुलगा, पांचवा जेम्स, गादीवर बसला; व पुढें बराच काळ इंग्लंडला स्कॉटलंडची भीति उरली नाहीं.

या लढाईनंतर खुद्द हेन्रीला लढाईचा वीट आला; त्याच्या लोकांनाही लढाई नको होती. शिवाय पवित्र संघांतील राष्ट्रांनीं त्याला कोणत्याही प्रकारची मदत केली नव्हती. मात्र त्यांनीं आपला स्वार्थ भरपूर साधून घेतला होता. त्यामुळें तर त्याला वाईट वाटलें. तेव्हां त्यानें फ्रान्सबरोबर सन १५१४ मध्यें तह केला व लुईचें लग्न आपली बहीण मेरी इच्याबरोबर लावलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परंतु दुर्दैवानें लुई लौकरच मेला व त्याचा पुतण्या फ्रॅन्सिस फ्रान्सच्या गादीवर बसला.

५. वूल्सेचें परराष्ट्रीय धोरण :—यानंतर युरोपियन राजकारणांत अनेक अनिष्ट गोष्टी घडल्या. सन १५१६ मध्यें स्पेनचा राजा फर्डिनंड मरण पावला. त्यामुळें त्याचा नातू–मुलीचा मुलगा–चार्ल्स, स्पेनचा राजा झाला; व स्पेनचें राज्य, नेदर्लंडस्, नेपल्स व सिसिली, व स्पेनच्या अमेरिकन वसाहती इतका मोठा प्रदेश त्याच्या ताब्यांत आला. पुढें सन १५१९ मध्यें मॅक्झिमीलियन बादशाह मेला; त्यामुळेंही त्याच्या राज्यापैकीं ऑस्ट्रियाचें राज्य त्याचा नातू–मुलाचा मुलगा–व आतां स्पेनचा राजा चार्ल्स याच्याकडेच आलें. परंतु रोमन बादशाहीपद मात्र निवडणुकीवर अवलंबून असल्यानें तें चार्ल्सला सहज प्राप्त झालें नाहीं. बादशाहीपदाच्या निवडणुकीकरितां या वेळीं फ्रान्सचा राजा फ्रॅन्सिस, स्पेनचा राजा चार्ल्स, व आठवा हेन्री असे तीन उमेदवार होते. परंतु या निवडणुकींत चार्ल्सचा जय होऊन तो पांचवा चार्ल्स म्हणून बादशाह झाला. यामुळें स्पेन, हॉलंड, जर्मनी, ऑस्ट्रिया, नेदर्लंडस्, नेपल्स इतक्या मोठ्या साम्राज्याचा चार्ल्स मालक झाला; व त्याचें सामर्थ्यही जास्त वाढलें. अशा स्थितींत फ्रॅन्सिस व चार्ल्स यांमध्यें इटॅलियन प्रदेश मिळविण्याकरितां चुरस लागणें शक्य होतें; व दोघेही आपली बाजू जास्त सामर्थ्यवान करण्याकरितां इंग्लंडच्या हेन्रीला आपल्या बाजूला वळवून घेण्याचा एकसारखा प्रयत्न करीत होते. या सर्व गोष्टी वूल्से जाणून होता; व म्हणून एकदां फ्रॅन्सिसला तर दुसऱ्या वेळीं चार्ल्सला मदत करण्याचें ठरवून इंग्लंडचें सामर्थ्य वाढविण्याचा त्याचा हेतु होता. त्याचप्रमाणें त्या दोघांमध्यें सत्तेचा समतोलपणा राखण्याचें धोरणही त्यानें स्वीकारल्याचें दिसतें. यामुळें कोणाचेंही पारडें त्यानें विशेष जड होऊं दिलें नाहीं. मात्र त्याचा ओढा पांचव्या चार्ल्सकडे विशेष होता.

सन १५२० मध्यें फ्रॅन्सिस व आठवा हेन्री यांची फ्रेंच सरहद्दीवर भेट झाली. त्यावेळीं फ्रॅन्सिस व हेन्री या दोघांनींही आपल्या वैभवाचें प्रदर्शन करून दुसऱ्याला दिपवून टाकण्याकरितां इतका पैसा खर्च केला कीं, भेटीच्या ठिकाणाला लोकांनीं 'सुवर्णवस्त्रभूमि' असें नांव दिलें. परंतु त्याचा फारसा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



आठव्या हेन्रीचें डोव्हरहून फ्रान्सकडे प्रयाण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपयोग झाला नाहीं; व हेन्रीनें पुढें थोड्याच दिवसांत पांचव्या चार्ल्सचीही गांठ घेऊन त्याच्याशीं तह केला. या तहांत ठरल्याप्रमाणें चार्ल्सनें, वचन देऊनही, वूल्सेला पोपची जागा मिळवून देण्याचा प्रयत्न केला नाहीं. व चार्ल्सनें सन १५२५ मध्यें पेव्हियाच्या लढाईत फ्रॅन्सिसला इतका चोप दिला कीं, त्यामुळें चार्ल्सचें पारडें जड होण्याचा रंग दिसूं लागला. यामुळें हेन्री व चार्ल्स यांच्यामध्यें झालेला तह फिसकटला व हेन्रीनें वूल्सेच्या सल्ल्याप्रमाणें फ्रॅन्सिसबरोबर मित्रत्वाचा तह केला (१५२७). युरोपियन राजकारणांत सत्तेच्या समतोलपणाचें तत्त्व रूढ करण्याचें मुख्य श्रेय वूल्सेकडेच जातें.

६. वूल्सेचें अंतर्गत धोरण :—युरोपियन राजकारणांत गुंतला असतांही वूल्सेचें लक्ष इंग्लंडच्या अंतर्गत सुधारणांकडे मुळींच नव्हतें असें नाहीं. विद्येचा प्रसार योग्यरीतीनें व्हावा म्हणून त्याची एकसारखी खटपट चाललेली होती. कांहीं धर्ममठ आपलें धर्मकार्य नीट चालवीत नसत. धर्ममठ जप्त करण्याची परवानगी पोपकडून मिळवून त्यानें सुमारें चाळीस धर्ममठ जप्त केले व आलेला पैसा त्यानें नवीन शिक्षणसंस्था स्थापण्यांत खर्च केला. खुद्द आपल्या इप्स्विच्र गांवीं त्यानें एक शाळा स्थापन केली व ऑक्सफर्डला 'कॉर्डिनल कॉलेज' (आतां क्राईस्ट कॉलेज या नांवानें ओळखलें जाणारें) बांधण्यास सुरुवात केली. शैक्षणिक सुधारणा कराव्या व त्याकरितां धर्मगुरूंनीं उत्साहानें कार्य करावें व धर्ममठांचा पैसा योग्य कारणीं लावावा, असा त्याचा स्तुत्य हेतु होता. पण तो फारसा साध्य झाला नाहीं. सन १५१८ मध्यें वैद्यकी ज्ञानाचा प्रसार करण्याकरितां हेन्रीच्या साहाय्यानें त्यानें एक मोठें वैद्यक विद्यालयही स्थापन केलें. इंग्लंडच्या धर्मपीठांत चालू असलेला धार्मिक व नैतिक अनाचार थांबवावा अशी त्याची फार इच्छा होती. धार्मिक सुधारणा करण्याकरितांच त्याला पोप व्हावयाचें होतें; परंतु त्याची इच्छा सफल झाली नाहीं.

राजकीय बाबतींत राजसत्ता दृढ करून ती वाढवावी असें त्याचें धोरण होतें व त्याप्रमाणें त्याचे एकसारखे प्रयत्न चालू होते. सातव्या हेन्रीनें स्थापन केलेल्या स्टार चेंबर कोर्टाचा त्यानें चांगलाच उपयोग करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेऊन त्यानें सरदारांची सत्ता कमी करण्याचा प्रयत्न केला. पार्लमेंटपेक्षांही राजसत्ता श्रेष्ठ होय असें त्याला वाटत असे. त्यामुळें आपल्या चौदा वर्षांच्या कारभारांत त्यानें पार्लमेंटची सभा क्वचितच बोलाविली. प्रिव्ही कौन्सिलच्या सल्लयानेंच तो आपला कारभार करीत असे. पण जकात बसवावयाची झाल्यास मात्र तो पार्लमेंटची संमति घेई. अशा एका प्रसंगीं त्यानें पार्लमेंटला दम देऊन, आपला नवीन कर थोड्या कमी प्रमाणांत पास करून घेतला. नजराण्याच्या रूपानेंही लोकांकडून तो पैसा उकळीत असे. गरीबांना तो उत्कृष्ट व योग्य न्याय देई व श्रीमंतांच्या कचाट्यांतून त्यांना सोडवी. शेतांचीं कुरणें करण्याची पद्धति जमिनदारांनीं इंग्लंडमध्यें सुरू केली होती. त्यामुळें शेतकऱ्यांना काम मिळेनासें झालें; हें पाहून ती पद्धत बंद करण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला, पण त्याला त्या बाबतींत यश मिळालें नाहीं.

७. घटस्फोट प्रकरण :—अशा धामधुमींतच एका नवीन प्रकरणाचा जन्म झाला व वूल्सेची सत्ता संपुष्टांत आली. आठव्या हेन्रीचें लग्न स्पेनची राजकन्या कॅथराइन इच्याबरोबर झाल्याला बरींच वर्षें झालीं होतीं. कॅथराइन हेन्रीपेक्षां पांच वर्षांनीं मोठी होती, व हळू हळू तिचें सौंदर्यही लुप्त होऊं लागलें होतें! तिच्यापासून हेन्रीला पुष्कळ मुलें झालीं पण मेरीशिवाय त्याचें एकही मूल जगलें नाहीं. यामुळें तो अत्यंत विमनस्क झाला. आपण आपल्या वडील भावाच्या विधवेबरोबर लग्न केल्यामुळेंच देव कोपला व त्यामुळेंच आपलीं मुलें जगत नाहींत असें त्याच्या मनानें घेतलें. हेन्री निपुत्रिक मरण पावल्यास वारसाबद्दल राज्यांत पुन्हां गोंधळ माजेल असें प्रजेप्रमाणें हेन्रीलाही वाटूं लागलें होतें. बकिंगहॅमचा ड्यूक एडवर्ड हा पुढें वारसा-हक्क सांगूं शकेल म्हणून हेन्रीनें त्याला फांशीं दिलें. या वेळीं कॅथराइन त्याला आवडेनाशी झाली व ॲन बुलीन नामक एका सुंदर व मोहक तरुणीवर हेन्रीचें मन गेल्यानें कॅथराइनशीं घटस्फोट मिळवावा असें त्याला वाटूं लागलें. शिवाय पांचव्या चार्ल्सनें त्याला फसविल्यामुळेंही कॅथराइनसंबंधीं-कारण कॅथराइन चार्ल्सची मावशी होती-त्याचें मन जास्त कलुषित झालें. खुद्द वूल्सेलाही घटस्फोट मान्य होता व कॅथराइन व हेन्री

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांचें लग्न अन्याय्य ठरवून एका फ्रेंच राजकन्येबरोबर हेन्रीचें लग्न व्हावें अशी त्याची इच्छा होती.

८. पोपला पेंच :—या घटस्फोटाला पोपची परवानगी मिळविणें हा एकच सरळ मार्ग होता; व त्याप्रमाणें हेन्रीनें घटस्फोट मिळविण्याकरितां सन १५२७ मध्यें पोपकडे अर्जही केला. उघड रीतीनें सोपी वाटणारी ही गोष्ट या वेळीं इतकी सोपी नव्हती. कारण पोप, सातवा क्लेमन्ट, पांचव्या चार्ल्सचा कैदी होता. त्यामुळें घटस्फोटाची परवानगी देऊन चार्ल्सचा आपल्यावर आणखी रोष करून घ्यावा अशी पोपची इच्छा नव्हती. हेन्रीला दुखवावें असेंही त्याला वाटत नव्हतें; कारण चार्ल्सविरुद्ध हेन्री व त्याचा मित्र फ्रॅन्सिस आपल्याला मदत करूं शकतील असें त्याला वाटत होतें. शिवाय हेन्रीच्या घटस्फोटाला मान्यता दिल्यास आपल्या सत्तेस बाध येतो हें पोप ओळखून होता. सर्वसाधारण धर्म-कायदा हें लग्न योग्य नाहीं असेंच सांगत होता; तरी त्याला पूर्वींचा पोप ज्यूलियस यानें मान्यता दिली होती. घटस्फोटाला मान्यता देणें म्हणजे ज्यूलियसनें दिलेली मान्यता—म्हणजेच पोपची मान्यता—अयोग्य होती हें सिद्ध केल्यासारखें होणार ! या सर्व कारणांमुळें पोपही मोठ्या पेंचांत पडला. त्यामुळें तो हें प्रकरण एकसारखा लांबणीवर टाकूं लागला व हेन्री त्याबद्दल एकसारखी निकड लावूं लागला. शेवटीं कंटाळून जाऊन त्यानें कार्डिनल वूल्से व कार्डिनल कॅम्पेगियो यांचें एक कमिशन नेमलें व घटस्फोट प्रकरणाचा शेवट लावण्याची त्या कमिशनला त्यानें आज्ञा दिली (१५२८). आपला प्रधान व परम मित्र वूल्से कमिशन-वर आहे यामुळें हेन्रीला आनंद झाला. परंतु कॅथराइन चिडली व त्या कमिशनचा अधिकार अमान्य करून ती सरळ रोमला पोपकडे गेली. खुद्द पांचव्या चार्ल्सला या सर्व गोष्टी कळल्यावर त्यालाही हेन्रीचा अत्यंत राग आला. त्यामुळें पोपनें कमिशन रद्द केलें व आपणच या गोष्टीचा निर्णय लावूं असें त्यानें जाहीर केलें.

९. वूल्सेचा अधःपात :—यामुळें हेन्री चिडून गेला. या सर्व गोष्टींबद्दल वूल्सेवर सूड उगविण्याचें त्यानें ठरविलें. वूल्सेवर सरदार व एकंदर जनता नाखूष आहे हेंही हेन्री जाणून असल्यामुळें त्यानें वूल्सेला अधिकारच्युत करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वतः अधिक लोकप्रियता मिळविण्याचें ठरविलें. ॲन बुलीन ऐवजीं एका फ्रेंच राजकन्येशीं लग्न केल्यास युरोपियन राजकारणांत फ्रान्ससारखा एक परम दोस्त इंग्लंडला मिळेल हें वूल्सेचें धोरणी मत आपल्यास पसंत नसल्याचें दाखवून त्यानें त्याला मुख्य प्रधानाच्या जागेवरून एकाएकीं दूर केलें व त्याची मालमत्ता जप्त केली. शिवाय दुसऱ्या रिचर्डच्या कारकीर्दींत पास झालेला व सांदी-कोंपऱ्यांत पडलेला राजावज्ञेचा कायदा जारी करून 'त्या कायद्याविरुद्ध वागून वूल्सेनें पोपबरोबर पत्रव्यवहार केला व त्यानें आपल्या संमतीविरुद्ध पोपचें प्रतिनिधित्व स्वीकारलें,' वगैरे आरोप त्याच्यावर ठेवले. परंतु कांहीं रदबदलीनंतर वूल्सेला उत्तर इंग्लंडमध्यें जाऊन राहण्याची हेन्रीनें परवागी दिली. तेथें असतां गेलेली सत्ता पुन्हां परत मिळविण्याच्या फंदांत पडल्यानें हेन्रीनें त्याच्यावर राजद्रोहाचा अरोप केला, त्याला कैद करविलें व त्याचा खटला चालविण्याकरितां त्याला लंडनला आणण्याचा हुकूम सोडला. गलित धैर्य व अशक्त झालेला वूल्से वाटेंतच लेस्टरच्या अबेमध्यें मृत्यु पावला (१५३०). " जितक्या प्रामाणिकपणानें मी माझ्या राजाची सेवा केली तितकी मी ईश्वराची सेवा केली असती, तर ईश्वरानें मला माझ्या म्हातारपणीं अंतर दिलें नसतें. " असे सार्थ उद्गार या वेळीं त्याच्या तोंडून निघाले होते.

अभ्यास

१. आठव्या हेन्रीचा स्वभाव वर्णा. त्याचा मुख्य हेतु कोणता ?

२. वूल्सेचें थोडक्यांत चरित्र देऊन, त्यानें कोणत्या गोष्टी उत्तम प्रकारें केल्या तें सांगा.

३. राजा व वूल्से यांत अधिक महत्त्वाकांक्षी कोण होता ? उदाहरणें द्या.

४. वूल्सेच्या अधःपातास तो स्वतः व राजा कितपत कारणीभूत झाला ? कशावरून ? उदाहरणें द्या.

५. खालील गोष्टींसंबंधीं एकेक महत्त्वपूर्ण वाक्य लिहा :—
टापांची लढाई; सुवर्णवस्त्रभूमि; सत्तेचा समतोलपणा; राजावज्ञेचा कायदा; पांचव्या चार्ल्सचें राज्य.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. राजाला घटस्फोट कां हवा होता? घटस्फोटाला मान्यता देण्याचें पोपनें लांबणीवर कां टाकलें? त्याचा परिणाम काय झाला?

७. खालील गोष्टींचीं कारणें द्या.

(१) मठजप्ती. (२) पवित्र संघ. (३) फ्रान्स व स्पेन यांची चुरस.

८. वूल्सेच्या चरित्रांतील ठळक ठळक गोष्टी लक्षांत घेऊन त्यांचीं चित्रें काढा. एका मोठ्या कागदाच्या डाव्या बाजूवर तीं कालानुक्रमानें एका-खालीं एक लावून त्याच्या स्पष्टीकरणार्थ प्रत्येक चित्रापुढें लहान टिपणें लिहा. असें केल्यावर वूल्सेच्या चरित्राचें मर्म दाखविणारा एक कालादर्श तयार होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२८. युरोपियन धर्मक्रांति व धर्मसुधारणा

१. धर्मसुधारणेची आवश्यकता :—आठवा हेन्री व कॅथराइन यांचें घटस्फोट प्रकरण येथेंच सोडून आपण युरोपांत जी नवी धर्मक्रांति होऊं घातली होती, तिच्याकडे वळूं. सर्व युरोपांत एके काळीं पोपची अमर्याद सत्ता मोठ्या आदरानें मानली जात होती; पण त्याला आतां उतरती कळा लागली होती. युरोपांत अनेक नव्या नव्या गोष्टी होऊं लागल्या होत्या, नवे नवे शोध लागले होते; लोकांच्या भौगोलिक कल्पना भ्रामक ठरूं लागल्या होत्या व त्यामुळें धर्मावरील त्यांच्या अंधविश्वासास ओहोटी लागूं लागली. बंदुकीच्या दारूच्या शोधामुळें युद्धकलेंत, दुर्बिणीचा शोध व होकायंत्र यांच्या शोधामुळें नौकानयनांत व छापण्याच्या कलेमुळें विद्येच्या प्रसारांत भयंकर क्रांति झाली होती. त्यांतच लोकांच्या मनांत राष्ट्रीयत्वाची जाणीव उत्पन्न झाल्यामुळें पोपची सत्ता झुगारून द्यावी असें लोकांस वाटूं लागलें होतें. तशांतच विद्येच्या पुनरुज्जीवनानें लोकांत नवचैतन्य निर्माण झालें, निरनिराळ्या शास्त्रांचा व धर्मशास्त्रांचाही खोल अभ्यास होऊं लागला व अंधश्रद्धेचा काळ संपून प्रत्येक गोष्टीचा व विशेषतः धर्माचा चिकित्सक बुद्धीनें अभ्यास होऊं लागल्यानें धर्मसुधारणा व्हावी असें अनेकांस वाटूं लागलें.

२. धर्मगुरूंचें आचरण :—अशा बदलत्या काळांत खुद्द धर्मपीठ, धर्ममठ व धर्मगुरू यांचीही स्थिति अत्यंत अवनतीस पोहोंचलेली होती. धर्ममठ अत्यंत श्रीमान् असून राजेरजवाड्यांकडून त्यांच्यावर देणग्या व पैसा यांचा एकसारखा पाऊस पडत असे! धर्मप्रसाराचें काम मोठ्या उत्साहानें व्हावें म्हणून मोठमोठ्या जमिनी मठांकडे लावून दिल्या होत्या. असें दान केल्यानें मेल्यावर आपल्याला यमगृहीं भयंकर यातना व दुःखें सोसावीं लागणार नाहींत अशी भोळ्या व खुळ्या लोकांची मूर्ख समजूत असे! या सर्व संपत्तीवर ताव मारण्याचें काम धर्मगुरू करीत. त्यामुळें तेही श्रीमान् झाले होते. कोणत्याही प्रकारचें धर्मप्रसाराचें काम न करतां ऐषारामांत रहावयास मिळतें म्हणून जो उठला तो धर्मगुरू होण्यास प्रवृत्त होत असे! केवळ स्वार्थांध होऊन धर्म-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरू होणारे लोक धर्मकार्य उत्कटतेनें करण्यास मुळींच लायक नसत. त्यांचें शिक्षण बेताचेंच असल्यानें राजा व सरदार यांची हांजी हांजी करून आपली संपत्ति व आपलें वतन रक्षण करण्याचेंच कार्य या धर्मगुरूंकडून होत असे. पैशाच्या हव्यासामुळें एकेका धर्मगुरूच्या ताब्यांत पांच पांच सहा सहा धर्ममठ असत. खुद्द वूल्सेच्या ताब्यांत सहा–सात धर्ममठ होते, व त्यांचें सर्व उत्पन्न तोच घेई. अशा धर्मगुरूंचें आचरण पहावें तेंही धर्मविरुद्ध व नीतिविरुद्ध ! स्वकर्तव्यापासून च्युत झालेले हे धर्मगुरू स्वार्थांध व अत्यंत लोभी बनून त्यांनीं धर्माचा नुसता विचका करून टाकला होता !

३. पोपची वागणूक :—अशा धर्मगुरूंचा गुरू व ख्रिस्तीधर्माचा मुख्य गुरू म्हणजे पोप ! तोसुद्धां राजकारणांत पडूं लागला, जवळ मोठें सैन्य बाळगून मोठमोठ्या राजांशीं प्रांत मिळविण्याच्या हेतूनें लढाया देऊं लागला. मध्य इटलींतील बराचसा भाग पोपच्या राज्यांत मोडत असे. ‘ दुष्ट राजाला पदच्युत करून, त्याच्या जागीं सुष्टाची नेमणूक करण्याचा आपल्याला अधिकार आहे. या ऐहिक जगतांत परमेश्वराचा मी एकच एक प्रतिनिधी असल्यानें सर्वसाधारण लोकांनींच काय पण प्रत्येक राजानें माझी आज्ञा मान्य केली पाहिजे, मी देईन त्याच मुलखावर राज्य केलें पाहिजे ’ असें प्रत्येक पोप म्हणत असे. परंतु नव्या युगाच्या सुरुवातीपासून व विद्येच्या पुनरुज्जीवनामुळें पोपचा हा अधिकार कोणताही राजा मानीनासा झाला. खुद्द पोपचें आचरणही वाईट असे. ऐषारामांत व अनेक प्रकारच्या विलासांत दंग झाल्यामुळें पोपवरील लोकांचा विश्वास उडूं लागला. तशांतच ‘ पापमुक्ततेचे पास ’ विकण्याची प्रथा पोपनें पाडल्यामुळें त्याच्यावरील श्रद्धा कमी झाली व धर्मसुधारणा व्हावी असें लोकांस वाटूं लागलें. या वेळीं पोपच्या व धर्मगुरूंच्या स्वैर वागणुकीवर प्रखर घाव घालून खरी वस्तुस्थिति लोकांसमोर मांडण्याचें व धर्मसुधारणेची आवश्यकता पटविण्याचें खरें काम मार्टिन ल्यूथर यानें करण्याचें ठरविलें.

४. मार्टिन ल्यूथर :—मार्टिन ल्यूथर हा एका गरीब जर्मन शेतकऱ्याचा मुलगा. त्याचा जन्म सन १४८३ मध्यें झाला. भिक्षा मागून त्यानें उत्तम शिक्षण संपादिलें; व नंतर तो धर्मगुरू बनला. त्यानें ख्रिस्ती धर्मशास्त्राचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खोल अभ्यास करण्यास सुरुवात केली. परंतु त्या अभ्यासानें त्याच्या मनाला शांति मिळेना. पुढें विटेन्बर्गच्या विश्वविद्यालयांत तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाचें काम करूं लागल्यानें त्याची फार प्रसिद्धी झाली. कांहीं काळानंतर तो रोमला गेला. तेथील एकंदर प्रकार पाहून त्याला अत्यंत वीट आला. रोमहून परत आल्यावर धर्म-सुधारणेसंबंधींचीं आपलीं मतें तो जर्मनींत लोकांस सांगूं लागला. याच सुमारास

मार्टिन ल्यूथर

रोममध्यें एक मोठें चर्च बांधण्याचें, पोप, दहावा लियो, यानें ठरवून 'या धर्मकृत्यास जो आर्थिक मदत करील त्याला पापमुक्ततेचे पास देण्यांत येतील.' असें त्यानें जाहीर केलें; व हें काम करण्याकरितां निरनिराळ्या देशांत आपले हस्तक पाठविले. टेटझेल या नांवाचा एक हस्तक ल्यूथर राहत असे त्या गांवीं–विटेन्बर्गला–आला. त्या वेळीं टेटझेलच्या अधार्मिक कृत्यांबद्दल त्याची ल्यूथरनें मोठ्या त्वेषानें हजेरी घेतली; व पोपला अशा तऱ्हेनें पापमुक्ततेचे पास विकण्याचा अधिकारच नाहीं असें जोरजोरानें तो प्रतिपादूं लागला. पापमुक्ततेचे पास विकत घेतल्यानें स्वर्गद्वारें खुलीं होतात, असें बायबलमध्यें सांगितलें नाहीं, असें छातीठोकपणें त्यानें जाहीर केलें. शेवटीं पापमुक्ततेच्या पासांविरुद्ध सुमारें ९५ मुद्द्यांचें एक पत्रक टेटझेल उतरला होता त्या विटेन्बर्गच्या चर्चच्या दारावर खिळ्यानें लावून त्याचा खरे–खोटेपणा सिद्ध करण्याकरितां त्यानें टेटझेलला आव्हान दिलें! एवढेंच नव्हे तर, पोप खिस्ती धर्मपीठाचा गुरूच नव्हे असेंही तो म्हणूं लागला. त्यामुळें चिडून जाऊन पोपनें त्याला धर्मबहिष्कृत केलें; व–' ल्यूथर नास्तिक असल्यामुळें त्याच्यावर कोणी विश्वास ठेवूं नये' असें एक आज्ञापत्रक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोपनें काढलें. पण ल्यूथरनें त्या आज्ञापत्रकाचा नुसता निषेधच केला असें नाहीं तर भर चव्हाठ्यावर त्यानें तें जाळून टाकलें ! (१५१९).

५. ल्यूथरला पाठिंबा:—ल्यूथरच्या या कृत्यामुळें पोपला पैसा मिळेनासा झाला. धर्मभोळ्या, आचरट व खुळ्या लोकांनीं मात्र ल्यूथरचा निषेध केला. पोपवर व धर्मपीठावर झोड उठवून धर्मसुधारणांची आवश्यकता प्रतिपादिली होती त्या इरॅस्मसलाही ल्यूथरचें हें कृत्य आवडलें नाहीं. परंतु जर्मनीमध्यें कित्येक लोकांनीं ल्यूथरला मदत करण्याचें ठरवून त्याला पाठिंबा दिला. सॅक्सनीच्या ड्यूकनेंही त्याला उचलून धरलें व इतर कित्येक जर्मन राजपुत्रांनींही त्यास आश्रय देऊन त्याच्या धर्मतत्त्वांचा आपल्या संस्थानांत प्रसार करण्यास त्यास प्रोत्साहन दिलें. जर्मनीचा बादशाह पांचवा चार्ल्स याला ल्यूथरचें कृत्य आवडलें नाहीं व पोपची अवज्ञा करून त्याची सत्ता झुगारून दिल्याबद्दल ल्यूथरला देहान्त प्रायश्चित्त देण्याचें त्यानें ठरविलें. परंतु तें त्याला करतां आलें नाहीं. सॅक्सनीच्या ड्यूकनें ल्यूथरला एक वर्षभर आपल्या किल्ल्यांत गुप्तपणें आश्रय दिला व तेथेंच ल्यूथरनें बायबलचें जर्मन भाषेंत भाषांतर केलें. त्यानंतर ल्यूथर आपल्या मतांचा प्रसार करीत उत्तर जर्मनींत फिरत होता. त्या वेळीं अनेक जर्मन राजपुत्रांनीं जर्मन बादशाहाच्या आज्ञेचा निषेध केला; व त्यामुळेंच ल्यूथरच्या अनुयायांना 'प्रॉटेस्टंटस्'–निषेधवाले–असें नांव प्राप्त झालें. ल्यूथर १५४६ सालीं मृत्यु पावला. त्याच्या मृत्युनंतरही त्याचा पंथ वाढीस लागला; व थोड्याच वर्षांत पोपची सत्ता झुगारून देणारीं अनेक राष्ट्रें युरोपांत निघालीं. ल्यूथरमुळेंच रोमच्या धर्मपीठाची विभागणी झाली; व पोपची सत्ता अमान्य करणारे अनेक पंथोपपंथ निर्माण झाले. ल्यूथर हुषार, विद्वान्, उत्साही व धीरवीर होता. परंतु अनेक वेळां उद्धट व अपमानकारक शब्द वापरून त्यानें अनेक शत्रूही निर्माण केले होते.

६. जॉन कॅलव्हिन:—ल्यूथरप्रमाणेंच जॉन कॅलव्हिन या फ्रेंच गृहस्थानेंही पोपच्या सत्तेविरुद्ध हत्यार उपसलें. त्याचा जन्म सन १५०९ मध्यें झाला. तो नास्तिक असल्याचें ठरवून फ्रेंच सरकारनें त्याला कैद करण्याचें ठरविलें. तेव्हां तो स्वित्झरलंडमध्यें गेला (१५३६). त्याची शिस्त तेथील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांना न आवडल्यानें त्यांनीं त्याला हाकलून दिलें; परंतु थोड्या वर्षांनींच त्याला त्या देशांत पुन्हां बोलावण्यांत आलें. तेथें तो सन १५६४ मध्यें मेला. त्याच्या पंथाला 'प्यूरिटन' पंथ असें नांव प्राप्त झालें होतें. 'आपल्या धर्मपंथांतील लोकांनीं जिनिव्हाचेंच चर्च मान्य केलें पाहिजे, एका विशेष प्रकारच्या पद्धतीचा व रंगाचा पोषाखच वापरला पाहिजे, डामडौल व ऐषाराम टाकून दिले पाहिजेत' अशी त्याची आज्ञा होती. त्याच्या आज्ञे-प्रमाणें न वागणारास छळ सोसावा लागे. जिनिव्हाला अनेक लोक त्याची शिकवणूक शिकून निरनिराळ्या देशांत गेले व तेथें त्यांनीं प्यूरिटन पंथाच्या मतांचा फैलाव केला. एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीत अनेक प्यूरिटन लोक इंग्लंडमध्यें आले व स्टुअर्ट राजांच्या कारकीर्दींत त्यांनीं अनेक उलाढाली केल्या.

७. अलरिच झिंवगली :—कॅलव्हिनप्रमाणेंच आणखी एक धर्मसुधारक म्हणजे अलरिच झिंवगली हा होय. त्याचा जन्म सन १४८४ मध्यें झाला. तो स्वित्झरलंडचा रहिवासी असून धंद्यानें शिक्षक होता. त्यानेंही एक नवीनच प्रॉटेस्टंट पंथ स्थापन केला. पोपची सत्ता त्याला मान्य नव्हती. उत्तम प्रवचनकार, परमतसहिष्णु व दूरदर्शी असल्यानें त्याची लोकांवर चटकन छाप पडली. कांहीं बाबतींत तो ल्यूथरच्याही पुढें गेला होता. स्वित्झरलंडमध्यें कॅथॉलिक परगणे व प्रॉटेस्टंट परगणे यांच्यांत यादवी माजली असतां झूरिकच्या प्रॉटेस्टंटांतर्फें तो सैनिक म्हणून लढत असतां मारला गेला (१५३१). इंग्लंड व स्कॉटलंडमध्यें त्याच्या शिष्यांनीं प्रॉटे-स्टंटपंथ वाढविला.

८. धर्मक्रांतीचा परिणाम :—अशा तऱ्हेनें जवळ जवळ सर्व युरोपभर धर्मक्रांति होऊन धर्मसुधारणा होऊं लागली; परंतु या चळवळीनें खरी धर्म-सुधारणा मुळींच झाली नाहीं. ती भविष्यकाळाकडेच सोंपविण्यांत आली. युरोपमध्यें सुरू झालेल्या धर्मसुधारणेच्या चळवळीचे परिणाम मात्र फार दूरवर पोंचणारे होते. अनेक लोकांनीं नाना पंथ निर्माण करून त्यांनीं पोपची सत्ता झुगारून दिल्यानें धर्मदृष्ट्या पोपचें महत्त्व कमी झालें. जर्मनी, इंग्लंड, स्वित्झरलंड वगैरे राष्ट्रांनीं पोपची सत्ता झुगारून दिली; व इटली,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्पेन, फ्रान्स वगैरे राष्ट्रांनीं ती मान्य केल्यानें युरोपांत दोन तट निर्माण होऊन त्यांमध्यें कायमची चुरस निर्माण झाली. त्यामुळें युद्धें व रक्तपात यांना ऊत येऊम राष्ट्रांची अनेक प्रकारांनीं हानी झाली. धर्मसुधारणेच्या चळवळीमुळें लोकांचे अनेक फायदे झाले. प्रत्येकाच्या सदसद्विवेकबुद्धीस अवसर मिळून स्वमत व स्वेच्छा निर्भयपणें मांडण्याची लोकांस मोकळीक मिळाली. त्यामुळें प्रत्येक राष्ट्राच्या भाषेंत नवीनं नवीन ग्रंथ झाले. अर्थात् वाङ्मय समृद्ध होऊं लागलें. शैक्षणिक सुधारणांस प्रोत्साहन मिळूं लागल्यानें नवीन नवीन शाळा स्थापन होऊं लागल्या. लोकांची धर्मावर जास्त व खरी श्रद्धा बसूं लागली व त्यांच्या जीवनांत खरा आनंद भरूं लागला, धर्मगुरूंच्या नीतिभ्रष्ट आचरणास आळा बसूं लागला व अंधश्रद्धेमुळें इतके दिवस लोकांच्या पैशाचा ओघ धर्ममठांकडे वाहत असे तो सत्कारणीं लागण्यास मदत झाली.

९. कॅथॉलिक संघटनेची चळवळ :—युरोपांतील धर्मसुधारणेची लाट थोपवून धरण्याकरितांही अनेक प्रयत्न झाले. रोमन कॅथॉलिक पंथांतून अनेक लोक फुटून जाऊं लागले. तेव्हां त्या पंथाची कांहीं ना कांहीं सुधारणा करणें जरूर आहे व ही सुधारणा लौकर घडवून आणली नाहीं तर कॅथॉलिक पंथ मरणाच्या पंथास लागेल असें अनेक रोमन कॅथॉलिकांस वाटूं लागलें; व त्या पंथांतील कांहीं कार्डिनल व बिशप यांनीं इटलीमध्यें ट्रेंट येथें मोठी सभा भरवून रोमन कॅथॉलिक पंथाची सुसूत्र पद्धतीवर उभारणी करून पाद्री, बिशप व धर्मगुरू यांची वागणूक व आचरण यांसंबंधीं नवीन नियम केले. या सभेनें आद्य धर्मपीठाच्या सत्तेंत व अधिकारांत कोणत्याही प्रकारचा बदल केला नसला तरी त्यांनीं केलेले नियम अजूनही मानले जातात.

परंतु धर्मसुधारणेच्या चळवळीमुळें झालेलें नुकसान भरून काढण्याकरितांही रोमन कॅथॉलिकांनीं उपाय योजून नास्तिक व धर्मलंड लोकांना जबरदस्त शिक्षा करण्याकरितां 'इन्क्विझिशन' कोर्टाचा सर्रास उपयोग करण्याचें ठरविलें. स्पेनमध्यें असलेलें इन्क्विझिशन कोर्ट बरेंच नामांकित असून धर्मसुधारणेच्या चळवळीपूर्वीच फर्डिनंडनें तें स्थापन केलें होतें. त्या कोर्टापुढें आतां प्रॉटेस्टंटांसही खेंचण्यांत येऊन त्यांचे भयंकर हाल होऊं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागले. पोपनेंही असेंच कोर्ट स्थापन केलें होतें. या कोर्टाकडून नास्तिकांस देहान्त प्रायश्चित्त अगर जिवंत जाळण्याचीही शिक्षा देण्यांत येत असे. नास्तिक असल्यानें परलोकीं त्याला अनेक देहदंड सोसावे लागणारच; तेव्हां तेच देहदंड या जगांतच जर त्या नास्तिकानें सोसले तर त्याचा परलोकवास अत्यंत सुखाचा होईल अशी या लोकांची खुळी कल्पना होती! इन्क्विझिशन कोर्टाला स्पेनमध्यें जितकें यश लाभलें तितकें कोठेंही लाभलें नाहीं व त्यामुळें स्पेनमध्यें औषधालाही प्रॉटेस्टंट उरला नाहीं.

१०. जेसुइट लोक:—धर्मपीठाची झालेली हानि भरून काढण्याचें काम जीझस सोसायटीनें केलें होतें. इग्नेशय लायोला यानें ही संस्था स्थापन केली. त्याच्या पंथांतील लोकांस 'जेसुइटस्' असें संबोधण्यांत येत असे. जुन्या कॅथॉलिक धर्माचें संरक्षण व संघटण करणें हा यांचा मुख्य उद्देश होय. जेसुइट लोकांनीं अत्यंत स्वार्थत्यागपूर्वक राहून धर्मप्रसाराचें, शिक्षणाचें व धर्मशिक्षणाचें काम अंगावर घेतलें होतें. या पंथांत सामील होण्यापूर्वी कडक शिस्तींत राहून प्रत्येकाला बराचसा अभ्यास करावा लागे. 'आम्ही गरिबींत राहूं, नीति सोडणार नाहीं,

इग्नेशय लायोला

वरिष्ठांचें हुकूम विनतक्रार पाळूं, पोपच्या आज्ञा शिरसावंद्य मानूं, धर्मप्रसारार्थ देह कष्टवूं' वगैरे नाना प्रकारच्या शपथा प्रत्येकाला घ्याव्या लागत. त्यांची धर्मनिष्ठा कडवी होती; कर्तव्याला ते सदैव जागत व आमरण विद्येला व तिच्या प्रसाराला वाहून घेत. यायोगें त्यांची जनतेवर विलक्षण छाप बसली होती. त्यांचा कोणताही विशिष्ट गणवेष नव्हता, कोणतीही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विशिष्ट धार्मिक शिकवणूकही नव्हती. मात्र त्यांची शिस्त पराकाष्ठेची असे! त्यांचीं निरनिराळीं पथकें करण्यांत आलीं होतीं, व प्रत्येक पथकावर एकेक मुख्य अधिकारी नेमण्यांत येत असे. त्याची आज्ञा व हुकूम प्रत्येकानें मानले पाहिजेत असा दंडक होता. सर्व चळवळीचा जो मुख्य असे त्याला मुख्य सेनापति मानण्यांत येई. ज्या देशांत जेसुइट गेले, तेथें धर्मप्रसाराचें काम करून अनेक लोकांना त्यांनीं कॅथॉलिक पंथांत आणलें. त्यांच्या मिशनरी संस्था अजूनही अनेक देशांत दिसून येतात. जेसुइट लोकांनीं आपल्या प्राणांचीही पर्वा न करतां धर्मप्रसाराचें काम अत्यंत उत्कटतेनें, धैर्यानें व एकतानतेनें केलें तरी त्यांना मिळावें तितकें यश मिळालें नाहीं व धर्मसुधारणेच्या चळवळीनें रोमन कॅथॉलिक पंथाची जी त्रेकी झाली त्याची एकीही कधीं झाली नाहीं.

अभ्यास

१. धर्मक्रांतीचीं कारणें द्या. तीं नाहींशीं करण्याकरितां तुम्हीं काय केलें असतें? त्यावेळच्या लोकांनीं कोणत्या गोष्टी केल्या?

२. मार्टिन ल्यूथरचें थोडक्यांत चरित्र सांगा.

३. ल्यूथरप्रमाणेंच पोपची धार्मिक सत्ता अमान्य करणारांची हकीकत द्या.

४. धर्मक्रांतीचे परिणाम वर्णा.

५. कॅथॉलिक संघटनेकरितां कोणकोणत्या गोष्टी करण्यांत आल्या?

६. इग्नेशय लायोलाच्या जेसुइट पंथाची थोडक्यांत माहिती द्या. त्यानें कॅथॉलिक संघटनेकरितां काय प्रयत्न केला?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२९. आठवा हेन्री व इंग्लंडमधील धर्मक्रांति

१. तत्कालिन धार्मिक परिस्थिति:—युरोपांत धर्मसुधारणेची चळवळ जोरानें सुरू असतां इंग्लंडमध्येंही त्या चळवळीचें बीज रुजूं लागलेलें होतें. फार प्राचीन काळापासून इंग्लंडमध्यें पोपच्या सत्तेविरुद्ध लोकमत निर्माण झालें होतें. राजकारण राजानें करावें पण धर्मकारण रोमला राहणाऱ्या पोपनें करावें अशी इंग्लंडची स्थिति होती. ती कित्येक लोकांस नापसंत होती. पूर्वी राजाच्या संमतिशिवाय इंग्लंडमध्यें पोपची सत्ता व त्याचा धार्मिक अधिकार व हक्क मानले जात नसत. ही गोष्ट खरी असली तरी जॉनच्या वेळेपासून इंग्लंडचा राजा पोपचा हस्तकच बनून राहिलेला होता व इंग्लंडच्या धर्मपीठाचा मालक म्हणून पोपच ओळखला जाई. यामुळें बिशप, पाद्री, आर्चबिशप, कॉर्डिनल, पोपचे प्रतिनिधी वगैरे अधिकाऱ्यांच्या नेमणुका पोपकडून होत व अशा जागीं कधीं कधीं परकीय गृहस्थ नेमले जात. ते इंग्लंडच्या बाहेरच रहात व आपलें वतन उपभोगीत. तसेंच नवीन नेमणूक झाली म्हणजे प्रत्येक धर्मगुरूला पोपला कांहीं नक्त नेमणूक द्यावी लागे. पैशाच्या लोभानें पोप अशा नेमणुका वारंवार करी. शिवाय धार्मिक बाबतींतील कांहीं खटले धार्मिक कोर्टांकडूनच चालविले जात व त्याविरुद्ध अपील करावयाचें झाल्यास तें रोमला पोपकडे करावें लागे. अशा कोर्टांवर राजाचा अधिकार मुळींच चालत नसे. त्यामुळें इंग्रजांचा पैसा व वेळ निष्कारण फुकट जाई. इतकें असूनही इंग्लंडमध्यें धर्मशिक्षण व धर्मप्रसार करण्याकडे पोप क्वचितच लक्ष देई. आपल्या विलासी आचरणानेंही पोपनें लोकांच्या मनांत आपल्याबद्दल अनादर उत्पन्न केला होता. इंग्लंडमधील धर्मगुरूंचें आचरणही अधार्मिक व अनैतिक होतें. ते अत्यंत विलासी व चैनी बनल्या कारणानें कर्तव्यच्युत झालेले होते. धर्मप्रसाराचें व धर्मशिक्षणाचें काम करण्यापेक्षां भल्याबुऱ्या मार्गांनीं पैसा मिळवावा व तो आळसांत व चैनींत राहून निरनिराळ्या विलासांत खर्च करावा असें त्यांस वाटत असे. अर्थात् पोप व धर्मगुरू यांचें धर्मबाह्य व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नीतिभ्रष्ट आचरण लोकांना आवडेनासें होऊन त्यांच्याबद्दल लोकमत अत्यंत कलुषित झालें होतें. पोपसारख्या एका परकीय अधिकाऱ्यानें इंग्लंडच्या धर्मखात्यावर वर्चस्व गाजवावें ही गोष्टही इंग्रजांच्या मनांत खुपत होती.

२. लोलर्ड पंथ :—वरील स्थिति सुधारण्याकरितां अनेक राजांनीं प्रयत्न केले; परंतु त्यांना फारसें यश मिळालें नाहीं. दुसऱ्या रिचर्डनें राजावज्ञेचा कायदा पास करून जो कोणीं पोपचे हुकूम व त्याचीं आज्ञापत्रकें इंग्लंडमध्यें आणील अगर त्याच्याशीं धार्मिक बाबतींत पत्रव्यवहार करील, त्यास जबर शिक्षा करण्यांत येईल असें ठरविलें होतें (१३९३). परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. पोपची सत्ता कमी केली पाहिजे व धर्मसुधारणा घडवून आणली पाहिजे असें अनेक लोकांस वाटूं लागलें होतें. ' लोभी पोप हा गवळी असून दूध देणारी त्याची गाय म्हणजे इंग्लंड होय, ' असें लोक म्हणत. अशा स्थितींत इंग्लंडांत चौदाव्या शतकाच्या अखेरीस जॉन विक्लिफनें धर्मसुधारणेची आवश्यकता प्रतिपादन करण्यास सुरुवात केली होती. पोप व धर्मगुरू श्रीमंत असल्यामुळेंच धार्मिक अनाचार होतात; तेव्हां त्यांच्याकडे जाणाऱ्या पैशाचा ओघ थांबवून धर्मपीठाची सुधारणा केली पाहिजे असें तो प्रतिपादीत असे. इंग्लंडमधील जनतेला विक्लिफचें म्हणणें पटलें तरी त्याला फारसे अनुयायी न मिळाल्यानें त्याच्या चळवळीचा फारसा उपयोग झाला नाहीं. त्याला ' धर्मसुधारणेच्या चळवळीचा शुक्रतारा ' असें लोक म्हणत; व त्याच्या अनुयायांस ' लोलर्ड ' (बडबड करणारे) म्हणत. त्यांना राजाश्रय मिळाला नाहीं तरीही त्यांचा पंथ न मरतां आठव्या हेन्रीच्या वेळेपर्यंत तो जीव धरून होता.

३. ऑक्सफर्डचे सुधारक :—लोलर्ड लोकांनंतर व ट्यूडर अंमलाच्या सुरुवातीला विद्येच्या पुनरुज्जीवनाची चळवळ सुरू झाली; व तिनें धर्मसुधारणेची आवश्यकता पटवून देण्यास बरीच मदत केली. या चळवळ्यांचें केंन्द्र ऑक्सफर्ड होय. तेथूनच जॉन कॉलेट, इरॅस्मस व टॉमस मूर यांनीं लॅटिन व ग्रीक भाषांचा अभ्यास करून व लोकांकडून करवून घेऊन लोकांच्या धार्मिक अंधश्रद्धेला चांगलाच धक्का दिला. कॅथॉलिक धर्मपंथ त्यांस अमान्य नव्हता व पोपचें वर्चस्व झुगारून द्यावें असेंही त्यांस वाटत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हतें. तरी पण धर्मगुरूंनीं शुद्धाचरणी व्हावें अशी त्यांची इच्छा होती; अर्थात शिक्षणाचा फैलाव करणें जरूर आहे असें त्यांचें म्हणणें होतें. त्याकरितां त्यांनीं शाळा स्थापन केल्या व तेथें धर्माची खरी शिकवण शिकविण्यास सुरुवात केली. त्यामुळें लोकांची चिकित्सकबुद्धि जागृत होऊन त्यांच्या खुळ्या व आचरट कल्पना नाहींशा होण्यास मदत झाली. ऑक्सफर्डच्या या विद्याप्रसारकांस 'ऑक्सफर्डचे सुधारक' असें मानण्यांत येतें.

४. धर्मसंरक्षक हेन्री :—धर्मसुधारणेसंबंधीं आठवा हेन्री अगदीं उदासीन होता; एवढेंच नव्हे तर तो त्या चळवळीस नाक मुरडी ! धर्मसुधारणेच्या चळवळीची मुहूर्तमेढ जर्मनींत ल्यूथरनें केली. ल्यूथरचे अनेक अनुयायी इंग्लंडमध्यें आले व त्यांनीं ल्यूथरच्या मूलगामी तत्त्वांचा इंग्लंडमध्यें फैलाव करून इंग्रजांचीं मनें धर्मसुधारणेस अनुकूल करून घेतलीं. त्यांच्या पाखंडी मतांच्या पुस्तकांचा इंग्लंडमध्यें अभ्यास होऊं लागून लोकांच्या धार्मिक कल्पना बदलूं लागल्या. असें असलें तरी हेन्रीनें त्याला विरोध केला नाहीं व त्यांना प्रोत्साहनही दिलें नाहीं. मात्र ल्यूथरचा निषेध करून त्याच्या शिकवणुकीचें खंडण करणारा व पोपची व कॅथॉलिक धर्मतत्त्वांची तळी उचलून धरणारा एक ग्रंथ त्यानें स्वतः प्रसिद्ध केला. त्यामुळें खूष होऊन पोपनें त्याला 'धर्मसंरक्षक' अशी पदवी अर्पण केली. ती अजूनही इंग्लंडच्या राजाच्या बिरुदावळींत विराजते. इंग्लंडमध्यें धर्मसुधारणेला कारणीभूत झालेला आठवा हेन्री हाडानें कॅथॉलिक होता, कॅथॉलिक म्हणून त्यानें जन्मभर आचरणही केलें व कॅथॉलिक म्हणूनच तो मेला !

५. पोपशीं बेबनाव :—परंतु कॅथराईनशीं घटस्फोट करण्यास पोपनें संमति न दिल्यानें तो अतिशय चिडला व त्या बाबतींत पोपचा अधिकार अमान्य करून घटस्फोट प्रकरणाचा निकाल स्वतःच लावण्याचें त्यानें ठरविलें व धार्मिक बाबतींतील पोपची इंग्लंडमधील सत्ता झुगारून देऊन ती स्वतःच्या ठिकाणीं केन्द्रीभूत करण्याचें त्यानें निश्चित केलें. वूल्सेनंतर त्यानें कँटरबरीचा आर्चबिशप टॉमस क्रॅन्मर याला हातीं धरून धार्मिक कोर्टाकडून घटस्फोट प्रकरणाचा निकाल लावण्याची कामगिरी त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्यावर सोंपविली. क्रॅन्मरनें आपल्या कोर्टाकडून हेन्रीला घटस्फोटाची परवानगी देऊन वाटेल त्या स्त्रीशीं लग्न करण्याचीही त्याला मोकळीक दिली. लगेच त्याचा कॅथराइनशीं घटस्फोट मान्य झाला व त्यानें ॲन बुलीनशीं लग्नही केलें! गरीब बिचारी कॅथराइन यानंतर वर्षानेंच मेली. परंतु पोपचा अधिकार झुगारून देऊन सर्व धार्मिक सत्ता हेन्रीनें आपल्या हातीं घेतल्यानें हेन्रीचें महत्त्व व सामर्थ्य वाढलें. पोपविरुद्ध चालविलेल्या आपल्या कामगिरीला कायदेशीरपणा यावा

टॉमस क्रॅन्मर

म्हणून त्यानें पार्लमेंटची सभा बोलाविली (१५२९). व तिच्याकडून त्यानें स्वतःच तयार केलेले अनेक कायदे पास करून घेतले. सन १५३० मध्यें क्रॅन्मरच्या सल्ल्याप्रमाणें युरोपियन विश्वविद्यालयांकडे थॅथराईनच्या घटस्फोटाचें प्रकरण सोंपवून त्यांचें मत मागविण्यांत आलें. तें मत घटस्फोटाला अनुकूल असेंच आलें. पुढच्याच वर्षीं इंग्लंडमधील धर्मगुरूंनीं हेन्री हा इंग्लंडच्या धर्मपीठाचा मुख्य होय अशी कबुली दिली. या सर्व प्रकरणाच्या बुडाशीं हेन्रीचा स्वार्थ होता; व त्यामुळेंच युरोपियन धर्मसुधारणेची चळवळ धार्मिक स्वरूपाची असून इंग्लंडमधील धर्मसुधारणेच्या बुडाशीं राजकारण होतें असें लोक मानतात.

६. धर्मसुधारणावादी पार्लमेंट (१५२९–३६):—या पार्लमेंटनें अनेक कायदे पास करून सर्व प्रकारची धार्मिक सत्ता इंग्लंडच्या राजाच्या हातीं दिली; त्यामुळें पोपचें इंग्लंडमधील प्राधान्य व त्याचें महत्त्व लयास गेलें. सन १५३२ च्या कायद्यानें बिशप लोकांनीं आपल्या नवीन नेमणुकीनंतरचें पहिल्या वर्षाचें उत्पन्न पोपकडे न पाठवितां राजाकडे पाठवावें हें तत्त्व मान्य केलें. सन १५३३ च्या कायद्यानें धार्मिक खटल्याविरुद्ध अपील पोपकडे न करतां कँटरबरीच्या आर्चबिशपच्या कोर्टांत करण्यांत यावें असें ठरलें. यामुळें धार्मिक बाबतींतील अपीलें चालविण्याचा पोपचा अधिकार नष्ट करण्यांत आला. याच कायद्यानें हेन्रीचा कॅथराईनशीं होणारा घटस्फोट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कँटरबरी कोर्टानें मान्य केला व त्याला ॲन बुलीनशीं लग्न करण्यास मोकळीक मिळाली. पुढच्याच वर्षी (१५३४) पार्लमेंटनें धार्मिक श्रेष्ठत्वाचा कायदा पास करून इंग्लंडचा राजा इंग्लंडच्या धर्मपीठाचा मुख्याधिकारी असल्याचें जाहीर करण्यांत आलें. यामुळें इंग्लंडचा पोपशीं असलेला धार्मिक संबंध कायमचा रसातळास गेला व सर्व धार्मिक बाबतींत इंग्लंडचा राजा श्रेष्ठ आहे, हें तत्त्व रूढ झालें. या वर्षी आणखी एका कायद्यानें पार्लमेंटनें ॲन बुलीन व हेन्री यांच्या मुलांचा राज्यावरील वारसा मान्य करून मेरीचा–कॅथराईनच्या मुलीचा–वारसा अमान्य करण्यांत आला. सन १५३५

धर्मसुधारणेप्रीत्यर्थ आठव्या हेन्रीचें पदक

मध्यें पोपनें एक आज्ञापत्र प्रसिद्ध करून हेन्रीवर धर्मबहिष्कार टाकल्याचें जाहीर केलें. परंतु ती गोष्ट हेन्रीच्या खिजगणतींतही नव्हती ! पार्लमेंटला हातीं धरून धर्मसुधारणेचें त्याचें काम अव्याहतपणें चालूच होतें. धर्मसुधारणेच्या बाबतींत राजाला वाटेल तो कायदा पार्लमेंटनें पास करू दिला ही गोष्ट खरी; परंतु पार्लमेंटची निवडणूक झाली त्या वेळीं आपल्याला अनुकूल असेच सभासद निवडून येतील अशी दक्षता हेन्रीनें बाळगली होती ! या सर्व गोष्टींमुळेंच हेन्रीचें धोरण सर्वस्वीं यशस्वी झालें व त्याचा स्वार्थ साधला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेला. सातव्या हेन्रीनें सरदारांची सत्ता नामशेष करून राजसत्ता अनियंत्रित केली; तसेंच आठव्या हेन्रीनें पोपची सत्ता झुगारून देऊन व त्या ऐवजीं राजसत्ता प्रस्थापित करून राजसत्ता अधिकच अनियंत्रित केली.

७. नव्या धोरणाचा परिणाम :—राजा धर्माधिकारी झाला ही गोष्ट अनेकांना आवडली नाहीं व त्यांनीं नव्या कायद्यास अनुसरून राजसत्तेची शपथ घेण्याचेंही नाकारलें. अशांपैकीं एक नामवंत गृहस्थ म्हणजे 'युटोपिया' ग्रंथाचा लेखक व वूल्सेनंतरचा हेन्रीचा प्रधान सर टॉमस मूर होय. तो हेन्रीला धर्माधिकारी मानावयास तयार नसल्यानें त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला; परंतु तें कृत्य राजाला न आवडून त्यानें त्याला फांशीं दिलें. जॉन फिशर, रॉजेस्टरचा बिशप, यांचीही मूरप्रमाणेंच हेन्रीनें व्यवस्था केली! फिशर अत्यंत विद्वान् म्हणून ओळखला जात होता. परंतु कॅथराइनचा घटस्फोट त्याला अमान्य असून राजा धर्माचा मुख्य आहे हें तत्त्वही त्याला मान्य झालें नाहीं. तेव्हां हेन्रीनें त्यालाही फांशीं दिलें! अशाच तऱ्हेनें ज्यांनीं ज्यांनीं नवीन कायद्यास अनुसरून राजनिष्ठेची शपथ घेण्याचें नाकारलें त्यांना—धर्मगुरूंनाही—हेन्रीच्या कोपास बळी पडून फांशीं जावें लागलें. आपल्याला विरोध करणारा विद्वान आहे, कीं सरदार आहे, कीं खुद्द आपली बायको आहे, कीं आपला प्रधान आहे, हें न पाहतां केवळ तो आपल्याला विरोध करतो किंवा त्याच्यावरील आपली मर्जी उतरली म्हणून हेन्रीनें अनेकांना देहान्ताची शिक्षा दिली! वूल्से, टॉमस मूर, फिशर व हेन्रीच्या अनेक स्त्रिया यांना त्यानें अशीच क्रूर शिक्षा दिली होती. टॉमस मूर व फिशर यांच्यासारख्या सुप्रसिद्ध व्यक्तींचा वध झाल्यानें पोपशीं इंग्लंडचा समेट होणें अशक्य झालें.

८. इंग्लिश व युरोपियन धर्मक्रांति :—इंग्लंडमधील धर्मक्रांतीचें वरील विवेचन वाचून ती प्रथमतः राजकीय स्वरूपाची चळवळ होती हें लक्षांत येईल. आठव्या हेन्रीला युरोपांत चालू असलेली धर्मक्रान्ति प्रथमतः मान्य नव्हती; परंतु ज्यावेळीं त्याच्या स्वार्थाला धक्का बसूं लागला त्यावेळीं त्यानें धर्मक्रांतीसंबंधाचें आपलें धोरण पालटून टाकलें! त्यानें धर्मक्रांति घडवून आणली असली तरी तो स्वतः मरेपर्यंत कॅथॉलिक पंथीयच राहिला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यावरून धर्मक्रांति घडवून आणण्यांत इंग्लंडमधील पोपचें वर्चस्व झुगारून देण्याचाच त्याचा विचार होता हें उघड आहे. धर्मांतील दोष त्याला दिसत होते, तरीही ते काढून टाकावेत व धर्माची आमूलाग्र सुधारणा करावी असा त्याचा मनोदय नव्हता. हेन्रीनंतर झालेल्या ट्यूडर राजांनीं मात्र या चळवळीला धार्मिक वळण दिलें. मेरीला धर्मक्रांति मान्य नव्हती तर एलिझाबेथला धर्मांतील दोष काढून टाकून धर्माची सुधारणा घडवून आणावयाची होती. यामुळें पुढें पुढें इंग्लंडमधील धर्मक्रांतीचें राजकीय स्वरूप धार्मिक चळवळींत मिसळूं लागलें व ती चळवळ संमिश्र स्वरूपाची झाली. याच्या उलट युरोपीय धर्मक्रांतीची चळवळ होती. प्रथमतः ती केवळ धार्मिक स्वरूपाची असून धर्मांतील दोष काढून टाकून त्याची आमूलाग्र सुधारणा करण्याचा धर्मसुधारकांचा विचार होता. परंतु पुढें पुढें हें धोरण मागें पडूं लागलें. निरनिराळ्या राष्ट्रांतील लोकांनीं प्रॉटेस्टंट पंथ स्वीकारून कॅथॉलिक पंथीयांचा छळ करण्यास सुरुवात केली. यामुळें युरोपांत धर्माच्या सबबीवर राष्ट्राराष्ट्रांत उघड उघड दोन तट पडूं लागले व त्याचें पर्यवसान युद्धांतही होऊं लागलें. यावरून युरोपांतील धर्मक्रान्ति प्रथमतः धार्मिक स्वरूपाची असून पुढें पुढें तिला राजकीय स्वरूप प्राप्त झालें असें म्हणावें लागतें.

अभ्यास

१. इंग्लंडमध्यें धर्मसुधारणा घडवून आणण्यांत खालील लोकांनीं कोणते प्रयत्न केले ? विक्लिफ, टॉमस मूर, ल्यूथर, क्रॅन्मर, कॅथराईन.

२. धर्मक्रान्ति होण्यापूर्वी इंग्लंडमधील धर्मगुरूंची स्थिति कशी होती तें वर्णा. त्याचा परिणाम काय झाला ?

३. धर्मसुधारणावादी पार्लमेंटनें क्रांतिकारक असे कोणते कायदे पास केले ? ही पार्लमेंट राजाच्या अंकित होती का ? कशावरून ?

४. धर्मक्रांतीमुळें पोपची सत्ता कमी होऊन राजाची सत्ता वाढली हें एका आलेखाच्या साहाय्यानें दाखवा.

५. धर्मक्रांति घडवून आणण्यांत हेन्रीचा खरा हेतु कोणता होता ? तो साध्य झाला असल्यास त्याला तुम्ही काय म्हणाल ? कां ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. इंग्लिश व युरोपियन धर्मक्रांतींतील फरक सांगा.
७. 'आठवा हेन्री अत्यंत स्वार्थी होता' हें म्हणणें उदाहरणें देऊन सिद्ध करा.

उतारा

१. धार्मिक श्रेष्ठत्वाचा कायदा–इ. स. १५३४

ज्याअर्थीं इंग्लंडचे राजे हेच इंग्लंडच्या धर्मपीठाचे श्रेष्ठ अधिकारी होणें योग्य, न्याय्य व अत्यंत आवश्यक आहे, ज्या अर्थीं आपापल्या धर्मसभांतून धर्मगुरूंनींही वरील गोष्टीस मान्यता दिली आहे व ज्या अर्थीं आपल्या धर्मांतील सर्व चुका, त्यांतील दोष, त्यांतील घाण काढून टाकून पाखंडीपणा व धर्माज्ञेचा दुरुपयोग नष्ट करणें जरूर आहे व ख्रिस्तानें उपदेशिलेला धर्म निर्दोष करून त्याचें पावित्र्य रक्षिणें जरूर आहे; त्याअर्थीं आपल्या अधिकारांत ही पार्लमेंटसभा असा कायदा करते कीं आमचे राजे व या देशाचे अधिराज व त्यांचे वारस व पुढें होणारे इंग्लंडचे राजे हेच या जगांतील इंग्लंडच्या धर्मपीठाचे एकमेव श्रेष्ठ अधिकारी म्हणून ओळखिले जावेत, मानले जावेत व तशी त्यांची कीर्तीही व्हावी; त्याचप्रमाणें धर्मपीठाच्या मुख्य व सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्याला ज्या पदव्या, जो मान, जो श्रेष्ठपणा, जो मोठेपणा, जी सत्ता, जो हक्क, जो अधिकार, ज्या सवलती, जो फायदा व ज्या सुखसोयी मिळतात व उपभोगितां येतात, त्या सर्व त्यांना मिळतील व उपभोगितां येतील. एवढेंच नव्हे तर आपल्या धर्मांतील दोष, चुका, घाण व पाखंडीपणा काढून टाकण्याकरितां, व तो धर्म निर्दोष करून त्याचें पावित्र्य रक्षिण्याकरितां त्यांस वेळोवेळीं त्यांत सुधारणा करतां येईल, कायदे पास करतां येतील, जुन्या कायद्यांत दुरुस्त्या करतां येतील अगर ते रद्दही करतां येतील.

प्रश्न :—१. धार्मिक श्रेष्ठत्वाचा कायदा पास करण्याचें कारण काय ?
२. या कायद्यानें राजास कोणकोणते अधिकार मिळाले ? हे सर्व अधिकार पूर्वी कोण उपभोगीत होता ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३०. टॉमस क्रॉम्वेलचा उदय व धर्ममठांचा अस्त

१. टॉमस क्रॉम्वेल :—वूल्से व टॉमस मूर यानंतर हेन्रीचा मुख्य मंत्री टॉमस क्रॉम्वेल होय. त्याचा जन्म सन १४८५ सालीं एका गरीब कुळांत झाला. त्याच्या बापाचा धंदा लोहाराचा होता. लहानपणीं दुर्वर्तनाबद्दल त्याला इंग्लंडमधून हांकलून देण्यांत आलें होतें. त्यावेळीं तो इटली व नेदरलंड या देशांत कधीं सैनिक, तर कधीं व्यापारी म्हणून एकसारखा भटकला. त्याच्या व्यापारानें त्याला हात दिल्यानें त्याचें उखळ चांगलेंच पांढरें झालें होतें. त्यानंतर तो इंग्लंडमध्यें परत आला व वकिली करूं लागला. त्यांतही त्यानें उत्तम नांव मिळविलें. अखेर वूल्सेनें त्याला आपली चिटणिसी दिली. वूल्सेनें जे धर्ममठ जप्त केले त्या प्रकरणीं क्रॉम्वेलनें त्याला चांगलीच मदत केली. वूल्सेनंतर क्रॉम्वेलनें मोठ्या अक्कलहुषारीनें वागून अनेकांकडून वाहवा मिळविली; इतकी कीं, त्यामुळें तो हेन्रीच्याही मनांत भरला. त्यामुळें त्याला राजाश्रय मिळून मूरच्या नंतर रिकामी झालेली मुख्य मंत्र्याची जागा हेन्रीनें त्यालाच दिली. हेन्रीला पाहिजे होता तसाच क्रॉम्वेल होता. त्याची देहयष्टी बळकट असून त्याला दूरदृष्टीही चांगली होती. यश मिळविण्याकरितां तो वाटेल त्या भल्या-बुऱ्या मार्गांचा अवलंब करण्यास कधींही डरत नसे. राजसत्ता अनियंत्रित करणें हा त्याच्या सर्व धोरणाचा मुख्य उद्देश होता; व म्हणूनच आपल्या अनियंत्रित धन्याची लहर सांभाळून त्याचें हरएक काम बिनबोभाट करण्या-कडेच त्यानें आपली सर्व अक्कल व हुषारी खर्च केली. 'एक घाव कीं दोन तुकडे' हें त्याच्या एकंदर कामाचें धोरण होतें व हें त्याचें धोरण हेन्रीनें पूर्णपणें ओळखून धर्ममठांच्या विध्वंसाचे कामीं त्याचा पुरेपूर फायदा करून घेतला.

टॉमस क्रॉम्वेल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. धर्ममठांची सद्यःस्थिति :—सन १५३४ मध्यें धार्मिक श्रेष्ठत्वाचा कायदा पास केल्यानंतर हेन्रीची दृष्टि इंग्लंडमधील धर्ममठांकडे वळली. त्यावेळीं अनेक धर्ममठ इंग्लंडमध्यें होते. एके काळीं या धर्ममठांनीं अनेक विपद्ग्रस्तांना व धार्मिकांना आधार व आश्रय दिला होता. धर्ममठ म्हणजे धार्मिक शिक्षणाच्या शाळाच होत्या. त्यांच्याकडून धर्मप्रसाराचें कामही अत्यंत उत्तमप्रकारें होत असे. त्यांमध्यें राहणाऱ्या अनेक विद्वानांनीं चांगले चांगले ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले होते. त्यांच्यातर्फें अनेक शाळा उत्तम चालल्या होत्या; व त्यांत मुलांना शिक्षण मिळत असे. भिकाऱ्यांना भिक्षा मिळे, आजाऱ्यांची शुश्रूषा होई व अतिथिसत्कार उत्तम प्रकारें होत असे. अनेक दात्यांनीं धर्ममठांना पैसा दिला होता; व जमिनी लावून दिल्या होत्या. त्यामुळें धर्ममठांची स्थावर व जंगम मालमत्ता वाढली होती. अनेक धर्मगुरू मोठमोठ्या जमिनींचे श्रीमंत जमिनदार झाले होते. त्यांच्या चर्चमधूनही सोन्याचीं भांडीं, रुप्याचीं ताटें व रत्नखचित वस्तु यांचा संभार इतका वाढला होता कीं साध्या सरदारालाही त्यांचा हेवा वाटावा !

परंतु अलीकडे धर्ममठांची सद्दी संपुष्टांत येऊं लागली होती. या वेळीं इंग्लंडमध्यें अनेक लहान मोठ्या शाळा स्थापन झाल्यानें धर्ममठांतून मिळणाऱ्या शिक्षणाची मातब्बरी लोकांस वाटेनाशी झाली होती. छापलेलीं पुस्तकें स्वस्त मिळूं लागल्यानें धर्ममठांतर्फें प्रसिद्ध होणाऱ्या हस्तलिखित पुस्तकांवर पूर्वीप्रमाणें लोकांच्या उड्या पडेनाशा झाल्या. देशांत अनेक ठिकाणीं प्रवाशांची सोय झाल्यानें धर्ममठांच्या सोयींकडे कोणी ढुंकूनही पाहिनासा झाला. शिवाय त्या वेळीं एक प्रकारची धर्मप्रसाराची लाट उसळल्यासारखी झाल्यानें धर्ममठांत राहून कर्मठ आयुष्य, एकलकोंडेपणें कंठण्यास कोणी तयार होईना. धर्मावरील लोकांची श्रद्धा कायमची उडाली होती असें नव्हे; पण कोठेंही राहून शुद्धाचरणानें राहतां येतें ही लोकांची कल्पना बळावत चालली होती. या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला कीं, धर्ममठांकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलल्यामुळें ते ओस पडूं लागले होते. यामुळें धर्ममठांनीं एके काळीं उत्तम काम केलें असलें तरी लोकदृष्ट्या त्यांची किंमत कमी होऊन लोकमत त्यांच्या विरुद्ध झालें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मगुरूंची पूर्वींची धार्मिक वृत्ति व त्यांची विद्वत्ता नाहींशी झाली होती. तशांतच या धर्ममठांतील धर्मगुरूंचें आचरणही शुद्ध नसे. अनाचार व नीतिबाह्य वर्तन ह्यांना मठांतून नुसता ऊत आला होता. ! त्यामुळें धर्म-गुरूवरील लोकांचा विश्वासही ढळूं लागला होता. तशांतच या धर्मगुरूंचा ओढा पोपकडे असल्यानें धार्मिक श्रेष्ठत्त्वाच्या कायद्याप्रमाणें या धर्ममठां-तील धर्मगुरू पोपचें वर्चस्व मान्य करतात कीं इंग्लंडच्या राजाचें धार्मिक वर्चस्व मान्य करतात हा प्रश्नच होता. त्यांनीं पोपचें वर्चस्व मान्य केल्यास इंग्लंडमध्यें पोपच्या अनुयायांचा सुळसुळाट माजणार व पोपची सत्ता झुगारून देऊन हेन्रीनें जें कार्य आरंभिलें होतें त्याचा बोजवारा उडणार ! यामुळेंच हेन्रीचें लक्ष या धर्ममठांकडे वळलें; व ते जप्त करून पोपच्या सत्तेचीं इंग्लंडमधील अनेक केन्द्रें उध्वस्त करावीं असें हेन्री व क्रॉम्वेल यांनीं ठरविलें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे धर्ममठांचीं पूर्वींचीं उदात्त तत्त्वें सुटलीं, त्यांस त्राता न राहिल्यानें ते निर्बळ झाले व हेन्री-सारख्या धूर्त व स्वार्थी राजानें त्यांच्या संपत्तीवर डोळा ठेवून त्यांचा विध्वंस केला.

३. धर्ममठांची चौकशी व त्यांचा विध्वंस :—धर्ममठांच्या विध्वंसाचें काम हेन्रीनें क्रॉम्वेलकडे सोंपविलें. तो धार्मिक प्रवृत्तीचा नव्हता. धर्ममठ नाहींसे करून त्यांची अपार संपत्ति सरकारी खजिन्यांत भरावयाची असें हेन्रीप्रमाणेंच क्रॉम्वेलनेंही ठरविलें होतें; पण तसें करण्यास कारण काय दाखवावयाचें ? परंतु त्याला योग्य कारण हुडकीत बसण्याचें कारणच पडलें नाहीं. धर्ममठ पोपची सत्ता मान्य करतात हें एकच कारण पुरेसें होतें; व त्याकरितां कांहीं लहान लहान मठ त्यानें वूल्सेच्या मदतीनें नाहीं-सेही केले होते. परंतु मोठ्या मठांची काय वाट ? ते पोपची सत्ता झुगारून देऊन राजाची सत्ता मान्य करणार नाहींत कशावरून ? अशा परिस्थितींत क्रॉम्वेलनें एक नवीनच तोड काढली. त्यानें खरें कारण पुढें न करतां सर्व मठांची चौकशी करण्याचें ठरविलें व निरनिराळ्या मठांची चौकशी करून अहवाल मागविले. चौकशी करणारानें कोणत्या प्रकारचा अहवाल सादर करावयाचा याचा कानमंत्रही प्रत्येकास देण्यास क्रॉम्वेल विसरला नाहीं !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालें! थोड्याच दिवसांत सर्व अहवाल आले कीं, "सर्व पाद्री अत्यंत आळशी असून देवधर्माकडे त्यांचें मुळींच लक्ष नाहीं. ते मंद बुद्धीचे असून त्यांच्याकडून कोणतेंही कार्य होत नाहीं. त्यांची राहणी मोठ्या डामडौलाची असून 'खाणें, पिणें व मजा मारणें' हाच त्यांचा नित्य व्यवसाय असल्यानें त्यांच्यामध्यें शोक व ऐषाराम यांची जास्त वाढ झालेली आहे. त्यांचें आचरणही शुद्ध नसून ते पापी व नीतिबाह्य वर्तनांत सदैव डुंबत आहेत. थोडक्यांत म्हणजे धर्ममठ म्हणजे स्वैराचार व नीतिभ्रष्ट आचरण यांचीं माहेरघरेंच होत." अशा तऱ्हेचे अनुकूल अहवाल आल्याबरोबर हेन्री व क्रॉम्वेल यांचें कार्य झालें! मठांच्या वैऱ्यांचाही विश्वास अशा अहवालांवर बसला नसता; परंतु राजा व प्रधान यांचा त्यांवर विश्वास बसला! त्यांनीं लगेच सन १५३६ मध्यें सुमारें ४०० लहान मठ जप्त करण्याचें व सन १५३९ मध्यें सुमारें १५० मोठे मठ जप्त करण्याचें पार्लमेंटमध्यें बिल मांडलें व तें पास करून घेऊन लहान-मोठ्या मठांची मालमत्ता जप्त केली व त्यांचा विध्वंस केला. जप्त केल्यावर मठांची संपत्ति शिक्षणप्रसारार्थ उपयोजिली जाईल असें हेन्री म्हणत असे. पण तसें घडलें नाहीं. कारण जप्त केलेल्या मठांची संपत्ति त्यानें आपल्या खजिन्यांत भरली व जमिनी आपल्या नांवें केल्या. संपत्तीपैकीं बराचसा पैसा हेन्रीच्या हस्तकांच्या व अधिकाऱ्यांच्याही खिशांत गेला; कांहीं जमिनी नव्या सरदारांमध्यें त्यानें वांटून दिल्या. अर्थात् मठांच्या जमिनी उजाड झाल्या, अनेक धर्मगुरू व जोगिणी उघड्या पडल्या व गरीब भिकाऱ्यांचे हाल कुत्रा खाईनासा झाला! धर्ममठ नाहींसे झाल्यानें हेन्रीचें वजन व सामर्थ्य वाढलें व तो अतिशय गबर झाला. त्यानें अगदीं थोडा पैसा नवीन शाळा-कॉलेजें स्थापण्यांत व कांहीं नवीन धर्ममठ स्थापण्यांत खर्च केला होता. तसेंच आरमाराची वाढ करण्याकरितां त्यानें नवीन गोद्या बांधल्या, नवीन जहाजें बांधलीं व समुद्रकिनाऱ्याचें संरक्षण करण्याकरितां ठिकठिकाणीं त्यानें बांधकाम सुरू केलें. तरीपण त्यानें अनेकांना नाखूषही केलें.

४. धर्मसंरक्षक जथा :—धर्मक्रांतीच्या एवढ्याच बाबतींत हेन्रीला लोकांचा कसून विरोध झाला. उत्तर इंग्लंडमध्यें धर्ममठांचे अनेक चाहते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहत असत; व त्यांना मठांबद्दल अत्यंत आपलेपणा वाटत असे. पुराण-मतवादी असल्यानें धर्ममठांचा विध्वंस झाला ही गोष्ट त्यांना पटली नाहीं; व त्यामुळें चिडून जाऊन त्यांनीं बंड उभारलें. त्यांच्या बंडाला यॉर्कशायर-मध्यें चांगलाच आश्रय मिळून तेथें बंडांत सुमारें तीस हजार लोक सामील झाले. सर्व लोक जमावानें लंडनला निघाले, व राजाची गांठ घेऊन त्याच्या-कडून खालील मागण्या मान्य करून घेण्याचें त्यांनीं ठरविलें:—(१) मठांचें पुनरुज्जीवन करणें. (२) पोपची सत्ता मान्य करणें. (३) मेरीचा वारसा मान्य करणें. (४) क्रॉम्वेलची चौकशी करून त्याला शिक्षा करणें. बंड-



धर्मसंरक्षक जथा

वाल्यांचा पुढारी रॉबर्ट आस्क होता. कॅथॉलिक धर्माच्या संरक्षणाकरितां आमचा जथा निघालेला आहे असें सांगून निरनिराळ्या पांच जखमांकित क्राइस्टचें चित्र ज्यावर आहे असा ध्वज आपल्या हातांत घेऊन सर्व बंडवाले एखाद्या यात्रेला निघतात त्याप्रमाणें चालूं लागले. या बंडाला 'धार्मिक यात्रा' असें त्यांनीं नांव दिलें. त्या बंडवाल्यांना तोंड देण्याकरितां हेन्रीनें नॉर्फोकच्या ड्यूकच्या नेतृत्वाखालीं बरेंच मोठें सैन्य पाठविलें. त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजाची गांठ घालून देण्याचें बंडवाल्यांस वचनही दिलें; पण तें पाळलें गेलें नाहीं व रॉबर्ट आस्क व त्याचे अनेक अनुयायी यांना फांशीं देण्यांत आलें (१५३७). या बंडानंतर निरनिराळ्या धर्मगुरूंचीं मनें वळवून व त्यांस अनेक प्रकारचीं वचनें देऊन क्रॉम्वेलनें १५० मोठे धर्ममठही नाहींसे केले (१५३९). या बंडाचा एक चांगला उपयोग झाला. उत्तर इंग्लंडांत अशीं बंडें वारंवार होतात असें पाहून त्या भागांत हेन्रीनें एक मंडळ स्थापून त्याच्याकडे तेथें शांतता स्थापण्याचें काम सोंपविलें. या मंडळाला ' उत्तरेकडील मंडळ ' असें म्हणतात. सुमारें एक शतकभर या मंडळानें उत्तम प्रकारें कामगिरी केली. हें मंडळ म्हणजे प्रिव्ही कौन्सिलची एक कमिटीच होय. त्याचा अध्यक्ष गव्हर्नरसारखाच मानला जाई. पुढें पुढें हें मंडळ जाचक होऊं लागल्यानें तें रद्द करण्यांत आलें (१६४१).

५. सहा कलमी कायदा (१५३९):— धर्ममठांचा विध्वंस केल्यानंतर हेन्री आणखीही कांहीं क्रांतिकारक गोष्टी करून प्रॉटेस्टंट धर्मपंथाचें पाऊल पुढें सरकवील असें अनेकांना वाटलें. त्याचा मुख्य मंत्री क्रॉम्वेल व कँटरबरीचा आर्चबिशप क्रॅन्मर यांचा ओढा प्रॉटेस्टंट पंथाकडेच होता. त्यामुळेंही प्रॉटेस्टंटपंथीय लोकांना आशा वाटत होती. परंतु हेन्रीचा ओढा प्रॉटेस्टंट पंथापेक्षांही रोमन कॅथॉलिक पंथाकडेच जास्त असल्यानें जुने आचार-विचार चांगले, असें त्याचें निश्चित मत होतें. शिवाय क्रांतिकारक धर्मसुधारणांची त्याला भीति वाटूं लागल्यामुळें असो किंवा अन्य करणाकरितां असो त्यानें पार्लमेंटकडून एक सहा कलमी कायदा पास करून घेतला व रोमन कॅथॉलिक पंथावरील आपला विश्वास प्रगट केला. या कायद्यानें खालील गोष्टी प्रत्येकानें मान्य केल्या पाहिजेत असें त्यानें फर्माविलें; व त्या कायद्याची त्यानें जारीनें अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. त्यांतील कांहीं महत्त्वाच्या गोष्टी अशा :—(१) ट्रॅन्सबस्टॅन्सिएशनच्या अथवा द्रव्यांतराच्या तत्त्वास मान्यता देणें. येशू खिस्ताच्या पुण्यतिथीच्या भोजनप्रसंगीं जी भाकरी व दारू वांटण्यांत येते तिचें क्रिस्ताचें मांस व रक्त यांत रूपांतर होतें ही कल्पना वरील तत्त्वाच्या बुडाशीं होती. (२) धर्मगुरूंनीं लग्न न करतां संन्यस्त वृत्तीनें राहिलें पाहिजे. (३) मृत्यूपूर्वी पाद्र्याजवळ प्रत्येकानें आपल्या पापाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कबुलीजबाब देऊन मोक्षप्राप्ति करून घेणें. (४) मृतात्म्यास चांगली गति मिळावी म्हणून कोणींही खासगी प्रार्थना करावी. या कायद्यानें – कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट – दोघेही असंतुष्ट झाले. प्रॉटेस्टंट पंथाच्या लोकांना या सर्व गोष्टी पसंत नव्हत्या व हेन्रीनें प्रतिगामी धोरण स्वीकारल्यामुळें ते त्याच्यावर रुष्ट झाले. वूर्स्टरचा बिशप लॅटिमर यानें आपल्या जागेचा मोठ्या धैर्यानें राजीनामा दिला; परंतु त्याची योग्यता हेन्री जाणून असल्यामुळें त्यानें त्याच्या केसासही धक्का लावला नाहीं. कँटरबरीचा आर्चबिशप क्रॅन्मर यानें लग्न केलें होतें. त्यानें आपली बायको जर्मनीला गुप्तपणें पाठवून दिली. या कायद्याचें उल्लंघन करणारांस त्यानें जबर शिक्षा ठोठावल्या. परंतु प्रॉटेस्टंटांना खूष करण्याकरितां हेन्रीनें आणखी एक गोष्ट केली. आर्चबिशप क्रॅन्मर याच्या सहाय्यानें क्रॉम्वेलनें बायबलचें इंग्रजी भाषांतर करवून घेतलें होतें. हेन्रीच्या संमतीनें तें छापून क्रॉम्वेलनें प्रसिद्ध केलें व त्याचा प्रसार इंग्लंड-भर करण्यास राजानें परवानगी दिली. प्रार्थनेच्या वेळीं इंग्लिश बायबलच वापरावें व धर्ममंदिरांतून इंग्रजींतूनच प्रार्थना करण्यांत यावी असाही त्यानें हुकूम सोडला (१५४०).

६. हेन्रीचीं लग्नें व क्रॉम्वेलचा शेवट:—आपल्या अमदानीच्या शेवटीं शेवटीं हेन्री अत्यंत जुलमी झाला; व तो स्वतःच्या इच्छेप्रमाणें वाटेल तसा वागूं लागला होता. ॲन बुलीनशीं त्याचें लग्न १५३५ सालीं झालें व एलिझाबेथ नांवाची एक मुलगीही तिला झाली होती. परंतु तिला मुलगा झाला नाहीं म्हणून ती त्याच्या मनांतून उतरली! तिची दरबारी लोकांशीं वागणूक चांगली नाहीं असें त्याला वाटलें व शेवटीं अत्यंत चिडून जाऊन त्यानें तिच्यावर नीतिबाह्य वर्तनाचा आरोप लादला व तिचा शिरच्छेद करविला (१५३६). लगेच दुसऱ्या दिवशीं त्यानें जेन सेमूरशीं लग्न केलें. तिनें सन १५३७ मध्यें एका मुलाला जन्म दिला. त्याचें नांव एडवर्ड. त्यामुळें हेन्रीला आनंद झाला. पण मुलाच्या जन्मानंतर जेन लवकरच मरण पावली व हेन्री पुन्हां विधुर झाला. या वेळीं आपलें वजन कमी होत आहे असें वाटल्यावरून व हेन्रीला खूष करण्याच्या हेतूनें क्रॉम्वेलनें त्याच्या लग्नाचा घाट घातला. क्रॉम्वेलचा ओढा प्रॉटेस्टंट पंथाकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्यानें इंग्लंडमध्यें त्या पंथाचा प्रसार व्हावा अशी त्याची इच्छा होती. तेव्हां एखाद्या जर्मन राजकन्येशीं हेन्रीचा विवाह लावल्यानें इंग्लंडमध्यें प्रॉटेस्टंट पंथाचा प्रसार करण्यास जर्मन राजपुत्रांची मदत होईल व इंग्लंडला युरोपांत एखादा मित्र लाभेल अशा दुहेरी हेतूनें जर्मनींतील क्लीव्हच्या ड्यूकची बहीण, ॲन, हिच्याबरोबर हेन्रीनें लग्न करावें असें त्यानें सुचविलें. हेन्रीसही ही गोष्ट पसंत पडून त्यानें ॲनबरोबर लग्नही केलें (१५४०). परंतु लग्नानंतर ॲन अत्यंत साधी, भोळसर व अडाणी असल्याचें त्याच्या निदर्शनास आलें; व एकदम ती त्याच्या मनांतून उतरली! शिवाय क्रॉम्वेलच्या म्हणण्याप्रमाणें उत्तर जर्मनींतील राजपुत्र हेन्रीबरोबर मित्रत्वाचा तह करण्यास आपली तयारीही दाखवीनात. तेव्हां हेन्री वरील दोन्ही कारणांकरितां क्रॉम्वेलवर भयंकर रागावला. प्रथमतः त्यानें ॲनशीं घटस्फोट केला. व या लग्नाच्या बाबतींत आपल्याला क्रॉम्वेलनें फसविल्याबद्दल त्यानें त्याला कैद केलें व त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून पार्लमेंटच्या संमतीनें त्याला फांशीं दिलें (१५४०). लगेच त्यानें कॅथराइन हॉवर्ड या स्त्रीशीं लग्न केलें. ती जुन्या सरदार घराण्यांतील असल्यानें जुने सरदार आपल्यावर खूष होतील असें त्याला वाटलें. परंतु थोड्याच दिवसांत, लग्नापूर्वी कॅथराइनची वागणूक वाईट असून ती बदचालीची होती. असें त्याला आढळल्यावरून त्यानें तिचाही शिरच्छेद करविला (१५४३). शेवटीं हेन्रीनें कॅथराइन पार या स्त्रीशीं लग्न केलें (१५४३). ती चतुर असल्यानें तिनें आपल्या नवऱ्याची मर्जी सुप्रसन्न राखिली. ती मात्र हेन्रीच्या मागें बरेच दिवस जगली.

अ भ्या स

१. धर्ममठ ही संस्था उपयोगी होती का? कशावरून?
२. धर्ममठांची जप्ती करण्याचें कारण काय? हेन्रीनें त्यांच्या संपत्तीचा विनियोग कसा केला? धर्ममठांच्या विध्वंसाचा परिणाम काय झाला?
३. टॉमस क्रॉम्वेलचें थोडक्यांत चरित्र द्या.
४. खालील गोष्टींसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.
धर्मसंरक्षक जथा, धर्मसंरक्षक हेन्री, उत्तरेकडील मंडळ, क्लीव्हची ॲन, सहा कलमी कायदा, आठव्या हेन्रीचीं धार्मिक मतें.
५. आठवा हेन्री स्वार्थी व निर्दय होता असें म्हणतात. कारणें देऊन सिद्ध करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३१. हेन्रीचा अनियंत्रित कारभार व शेवट.

१. स्कॉटलंडशीं व फ्रान्सशीं युद्ध :—धर्मसुधारणेच्या बाबतींत हेन्री गुंतला असतां युरोपियन राष्ट्रांकडे लक्ष देण्यास त्याला फारसा वेळ मिळाला नाहीं. स्कॉटलंडचा राजा अल्पवयी असल्यामुळें त्या देशाशीं युद्धप्रसंग उत्पन्न होतील अशीही आशा नव्हती. त्यांतूनही त्याची बहीण मार्गारेट हिच्या हातीं जोंपर्यंत सर्व राज्यकारभार होता, तोंपर्यंत युद्ध निर्माण झालें नाहीं. परंतु पांचवा जेम्स जेव्हां मोठा झाला व तो स्वतः राज्यकारभार पाहूं लागला तेव्हां त्यानें फ्रान्सबरोबर सलोख्याचें धोरण स्वीकारून व पोपशींही मैत्री जोडून हेन्रीला—आपल्या मामाला—त्रास देण्याचें धोरण स्वीकारलें. त्याच्या या धोरणानें जेम्सचे सरदार असंतुष्ट झाले व त्या बाबतींत जेम्सला मदत न करण्याचें त्यांनीं ठरविलें. सन १५४२ मध्यें इंग्लंड व स्कॉटलंड यांमध्यें सॉल्वेमॉस येथें लढाई झाली व त्यांत स्कॉटलंडचा पूर्ण पराभव झाला. पराभवाच्या हबक्यानें, अगोदरच अशक्त असलेला, पांचवा जेम्स लौकरच मेला. त्या वेळीं त्याची एक आठवड्याची लहान मुलगी मेरी (पुढें स्कॉटलंडची राणी मेरी या नांवानें प्रसिद्धीस आलेली) राज्यावर बसली. आपला मुलगा एडवर्ड याचें मेरीशीं लग्न लावून द्यावें अशी हेन्रीची फार फार इच्छा होती. स्कॉटलंडमधील बऱ्याच इंग्रज उमरावांनीं या योजनेला संमतिही दिली होती (१५४३). परंतु स्कॉटिश सरदारांचा ओढा फ्रान्सकडे असल्यानें त्यांनीं आपली संमति दिली नाहीं. तेव्हां हेन्रीनें फ्रान्स व स्कॉटलंड या दोन्ही देशांशीं युद्ध पुकारलें. फ्रान्सविरुद्ध जर्मन बादशाह पांचवा चार्ल्स यालाही हेन्रीनें आपल्या बाजूला वळवून घेतलें व दोघांनीं मिळून फ्रान्सवर हल्ला करण्याचें ठरविलें. हेन्री स्वतः समरभूमीवर उतरला व त्यानें बोलोन बंदर हस्तगत केलें (१५४४). परंतु या वेळीं चार्ल्सनें त्याला सोडल्यामुळें हेन्रीला स्कॉटलंड व फ्रान्स या दोन्ही देशांशीं एकटेंच लढावें लागलें. तेव्हां फ्रेंचांना जोर आला. त्यांनीं आपलें आरमार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सज्ज करून इंग्लंडवर जोराचा हल्ला करण्याचें ठरविलें. परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं. त्यानंतर तह झाला. मात्र बोलोन शहर इंग्लंडकडेच राहिलें.

२. नाण्यांत भेसळ :—या युद्धांमुळें हेन्रीचा खजिना रिता पडला. धर्ममठ जप्त करून मिळविलेला पैसा त्यानें अगोदरच खर्च करून टाकला होता. तेव्हां जास्त पैसा मिळविण्याच्या हेतूनें त्यानें नाण्यांत भेसळ करण्याचें ठरविलें. पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें दर बारा औंसामागें सुमारें एक औंस तांबें नाण्यांत मिसळीत असत. असें केल्यानें नाण्यांची किंमत कधींही उतरत नसे. त्यामुळें राष्ट्राची पत वाढून इतर राष्ट्रांशीं होणारा व्यापारही वाढे. परंतु या गोष्टीकडे हेन्रीनें दुर्लक्ष करून सन १५४३ मध्यें नवीन नाणीं पाडून त्यांत दर बारा औंस रुप्यामागें

b. HENRY VIII. York Groat bearing Wolsey's initials and Cardinal's Hat.
a. HENRY VIII. Tournay Groat, 1513.
c. HENRY VIII Gold George noble, c. 1526.

आठव्या हेन्रीचीं नाणीं

त्यानें दोन औंस तांबें मिसळलें. पुढें १५४६ मध्यें त्यानें दर बारा औंस रुप्यामागें आठ औंस तांबें मिसळलें. त्यामुळें हेन्रीचा फायदा झाला. परंतु व्यापार बुडाला! कारण नाण्यांची खरी किंमतच व्यापाऱ्यांना कळेनाशी झाली, अन्न महाग झालें, गरिबांस अन्न मिळेनासें झालें, भिकार वाढले व चोऱ्या–मारामाऱ्याही होऊं लागल्या.

३. हेन्री व वेल्स आणि **आयर्लंड** :—हेन्रीनें ब्रिटिश बेटांचें एकीकरण करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला व त्यांत त्याला बरेंच यश मिळालें. सन १५३६ मध्यें हेन्रीनें वेल्सचे निरनिराळे तेरा कौंटी करून ते इंग्लंडमध्यें सामील करून घेतले; त्याचप्रमाणें त्यांच्यातर्फे सतरा सभासद ब्रिटिश पार्लमेंटमध्यें बसूं लागले व इंग्लंडांतील कायद्यांचा अंमल वेल्समध्यें होऊं लागला. सन १५४२ मध्यें ‘ आयर्लंडचा राजा ’ अशी त्यानें स्वतः पदवी घेतली. पूर्वीचे राजे आपल्याला ‘ आयर्लंडचा मालक ’ असें म्हणवून घेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



आठव्या हेन्रीचीं आरमारी जहाजें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परंतु या फरकानें विशेषसा फायदा झाला नाहीं. इंग्रजांबद्दल आयरिश लोकांना आपलेपणा कधींच वाटला नाहीं.

४. आरमाराची स्थापना :—सातव्या हेन्रीनें आरमाराला उत्तेजन दिलें, समुद्रपर्यटन करून नवीन प्रदेश शोधून काढण्यास मदत केली व व्यापारास उत्तेजन दिलें. तसेंच त्यानें लढाऊ जहाजें बांधून पोर्टस्मथ येथें एक मोठी गोदीही बांधिली. त्यानंतर आठव्या हेन्रीनें आरमाराचें महत्त्व ओळखून आरमारी जहाजांची वाढ केली व आपलें आरमार बलाढ्य करण्याकरितां त्यानें पुष्कळ पैसा खर्च केला. त्यानें 'ट्रिनिटी गृह' स्थापून तेथें उत्कृष्ठ नाविक तयार होतील अशी व्यवस्था केली. आरमारी अधि-



आठव्या हेन्रीचें मोठें जहाज

काऱ्यांची निवड करावी, उत्तम शिक्षण देऊन चांगले खलाशी तयार करावे व त्यांना नौकानयनाबद्दल उत्तेजन देऊन त्याबद्दल त्यांना बक्षिसें द्यावीं, दीपगृहें बांधून नौकानयनास मदत करावी वगैरे कामें या संस्थेनें करावीं असें ठरविण्यांत आलें. तसेंच नौकानयन शिकविण्याच्या शाळाही त्यानें सुरू केल्या व मच्छीमारीच्या धंद्यास उत्तेजन दिल्यानें उत्तम नावाडी तयार होतील असें वाटल्यावरून त्या धंद्यास त्यानें उचलून धरलें. नवीन जहाजें बांधण्याचें व जुनीं दुरुस्त करण्याचें काम करण्याकरितां त्यानें एक 'आरमार मंडळ' निर्माण केलें. आरमारामध्यें शिडाचीं जहाजें प्रथमतः हेन्रीनेंच सुरू केलीं; व त्यांच्या मदतीनेंच त्यानें १५४५ मध्यें फ्रेंच आरमाराचा पराभव केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

' गॅलियन ' नांवाच्या नव्या प्रकारच्या आरमारी जहाजाची बांधणी त्याच्याच काळांत प्रथम झाली. पोर्टस्मथच्या गोदीखेरीज वुलविच व डेपोर्ट येथें त्यानें आणखी गोद्या बांधवून घेतल्या व इतर अनेक दुरुस्त करून घेतल्या. समुद्रावरून येणाऱ्या हल्ल्यापासून इंग्लंडचें संरक्षण करण्याकरितां त्यानें किनाऱ्यावर ठिकठिकाणीं किल्ले बांधून इंग्लंडचा किनारा सुरक्षित केला. त्याच्या या सर्व कृत्यांमुळेंच त्याला ' ब्रिटिश आरमाराचा जनक ' अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. त्यानें अठ्ठावन नवीन जहाजें बांधून आपलें आरमार सामर्थ्यवान केलें. ब्रिस्टलच्या विल्यम हॉकिन्स या नांवाच्या गृहस्थास उत्तेजन देऊन त्यानें त्याला पश्चिम आफ्रिकेचा किनारा शोधण्यासही मदत केली.

४. हेन्रीचा अंतःकाळ व योग्यता :—शेवटीं शेवटीं हेन्रीची प्रकृति चांगलीच ढांसळली; व आतां आपण फार दिवस वांचणार नाहीं असेंही त्याला वाटूं लागलें. तेव्हां त्यानें आपल्या मागें आपल्या मुलांचा वारसा ठरवून दिला. प्रथमतः त्याचा मुलगा एडवर्ड, नंतर मेरी व शेवटीं एलिझाबेथ यांनीं क्रमानें राज्यावर बसावयाचें होतें. तो सन १५४७ मध्यें मरण पावला. त्यानें अनियंत्रितपणें राज्य हांकलें पण प्रत्येक वेळीं पार्लमेंट-कडून संमति मिळवून घेऊन आपल्या प्रत्येक अनियंत्रित कृत्यास त्यानें सनदशीरपणाच्या कोंदणांत बसविलें ! तो क्रूर, जुलमी व निर्दय असला तरीही लोकांचा लाडका राजा होता. राजसत्ता जोरकस केल्यामुळेंच त्यावेळीं राजकीय, सामाजिक व धार्मिक वादळांतून त्यानें आपल्या आवडत्या देशास निभावून नेलें. त्यानें लोकांकडून सक्तीचीं कर्जें घेतलीं, स्वतःच्या आशा व इच्छा अत्यंत हिंमतीनें व क्वचित् क्रौर्यानेंही त्यानें शेवटास नेल्या, स्वतःच्या इच्छेप्रमाणें त्यानें आपल्या प्रधानांना मोठ्या मानास चढविलें, त्यांना आपल्या दुर्दम इच्छेप्रमाणें राबवून घेतलें व त्यांना निर्दयपणें वागविलें. असें असलें तरी इंग्लंडचें हित साधण्याकडे व त्याच्या भावी उज्वल यशाकडे त्याची दृष्टि होती. तो स्वार्थी व आपलपोट्या असेल; पण हा स्वार्थ व आपलपोटेपणा राष्ट्राच्याही कारणीं लावून राष्ट्राचें पाऊल सर्व बाबतींत पुढें पडेल असेंच धोरण त्यानें आंखलें व तें पार पाडलें. त्याच्या जोरकस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारभारानेंच एलिझाबेथच्या कारकीर्दींत इंग्लंडची सर्वांगीण सुधारणा मोठ्या झपाट्यानें झाली. आठवा हेन्री मोठा रसिक व शोकीन होता; डामडौलाची त्याला आवड होती. विद्वत्तेची त्याला चाड असे. त्यामुळें कला व वाङ्मय यांची त्याच्या कारकीर्दींत वाढ होण्यास मदत झाली. ब्रिटिश आरमाराचा तो जनकच समजला जातो. या सर्व गोष्टींमुळें तो अद्वितीय राजा होऊन गेला असेंच मानतात.

५. आठवा हेन्री व पार्लमेंट :—आठवा हेन्री अनियंत्रित होता. राजानें पार्लमेंटच्या अंकित राहण्यापेक्षां पार्लमेंटनें राजाच्या अंकित राहावें हेंच तत्त्व त्याला एकंदरींत मान्य होतें, असें दिसतें. मनाला वाटेल तसा तो वागला. मन मानेल तसा त्यानें राज्यकारभारही चालविला. लोकांना पाहिजे असलेली सुराज्यव्यवस्था व शांतता निर्माण करून सरदार व धर्मगुरू यांना तर त्यानें नमविलेंच. धर्मसुधारणेसंबंधींचें धोरण ठरवून त्याला त्याचें पार्लमेंटची संमति मिळवून घेतली. मठजप्ती करण्याचें ठरवून पार्लमेंटकडून त्यानें तसा कायदा पास करविला. नाण्यांची भेसळ केली, तीही पार्लमेंटच्या संमतीनें. वारसा ठरविण्याचा हक्कही पार्लमेंटनें त्याला दिला. थोडक्यांत म्हणजे पार्लमेंटसभा राजाच्या इतकी अंकित होती कीं, राजा म्हणेल त्याला तिनें निमूटपणें मान तुकविली. परंतु या सर्व गोष्टींच्या बुडाशीं हेन्रीच्या अनेक कारवाई होत्या हें विसरतां येणार नाहीं. पहिलें म्हणजे नवीन सरदार निर्माण करून त्यानें उमरावमंडळ हस्तगत केलें. ज्या गांवांतून त्याचें विशेष वजन होतें त्यांना त्यानें प्रतिनिधित्वाचा हक्क दिला; व ज्या गांवांत त्याचें वजन नव्हतें तेथें अन्यप्रकारें वजन पाडून आपल्याला अनुकूल असेच सभासद तेथून निवडून येतील अशी व्यवस्था त्यानें केली. या दोन्ही गोष्टींमुळें कॉमन्स सभाही त्याच्या अंकित राहिली. त्यानें पुरस्कारिलेला प्रत्येक कायदा यामुळेंच पार्लमेंटकडून नेहमीं पास होत असे. खुद्द कॉमन्स सभेचा अध्यक्षही त्याचा हस्तक असल्यानें त्याचें काम अदमासाबाहेर यशस्वी होत असे. यामुळेंच पार्लमेंटला न विचारतांही तो जाहीरनामें व वटहुकूम काढून पुढें त्याला तो पार्लमेंटची संमति घेई. एवढेंच नव्हे तर राजाचे जाहीरनामे व वटहुकूम लोकांनीं मोडले तर त्यांना शिक्षा करण्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितां राजानें मंडळ नेमलें त्यालाही पार्लमेंटनें मान्यता दिली होती. या सर्व गोष्टींवरून आठव्या हेन्रीच्या वेळीं पार्लमेंट नुसती बेगडी सभा होती हेंच सिद्ध होतें.

अभ्यास

१. आठवा हेन्री ब्रिटिश आरमाराचा जनक समजला जातो. कां ?

२. आठवा हेन्री व पार्लमेंट यांचे संबंध कसे होते ? तो अनियंत्रित होता का ? कशावरून ?

३. त्याची योग्यता सांगा. राष्ट्राची त्यानें सेवा उत्तम प्रकारें केली असें तुम्हांस वाटतें ? कां ? त्यानें स्कॉटलंडशीं युद्ध कां केलें ?

४. त्याच्या कारकीर्दींतील मुख्य व महत्त्वाच्या गोष्टी कालक्रमानें सांगा.

५. त्याच्यासारखा अनियंत्रित पण देशहित साधणारा दुसरा राजा कोण ? कशावरून ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—इ. स. १४८५–१५४७.

वर्ष	इंग्लंड—महत्त्वाच्या गोष्टी	यूरोप—महत्त्वाच्या गोष्टी	हिंदुस्थान—महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ती
१४८५	बॉसवर्थची लढाई–सातवा हेन्री			कोलंबस
	१४८७ स्टार चेंबर कोर्ट		१४८८–१५१७ शिकंदर लोदी	लँबर्ट सिमनेल
	१४९२ पर्किन वॉरबेक	१४९२ कोलंबसाचा शोध		
	१४९४ पॉयनिंगचा कायदा	१४९५ फ्रान्स विरुद्ध संघ	१४९३ बहामनी राज्याचे सुभेदार स्वतंत्र	एमसन, डडले
	१४९६ कॅबटचा शोध			
		१४९८ वास्को-ड-गामाचा शोध		कॅबट, वास्को-ड-गामा
१५०५				
	१५०९ सातव्या हेन्रीचा मृत्यु; व आठवा हेन्री राजा होतो.			कॉलेट, वूल्से
	१५१३ टापांची लढाई			
	१५१३ फ्लॉडनची लढाई			इरॅस्मस
		१५१६ स्पेनचा फर्डिनंड–मृत्यु.	१५१७–१५२६ इब्राहिम लोदी	ल्यूथर
		१५१९ मॅक्झीमीलियनचा मृत्यु;		
	१५२० सुवर्णवस्त्र भूमी	पांचवा चार्ल्स बादशाह		
१५२५		१५२५ पेव्हियाची लढाई	१५२६ पानिपतची पहिली लढाई	बाबर
	१५२९ – ३६ धर्म-सुधारणा			एकनाथ
			१५३० बाबराचा मृ.	क्रॅन्मर, क्रॉम्वेल
	१५३० वूल्सेचा मृत्यु.		१५३०–४० हुमायून	टिंडेल
	१५३६ धर्ममठ जप्ती			
	१५३९ सहा कलमी कायदा	१५४० जेसुइटपंथ स्थापना	१५४०–४५ शेरशहा	
		१५४५ ट्रेन्टची सभा		शेरशहा
१५४७	आठव्या हेन्रीचा मृत्यु			

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३२. धर्मसुधारणेचा विकास

१. हेन्रीची वारशासंबंधीं व्यवस्था :—आठव्या हेन्रीला आपला वारसा ठरविण्याचा अधिकार पार्लमेंटनें दिला व त्याप्रमाणें मृत्युपत्रानें हेन्रीनें आपला वारसा खालील प्रमाणें ठरविला होता. आपला एकुलता एक मुलगा एडवर्ड याला आपल्यामागें राज्यपद मिळावें. तो निपुत्रिक वारल्यास आपली मुलगी मेरी हिनें राज्यपद स्वीकारावें; तीही निपुत्रिक वारल्यास आपली दुसरी मुलगी एलिझाबेथ हिनें राज्य घ्यावें. या योजनेस अनुसरून आठव्या हेन्रीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा एडवर्ड हा गादीवर आला. त्या वेळीं त्याचें वय अवघें दहा वर्षांचें होतें. राजा अल्पवयी असल्यानें दूरदर्शी हेन्रीनें त्याला राज्यकारभारांत मदत करण्याकरितां एक राजपालक मंडळही नेमलें होतें. या मंडळाकडून कारभार चोख व निःपक्षपाती व्हावा म्हणून त्या मंडळांत त्यानें कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट या दोन्ही पंथांतील निम्मे–निम्मे लोक नेमिले होते. असें करण्यांत त्याचा एक मुख्य हेतु होता व तो म्हणजे धार्मिक व राजकीय बाबतींत आपण जें धोरण स्वीकारलें, तें एडवर्ड वयांत येऊन स्वतःच्या बुद्धीनें राज्यकारभार करूं लागेपर्यंत कायम राहावें व त्यांत कोणासही फारसा बदल करतां येऊं नये. पालकमंडळांत जुन्या उमरावमंडळांतील सरदार न नेमण्याची त्यानें काळजी घेतलेली होती. तरीही जे नवीन लोक होते त्यांत कांहीं सुधारणावादी तर कांहीं पुराणमतवादी होते व त्यांत सुधारणावाद्यांचा जय झाला. त्यांनीं पालकमंडळांत आपल्याला अनुकूल असें मताधिक्य मिळवून घेतलें व आपला पुढारी व राजाचा मामा हर्टफर्डचा अर्ल याला सॉमरसेटचा ड्यूक असा बहुमानाचा हुद्दा देऊन

सहावा एडवर्ड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला सर्वसत्ताधारी व संरक्षक नेमलें. या कृत्यानें हेन्रीनें केलेली सर्व व्यवस्था फुकट गेली!

२. सॉमरसेट :—आठव्या हेन्रीची राणी जेन सेमूर हिचा सॉमरसेट हा भाऊ होय. तो विद्वान् व चांगला कसलेला सैनिक होता. त्याचा ओढा धर्मसुधारणेकडे होता. अर्थात् आठवा हेन्री मेल्यानें धर्मसुधारणेचें रान त्याला मोकळें झालें. त्याची वागणूक मोठी डौलदार व मन उदार असल्यानें तो लोकांना आवडे. तो गरिबांचा कनवाळू व निःस्वार्थी असल्यानें लौकरच लोकप्रिय झाला. तो मोठा महत्त्वाकांक्षी होता. त्याचे हेतूही उच्च असत. मोठा धैर्यवान् असल्यानें न डगमगतां तो आपले हेतु तडीस नेण्याची पराकाष्ठा करीत असे. त्याचा हेकेखोरपणा व दुबळें मन यांनीं त्याच्या उच्च हेतूंचा नाश केला. शिवाय त्याची अव्यवहार्यता व योजकतेचा अभाव यांमुळें ज्यांत हात घाली त्यांत तो अयशस्वी होई. आठव्या हेन्रीच्या कारकीर्दींत धर्मसुधारणेचें काम मागें पडलें होतें. तें पुरें करून धर्मसुधारणा पूर्णत्वास नेणें व परराष्ट्रीय बाबतींत हेन्रीच्या धोरणाचा स्वीकार करून इंग्लंडला परराष्ट्रीय राजकारणांत मानाचें स्थान मिळवून देणें असे त्याचे दोन मुख्य हेतु होते. परंतु वर सांगितलेल्या दुर्गुणांमुळें आंगीं कर्तबगारी असूनही त्याच्या हातून व्हावी तशी कामगिरी झाली नाहीं व त्याचा पाडाव झाला. त्याचा उतावळा स्वभाव व कामाची धरसोड यांमुळेंही त्याचें अतोनात नुकसान झालें.

३. धर्मसुधारणा :—सॉमरसेटचा ओढा प्रॉटेस्टंट पंथाकडे असल्यानें व धर्मसुधारणा पूर्णत्वास नेण्याचा त्यानें चंग बांधल्यानें त्यानें या बाबतींत पालकमंडळाच्या मदतीनें अनेक गोष्टी केल्या. मात्र या कामीं त्याचा उतावळा स्वभाव त्याला भोंवला! प्रथमतः त्यानें हेन्रीच्या कारकीर्दींत पार्लमेंटनें पास केलेला सहा कलमी कायदा रद्द करवून घेतला. त्यानंतर पालकमंडळाच्या संमतीनें एक कमिशन नेमून त्याच्याकडून धर्मसुधारणेचीं अनेक कामें त्यानें करवून घेतलीं. या कमिशननें चर्चमधील साधुसंतांचीं चित्रें व मूर्ति नाहींशा करविल्या व धर्मप्रार्थना इंग्रजीमधून केली पाहिजे असें ठरविलें. कमिशनचें हें कृत्य अनेक धर्मभोळ्या लोकांना आवडलें नाहीं. धर्म-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंदिरांतील मूर्ति व चित्रें फार प्राचीन होतीं; व शिल्पकला आणि चित्रकला यांचे ते उत्कृष्ठ नमुने होते. शिवाय इतके दिवस लॅटिन भाषेंतून प्रार्थना म्हणत ती इंग्रजींतून म्हणावी लागल्यानें लोकांच्या भावना दुखविल्या गेल्या. तसेंच अधिकाऱ्यांनीं आपले हुकूम अत्यंत निष्ठुरपणें लोकांस पाळावयास लावले. त्यामुळें तर लोकांत जास्तच असंतोष माजला व ठिकठिकाणीं दंगेधोपे होऊं लागले. परंतु एवढ्यानें सॉमरसेटच्या धार्मिक सुधारणा थांबल्या नाहींत. त्यानें आणखी सुधारणा घडवून आणल्या. आदर्श तत्त्वांचा नवीन एक इंग्रजी ग्रंथ तयार करवून घेऊन व धर्मतत्त्वांचा तोच आधारभूत ग्रंथ मानून प्रत्येक पाद्र्यानें त्यावरूनच आपलीं प्रवचनें करावीं असें ठरविण्यांत आलें. धर्मगुरूंना लग्नें करण्याची परवानगी मिळाली. शिलकी धर्ममठ व इतर पवित्र स्थळें यांचा नाश करून त्यांची सर्व संपत्ति जप्त करण्यांत आली. या संपत्तीपैकीं बहुतेक सर्व सॉमरसेटचे मित्र व सल्लागार यांच्या खिशांतच जमा झाली; व सॉमरसेटनेंही तिच्यावर हात मारण्यास कांहीं कमी केलें नाहीं! कांहीं शाळा व कॉलेजें यांना थोडा पैसा मिळाला; एवढी एकच गोष्ट त्यानें चांगली केली.



प्रत्येक धर्ममंदिरांत ठेवलेलें बायबल

४. सहाव्या एडवर्डचें प्रार्थना-पुस्तक :—सॉमरसेटनें जी सर्वांत अत्यंत महत्त्वाची गोष्ट केली ती म्हणजे क्रॅन्मरच्या मदतीनें त्यानें इंग्रजी भाषेंत एक नवीन प्रार्थनापुस्तक तयार केलें व चर्चमधून प्रार्थनेच्या वेळीं तें पुस्तक सर्वांनीं वापरलें पाहिजे असा पार्लमेंटकडून कायदा पास करून घेतला. पूर्वी प्रार्थना पुस्तक लॅटिन भाषेंत असे; व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रार्थनाही लॅटिन भाषेमध्येंच केली जाई. त्यासंबंधीं पार्लमेंटनें जो कायदा केला त्याला 'एकरूपतेचा कायदा' असें म्हणतात (१५४९). प्रार्थनापुस्तक तयार करण्याचें काम कँटरबरीचा आर्चबिशप व आठव्या हेन्रीचा दोस्त क्रॅन्मर यानें केलें. उत्कृष्ठ भाषेचा नमुना म्हणून अजूनही हें पुस्तक मानलें जातें. या प्रार्थनापुस्तकांत कॅथॉलिकांचे कांहीं जुने विचार व प्रॉटेस्टंटांचे कांहीं नवीन विचार यांची उत्कृष्ठ सांगड क्रॅन्मरनें घातलेली होती. लॅटिन ऐवजीं लोकांच्या बोलीमध्यें प्रार्थनापुस्तक तयार झाल्यानें अनेकांना तो एक परमेश्वरी प्रसाद वाटला तर अनेकांनीं त्याचा निषेध केला; व त्यामुळें देशांत दंगेधोपे व बंडें माजलीं. त्यांपैकीं पश्चिम भागांत डेव्हन परगण्यांतील लोकांनीं केलेलें बंड प्रमुख होय.

५. डेव्हनशायरमधील बंड (१५४९):—इंग्रज लोक अत्यंत पुराणमतवादी असल्यानें त्यांस नवीन नवीन गोष्टी विशेष आवडत नसत; कारण 'जुनें तें सोनें' असें म्हणणाऱ्यांचाच इंग्लंडमध्यें भरणा फार! यामुळें डेव्हन व कॉर्नवाल या परगण्यांत ज्यावेळीं हें प्रार्थनापुस्तक प्रथमतः वाचण्यांत आलें त्यावेळीं तेथील लोकांनीं बंड पुकारलें व 'सहा कलमी कायदा पुन्हां पास करा,', लॅटिनमध्येंच प्रार्थना म्हणण्यास परवानगी द्या,' व 'आमच्या वाडवडिलांच्या धर्माप्रमाणेंच आम्हांला वागूं द्या.' असें ते म्हणूं लागले. अरुंडेल व पोमरॉय हे बंडवाल्यांचे पुढारी झाले. बंडवाल्यांनीं एक्झिटरवर हल्ला केला; तेव्हां लॉर्ड रसेल त्यांच्यावर चालून गेला. बरेच दिवस बंडवाल्यांनीं त्याला दाद दिली नाहीं; परंतु अखेर बंडवाल्यांचा पराभव झाला; व त्यांचे जवळ जवळ चार हजार लोक प्राणांस मुकले!

६. स्कॉटलंडशीं युद्ध:—धर्मसुधारणांमध्यें गुंतला असतांच सॉमरसेटला स्कॉटलंडबरोबर लढावें लागलें. आठव्या हेन्रीनें फ्रान्स व स्कॉटलंड यांच्याबरोबर आपल्या मृत्यूपूर्वी तह केले होते. सॉमरसेटला स्कॉटलंडबरोबर युद्ध करण्याची जरूरीही नव्हती; परंतु त्याला दोन कारणांकरितां स्कॉटलंडशीं युद्ध करावें लागलें. पहिलें कारण म्हणजे स्कॉटलंडची राणी मेरी लहान होती व त्या देशाचा राज्यकारभारही एका राजपालक मंडळाकडेच होता. या मंडळानें स्कॉटिश प्रॉटेस्टंटांचा छळ चालविला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता. तो सहन न झाल्यानें त्यांनीं इंग्लंडच्या मदतीची याचना केली. दुसरें असें कीं आठव्या हेन्रीनें एडवर्डचें लग्न स्कॉटलंडच्या मेरीबरोबर व्हावें म्हणून आपल्या हयातींत पुष्कळ खटपट केली होती. असें करण्यांत स्कॉटलंड व इंग्लंड यांचें एकीकरण होऊन पुन्हां युद्धाची कटकट नको असा त्याचा उद्देश होता. परंतु त्याचा उद्देश सफळ झाला नाहीं. तेव्हां आलेल्या संधीचा फायदा घेऊन एडवर्ड व मेरी यांचें लग्न जमवून हेन्रीची इच्छा पूर्ण करावी असा सॉमरसेटनें विचार केला; व स्कॉटिश प्रॉटेस्टंटांस मदत करण्याचें त्यानें ठरविलें. आपल्या नेहमींच्या उतावळ्या स्वभावास अनुसरून त्यानें सैन्याची जमवाजमव केली, आरमाराची मदत घेतली व स्कॉटलंडवर एकदम चाल केली. खुद्द स्कॉटिश लोकांना मेरी व एडवर्ड यांचें लग्न नापसंत होतें; व त्यांनींही युद्धाची तयारी जोरांत करून सैन्य जमविलें. इंग्रजांपेक्षां स्कॉटिश लोक जास्त असूनही स्कॉटिश लोकांच्या मूर्खपणाच्या हालचालीमुळें पिंकी येथें त्यांचा पराभव झाला (१५४७). या विजयानें सॉमरसेटचा कांहींही फायदा झाला नाहीं. उलट मेरी व एडवर्ड यांचें लग्न होऊं देऊं नये असा स्कॉटिश लोकांचा दृढनिश्चय होण्यास या पराभवानें मदत केली. लढाईच्या धामधुमींत असतांच स्कॉटिश लोकांनीं आपली राणी मेरी हिची फ्रान्सकडे रवानगी करून दिली व तेथेंच पुढें तिचें फ्रान्सच्या राजपुत्राशीं लग्न लावण्यांत आलें. शिवाय स्कॉटलंडला मदत करण्याच्या हेतूनें फ्रान्सनेंही या वेळीं इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारलें व आठव्या हेन्रीनें काबीज केलेल्या बोलोन शहरावर हल्ला चढविला. त्यामुळें तें शहर पडलें व फ्रेंचांच्या हातीं आलें. हें युद्ध पुढें बरेच दिवस चिघळत राहिलें व शेवटीं तिन्ही राष्ट्रांत तह झाला. त्या तहानेंही फ्रेंचांनीं घेतलेलें बोलोन शहर इंग्रजांना परत मिळालें नाहीं. प्रॉटेस्टंटांना मदत करून स्कॉटलंडमध्यें धर्मसुधारणा घडवून आणण्याचा सॉमरसेटचा जो उद्देश होता तोही सफळ झाला नाहीं.

७. सॉमरसेटचा अंतर्गत कारभार :—या वेळीं इंग्लंडमध्यें श्रीमान् अशीं व्यापारीमंडळें होतीं; त्यांस गिल्डस् असें म्हणत. शहरांतील व्यापारी, उदमी व शेटसावकार यांनीं अशीं मंडळें बहुतेक शहरांतून स्थापन केलीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतीं. त्यांचा उद्देश गरिबांना मदत करण्याचा असल्यानें त्यांनीं अनेक गरिबांना मृत्यूनंतरच्या क्रिया-कर्मांतराकरितां मदत केली होती व अजूनही करीत असत. तसेंच या संस्था आपल्या सर्व सभासदांच्या मुलांना शिक्षण देऊन उत्तम कारागीर व मजूर निर्माण करण्याचेंहि शिक्षण देत. तसेंच वृद्ध कामकऱ्यांना व आजाऱ्यांनाही त्यांच्याकडून मदत मिळत असे. अशी उपयुक्त कामगिरी करीत असूनही केवळ मजा मारण्यांतही त्यांचा पैसा अतोनात खर्च होत असे. तेव्हां या संस्था नाहींशा कराव्या असें सॉमरसेटला वाटलें व त्याप्रमाणें त्यानें या सर्व संस्था एकदम नाहींशा केल्या; व त्यांची सर्व संपत्ति जप्त केली. परंतु लंडनची संस्था वजनदार असल्यानें ती त्याला जमीनदोस्त करतां आली नाहीं. या संस्था नाश पावल्यानें कामकरी मंडळींत अत्यंत असंतोष निर्माण झाला.

८. नॉर्फोकमधील बंड :—व्यापारी संस्था नाश पावल्यानें कामकरी व शेतकरी लोक असंतुष्ट झाले; व त्यांनीं एक मोठें बंड पुकारलें. त्यांचा जमाव नॉर्फोक परगण्यांत विशेष होता. त्यांचा पुढारी केट नांवाचा एक चांभार होता. केटचें बंड होण्यास अनेक कारणें झालीं. आठव्या हेन्रीनें नाण्यांची भेसळ केल्यामुळें जिनसांच्या व खाद्यपेयांच्या किंमती अतोनात वाढल्या होत्या. ही भेसळ कमी करण्याचें सोडून सॉमरसेटनें ती जास्तच केली. यामुळें तर लोकांचा असंतोष जास्तच वाढला. तसेंच या वेळीं प्रत्येक गांवीं जीं गायरानें असत तीं जमिनदारांकडून बंद करण्यांत आलीं. तीं जोंपर्यंत खुलीं होतीं तोंपर्यंत गांवचे लोक आपल्या मेंढ्या, डुकरें व बदकें-कोंबडीं तेथें फुकट चरायला नेत असत. जमिनदारांनीं त्याला कुंपणें घातल्या-मुळें शेतकऱ्यांना तसें करतां येईना व म्हणून त्यांचें अतोनात नुकसान होऊं लागलें. तसेंच या वेळीं शेतीच्या धंद्यापेक्षां मेंढ्यांचा धंदाच उत्तम असें जमिनदारांस वाटूं लागलें. थोड्या पैशांत व कमी कामकरी नेमून जास्त नफा मिळवावा या हेतूनें त्यांनीं आपल्या शेतांचीं कुरणें बनविलीं; व तेथें आपल्या मेंढ्या चरायला सोडाव्या व योग्य वेळीं त्यांची लोकर कापून थोड्या खर्चांत पुष्कळ नफा मिळवावा अशी त्यांची प्रवृत्ति झाली होती. यामुळें देशाची शेती नष्ट झाली व शेतकऱ्यांस काढून टाकण्यांत आल्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते बेकार बनले. यामुळेंही अस्वस्थता माजून राहिली. अशा स्थितींत ज्या जमिनदारांनीं जप्त झालेल्या मठांच्या जमिनी घेतल्या होत्या ते मजूरांस अधिक फायद्याच्या लोभानें अत्यंत छळूं लागले. या सर्व गोष्टींमुळें शेतकरी व कामकरी यांच्यांत तीव्र असंतोष माजला होता. जमिनदारांच्या या सर्व कृत्यांमुळें असंख्य लोक बेकार झाले. त्यामुळें भिक्षा मागण्याशिवाय त्यांस गत्यंतर नव्हतें. चोरी करून पोट भरावें असें अनेकांस वाटूं लागल्यानें चोऱ्याही होऊं लागल्या. परंतु चोरी करणारास फांशीची शिक्षा ठरविली असल्यानें चोऱ्या कमी होत. तसेंच भिक्षेकरी व उडाणटप्पू लोक यांच्या-संबंधींही कायदे करण्यांत आल्यानें तोही मार्ग सर्वांसच खुला नव्हता. या सर्व गोष्टींचें पर्यवसान बंडांत झालें. नॉर्फोक परगण्यांतील लोकांनीं बंडाचा बावटा उभारला व रॉबर्ट केटच्या नेतृत्वाखालीं सर्व लोक जमा होऊं लागले. या बंडाचा बींमोड करण्याचा प्रयत्न करूं नये असें सॉमरसेटचें मत होतें. त्याप्रमाणें त्यांच्या तक्रारी ऐकून त्या दूर करण्याचें त्यानें अभिवचनही दिलें; परंतु तें बडवाल्यांकडून कांहीं गैरसमजुतीनें फेंटाळून देण्यांत आलें. तेव्हां सॉमरसेटचें सामोपचाराचें धोरण न पटून राजपालकमंडळानें बंडवाल्याविरुद्ध युद्ध पुकारून त्यांच्यावर सैन्याची रवानगी केली. बंडवाल्यांचा पुढारी रॉबर्ट केट यानें आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें जमिनदारांनीं शेतांना घातलेल्या कुंपणांचा विध्वंस केला व कुरणांचीं जाळपोळ सुरू केली. वॉरिकचा अर्ल बंडवाल्यांवर सैन्यासह चाल करून गेला. बंडवाल्यांत कोणत्याही प्रकारची शिस्त नसल्यानें वॉरिकच्या सैन्यानें त्यांचा तेव्हांच धुव्वा उडविला! या लढाईंत बंडवाल्यांचे तीन हजार लोक कामास आले. वॉरिकनें नॉर्फोक परगण्यांतील या बंडांत सामील झालेल्या लोकांना अत्यंत निर्दयपणें वागवून बंडाचा बींमोड केला; व नंतर रॉबर्ट केट व त्याचा भाऊ, विल्यम, यांना फांशीं देण्यांत आलें (१५४९).

९. सॉमरसेटची अधिकारच्युति :—यामुळें सॉमरसेटचे ग्रह त्याच्यावर उलटले. याच सुमारास त्याचा भाऊ, टॉमस सेमूर, यानें त्याच्याविरुद्ध कारस्थानें करण्यास सुरुवात केली. आठव्या हेन्रीची बायको कॅथराइन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पार हिच्या बरोबर त्यानें लग्न केलें होतें. तो महत्त्वाकांक्षी असला तरी अत्यंत अविचारी व मूर्ख होता. राजकन्या एलिझाबेथ हिच्याशीं आपलें लग्न व्हावें अशी त्याची फार फार इच्छा होती. आपला भाऊ आपल्यापेक्षां मोठा सत्ताधारी आहे त्यामुळें आपल्यास कोणीं विचारीत नाहीं, अशी त्याची मूर्ख कल्पना होती. तेव्हां स्वतःचें महत्त्व वाढविण्याकरितांच तो आपल्या भावाविरुद्ध कारस्थानें रचूं लागला. हें समजल्यावर सॉमरसेटनें त्याच्याविरुद्ध राजद्रोहाचा कायदा पास करून घेऊन त्याला फांशीं दिलें. या कृत्यानें व विशेषतः डेव्हनशायरमधील व नॉर्फोकमधील बंडांमुळें सॉमरसेटच्या अधिकारास उतरती कळा लागली. त्याचा ओढा गरिबांकडे असल्यानें व त्याची एकंदर वागणूक उद्धट असल्यानें उमरावांना तो अप्रिय वाटूं लागलेला होता. दोन्ही बंडांचा त्याला बीमोड करतां आला नाहीं म्हणून राजपालकमंडळांतही त्याला विरोध होऊं लागला. वॉरिकच्या अर्लचें या मंडळांत चांगलेंच प्रस्थ माजलें होतें व तोही सॉमरसेटचा मत्सर करूं लागला. त्याच्या काळांत इंग्लंडची तिजोरीही रिती झाली. त्याच्या हातून कोणतेंही भरगच व सहज डोळ्यांत भरेल असें कृत्य झालें नाहीं. या सर्व गोष्टींमुळें राजपालकमंडळानें त्याच्या हातची सर्व सत्ता काढून घेतली व त्याच्यानंतर डडले, वॉरिकचा अर्ल, हा राज्याचा संरक्षक झाला (१५४९). पुढें वॉरिकनें त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्याला फांशीं दिलें (१५५२).

१०. **नॉर्दंबरलंडचा ड्यूक–डडले** :—सॉमरसेटनंतर डडले–वॉरिकचा अर्ल–सर्वसत्ताधारी बनला (१५४९). नॉर्फोकच्या लोकांचें बंड त्यानें मोडलें म्हणून त्याची कीर्ति फार गाजली होती. राज्यकारभारास लायक असला तरी तो स्वार्थी, लोभी व मत्सरी होता. आपला स्वार्थ वाटेल त्या उपायानें सिद्धीस नेण्याची तो नेहमीं खटपट करीत असे. सातव्या हेन्रीचा आर्थिक मंत्री डडले त्याचा बाप होता. आपलें घराणें ऊर्जितावस्थेस यावें म्हणून त्याची एकसारखी धडपड असे. तो मोठा महत्त्वाकांक्षी होता. परंतु अत्यंत निर्दय असल्यानें त्याला लोकप्रियता मिळवितां आली नाहीं. अधिकारावर आल्यावर बालराजावर वजन मारून त्यानें स्वतःस 'नॉर्दंबर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लंडचा ड्यूक' अशी पदवी मिळविली. सॉमरसेटपेक्षांही इंग्लंडमध्यें जास्त सुधारणा घडवून आणावयाची असें त्यानें ठरविलें होतें. याच वेळीं युरोपांत प्रॉटेस्टंटांविरुद्ध कडक कायदे होऊं लागल्यानें अनेक लोक इंग्लंडमध्यें येऊन राहिले होते. त्यांना हाताशीं धरून इंग्लंडांत धर्मसुधारणा करण्याचा त्यानें चंग बांधला. राजकन्या मेरी ही कॅथॉलिकपंथाभिमानी असल्यानें तिला वळवून घेण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला. परंतु मेरी मोठी करारी असल्यानें वॉरिकला त्या बाबतींत यश आलें नाहीं.

११. धार्मिक सुधारणा :—सर्व सत्ता हातीं आल्यावर व धर्मसुधारणेला अनुकूल असे लोक मिळाल्यावर धर्मसुधारणा करण्याच्या हेतूनें वॉरिकनें—ऊर्फ नॉर्दंबरलंडनें—सन १५५१ सालीं पार्लमेंट बोलाविलें. सन १५४९ मध्यें तयार केलेलें प्रार्थनापुस्तक फार जुनें झालें असून व त्याची सुधारणा करणें अत्यंत आवश्यक होय असें वाटल्यावरून त्याची प्रॉटेस्टंट तत्त्वांस अनुसरून सुधारणा करण्यांत आली. सन १५५२ सालीं पुन्हां एकरूपतेचा कायदा नव्यानें पास करून घेऊन नवीन सुधारून छापलेलें प्रार्थनापुस्तक सर्व मंदिरांतून प्रार्थनेच्या वेळीं वाचण्यांत व वापरण्यांत यावें असा कायदा पास करण्यांत आला. या प्रार्थनापुस्तकाचे वेळींही आर्चबिशप क्रॅन्मर यानें अत्यंत परिश्रम घेतले होते. हेंच प्रार्थनापुस्तक अजूनही इंग्लंडच्या मंदिरांतून प्रार्थनेच्या वेळीं वाचलें जातें. यानंतर प्रॉटेस्टंट पंथांस अनुसरून अनेक सुधारणा करण्यांत आल्या. चर्चमधील स्थंडिलें उध्वस्त करण्यांत येऊन मंदिरांच्या खिडक्यांवर संतांचीं चित्रें काढलेलीं होतीं म्हणून त्या खिडक्याही फोडून टाकण्यांत आल्या! सर्व धर्मतत्त्वांचें सार बेचाळीस तत्त्वांत एकत्रित करण्यांत आलें (१५५३). या धर्मतत्त्वांवर ल्यूथरच्या शिकवणुकीची दाट छाया पडलेली दिसत होती. या सर्व धर्मसुधारणांचा देशावर वाईट परिणाम झाला. सर्व देशभर धड जुना धर्महीं चालू नव्हता व नव्या धर्मासंबंधीं कायद्यांची अंमलबजावणी योग्य रीतीनें न झाल्यानें सर्वत्र अनवस्था प्रसंग उत्पन्न झाला. धर्ममंदिरांच्या उत्पन्नाबद्दलही तंटे उत्पन्न होऊं लागले; व त्या बाबतींत लांचलुचपतीचे प्रकार फार होऊं लागले. खुद्द सॉमरसेट व नॉर्दंबरलंड यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्ममंदिरांच्या मालकीच्या सुमारें पन्नास लाख पौंड उत्पन्नाच्या जमिनी उपटल्या. या सर्व गोष्टींचा देशावर अनिष्ट असाच परिणाम झाला. राजपालकमंडळांतील सर्व लोक स्वार्थी व लोभी आहेत व देशांतील लोकांना व प्रत्यक्ष देवालाही फसविण्याकरितां ते हपापलेले आहेत असाच लोकांचा समज होऊं लागला. तशांतच या मंडळांतील लोकांनीं नाण्यांची भेसळ करवून पैसा लुबाडला; खोटा व नकली माल तयार करून विकणाऱ्या व्यापाऱ्यांस शिक्षा करण्याचें सोडून मंडळानें त्यांस उत्तेजनच दिलें असें लोकांस वाटूं लागलें. भिक्षा मागण्याकरितांही परवाने पाहिजेत असें पार्लमेंटनें ठरविल्यानें भिक्षेकरी असंतुष्ट झाले. परंतु लोकांना कोणीही त्राता मिळाला नाहीं; व गरिबांचे हाल कुत्राही खाईनासा झाला.

१२. एडवर्डचा मृत्यु (१५५३)—नॉर्दंबरलंडचें कारस्थान :— राजा एडवर्ड याची प्रकृति त्याच्या बापाप्रमाणें धडधाकट नव्हती. त्याच्या बापाची दुर्दम इच्छाशक्ति त्याच्या अंगीं लहान वयांतही असल्याचें लोकांच्या निदर्शनास आलें होतें. परंतु ज्या वेळीं कसरत व खेळ यांत रमून जाऊन शरीर व मन भक्कम करणें जरूर होतें अशा वेळीं त्याला धर्मकारण व राजकारण यांच्या कारभाराशीं झगडावें लागलें. यामुळें अगोदरच नाजूक असलेलें त्याचें शरीर अधिकच नाजूक झालें व त्याला क्षयानें पछाडलें; अखेर तो सन १५५३ मध्यें मरण पावला.

एडवर्ड लौकरच मरणार हें नॉर्दंबरलंडला अगोदरच कळलें होतें. एडवर्ड मेल्यावर राज्यावर मेरी येणार हें नक्की होतें व ती राणी झाल्यास आपल्या हातीं सत्ता राहणार नाहीं अशी त्याची पक्की खात्री होती. तेव्हां एडवर्डच्या मृत्यूपूर्वीच मेरीचा व एलिझाबेथचाही वारसा रद्द करून लेडी जेन ग्रे हिला राणी करावें असें त्यानें ठरविलें व त्या गोष्टीला एडवर्डची संमतीही त्यानें मिळवून ठेविली होती. नॉर्दंबरलंडला जेन ग्रेचा वारसा मान्य होण्याचें कारण असें कीं, तिचें लग्न त्यानें आपला एक मुलगा लॉर्ड गिलफर्ड डडले याच्याशीं लावलें असल्यानें सर्व सत्ता आपल्या हातीं राहील असें त्यास वाटलें. अखेर मरतां मरतां एडवर्डनें त्याच्या म्हणण्याप्रमाणें मृत्युपत्र तयार केलें; व त्याप्रमाणें लेडी जेन ग्रे इंग्लंडची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राणी व्हावी असें त्यानें ठरविलें. अर्थात् या मृत्युपत्राला पार्लमेंटची संमति नसल्यानें त्याला कायदेशीरपणा प्राप्त झालेला नव्हता. तरीही एडवर्ड मरण पावल्यावर नॉर्दंबरलंडनें राजपालकमंडळांतील सर्व सभासदांची मनधरणी करून त्यांना आपल्या बाजूला वळवून घेतलें व घाईघाईनें लेडी जेन ग्रेच्या नांवानें द्वाही फिरविली. परंतु लोकांचा ओढा जेन ग्रेकडे नसून मेरीकडे होता. कारण जेन राणी झाल्यानें स्वार्थी नॉर्दंबरलंडच्या हातांत राज्यसूत्रें राहतील अशी लोकांस भीति वाटत होती. राणी म्हणून जेन ग्रेची द्वाही फिरविण्यांत आली असें पाहून मेरी नॉर्फोक परगण्यांत पळून गेली. तेव्हां नॉर्दंबरलंड तिच्यावर ससैन्य चालून गेला; परंतु त्याच्या सैन्यानें बंड केल्यानें मेरीचा वारसा त्याला मान्य करावा लागला; व अखेर मेरी इंग्लंडची राणी झाली.

अभ्यास

१. सॉमरसेटसंबंधीं तुम्हांस असलेली माहिती सांगा. तो अप्रिय कां झाला ?

२. सहाव्या एडवर्डच्या कारकीर्दींत धर्मसुधारणेचें पाऊल पुढें कसें पडलें तें वर्णा.

३. सॉमरसेटनें व्यापारीमंडळें रद्द कां केलीं ? त्याचा परिणाम काय झाला ? हीं मंडळें लोकांना प्रिय वाटण्याचें कारण काय ?

४. नॉर्फोकमधील लोकांनीं बंड कां केलें ? त्याचा बींमोड कोणीं केला ? त्या बंडाचा परिणाम काय झाला ?

५. खालील प्रश्नांचीं उत्तरें द्या.

(अ) आठव्या हेन्रीच्या मृत्युपत्रासंबंधीं माहिती सांगा. (आ) प्रार्थनापुस्तकासंबंधीं माहिती द्या. (इ) डेव्हनशायरमधील बंडाची हकीकत सांगा. (ई) सॉमरसेटनें स्कॉटलंडशीं युद्ध कां केलें ? त्याचा परिणाम सांगा. (उ) टॉमस सेमूरसंबंधीं चार वाक्यें लिहा. (ऊ) शेतांचीं कुरणें केल्याचा परिणाम काय झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—नॉर्दंबरलंड, सहावा एडवर्ड, दुसरें प्रार्थनापुस्तक, वॉरिकचा ड्यूक, अरुंडेल, क्रॅन्मर, पिंकी, बोलोन, सॉमरसेट, जेन ग्रे.

७. नॉर्दंबरलंडचा स्वभाव सांगून एडवर्डच्या मृत्यूनंतर त्यानें केलेलें कारस्थान सांगा. त्यानें केलेल्या धार्मिक सुधारणा सांगा.

उतारा

१. शेतांचीं कुरणें करण्याच्या पद्धतीनें उडविलेला कहर

आपल्या वाडवडिलांना शेतीचें जें उत्पन्न मिळत असे किंवा आजही त्यांना शेतीचें जें उत्पन्न येतें व तिच्यामुळें त्यांचा जो फायदा होतो त्यावरच संतुष्ट राहणें योग्य असतांही अनेक धर्मगुरूही आज असंतुष्टच आहेत. उत्तमप्रकारचें स्वास्थ्य व सौख्य उपभोगीत असूनही व शेतकऱ्यांचे हाल होतील हें माहीत असूनही या लोकांना जास्त फायद्याची नुसती हांव सुटलेली आहे ! आणि यांनाच आम्ही धर्मगुरू म्हणावयाचें ! या लोकांनीं आज आपल्या शेतांतून तसूंभरही जागा नांगरणीस ठेविलेली नाहीं ! शेतांचीं कुरणें करण्याकरितां त्यांनीं शेतास कुंपणें घालण्यास सुरवात केली आहे; व त्यापायीं त्यांनीं गांवांतील घरें पाडलीं, शहरेंच्या शहरें उध्वस्त केलीं व धर्ममंदिराशिवाय एकही इमारत उभी ठेविलेली नाहीं ! अरण्यें शिकारबागा, क्रीडावनें वगैरेकरितां थोडी कां जागा व्यर्थ गेली आहे ! तरीही या लोकांनीं चांगल्या चांगल्या राहत्या घरांची व सुपीक जमिनींची नुसतीं उजाड रानें माजविलीं आहेत ! एका आधाशी व लोभी माणसानें—कीं ज्याला या देशाचा नुसता कृतांतच म्हणतां येईल—हजारों एकरांच्या जमिनीला एकच कुंपण घालून लाखों गरीब शेतकऱ्यांना बेकार बनवावें व त्यांना फसवून व त्यांच्यावर अत्यंत जुलुम करून अत्यंत चोरटेपणानें त्यांच्या शेतांतून मेंढ्या घालाव्या व त्यांच्या शेतांचीं कुरणें बनवावीं ही शुद्ध नागवणूक होय ! एवढेंच नव्हे तर अत्यंत सालस, साध्या, गरीब, दुबळ्या व दीन शेतकऱ्यांना, त्यांच्या बायकांना, त्यांच्या मुलांना व लहान लहान अर्भकांना, विधवांना, पोरक्या पोरांना, या ना त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपायानें, जुलुमजबरदस्तीनें व अत्यंत दुष्टपणानें बेकार बनविणें व त्यांच्या सुपीक जमिनींचीं कुरणें बनविणें ही नीचपणाची कमाल होय ! !

—टॉमस मूरच्या युटोपियावरून

प्रश्न :—१. कोणकोणत्या जागा कुरणाकरितां घेतल्या होत्या ? त्याचा परिणाम काय झाला ?

२. शेतांचीं कुरणें करणें अयोग्य कां होतें ?

३. वरील उताऱ्यावरून त्यावेळच्या शेतीबद्दल तुम्हांस काय म्हणतां येईल ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३३. धर्मसुधारणेची कलती कमान: इंग्लंडांत पुन्हां कॅथॉलिक धर्म !

१. राणी मेरी :—मेरी राज्यावर आली, त्या वेळीं तिचें वय सदतीस वर्षांचें होतें. आठवा हेन्री व दुर्दैवी कॅथराईन यांची ती मुलगी व सहाव्या एडवर्डची सावत्र बहीण. लहानपणीं तिचें शिक्षण चांगलें झालें होतें. ग्रीक, लॅटिन, फ्रेंच व इटॅलियन अशा चार भाषा तिला अवगत होत्या; व सर टॉमस मूर व इरॅस्मस यांचे ग्रंथही तिनें वाचलेले होते. हेन्रीनें तिच्या आईशीं घटस्फोट केल्यानंतर तिचे दिवस फारच हालांत गेले. खऱ्या मातृप्रेमाची कल्पना तिला जवळजवळ नव्हतीच. ती धैर्यवान् सद्गुणी व धार्मिक प्रवृत्तीची होती. रोमन कॅथॉलिक धर्मावर, तिच्या आईप्रमाणेंच, तिची अढळ श्रद्धा होती व कोणत्याही प्रसंगीं न डगमगतां तिनें आपला हा विश्वास कधींही ढळूं दिला नाहीं.

मेरी

ट्यूडरांचा करारी बाणा व खंबीर मन तिच्या ठिकाणींही पूर्णपणें दृष्टोत्पत्तीस येत होतें. लहानपणापासून हाल अपेष्टांत दिवस गेल्यानें व प्रत्येक वेळीं नवीन नवीन संकटांची मार्गप्रतिक्षा करीत राहिल्यानें तिचा स्वभाव थोडा संशयी बनलेला होता; व त्यामुळेंच आपल्याला ज्यांनीं ज्यांनीं छळलें त्यांच्यावर सूड उगवावा असें तिला वाटे. सहाव्या एडवर्डच्या कारकीर्दींत धर्मासंबंधीं जे कायदे पास करण्यांत आले होते ते तिला मुळींच मान्य नव्हते. राणी झाल्यावर पोपशीं इंग्लंडचा पुन्हां संबंध जोडून व इंग्लंडांत रोमन कॅथॉलिक पंथाचा प्रसार करून प्रॉटेस्टंट पंथाची योग्य रीतीनें हकालपट्टी करण्याकरितां तिनें जवळ जवळ चंगच बांधला होता. या कामीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जो कोणी तिला विरोध करील त्याचा कांटा नाहींसा करून आपल्या योजना शेवटास नेण्यास ती पूर्ण समर्थ होती. अर्थात् ती राणी झाल्यानें ज्या रोमन कॅथॉलिकांना अनेक प्रकारचा छळ गेलीं वीस वर्षें सहन करावा लागला त्यांना हायसें वाटलें व त्यांनीं राणी म्हणून तिचें हार्दिक स्वागत केलें.

२. मेरीचे सल्लागार :—रोमन कॅथॉलिक पंथाचा प्रसार करण्याकरितां जुने मंत्री व सल्लागार तिच्या उपयोगाचे नव्हते. म्हणून ज्यांचा कॅथॉलिक पंथावर विश्वास होता व धार्मिक बाबतींत तिचे विचार ज्यांच्याशीं पटत होते अशा लोकांनाच तिनें आपल्या सल्लागारमंडळांत सामील केलें. तिचा प्रमुख सल्लागार रेनार्ड हाच होय. जर्मन बादशाह पांचवा चार्ल्स याचा रेनार्ड हा हस्तक होता. त्याच्या मनांतून पांचव्या चार्ल्सचा मुलगा व स्पेनचा राजा फिलिप याच्याबरोबर मेरीचें लग्न व्हावें असें होतें. शिवाय लेडी जेन ग्रे व एलिझाबेथ यांचा इंग्लंडच्या गादीवरील वारसा रद्द करावा; किंबहुना त्यांना फांशीं देऊन वारसा–प्रकरणाची काय-मची वाट लावावी असाही त्याचा विचार होता. यांपैकीं पहिली गोष्ट त्याला साध्य करून घेतां आली; परंतु दुसरी साध्य झाली नाहीं. याच्याशिवाय विंचेस्टरचा बिशप गार्डिनर, नॉर्फोक व बॉनर हेही तिचे सल्लागार होते. गादीवर आल्यावर या सर्वांस तिनें बंधमुक्त केलें व त्या सर्वांना आपल्या सल्लागारमंडळांत स्थान दिलें. या सर्वांत गार्डिनरच काय तो योग्य माणूस होता.

३. मेरीचीं पहिलीं कृत्यें :—मेरीचा कल रोमन कॅथॉलिक पंथाकडे असूनही सर्व लोकांनीं तिचें स्वागत केलें. आठव्या हेन्रीच्या धर्मसुधारणेस सर्वांनीं मान तुकविली होती; पण सर्व राष्ट्र प्रॉटेस्टंटांच्या छळास कंटाळून गेलें होतें. मेरी राज्यावर आल्यास ती आठव्या हेन्रीची सौम्य धर्मपद्धति सुरू करील असें सर्वांस वाटत होतें. परंतु त्यांची ही कल्पना फोल ठरली. तिला आपल्या बापाबद्दल प्रेम कधींच नव्हतें. एक तर त्यानें तिला तिच्या आईजवळ राहूं दिलें नव्हतें व तिचा राजदरबारांत प्रवेशही होऊं दिला नव्हता; व दुसरें म्हणजे हेन्रीनें तिच्या आईचा अत्यंत छळ व अवहेलना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली अशी तिची ठाम कल्पना होती. यामुळें तिचा ओढा आपल्या आईकडे व तिच्या धर्मपंथाकडे विशेष होता. मेरीच्या मनाची ठेवण स्पॅनिश असल्यानें इंग्लिश मनोवृत्तींशीं ती कधींही एकतानता पावली नाहीं; व ज्या राष्ट्रानें आपल्या आईचा छळ केला त्या राष्ट्राबद्दल तिला आपलेपणा कधींच वाटला नाहीं. राष्ट्रभक्तीपेक्षां तिची मातृभक्ति विशेष असल्यानेंच राणी या नात्यानें आपल्या प्रजेला तिनें नीट वागविलें नाहीं. या सर्व गोष्टींचा व्हायचा तोच परिणाम झाला.

गादीवर आल्यावरोबर तिनें प्रथमतः नार्दंबरलंडला फांशीं दिलें; व लेडी जेन ग्रे व तिचा नवरा यांना देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा फर्मावण्यांत येऊन कांहीं काळ त्या दोघांना लंडनच्या टॉवरमध्यें कैदेंत ठेवण्यांत आलें. नंतर गेल्या राजवटींत कैदेंत टाकण्यांत आले होते अशा सर्व रोमन कॅथॉलिकांस तिनें बंधमुक्त केलें; तसेंच ज्या कॅथॉलिकांची मालमत्ता जप्त करण्यांत आली होती ती परत करण्याची तिनें आज्ञा केली. सर्व प्रॉटेस्टंट बिशपांना हांकलून देण्यांत येऊन त्यांच्या जागीं रोमन कॅथॉलिक बिशपांची नेमणूक करण्यांत आली. जे प्रॉटेस्टंट परदेशांतून इंग्लंडमध्यें आले होते, त्यांना हद्दपार करण्यांत आलें. यानंतर पार्लमेंट सभा भरविण्यांत आली व तिच्याकडून सहाव्या एडवर्डचे वेळीं पास झालेले सर्व कायदे रद्द करण्यांत आले. त्याच्या वेळेस सुरू झालेलें प्रार्थना–पुस्तक रद्द ठरून मंदिरांतून लॅटिन भाषेंतील प्रार्थनाच म्हटली जावी असें ठरलें. एकरूपतेचा कायदा व धार्मिक श्रेष्ठत्वाचा कायदा हे कायदेही पार्लमेंटनें रद्द केले. आठव्या हेन्रीचा सहा कलमी कायदा पुन्हां पास करण्यांत येऊन त्याची अंमलबजावणी होऊं लागली. पोपचा प्रतिनिधि म्हणून रेजिनॉल्ड पोचें इंग्लंडांत स्वागत करण्यांत आलें. धर्मगुरूंनीं लग्नें न करतां ब्रह्मचर्य स्वीकारून धर्माचा प्रसार करावा असें ठरलें. पार्लमेंटनें वरील सर्व कृत्यांस आपली संमति दिली. परंतु जप्त केलेल्या जमिनी ज्या लोकांनीं विकत घेतल्या होत्या, त्यांच्याकडून काढून घेऊन त्या धर्ममठ व इतर धर्मसंस्था यांना परत देण्याचें पार्लमेंटनें साफ नाकारलें. तेव्हां मेरीनें राजसत्तेकडे ज्या जमिनी व जी मालमत्ता आली होती तीच धर्मसंस्थांस वांटली; कांहीं भाग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोपलाही दिला. त्याचप्रमाणें प्रथम वर्षाचें उत्पन्नही पोपला पूर्वीप्रमाणें देण्याचें ठरविण्यांत आलें. चौथा व पांचवा हेन्री यांच्या काळांत लोलर्ड लोकांविरुद्ध जे कायदे पास करण्यांत आले होते ते मध्यंतरींच्या काळांत रद्द करण्यांत आले होते; पण तेही पार्लमेंटनें पुन्हां पास केले. अशा तऱ्हेनें मेरीनें रोमन कॅथॉलिक पंथाची घडी इंग्लंडमध्यें पुन्हां स्थापन करून पूर्वीप्रमाणें इंग्लंडमध्यें पोपची धार्मिक सत्ता पुनरपि सुरू झाली. तिचा सल्लागार गार्डिनर याला वरील कृत्यांपैकीं अनेक कृत्यें नापसंत होतीं व तसें त्यानें मेरीला सांगितलेंही. परंतु तिनें त्याकडे लक्ष दिलें नाहीं. इंग्लंडांत पोपची सत्ता पुन्हां स्थापन झाली हेंही लोकांना व राष्ट्रालाही आवडलें नाहीं.

४. मेरीचें लग्न (१५५४):—पार्लमेंटनें मेरीला तिच्या धर्मसमजुती-प्रमाणें अनेक गोष्टी करण्यास संमति दिली. तेव्हां मेरी आपल्या म्हणण्या-प्रमाणें वागेल असें पार्लमेंटला वाटलें व म्हणून मेरीच्या लग्नाचा प्रश्न उत्पन्न करून एखाद्या इंग्लिश उमरावाबरोबर तिचें लग्न करून देण्याचा पार्लमेंटनें घाट घातला. चौथ्या एडवर्डचा पणतू, डेव्हनचा अर्ल, याच्या-बरोबर मेरीनें लग्न करावें अशी राष्ट्राची इच्छा होती. परंतु मेरीला तें लग्न नको होतें. बादशाह पांचवा चार्ल्स तिचा जिवलग मित्र होता, व त्याचा हस्तक रेनार्ड यानें एकसारखें तिच्या कानीं लागून बादशहाचा मुलगा फिलिप याच्याशीं तिनें लग्न करावें असा डाव टाकला. फिलिपशीं लग्न करावें असें तिलाही वाटूं लागलें. पण मेरीनें फिलिपशीं लग्न करावें असें तिच्या प्रजेला वाटत नव्हतें. कारण एक तर फिलिप तिच्यापेक्षां अकरा वर्षांनीं लहान होता; दुसरें असें कीं फिलिपशीं तिनें लग्न केल्यास स्पेनवर इंग्लंडला अवलंबून रहावें लागेल, व स्पेनच्या शत्रूंशीं विनाकारण इंग्लंडला लढावें लागेल; तसेंच या लग्नामुळें इंग्लंडमध्यें पोपचें महत्त्व वाढेल, कॅथॉलिक पंथाचा जोरानें प्रसार होईल व प्रॉटेस्टंटांचा छळ होईल अशी लोकांना भीति वाटत होती. परंतु फिलिप तिच्या आईच्या कुळांतला होता. म्हणून त्याच्याबद्दल तिला आपलेपणा वाटत होता. दुसरें असें कीं फिलिप रोमन कॅथालिक पंथाचा कट्टा अभिमानी असल्यानें त्याच्याशीं लग्न केल्यास इंग्लंडमध्यें त्या पंथाचा प्रसार करण्यास सोपें जाईल; व या बाबतींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लिश राष्ट्रानें मदत केली नाहीं तर युरोपांत आपल्याला निदान एक तरी सामर्थ्यवान मित्र मिळेल अशीही तिची कल्पना होती. या सर्व गोष्टीमुळें आपल्या प्रजेच्या व पार्लमेंटच्या मतास धिक्कारून तिनें फिलिपबरोबर लग्न करण्याचा नक्की निश्चय केला व त्याप्रमाणें त्यांचा वाङ्निश्चयही झाला !

५. वॅटचें बंड :—स्पेनच्या फिलिपबरोबर मेरीचें लग्न होणार ही गोष्ट प्रजेला आवडली नाहीं व त्या लग्नाबद्दलची आपली नापसंती दर्शविण्या-करितां लोकांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें दंगेधोपे करण्यास सुरुवात केली. त्यांतल्या त्यांत केंट व सक्सेस परगण्यांतील लोकांनीं केलेलें बंड अत्यंत महत्त्वाचें होय. बंडवाल्यांचा पुढारी सर टॉमस वॅट हा होता. सर्व लोकांना एकत्र जमवून त्यानें लंडनवर चाल केली. त्यामुळें सर्व लंडन-निवासी लोक भयभीत झाले. मेरीनें स्वतः त्यांना धीर दिला व बंडवाल्यां-वर सैन्याची रवानगी केली. थोड्याच वेळांत बंडवाल्यांचा पराभव झाला. वॅटला कैद करून त्याचा शिरच्छेद करण्यांत आला. मेरीला पदच्युत करून एलिझाबेथला गादीवर बसविण्यांत यावें असें बंडवाल्यांचें म्हणणें होतें; तेव्हां तीही या बंडवाल्यांना सामील असावी असा मेरीला संशय आला. शोधाअंतीं तो संशय खोटा ठरल्यानें एलिझाबेथ जिवंत राहू शकली. बंडांत सामील झालेल्या सर्व लोकांस अत्यंत निर्दयपणें वागविण्यांत आलें. वॅटशिवाय बंडवाल्यांचे अनेक पुढारी होते. त्यांत लेडी जेन ग्रेचा बाप होता. तेव्हां त्याला व त्याच्याबरोबरच लेडी जेन ग्रे व तिचा नवरा लॉर्ड गिल्फर्ड डडले यांनाही फांशी देण्यांत आलें. बंडाचा मोड झाल्यावर फिलिप इंग्लंडमध्यें आला व विंचेस्टरचा बिशप गार्डिनर यानें मेरी व फिलिप यांचें लग्न लावून दिलें (१५५४).

६. प्रॉटेस्टंटांचा छळ :—लग्न झाल्यावर आपल्याला कांहीं दिवस गेल्याचा मेरीला भास होत होता; व आपल्याला मुलगा होणार या खोट्या आनंदांत ती बरेच दिवस होती. परंतु कांहीं दिवसांनीं खरी गोष्ट उघडकीस आल्यावर तिला अतोनात वाईट वाटलें व त्याचा तिच्या मनावर व प्रकृती-वरही परिणाम झाला. दिवसेंदिवस ती अशक्त होऊं लागली व तिचा स्वभाव चिडखोर बनूं लागला. आपल्याला मुलगा न झाल्यानें व यापुढें होण्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आशाही नष्ट झाल्यानें एलिझाबेथचा तिला हेवा वाटूं लागला. लहानपणापासून ती तिचा मत्सर करी; परंतु आतां एलिझाबेथला लोक भजतात व आपल्यानंतर तीच राणी होणार हें समजून आल्यानें तिला फारच वाईट वाटूं लागलें. अशा स्थितींतही कॅथॉलिक धर्माच्या प्रसाराकडे व त्याच्या विरोधकांकडे ती जास्तच लक्ष देऊं लागली. त्यामुळें धर्मछळाला ऊत आला. कॅथॉलिकांविरुद्ध असलेले सर्व कायदे पार्लमेंटनें रद्द केलेच होते. व


फिलिप व मेरी यांची मुद्रा

लोलर्ड लोकांसंबंधींचे कायदे जारी करण्यास पार्लमेंटनें संमति दिली होती (१५५५). तसेंच नास्तिकांवर खटले भरून त्यांना शिक्षा सुनावण्यांत यावी अशा अर्थाचा पार्लमेंटनें कायदा पास केला होता. त्याचा आधार घेऊन मेरीनें प्रथमतः प्रॉटेस्टंटांविरुद्ध हत्यार उपसलें; रॉजर्स, हूपर, फेरर व आणखी कित्येक प्रॉटेस्टंट बिशपांना तिनें फांशीं दिलें. या वेळीं आपल्या हातीं इंग्लंडची राजसत्ता येत नाहीं हें जाणून अत्यंत नाखूष स्थितींत मेरीचा नवरा फिलिप तिला सोडून स्पेनला गेला. त्यामुळें मेरी इंग्लिश लोकांवर फारच चिडली व तिनें असंख्य लोकांस फांसावर चढविलें. तसेंच रिडले, लॅटिमर यांना तिनें जिवंत जाळलें. आर्चबिशप क्रॅन्मरवर तर तिचा फारच डोळा होता. धर्मसुधारणेला त्याच्यामुळेंच इंग्लंडमध्यें वाव मिळाला, प्रार्थनापुस्तक त्यानेंच केलें, एकरूपतेचा कायदा व धार्मिक श्रेष्ठत्वाचा कायदा त्याच्यामुळेंच पास झाला व अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिच्या आईचा –कॅथराइनचा–घटस्फोट त्याच्यामुळेंच होऊं शकला. तेव्हां या सर्व गोष्टींबद्दल त्याच्यावर तिचा दांत होता! म्हणून क्रॅन्मरला तिनें कैद केलें व ठार मारण्याची धमकी दिली. परंतु 'प्रॉटेस्टंट धर्मावरील माझा विश्वास उडाला असून कॅथॉलिक धर्मपंथ स्वीकारण्यास मी तयार आहें' असें त्यानें कबूल केलें तर त्याला जीवदान देण्यांत येईल असें त्याला तिनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कळविलें. प्रथमतः तिचें म्हणणें मान्य करावें असें त्याला वाटूं लागलें व त्याप्रमाणें त्यानें केलेंही ! परंतु अखेरीस स्वतःची चूक कळून आल्यावर त्याला पश्चात्ताप झाला व त्यानें मेरीचें म्हणणें अमान्य केलें; तेव्हां त्याला जिवंत जाळण्यांत आलें (१५५६). जाळण्याचे वेळीं त्यानें आपला उजवा हात प्रथमतः अग्नीमध्यें कोंबला व "या हातानें घात केला" असें तो म्हणाला. कारण 'प्रॉटेस्टंट पंथावरील विश्वास उडाल्यानें कॅथॉलिक धर्माचा स्वीकार करण्यास मी तयार आहें' असें त्या हातानें त्यानें मेरीला लिहून दिलें होतें. क्रॅन्मरप्रमाणेंच सुमारें तीनशें प्रॉटेस्टंटांनाही मेरीनें जिवंत जाळून टाकण्याची शिक्षा दिली होती ! प्रॉटेस्टंटांचा छळ केल्यानें व क्रॅन्मरला जिवंत जाळल्यानें लोकांना दहशत बसेल व कॅथॉलिक पंथाचा इंग्लंडमध्यें सहज फैलाव होईल असें मेरीला वाटलें होतें; परंतु झालें त्याच्या उलट ! हा छळ पाहून 'नको तो रोमन कॅथॉलिक धर्मपंथ' असें लोकांस होऊन गेलें व प्रॉटेस्टंट पंथाकडेच त्यांची प्रवृत्ति होऊं लागली. बॉनर, गार्डिनर वगैरे तिच्या सल्लागारांनीं प्रथमतः तिला उत्तेजन दिलें; तरी पुढें पुढें त्यांनी तिला त्यापासून परावृत्त करण्याचा बराच निष्फळ प्रयत्न केला. तिचा नवरा फिलिप यानेंही तिचें मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण ह्या हेकेखोर व करारी राणीनें कोणालाही दाद न देतां आपला निश्चय पार पाडला. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. रोमन कॅथॉलिक पंथाला लोक विटले. विशेषतः क्रॅन्मरच्या वधानें तर कॅथॉलिक पंथाला इंग्लंडमध्यें कायमचाच खो बसला.

७. फ्रान्सशीं युद्ध :—प्रॉटेस्टंटांचा छळ झाल्यानें इंग्लंडमध्यें अनेक दंगे-धोपे होऊं लागले. इंग्लंडच्या दक्षिणेस असलेल्या 'वाईट' बेटांतील लोकांनीं बंड पुकारलें. फ्रान्सनें तेथील लोकांना मदत पाठविली. तेव्हां फिलिपनें फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारण्याचा मेरीला सल्ला दिला. मोठ्या नाखुषीनें व केवळ आपल्या नवऱ्याला खूष करण्याकरितां तिनें फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारलें. लगेच तिनें बंडवाल्यांविरुद्ध सैन्याची रवानगी केली, व त्यांचा मोड केला. परंतु सन १५५७ मध्यें फ्रेंचांनीं इंग्रजांच्या ताब्यांत असलेल्या कॅले बंदराला वेढा दिला. फ्रान्समधील हें बंदर इंग्रजांच्या ताब्यांत दोनशें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्षे होतें व इंग्लिश खाडींतील तें एक महत्त्वाचें व नाक्याचें ठिकाण समजलें जाई. परंतु अखेर फ्रेंचांनीं तें सर केलें (१५५८). यावेळीं कॅलेवर योग्य शिबंदी नव्हती, त्याची तटबंदी नादुरुस्त होती व तेथील लोकांना इंग्लंडहून योग्य वेळीं मदतही आली नाहीं. यामुळें इंग्लंडच्या हातून कॅले गेलें, तें कायमचें !

८. मेरीचा मृत्यु (१५५८) :— कॅले पडल्याची बातमी आली त्यावेळीं मेरी आजारीच होती. त्या स्थितींत तिला ती बातमी कळल्यावर तिच्या हृदयाला चांगलाच चरका बसला. 'माझ्या मृत्यूनंतर माझें शरीर कोणी फाडून पाहील तर त्याला माझ्या हृदयावर कॅले हीं अक्षरें कोरलेलीं आढळतील,' असें ती मृत्यूपूर्वी आपल्या दासीजवळ म्हणाली. यानंतर ती फार दिवस जगली नाहीं; व शेवटीं सन १५५८ मध्यें मरण पावली. मेरी मोठी करारी, धैर्यवान् व अत्यंत धार्मिक वृत्तीची होती. परंतु तिचा हेकेखोर स्वभाव व क्रौर्य यांमुळें सर्व राष्ट्र तिच्यावर उलटलें व आज ती 'खुनी मेरी' म्हणूनच ओळखली जाते. तिचें सर्व आयुष्य रोगांशीं व निराशेशीं झगडण्यांत गेलें. त्यामुळें ती एकसारखी खचतच गेली. तिच्या नवऱ्याचें तिच्यावर प्रेम नव्हतें व तो तिला टाकून गेला यामुळेंही तिचें अंतःकरण विदीर्ण झालें. कॅथॉलिक पंथाचा इंग्लंडमध्यें प्रसार करण्याचा तिनें अत्यंत उत्साहानें प्रयत्न केला; परंतु त्यांतही तिला यश लाभलें नाहीं. तिच्या इतकी दुर्दैवी राणी तीच होय ! गादीवर आली त्या वेळीं ज्या लोकांनीं तिचें आनंदानें व मोठ्या उत्साहानें स्वागत केलें त्याच लोकांना मेरी मेल्यानें अत्यंत आनंद झाला ! सर्व लोक तिच्या धर्मवेडाला व धर्मच्छळाला विटून गेले होते; इतके कीं तिच्या मृत्यूमुळें कोणालाही हळहळ वाटली नाहीं.

अभ्यास

१. राणी व स्त्री या नात्यानें मेरीचें चरित्र थोडक्यांत द्या. तिच्यांत व औरंगजेबांत साम्य कोणतें ?
२. कॅथॉलिक धर्मपंथाचा इंग्लंडांत प्रसार करण्याकरितां तिनें कोणकोणत्या गोष्टी केल्या ? त्याचा परिणाम काय झाला ? मेरीचें धोरण कां फसलें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. मेरीनें प्रॉटेस्टंटांचा छळ करण्याचें कारण काय ? त्याचा परिणाम काय झाला ?

४. क्रॅन्मरचें चरित्र थोडक्यांत द्या. त्याची महत्त्वाची कामगिरी कोणती ? मेरीचा त्याच्यावर दांत असण्याचें कारण काय ? त्याचा परिणाम काय झाला ?

५. मेरीच्या कारकीर्दींत पोपची सत्ता इंग्लंडांत पुन्हां सुरू होण्याचें कारण काय ? मेरीचा कॅथॉलिकपंथाकडे ओढा कां होता ? त्याचा परिणाम काय झाला ?

६. वॅटच्या बंडाचीं कारणें सांगा. त्याचा परिणाम काय झाला ?

७. इंग्लंडच्या ताब्यांतून कॅले कां गेलें ? त्याचा राणीवर व राष्ट्रावर काय परिणाम झाला ?

८. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
रेनार्ड, रेजिनाल्ड पो, गार्डिनर, फिलिप, रिडले, लॅटिमर, खुनी मेरी, क्रॅन्मर, कॅले, वॅट, गार्डिनर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३४. धर्मसुधारणेची चढती कमान: प्रॉटेस्टंटपंथ कायम रुजला

१. तत्कालीन परिस्थिति :—मेरी मेल्यावर तिच्या मागून एलिझाबेथ इंग्लंडची राणी झाली. त्यावेळीं इंग्लंडची परिस्थिति अत्यंत बिकट होती. अधिकारीवर्ग कायद्यांविरुद्ध वागत असे. सरकारी खजिना रिता पडलेला होता, सैन्याची स्थिति खालावलेली होती, सर्व किल्ले नादुरुस्त झाले होते व आरमारी सामर्थ्य केवळ नामधारीच राहिलेलें होतें. धार्मिक बाबतींत जिकडे तिकडे असंतोष माजून राहिला होता, रोमन कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट व प्यूरिटन असे निरनिराळे पंथ इंग्लंडांत असल्यामुळें व कोणतें मत स्वीकारावें हें लोकांना नीट समजत नसल्यामुळें सर्व लोक धर्मासंबंधीं उदासीन होते. धार्मिक बाबतींत नुसती बजबजपुरी माजली होती! राष्ट्राची दुफळी झाली होती. अशा बिकट परिस्थितीस तोंड देऊन आपलें राष्ट्र वैभवशिखरास नेण्याची मोठी कामगिरी एलिझाबेथवर पडली होती; व तिनें ती उत्कृष्टपणें पार पाडली.

एलिझाबेथ

२. एलिझाबेथ (इ. स. १५५८-१६०३):—ती ॲन बुलीनची मुलगी. राज्यावर आली त्या वेळीं तिचें वय पंचवीस वर्षांचें होतें. ती दिसण्यास मोठी मोहक व सुंदर दिसत असे. तिचे सर्व अवयव रेखीव असून तिची शरीरयष्टी कणखर व मजबूत होती. अधिकारलालसा, स्वार्थीपणा, सत्याची चाड न धरतां बिनदिक्कत वाटेल ती गोष्ट करणें, हेकेखोरपणा, तापटपणा वगैरे अनेक दुर्गुण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिनें बापापासून उचलले होते. तिचा स्वभाव मोठा गोड व मनमिळाऊ असल्यानें ती लौकरच लोकप्रिय होत असे. राजवैभवाचा पुरेपूर फायदा घेऊन राष्ट्राशीं तादात्म्यबुद्धीनें वागण्याचें तिचें धोरण असे. मोठें महत्त्वाचें राजकारण असो अगर साधा खेळ असो, हातीं घेतलेलें प्रत्येक काम ती अत्यंत एकतानतेनें करी. राष्ट्राशीं समरस होऊन प्रत्येक गोष्ट आत्मीय भावनेनें करण्याची ट्यूडर राजांची प्रवृत्ति तिच्या आंगीं पूर्णपणें बाणली होती. 'राष्ट्राचें काम म्हणजे घरचेंच काम' अशा बुद्धीनें तिनें राज्यकारभार हांकण्याचें धोरण ठेवलें. तिचें शिक्षण अत्यंत काळजीपूर्वक झालेलें होतें. लॅटिन व ग्रीक वाङ्मयाचा तिनें कसोशीनें अभ्यास केला होता. फ्रेंच व इटॅलियन भाषा ती सफाईनें बोलत असे. विद्वानांना आश्रय देऊन त्यांच्याकडून उत्तमोत्तम ग्रंथनिष्पत्ति करवून घ्यावी असें तिला वाटे. संगीताची तिला अभिरुचि असे. डामडौल, भपकेदार पोषाख, नटवेपणा यांचा तिला शोक असे. बुद्धीचा तल्लखपणा, दूरदृष्टि व मनाचा खंबीरपणा वगैरे गुण तिच्या ठिकाणीं वसत असले तरी ती मोठी मिजासखोर, रंगेल, भावनाप्रधान व ख्यालीखुशालीनें वागणारी होती. उत्तम व सुंदर पुरुष तिला आवडत व त्यांच्यांशीं तिची वागणूक चांगली नसे असा लोकप्रवाद होता. हा एकच तिचा मोठा दुर्गुण होता. एरवीं राजकारणांत ती धुरंधर होती. माणसाची तिला उत्तम पारख असल्यानें तिनें योग्य सल्लागार नेमले. धर्माच्या बाबतींत ती फारशी आग्रही नव्हती. परधर्मसहिष्णुतेचें धोरण स्वीकारून प्रॉटेस्टंट पंथाचा इंग्लंडमध्यें हळूहळू पण जोरदार रीतीनें तिनें प्रसार केला. तिचें धोरण नेहमीं निश्चित ठरलेलें असे. त्यांत तिनें कधींही बदल केला नाहीं. अशा तऱ्हेनें सर्वतोपरी लायक राणी इंग्लंडला लाभल्यानें इंग्लंडची सर्व प्रकारें भरभराट झाली.

३. एलिझाबेथचे सल्लागार :—सर विल्यम सेसिल ऊर्फ लॉर्ड बर्ले हा तिचा मुख्य मंत्री होता. चाळीस वर्षें त्यानें एलिझाबेथची चाकरी अत्यंत नेकीनें व कसोशीनें केली. तो फडणिशीच्या कामावर होता व तें काम त्यानें अत्यंत चोखपणानें केलें. उत्तम राज्यकर्ती म्हणून एलिझाबेथला जें नांव मिळालें त्याचें बहुतेक सर्व श्रेय त्यालाच आहे. त्याचा मुलगा सर रॉबर्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सेसिल त्याच्या इतकाच चोख, विश्वासू व मेहेनती असल्यानें विल्यम सेसिलच्या मागून राणीनें त्याला मुख्य मंत्र्याची जागा व फडणिशी दिली. विल्यमचा मेहुणा सर निकोलस बेकन व त्याचा मुलगा, प्रसिद्ध तत्त्ववेत्ता सर फ्रॅन्सिस बेकन, यांनींही वेळोवेळीं योग्य सल्ला देऊन राज्यकारभारांत तिला उत्तम प्रकारची मदत केली; परंतु या सर्वांपेक्षांही सर फ्रॅन्सिस वॉल्सिंगहॅम हा अत्यंत दक्ष, विश्वासू व लायक असा एलिझाबेथचा सल्लागार होता. या सर्व सल्लागारांबरोबर कांहीं खुषमस्करेही तिनें जवळ बाळगले

सर विल्यम सेसिल

होते. त्यांच्या संगतींत ती मोठ्या विलासांत व रंगेलपणांत रंगलेली असे! इतर बाबतींत अत्यंत काटकसरीनें व थोडी कंजूषपणानें वागणारी एलिझाबेथ या रंगेल खुषमस्कऱ्यांच्या संगतींत असली म्हणजे पाण्यासारखा पैसा उधळण्यास सदैव तयार असे! या खुषमस्कऱ्यांचा राजा व राणीचा अत्यंत आवडता गृहस्थ म्हणजे नार्दंबरलंडचा धाकटा मुलगा लॉर्ड रॉबर्ट डडले हा होय. यालाच पुढें लेस्टरचा अर्ल करण्यांत आलें. तो राणीचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बालमित्र होता. तो उंची व भपकेदार पोषाख घाली व मोठा मोहक दिसे; म्हणून तो तिला फार आवडत असे. त्याच्याशीं तिनें लग्नही केलें असतें; पण तसें झाल्यास आपल्या हातचा राज्यकारभार त्याच्या हातीं जाईल अशी तिला भीति वाटत असल्यानें तिनें जन्मभर लग्नच केलें नाहीं. त्याच्यावर तिनें अनेक कामगिऱ्या सोंपविल्या व त्या त्यानें सर्व बिघडविल्या, हा त्याचा विशेष होय !

४. एलिझाबेथचें धार्मिक धोरण :—एलिझाबेथ राणी झाल्यावर तिला प्रथमतः धार्मिक प्रश्नाचा निकाल लावणें जरूर होतें. गेल्या पंचवीस वर्षांत धार्मिक बाबतींत अनेक भानगडी झाल्या होत्या. धार्मिक बाबतींत रक्तपात व दंगेधोपेही माजले होते व अनेक प्रॉटेस्टंटांनीं व रोमन कॅथॉलिकांनीं देशत्याग केला होता. राष्ट्रांतील असंतोष थांबवून देशांत शांतता निर्माण व्हावी अशी बहुजन समाजाची इच्छा होती. अशा स्थितींत धार्मिक प्रश्नाचा कायमचा निकाल लावल्याखेरीज देशाला शांतता व स्वस्थता लाभणें अशक्य आहे असें तिला आढळून आलें. राणीनें कोणतें धोरण स्वीकारावें त्याबद्दल अनेकांचीं अनेक मतें होतीं. राणीनें आपल्या धर्मपंथाला उचलून धरून मेरीप्रमाणें त्याचा प्रसार करावा असें कॅथॉलिकांस वाटे; तर अपल्यावर झालेल्या अन्यायाचा सूड घेण्याकरितां तिनें प्रॉटेस्टंट पंथच स्वीकारावा असें प्रॉटेस्टंटांना वाटत होतें. अशा स्थितींत तिच्यापुढें तीन मार्ग मोकळे होते. मेरीप्रमाणें कॅथॉलिक पंथाला व पोपच्या सत्तेला मान्यता देणें व प्रॉटेस्टंटांचा छळ करणें हा पहिला मार्ग. यामुळें तिच्या हातांतील सत्ता नाहींशी होणार होती. म्हणून अधिकारलालसा असलेल्या राणीनें हा मार्ग सोडून दिला. दुसरा मार्ग म्हणजे सहाव्या एडवर्डचें धोरण अनुसरून प्रॉटेस्टंट पंथाला राजाश्रय देऊन त्याचा प्रसार करणें. परंतु प्रॉटेस्टंट मतें तिला पूर्णत्वानें मान्य नव्हतीं. यामुळें हाही मार्ग तिनें त्याज्य ठरविला. तिसरा मार्ग म्हणजे वरील दोन्ही पंथांची सांगड घालून दोघांनाही खूष ठेवण्याचा. हेंच धोरण थोड्या फार अंशानें आठव्या हेन्रीनेंही स्वीकारलेलें होतें. अर्थात् रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट या दोन्ही धर्मपंथांतील लोकांना न दुखवितां धार्मिक प्रश्नाचा निकाल लावण्याचें तिनें ठरविलें. तिच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आईचें–ॲन बुलीनचें–लग्न आठव्या हेन्रीशीं झालें होतें. या लग्नास पोपनें मान्यता दिली नसल्यानें एलिझाबेथ राज्याची खरी वारस होऊंच शकत नाहीं असें त्याचें म्हणणें होतें. अर्थात् अशा स्थितींत एलिझाबेथ पोपच्या सत्तेचा स्वीकार करणें शक्यच नव्हतें. मेरीच्या वेळीं ती रोमन कॅथॉलिक देवळांत जाऊन त्या धर्मपंथाप्रमाणें प्रार्थना वगैरे करण्याचें ढोंगही करी! परंतु तिच्या मनाचा ओढा प्रॉटेस्टंट पंथाकडेच विशेष होता. मात्र ही गोष्ट तिनें लोकांना समजूं दिली नाहीं. त्या पंथाकडे तिचा ओढा असला तरीही तिला त्या पंथाचीं सर्वच तत्त्वें मान्य होतीं असें नाहीं. या सर्व गोष्टींमुळेंच धार्मिक बाबतींत पोपची सत्ता अमान्य करून लोक राणीची सत्ता मान्य करताहेत तोंपर्यंत लोकांना तिनें धार्मिक बाबतींत फारसा त्रास दिला नाहीं. तिला इंग्लंडांत राष्ट्रीय धर्मपीठाची स्थापना करावयाची होती; व त्या पीठाची अधिष्ठात्री देवता तिला स्वतःला व्हावयाचें होतें. या करितांच धार्मिक बाबतींत सुवर्णमध्य गांठण्याचें तिनें ठरविलें.

५. राष्ट्रीय धर्माची स्थापना:—आपल्या धोरणास अनुसरून व प्रॉटेस्टंटपंथाचें पुनरुज्जीवन करण्याच्या हेतूनें राज्यावर आल्याबरोबर प्रॉटेस्टंटांचें हत्त्याकांड तिनें एकदम थांबवून पार्लमेंटची सभा बोलाविली. या पार्लमेंटनें अनेक कायदे पास करून धार्मिक प्रश्नाचा कायमचा निकाल लावला. सन १५५९ मध्यें धार्मिक श्रेष्ठत्वाचा कायदा पास करून पोपची सत्ता झुगारून देण्यांत आली, व इंग्लंडच्या धर्मपीठावर एलिझाबेथची नेमणूक करण्यांत आली. परंतु मुख्याधिकारी पद न स्वीकारतां तिनें आपल्याला 'मुख्य सूत्रधार' असेंच म्हणवून घेण्याचें ठरविलें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्याच वर्षी एकरूपतेचा कायदा पास करण्यांत आला. कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट या दोन्ही पंथांतील लोकांस मान्य होतील असे थोडे फेरफार करून व कांहीं भाग अजीबात गाळून सहाव्या एडवर्डचें प्रार्थनापुस्तक सुरू करण्यांत आलें, व तें प्रार्थनेच्या वेळीं मंदिरांतून वाचण्यांत यावें असें ठरविण्यांत आलें. धर्मगुरूंना लग्न करण्याची परवानगी देण्यांत आली नाहीं. मेरीनें जे धर्ममठ पुन्हां सुरू केले होते ते पुन्हां जप्त करण्यांत आले. मंदिरांतून प्रार्थना इंग्रजींतूनच व्हावी असें ठरविण्यांत येऊन प्रार्थनेला जो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हजर राहणार नाहीं त्याला प्रत्यहीं एक शिलिंग दंडही ठेवण्यांत आला. सन १५५३ मध्यें सहाव्या एडवर्डच्या वेळचीं बेचाळीस धर्मसूत्रें फक्त एकूणचाळीस धर्मसूत्रांत गोंवण्यांत आलीं. धर्मतत्त्वांची सुधारणा करतांना कॅथॉलिकांना रुचणार नाहीं असा भाग काढून टाकण्याची शक्य ती काळजी घेण्यांत आली होती. या सर्व गोष्टींमध्यें एलिझाबेथची मुत्सद्देगिरी लोकांच्या प्रत्ययास आली. अशा रीतीनें तिनें इंग्लंडांत राष्ट्रीय धर्माची स्थापना केली. या पंथाला एपिस्कोपेलियन धर्मपंथ असेंही म्हणतात.

६. धार्मिक सुधारणांचा परिणाम :—एलिझाबेथनें केलेल्या धर्मसुधारणेमुळें फारशी चलबिचल झाली नाहीं; व तिच्या सुधारणा बहुतेक सर्व लोकांनीं मान्य केल्या. या वेळीं इंग्लंडमधील बहुजनसमाजाचा ओढा प्रॉटेस्टंट पंथाकडे होता. उत्तर इंग्लंडमध्यें कॅथॉलिकांचें मताधिक्य होतें; परंतु या दोन्ही पंथांतील लोकांना एलिझाबेथचें धार्मिक धोरण मनापासून आवडलें नाहीं. प्रॉटेस्टंटांना वाटे कीं, राणीनें यापेक्षांही जास्त सुधारणा करणें जरूर होतें. रोमन कॅथॉलिकांना वाटे, राणीनें पोपची सत्ता झुगारून दिली, व मंदिरांतून इंग्रजींतून प्रार्थना सुरू केली ही गोष्ट चांगली केली नाहीं. त्यामुळें अनेक कॅथॉलिक धर्मगुरूंनीं आपली वृत्ति सोडून दिली. तेव्हां एलिझाबेथनें त्यांच्या जागीं नवीन धर्मगुरू व बिशप नेमले, व अनेकांना कैदेंत टाकलें. कँटरबरीच्या आर्चबिशपच्या जागीं तिनें मॅथ्यू पार्कर या बुद्धिमान् व विद्वान् पुरुषाची नेमणूक केली. एलिझाबेथनें धार्मिक बाबतींत स्वीकारलेलें सुवर्णमध्याचें धोरण त्याला पूर्णपणें मान्य असल्यानें राणीला त्याची चांगलीच मदत झाली. नास्तिकांना कडक शिक्षा करणें किंबहुना त्यांना जिवंत जाळण्याची शिक्षा करणें एलिझाबेथला मान्य नव्हतें व म्हणूनच मेरीनें नास्तिकांविरुद्ध जे कायदे केले होते त्यांची अंमलबजावणी करण्याचें मूर्खपणाचें धोरण एलिझाबेथनें स्वीकारलें नाहीं. तरी सन १५५९ मध्यें 'हाय कमिशन' कोर्टाची स्थापना करून आर्चबिशप पार्करला तिनें त्याचा अध्यक्ष नेमलें. त्यांत एकंदर चव्वेचाळीस सभासद होते. एलिझाबेथनें पास केलेल्या धर्मासंबंधीं कायद्यांचें जो उल्लंघन करील त्याची चौकशी करून त्याला शिक्षा करण्याचें काम या कोर्टाकडे सोंपविण्यांत आलें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या कोर्टाचे सभासद गांवोगांव हिंडत व नास्तिकांना व अनीतिमान् धर्म-गुरूंना हुडकून काढून या कोर्टापुढें खेचून आणीत असत.

७. पोपकृत बहिष्कार :—एलिझाबेथनें जी धार्मिक पुनर्घटना केली ती बऱ्याच लोकांस रुचली नाहीं. तरी एलिझाबेथनें प्रथम प्रथम आपल्या कायद्यांची अंमलबजावणी फार कडक रीतीनें होऊं दिली नाहीं. सर्व बिशप, पाद्री व धर्मगुरू यांना धार्मिक श्रेष्ठत्वाची शपथ घ्यावी लागत असे. ती आठशेंपैकीं फक्त दोनशेंनीं घेण्याचें नाकारलें व त्यांनी आपली वृत्ति सोडून दिली. तसेंच प्रत्येकाला दर रविवारीं मंदिरांत जाऊन नवीन प्रार्थना-पुस्तकाप्रमाणें प्रार्थना करण्याची सक्ति करण्यांत आली होती व न केल्यास दर वेळीं एक शिलिंग याप्रमाणें दंड द्यावा लागत असे. अनेक कॅथॉलि-कांनीं हा दंड भरला; परंतु जसजसे दिवस जाऊं लागले तसतशी काय-द्यांची अंमलबजावणी कडक रीतीनें होऊं लागली. तेव्हां त्यांची स्थिति अत्यंत चमत्कारिक झाली. एलिझाबेथसंबंधीं धार्मिक श्रेष्ठत्वाची शपथ घ्यावी तर पोपची अवज्ञा केल्याचा आरोप आपल्यावर येऊन आपण खरे रोमन कॅथॉलिक नाहीं, असें लोक म्हणणार; बरें, घेतली नाहीं तर आपण राजनिष्ठ नाहीं असें राणी म्हणणार व शिक्षा करणार. अशा पेचांत अनेक कॅथॉलिक सांपडले होते. परंतु पुढें सन १५७० मध्यें पोपनें एक फर्मान काढून 'एलिझाबेथ नास्तिक असून, गादीचा तिनें अपहार केला आहे,' तेव्हां तिला धर्मबहिष्कृत केल्याचें व तिला पदच्युत करून ती या पुढें इंग्लंडची राणी नसल्याचें त्यानें जाहीर केलें. अर्थात् रोमन कॅथॉलिकांनीं यापुढें इंग्लिश मंदिरांतून प्रार्थनेला जाऊं नये व राणीच्या आज्ञा मानूं नयेत असाही एक विचित्र हुकूम त्यानें सोडला ! अशा स्थितींत डगमगून न जातां राणीनें पार्लमेंट भरवून एक नवीन कायदा पास करून घेतला व राणीला नास्तिक अगर गादीचा अपहार करणारी असें म्हणणारास राजद्रोही समजण्यांत येईल असें तिनें जाहीर करून पोपला चांगलेंच उत्तर दिलें. यामुळें तर रोमन कॅथॉलिक फारच मोठ्या पेचांत पडले. रोमन कॅथॉलिकांविरुद्ध मंत्रिमंडळानें कडक कायदे पास केले. परंतु राणीनें त्यांची अंमलबजावणी होऊं दिली नाहीं. हाय कमिशन कोर्टा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढें जे कॅथॉलिक येत त्यांना खालील प्रश्न नेहमीं विचारले जात. ‘ राणी म्हणून एलिझाबेथला तूं मानायला तयार आहेस का ? ’ ‘ राणीला धर्मबहिष्कृत करण्याचा पोपला अधिकार आहे का ? ’ ‘ परकीय कॅथॉलिक सत्तेनें इंग्लंडवर स्वारी केल्यास तूं कोणत्या बाजूनें लढशील ? ’ रोमन कॅथॉलिकांचा छळ करावा अशी राणीची इच्छा नव्हती. परंतु त्यांनीं



आपल्या पंथांत सामील व्हावें व राष्ट्राची एकी वाढवावी अशी तिची सदैव इच्छा असे.

८. **प्यूरिटन लोक :**—एलिझाबेथ राणीनेंरो मन कॅथॉलिकांविरुद्धच केवळ कायदे पास केले असें नव्हे. तर कांहीं जहाल प्रॉटेस्टंटांविरुद्धही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कायदे केले होते. मेरीच्या छळाला कंटाळून अनेक प्रॉटेस्टंट लोकांनीं देशत्याग केला होता. ते जिनीव्हाला जाऊन कॅलव्हिनजवळ राहिले व त्याच्या धर्मतत्त्वांचा त्यांनीं अभ्यास केला. मेरीच्या मृत्यूनंतर हे लोक इंग्लंडला परत आले. ते आपल्याला जहाल प्रॉटेस्टंट अथवा 'प्यूरिटन्स' असें म्हणवून घेत. त्यांचा पंथ इंग्लंडमध्यें हळू हळू वाढूं लागला. एलिझाबेथच्या धर्मसुधारणांबद्दल त्यांनीं तीव्र असंतोष प्रदर्शित केला; व त्यांत आणखी सुधारणा घडवून आणण्याकरितां आपल्या पंथाचीं तत्त्वें लोकांत प्रसृत करण्यास त्यांनीं सुरुवात केली. त्यांना बिशपांची सत्ता अमान्य असून धर्मप्रार्थना अगदीं साधी असावी, लग्नांत आंगठीची अदलाबदल करूं नये, मंदिरांत खिस्ताचा क्रॉस नसावा, प्रार्थनेच्या वेळीं ऑर्गनची साथ नसावी, मंदिरांत चित्रें नसावींत वगैरे अनेक सुधारणा त्यांना घडवून आणावयाच्या होत्या. एलिझाबेथला त्यांची चळवळ मान्य नव्हती म्हणून प्यूरिटन लोकां-विरुद्ध तिनें अनेक कडक कायदे केले. तिच्या सल्ल्यानें कँटरबरीचा आर्च-बिशप मॅथ्यू पार्कर यानें 'जाहिरनामे' प्रसिद्ध करून प्रस्थापित धर्माप्रमाणें प्यूरिटन लोकांनीं वागलें पाहिजे अशी इशारत दिली होती. परंतु त्याप्रमाणें ते वागले नाहींत. तेव्हां रोमन कॅथॉलिकांप्रमाणेंच त्यांचाही छळ होऊं लागला. त्यांनाही दर दिवसास एक शिलिंग याप्रमाणें दंड द्यावा लागत असे. दंड, कैद, हद्दपारी वगैरे अनेक प्रकारच्या शिक्षाही त्यांस होऊं लागल्या; तेव्हां अनेकांनीं इंग्लंड सोडलें. परंतु त्यांच्या मतांचा इंग्लंडमध्यें अतिशय फैलाव होऊं लागला; व हळू हळू खुद्द पार्लमेंटचे बरेच सभासदही त्या पंथाचे अनुयायी बनले. प्यूरिटनांना साधी राहणी व उच्च विचार-सरणी आवडत असे. निव्वळ डामडौल, भपका व करमणूक यांमध्यें रंगून जाण्यापेक्षां प्रत्येकानें साधेपणानें राहून आपलें आचरण पवित्र ठेवावें असें ते म्हणत असत. आर्चबिशप, बिशप वगैरे लोकांच्या हातीं धर्मसत्ता न ठेवतां ती एका धर्ममंडळाकडे ठेवावी, या मंडळांत लायक, अनुभवी व विचारवान लोक नेमावेत व त्यांना 'प्रेसबीटर' असें म्हणण्यांत यावें, त्या सर्वांचा दर्जा सारखा असावा असें प्यूरिटन म्हणत. त्यांच्या पंथाला 'प्रेसबिटेरियन पंथ,' असें नांव मिळालें होतें. राहणी, विचारसरणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व प्रार्थना या सर्वांत या लोकांनीं स्वातंत्र्य, पावित्र्य व साधेपणा पुरस्कारिला म्हणून यांना प्यूरिटन्स असेंही म्हणतात. त्यांचा पुढारी जॉननॉक्स होय.

९. जॉन नॉक्स :—प्यूरिटन लोकांचा पुढारी व कॅलव्हिनचा शिष्य जॉन नॉक्स याचा जन्म सन १५०५ मध्यें झाला. प्रथमतः तो रोमन कॅथॉलिक चर्चमध्यें धर्मोपदेशक होता. कॅलव्हिनजवळ जिनीव्हाला त्यानें धर्मतत्त्वांचा खोल अभ्यास केला व तो प्यूरिटन बनला. त्याचीं प्रवचनें अत्यंत रसाळ व स्फूर्तिदायक असत. रिकामा डामडौल त्याला कधींही पसंत नसून 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' हें त्याचें ध्येय होतें. इंग्लंडमध्यें त्याचें जमेना म्हणून तो स्कॉटलंडमध्यें गेला. तेथें

जॉन नॉक्स

भपकेवाज व डामडौली राहणीबद्दल स्कॉटलंडची राणी मेरी हिची कानउघाडणी करण्यास तो डगमगला नाहीं. तेव्हां राणीनें त्याला कैदेंत टाकलें. त्यावेळीं त्याचें वय फक्त चोवीस वर्षांचें होतें. स्त्रियांनीं राज्य करूं नये असें त्याचें स्पष्ट मत होतें. स्कॉटलंडमधील प्रेसबिटेरियन धर्मपंथाचा तो मूळ संस्थापक होय. धर्मसंस्थेवर राजाची अगर पोपची सत्ता मुळींच नसावी व त्याऐवजीं धर्मगुरू व वृद्ध व ज्ञानी लोकांच्या हातीं धर्मखात्याची सर्व व्यवस्था असावी, असें या पंथांतील लोकांचें मत होतें. या मंडळांतील लोकांची निवडणूक लोकांनीं करावी असें या पंथाचें तत्त्व असे. हटवादी व एककल्ली असूनही जॉन नॉक्स याच्या अंगीं अतुल धैर्य होतें; मात्र त्याचीं मतें पूर्ण विचारान्तीं बनलेलीं नसत. त्यानें मेरीबरोबर अनेक वेळां धर्मचर्चा केली; परंतु त्या दोघांचें कधींही पटलें नाहीं. 'स्कॉटलंडच्या नाशास कारणीभूत होणारी राणी' असें तो तिच्यासंबंधीं म्हणे. तो सन १५७२ त मेला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अ भ्या स

१. एलिझाबेथनें कोणतें धार्मिक धोरण स्वीकारलें ? असें करण्याचें कारण काय ? तिचा ओढा कोणत्या धर्मपंथाकडे होता ? मग तिनें धर्मसहिष्णुतेचें धोरण कां स्वीकारलें ? त्याचा परिणाम काय झाला ? तिनें हाय कमिशन कोर्ट कां स्थापलें ?

२. स्त्री या नात्यानें एलिझाबेथची योग्यता सांगा.

३. एलिझाबेथनें राष्ट्रीय धर्माची स्थापना कशी केली तें थोडक्यांत सांगा.

४. कॅथॉलिक पंथीयांनीं एलिझाबेथला मान तुकविली कां ? ज्यांना तिचें धोरण मान्य नव्हतें त्यांनीं काय केलें ? त्यांच्याविरुद्ध एलिझाबेथनें कोणते कायदे पास केले ?

५. पोपनें एलिझाबेथवर धर्मबहिष्कार कां पुकारला ? त्याला एलिझाबेथनें काय उत्तर दिलें ? त्याचा परिणाम काय झाला ?

६. प्यूरिटन लोकांसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या. त्यांना जहाल प्रॉटेस्टंट कां म्हणत ?

७. खालील व्यक्तींसंबंधीं माहिती सांगा.
लॉर्ड सेसिल, मॅथ्यू पार्कर, लेस्टरचा अर्ल, सर रॉबर्ट सेसिल, जॉन नॉक्स, बेकन, वॉल्सिंगहॅम.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३५. एलिझाबेथ व स्कॉटलंडची राणी मेरी

१. इंग्लंड व स्कॉटलंड यांचे संबंध :—इंग्लंडमध्यें धर्माची घडी नीट बसविल्यावर एलिझाबेथला परराष्ट्रीय राजकारणाकडे व त्यांतल्या-त्यांत स्कॉटलंडकडे लक्ष द्यावें लागलें. अनेक शतकें इंग्लंड व स्कॉटलंड यांच्या एकसारख्या लढाया होत होत्या; व युद्ध चालू नसतांही स्कॉटलंड व इंग्लंड यांच्या सरहद्दीवर नेहमीं अशांतताच असे. या दोन्ही देशांत मैत्री नांदावी म्हणून अनेक प्रयत्न करण्यांत आले. सातव्या हेन्रीनें लग्नसंबंध घडवून आणून स्कॉटलंडशीं मैत्री जोडली. परंतु ती फार दिवस टिकली नाहीं. आठव्या हेन्रीच्या व सहाव्या एडवर्डच्या कारकीर्दीत तसेच प्रयत्न झाले. परंतु स्कॉटलंडचा ओढा फ्रान्सकडे असल्यानें व स्कॉटिश जनता इंग्रजांना आपले पिढीजाद शत्रु समजत असल्यानें वरील सर्व प्रयत्न फसले. एलिझाबेथच्या वेळीं स्कॉटलंडच्या गादीवर मेरी होती. लहानपणापासून ती फ्रान्समध्यें वाढली. तिचें शिक्षणही तेथेंच झालें व वयांत आल्यावर फ्रान्सच्या युवराजाशीं तिनें लग्नही केलें. तिचा नवरा दुसरा फ्रॅन्सिस पुढें फ्रान्सचा राजा झाला व त्यामुळें मेरी फ्रान्सची राणी झाली. अर्थात् एका राजाराणीच्या अंमलाखालीं फ्रान्स व स्कॉटलंड असे दोन्ही देश आले. फ्रान्सही इंग्लंडचा पिढीजात शत्रू! त्यामुळें इंग्लंड एकटें पडलें व स्कॉटलंड आणि फ्रान्स एक झाल्यानें मैत्री दूर राहून इंग्लंड व स्कॉटलंड यांच्यांत वैर जास्त माजलें. याशिवाय मेरी अल्पवयी असतां तिची आई गाइस्‌ची मेरी राज्यकारभार पाही. त्या वेळीं तिचे सर्व सल्लागार फ्रेंच असल्यानें व ती स्वतःही फ्रेंच स्त्री असल्यानें स्कॉटलंडमध्यें इंग्लंड–विरोधी वातावरण नांदत होतें. अशा स्थितींत स्कॉटलंडमध्यें धार्मिक बाबतींत राणी व प्रजा यांच्यांत तेढ आली. स्कॉटलंडमध्यें जॉन नॉक्स आपल्या प्रॉटेस्टंट–प्यूरिटन-धर्मतत्त्वांचा प्रसार करीत होता. एका स्त्रीनें राज्यकारभार करावा ही गोष्ट त्याला मुळींच पसंत नव्हती. त्याला स्कॉटलंडमध्यें अनेक अनुयायी मिळाले व त्यांनीं त्याचा प्रेसबिटेरियन पंथ स्वीकारला. या सर्व लोकांच्या मनांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गाइस्‌ची मेरी व तिचे फ्रेंच सल्लागार यांच्याबद्दल तिरस्कार भरला होता. तेव्हां त्यांच्याविरुद्ध आपल्याला मदत करण्याबद्दल या प्रॉटेस्टंटांनीं इंग्लंडची मदत मागितली. जॉन नॉक्स व त्याचे प्यूरिटन अनुयायी यांच्याबद्दल एलिझाबेथला आपलेपणा वाटत नव्हता. पण त्यांना मदत केल्यास स्कॉटलंडमधील फ्रेंचांचें वजन नाहींसें होईल म्हणून त्यांना मदत करण्याचें तिनें वचन दिलें व थोडें सैन्य व आरमार स्कॉटलंडकडे रवाना केलें. परंतु पुढें गाइस्‌ची मेरी व तिचे फ्रेंच सल्लागार यांनीं स्कॉटलंड सोडून फ्रान्समध्यें निघून जावें, असा मेरी व प्यूरिटन लोक यांच्यांमध्यें तह झाल्यानें हें युद्ध झालें नाहीं. याच सुमारास मेरीचा फ्रेंच नवरा मेला व कांहीं फ्रेंच सल्लागारांसह ती स्कॉटलंडला परत आली. त्या वेळीं या विधवा राणीचें वय अवघें एकोणीस होतें.

२. स्कॉटलंडची राणी मेरी :—मेरी दिसण्यांत मोठी अतिसुंदर व मोहक असे. 'तिच्या मोहक सौंदर्याकडे पहाणारा कोणींही सहज भारून जात असे,' असें एकानें तिच्या आकर्षकतेचें वर्णन केलें आहे. परंतु मोहक व सुंदर असली तरी स्वभावानें ती दुर्बल होती. मेरी मोठी चतुर, कलाकुसरीची व छानछोकीची आवड असणारी तल्लख स्त्री होती. 'ईश्वरानें स्त्रीपेक्षां मला पुरुष बनविलें असतें तर घोडा व तरवार यांच्यासह मी रात्रन् रात्र रानां–वनांतून आनंदानें भटकलें असतें,' असें ती वारंवार म्हणे. जनावरें तिला फार आवडत व शिकारीचा तिला

स्कॉटलंडची राणी मेरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अत्यंत नाद असे. कोणाही मनुष्यावर तिची एकदम छाप पडे. लोकांचा लोभ व माया संपादन करून त्यांना वश करून घेण्याची कला तिच्या ठिकाणीं अभिजात होती. निर्भय सडेतोडपणा, सीधेपणा, बोलण्यांतील साधेपणा वगैरे गुणांनीं युक्त असलेली मेरी मोठी महात्त्वाकांक्षी असून तिच्या ठिकाणीं अधिकारलालसा जबरदस्त होती. कामाची चिकाटी व राजकारणकुशलता तिच्या अंगी मुळींच नव्हती. धरसोडीची वागणूक तिच्या पांचवीलाच पुजलेली असे! तिचा मोठा दुर्गुण म्हणजे ती अत्यंत कामुक होती. देशभक्ति हा गुण तिच्या व्यवहार–कोशांत मुळींच नव्हता. धार्मिक बाबतींत ती रोमन कॅथॉलिक पंथाची अभिमानी असल्यामुळें त्या धर्माचा प्रसार करण्याकरितां सर्व जन्मभर तिनें जिवापाड मेहेनत केली. हातीं घेतलेल्या कोणत्याही कामांत तिला कधींच यश आलें नाहीं. हें तिचें दुर्दैव होय. फ्रान्समधून ती स्कॉटलंडला आली त्या वेळीं नंदनवनांतून एका ओसाड प्रदेशांत आल्यासारखें तिला वाटूं लागलें! तेथील लोक पहावे तर तेही रोमन कॅथॉलिक पंथ सोडून जॉन नॉक्सच्या प्यूरिटन पंथांत शिरलेले! अशा बिकट परिस्थितींत ती पडलेली होती.

३. एलिझाबेथला पेंच:—इकडे एलिझाबेथही पेंचांत पडली. नात्यानें मेरी ही एलिझाबेथची दूरची भाची. अर्थात् इंग्लंडच्या गादीवर ती वारसा सांगायची, अशी एलिझाबेथला भीति वाटत होती. ज्या कॅथॉलिकांचा एलिझाबेथनें छळ करावयाला सुरवात केली होती, त्यांना वाटे कीं, ज्या अर्थी एलिझाबेथचा वारसा पोपनें अमान्य केला त्या अर्थी मेरीचाच हक्क इंग्लंडच्या गादीवर जास्त पोंचतो. एक वेळ एलिझाबेथचा हक्क मान्य केला तरीही एलिझाबेथला मुलें न झाल्यास तिच्यानंतर इंग्लंडच्या गादीवर मेरीचाच वारसा पोंचतो. तेव्हां मेरी हीच आमची राणी होण्यास योग्य होय. याच वेळीं मेरीनेंही इंग्लंडच्या गादीवर आपला हक्क असल्याचें जाहीर केलें व ती आपल्याला इंग्लंडची राणी म्हणवूं लागली. यामुळें पुढें जवळ जवळ सत्तावीस वर्षें एलिझाबेथ व मेरी यांच्यामध्यें इंग्लंडच्या गादीबद्दल एकसारखी चुरस लागून राहिली होती.

४. मेरी व डार्नले:—फ्रान्समधून स्कॉटलंडमध्यें आल्यावर मेरीला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यकारभार हातीं घ्यावा लागला; परंतु राज्यकारभारांत तिचें फारसें लक्ष नसे. 'सकाळीं शिकार व संध्याकाळीं नाचरंग' यांतच तिचा बहुतेक वेळ जात असल्यानें तिची प्रॉटेस्टंट प्रजा तिच्यावर रुष्ट झाली होती. तिच्यानंतर राज्याला वारस नसल्यानें तिनें लग्न करावें असें तिच्या सरदारांस वाटे. तेव्हां तिनें हेन्री डार्नले याच्याशीं दुसरें लग्न केलें. सातव्या हेन्रीची मुलगी व मेरीची आजी, मार्गारेट, हिनें चौथ्या जेम्सच्या मृत्यूनंतर लॉर्ड अँगसशीं दुसरें लग्न केलें होतें. त्याचा मुलगा डार्नले होय. यामुळें इंग्लंडच्या गादीवरील आपला हक्क शाबीत करण्यास जास्त जोर येईल, असें मेरीला वाटत होतें. धर्मानें रोमन कॅथॉलिक व वयानें आपल्या बायकोपेक्षां लहान असलेला डार्नले मूर्ख, अविचारी व मत्सरी असल्यानें त्याचें व मेरीचें कधीं पटलें नाहीं. मेरीलाही तो आवडत नसे. दोघांनाही हें लग्न पसंत नव्हतें. सन १५६६ मध्यें मेरीला मुलगा झाला. त्याचें नांव जेम्स. याच सुमारास डार्नलेच्या मत्सरी स्वभावानें उचल घेतली. डार्नलेशीं पटत नसल्यानें मेरी रीसियो नांवाच्या आपल्या खासगी चिटणिसाबरोबरच आपला बराच वेळ खर्च करूं लागली. रीसियो हा इटॅलियन होता; व तो आपल्या बायकोला जास्त आवडतो ही गोष्ट न खपून मत्सरी डार्नलेनें एके रात्रीं मेरी, रीसियो व तिचे इतर इष्टमित्र जेवीत असतां कांहीं हत्यारी लोकांसह तेथें जाऊन रीसियोचा खून केला. या गोष्टीचा मेरीला फार राग आला. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं लॉर्ड बॉथवेल यानें डार्नलेचाही खून केला. डार्नलेच्या खून प्रकरणांत मेरीचेंही अंग असावें, असा लोकांचा संशय होता. त्यानंतर बॉथवेलला खुनी म्हणून कोर्टांत खेंचण्यांत आलें; परंतु आपल्या सैन्याच्या जोरावर त्यानें ज्यूरीला दम भरून स्वतःची सुटका करून घेतली! नंतर मोठ्या सैन्यानिशीं त्यानें राणीवरही चालून जाऊन तिला कैद केलें व तिच्या मनाविरुद्ध तिच्याशीं स्वतःचें लग्न लावून घेतलें.

५. मेरीची कैद व सुटका:—या घटनेमुळें मेरीवर लोक अत्यंत चिडले व लॉर्ड मोरे यानें मोठें सैन्य जमा करून बंडाचा झेंडा उभारला. कारबेरी टेकडीजवळ सन १५६७ मध्यें बंडवाले व मेरी—बॉथवेल यांच्यामध्यें मोठी लढाई होऊन मेरीचा पराभव झाला; तेव्हां बॉथवेल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डेन्मार्कला पळून गेला. बंडवाल्यांनीं मेरीला लॉकलेव्हन किल्ल्यांत कैदेंत ठेवून दिलें. तेथें असतां 'स्कॉटलंडच्या गादीवर माझा हक्क नाहीं व माझ्या लहान मुलाला राजा करावें,' असें त्यांनीं तिला मान्य करण्यास भाग पाडलें. कैदेंत असतां तिच्या सुटकेकरितां तिच्या अनुयायांनीं अनेक खटपटी केल्या व गुप्त वेषानें तिला पळविण्याचाही त्यांनीं एकदां निष्फळ प्रयत्न केला. शेवटीं सन १५६८ मध्यें त्यांचा प्रयत्न यशस्वी होऊन मेरीला त्यांनीं कैदेंतून पळविली. तेव्हां लढाई सुरू झाली; मेरीला पळण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. तेव्हां नाइलाजास्तव ती एलिझाबेथचा आश्रय मिळविण्याकरितां इंग्लंडमध्यें कंबरलंड परगण्यांत गुप्तपणें आली; व अत्यंत कळकळीची प्रार्थना करून तिनें एलिझाबेथची मदत मागितली.

६. एलिझाबेथ व मेरी:—एलिझाबेथनें मेरीसंबंधानें आपलें धोरण अत्यंत सावधगिरीचें ठेवलें होतें. परंतु मेरी इंग्लंडमध्यें आल्यावर तिच्या मनाच्या स्थितींत थोडी चलबिचल झाली. तिला मदत न केली तर मेरी फ्रान्समध्यें अगर स्पेनमध्यें जाणार व तेथील एखाद्या राजाशीं लग्न करून इंग्लंडवरील स्वतःचा वारसा शाबीत करण्याकरितां स्वारी करणार, हें ठरलेलें होतें. बरें, तिला स्कॉटलंडांत परत पाठवावी तर डार्नलेच्या खुनाबद्दल व तुरुंगांतून पळून गेल्याबद्दल तिच्या प्रजाजनांनीं तिला देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा दिली असती. मेरीला मदत करावयाची तर इंग्लंडांतील कॅथॉलिकांचें फावणार, व ते तिच्या वतीनें गुप्त कारस्थानें रचून एलिझाबेथला सतावून सोडणार. अशा स्थितींत एलिझाबेथनें मेरीला मोठ्या प्रेमानें पत्र लिहून तिला मदत करण्याचें आश्वासन दिलें; व बोल्टन किल्ल्यांत तिला कैदेंत ठेवलें. त्यानंतर तिच्या अपराधांची चौकशी करण्याचें ठरवून यॉर्कला एक कोर्टही तिनें नेमलें. मेरी इंग्लंडमध्यें आली हें कळतांच रोमन कॅथॉलिकांनीं तिची सोडवणुक करून इंग्लंडच्या गादीवर तिची स्थापना करण्याकरितां कारस्थानें व कट करण्यास सुरुवात केली. सन १५६९ मध्यें नॉर्फोकच्या ड्यूकनें तिच्याशीं लग्न करण्याची इच्छा दर्शविली, तेव्हां त्याला कैद करण्यांत आलें. त्याच वर्षी नॉर्दंबरलंड व वेस्टमोरलंडच्या उमरावांनीं बंड उभारून तिच्या सुटकेचा प्रयत्न चालविला. एलिझाबेथनें त्यांच्या बंडाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तावडतोब बीमोड करून मेरीला उत्तर इंग्लंडांतून उचलून मध्य इंग्लंडांतील एका किल्ल्यांत तुरुंगांत ठेवलें. मेरीच्या बाजूनें कारस्थानें रचणारे लोक जेसुइट व रोमन कॅथॉलिक होते; व त्यांच्यांत परकीयांचाही भरणा पुष्कळ होता. तेव्हां त्यांचें निर्मूलन करण्याचें ठरवून एलिझाबेथनें रोमन कॅथॉलिकांवर हत्यार उपसलें; व त्यांच्या छळास सुरुवात झाली. आपण केलेल्या सर्व धार्मिक कायद्यांची अंमलबजावणी करण्याचें ठरवून ते मोडणारांस तिनें कडक शिक्षा देण्यास सुरुवात केली.

७. मेरीचा वध :—या सुमारास सन १५७० मध्यें पोपनें एलिझाबेथला धर्मबहिष्कृत केल्याचें जाहीर केलें; व तिचे हुकूम कोणींही मानूं नयेत असें फर्माविलें. यामुळें कॅथॉलिक लोक जास्त चेतले व त्यांनीं एलिझाबेथला राज्यावरून काढून टाकून मेरीला इंग्लंडच्या राज्यावर बसविण्याकरितां अनेक कारस्थानें रचलीं. त्या सर्वांत सन १५८६ सालचा अँथनी बॅबिंग्टन यानें रचलेला 'बॅबिंग्टनचा कट' महत्त्वाचा होय. परंतु तो कट एलिझाबेथचा चिटणीस वॉल्हिंगहॅम याच्यामुळें उघडकीस आल्यानें बॅबिंग्टनला फांशीं जावें लागलें. या सर्व कटांचा परिणाम असा झाला कीं, मेरीला जिवंत ठेवणें म्हणजे आपल्यावर आपत्ति ओढवून घेणें होय असें एलिझाबेथचे प्रधान तिला सांगूं लागले. राणीला ही गोष्ट प्रथमतः फारशी मान्य नव्हती. मेरीला ठार केल्यास इतर राष्ट्रांच्या भावना दुखविल्या जातील अशी राणीची दृढ समजूत होती. पण सन १५८६ मध्यें प्रधानांनीं बॅबिंग्टन कटाशीं मेरीचा संबंध असल्याचें सिद्ध करून दाखवून कसेंबसें राणीचें मन वळवून मेरीच्या वधाचा हुकूम तिच्याकडून मिळविला व लगेच तिला सन १५८७ मध्यें फांशीं देण्यांत आलें. एलिझाबेथचा एक प्रतिस्पर्धी नाहींसा झाला खरा पण त्यामुळें कॅथॉलिक पंथीय युरोपियन राष्ट्रांना मोठाच धक्का बसला. इंग्लिश प्रॉटेस्टंटांची एलिझाबेथला सहानुभूति लाभली असली तरी मेरीच्या वधामुळें इंग्लंडवर एका नवीन संकटाची आपत्ति कोसळणार अशीं चिन्हेंही या वेळीं दिसूं लागलीं !

अभ्यास

१. स्कॉटलंडची राणी मेरी हिचें चरित्र थोडक्यांत द्या.
२. ट्यूडरांच्या कारकीर्दींत स्कॉटलंड व इंग्लंड यांचे संबंध कसे होते ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. एलिझाबेथनें मेरीला मदत केली असती तर काय झालें असतें? एलिझाबेथच्या कैदेंत मेरी असतां कॅथॉलिकांनीं तिच्या सुटकेकरितां कोणकोणते प्रयत्न केले? त्यांचा परिणाम काय झाला?

४. खालील व्यक्तींसंबंधीं थोडक्यांत हकीकत सांगा.
चार्ल्स डार्नले, रीसियो, गाइसची मेरी, अँथनी बॅबिंग्टन, जॉन नॉक्स, बॉथवेल.

उतारे

१. स्कॉटलंडची राणी मेरी हिच्या वधाकरितां पार्लमेंटनें एलिझाबेथला विनविलें असतां राणीनें पाठविलेलें उत्तर-१५८६.

स्कॉटलंडची राणी मेरी हिचें पूर्ववैभव, तिचा श्रेष्ठ दर्जा, तरुणपणीं तिनें उपभोगिलेली श्रीमंती व त्यावेळचें तिचें भाग्य, तिचें व माझें अत्यंत निकटचें नातें व स्त्रीत्वामुळें आम्हां दोघींमधील साम्य या सर्व गोष्टी लक्षांत घेतां तिचा वध होऊं नये असेंच मला वाटतें. यदाकदाचित् वध झालाच तर त्याबद्दल मला अत्यंत वाईट वाटून माझा जीव तिच्याकरितां हळहळेल; व याकरितांच मेरीचा वध करण्यासंबंधाची तुमची विनंती मला मान्य करतां येत नाहीं. या देशाच्या संरक्षणाकरितां व खुद्द माझ्या संरक्षणाकरितां मेरीचा वध करणें एवढा एकच उपाय नाहीं. अर्थात माझा व माझ्या सरकारचा नाश टाळण्याकरितां पार्लमेंटला अनेक उपाय उपयोजितां येतील, व तसे उपाय उपयोजिण्याची मी तुम्हांला पूर्ण मुभा देतें.

२. राणीच्या वरील संदेशास पार्लमेंटचें उत्तर.

वरील प्रश्नाचा विचार करण्याकरितां आम्ही आजवर अनेक सभा भरविल्या व वादविवाद केला; परंतु आम्ही सुचविलेल्या उपायाशिवाय देशाच्या व आमच्या परम थोर राज्ञीच्या रक्षणाचा, मेरीच्या वधाशिवाय, आम्हांस दुसरा कोणताही उपाय सांपडत नाहीं; तरी आमच्या विनंतीचा पुन्हां विचार व्हावा.

३. राणीचें उत्तर

मी शपथपूर्वक कळवितें कीं तुमची विनंती मला मान्य करतां येत नाहीं. यापेक्षां मला जास्त कांहींच सांगतां येत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न :—१. मेरीचा वध करावा असें पार्लमेंटला कां वाटत होतें ? तो करूं नये असें राणीला कां वाटत होतें ?

२. मेरीचा वध झाला असता तर एलिझाबेथला काय वाटलें असतें ? कशावरून ?

३. यावरून एलिझाबेथबद्दल तुम्हांस काय वाटतें ?

४. मेरीच्या वधानंतर एलिझाबेथनें जेम्सला पाठविलेलें पत्र–१५८७.

प्रिय चिरंजीव,

जी दुःखद गोष्ट घडूं नये असें मला मनापासून वाटत होतें, ती घडल्यामुळें माझ्या मनाला किती वेदना होत असतील तें एक माझें मलाच माहीत. या बाबतींत माझें वर्तन किती निष्कलंक आहे, तें एक परमेश्वरच जाणें ! किंवा ज्यांना सर्व गोष्टी माहीत आहेत तेच जाणोत. मला जें जें कांहीं करतां येणें शक्य होतें तें तें मी सर्व केलें होतें हें मी तुला आर्जवून सांगतें. मी कांहीं इतकी दुधखुळी नाहीं कीं वाटेल त्यानें, वाटेल त्या राजपुत्रानें, माझ्याकडून वाटेल ती गोष्ट करवून घ्यावी. कोणतीही न्याय्य गोष्ट करण्यास मी कधींही कचरणार नाहीं व केलीच तर ती मी कधींही नाकबूल करणार नाहीं. माझें कुलही हीन नाहीं; किंवा मीही दुष्ट नाहीं. मी कोणतीही गोष्ट छपविण्याचा प्रयत्न करीत नाहीं; तर उलट ती कशी घडली तें स्पष्टपणें सांगतें. या माझ्या स्वभावानुसार जें घडून येणें जरूर होतें तेंच घडून आलें आहे व माझी इच्छा असती तर ही गोष्ट मी दुसऱ्यावरही ढकलून दिली असती; पण तसें मला करावयाचें नाहीं. या जगांत माझ्या इतका निकटचा, प्रेमळ व प्रामाणिक मित्र मिळणें दुरापास्त आहे, याची तूं खात्री बाळग. एवढेंच नव्हे, तर तुझी काळजी व तुझ्या राज्याचें कल्याण इच्छिणारी माझ्याशिवाय दुसरी कोणींही तुला आढळणार नाहीं. तुला दीर्घायुष्य मिळावें व तूं पुष्कळ वर्षे राज्य करावेंस अशी प्रार्थना करून मी तांतडीनें लिहिलेलें हें पत्र संपवितें.

प्रश्न :—१. वरील पत्रावरून एलिझाबेथबद्दल तुम्हांस काय वाटतें ? तिचा कोणता स्वभावविशेष तुम्हांस कळतो ? कशावरून ?

२. तिनें लिहिलेली हकीकत खरी आहे का ? कशावरून ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३६. इंग्लिश आरमाराची वाढ : समुद्रावरील कुत्रे

१. आरमाराची उत्पत्ति :—ट्यूडर काळांत इंग्लिश आरमाराची वाढ अत्यंत झपाट्यानें झाली. सातवा हेन्री व आठवा हेन्री यांनीं आरमाराच्या वाढीकरितां कसकसे प्रयत्न केले याचें वर्णन मागें आलेलेंच आहे. सहावा एडवर्ड व मेरी यांच्या काळांतही इंग्लिश लोकांनीं आरमाराच्या वृद्धी-करितां बरीच खटपट चालविली होती. एडवर्डच्या काळांत इंग्लंडांत अनेक चांचे निर्माण झाले होते; व त्यांनीं नवीं नवीं जहाजें बांधून इंग्लिश खाडीमध्यें चांचेगिरी करण्यास सुरुवात केली होती. हे चांचे उत्तम खलाशी असत व नौकानयनाचा त्यांना चांगलाच सराव असल्यानें त्यांच्या-कडून मेरीच्या व एलिझाबेथच्या काळांतही इंग्लंडची आरमारी वाढ चांग-लीच झाली. या चांचे लोकांचा उपद्रव होऊं लागल्यानें परराष्ट्रांकडून, विशेषतः स्पेनकडून, एलिझाबेथकडे अनेक तक्रारी येत असत; परंतु त्यांचा फारसा उपयोग होत नसे. सरकारला कोणत्याही प्रकारचा खर्च न पडतां स्पेनच्या आरमाराची शक्ति कमी होण्यास व उत्तम इंग्लिश नावाडी निर्माण होण्यास या चांचेगिरीचा चांगलाच उपयोग होत असल्यानें एलिझाबेथनें एक प्रकारें चांचेगिरीस चांगलेंच उत्तेजन दिलें आणि या चांचेगिरींतूनच आरमाराची उत्पत्ति झाली. प्रथमतः स्वसंरक्षण व स्वदेश-संरक्षण हेंच इंग्लिश खलाशांचें धोरण असे. परंतु पुढें पुढें हे खलाशी जसजसे जलपर्यटणांत निष्णात होऊं लागले तसतसे स्पॅनिश खलाशांशीं त्यांचे वारंवार झगडे होऊं लागल्यानें आरमारी युद्धाचा इंग्लिश खलाशांस चांगलाच अनुभव येऊं लागला. उत्तम दर्यावर्दी राष्ट्र म्हणून या वेळीं स्पेनची कीर्ति होती; त्याचीं आरमारी जहाजें मजबूत होतीं, व अमेरिकेंतून त्या देशाला अपार संपत्ति व गुलाम मिळत असल्यानें स्पेनचें आरमार अजिंक्य म्हणून समजलें जात होतें. स्पेनचें हें अजिंक्यपद हिरावून घेऊन नव्या जगाच्या संपत्तींत आपला भाग स्थापन करण्याकरितां इंग्लिश खलाशांची एकसारखी धडपड चालली होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. स्पेन व इंग्लंड यांची तेढ :—या वेळीं इंग्लंडमध्यें प्रॉटेस्टंट धर्म जवळ जवळ कायमचा रुजला होता; तर स्पेनमध्यें रोमन कॅथॉलिक धर्मपंथ कायमचा असल्यानें तेथें पोपच्या धर्माज्ञा मान्य केल्या जात असत. यामुळें स्पेन व इंग्लंड यांच्यामध्यें वैर माजलें होतें. अमेरिकेहून सोन्या–रुप्यांनीं भरून आलेलीं स्पॅनिश जहाजें लुटावीं व स्पेनचा अमेरिकेशीं चाललेला व्यापार मारून त्या ऐवजीं आपला व्यापार वाढवावा असें इंग्लिश लोकांस वाटत असे. यामुळेंही स्पॅनिश–इंग्लिश तेढ एकसारखी वाढत होती. या वेळीं एका काल्पनिक रेषेनें सर्व जगाचे पोपनें दोन विभाग पाडले होते. त्या रेषेच्या पूर्वेकडील भाग पोर्तुगालचा व पश्चिमेकडील भाग स्पेनचा असें त्यानें ठरवून दिलें होतें. तसेंच पोर्तुगीज व स्पॅनिश लोकांच्या परवानगीशिवाय नवीन प्रदेशाकडे नवीन जलमार्गांनीं कोणीही जाऊं नये अशी पोपनें धर्माज्ञा काढली होती. पण पोपला तसा अधिकारच नाहीं, अर्थात् त्याची धर्माज्ञा मानण्याची जरूरी नाहीं असें सांगून इंग्लिश लोकांनीं स्पॅनिश जहाजांची लुटालूट करण्याचा व अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींवर हल्ले चढविण्याचा आपला उपक्रम कायम ठेवला. स्पेनचा राजा दुसरा फिलिप याला इंग्लिश लोकांच्या चांचेगिरीचा नेहमीं राग येई व चिडून जाऊन त्यानें अनेक वेळां एलिझाबेथकडे तक्रारीही केल्या. परंतु एलिझाबेथ आपल्या खलाशांना कधीं उत्तेजन देई तर कधीं त्यांना शिक्षा देई. कधीं कडक कायदे करी, पण त्यांची अंमलबजावणी कधींच करीत नसे. फिलिपचा राग तात्पुरता घालविण्याकरितां व आगामी आरमारी युद्धाची उत्तम तयारी व्हावी म्हणून वरील प्रकारचें धोरण एलिझाबेथला नेहमीं स्वीकारावें लागे. परंतु त्यामुळें इंग्लिश खलाशांचे प्रयत्न कमी न होतां ते एकसारखे वाढत गेले व अखेर त्यांनीं आपलें ध्येय गांठून इंग्लंडला वैभव प्राप्त करून दिलें.

३. जॉन हॉकिन्स :—आपलें उद्दिष्ट ज्या अनेक उपायांनीं इंग्लिश खलाशांनीं साध्य केलें, त्यांतील एक महत्त्वाचा उपाय म्हणजे गुलामांचा व्यापार करणें हा होय. स्पॅनिश अमेरिकेंतील वसाहतींत मजुरांची नेहमीं चणचण भासत असे. ही गोष्ट जाणून जॉन हॉकिन्स या एका प्रख्यात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लिश दर्यावर्दी गृहस्थानें स्पॅनिश वसाहतींत आफ्रिकन नीग्रो गुलाम म्हणून विकण्याची प्रथा पाडली. स्पॅनिश वसाहतींशीं गुलामांचा व्यापार करण्याची परवानगी स्पेनच्या राजानें एका स्पॅनिश कंपनीसच दिली होती. अर्थात् स्पॅनिश कायद्याप्रमाणें दुसऱ्या कोणासही अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींशीं गुलामांचा व्यापार करण्याची मनाई होती. परंतु हे कायदे झुगारून देऊन सन १५६२ मध्यें जॉन हॉकिन्सनें आफ्रिकन नीग्रोनीं भरलेलीं तीन जहाजें बरोबर घेऊन ॲटलांटिक महासागर ओलांडला; व स्पॅनिश वसाहतींत त्या सर्व नीग्रोंना गुलाम म्हणून विकलें. या व्यापारांत

जॉन हॉकिन्स

त्यानें अपार संपत्ति मिळविली; आपल्या जहाजांत अमेरिकन माल भरपूर भरला व तो इंग्लंडला परत आला. सन १५६४ सालीं गुलामांचीं चार जहाजें पुन्हां बरोबर घेऊन तो अमेरिकेंत गेला. यावेळीं त्याला अनेक संकटांशीं झगडावें लागलें. तरी त्या सर्वांतून निभावून मागीलप्रमाणेंच तो अपार संपत्तीसह इंग्लंडला परत आला. सन १५६७ सालीं गुलामांचीं पांच जहाजें बरोबर घेऊन तो अमेरिकेंत गेला व सर्व गुलाम विकून तो परत येत असतां स्पॅनिश आरमाराची व त्याची अमेरिकेच्या किनाऱ्यावर गांठ पडून लढाई होण्याचा रंग दिसूं लागला. थोडीशी चकमकही उडून त्यांत हॉकिन्सचीं तीन जहाजें बुडालीं. तेव्हां स्पॅनिश लोकांचा डोळा चुकवून हॉकिन्स तेथून निसटला व सुखरूपपणें इंग्लंडला परत आला. हॉकिन्सच्या या सफरींत त्याच्याबरोबर असलेला व इंग्लंडला सुखरूप परत आलेला दुसरा मोठा नामवंत दर्यावर्दी म्हणजे ड्रेक होय.

४. फ्रॅन्सिस ड्रेक :—थोडासा खुजा, पिंगट दाढीचा, वयानें जवळ जवळ पसतिशीच्या घरांतला, निर्भयपणानें समुद्रावर संचार करणारा व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निधड्या छातीनें स्पॅनिश जहाजांवर तुटून पडणारा फ्रॅन्सिस ड्रेक एलिझाबेथच्या वेळीं असलेल्या सर्व खलाशांत अग्रगण्य होय. प्रथमतः चांचेगिरीचा धंदा करण्यांत हा फार पटाईत होता. तो प्रॉटेस्टंट असून रोमन कॅथॉलिकांचा द्वेष्टा होता. नवीन जगांतील सर्व जमीन व संपत्ति स्वार्थसाधु स्पॅनिश लोकांनीं लुबाडून इंग्रजांचा विश्वासघात केला आहे अशी त्याची दृढ समजूत होती. हॉकिन्सबरोबर निरनिराळ्या सफरी केल्यानें नौकानयनाचा व दर्यावर्दीपणाचा त्याला उत्कृष्ट अनुभव

सर फ्रॅन्सिस ड्रेक

व शिक्षण मिळालें होतें. चांचेगिरी करूनच अमेरिकेहून येणारी सर्व संपत्ति आपल्याला लुटतां येईल असें त्यास वाटत असे. यामुळेंच स्पॅनिश लोकांशीं त्याच्या नेहमीं चकमकी उडत. सन १५७७ सालीं फ्लीमथ बंदरांतून आपल्याबरोबर पांच जहाजें घेऊन तो निघाला. दक्षिण अमेरिकेच्या बाजूनें जात असतां अनेक स्पॅनिश जहाजें त्यानें लुटलीं व त्यांतील सोनें–रुपें हरण केलें. नंतर दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण टोंकास वळसा घालून तो पॅसिफिक महासागरांत उतरला. तेथें त्याच्या साथीदारांनीं बंड केलें. त्यांच्या पुढाऱ्यांस ठार मारून त्यानें बंडाचा बींमोड केला, व तो पुढें सटकला. मध्यंतरीं त्याला अनेक संकटांशीं झगडावें लागलें; परंतु त्यांतूनही निभावून गेल्यावर तो दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यानें चालला असतां पेरू देशाहून अपार संपत्तीनें व हिऱ्यांमोत्यांनीं भरलेलें एक स्पॅनिश जहाज चालल्याचें वृत्त त्याला कळलें. लगेच त्यानें त्या जहाजावर आक्रमण करून त्यांतील माल जप्त केला. यानंतर तो तसाच अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यानें जात असतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



एलिझाबेथकालीन संशोधकांचे जलमार्ग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्हॅंक्युव्हर बेटांपर्यंत गेला. तेथें कांहीं चिनी खलाशांची व त्याची गांठ पडली व त्यांच्याच साहाय्यानें तो पुढें 'ईस्ट इंडीज' बेटांकडे जाण्याकरितां निघाला. तेथें मसाल्याच्या बेटांच्या सुलतानाबरोबर त्यानें व्यापारी तह केला होता. तेथील जावा-सुमात्रा बेटांशीं थोडा व्यापार करून तो इंग्लंडला सुमारें तीन वर्षांनीं गुडहोप भूषिरामार्गें परत आला. त्याच्या या समुद्र-प्रवासामुळें त्याची कीर्ति वाढली, लोकांनीं त्याचें अभूतपूर्व स्वागत केलें व राणीनेंही त्याचा गौरव करून त्याला बहुमानाच्या पदव्या दिल्या. सर्व जगाला प्रदक्षिणा घालणारा ड्रेक हा दुसरा दर्यावर्दी खलाशी होय. त्यानें अमेरिकेची तीनदां सफर केली व एका सफरीच्या वेळीं पनामाच्या संयोगी-भूमीवर उतरून त्यानें पॅसिफिक महासागराचें दर्शनही घेतलें. त्यानें ज्या जहाजांतून पृथ्वीप्रदक्षिणा केली, त्या जहाजाचें नांव 'गोल्डन हाइंड' असें होतें.

५. ग्रेनव्हिल, रॅले व गिलबर्ट :—सर रिचर्ड ग्रेनव्हिल या नांवाचा एक दर्यावर्दी गृहस्थही एलिझाबेथच्या वेळेला प्रसिद्धी पावला होता. स्पॅनिश जहाजांशीं निर्भय-पणें झुंज देऊन त्यानें अनेक वेळां स्पॅनिश लोकांचा पराभव केला होता. त्याचें एकटें जहाज एकदां स्पॅनिश जहाजांच्या कचाट्यांत सांपडलें असतां प्राणांचीही पर्वा न करतां अखेरपर्यंत तो निकरानें लढला; पण तो एकटा पडल्यानें त्याला यश लाभलें नाहीं. चांचेगिरी करून व स्पॅनिश जहाजांवर चोरटे हल्ले चढवून ज्याप्रमाणें इंग्लिश खलाशांनीं अपार संपत्ति, यश व कीर्ति संपादन केली व स्पॅनिश खलाशांच्या मनांत धडकी भरविली त्याचप्रमाणें नवीन जगांतील संपत्ति मिळविण्याचा इंग्रजांनीं एक नवीनच उपक्रम करण्यास एलिझाबेथच्या वेळीं सुरुवात केली. हा उपक्रम म्हणजे अमेरिकेंत इंग्रजांच्या वसाहती स्थापन करणें हा होय. उत्तर अमेरिकेंत स्पॅनिश लोकांचा अजून शिरकाव झालेला नव्हता. तेव्हां तेथें इंग्रजांच्या वसाहती स्थापण्याची कल्पना

सर वॉल्टर रॅले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर वॉल्टर रॅले याला सुचली. त्याप्रमाणें त्यानें सन १५८५ व १५८७ सालीं प्रयत्न करून एलिझाबेथच्या नांवानें 'व्हर्जीनिया' नांवाची एक वसाहत स्थापन केली; परंतु त्याच्या प्रयत्नास यावें तितकें यश आलें नाहीं. रॅलेप्रमाणेंच सर हॅंफ्री गिलबर्ट यानें न्यूफाउंडलंडमध्यें वसाहती स्थापण्याचा निष्फळ प्रयत्न केला. एलिझाबेथच्या कारकीर्दीत अमेरिकेमध्यें इंग्लंडची एकही वसाहत मजबूत पायावर स्थापिली गेली नाहीं.

गिलबर्ट

६. फ्रॉबिशर, डेव्हिस व चॅन्सेलर :—वरील लोकांशिवाय इतरही अनेक धाडसी इंग्लिश दर्यावर्दी खलाशांनीं या सुमारास नवीन शोध लावण्याचे प्रयत्न केले. सन १५७० मध्यें ग्रीनलंडला जाऊन तेथून वायव्य दिशेनें चीनला जाण्याकरितां नवीन मार्ग शोधण्याची मार्टिन फ्रॉबिशरनें धडपड केली. आर्क्टिक महासागरांत सफर करणारा फ्रॉबिशर हा पहिलाच दर्यावर्दी होय. त्यानें त्या दिशेनें तीन वेळां प्रयत्न केला; पण त्या भागांत बर्फ नेहमीं गोठलेलें असल्यानें त्याच्या प्रयत्नांस यश आलें नाहीं. फ्रॉबिशरप्रमाणेंच जॉन डेव्हिस या धाडसी दर्यावर्दी गृहस्थानें तीनदां ग्रीनलंडपर्यंत सफर मारून पूर्वेकडे जाण्याचा मार्ग शोधून काढण्याची शिकस्त केली; पण त्यालाही यश आलें नाहीं. यानंतर ईशान्य दिशेनें पूर्वेकडे जाण्याकरितां नवीन जलमार्ग शोधून

मार्टिन फ्रॉबिशर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढण्यासाठीं रिचर्ड चॅन्सेलर व ह्यूज विलोबी या इंग्रज खलाशांनीं पराक्रमाची पराकाष्ठा केली. रशियाच्या उत्तर दिशेस असणाऱ्या श्वेत समुद्रांतील आर्चेंजल बंदरापर्यंत ते जाऊं शकले. या सफरींवर असतांनाच विलोबी मृत्यु पावला; तेव्हां चॅन्सेलरनें थेट मास्कोपर्यंत जमिनीवरून प्रवास करून तो कास्पियन समुद्रापर्यंत गेला. त्याच्या या प्रयत्नानें या दिशेनेंही पूर्वेकडे जाण्याचा मार्ग शोधतां येणें अशक्य आहे असें ठरलें; तरी पण चॅन्सेलरनें रशियाशीं व्यापार करण्याकरितां मस्कोव्ही कंपनी ऊर्फ रशिया कंपनी स्थापन केली. यानंतर सन १६०० मध्यें प्रसिद्ध ईस्ट इंडिया कंपनी स्थापन करण्यांत आली. या कंपनीला राजाश्रय नव्हता; परंतु पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याचा परवाना तिला देण्यांत आला होता. या कंपनीचा मूळ उद्देश म्हणजे ईस्ट इंडीज बेटांशीं व्यापार करण्याचाच होता. हिंदुस्थानशीं व्यापार करणें अगर तेथें वसाहती स्थापन करणें या कल्पना नंतरच्या होत.

७. समुद्रावरील कुत्रे :—आतांपर्यंतच्या सर्व वर्णनावरून एलिझाबेथच्या काळामध्यें इंग्लिश खलाशांचा दर्यावर्दीपणा कसकसा वाढत होता हें दिसून येणार आहे. एकेकाळीं इंग्लंडच्या बाहेर जाण्यास भिणारा व आपला शेतीचा धंदा सांभाळून राहणारा इंग्रज शेतकरी आतां दर्यावर्दीपणांत अग्रेसरत्व मिळवूं पाहत होता. तुफान दर्यामध्यें आपलीं छोटीं जहाजें हाकारावीं व प्रतिकूल परिस्थितीशीं मोठ्या निर्भयपणें टक्कर द्यावी, क्वचित् प्रसंगीं भर समुद्रांत स्पॅनिश जहाजें आढळल्यास त्यांशीं झुंज देऊन त्यांना स्वबलाची योग्य कल्पना आणून द्यावी, अमेरिकेहून सोन्या-रुप्यांनीं गच्च भरून येणारीं स्पॅनिश जहाजें लुटावीं, नवीन नवीन जलमार्ग

सर रिचर्ड ग्रेनव्हिल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शोधून काढण्याकरितां प्राणांचीही पर्वा न करतां जिवापाड मेहनत करावी असे नाना तऱ्हेचे उद्योग या वेळीं इंग्रज लोक करीत असत. यामुळें इंग्लिश लोकांस नौकायनाचें व दर्यावर्दीपणाचें उत्कृष्ठ शिक्षण मिळालें. राणीकडून मिळणाऱ्या उत्तेजनाची यत्किंचित्‌ही पर्वा न बाळगतां केवळ स्वयंस्फूर्तीनें काम करणाऱ्या लोकांकडूनच पुढें स्पॅनिश आरमाराचा इंग्रजांना फडशा पाडतां आला. या लोकांच्या धाडसी व निर्भय वृत्तीपुढें स्पॅनिश खलाशी थक्क होत ! चांचेगिरी करूनच हे सर्व प्रसिद्धीस आले होते. या चांचे लोकांत घरंदाज व संभावीत लोकांप्रमाणेंच अनेक रिकामटेकडे, अट्टल व बिलंदर



आर्क रॉयल

भामटेही होते ! त्यांच्या धाडसी पराक्रमांस कंटाळून त्यांवर चिडलेल्या स्पॅनिश लोकांनीं त्यांना ' समुद्रावरील कुत्रे ' असें उपाहासगर्भ नांव दिलें; परंतु आश्चर्याची गोष्ट कीं, या ' समुद्रावरील कुत्र्यांनीं 'च अजिंक्य अशा स्पॅनिश आरमाराचा सर्वस्वीं नाश केला.

८. **समुद्रराणी एलिझाबेथ :**—खुद्द राणी एलिझाबेथला इंग्रज खलाशांबद्दल मनापासून कौतुक वाटत असे. त्यांच्या सफरींबद्दल त्यांचें अभिनंदन करावें व त्यांस उत्तेजन द्यावें असें तिला वारंवार वाटे, परंतु तसें उघड उघड केल्यास इंग्लंडवर अरिष्ट कोसळेल, हें तिला माहीत होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें असलें तरी तिनें ड्रेकला 'सर' ही पदवी देऊन त्याचा गौरव केला होता. आपल्या आरमाराची वाढ व्हावी व तें ऊत्कृष्ठ व्हावें अशी तिची इच्छा होती. तिनें पुष्कळ नवीन नवीन जहाजें बांधलीं; नौकानयनशास्त्रासंबंधाच्या अनेक पुस्तकांचें इंग्रजींत भाषांतर करवून घेऊन त्याचा तिनें जनतेंत प्रसार केला, व लढाऊ जहाजांचा लढाईच्या कामीं जास्त उपयोग व्हावा अशा तऱ्हेनें त्यांच्या बांधणींत फेरफार करून तिनें नवीन चौतीस जहाजें बांधविलीं. खलाशांची ती इतकी आवडती होती कीं त्यांनीं तिला 'समुद्र–राणी' असें नांव दिलें. एकंदरींत पाहतां एलिझाबेथच्या उत्तेजनामुळें इंग्लिश खलाशांनीं उत्साहपूर्व कामगिरी करून दाखविली व इंग्लंडला उत्तम आरमारी राष्ट्र असें नांव मिळवून दिलें; तें आजतागायत चालू आहे.

अभ्यास

१. चांचेगिरींतूनच इंग्लिश आरमाराची उत्पत्ति झाली हें बरोबर आहे का? उदाहरणें देऊन सिद्ध करा.
२. स्पेनचा राजा दुसरा फिलिप याला इंग्लिश चांच्यांपासून कोणता उपद्रव होत असे? त्याकरितां त्यानें कोणती उपाययोजना केली?
३. ड्रेकच्या जलपर्यटनाचें व त्याच्या धाडसी सफरीचें थोडक्यांत वर्णन करा.
४. खालील व्यक्तींसंबंधीं एक महत्त्वपूर्ण वाक्य लिहा :— गिलबर्ट, रॅले, फ्रॉबिशर, चॅन्सेलर, डेव्हिस, हॉकिन्स, समुद्र-राणी, विलोबी, ग्रेनव्हिल.
५. जगाचा नकाशा काढून त्यांत ड्रेकच्या जलपर्यटनाचा मार्ग दाखवा.
६. एलिझाबेथच्या काळचा जो दर्यावर्दी तुम्हांस आवडत असेल त्याच्या धाडसाचीं कृत्यें वर्णन करा; व त्याच्या जलपर्यटनाचा मार्ग नकाशांत भरा.
७. तुमच्या आवडत्या दर्यावर्दी गृहस्थाबरोबर तुम्ही जलपर्यटनास जात आहांत अशी कल्पना करून निरनिराळ्या देशांत तुम्हांस काय मिळेल तें सांगून तुमच्या प्रवासाची थोडक्यांत हकीकत सांगा.
८. स्पॅनिश दर्यावर्दी व इंग्लिश खलाशी यांच्यांत तेढ येण्याचें कारण काय? त्यांत एलिझाबेथचा हात कितपत होता?
९. एलिझाबेथच्या कारकीर्दींत आरमाराची वाढ कशी झाली तें सांगा.
१०. हॉकिन्स व ड्रेक यांचें चरित्र थोडक्यांत सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३७. एलिझाबेथचें परराष्ट्रीय धोरण : अजिंक्य आरमाराचा धुव्वा !

१. युरोपांतील परिस्थिति :—एलिझाबेथ इंग्लंडची राणी झाली त्यावेळीं इंग्लंडला एकही मित्रराष्ट्र युरोपांत नव्हतें. आठव्या हेन्रीची एलिझाबेथ ही अनौरस मुलगी असल्यानें पोपनें इंग्लंडच्या गादीवरील तिचा हक्क अमान्य केला होता. त्यामुळें पोपची आज्ञा शिरसावंद्य मानणाऱ्या सर्व रोमन कॅथॉलिक राष्ट्रांचें एलिझाबेथशीं वैर होतें. एलिझाबेथ अत्यंत दूरदर्शी व सावधानतेनें राज्यकारभार हांकणारी असल्यानें तिनें सहसा युद्धाची पाळी आणूं दिली नाहीं. परंतु युद्ध करणें जरूर आहे असें वाटल्यास तिनें कधींही माघार घेतली नाहीं. फ्रान्स व स्पेन हे तिचे हाडवैरी. स्पेनचा राजा दुसरा फिलिप हा रोमन कॅथॉलिक पंथाचा; शिवाय एलिझाबेथनें त्याची लग्नाची मागणी धुडकावून दिलेली ! यामुळें तो तिच्यावर चिडलेला ! फ्रान्स यादवींत सांपडलेला होता. कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट (फ्रान्समध्यें प्रॉटेस्टंटांना ह्यूजिनॉट असें म्हणत) यांच्यांत भयंकर तेढ माजल्यानें रक्तपात, खून व चकमकी यांना फ्रान्समध्यें नुसता ऊत आला होता ! फ्रान्सचा राजा दुसरा फ्रॅन्सिस याशीं स्कॉटलंडची राणी मेरी हिचें लग्न लागलेलें असल्यामुळें व तिचा इंग्लंडच्या गादीवर अधिकार पोंचत असल्यामुळें स्कॉटलंड, इंग्लंड व फ्रान्स यांचें एकीकरण घडवून आणण्याचा फ्रॅन्सिसचा बेत होता. तशांतच स्कॉटलंडमधील घोटाळे व फ्रॅन्सिसचा मृत्यु यांमुळें वरील बेत जागच्या जागींच थंड पडले. खुद्द जर्मनींत अंतस्थ भानगडी अनेक असल्यानें त्याला इतर राष्ट्रांकडे लक्ष देण्यास अवधि नव्हता.

२. फ्रान्सशीं धोरण :—अशा परिस्थतींत एलिझाबेथला एकही मित्रराष्ट्र नव्हतें. फ्रान्स व स्पेन यांच्यामध्यें अंतस्थ चुरस व वैर असल्यानें त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन्ही राष्ट्रांना इंग्लंडच्या मदतीची व मैत्रीची फार मातब्बरी वाटत होती. आपल्याशीं नाहीं तर निदान आपल्या शत्रूराष्ट्राशीं तरी एलिझाबेथनें मैत्री-करूं नये असें त्या दोन्ही राष्ट्रांना नेहमीं वाटे. व त्या दिशेनें दोघांचेही प्रयत्न चाललेले असत. ही गोष्ट ओळखून व मैत्रीची आशा दाखवून एलि-झाबेथनें त्या दोन्ही राष्ट्रांना नुसतें झुलविलें ! त्यावेळीं फ्रान्समध्यें कॅथराइन मिडिची या बाईनें ह्यूजिनॉट लोकांचा पक्ष व गाइसच्या ड्यूकनें कॅथॉलि-कांचा पक्ष उचलून धरलेला होता. एलिझाबेथचा ओढा ह्यूजिनॉट लोकांकडे होता. सन १५६२ मध्यें त्यांच्याशीं एक तह करून तिनें त्यांना मदत पाठविली. व त्याबद्दल त्यांच्याकडून फ्रान्समधील हावरे बंदर मिळविलें. ही गोष्ट अनेक फ्रेंचांना आवडली नाहीं. त्यामुळें पुढें अनेक घोटाळे माजले. गाइसच्या ड्यूकचा वध झाला; व कॅथरॉइन मिडिची हिनें गेलेलें बंदर परत मिळविण्याकरितां चंग बांधला. याच सुमारास स्कॉटलंडची राणी, मेरी, हिचें डार्नलेशीं लग्न झाल्यानें फ्रान्स व स्कॉटलंड यांचें एकीकरण होण्याची आशा नष्ट झाली. या स्थितींत इंग्लंड व फ्रान्स यांचें सूत जमेल अशी परिस्थिति निर्माण होऊं लागली. सन १५७० मध्यें पोपनें एलिझाबेथला धर्मबहिष्कृत केल्याची आज्ञा काढल्यानें एलिझाबेथ एकाकी पडली व आपल्याला एखादें मित्रराष्ट्र असावें असें तिला वाटूं लागलें. यावेळीं फ्रान्सच्या राजाचा भाऊ, अँज्यूचा ड्यूक फ्रॅन्सिस, याच्याशीं लग्न करावें असें तिच्या प्रधानांनीं तिच्या मनांत भरवून दिलें. हें लग्न झालें तर फिलिप इंग्लंडवर एकदम स्वारी करील हें जाणून तिनें लोकांना नुसतें झुलविलें ! यावेळीं एलिझाबेथचें मन वळविण्याकरितां कुरूप व तिच्यापेक्षांही दहा वर्षांनीं लहान असलेला फ्रॅन्सिस अँज्यू इंग्लंडमध्यें आला. त्यावेळीं या मानभावी राणीनें 'आपला भावी नवरा' म्हणून त्याचें स्वागतही केलें ! याच सुमारास नेदरलंडमधील प्रॉटेस्टंट लोकांनीं फिलिपच्या जाचक कारभारास कंटाळून बंड पुकारलें. त्यांचा अँज्यू हा पुढारी होता. ही गोष्ट ओळखून एलिझाबेथनें त्याला गोड गोड थापा मारल्या व सैन्य व पैसा देऊन नेदरलंडमध्यें त्याची तिनें रवानगी केली. परंतु तेथें गेल्यावर थोड्याच दिवसांत नेदरलंडच्या लोकांनीं त्याला फ्रान्समध्यें पिटाळून लाविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो सन १५८४ मध्यें मेला व त्यामुळें एलिझाबेथचा लग्नाचा विचार कायमचा नाहींसा झाला.

३. एलिझाबेथ व नेदरलंड :—नेदरलंड हा स्पेनच्या साम्राज्याचा एक भाग होता. तेथें प्रॉटेस्टंट लोकांचा भरणा फार असल्यानें त्यांच्यावर नानाप्रकारचा जुलूम होई. त्याच्या प्रतिकारार्थ नेदरलंडच्या प्रॉटेस्टंट लोकांनीं बंड केलें. त्यावेळीं पार्माचा ड्यूक हा दुसऱ्या फिलिपचा तेथील गव्हर्नर होता. बंडवाल्यांचा पुढारी ऑरेंजचा विल्यम होता. एका कॅथॉलिक माथेफिरूनें त्याचा एक दिवस खून केला. त्यामुळें पार्माला आनंद होऊन त्यानें प्रॉटेस्टंटांचा निःपात करण्याचें ठरवून त्यांचें मुख्य ठिकाण अँटवर्प शहर काबीज केलें. तेव्हां आपल्या असहाय स्थितींत त्यांनीं एलिझाबेथची मदत मागितली; व तिला नेदरलंडची राणी करण्याचें वचन

लेस्टरच्या आगमनाप्रीत्यर्थ काढलेलें पदक

दिलें. राणीनें त्यांचें म्हणणें ऐकून घेऊन त्या बाबतींत जबरदस्त अटी डच लोकांना कळविल्या. डच लोकांनीं त्या मान्य केल्या नाहींत; तरी पण एलिझाबेथची मदत त्यांनीं मागितली. तेव्हां लेस्टरच्या ड्यूकच्या नेतृत्वाखालीं त्यांच्या मदतीकरतां तिनें मोठी फौज पाठविली. तो नालायक होता व डच लोकांशीं भांडण करून सन १५८६ मध्यें तो इंग्लंडला परत आला. याच युद्धाचे वेळीं झटफेनच्या लढाईत सर फिलिप सिडने हा मरण पावला,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्याविरुद्ध एलिझाबेथनें डच लोकांना मदत केली, ही गोष्ट स्पेनचा राजा दुसरा फिलिप, याला मुळींच आवडली नाहीं. यामुळें इंग्लंडवर स्वारी करून एलिझाबेथचा नक्षा उतरावा असें त्याला एकसारखें वाटत होतें. स्पेनबरोबर युद्ध करावें लागणार हें एलिझाबेथही ओळखून होती; व त्याकरितां तिची अंतस्थरीतीनें व उघड उघड अनेक प्रकारची तयारीही चालली होती.

४. आरमारी युद्धाचीं कारणें :—एलिझाबेथ इंग्लंडच्या गादीवर आल्यापासून इंग्लंड व स्पेन यांच्यामध्यें एकसारखी कुरबूर सुरू झाली होती. मेरीप्रमाणेंच एलिझाबेथही आपल्याशीं लग्न करील अशी स्पेनचा राजा दुसरा फिलिप याला फार आशा होती. परंतु त्याची लग्नाची मागणी तिनें झिडकारल्यामुळें तो तिच्यावर रुष्ट झाला होता. त्यानंतर एलिझाबेथनें पोपची सत्ता झुगारून देऊन इंग्लंडांत प्रस्थापित धर्माची स्थापना केली व कॅथॉलिकांचा थोडा फार छळ करण्यास सुरुवात केल्यानें फिलिपच्या नाकास चांगल्याच मिरच्या झोंबल्या! तो पक्का कॅथॉलिक धर्माभिमानी होता; व त्या पंथाचा जगभर प्रसार करण्याकरितां त्यानें चंग बांधला होता. स्पेन व इंग्लंड यांमधील ही धार्मिक तेढ एकसारखी वाढतच गेली. इंग्लंडचे मोठमोठे नामांकित दर्यावर्दी लोक या कारणाकरितांच स्पेनचे शत्रू बनले होते. त्यांची इंग्लिश खाडींतील व ॲटलांटिक महासागरांतील चांचेगिरी स्पेनला चांगलीच भोंवली होती. पोपनें नव्या जगाची पोर्तुगाल व स्पेन या देशांमध्यें केलेली विभागणी व अमेरिकेशीं गुलामांचा व इतर व्यापार करण्याचा त्या दोन देशांस दिलेला परवाना, हॉकिन्स, ड्रेक, रॅले वगैरे इंग्लिश खलाशांनीं झुगारून दिला. अमेरिकेहून सोन्या-रुप्यांनीं भरून येणारीं स्पॅनिश गलबतें लुटण्याचा त्यांनीं एकसारखा धडाका उडवून दिल्यानें स्पेनचा फिलिप संतापून गेला होता. त्यांतल्या त्यांत त्याचा ड्रेकवर चांगलाच डोळा होता. ड्रेकनें स्पॅनिश लोकांचीं गलबतें लुटून अगणित संपत्ति इंग्लंडला आणली तेव्हां 'त्यानें हरण केलेली संपत्ति परत करावी व ड्रेकला आमच्या स्वाधीन करावें,' असा हुकूम त्यानें एलिझाबेथला धाडला. परंतु प्रथमतः एलिझाबेथनें त्याला एक गुळमुळीत पत्र लिहिलें; व नंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ड्रेकला शिक्षा न करतां उलट त्याचा बहुमान केला; त्याला 'सर'ही पदवी दिली व नवीन नवीन सफरी करण्याकरितां पैसा दिला. हें समजल्यावर फिलिपनें आपल्या राज्यांतील सर्व इंग्लिश जहाजें पकडण्याचा व त्यांची मालमत्ता जप्त करण्याचा सपाटा चालविला. तेव्हां ड्रेक व फ्रॉबिशर यांना नाविक अधिकारी करून एलिझाबेथनें त्यांना स्पॅनिश बंदरें व गलबतें लुटण्याची आज्ञा केली. तेव्हां वेस्ट इंडीज बेटांमध्यें इंग्रजांवर होणारा धार्मिक जुलुम व त्यांवर होणारे अत्याचार थांबविण्याच्या हेतूनें ते दोघेही त्या बेटांकडे निघून गेले. स्पॅनिशांच्या वरील अत्याचारांमुळें इंग्रज स्पॅनिश लोकांवर चिडले होते. याच सुमारास (१५८७ मध्यें) स्कॉटलंडची राणी मेरी हिचा इंग्लंडमध्यें वध करण्यांत आला होता. मरतां मरतां तिनें इंग्लंडच्या गादीवरील आपला वारसा दुसऱ्या फिलिपला दिला. यामुळें तिच्या वधाबद्दल सूड घ्यावा व इंग्लंडच्या गादीवरील आपला हक्क शाबीत करावा या हेतूनें त्यानें लढाईची तयारी करण्यास सुरुवात केली. इंग्लंडबरोबर धर्मयुद्ध सुरू करून त्या देशावर धार्मिक सूड उगवावा असा पोपनेंही फिलिपजवळ आग्रह धरला होता. यामुळें फिलिपलाही उत्तेजन मिळालें व त्यानें इंग्लंडवर स्वारी करण्याकरितां जोराची तयारी चालविली. ही बातमी कळतांच ड्रेकनें केडिझ बंदरीं असलेल्या स्पेनच्या आरमारी ठाण्यावर अचानक हल्ला करून 'स्पेनच्या राजाच्या दाढीला आग लावून दिली'! या हल्ल्यानें केडिझ येथें असलेल्या स्पेनच्या आरमाराचा निकाल लागला व फिलिपची तयारी फुकट गेली. यामुळें त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली; व थोड्याच दिवसांत त्यानें चांगली तयारी करून इंग्लंडवर स्वारी करण्याकरितां आपलीं जहाजें लिस्बन बंदरांतून हाकारलीं (मे, १५८८).

५. '**अजिंक्य आरमार**':—गेलीं वीस वर्षें स्पेन व इंग्लंड या दोन्ही देशांत धार्मिक प्रश्न, समुद्रावरील सत्ता, अमेरिकन वसाहती व व्यापार यांसंबंधीं जीं भांडणें माजलीं त्यांचा एकदां कायमचा निकाल लावून घ्यावा या हेतूनेंच फिलिपनें इंग्लंडवर स्वारी करण्याचें ठरविलें; व आपल्या 'अजिंक्य आरमारा'ची इंग्लंडवर रवानगी केली. या आरमारांत एकंदर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३७ जहाजें असलीं तरी त्यांपैकीं लढाऊ जहाजें फक्त ६९ होतीं. बाकीचीं केवळ शोभेकरितां, इंग्लिशांना भिवविण्याकरितां व दारूगोळा आणि इतर सामान वाहण्याकरितांच या आरमाराबरोबर पाठविण्यांत आलीं होतीं. तीं जहाजें केवळ व्यापारी जहाजें असून या वेळीं तीं लढाईच्या कामाकरितां उपयोजिण्यांत येणार होतीं. आरमाराच्या या काफिल्यावर सुमारें १९,००० सैनिक होते व इंग्लंडवर हल्ला करण्यापूर्वी या आरमारानें नेदरलंडमध्यें उतरावें व तेथील स्पॅनिश गव्हर्नर पार्मा याच्या नेतृत्वाखालीं आणखी १६,००० उत्तम सैनिक आरमारावर घेण्यांत यावे अशी आरमाराचा दर्यासारंग मेदिना सिडोनिया याला फिलिपची आज्ञा होती. अशा तऱ्हेनें सुमारें ३५,००० सैन्यानें इंग्लंडवर हल्ला करून तो देश पादाक्रांत करावा अशी फिलिपची इच्छा होती. स्पेनची सर्व फौज उत्तम कसलेली होती व त्या वेळीं सर्व युरोपांत स्पेनच्या सैन्याला दुसरी तोड नव्हती.

६. **इंग्लिश आरमार:**—स्पेनच्या आरमाराच्या उलट इंग्लिश आरमाराची स्थिति होती. त्याचा मुख्य दर्यासारंग लॉर्ड हॉवर्ड हा एक रोमन कॅथॉलिक असून तो स्पेनच्या दर्यासारंगापेक्षां जास्त कसलेला गृहस्थ होता. त्याच्या आरमारांत एकूण ९० जहाजें असून त्याशिवाय त्याला मदत करण्याकरितां व्यापारी व इतर जहाजें मिळून १०० वर जहाजें सज्ज करून ठेवण्यांत आलीं होतीं. स्पेनच्या आरमारापेक्षां हीं जहाजें हलकीं व लहान असल्यानें त्यांची गति जलद असे. त्यांची बांधणीही स्पॅनिश जहाजांपेक्षां उत्तम दर्जाची होती. त्यांवर सुमारें १५,००० सैनिक होते; व ते दर्यावर्दीपणांत चांगले कसलेले असल्यानें स्पॅनिश सैनिकांपेक्षां ते वरचढ होते. त्यांचा तोफखानाही स्पेनच्या तोफखान्यापेक्षां उत्तम होता. इंग्लिश दर्यासारंग लॉर्ड चार्ल्स हॉवर्ड याला मदत करण्याकरितां व सल्ला देण्याकरितां ड्रेक, हॉकिन्स, फ्रॉबिशर वगैरें अनेक नामवंत दर्यावर्दी तयार होते. याशिवाय राष्ट्रावरील आपत्ति टाळण्याकरितां आपले धार्मिक मतभेद विसरून जाऊन अनेक रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट लोक एकत्र झाले. देशावरील आपत्ति टाळण्याकरितां श्रीमंत, सरदार, व्यापारी वगैरे लोकांनीं अगणित संपत्ति गोळा करून राणीच्या स्वाधीन केली. इंग्रजांनीं या वेळीं जी देशभक्ति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाखविली तिला तोडच नाहीं. यावेळीं इंग्रजांनीं उत्तम सैन्यही लंडनजवळ तयार ठेवलें होतें. या सैन्यांत जवळ जवळ ७०,००० सैनिक दाखल झाले होते; परंतु हें सैन्य स्पॅनिश सैन्याइतकें कसलेलें नव्हतें. सुसज्ज झालेले इंग्रज लोक आपल्या आरमाराचा तळ प्लीमथ येथें ठेवून स्पेनच्या आरमाराची वाट पहात होते.

७. ‘ अजिंक्य आरमारा ’ चा पराभव :—स्पेनचें आरमार लिस्बनहून निघाल्यापासूनच त्याचें दुर्दैव त्याच्या आड येऊं लागलें. प्रथमतः वादळी हवेमुळें फेरोल या ठिकाणीं कांहीं काळ त्याला कंठावा लागला; व जहाजांची दुरुस्ती झाल्यावर सुमारें दीड महिन्यानें (१२ जुलै, १५८८) त्यानें आपल्या प्रवासास पुन्हां सुरुवात केली. आठ दिवसांत तें आरमार इंग्लिश खाडींत उतरलें. तेव्हां इंग्लंडच्या किनाऱ्यावरील टेहळणी करणाऱ्यांनीं टेकड्या टेकड्यांवरून शेकोट्या पेटवून त्याच्या आगमनाची वार्ता सर्व इंग्लंडभर प्रसृत केली. जुलै २१ ला इंग्लिश आरमाराच्या अगदीं नजीक स्पेनचें आरमार आलें. तेव्हां इंग्रज आपल्यावर हल्ला करतील



अजिंक्य आरमाराचा मार्ग

अशी स्पॅनिश लोकांची कल्पना होती. परंतु तसें न होतां स्पेनचें आरमार नेदरलंडच्या दिशेनें सावकाश चाललें होतें. या वेळीं गनिमी काव्याचा अवलंब करून इंग्रजांनीं स्पॅनिश जहाजांवर पाठीमागून हल्ला करण्यास सुरुवात केली. इंग्लिश जहाजें हलकीं असल्याकारणानें स्पॅनिश जहाजांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुप्पट वेगानें जाऊं शकत. त्यांच्यावरील तोफाही लौकर डागल्या जात असल्यानें स्पॅनिश लोक हैराण होऊं लागले. तेव्हां २६ जुलै रोजीं इंग्लिश खाडीच्या बाहेर जाऊन स्पॅनिश आरमारानें कॅलेजवळ तळ ठोकला. ही बातमी लागतांच हॉवर्ड डोव्हरला आला व आपल्या आठ जहाजांत भरपूर दारूगोळा भरून घेऊन तो कॅलेकडे निघाला. तेथें त्यानें २८ जुलै रोजीं त्यांना आग लावून दिली व बेसावध असलेल्या स्पॅनिश आर-



अजिंक्य आरमाराशीं लढाई

माराच्या काफिल्यांत तीं सोडून दिलीं. या जळत्या जहाजांना अनुकूल वारा लाभल्यानें तीं आठही जळतीं जहाजें स्पॅनिश आरमारांत घुसलीं. त्यामुळें अनेक स्पॅनिश जहाजांस आग लागली, व सर्वत्र गोंधळ माजला. ज्याला जी वाट फुटेल त्या मार्गानें प्रत्येक स्पॅनिश जहाज जाऊं लागलें. त्यांच्या पाठीवर इंग्लिश जहाजें होतींच. यामुळें स्पॅनिश जहाजांची जी एकदां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पांगापांग झाली ती कायमची ! अशा स्थितींत ड्रेकच्या काफिल्यानें स्पॅनिश जहाजांस सतावून सोडलें. यामुळें अनेक जहाजें फुटलीं, अनेक बुडालीं व अनेकांनीं वारा नेईल तिकडे आपली वाट सुधारली ! स्पॅनिश आरमाराची अशी स्थिति झाल्यानें स्पॅनिश दर्यासारंग मेडिना सिडोनिया यानें नेदरलंड-मधील पार्माच्या नेतृत्वाखालील सैन्याची मदत घेण्याचा विचार रद्द केला व आपलीं जहाजें उत्तर समुद्रांत हाकारून इंग्लिश खाडींतून न जातां स्कॉटलंड व आयर्लंड यांना वळसा घालून स्पेनकडे जाण्याचा बेत त्यानें ठरविला. यामुळें अनेक जहाजें वाऱ्यावरोबर उत्तरेकडे गेलीं. तेथून स्कॉट-लंडच्या उत्तर टोंकास वळसा घालीत असतां आर्कनी बेटांजवळ तुफानी



अजिंक्य आरमाराचा पाठलाग

वादळांत सांपडल्यामुळें तेथील खडकांवर कांहीं आपटलीं गेल्यानें तीं फुटलीं व कांहीं बुडालीं. त्यानंतर आयर्लंडच्या पश्चिमेकडून जात असतांही वादळांत सांपडून अनेक स्पॅनिश जहाजें नाहींशीं झालीं. असें होतां होतां १३२ जहाजांपैकीं फक्त मोडकीं तोडकीं ५२ जहाजें स्पेनला परत गेलीं ! आपल्या पराभवाची बातमी कळली त्या वेळीं फिलिप म्हणाला, ‘ परमेश्वराची इच्छा ! परंतु मीं आपलें आरमार इंग्रजांशीं लढण्याकरितां पाठविलें होतें !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंचमहाभूतांशीं नव्हे ! ' यावरून त्याला किती जबरदस्त धक्का बसला होता, याची कल्पना येते.

८. परिणाम—' अजिंक्य ' ठरलेल्या स्पेनच्या आरमाराचा इंग्लंडनें पराभव केल्यानें इंग्लंडची श्रेष्ठता सर्वमान्य झाली. यापुढें परचक्राची भीति न उरल्यानें इंग्लंडला कायमची स्वस्थता प्राप्त झाली. एलिझाबेथनें स्थापन केलेला प्रस्थापित धर्म इंग्लंडांत कायमचा रुजला; रोमन कॅथॉलिक पंथाची पिछेहाट झाली व कॅथॉलिक पंथाच्या प्रसाराकरितां व संघटनेकरितां जेसुइटांनीं चालविलेले प्रयत्न थंडावले. इंग्लंडचें समुद्रावरील वर्चस्व सिद्ध झालें व त्यामुळें इंग्लिश व्यापार व वसाहती यांची वाढ होण्यास वाव मिळाला.



आरमारी विजयार्थ एलिझाबेथनें काढलेलें चांदीचें पदक

स्पेनच्या समुद्रावरील सत्तेस उतरती कळा लागली व हळूहळू ती संपुष्टांत आली. त्यामुळें नेदरलंडमधील डच लोकांस हायसें वाटून त्यांस आपलें स्वातंत्र्य मिळविणें सुलभ झालें. इंग्लंडला ' समुद्रस्वामी ' होण्याचा लोभनीय असा मान मिळाला. त्यामुळें इंग्लंडमध्यें पार्लमेंटची सत्ता वाढीस लागून राजसत्ता कमी होऊं लागली. सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे स्पॅनिश आरमाराचा पराभव म्हणजे एलिझाबेथच्या दूरदर्शीपणाचा व मुत्सद्दीपणाचा विजयच होय. व यामुळें सर्व राष्ट्र तिला देवीप्रमाणें भजूं लागलें व तिची कीर्ति जगभर पसरली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. फिलिपचे आणखी प्रयत्न :—अजिंक्य आरमाराच्या पराभवानंतर ड्रेकच्या नेतृत्वाखालीं एक आरमारी काफिला पोर्तुगालला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां पाठविण्यांत आला होता; परंतु त्यांत यश आलें नाहीं (१५८९). यानंतर फिलिपनें आपल्या आरमाराची पुनर्रचना करण्यास सुरुवात केली; तेव्हां एलिझाबेथनें ड्रेकच्या केडिझमधील पराक्रमाची



केडिझचा पाडाव

पुनरावृत्ति करण्याकरितां लॉर्ड हॉवर्डच्या नेतृत्वाखालीं एक आरमारी काफिला पाठविला. त्यानें उत्कृष्ट कामगिरी केली व केडिझ बंदरांतील अनेक जहाजें बुडविलीं, तेथील गोद्या नादुरुस्त केल्या व स्पॅनिश आरमाराची कंबर मोडून टाकिली. परंतु एवढ्यानें खचून न जातां फिलिपनें इंग्लंडवर स्वारी करण्याकरितां सन १५९७ सालीं पुन्हां आरमार पाठविलें. दुर्दैवानें वादळानें यावेळींही त्याचा पाठपुरावा केल्यानें इंग्लंडला पोंचण्यापूर्वीच त्याचा नाश झाला. पुढील वर्षी दुसरा फिलिप मरण पावला व त्याच्या मृत्यूबरोबरच इंग्लंड व स्पेन यांच्यामध्यें लागलेली चुरस कायमची नष्ट झाली. यानंतर स्पेननें पुन्हां कधींही डोकें वर काढलें नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. स्पॅनिश पराभवाची मीमांसा :—इंग्लंड व स्पेन यांमध्यें झालेल्या आरमारी लढाईत स्पेनचा पराभव झाला; त्याला अनेक कारणें झालीं. इंग्लिश जहाजें हलकीं, सुटसुटित व जलद चालणारीं असल्यानें त्यांच्या हालचाली सहज रीतीनें होत. याच्या उलट स्पॅनिश जहाजें अवजड व उंचच्या उंच असल्यानें तीं मंदपणें चालत व त्यामुळें त्यांच्या समुद्रावरील हालचाली दिरंगाईनें होत. स्पॅनिश जहाजांवरील युद्धसामुग्री व अन्नसामुग्रीही अपुरी होती. इंग्लिश खलाशांची गोलंदाजी अचूक व जलद असे. उंच स्पॅनिश जहाजांच्या महत्त्वाच्या अशा मध्य भागावर इंग्रजांची अचूक गोलंदाजी येई व त्यामुळें त्यांचा फन्ना उडे. हॉकिन्स, ड्रेक, फ्रॉबिशर, हॉवर्ड वगैरे इंग्लिश आरमारी अधिकारी आपल्या कामांत निष्णात होते व त्यांच्या हाताखालील खलाशी नाविकयुद्धांत तरबेज होते. या सर्वांनीं आरमारी युद्धांत ड्रेकच्या



अजिंक्य आरमारावरील विजयार्थ एलिझाबेथनें काढलेलें पदक

गनिमी काव्यानें लढण्याच्या धोरणाचा अवलंब केला. या अभिनव पद्धतीनें लढल्यामुळेंच इंग्रजांना यश लाभलें. इंग्रज आरमारी अधिकाऱ्यांप्रमाणें स्पॅनिश अधिकारी कुशल नव्हते; आरमारी युद्धाचा त्यांस अनुभवही नव्हता; त्यांच्या हाताखालील खलाशीही कसलेले नव्हते. त्यांच्यांत बाजारबुणगे व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यापारी यांचाच भरणा अधिक होता. त्यांना आरमारी युद्धाची माहिती नसल्यानें कसलेल्या इंग्लिश खलाशांकडून त्यांचा पराभव झाला. स्पॅनिश खलाशांपेक्षां इंग्लिश खलाशांची संख्याही जास्त होती. नवख्या अशा इंग्लिश खाडींत स्पॅनिशांना लढावें लागलें. आपसांतील मतभेद, जातिभेद, धर्मभेद वगैरे सर्व भेद बाजूला सारून इंग्रज खलाशी राष्ट्राभिमानानें प्रेरित होऊन संघटित झाले व त्यांचा हा राष्ट्रभिमान देशावरील संकटाचें निराकरण करण्यास उपयोगी पडला. स्वतः राणीनेंही आपल्या लोकांस उत्तेजन दिलें व 'देशसंरक्षणाची जबाबदारी मीं माझ्या लोकांवर पूणपणें टाकली आहे व माझे लोक ती योग्य रीतीनें पार पाडतील अशी माझी खात्री आहे.' असें त्यावेळीं तिनें भाषण केलें. त्यामुळें सर्व लोक भारून गेले. इंग्लंडला यावेळीं दैवही अनुकूल लाभलें व त्यामुळेंच वादळानें स्पॅनिश आरमाराचा नाश केला !

अभ्यास

१. इंग्लंड व स्पेन यांच्यामधील आरमारी युद्धाचीं कारणें सांगा.

२. स्पॅनिश आरमारावरील स्वतःला एक खलाशी समजून लिस्बन बंदरांतून निघाल्यापासून पुनः परत येईपर्यंतची थोडक्यांत हकीकत सांगा.

३. स्पेनच्या पराभवाचीं कारणें सांगून त्याचा परिणाम काय झाला तो सांगा.

४. स्पेन व इंग्लंड यांनीं आरमारी युद्धाची केलेली तयारी सांगा.

५. स्पॅनिश आरमारानें आक्रमिलेला मार्ग दाखविणारा नकाशा काढून त्यांत महत्त्वाच्या नोंदी करा.

६. खालील व्यक्तींसंबंधीं एक महत्त्वपूर्ण वाक्य लिहा :—पार्माचा ड्यूक, मेडिना सिडोनिया, हॉवर्ड, फ्रॅन्सिस अँज्यू, ऑरेंजचा विल्यम, लेस्टरचा ड्यूक, कॅथराईन मिडिची.

७. एलिझाबेथनें नेदरलंडमधील लोकांस मदत केली ती कां ? त्याचा परिणाम काय झाला ? तिनें ह्यूजिनॉट लोकांना मदत कां केली ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उतारा

१. आरमारी युद्धाच्या वेळचें एलिझाबेथचें भाषण–१५८८

माझ्या प्रेमळ बांधवांनो,

ज्यांना माझ्या जिवाची अत्यंत काळजी वाटते अशा माझ्या मित्रांनीं, माझ्या जिवास दगाफटका होईल म्हणून सध्यांच्या संकटप्रसंगीं सशस्त्र लोकांमधून मी निर्भयपणें हिंडणेंफिरणें योग्य नव्हे, असा मला सल्ला दिला; परंतु या प्रसंगीं माझ्या प्रेमळ व स्वामिनिष्ठ प्रजाजनांस सोडून दूर राहणें माझ्या हातून कधींही होणार नाहीं, याची तुम्ही खात्री बाळगा. भ्याड व जुलमी राज्यकर्त्यांनीं वाटेल तर भ्यावें! माझी स्थिति तशी नाहीं. ईश्वरी कृपेनें माझी सुरक्षितता व माझें सामर्थ्य माझ्या प्रजेच्या दृढ स्वामिनिष्ठेवर व सदिच्छेवरच अवलंबून आहे व या विश्वासावरच मी आजपर्यंत वागत आलें आहे. केवळ मजा मारावी अथवा जिवाची करमणूक करावी अशा हेतूनें या ठिकाणीं आज मी तुमच्यामध्यें आलें नसून लढाईच्या भर दंगलीमध्यें व रणधुमाळीमध्यें तुमच्या खांद्याशीं खांदा लावून समरांगणीं मृत्यूशीं टक्कर देण्याच्या हेतूनें आलें आहें! एवढेंच नव्हे, तर परमेश्वराकरितां, माझ्या राष्ट्राकरितां, नव्हे माझ्या लाडक्या प्रजेकरितां, माझी इभ्रत व माझा नश्वर देह मी आज धुळीस मिळविण्यासही तयार आहें! एखाद्या निशःक्त व दुबळ्या स्त्रीचा हा देह असला तरी त्या कुडीच्या आंतील आत्म्याचा उत्साह नि त्याचा जोम एखाद्या राजालाही–इंग्लंडच्या राजालाही–खात्रीनें लाजवील! काय बिशाद लागली आहे त्या पार्माची, नि त्या फिलिपची अगर एखाद्या युरोपियन राजाची या आपल्या राष्ट्रावर हल्ला करण्याची! माझ्या राज्याच्या अब्रूस धक्का बसेल अशी यत्किंचितही गोष्ट कोणाकडूनही झाली तर हातीं शस्त्र घेतल्याशिवाय मी कधींही राहणार नाहीं; मग त्यावेळीं मीच तुमची सेनापती, मीच तुमची न्यायाधीश व समरांगणावरील तुमच्या पराक्रमाचें चीज करणारीही मीच! तुमचें धैर्य नी शौर्य मला माहीत आहे. माझ्या सेनापतीच्या आज्ञेत राहण्याची तुमची तत्परता, तुमच्यांतील एकी, व युद्धप्रसंगींचा तुमचा पराक्रम मला माहीत आहे. अर्थात् परमेश्वराच्या कृपेनें या युद्धांतही आपण आपल्या राष्ट्राच्या व परमेश्वराच्या शत्रूवर विजय मिळवूं, ही खात्री बाळगा व युद्धास सज्ज व्हा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्नः—१. या भाषणावरून एलिझाबेथबद्दल तुम्हांस काय वाटतें ? या भाषणांत तुम्हांस तिचा स्वभाव दिसतो काय ? कशावरून ? कोणता ?

२. या भाषणाचा परिणाम काय झाला ? कोणाकोणावर झाला ? कशामुळें ?

३. पार्मा व फिलिप कोण ? त्यावेळीं इंग्लंडवरील संकट कोणतें ? तें संकट निवारण्याकरितां एलिझाबेथनें कोणती तयारी दाखविली ? त्याचा परिणाम काय झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

कालादर्श इ. स. १५५८–१६०३

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	युरोप–महत्त्वाच्या गोष्टी	हिंदुस्थान–महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ती
१५५८	१५५८–१६०३ एलिझाबेथ १५५९ धर्मसुधारणा	१५५६ दुसरा फिलिप-स्पेनचा राजा	१५५६–१६०५ अकबर	बहिरामखान
	१५६२ हॉकिन्स–गुलामांचा व्यापार	१५६० फ्रॅन्सिसचा मृत्यु. नववा चार्ल्स फ्रान्सचा राजा	१५६० अकबर वयांत येतो.	हॉकिन्स
	१५६५ ड्रेकचें पहिलें पर्यटन		१५६५ तालीकोटची लढाई	ड्रेक
१५७०	१५७० एलिझाबेथ धर्म बहिष्कृत			
	१५७२ ड्रेकची सफर–पनामा	१५७२ बार्थोलोम्यूची कत्तल	१५७२ राणा उदयसिंह –मृत्यु–	राणाप्रताप अबुल फजल,
			१५७६ हळदीघाटची लढाई	फ्रॉबिशर
	१५७७ ड्रेकची पृथ्वी-प्रदक्षिणेस सुरुवात			
१५८०	१५८० ड्रेक इंग्लंडला परत	१५८० स्पेनला पोर्तुगाल जोडला		तोडरमल्ल, मानसिंग
	१५८३ हाय कमिशन कोर्ट		१५८२ दिने इलाही–स्थापना	बिरबल
	१५८६ बॅबिंग्टन कट	१५८५ व्हर्जीनिया वसाहत–स्थापना		गिलबर्ट स्कॉटलंडची राणी मेरी
	१५८७ स्कॉटलंडची राणी मेरी–वध			
	१५८८ अजिंक्य आरमार–पराभव		१५८९ तोडरमल्लाचा मृत्यु	
१५९०			१५९० अकबराकडे जेसुइटांचें दुसरें शिष्टमंडळ	स्पेन्सर शेक्सपियर रॅले
१६००	ई. इं. कंपनी स्थापना १६०१ भिकाऱ्यांचा कायदा	१५९८ दुसऱ्या फिलिपचा मृत्यु	१५९९ अहमदनगरची स्वारी	बेन जॉनसन चांदबिबि बेकन
	१६०३ एलिझाबेथचा मृत्यु	१६०२ डच ई. इं. कंपनी	१६०५ अकबराचा मृत्यु	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३८. एलिझाबेथची अखेर

१. एलिझाबेथ व आयर्लंड :—स्पॅनिश युद्धांतून यशस्वी तऱ्हेनें बाहेर पडल्यावर एलिझाबेथला थोडी स्वस्थता मिळाली. तेव्हां या काळांत तिला आयर्लंडकडे लक्ष देण्यास सवड मिळाली. आठव्या हेन्रीनें आयर्लंडमध्यें खरी राजसत्ता निर्माण केली व तेथील बंडें मोडून तेथें स्वस्थता निर्माण केली होती. परंतु त्याचें धार्मिक धोरण आयरिश लोकांना मान्य झालें नाहीं. प्रॉटेस्टंट पंथाचीं बीजें आयर्लंडमध्यें रुजविण्याकरितां टॉमस क्रॉमवेलनें अनेक व्यर्थ प्रयत्न केले. तेथील धर्ममठही जप्त करण्यांत आले. ही गोष्ट आयरिश लोकांना मान्य झाली नाहीं. आयर्लंड देश मागासलेला असल्यानें त्याला धर्ममठांची अत्यंत आवश्यकता होती. परंतु हेन्रीनें धर्ममठांच्या जमिनी आयरिश सरदारांना दिल्या व त्यांना पदव्या देऊन आयर्लंडांत शांतता निर्माण केली. थोड्याच दिवसांनीं 'आयर्लंडचा राजा' अशी पदवीही त्यानें आपल्याला घेतली. यानंतरचा आयर्लंडचा इतिहास म्हणजे अत्याचार, खून व बंडें यांचा इतिहास होय. आयरिश लोकांस हुसकावून लावून त्या देशांत इंग्रजांच्या वसाहती स्थापन करण्याचा इंग्रजांनीं प्रयत्न चालविल्यानें आयरिश लोक चिडले होते. मेरीनें इसेक्सच्या ड्यूकच्या मदतीनें आयर्लंडांत थोडा काळ शांतता निर्माण केली. सन १५६७ मध्यें शेन ओनीलनें बंड केलें; परंतु इंग्लंडचा आयरिश गव्हर्नर सर हेन्री सिड्ने यानें तें मोडलें. सन १५७९ मध्यें डेसमॉडच्या ड्यूकनें आयर्लंडांत बंड केलें व तें १५८४ पर्यंत टिकलें. या बंडवाल्यांना ८०० स्पॅनिश लोकांची मदत मिळालेली होती; मात्र तिचा उपयोग झाला नाहीं. एलिझाबेथनें या बंडाचा मोड अत्यंत क्रूरपणानें केला. बंडवाल्यांच्या जमिनी जप्त करून त्या तिनें इंग्रजांना दिल्या व मन्स्टर परगण्यांत इंग्रजांची वसाहत स्थापण्याचा प्रयत्न करण्यांत आला; परंतु तो फसला. यानंतर बरींच वर्षें आयर्लंडांत स्वस्थता होती. सन १५९८ मध्यें टायरोनचा अर्ल ह्यू ओनील याच्या नेतृत्वाखालीं एक मोठें बंड आयर्लंडांत झालें. स्वधर्म व स्वदेश यांचें संरक्षण करणें हा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बंडवाल्यांचा मुख्य उद्देश होता. जेसुइट लोकांनीं व स्पॅनिशांनींही या बंडवाल्यांस मदत केली होती. बंडाचा मोड करण्याकरितां इसेक्सच्या अर्लच्या नेतृत्वाखालीं सुमारें २०,००० सैनिक एलिझाबेथनें आयर्लंडकडे रवाना केले. इसेक्सला बंडाचा मोड करतां आला नाहीं, व त्याचा पराभव झाला. तेव्हां मूर्खपणानें बंडवाल्यांशीं एक तह करून त्या तहान्वयें त्यानें आयरिश लोकांचें स्वातंत्र्य मान्य केलें. ही बातमी ऐकून एलिझाबेथला त्याचा राग आला व तिनें त्याला इंग्लंडांत परत बोलाविलें. तेथें तो राणीशीं भांडूं लागला; तेव्हां त्याला राजद्रोहाचा गुन्हा केल्याबद्दल फांशीं देण्यांत आलें (१६०१). इसेक्सनंतर माउंट जॉय याला सेनापतित्व देऊन एलिझाबेथनें आयर्लंडवर पाठविलें. त्यानें टायरोनचा पराभव करून आयर्लंडांत शांतता स्थापन केली. परंतु त्यानें हें बंड केवळ तरवारीच्या जोरावरच मोडलें. आयरिश लोकांच्या मनांतील द्वेष व असंतोष या वेळीं तात्पुरता ओसरला असला तरी तो उसळून केव्हां बाहेर पडेल हें सांगणें अशक्य होतें. एलिझाबेथच्या कारकीर्दींत तरी त्याचा पुन्हां स्फोट झाला नाहीं.

२. धार्मिक प्रश्न व अडचणी :—स्पॅनिश आरमाराचा पराभव करून इंग्लंडला वैभवाच्या शिखरावर पोंचविणारी एलिझाबेथ आयर्लंडमधील बंडाळी मोडल्यावर फार दिवस जगली नाहीं. तिच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं ती लोकमताप्रमाणें वागूं लागली होती. तरी धार्मिक बाबतींत आपल्या प्रस्थापित धर्मपंथाची ती कट्टी अभिमानी होती. त्या वेळीं कांहीं बिशप लोक प्रार्थनापुस्तकाप्रमाणें प्रार्थना करीत नसत. उलट कांहीं पाद्री लोक खासगी रीतीनें सभा भरवून धर्मतत्त्वांची चर्चा करीत. त्याला पुढें पुढें प्रार्थनेचें स्वरूप येऊं लागलें. ही प्रार्थना प्रार्थनापुस्तकाप्रमाणें नसे. ही गोष्ट राणीला आवडली नाहीं. तेव्हां त्या वेळचा कँटरबरीचा आर्चबिशप ग्रिंडाल याला वरील प्रार्थना थांबविण्याचा तिनें हुकूम सोडला. त्यानें अशा प्रार्थना होण्यास हरकत नाहीं, परंतु प्रार्थनापुस्तकाप्रमाणें त्या व्हाव्या असें फर्माविलें. पण हीही गोष्ट राणीला आवडली नाहीं व तिनें ग्रिंडालची उचलबांगडी करून त्याच्या ऐवजीं जॉन व्हिटगिफ्ट याला कँटरबरीचा आर्चबिशप नेमलें. या वेळीं इंग्लंडच्या धर्मव्यवस्थेंत बदल करून ती प्रेसबिटे-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रियन पंथाप्रमाणें एका मंडळाकडून करण्यांत यावी असें कांहीं लोक म्हणत होते; तर कांहींचें म्हणणें पडलें कीं धर्मव्यवस्था पूर्णपणें स्वतंत्र असावी. व्हिटगिफ्ट यानें कोणालाच अनुमति दिली नाहीं. तेव्हां तो विषय पार्लमेंट-पुढें चर्चेकरितां निघाला असतां वरील चळवळीच्या पुढाऱ्यांना इंग्लंडमधून हाकलून देऊन राणीनें पार्लमेंटला चांगलीच तंबी देऊन कळविलें कीं, "धर्मव्यवस्थेसंबंधीं व्यवस्था करण्याचा माझा सार्वभौम हक्क आहे व त्या संबंधांत चर्चा होतां कामा नये." राणीच्या या निरोपामुळें पार्लमेंटला चांगलीच थप्पड बसली.

३. भिकाऱ्यांसंबंधीं कायदा (१६०१):—एलिझाबेथच्या कारकीर्दींत एक चांगली गोष्ट झाली होती; व ती म्हणजे भिकाऱ्यांसंबंधीं कायदा पास करणें ही होय. फार प्राचीन काळापासून धर्मपीठ हें गरिबांचें वाली समजण्यांत येत असे. अर्थात् त्याच्यामार्फत व पुढें धर्ममठांच्या तर्फेंही गरिबांना भिक्षा, राहण्यास जागा, अन्न व शिक्षणही मिळत असे. अशी भिक्षा मिळत राहिल्यानें अनेक उनाड, गरिबीच्या आवरणाखालीं स्वतःला दडवून घेऊन, खुशालचेंडूप्रमाणें वागूं लागले होते. ही गोष्ट लक्षांत घेऊन आठव्या हेन्रीनें 'खरा गरीब व धट्टा-कट्टा कोण' हें ठरवून योग्य माणसासच भिक्षा मागण्याचा परवाना देण्याची पद्धति सुरू केली होती. परंतु धर्ममठांचा विध्वंस, शेतांना कुंपणें घालून शेती बंद करण्याची पद्धति, शेतीऐवजीं मेंढपाळाचा धंदा बोकाळलेला, या व इतर गोष्टींमुळें इंग्लंडांत बेकारी अतिशय माजली. गरिबांचा वाली इंग्लंडांत राहिला नाहीं व गरीब व बेकार यांचे हाल कुत्रा खाईना! तेव्हां एलिझाबेथनें सन १५७२ मध्यें प्रत्येक गांवच्या मेयरला आपल्या हद्दींतील लोकांवर 'धर्मादाय कर' बसविण्याचा हक्क दिला व त्याच्या उत्पन्नांतून गरिबांचा प्रतिपाळ करण्यांत यावा असें तिनें ठरविलें. याची योग्य अंमलबजावणी होते किंवा नाहीं तें पाहण्याकरितां तिनें योग्य अधिकारीही नेमले. परंतु यानें गरिबांची व्यवस्था चांगलीशी झाली नाहीं. तेव्हां पार्लमेंटनें एक नवीन कायदा सन १६०१ मध्यें पास केला. या कायद्यान्वयें खालील गोष्टी ठरल्या. प्रत्येक गांवांतील लोकांनीं आपल्या हद्दींतील गरि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बांचा प्रतिपाळ करावा. जमीनसाऱ्याबरोबरच सर्वांकडून धर्मादाय कर अधिकाऱ्यांनीं वसूल करावा; बेकारांना काम मिळवून देणें व लुले–पांगळे–आंधळे यांना व गरिबांना मदत करणें या कारणांकरितां वरील कराचा उपयोग करावा. या कायद्यानें बेकारांना काम मिळूं लागलें व गरिबांची सोय झाली. शिवाय खासगी रीतीनें धर्मादाय करणाऱ्या लोकांच्या संवयीस आळा बसला. या कायद्यांतही अनेक अडचणी पुढें उत्पन्न झाल्या व त्या सुधारून त्यांची अंमलबजावणी पुढें सन १८३४ पर्यंत चालू होती.

४. एलिझाबेथ व पार्लमेंट :—पार्लमेंटला धाब्यावर बसवून मन मानेल तसा अनियंत्रितपणें राज्यकारभार करण्याची ट्यूडर राजांनीं प्रथाच पाडलेली होती. अतिशय जरूरीच भासली तर ट्यूडर राजे पार्लमेंट बोलावीत. लोकांनींही त्या विरुद्ध कधीं तक्रार केली नाहीं. त्यांचा व्यापार–धंदा जोंपर्यंत योग्य रीतीनें चालला होता व तो चांगला चालण्याकरितां लागणारी शांतता जोंपर्यंत ट्यूडर राजे देशांत स्थापन करीत होते तोंपर्यंत राजकारणांत भाग घ्यावा व आपल्या राजकीय हक्कांची जोपासना करावी असें लोकांसही कधीं वाटलें नाहीं. परंतु लोकांची ही वृत्ति एलिझाबेथच्या उत्तर काळांत बदलली. आपल्या कारकीर्दीच्या पूर्वार्धांत एलिझाबेथनें अत्यंत अनियंत्रितपणें राज्यकारभार हांकला. पण शेवटीं शेवटीं तिला लोकमताला मान देऊन पार्लमेंटपुढें नमावें लागलें. सुरुवातीला तिला लोकांनीं विरोध केला नाहीं, कारण त्या वेळीं त्यांना देशांत शांतता पाहिजे होती. प्रस्थापित धर्माची स्थापना करण्याकरितां पार्लमेंटनें एलिझाबेथनें सुचविलेले अनेक कायदे पास केले; एवढेंच नव्हे, तर पोपनें तिला धर्मबहिष्कृत केलें त्या वेळींही पार्लमेंटनें तिच्या सांगण्याप्रमाणें नास्तिक व धर्मलंड लोकांविरुद्ध कायदा पास केला. असें जरी असलें तरी पार्लमेंटनें एलिझाबेथला मुळींच त्रास दिला नाहीं असें नाहीं. राणीचें परराष्ट्रीय व धार्मिक धोरण योग्य कीं अयोग्य हें ठरविण्याचा पार्लमेंटनें अनेक वेळां निष्फळ प्रयत्न केला. अत्यंत निर्भयपणें तिच्या लग्नाबद्दल व वारसा ठरविण्याबद्दल पार्लमेंटनें अनेक वेळां तिच्या देखत चर्चा केली व तिला भंडावून सोडलें. तेव्हां ती चिडली व या गोष्टीची पार्लमेंटनें चर्चा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करतां कामा नये असें तिनें स्पष्टपणें सांगितलें तेव्हां पार्लमेंटनें मौन धरलें. असें असलें तरी पार्लमेंटच्या खास अधिकाराकरितां या वेळीं पार्लमेंट सभा राणीशीं भांडूं लागली. अटक-स्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य व धर्म, व्यापार आणि परराष्ट्रीय धोरण यांची उघडपणें चर्चा करणें या बाबतींत पार्लमेंटनें तिच्याशीं भांडून भांडून वरील तिन्ही गोष्टी तिच्याकडून मान्य करून घेतल्या. हे सर्व प्रकार अत्यंत खेळीमेळीनें चालत असत.

५. पार्लमेंट व मक्तेदान :—परंतु सन १५८८ मध्यें स्पॅनिश आरमाराचा पराभव झाल्यानंतर व इंग्रजांना पराक्रमणाची भीति उरली नाहीं, त्या वेळीं लोकांना व पार्लमेंटला चांगलाच धीर व जोर आला व आपल्या अधिकाराकरितां ते राणीशीं नेटानें झगडूं लागले. कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं मक्त्यांसंबंधीं प्रश्न उत्पन्न झाला. आपल्या आवडत्या उमरावांना व दरबारी लोकांना राणी कांहीं मक्ते देत असे. मीठ, कातडीं, सोन्याच्या तारा, साबण वगैरे जिनसा तयार करून विकण्याचा मक्ता अनेक दरबारी लोकांना तिनें दिला होता. यामुळें हे लोक ते जिन्नस वाटेल त्या किंमतीला विकीत असत. त्यामुळें ते जिन्नस महाग झाले होते. हें लक्षांत घेऊन सन १५९७ सालीं पार्लमेंटनें राणीचा मक्ते देण्याचा अधिकार हिरावून घेण्याकरितां चंग बांधला. तें कळतांच 'मक्ता देण्याचा अधिकार म्हणजे माझ्या उद्यानांतील उत्कृष्ठ फूल अथवा माझ्या मुकुटांतील अत्यंत मौल्यवान् रत्न होय, तरी तें हरण करूं नये' असा तिनें पार्लमेंटला निरोप पाठविला व त्या प्रश्नाचा आपण योग्य तो निकाल लावूं असें तिनें पार्लमेंटला कळविलें. त्यामुळें त्या सभेंतील वादळ थोडें थंडावलें. पुढें सन १६०१ सालीं त्यासंबंधीं लोक फारच तक्रार करूं लागले, व राणीचा मक्ते देण्याचा अधिकार काढून घ्यावा असें पार्लमेंटनेंही ठरविलें. त्या वेळीं आपण फार ओढून धरतां कामा नये असें वाटून राणीनें सर्व मक्ते रद्द करण्याचें पार्लमेंटला आश्वासन दिलें. त्याप्रमाणें तिनें, सर्व नसले तरी, पुष्कळ मक्ते रद्द केले व पार्लमेंटच्या म्हणण्याला मान तुकविली.

६. पार्लमेंटच्या सत्तेची वाढ :—वरील गोष्टीवरून एक गोष्ट सिद्ध होते. एलिझाबेथसारख्या राणीला पार्लमेंटपुढें नमतें घ्यावें लागलें यावरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पार्लमेंटची सत्ता वाढली हें सिद्ध झालें. याला अनेक कारणें दाखवितां येतील. इंग्लंडला परचक्राची भीति उरली नसल्यानें लोकांचा व्यापार वाढला व देशांत स्वस्थता व शांतता निर्माण झाली होती. ट्यूडर काळाच्या सुरुवातीपासूनच नव्या विद्येचा इंग्लंडांत प्रसार होऊं लागला होता; व त्यामुळें लोकांचे विचार व आचार यांच्यांत पुष्कळ फरक पडलेला होता. त्यांची चिकित्सकबुद्धि आतां स्वैरपणें संचार करूं लागल्यानें लोकांना आपल्या तक्रारी राणीपुढें निर्भीडपणें मांडण्याची संवय जडली. मध्यम वर्गाला ट्यूडर राजांनीं हाताशीं धरलें, त्यामुळें त्यांची सर्वांगीण उन्नति झाली व व्यापार–उदीम त्यांच्या हातांत असल्यानें त्यांच्या हातीं पैसा खेळूं लागला. या श्रीमंतीबरोबरच आपल्या हक्कांची त्यांना जाणीव झाली. शिवाय या वेळीं प्यूरिटन लोकांचा इंग्लंडांत चांगलाच प्रभाव दिसूं लागला होता. खुद्द पार्लमेंटमध्यें त्यांचे अनेक प्रतिनिधी होते. अनियंत्रित कारभाराला आळा घालून लोकशाहीचा प्रसार करणेंच योग्य होय अशी त्यांची मीमांसा असल्यानें राजसत्तेस आळा घालण्याचे त्यांच्याकडून वारंवार प्रयत्न होत असत. त्यांच्या विचारांची छाप इतर लोकांवर सहज पडूं लागली व त्यामुळेंही राजसत्तेच्या अनियंत्रितपणास आळा बसूं शकला. एलिझाबेथनें पार्लमेंटच्या निवडणुकीवर आपला अधिकार चालावा म्हणून नवीन तीस शहरांना प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिला होता. परंतु प्यूरिटन लोकांच्या वजनामुळें या गोष्टींत तिला फारसें यश मिळालें नाहीं. एकंदरींत पाहतां वरील सर्व गोष्टींमुळें लोक राजकारणाकडे जास्त लक्ष देऊं लागले, व त्यामुळें पार्लमेंटची सत्ता वाढण्यास मदत झाली असें म्हणणें प्राप्त आहे.

एलिझाबेथ

७. एलिझाबेथची अखेर :—कारकीर्दीच्या अखेरी–अखेरीस एलिझाबेथच्या लोकप्रियतेस ओहोटी लागलेली होती. तिची प्रकृतीही ढांसळूं लागली होती व तिला दगदग होईनाशी झाली. असें असलें तरी तिला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'म्हातारे' म्हटल्याची अत्यंत चीड येई. तिनें लग्न केलें नसल्यामुळें गादीला वारस नव्हता. म्हणून तिच्या मंत्र्यांनीं वारसा नेमण्याची तिला अनेक वेळां सूचना केली व प्रत्येक वेळीं तिनें ती झिडकारून टाकली. परंतु जसजसा मृत्यू जवळ आला तसतसा आपल्या प्रधानांचा सल्ला मानावा असें तिला वाटूं लागलें; व त्यांच्या सल्ल्याप्रमाणें तिनें स्कॉटलंडचा राजा सहावा जेम्स याला आपला वारस नेमलें. सन १६०३ मध्यें ती अखेरची आजारी पडली, व एप्रिलच्या तिसऱ्या तारखेस दुपारीं तीन वाजतां आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षी इंग्लंडची ही अविवाहित राणी मृत्यु पावली. राष्ट्रहिताकडे नजर ठेवून लोकांमध्यें राष्ट्राभिमान चेतविणाऱ्या या राणीनें महनीय कामगिरी करून इंग्लंडच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. धार्मिक, आर्थिक, राजकीय, व्यापारविषयक वाङ्मयीन वगैरे प्रत्येक बाबतींत धुरीणत्व स्वीकारून तिनें परकीयांचें वर्चस्व व नियंत्रण झुगारून दिलें व आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून दिलें. तिच्यामुळेंच राष्ट्राची सर्वांगीण उन्नति झाली व परकीयांकडून इंग्लंडला अग्रेसरत्वाचा मान मिळूं लागला. तिच्या वेळीं लोकांमध्यें निर्माण झालेला राष्ट्रीय बाणा पुढें कधींही लोप पावला नाहीं व इंग्लंडची त्यामुळें एकसारखी भरभराटच होत गेली.

अभ्यास

१. एलिझाबेथचें आयर्लंडसंबंधीं धोरण वर्णा.

२. भिकाऱ्यांसंबंधानें कायदा करण्याचें काय कारण? त्या कायद्यानें काय साधलें?

३. इतर ट्यूडर राजांपेक्षां एलिझाबेथला पार्लमेंटकडून जास्त त्रास झाला असें कां म्हणतात? कोणकोणत्या प्रकरणीं पार्लमेंटनें राणीला त्रास दिला? त्याचा शेवट काय झाला? यावरून पार्लमेंटच्या सत्तेसंबंधीं तुम्हांस काय म्हणतां येईल?

४. एलिझाबेथचें धार्मिक धोरण थोडक्यांत वर्णा.

५. एलिझबेथला इंग्रज राजे-राण्यांत फार मोठा मान दिला जातो. कां?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. एलिझबेथच्या काळचा एक कालादर्श काढून त्यांत महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख करा.

७. मक्ते देण्याची पद्धति, तिच्या गुणदोषांसह वर्णन करा.

८. राणी या नात्यानें एलिझाबेथची योग्यता सांगा.

उतारे

१. मक्तेपद्धतीबद्दल एलिझाबेथचा पार्लमेंटला निरोप (१६०१.)

माझ्या मंत्रिमंडळानें समजावून सांगितल्यावरून व माझ्या लाडक्या प्रजाजनांकडून अनेक अर्ज माझ्याकडे आले त्यावरून मी जे मक्ते दिले आहेत त्यामुळें माझ्या प्रजाजनांस मोठा उपसर्ग पोंचत आहे हें मला कळलें. एवढेंच नव्हे तर ज्यांनीं माझ्याकडून हे मक्ते घेतले त्यांचे मध्यस्थही माझ्या प्रजेवर जुलुम करतात हेंही माझ्या ध्यानीं आलें आहे. हे मक्ते देतांना प्रजेला त्रास व्हावा व तिच्यावर जुलुम व्हावा अशी माझी इच्छा नव्हती. मक्ते दिल्यामुळें माझ्या प्रजेला जो त्रास होतो आहे त्याबाबतींत मी शक्य त्या सुधारणा घडवून आणण्याचें ठरविलें आहे. मक्ते–दानाच्या बाबतींतील माझा अधिकार अत्यंत नाजुक आहे. अर्थात् मी ज्या सुधारणा करणार आहें त्या बाबतींत आपण चर्चा करून अगर बोलून मजबद्दल अगर माझ्या धोरणाबद्दल शंका प्रदर्शित करण्यानें मला फार वाईट वाटेल. कारण अत्यंत संकटसमयींही माझ्या अधिकारावर आपण कधींही अतिक्रमण केलेलें नाहीं. संकटप्रसंगीं व अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगींही माझ्या अधिकाराबद्दल मी नेहमीं जागरूक असतें. यावेळीं मी इतकेंच कळवूं शकतें कीं कांहीं मक्ते मी अजीबात रद्द करणार आहें, कांहीं तात्पुरते रद्द करणार आहें व कांहींत सुधारणा करणार आहें. मात्र मी जें करणार आहें त्यामुळें माझ्या प्रजाजनांना उपसर्ग पोंचेल अगर मक्तेदारांच्या अन्याय्य वर्तनानें माझ्या प्रजेवर जुलुम होणार असेल तर तें मला खपणार नाहीं, हें आपण ध्यानांत ठेवा.

प्रश्न :—१. मक्ते देण्याच्या बाबतींत एलिझाबेथचें कोणतें धोरण होतें ? त्यामुळें प्रजेला त्रास कोणता झाला ?

२. मक्त्यांबद्दल पार्लमेंटला राणीनें आश्वासन काय दिलें ? तसें देण्याचें कारण काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३९. एलिझाबेथचा काळ: सुवर्णयुग

१. सुवर्णयुग—एलिझाबेथच्या कारकीर्दीचा काळ वैभवाचा काळ समजला जातो. या काळांत सर्व प्रकारें राष्ट्राचें पाऊल पुढें पडत गेलें व देशाची अनेक प्रकारें सुधारणा झाली. लोकांना अनेक प्रकारच्या नव्या नव्या कल्पना व नवे नवे विचार सुचूं लागल्यानें त्यांच्या ज्ञानांत एकसारखी वाढ होत गेली. एलिझाबेथच्या काळांत ज्ञानाचीं नवीं नवीं दालनें उघडलीं गेल्यानें लोकांच्या बुद्धीला चालना मिळाली व त्यामुळें अनेक शोधक, संशोधक, दर्यावर्दी, व्यापारी, लेखक, कलावान व कलावंत लोक पुढें आले. त्यामुळें इंग्लंडची भरभराट झाली व तें राष्ट्र वैभवाच्या शिखरास पोंचलें. या सर्वांस खुद्द राणीनेंही अनेक प्रकारें उत्तेजन दिलें व त्यांना राजाश्रय मिळाल्यानें त्यांच्याकडून योग्य ती कामगिरी घडून आली वं देश प्रगतिपथावर गेला. तिच्या काळाला 'सुवर्णयुग' मानण्यांत येतें व तें खरेंही आहे. एलिझाबेथ ज्या वेळीं राणी झाली त्या वेळीं आपापसांतील दुही, धार्मिक अस्वस्थता, व्यापारांतील अस्थिरता, परकीय राष्ट्रांचा इंग्लंडबद्दलचा प्रतिकूल ग्रह वगैरे अनेक कारणांमुळें देशाची स्थिति हलाखीची झाली. ती सुधारून इंग्लंडला महनीय असें स्थान प्राप्त झालें. या सर्वांमुळेंच युगकर्ती म्हणून एलिझाबेथ मानली जाते.

२. राष्ट्रीयधर्माची स्थापना:—एलिझाबेथ गादीवर आली त्या वेळीं इंग्लंडांत कॅथॉलिक धर्माला राजाश्रय होता; व बहुसंख्य इंग्रज त्याच पंथाचे होते. परंतु त्यामुळें देशांत दुही निर्माण होऊन पोपसारख्या परकीयाचें देशाच्या ऐक्याला विघातक असें प्रस्थ माजतें ही गोष्ट तिनें ओळखली. तेव्हां प्रस्थापित धर्माची स्थापना करून तिनें इंग्लंडला राष्ट्रीय धर्म मिळवून दिला. यालाच एपिस्कोपेलियन धर्मपंथ असेंही म्हणतात; कारण या धर्मपंथाचीं सर्व सूत्रें राजा व बिशप यांच्या हातीं असतात. या पंथाची स्थापना करीत असतां तिनें दाखविलेलें धैर्य, व क्वचित् प्रसंगीं क्रौर्य, यामुळें जहाल व मवाळ धर्माभिमान्यांमध्येंही एकोपा निर्माण झाला. या धार्मिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐक्याच्या जोरावरच तिला राष्ट्रैक्य साधतां आलें, व वाटेल त्या संकटाला निर्भयपणें व धैर्यानें तोंड देण्याची ताकद राष्ट्रामध्यें निर्माण झाली. तसेंच देशांतील धार्मिक दुही नष्ट झाल्यानें लोकांनाही हायसें वाटलें व अनेक नव्या नव्या कल्पना प्रसृत होऊं लागून त्यांकडे लोकांचें लक्ष वेधूं लागलें. नव विद्येच्या प्रसारानें लोकांमध्यें चिकित्सकबुद्धि अगोदरच निर्माण झाली असल्यानें धर्मावरील त्यांचा अंधविश्वास नाहींसा झाला होता व त्यांतच नवीन राष्ट्रीय धर्माची स्थापना होऊन राष्ट्रैक्य साधल्यानें त्यांच्याकडून मोठमोठीं कामें सहज स्फूर्तीनें होऊं लागलीं.

३. ब्रिटिश बेटांचें एकीकरण :—राष्ट्रीय धर्माची स्थापना होऊन इंग्लंडमध्यें ऐक्याचे वारे वाहूं लागले. या ऐक्याच्या जोरावरच एलिझाबेथला स्कॉटलंडशीं सलोखा व मैत्री स्थापन करतां आली. तसेंच आयर्लंडमध्यें धार्मिक गोष्टींबद्दल असंतोष माजून तेथील लोक बंडें करीत असत. तेथील बंडाळी नामशेष करून इंग्लिशांची सत्ता तेथें दृढ करण्याचे अनेक प्रयत्न एलिझाबेथनें केले व त्यांत तिला यश प्राप्त झालें होतें. खुद्द इंग्लंडमधील वेल्स प्रांत आठव्या हेन्रीनें इंग्लंडला जोडून घेतला होताच. या सर्व गोष्टींमुळें इंग्लंड, वेल्स व आयर्लंड हे सर्व एका सत्तेखालीं आले, व यांची स्कॉटलंडशीं मैत्री जमल्यानें वरील सर्व प्रांतांचें भावी एकीकरण शक्य झालें. यांसुळेंही साम्राज्याच्या दृढीकरणास पुष्कळ मदत झाली.

४. आरमारी वाढ व स्पेनचा पराभव :—लोकांमध्यें व्यापक दृष्टि उत्पन्न झाल्यानें त्यांच्यामधील घरकोंबडेपणा नाहींसा होऊं लागला. व तशांतच स्पॅनिश व पोर्तुगीज यांच्या पराक्रमांचीं वर्णनें वाचून व ऐकून तसे पराक्रम करण्यास इंग्रज लोक प्रवृत्त होऊं लागले. अशा धाडसी व पराक्रमी लोकांत ड्रेक, हॉकिन्स, रॅले, फ्रॉबिशर, चॅन्सेलर वगैरे अनेक नामांकित दर्यावर्दी लोक निर्माण झाले. त्यामुळें अनेक खलाशांना दर्यावर्दीपणाचा, नौकानयनाचा व आरमारी युद्धाचाही अनुभव मिळाला. अनेकांनीं अनेक भौगोलिक शोध लावण्याची खटपट केली, नवीन नवीन जलमार्ग शोधून काढण्याची शर्थ केली व चांचेगिरीबरोबरच आरमारी शिक्षणही मिळवून घेतलें. या सर्व कारणांमुळेंच इंग्लंडचें आरमार आयतेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निर्माण झालें व त्यावर ड्रेक, हॉकिन्ससारखे निष्णात व कर्तबगार अधिकारी मिळाल्यानें इंग्लंडला 'अजिंक्य' आरमाराचा पराभव करतां आला. स्पेनचा पराभव झाल्यानेंच समुद्रावरील सत्ता इंग्लंडकडे आली. व इंग्लंड देश समुद्राचा स्वामी म्हणून ओळखला जाऊं लागला. एलिझाबेथच्या वेळीं इंग्लंडनें मिळविलेला हा मान अजूनही कोणास हिरावून घेतां आलेला नाहीं.

५. साम्राज्याची मुहूर्तमेढ : वसाहतींची स्थापना :—इंग्लंडच्या निष्णात खलाशांनीं ब्रिटिश साम्राज्याची मुहूर्तमेढही रोविली. रॅले, गिलबर्ट, ड्रेक वगैरे खलाशांनीं अमेरिकेंत जाऊन तेथें वसाहती स्थापण्यास सुरवात केली. सन १५७९ मध्यें ड्रेकनें कोलंबियाचा ताबा घेतला; गिलबर्टनें न्यू फाउंडलंडमध्यें सन १५८३ मध्यें वसाहत स्थापन केली व रॅलेनें सन १५८४ मध्यें अमेरिकेंत 'व्हर्जीनिया' व सन १५९५ मध्यें वेस्ट इंडीज बेटांमध्यें वसाहती स्थापन केल्या. खुद्द आयर्लंडमध्यें रॅलेनें वसाहती स्थापन केल्या. वसाहती स्थापन करण्याच्या या प्रयत्नांमुळें भावी ब्रिटिश साम्राज्याची स्थापना झाली, असें इतिहासकार मानतात. याशिवाय हिंदुस्थानचा मार्ग सांपडल्यानें त्या दृष्टीनेंही इंग्रजांचे उद्योग सुरूच होते.

६. व्यापाराची वाढ :—वसाहतींची स्थापना व आरमारी युद्धांतील जय यांमुळें इंग्रजांचा समुद्रावरील स्वैरसंचार अत्यंत निर्भयपणें होऊं लागला व त्यांच्या व्यापाराची वाढ होऊं लागली. हॉकिन्सनें गुलामांचा व्यापार सुरू केलाच होता. सन १६०० सालीं ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना करण्यांत आली व तिला राणीनें पूर्वेकडील व्यापाराचा परवाना दिला. त्याचप्रमाणें मस्कोव्ही, लीव्हंट वगैरे अनेक व्यापारी कंपन्या स्थापन झाल्या. स्पॅनिश नेदर्लंडमधील फ्लँडर्समधील उत्तम व नांवाजलेले विणकरी व फ्रान्समधील 'ह्यूजिनॉट' (प्रॉटेस्टंट) कारागीरही इंग्लंडांत आश्रयार्थ आले होते. त्यांना एलिझाबेथनें इंग्लंडांत आश्रय दिल्यानें इंग्लंडमध्यें विणकलेची वाढ होण्यास मदत झाली. या लोकांकडून इंग्लिशांनीं विणकला उचलून त्या धंद्यांत अग्रेसरत्व मिळविलें. याच वेळीं अनेक मोठमोठे व्यापारी उदयास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येऊं लागले होते. त्यांत सर टॉमस ग्रेशॅम हा मोठा नामांकित व्यापारी होता. त्यानेंच इंग्लिश सराफकट्टयाची स्थापना केली (१५७१). या सराफकट्टया-तर्फे लोकांना व राज्यकर्त्यांसही स्वस्त व्याजानें कर्ज मिळण्याची सोय करण्यांत आली होती. या सोयीचा अनेक व्यापाऱ्यांनीं फायदा घेतला व आपला व्यापार वाढविला. यामुळें लंडन शहराचें व्यापारी महत्त्व वाढ-ण्यांस मदत झाली. लंडनप्रमाणेंच बर्मिंगहॅम, मँचेस्टर, शेफील्ड वगैरे शहरें व्यापार व कारखाने यांकरितां प्रसिद्धीस येऊं लागलीं होतीं. यामुळें 'गिल्ड' नामक मध्ययुगीन व्यापारीमंडळाकडून व्यापारनियं-त्रणाचें काम चोखपणें होईनासें झालें. तेव्हां औद्योगिक व व्यापार-विषयक बाबींचें नियंत्रण करण्याकरितां ट्यूडर राजांनीं अनेक उपायांची योजना केली. एलिझाबेथच्या वेळीं व्यापारांत अनेक नवखे व नालायक लोक शिरले होते; व त्यामुळें व्हावी तशी व्यापाराची वृद्धि होत नव्हती. हें जाणून एलिझाबेथनें सन १५६३ मध्यें उमेदवारीचा कायदा पास केला. या कायद्यानें सात वर्षें पूर्वशिक्षण घेतल्याशिवाय कोणीही स्वतंत्र धंदा अगर व्यापार करूं नये असें ठरविण्यांत आलें. यामुळें औद्योगिक व व्यापारी क्षेत्रांतील नालायक व अननुभवी लोकांवर नियंत्रण घालण्यांत आल्यानें कुशल कारागीर व कसलेले व्यापारी यांच्या हातीं उद्योग–धंदे व व्यापार गेला व त्यामुळें इंग्लंडच्या व्यापाराची वाढ होण्यास मदत झाली. वाढत्या व्यापारास मदत व्हावी या हेतूनें एलिझाबेथनें आठवा हेन्री व सहावा एडवर्ड यांच्या वेळीं सुरू झालेलीं नकली नाणीं बंद केलीं व त्यांचे ऐवजीं शुद्ध नाणीं सुरू केलीं. यामुळें इंग्लंडची पत वाढून व्यापा-राची वाढ होण्यास मदत झाली.

७. अनियंत्रित राजसत्ता व लोकशाही :—अनियंत्रित राजसत्ता व सनदशीर राज्यपद्धति यांची सांगड योग्य रीतीनें घालण्यांत एलिझाबेथनें कौशल्य दाखविलें. यावेळीं पार्लमेंटमध्यें व्यापारी, खलाशी, नवीन सरदार, प्रॉटेस्टंट, प्यूरिटन वगैरे अनेक प्रकारच्या लोकांचा भरणा होता. या सर्वांना हाताशीं धरून तिनें अनियंत्रितपणें राज्यकारभार हांकला. अनियंत्रित राजसत्तेचा तिला इतका हव्यास होता कीं, लग्न केल्यास नवरा–बायकोंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजसत्तेची विभागणी करावी लागेल, म्हणून तिनें लग्नही केलें नाहीं. असें असलें तरी प्रत्येक गोष्ट ती राष्ट्राभिमानानें प्रेरित होऊन करीत असे. त्यामुळें ती लोकांना प्रिय झाली होती. परंतु स्वस्थता, विद्येचा प्रसार, व्यापाराची वाढ, शत्रूंपासून निर्भयपणा वगैरे अनेक कारणांमुळें लोकांचें लक्ष राजकारणाकडे वळूं लागलें; व त्यांच्यामध्यें राजकीय हक्कांची जाणीव उत्पन्न झाली. हें ओळखूनच पार्लमेंटला कधीं हातीं धरून, कधीं धुडकावून देऊन तर कधीं नमतें घेऊन एलिझाबेथनें लोकमताला वाव दिला व आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस तिनें सनदशीर राज्यपद्धतीचा पाया सुधारून लोकशाहीकरितां उत्तम भूमि निर्माण करून ठेविली.

८. तेजस्वी वाङ्मयाची उत्पत्ति :—देशांत शांतता व स्वस्थता सुरू झाली म्हणजे वाङ्मय निर्माण होतें असें म्हणतात; त्याची प्रचीति एलिझाबेथच्या वेळीं आली. अनेक नामांकित लेखक व ग्रंथकार या काळांत उदयास आले. प्रवास करून ज्ञानांत भर घालावी व त्याच्या जोरावर नव्या कल्पना, नवे विचार व नव्या गोष्टी लिहून लोकांचें मनरंजन करावें व त्यांस

सर फिलीप सिडने

बोधामृत पाजावें अशी एक प्रथाच यावेळीं पडली होती. ड्रेक, हॉकिन्स, रॅले, फ्रॉबिशर यांच्या प्रवासाचीं व पराक्रमाचीं वर्णनें व धर्मासंबंधीं चर्चा करणारीं पुस्तकें यांचा खप यावेळीं अतिशय होत असे. परंतु यापेक्षांही अत्यंत नामांकित असे अनेक ग्रंथकार व विद्वान् लेखक यावेळीं प्रसिद्धी पावले. लॉर्ड बेकन, एडमंड स्पेन्सर, सर फिलिप सिडने, बेन जॉनसन, मार्लो व कवींचा मुकुटमणि शेक्सपियर याच काळांत होऊन गेले. निबंध लिहिण्याची प्रथा प्रथमतः लॉर्ड बेकननेंच पाडली. त्याच्या वेळीं तोच एक मोठा जाडा विद्वान् समजला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेक्सपियर

जात असे. एडमंड स्पेन्सरचें 'फेअरी क्वीन' हें काव्य त्या वेळीं लोकांना फारच आवडलें; व 'तो एक अभिजात कवि आहे' अशी सर्वांची समजूत होती. त्याचेंच दुसरें नामांकित काव्य म्हणजे 'शेपर्डस् कॅलेंडर' हें होय. झटफेनचा वीर सर फिलिप सिडने हाही एक उत्तम कवि होता. सर हेन्री सिडने याचा तो मुलगा असून उत्तम मुत्सद्दी, शूर योद्धा व विद्वान् लेखक म्हणून प्रसिद्ध होता. त्याचीं सुनीतें, काव्याचें जोरदार मंडन करणारा एक ग्रंथ व 'आर्केडिया' नांवाची कादंबरी यावरून तो कीटस्प्रमाणें एक मोठा प्रतिभावान लेखक झाला असता, असें विद्वानांचें मत आहे. बेन जॉनसन हा कवि व नाटककार शेक्सपियरचा प्रतिस्पर्धी होता. आनंदपर्यवसायी नाटकें लिहिण्यांत त्याचा हातखंडा असे. केवळ करमणुकीकरितांही त्यानें प्रहसनें लिहिलीं होतीं; व तीं लंडनच्या ग्लोब नाटकगृहांत अत्यंत लोकप्रिय झालेलीं होतीं. क्रिस्टॉफर मार्लो हा शोकपर्यवसायी प्रहसनें व नाटकें लिहिण्याबद्दल प्रसिद्ध आहे. हॅम्लेट, ऑथेल्लो, किंग लियर, मर्चंट ऑफ् व्हेनिस, मॅकबेथ वगैरे अनेक नामांकित नाटकें लिहिणारा व जगांतील नाटककारांचा मुकुटमणि विल्यम शेक्सपियर एव्हन नदीच्या कांठीं वसलेल्या स्ट्रॅफर्ड गांवीं सन १५६४ सालीं जन्मास आला. त्यानें लिहिलेल्या नाटकांमुळें त्याला अजरामर कीर्ति मिळाली असून ती आजपर्यंत एकानेंही लांच्छित केलेली नाहीं. लंडनच्या ग्लोब नाटकगृहांत त्याचीं नाटकें नेहमीं होत व आपल्या नाटकांतून तो स्वतःही काम करी. नाटककार म्हणून त्याची प्रसिद्धी झाली त्या वेळीं अनेक लुंगे-सुंगे नाटककार आपलीं नाटकें सुधारून देण्याकरितां त्याला विनंति करीत व त्यामुळें अनेकांच्या नाट्यकथा त्यानें सुधारून दिल्या. काव्य व कथा या दोन्हीकरितां शेक्सपियरचीं नाटकें प्रसिद्ध आहेतच; परंतु संसाराचें नितांतरम्य व खरेंखुरें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वास्तववादी चित्र रेखाटण्यामध्यें त्याचा हातखंडा होता. एलिझाबेथच्या काळीं तो तरुण होता. त्याचीं उत्तमोत्तम नाटकें पहिल्या जेम्सच्या कारकीर्दीतच लिहिलीं गेलीं आहेत. तो सन १६१६ मध्यें मृत्यु पावला. वरील सर्व-लेखकांनीं आपल्या प्रभावी वाङ्मयानें राष्ट्रांत नवचैतन्य उत्पन्न केलें.

९. कलाविकास :—तेजस्वी राष्ट्रीय वाङ्मयाप्रमाणेंच ट्यूडरांच्या काळांत इंग्लंडमध्यें व युरोपांत अनेक नामांकित चित्रकार व शिल्पकार निर्माण झाले होते; त्यांत होबीन, टिटियन, राफेल, डव्हिन्ची, मायकेल एन्जेलो वगैरे अग्रगण्य होत. उत्तम कसबी चित्रकार म्हणून सर्वांची ख्याति आहेच; परंतु त्या सर्वांत राफेल व मायकेल एन्जेलो हे सुप्रसिद्ध व नामवंत कसबी कारागीर होऊन गेले. होबीन या जर्मन कारागिरानें इंग्लंडमध्यें येऊन सर टॉमस मूरचीं व त्याच्या अनेक मित्रमंडळींचीं उत्तम चित्रें काढलीं. तीं पाहून आठव्या हेन्रीनें राजाश्रय देऊन त्याला दरसाल, तीस पौंड तनखा सुरू केला. टिटियन, राफेल डव्हिन्ची, मायकेल एन्जेलो हे सर्व इटॅलियन होते. राफेल यानें दहावा पोप लियो याचें एक इतकें सुंदर चित्र काढलें होतें कीं, तें पाहून पोपच्या एका चिटणिसानें सहीकरितां दौतटांक व बिलें त्याच्या-पुढें केलीं ! बऱ्याच वेळानें खरी गोष्ट लक्षांत येतां तो शरमला. मायकेल एन्जेलो हा मोठा शिल्पकार म्हणून प्रसिद्ध आहे. त्यानें बांधलेल्या सुंदर व नयनमनोहर इमारती अजूनही फ्लॉरेन्स व रोम येथें पहावयास सांपडतात. त्याच्याइतका कुशल शिल्पकार अजूनही झाला नाहीं असें म्हणतात. विद्येच्या पुनरुज्जीवनामुळें चित्रकला व शिल्पकला यांचा फैलाव इतका झपाट्यानें झाला कीं, त्यामुळें वरीलसारखे सुप्रसिद्ध व कुशल कारागीर निर्माण झाले; व त्यांनींही उत्तम कलावान लोक निर्माण केले. असें असलें तरी ट्यूडर काळांत इंग्लंडमध्यें चित्रकला व शिल्पकला सुप्तावस्थेंत होती. त्या वेळचीं भिकार चित्रें व ओबडधोबड मूर्ति व पुतळे वरील गोष्टीचें प्रत्यंतर अजूनही देतील !

मायकेल एन्जेलो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. एलिझाबेथच्या काळीं जे मोठमोठे लेखक निर्माण झाले त्यांचीं नांवें सांगा. त्या प्रत्येकाची कशाबद्दल प्रसिद्धी होती ?

२. शेक्सपियरचें थोडक्यांत चरित्र सांगा.

३. या काळांत कोणकोणत्या व्यापारी कंपन्या स्थापन झाल्या ? त्यांचा कोणकोणत्या देशांशीं व्यापार सुरू होता ?

४. जगाचा नकाशा काढून ज्या देशांशीं इंग्लंडचा व्यापार चालू होता ते देश त्यांत दाखवा. या देशांतून कोणता माल इंग्लंडांत येत असे ?

५. एलिझाबेथच्या काळाला 'सुवर्णयुग' असें कां म्हणतात ? कारणें द्या.

६. या वेळच्या उत्तम कलावंतांचीं व शिल्पकारांचीं नांवें सांगा. त्यांनीं आपल्या कलेला कोणतें वळण दिलें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४०. ट्यूडर राजांची अनियंत्रित सत्ता.

१. अर्वाचीन काळाची सुरुवात :—ट्यूडर काळाची सुरुवात म्हणजे अर्वाचीन युगाची सुरुवात मानण्यांत येते. या काळांत अनेक क्रांतिकारक गोष्टी झाल्या; व त्यामुळें अनेक गोष्टींत आमूलाग्र फरक झाले. धर्मक्रांतीचीं पाळेंमुळें खणून काढून कॅथॉलिक पंथाची संघटना करण्याकरितां जेसुइटांची चळवळ सुरू होती. उमराव व जमिनदार मध्यम व कनिष्ठ वर्गांतील लोकांना छळतां येईल तितकें छळून स्वतःचा स्वार्थ साधण्याची व राजालाही दमदाटी करण्याची पराकाष्ठा करीत असत. व्यापाराला उत्तेजन नव्हतें; भेसळ नाणीं व्यवहारांत जास्त असल्यानें व्यापार खालावला होता. शेतकऱ्यांचे हाल कुत्रा खाईनासा झाला होता ! परशत्रूचा हल्ला इंग्लंडवर केव्हां येईल हें सांगतां येणें अशक्य होतें; व आलाच तर त्याला योग्य रीतीनें तोंड देण्याची इंग्लंडच्या सैन्यांत व आरमारांत ताकद नव्हती. अशा विस्कळीत स्थितींत व क्रांतियुगांत इंग्लंड सांपडलें असल्यानें आपले व्यवहार व व्यापार सुरळीत चालण्याकरितां देशांत सुराज्यव्यवस्था निर्माण करून शांतता स्थापन करण्याकरितां अत्यंत दक्ष, कार्यक्षम, लोकहित व राष्ट्रहित साधणारी राजसत्ता लोकांस हवी होती. वरील गोष्टी साधल्यास राजसत्ता अनियंत्रित आहे कां लोकमतानुवर्ती आहे याकडे त्यांनीं दुर्लक्ष करण्याचें ठरविलें. यामुळेंच ट्यूडर राजांचा अनियंत्रित कारभार पचून गेला ! राज्यघटनेंत कोणत्याही प्रकारचा फरक झाला नव्हता; तरीही राजांची योग्यता व त्या वेळच्या राष्ट्राच्या गरजा यांकडेच लक्ष देऊन लोकांनीं राजाला मन मानेल तसा राज्यकारभार हांकूं दिला.

२. ट्यूडर राजांचा अनियंत्रित कारभार :—राजसत्ता सामर्थ्यवान असून राष्ट्रीय हिताची राजांना चाड आहे ही गोष्ट लोक चांगले ओळखून होते. यामुळेंच लोकांनीं राजकारणाकडे दुर्लक्ष केलें व राजावर पूर्णपणें भरंवसा ठेवून आपले व्यवहार सुरू ठेवले. राजांनींही आपल्या प्रजेच्या भरंवशाचा दुरुपयोग केला नाहीं. ‘ आपण देशाचे नोकर आहोंत अर्थात्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देशाची भरभराट करणें व देशाचें वैभव वाढवून त्याचा दरारा इतर राष्ट्रांवर ठेवणें हें आपलें कर्तव्य होय,' याच वृत्तीनें सर्व ट्यूडर राजे वागत होते. त्यांच्या राज्यकारभाराचें वरील सूत्र लक्षांत घेऊन त्यांनीं केलेले कायदे निमूटपणें मानणें हें योग्य होय असें प्रत्येकाला वाटत असे. सरदारांच्या त्रासास व छळास कंटाळलेल्या जनतेला सोडविण्याकरितां राजांनीं अनेक कायदे पास केले. यांमुळें सरदारांचें प्रस्थ व त्यांचा दरारा नष्ट झाला, देशांतील अशांतता कमी झाली व लोकांचे व्यवहार सुरळीत होण्यास मदत झाली. स्वार्थामुळें कां होईना पण आठव्या हेन्रीनें धर्मसुधारणा करण्यास अप्रत्यक्षपणें मदतच केली. व मेरीशिवाय बाकीच्या सर्व ट्यूडर राजांनीं प्रॉटेस्टंट पंथाचा प्रसार करून राष्ट्रीय धर्माची स्थापना केली. यामुळेंही लोकांवरील भोंदू व नीतिभ्रष्ट गुरूंचा पगडा नष्ट होण्यास व त्यांच्या खुळया व धर्मभोळ्या कल्पना नष्ट होण्यास मदत झाली. अर्थात् धर्मसुधारणेला ट्यूडर राजांनीं उचलून धरलें हा आपल्यावर मोठा उपकार झाला अशी लोकांची ठाम कल्पना होती. पूर्वींच्या सरदारांचा मोड करून लायक व योग्य अशा मध्यम वर्गातील लोकांना ट्यूडर राजांनीं हाताशीं धरलें, त्यांच्या व्यापाराला उत्तेजन दिलें, राज्यकारभारांत त्यांना मानाचीं स्थानें व अधिकाराच्या जागा दिल्या व अशारीतीनें त्या वर्गातील लोकांचा विश्वास संपादन करून राजांनीं आपला कारभार दक्षतेनें हांकला. या राजांनीं मध्यम व व्यापारी वर्गाशीं जें सलोख्याचें धोरण ठेवलें त्यामुळें देशाचा व राजांचाही फायदाच झाला. कारण मध्यम वर्गाची उन्नति म्हणजे व्यापारी भरभराट व व्यापारी भरभराट म्हणजे देशाची व उद्योगधंद्याची सुस्थिति, हें समीकरण ट्यूडर राजे पूर्णपणें ओळखून होते. याकरितांच परकीय व्यापारी व कलावान लोकांस त्यांनीं आपल्या देशांत आश्रय दिला व त्यांच्यातर्फें आपल्या देशांत नवीन नवीन उद्योगधंदे स्थापून व्यापारास चालना दिली. यामुळें इंग्लंडचा व्यापार वाढीस लागला, उद्योगधंद्यांची भरभराट झाली व देश सुसंपन्न होण्यास मदत झाली. व्यापार जसजसा वाढूं लागला तसतसें लोकांचें लक्ष नवीन शोध, साहसाचीं कामें, दर्यावर्दीपणा, धर्म, विद्येची आराधना, नवीन जलमार्ग शोधणें यांकडे वेधलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाऊं लागलें व राजांनीं या सर्व बाबतींत सर्वांस उत्तेजन देण्याचें धोरण स्वीकारल्यानें लोकांनीं राज्यकारभाराकडे दुर्लक्ष केलें व राजावर पूर्णपणें भरंवसा टाकला. त्यामुळें राजांना लोकांकडून कधींही विरोध झाला नाहीं व त्यामुळें जोरदार धोरण स्वीकारून व देशोन्नति साधून त्यांस परराष्ट्रीय बाबतींत इंग्लंडला मानाचा व महत्त्वाचा दर्जा प्राप्त करून घेतां आला.

३. ट्यूडर राजे व पार्लमेंट :—ट्यूडर राजांनीं आपला कारभार अत्यंत तडफदारपणें व अनियंत्रितपणें केला असला, तरी आपल्या प्रत्येक गोष्टीला त्यांनीं सनदशीरपणाचें स्वरूप दिलें. राज्यकारभाराच्या धोरणास व राजांनीं योजलेल्या कायद्यांस पार्लमेंटनें आपली मंजुरी दिली. नाहीं म्हणायला एलिझाबेथच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं पार्लमेंटनें तिला विरोध करावयास सुरुवात केली. ही एक गोष्ट सोडली तर पार्लमेंटनें ट्यूडर राजांना कधींही विरोध केल्याचें दिसून येत नाहीं. कायदा करणें व करांना संमत्ति देणें हे पार्लमेंटचे दोन प्रमुख अधिकार या वेळीं होते; परंतु त्याकरितां नेहमींच पार्लमेंट भरत असे असें नाहीं. सातव्या हेन्रीनें पार्लमेंटची सभा क्वचितच बोलाविली असली तरी आठव्या हेन्रीनें पार्लमेंटचा भरपूर उपयोग करून घेतला होता. पार्लमेंटनें राजाच्या धोरणाला विरोध न करतां प्रत्येक वेळीं त्याला पाठिंबाच दिला. कर बसविणें व कायदे पास करणें या गोष्टी मामुलीच्या होऊन बसल्या होत्या. आठव्या हेन्रीवर पार्लमेंटचा इतका विश्वास बसला होता कीं, राजानें जाहीरनामे काढून कायदे पास करावे अशी पार्लमेंटनें त्याला मोकळीक दिली होती! एलिझाबेथनें पार्लमेंट प्रथमतः वरचेवर बोलाविलें व पार्लमेंटकडून तिला फारसा विरोध झाला नाहीं. धार्मिक बाबतींत राणीचे सर्व कायदे पार्लमेंटनें पास केले. पोपनें राणीला धर्मबहिष्कृत केलें त्या वेळीं ती सभा राणीच्या मदतीस आपुलकीनें धांवली. परंतु राणीच्या लग्नाबद्दल, तिच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल व धार्मिक धोरणाबद्दल पार्लमेंटनें राणीला कधीं कधीं विरोध केला त्या वेळीं पार्लमेंटला राणीनें दटावल्यामुळें पार्लमेंट सभा थोडी नरमली; परंतु मक्तेदानाच्या वादविवादाच्या वेळीं राणीला पार्लमेंटपुढें नमावें लागलें !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. पार्लमेंट सभा :—वरील सर्व विवेचनावरून पार्लमेंट सभा ट्यूडर राजांच्या किती अंकीत होती हें दिसून येणार आहे. ट्यूडर राजे पार्लमेंट सहसा बोलावीतच नसत; व बोलाविलेंच तर त्यांच्या बैठकी थोड्या वेळांत उरकत असत. आठव्या हेन्रीनें सुरुवातीस दरसाल पार्लमेंट बोलाविलें व



पुढें कारणपरत्वें बोलाविलें. आपल्या पंचेचाळीस वर्षांच्या कारकीर्दींत एलिझाबेथनें तेरा वेळां पार्लमेंट सभा बोलाविली खरी पण सर्व बैठकांच्या वेळांची बेरीज तीन वर्षांपेक्षां जास्त होणार नाहीं! शिवाय आठव्या हेन्रीसारखे जबरदस्त राजे, आपल्याला अनुकूल असतील असेच लोक पार्लमेंट-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें निवडून येतील अशी निवडणुकीच्या वेळीं योग्य ती तजवीज अगोदरच करून ठेवीत असत. पार्लमेंटच्या निवडणूक प्रसंगीं राजांकडून लांचलुचपतीच्या उपायांचा वेळीं–अवेळीं उपयोग होत असल्यामुळें राजाला पाहिजे तेच लोक निवडून येत. यामुळें पार्लमेंट राजाच्या अंकित असे. खुद्द उमरावमंडळांतील जुने जुने सरदार नामोहरम झाले होते; व नवे सरदार राजाचे मिंधे असत. यामुळेंही उमरावमंडळाचा विरोध लटका पडत असे. या वेळीं कांहीं नव्या शहरांना प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार मिळाला होता. हे नवीन सभासद राजनिष्ठ असत व राजाला विरोध न करतां त्याची बाजू उचलून धरण्याची कामगिरी त्यांच्याकडून सदैव बजावली जात असे. या सर्व गोष्टींमुळें पार्लमेंटकडून राजाला विरोध होत नसे. स्पेनसारख्या बलाढ्य राष्ट्राकडून इंग्लंडवर येणारा हल्ला राष्ट्राला व राजाला सहज परतवितां यावा याकरितां सर्व लोक व पार्लमेंट राजाला मदत करण्यास सदैव तयार होती. स्पेनच्या हल्ल्याच्या भीतीमुळेंच राजाला विरोध करूं नये असें सर्वांस वाटत होतें. ती भीति नष्ट झाल्याबरोबर राजसत्तेला विरोध होऊं लागला हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. परंतु एकंदरीत पाहतां राजाला विरोध न करतां खेळीमेळीनें राज्यकारभार करावा असेंच सर्वांचें मत होतें. राजा व प्रजा यांचें ध्येय एक होतें, धोरण एक होतें व परस्परांचा एकमेकांवर अढळ विश्वास होता; यामुळेंच राजा व प्रजा यांचें जमलें व 'राजा करील ती पूर्वदिशा' असा राज्यकारभार चालला.

५. राजा व प्रिव्ही कौन्सिल:—ट्यूडर राजांनीं पार्लमेंटचा आब राखून आपल्या सर्व कृत्यांस सनदशीरपणाचें रूप दिलें. परंतु हरघडी ट्यूडर राजांनीं जिचा सल्ला घेतला ती संस्था म्हणजे प्रिव्ही कौन्सिल होय. त्या काळीं या मंडळांत सुमारें वीस सभासद असत. राजाच्या खास विश्वासांतील लोकांचाच शिरकाव या मंडळांत होत असे. भिन्न भिन्न मतांचे लोक या मंडळांत नेमले जात असल्यानें अनेक प्रकारच्या विचारांचें प्रदर्शन या संस्थेमध्यें होत असे. ही संस्था केवळ सल्लागार मंडळासारखीच असली तरी तिचा राजसत्तेवर चांगलाच वचक असे. राजा वाटेल ती गोष्ट करूं शकत असे. वेळेनुसार या मंडळाचा सल्ला झुगारून देऊनही राजा आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इच्छेप्रमाणें कायदे करी, कर लादी, शिक्षा देई व राज्यकारभार चालवी. आठव्या हेन्रीसारख्या जबरदस्त राजाला किंवा एलिझाबेथसारख्या कुशल राणीलाही या मंडळाचा सल्ला वारंवार विचारांत घ्यावा लागे. परंतु राजाच्या म्हणण्याला मान तुकविणारेच लोक या मंडळांत असल्यामुळें राजाला याही मंडळाकडून फारसा विरोध झाला नाहीं. कधीं कधीं आपल्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन वटहुकूम काढून अगर जाहीरनामे प्रसिद्ध करूनही हें मंडळ पार्लमेंटला धाब्यावर बसवीत असे. एकंदरींत पाहतां या मंडळाचा ट्यूडर राजांनीं इतका उपयोग केला कीं, राजसत्ता राजाच्या हातीं नसून ती या मंडळाच्या हातीं आहे असेंच लोक म्हणूं लागले.

अभ्यास

१. ट्यूडर राजांचा विशेष सांगा.

२. त्यांनीं धर्मक्रांतीसंबंधीं कोणतें धोरण स्वीकारलें होतें? त्याचा परिणाम काय झाला?

३. ट्यूडर राजे व पार्लमेंट यांचे संबंध वर्णा.

४. त्या वेळच्या प्रिव्ही कौन्सिलसंबंधीं थोडक्यांत हकीकत सांगा.

५. त्या वेळीं तुम्ही पार्लमेंटचे सभासद होतां, असें समजून तुम्ही राजाला विरोध केला असता किंवा नाहीं तें सकारण सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४१. ट्यूडर काळांतील समाजस्थिति

१. क्रान्तियुग :—इंग्लंडच्या इतिहासांत ट्यूडर काळ अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. मध्ययुगाचा अंत होऊन अर्वाचिन युगाला व ट्यूडर काळाला एकदमच सुरुवात झाली होती. धर्मसुधारणा, विद्येचें पुनरुज्जीवन व नवीन भूमीचा शोध यांमुळें लोकांच्या आचारा–विचारांत, वागण्यांत, कल्पनांत, शिक्षणांत, पोशाखांत व राहणींत क्रान्ति घडून आली. इंग्लंडचें सामर्थ्य वाढीला लागल्यानें त्या देशाचे उद्योगधंदे वाढले; व्यापार भर-भराटला, तेजस्वी वाङ्मय उत्पन्न झालें, स्पेनचा पराभव झाल्यानें इंग्लंडचें नाविक बळ वाढलें व या सर्व कारणांमुळें इंग्लंडला परदेशांतही मान मिळूं लागला व वैभवाप्रत पोंचलेल्या इंग्लंडला इतर मोठीं राष्ट्रें समान दर्जानें वागवूं लागलीं. वरील सर्व गोष्टींचा विचार करतां ट्यूडर काळ म्हणजे एक मोठें क्रान्तियुग होतें. लोकांचें सामाजिक जीवन, आर्थिक उलाढाली व धार्मिक विचार यांना या युगांत जी चालना देण्यांत आली त्यामुळें सर्व राष्ट्र खडबडून जागें झालें व त्यानें आपली निद्रा टाकून देऊन आपला जिवंतपणा सिद्ध केला. हा जिवंतपणा लोकांच्या प्रत्येक गोष्टींत स्पष्टपणें दिसून येत होता.

२. धार्मिक परिस्थिति :—अशा लोकांच्या धार्मिक जीवनाकडे लक्ष दिल्यास इंग्लिश लोक पुराणप्रिय होते असेंच दिसून येईल. विद्येच्या पुनरु-ज्जीवनानें त्यांच्या धर्मभावनांना चांगलाच धक्का दिला. ट्यूडर काळांतील लोक प्रवासानें, अभ्यासानें, मननानें, स्वतंत्रपणें विचार करूं लागले व त्यांची चिकित्सकबुद्धि जागृत झाली. त्या वेळचे विद्वान लोक धर्माचीं सालें काढण्यास टपलेले होते. टॉमस मूर, इरॅस्मस, कॉलेट हे म्हणत कीं, प्रत्येक स्त्रीपुरुषानें स्वभाषेंतून धर्मपुस्तक वाचावें व धर्माचें मर्म समजून घ्यावें. विचारांच्या अशा आंदोलित स्थितींत आठव्या हेन्रीनें धर्मक्रान्ति घडवून आणली; व पोपचा इंग्लंडच्या धर्मपीठावरचा अधिकार नष्ट केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या धर्मक्रांतीनें लोकांच्या मनांतही क्रांति घडवून आणली. जो तो बायबल वाचूं लागला, व त्याचा अर्थ समजावून घेऊन दुसऱ्यासही समजावून देऊं लागला. यामुळें लोकांत चांगलीच जागृति उत्पन्न झाली. पुढें हळू हळू पोपची सत्ता नष्ट झाली, नवीन प्रार्थनापुस्तक तयार झालें, व इंग्लंडमध्यें प्रॉटेस्टंट व रोमन कॅथॉलिक असे तट पडून कॅथॉलिकांचा छळ होऊं लागला. यासुळें कट्टया कॅथॉलिकांनीं बंडें केलीं; परंतु त्यांचें चाललें नाहीं. असंतुष्ट कॅथॉलिक खेडोपाडीं जाऊन राहिले व धर्मसुधारणावादी पार्लमेंटच्या कायद्यांचें उल्लंघन करूं लागले. ज्यांच्या वृत्ति नष्ट झाल्या होत्या तेही आपल्या पुरातन धर्मकल्पनांप्रमाणेंच आपलीं धार्मिक कामें चालवीत असत. कॅथॉलिक व्यापारी आपलीं दुकानें रविवारीं बंद करून पूर्वापार पद्धतीनें उपासना चालवीत. या सर्व गोष्टींना आळा घालण्याकरितां प्रॉटेस्टंटांनीं अनेक उपाय योजले. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. या सर्वांचें उट्टें मेरीच्या कारकीर्दीत निघालें. इंग्लंडमध्यें मेरीनें पोपची धार्मिक सत्ता पुन्हां प्रस्थापित केल्यानें प्रॉटेस्टंटांचा छळ होऊं लागला, त्यांचें प्रार्थनापुस्तक रद्द झालें व रोमन कॅथॉलिक पंथाचा इंग्लंडभर प्रसार होऊं लागला. पुढें एलिझाबेथनें प्रॉटेस्टंट पंथाची तळी उचलून धरून राष्ट्रीयधर्माची स्थापना केली. त्यामुळें रोमन कॅथॉलिकांचा छळ होऊं लागला; एलिझाबेथचें धार्मिक धोरण ज्यांना पसंत नव्हतें त्यांनीं आपापले नवीन पंथ स्थापन केल्यानें देशांत एपिस्कोपेलियन, कॅथॉलिक, प्यूरिटन, जेसुइट, नॉनकन्फॉर्मिस्ट, प्रेसबिटेरियन वगैरे अनेक पंथ निर्माण झाले. एपिस्कोपेलियन पंथाला राजाश्रय असल्यानें बाकीच्यांचे हाल होऊं लागले. त्यांतच प्रस्थापितधर्मा-प्रमाणें वर्तन न करणारास शिक्षा करण्याकरितां हाय कमिशन कोर्टाची स्थापना झाल्यानें बराच क्षोभ उत्पन्न झाला. स्वतःच्या मनाप्रमाणें पूजा करणें, प्रार्थना करणें वगैरे गोष्टी लोकांस करतां येईनाशा झाल्यानें लोकांनीं गुप्तस्थानें निर्माण केलीं व तेथें ते आपापल्या इच्छेप्रमाणें पूजा—अर्चा करूं लागले, प्रार्थना म्हणूं लागले व लॅटिन बायबलही चोरून वाचूं लागले. कांहीं कांहीं ठिकाणीं कॅथॉलिक धर्मगुरू अत्यंत गुप्त ठिकाणीं आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्म–तत्त्वांची शिकवणही देत. कायद्यानें रद्द केलेले पवित्र दिवसही साजरे होऊं लागले व कांहीं लोक अत्यंत निर्भयपणें आपले धार्मिक व्यवहार उघडपणें करूं लागले. यामुळें एलिझाबेथला कडक कायदे करावे लागले. जेसुइट लोकांनीं धार्मिक चळवळीबरोबरच इंग्लंडमध्यें राजकीय क्रान्ति घडवून आणण्याकरितां व विशेषतः स्कॉटलंडची राणी मेरी हिला तुरुंगांतून सोडवून तिला राणीपद देण्याकरितां अनेक कट केले. परंतु त्यांचे कट उघडकीस आल्यानें मेरीचा वध झाला व त्यांची इंग्लंडमधून हकालपट्टी झाली. एलिझाबेथच्या मृत्यूच्या वेळीं जो पंथ विशेष जोर धरून होता तो म्हणजे प्यूरिटन पंथ होय.

३. राजसत्ता :—ट्यूडर काळांतील इंग्लिश समाजाचे मुख्य असे तीन भाग पाडतां येतील. उमराववर्ग, मध्यमवर्ग व कनिष्ठवर्ग; मध्यमवर्गांत व्यापारी व उदीम करणारांचा समावेश होत असून कनिष्ठ वर्गांत मजुरांचा समावेश होत असे. सर्व समाजाच्या अग्रभागीं राजा चकमत असे. समाजाचा नेता व पुढारी म्हणूनच तो ओळखला जाई व त्याचें अनुकरण–क्वचित् अंधानुकरणही–समाजांत होत असे. ट्यूडर राजे बलिष्ठ व सामर्थ्यवान् होते. कोणाचीही भीडमुर्वत न ठेवतां, राष्ट्राचें हित हेंच आपलें ध्येय असें समजून ते वागणारे असल्यानेंच त्यांच्याकडून देशाचें कल्याण झालें व देश भरभराटला. देशाला ज्या गोष्टीची अत्यंत आवश्यकता होती ती गोष्ट म्हणजे शांतता व स्वस्थता; व ती मिळवून देण्याचें सर्व श्रेय ट्यूडर राजांनाच दिलें पाहिजे. परंतु आश्चर्याची गोष्ट कीं, हें ध्येय साध्य करण्याकरितां ट्यूडर राजांनीं सैन्याचा उपयोग केला नाहीं. खरें पाहतां राजाजवळ त्या वेळीं सैन्य असें नव्हतेंच ! भाडोत्री सैन्यावर राजे लढाया मारीत ! यावरून लष्कराचे बाबतींत राजसत्ता दुर्बल होती असेंच म्हणावें लागतें. राजांना ज्या वेळीं सैन्याची मदत लागे त्यावेळीं कौंटीमध्यें असलेल्या सैन्याला ते आपल्या मदतीला बोलावीत. कौंटींतील प्रत्येकानें या सन्यांत दाखल होऊन लष्करी शिक्षण घेतलें पाहिजे असा त्या वेळीं नियम असे. यामुळें सर्व सैन्य कौंटीतील लोकांचेंच असे. त्यावरील अधिकारीही त्यांचेच असत. यावरून राजांनीं लष्करी सामर्थ्यावर कितीसा जोर दिला होता हें समजून येतें. आरमारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सामर्थ्य वाढविण्याकरितां मात्र ट्यूडर राजांनीं पुष्कळच मेहेनत घेतली; व त्यांत त्यांना चागलेंच यश मिळालें. ट्यूडर राजांची लष्करी सत्ता कमकुवत असतांही त्यांनीं सरदारांची सत्ता नष्ट केली, शेतकऱ्यांनीं केलेलीं बंडें मोडलीं, व्यापार–उद्योगधंद्यांचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं ठेवून ते ऊर्जितावस्थेस आणले, स्पॅनिश आरमाराचा पराभव केला व परराष्ट्रीय राजकारणांत महत्त्वाचें व मानाचें स्थान इंग्लंडला मिळवून दिलें.

४. वरिष्ठ वर्ग :—राजानंतर त्या वेळच्या समाजांत सरदार व मोठमोठे जमिनदार व श्रीमंत व्यापारी यांचा समावेश होतो. ट्यूडर काळाचे सुरुवातीस असलेला सरदारवर्ग देशाच्या शांततेला बाधक व लोकांच्या स्वातंत्र्याचा शत्रू मानण्यांत येत असे. गुलाबांच्या युद्धांत अनेक सरदार मेले होते; जे राहिले त्यांना ‘ स्टार चेंबर ’ सारख्या कोर्टाकडून वठणीवर आणण्यांत आलें होतें. याचा योग्य तो परिणाम झाला व सरदारांवर राजाचा चांगलाच वचक बसला. यामुळें जुनीं सरदार घराणीं नष्ट झालीं. त्याबरोबर ट्यूडर राजांनीं नवे सरदार निर्माण करण्यास सुरुवात केली. राजदरबारी, अधिकारी व राजाश्रयानें वैभवसंपन्न झालेले लोक या सर्व लोकांसच नव्या नव्या सरदारक्या राजाच्या कृपेनें प्राप्त होत. अर्थात् ते राजाचे मिंधे असल्यानें त्यांनीं राजाला कधींही विरोध केला नाहीं; व त्यांच्याकडून प्रजेलाही कधीं त्रास झाला नाहीं.

५. मध्यमवर्ग :—सरदारांच्या खालोखाल सामान्य सुखवस्तु लोकांचा वर्ग होता. आपली जुनी शेती–वाडी सांभाळून राहणाऱ्या लोकांनाही या वेळीं दुस्थिति प्राप्त झाली होती. कारण या वेळीं नवीं नवीं घराणीं उदयास येऊं लागलीं व त्यांनीं जुन्या व मोडकळीस आलेल्या घराण्यांच्या जागा भरून काढल्या. कर्जानें बुजबुजलेल्या शेतवाड्या, मध्यमवर्गांत व्यापारामुळें पुढें आलेल्या व्यापाऱ्यांनीं विकत घेतल्या. शिवाय सरदारांच्या जमिनी राजांनींही मध्यमवर्गीतील लोकांस विकल्या. यामुळें नवीं घराणीं प्रामुख्यानें पुढें येण्यास मदत झाली. हे लोक बहुधा खेड्यापाड्यांत राहात. आपल्या शेतीवाडींत चांगलें व सुंदर घर बांधावें व तेथें आपल्या बायकामुलांसह आनंदानें राहावें हें ह्यांस फार आवडे. लंडनसारख्या मोठ्या शहरीं ते क्वचितच जात. आपल्या शेतीवाडीची निगा राखण्यांतच त्यांचा बहुतेक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काळ जात असे. या शेतवाड्यांच्या मुख्यास जमिनदार अथवा देशमुख असें म्हणत. त्याला आपल्यापुरतें एक लहानसें कोर्ट असे. या कोर्टाचा तोच न्यायाधीश. त्याच्या शेतीवाडींतील लोकांचे खटले त्याच्यापुढेंच चालत, व त्यांचा निकालही तोच देई! यामुळें शेतीवाडींत त्याला अतिशय महत्त्व असे. ट्यूडर काळांत या लोकांनीं जुन्या गोष्टी टाकून देऊन बऱ्याच नवीन गोष्टी उचललेल्या होत्या. घरें बांधण्याची नवी पद्धति त्यांनीं स्वीकारून त्यांना छोट्या राजवाड्यांचें स्वरूप देण्यास सुरुवात केली. या घरांतून ते अत्यंत श्रीमंती थाटांत मोठ्या दिमाखानें राहात; तरी आपल्या वाडींतील लोकांशीं ते मिळून मिसळून वागत.

अशा लोकांतूनच शांततारक्षक न्यायाधीश नेमण्याचा ट्यूडर राजांनीं पायंडा पाडला होता. मुख्य प्रधानाच्या सल्ल्यानें राजा हे अधिकारी नेमीत असे. प्रत्येक परगण्याकरितां असे अधिकारी असत. त्यांना पगार नसे. परंतु काम मात्र पुष्कळ करावें लागे. शांततारक्षण करणें हें यांचें मुख्य काम; परंतु त्याच्याबरोबरच तिचा भंग करणाऱ्यांस शासन करण्याचा अधिकारही त्यांना देण्यांत आला होता. या अधिकाऱ्यांविरुद्ध राजाकडे अर्ज करण्याची मोकळीक होती व वेळेनुसार स्टारचेंबरपुढें त्यांस खेंचण्यांत येई. या कामाखेरीज रस्ते व पूल यांची निगा राखणें, तुरुंगांची पहाणी करणें, बाजारासंबंधीं नियम करणें व फेरीवाल्यांना परवाने देणें वगैरे अनेक कामें यांना करावीं लागत. यामुळें जनता या अधिकाऱ्यांना जरा वचकून वागत असे. भिकाऱ्यांसंबंधाच्या कायद्याची व पार्लमेंट आणि प्रिव्ही कौन्सिल यांच्या कायद्यांची अंमलबजावणी याच अधिकाऱ्यांनीं केली.

या लोकांच्या खालोखाल शेत नांगरून व कसून उदरनिर्वाह करणाऱ्या शेतकऱ्यांचा व व्यापार उदीम करणाऱ्या लोकांचा वर्ग होय. अत्यंत काबाडकष्ट करावे व कसेंबसें पुरेसें अन्न मिळवावें हाच यांचा धंदा. हे सर्व लोक खेड्यांतूनच राहात. त्यांच्या जीवनाचें छोटेंसें चित्र पुढें दिलें आहे. त्यावरून त्यांची स्थिति कशी होती तें कळून येईल. या वर्गांत इंग्लिश समाजांतील बहुसंख्य लोक मोडत असत.

६. समाजरचनेचा विशेष:—ट्यूडर काळांतील समाजाच्या घटकाव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यवांचे याप्रमाणें निरनिराळे प्रमुख भाग दिसतात. पूर्वापार रूढ झालेला व मध्ययुगांत वाढलेला दास्यवृत्तीनें राहणारा वर्ग या काळांत बहुतेक नष्ट झाला होता. अर्थात वरिष्ठ वर्गातील लोकांच्या गुलामगिरींत राहणाऱ्या वर्गातील लोक यावेळीं जवळ जवळ नव्हतेच. वर्गकलह पुष्कळ असले तरी हिंदुस्थानाप्रमाणें इंग्लंडमध्यें जाती निर्माण झाल्या नव्हत्या. स्वतःच्या कर्तबगारीवर वाटेल त्यानें पुढें यावें व आपल्या कर्तृत्वानें समाजांतील कोणत्याही वर्गात स्थान पटकवावें अशी त्यावेळीं रीतच पडून गेलेली होती. यामुळें पुढें येण्यास त्यावेळीं चांगलाच वाव होता. स्वतःच्या कर्तबगारीवर कोणालाही सरदारकी मिळवितां येत असे. ती वंश व जन्म यांवर अवलंबून नव्हती. यामुळेंही समाजाचें पाऊल पुढें पडण्यास मदत झाली, व्यापार वाढला, उद्योगधंदे भरभराटले, व त्यांच्या जोरावर श्रीमंत झालेले लोक समाजांत मानाचें स्थान पटकावूं लागले. व्यापारावर श्रीमंत झाल्यावर जमिनी विकत घेऊन लोक आपली सामाजिक किंमत वाढवीत व समाजांतील जमिनदाराचा अथवा सरदाराचाही दर्जा मिळवीत. तो मिळविल्यावर त्याच्या मुलाला सरदाराच्या मुलीशीं अगर त्याच्या मुलीला सरदाराशींही लग्न करतां येत असे. यामुळें त्यांच्या मुलांचाही सामाजिक दर्जा वाढे. रोटी–बेटी व्यवहारांत कोणत्याही प्रकारची आडकाठी नसल्यानें समाजाचें पाऊल त्यावेळीं पुढें पडण्यास मदतच झाली.

अभ्यास

१. धर्मक्रांतीमुळें लोकांच्या विचारांत कोणकोणते फरक पडले होते ?
२. कॅथॉलिक लोकांना धर्मक्रान्ति मान्य नव्हती, त्यामुळें त्यांनीं आपल्या समजुतीप्रमाणें प्रार्थना करण्याकरितां कोणकोणत्या मार्गांचा अवलंब केला ?
३. शांततासंरक्षक अधिकाऱ्यांचीं कामें सांगा. त्यांना लोक कां वचकत ?
४. मध्यमवर्गांत कोणकोणते लोक मोडत ? त्यांतील महत्त्वाची व्यक्ति कोण ? तिच्यासंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.
५. राजसत्तेच्या लष्करी कमकुवतपणाचीं कारणें द्या.
६. त्या वेळच्या समाजाचें वैशिष्ट्य कोणतें ? आपल्या सामाजिक जीवनांतील व त्यांच्या सामाजिक जीवनांतील प्रमुख गुणदोष सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४२. ट्यूडर काळांतील उद्योगधंदे व व्यापार.

१. शेती व शेतकरी :—ट्यूडर काळांत सुस्थिति प्राप्त झाली होती; देश वैभवसंपन्न होऊं लागला होता. परंतु लोकांच्या स्थितींत फारसा फरक पडलेला नव्हता. इंग्लिश समाजरचना सोळाव्या शतकांतही पूर्वीप्रमाणेंच होती. आपल्या महाराष्ट्राप्रमाणेंच अनेक देशमुख अथवा जहागिरदार या वेळीं इंग्लंडमध्यें होते. ते मोठ्या ऐटींत व मिजाशींत राहात असत. त्यांच्या खालोखाल मिरासदार शेतकऱ्यांचा वर्ग होता. या वर्गांतील लोकांची संख्या थोडी होती तरी त्यांना अनेक प्रकारच्या सवलती असल्यामुळें या वर्गाला महत्त्व प्राप्त झालें होतें. त्यांना देशमुखाला अत्यंत अल्प असा खंड द्यावा लागत असे. देशमुखाच्या कोर्टांत हजर राहण्याचा त्यांना अधिकार असे. याच लोकांना सन १४३० च्या कायद्यानें ४० शिलिंग उत्पन्नाचा जमिनीचा मालक असल्यास मतदानाचा अधिकार मिळाला होता. शेती हाच यांचा प्रमुख धंदा असला तरीही राजकारणांत व राज्यकारभारांतही हे लोक चमकत असत. त्यांच्याइतके स्वतंत्र व निर्भयवृत्तीचे व जुलुम सहन न करणारे लोक इंग्लंडमध्यें त्या वेळीं दुसरें नव्हते; म्हणूनच सामर्थ्यहीन व गरीब असूनही त्यांना समाजांत मानाचें स्थान प्राप्त झालें होतें. या लोकांपेक्षां खालच्या दर्जाचे लोक म्हणजे पट्टेदार होत. देशमुखाकडून ज्या अटींवर जमीन खंडानें घेतलेली असेल त्याची एक नक्कल ज्यांना मिळत असे त्यांना पट्टेदार असें म्हणत. यामुळें देशमुख पट्टेदाराला कामावरून काढूं शकत नसे. त्याची वहिवाट वंशपरंपरा चालत असे. परंतु आपल्या बापाचें वतन आपल्या नांवें चालू करण्यांत यावें म्हणून पट्टेदाराच्या मुलाला देशमुखाच्या कोर्टाकडे अर्ज करावा लागे. त्या वेळीं त्याच्याकडून त्याचा मालक उत्तमोत्तम जिनसा घेई व एखादे वेळीं कांहीं निमित्त करून त्याला कामावरून काढूनही टाकी. जमिनीची मशागत करून जें उत्पन्न येईल त्यापैकीं एक ठराविक रक्कम पट्टेदाराला देशमुखाला द्यावी लागे. दास्य व बिकट अंगमेहेनत करूनच त्याला आपलें व आपल्या कुटुंबाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदरपोषण करावें लागे. त्याच्या हाताखालील मजुरांपेक्षां त्याचें घर चांगलें



नांगरणी, पेरणी, कुळवणी.

असे, त्याची मालमत्ताही बरीच असे. परंतु अंगमेहेनतीच्या प्रमाणांत त्याला प्राप्ति होतच असे असें नाहीं. पट्टेदारानंतर शेतावरील सामान्य मजुरांचा वर्ग होय. या लोकांना गुलामाप्रमाणें काम करावें लागे. त्यांची प्राप्ति अगदींच थोडी असे! वाटेल त्या वेळीं त्यांचा मालक त्यांना कामावरून काढून टाकी. सर्व शेतकरी खेड्यांतच राहात असत. खेड्यांत राहणारे बहुतेक शेतकरी खादाड व दारू पिणारे, दणगट व दंगेखोर व ख्यालीखुशालीनें राहणारे होते. अज्ञान व भांडकुदळपणा त्यांच्या पांचवीला पुजलेला असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तरीपण आपल्या हक्कांस ते जपत असत. यामुळेंच ते नेहमीं बंडें करीत. गांवच्या गांवरानांत मेंढ्या चाराव्या, वेळेवर त्यांची लोकर कातरावी, डुकरांचे कळप बाळगून त्यांची जोपासना करावी व जमिनीची उत्तमप्रकारें मशागत करून उत्तम पीक काढावें हे खेडेगांवांतील शेतकऱ्यांचे मुख्य उद्योगधंदे होते. हे शेतकरी आपल्या जुन्यापुराण्या कल्पना उराशीं बाळगून राहात असत; तरीही ट्यूडर काळांत शेतीमध्यें नवीन नवीन सुधारणा झाल्या होत्या.

२. शेतीची व शेतकऱ्यांची दुर्दशा :—ट्यूडर काळांत शेतीची व शेतकऱ्यांची दुर्दशा होण्यास सुरुवात झाली. त्याला अनेक कारणें झालीं. पहिलें म्हणजे जमिनीच्या अनेक तुकड्यांचें एकीकरण करण्यास सुरुवात झाली, यापूर्वी पट्टेदारांकडे २०–२५ एकरांचे तुकडे असत. त्याऐवजीं आतां शंभर शंभर एकर एकाकडेच येऊं लागले. यानंतर पडित जमिन वापरण्यांत येऊन तिचा शेतीच्या कामाकडे उपयोग होऊं लागला. या दोन्ही गोष्टींमुळें शेतकऱ्यांचें नुकसान होत नसे. परंतु सोळाव्या शतकाच्या सुमारास लोकरीच्या धंद्यास तेजी येऊं लागली. इंग्लंडमध्यें जसजसी शांतता निर्माण होऊं लागली तसतशी फ्लँडर्समधून इंग्लंडच्या लोकरीला जास्त जास्त मागणी येऊं लागली. इंग्लंडमधून फ्लँडर्समध्यें लोकर पाठवावी व तेथून त्याचें कापड इंग्लंडांत आणावें ही पद्धति बरींच वर्षें चालू होती. यामुळें सातव्या हेन्रीच्या काळांत लोकरीची निपज करण्याचा धंदा बेसुमार वाढूं लागला. जो उठला तो आपल्या शेतांत मेंढ्या पाळण्याचा धंदा करूं लागला. अर्थात शेती बंद झाली. मेंढपाळांच्या धंद्याला खर्च थोडा पण फायदा भरपूर, ही गोष्ट लक्षांत घेऊन जमिनीचे मालक आपल्या शेतांना कुंपणें घालून त्यांचीं कुरणें करूं लागले. वेळेनुसार आपल्या शेताभोंवतीं असणारीं माळरानें अथवा आपल्या कुळांच्या मालकीच्या शेतांभोंवतींही ते कुंपणें घालूं लागले व शेतांत असलेलीं मजुरांचीं घरेंदारें व झोपड्याही पाडूं लागले. यामुळें शेतकऱ्यांची दुर्दशा होऊं लागली. हें पाहून सातव्या हेन्रीनें शेताभोंवतीं कुंपण घालण्याच्या पद्धतीस आळा घातला. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. गांवचे गांव उध्वस्त होऊं लागले. जिकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहावें तिकडे मेंढ्यांकरितां कुरणें दिसूं लागलीं! वूल्सेनें अनेकांस शिक्षा करूनही कुंपणें घालण्याच्या व मेंढपाळांचा धंदा करण्याच्या पद्धतींत फरक झाला नाहीं. त्यामुळें उत्तर इंग्लंडमधील बेकार शेतकऱ्यांनीं सन १५३६ मध्यें बंड केलें. याच सुमारास जिनसांच्या किंमतीही चढूं लागल्या. त्यामुळें व काम नसल्यानें शेतकऱ्यांस पैसा व अन्न मिळेनासें झालें व त्यांनीं अनेक बंडें केलीं. आठव्या हेन्रीनें कुंपणें घालण्याविरुद्ध धोरण स्वीकारलें असल्यानें त्याच्या वेळीं शांतता होती; परंतु पुढें शेतकऱ्यांनीं अनेक बंडें केलीं. एलिझाबेथनें सन १५९७ मध्यें आणखी एक कायदा पास करून कुंपण घालण्याच्या पद्धतीस आळा घातला. या वेळीं जिनसांचे भाव उतरले होते, धान्याला मागणी येऊं लागली होती, देशांत शांतता निर्माण झाली होती व अनेक परकी विणकऱ्यांनीं आपलीं ठाणीं इंग्लंडमध्यें दिल्यानें लोकर व धान्य यांची किंमत सारखीच झाली होती. याच वेळीं कुरणांतील गवत खाऊन मेंढ्या जाडजूड होऊं लागल्या व त्यामुळें त्यांची लोकरही पूर्वी-सारखी उत्तम न होतां अत्यंत वाईट निपजूं लागली. अर्थात तिला किंमत कमी येऊं लागली. याच सुमारास इंग्लंडची लोकसंख्या दीडपटीनें वाढली त्यामुळें अन्नाला–म्हणजे धान्याला–जास्त मागणी येऊं लागली. या सर्व गोष्टींमुळें शेतीला तेजी आली; व त्यामुळें शेतकऱ्याची दुर्दशा नाहींशी होऊन तो सुखी झाला व मेंढपाळांचा धंदा बसल्यानें शेताला कुंपणें घाल-ण्याची पद्धति मागें पडली.

३. व्यापारीमंडळें :—ट्यूडर काळांत खेडेगांवांत राहणाऱ्या शेतक-ऱ्यांची दुर्दशा झाली. कुंपणें घालण्याच्या पद्धतीमुळें शेती बसली. त्यामुळें शेतकरी बेकार झाले. हे बेकार शेतकरी आपल्या खेडेगांवच्या खोपटांतून राहात असत; व आपल्या बायकामुलांच्या मदतीनें लोकर पिंजून विणीत असत. त्यांच्याकडून तयार झालेलें कापड मोठमोठे व्यापारी थोड्या किंम-तीस विकत घेऊन शहरांत जात व तेथें भारी किंमतीला विकीत. यामुळें या व्यापारीवर्गाला विशेष महत्त्व येऊं लागलें होतें. व पूर्वींच्या व्यापारी-मंडळांचें महत्त्व नष्ट होऊं लागलें. हीं मंडळें एके काळीं फार सामर्थ्यवान समजण्यांत येत असत. वाकबगार कारागिरांना मदत करणें, धंदा शिकणाऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



सोळाव्या शतकांत व सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत किंमतींत झालेली वाढ वरील चित्रांवरून लक्षांत येईल. सुमारें शंभर रुपये दिले तर गव्हाची पोती अगर गाई अगर कापड अगर दारू किती मिळे हें वरील सहा चित्रांत दिसेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उमेदवारांना शिक्षण देणें, उत्तम मालाची निपज करणें व संकटकाळीं मंडळांच्या सदस्यांच्या कुटुंबीयांची काळजी वाहणें वगैरे कामें या मंडळांकडून होत असत. परंतु ट्यूडर काळांत स्वतंत्र व्यापारीवर्ग पुढें आला; व कारागीर आपल्या कारखान्यांत स्वतंत्रपणें धंदे करूं लागला. मंडळांतील श्रीमंत माणसें आपणच नफा खाऊं लागलीं. यामुळें हीं मंडळें मागें पडूं लागलीं. या मंडळांवरील लोकांचा विश्वास उडूं लागला आहे असें पाहतांच सॉमरसेटनें बरीचशीं व्यापारीमंडळें नाहींशीं करून त्यांची मालमत्ता सरकारजमा केली. त्यामुळें व्यापारीमंडळांस चांगलाच धक्का बसला; व त्यांचें पूर्वीचें महत्त्व नष्ट होण्यास मदत झाली. लंडनसारख्या मोठमोठ्या शहरांतील व्यापारीमंडळेंही नाहींशीं झालीं व तेथें व्यापाऱ्यांस महत्त्व येऊं लागलें; व इंग्लंडच्या परगण्यांतून कारखानदाराला महत्त्व येऊं लागलें. हीं व्यापारीमंडळें नष्ट झाल्यानें अनेक लोक बेकार झाले; व मठजप्तीमुळें वाढलेल्या बेकारांत जास्त भर पडली.

४. धंद्यांची स्थिति :—मोठमोठ्या शहरांतील व्यापारीमंडळें नष्ट झालीं तरी लहान लहान गांवांतून कांहीं अवशिष्ट राहिलीं होतींच. मोठमोठ्या शहरांत या मंडळांची जागा दुसऱ्या मंडळांनीं घेतली. पुढें पुढें इंग्लंडमध्यें शांतता निर्माण होऊं लागली व खेडेगांवांत राहणें निर्भय आहे असें जेव्हां लोकांस वाटूं लागलें तेव्हां अनेक कारागीर शहरांतून उठून खेडेगांवांत जाऊन राहूं लागले. यामुळें मँचेस्टर, बर्मिंगहॅम यांसारख्या खेड्यांना महत्त्व येऊं लागलें. अनेक खेड्यांतून साळ्यांनीं आपले माग घातले व एकांतांत राहून ते आपलें काम निवांतपणें करूं लागले. परंतु त्यांच्या मागावर विणलेलें कापड पूर्वीप्रमाणें चांगलें निघत नाहीं अशा अनेकांच्या तक्रारी येऊं लागल्या. विणकरी कुशल नसतात व त्यांच्या कामावर देखरेख होत नाहीं म्हणून सरकारला उमेदवारांसंबंधीं कायदे करावे लागले. या कायद्यांमुळें विणकलेंत व इतर धंद्यांत पडणाऱ्या प्रत्येक मनुष्याला उमेदवार म्हणून सात वर्षें काम करणें आवश्यक ठरलें. विणकलेशिवाय बर्मिंगहॅमशायरमध्यें लेस, लँगक्रेडॉनमध्यें टांचण्या, ऑलफोल्डमध्यें काच, केंट व ससेक्स परगण्यांत लोखंडाचे कारखाने वगैरे अनेक धंदे या वेळीं इंग्लंड-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें चालू होते. या प्रत्येक धंद्यांत पडण्यापूर्वी कारागिराला अगोदर बरीच उमेदवारी करावी लागे; व ती संपल्यावर स्वतंत्र धंदा सुरू करतां येत असे. अशा सर्व कारखानदारांनीं आपापल्या धंद्यापुरत्या कंपन्या स्थापन करण्यास सुरुवात केली होती. या कंपन्यांजवळ पुरेसें भांडवल नसे. त्यामुळें मोठमोठे व्यापारी, दरबारी गृहस्थ वगैरेनीं या कंपन्यांत आपला शिरकाव करून घेतला; व तेथें आपली मालकीही स्थापन करण्यास सुरुवात केली. या लोकांचें सरकारांत वजन असे; व त्याचा उपयोग करून ते सरकारला कांहीं कर भरून एखादा विशिष्ट माल विकण्याचा सरकारकडून मक्ता घेऊं लागले. यामुळें मक्तेदारांचें फावलें व कारागीर व जनता यांच्यांत असंतोष माजूं लागला. या मक्तेदानाच्या बाबतींतच एलिझाबेथला शेवटीं हार खावी लागली होती.

५. उद्योगधंद्यांचें केन्द्र :—ट्यूडर काळांत व विशेषतः एलिझाबेथच्या काळांत अनेक प्रकारचे उद्योगधंदे भरभराटीस आले होते. या उद्योग-धंद्यांकरितां इंग्लंडमधील दक्षिणेकडील केंट, कॉर्नवॉल, ससेक्स, ग्लॉस्टर, डेव्हन, वगैरे परगणेच जास्त प्रसिद्ध होते. ससेक्स व केंट परगण्यांत लोखंड सांपडत असे. ग्लॉस्टर परगण्यांतील ‘ डीन ’ नांवाच्या जंगलांतील लाकडाचा कोळसा लोखंडाचा रस करण्याकरितां उपयोगांत येत होता. दगडी कोळसाही या भागांत सांपडूं लागला होता; परंतु लोखंडाचा रस करण्याकरितां त्याचा उपयोग अजून करण्यांत येत नसे. जहाजें बांधण्याचा धंदा कॉर्नवॉल व डेव्हन या परगण्यांतून या वेळीं चालू होता. या सर्व धंद्यांमुळें दक्षिण इंग्लंडला बरेंच महत्त्व प्राप्त झालें होतें. व्यापारवृद्धीमुळें दक्षिणेंतील लंडन, ब्रिस्टल,साऊथॅम्टन, नॉर्विच, डोव्हर, प्लीमथ वगैरे शहरांना अतिशय महत्त्व प्राप्त झालें होतें. परंतु लोकरीच्या कापडाचे कारखाने नॉर्फोक व यॉर्क परगण्यांत म्हणजे इंग्लंडच्या उत्तरेकडे उदयास येऊं लागले होते. कापड विणणें व तें रंग-विणें या कलांमध्यें वरील परगण्यांतील लोक तरबेज होऊं लागले होते. त्यामुळें हल, न्यूकासल, मँचेस्टर वगैरे खेडेगांवांस महत्त्व येऊं लागलें. इंग्लंडच्या मध्यभागीं कागद तयार करण्याचे व छापखान्यास व लढाईस लागणारें लोखंडी सामान तयार करण्याचे कारखाने निर्माण झाले होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याच भागांत अनेक छापखाने तयार होऊं लागले. दक्षिणेकडील जंगलांतून निघणारें लाकूड, लोखंड वितळविण्यास अपुरें पडूं लागलें; व पश्चिमेकडील परगण्यांतून लोखंडाच्या खाणी व तें वितळविण्याकरितां जंगली कोळसाही जवळच मिळूं लागला. यामुळें डडले, वुल्वरहॅमटन, बर्मिंगहॅम वगैरे खेड्यांतून लोखंडाचे कारखाने सुरू झाले व ते तेथें अजूनही कायम आहेत.

६. परकीय कारागिरांची कामगिरी :—ट्यूडर काळांत इंग्लिशांचे उद्योगधंदे बरेच सरसावले होते. परंतु ते भरभराटीस आणण्यास अनेक परकीय कारागीर कारणीभूत झालेले आहेत. दुसरा फिलिप व त्याचा नेदरलंडचा गव्हर्नर अल्व्हा यांच्या धार्मिक छळास कंटाळून फ्लँडर्समधील अनेक उत्तम विणकरी इंग्लंडमध्यें आले. त्यांनीं आपले धंदे इंग्लंडांत सुरू करून अनेक उत्तमोत्तम प्रकारचें कापड तयार केलें. यामुळें त्या धंद्यांत क्रान्ति घडून आली. या कारागिरांकडून इंग्रजांनीं त्या धंद्यांतील कसब शिकून घेऊन त्याचा प्रसार इंग्लंडभर केला. विणकलेप्रमाणेंच कांच तयार करणें, पितळ व त्याचीं भांडीं तयार करणें, चाकू, सुऱ्या करणाऱ्या शिकलगारांचा धंदा वगैरे बरेच धंदे परकीय लोकांमुळेंच इंग्लंडमध्यें सुरू झाले होते. फ्रान्समधूनही अनेक नामांकित कारागीर इंग्लंडमध्यें एलिझाबेथच्या वेळीं आले होते. या सर्व परकीय कारागिरांनीं इंग्लिश उमेदवारांना आपल्या धंद्यांतील कौशल्य शिकविलें पाहिजे, अशी त्यांच्यावर अट लादण्यांत आल्यानें त्यांच्या हाताखालीं अनेक इंग्रज कारागीर कागद, लेस, रेशमी कापड वगैरे माल कसा तयार करावयाचा तें शिकून तरबेज झाले. यामुळें फ्लेमिश व फ्रेंच परकीय कारागिरांनीं स्वतःचा फायदा साधूनही इंग्लंडवर उपकारांचें ओझें लादलें, असें म्हणणें फारसें चूक होणार नाहीं.

७. व्यापारी कंपन्या व इंग्लंडचा व्यापार :—इंग्लंडमध्यें स्थिरस्थावरता झाल्याबरोबर इंग्लंडचा परराष्ट्राशीं व्यापार झपाट्यानें वाढूं लागला; व त्याकरितां अनेक कंपन्या स्थापन झाल्या. त्यांत खालील कंपन्या प्रसिद्ध आहेत. सन १५७९ मध्यें बाल्टिक समुद्रांत व्यापार करण्याकरितां 'ईस्ट लँड कंपनी' स्थापन झाली. सन १५५५ मध्यें रशियाशीं व्यापार करण्याकरितां 'मस्कोव्ही' कंपनी सुरू होऊन तिनें रशियाशीं व्यापार सुरू करून उत्तर समुद्रांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मच्छीमारीचा धंदा काबीज केला. 'लीव्हंट' कंपनी सन १५८१ मध्यें स्थापन झाली. तिचा व्यापार तुर्कस्थानाशीं सुरू होता. तिची स्थिति चांगली नव्हती. हिंदुस्थानशीं व्यापार करण्याकरितां 'ईस्ट इंडिया' कंपनी सन १६०० मध्यें स्थापण्यांत आली. या सर्व कंपन्यांनीं जगावरील बहुतेक सर्व जलमार्ग व्यापून टाकले. जगांतील बहुतेक सर्व देशांशीं त्यांचा व्यापार सुरू होता. या कंपन्यांखेरीज अनेक धाडसी व्यापारी आपला व्यापार स्वतंत्रपणें करूं लागले होते. यामुळें एके काळीं व्यापारी जगांत अँटवर्पला जें महत्त्व होतें तें नाहींसें होऊन तें लंडनला प्राप्त होऊं लागलें. या व्यापारी उद्योगामुळें इंग्लंडची भरभराट झाली, वसाहतींची स्थापना होऊं लागली, इंग्लंडचें आरमार सामर्थ्यवान् होऊं लागलें व इंग्रजांची कूपमंडुकवृत्ति नाहींशी होऊन ते जगाच्या पाठीवर निर्भयपणें वाटेल तेथें जाऊं लागले. त्या कंपन्यांतर्फे कापसाचें, लोकरीचें व तागाचें कापड, चाकू-सुऱ्या कात्र्या, बिस्किटें, मीठ, दारू, जस्त, शिसें, लाख, दोर, आरसे वगैरे अनेक प्रकारचे जिन्नस इंग्लंडमधून दरवर्षी बाहेर जात व लोखंड, कातडीं, अंबाडी, रेशीम, चरबी, नारिंगें, लिंबें, खजूर, बदाम, पिस्ते, कांदे, सर्व प्रकारची उत्तम दारू, सागवान, निरनिराळीं तेलें, साखर, नीळ, पिसें, साबण, मसाल्याचे पदार्थ, गालिचे, सोनें-मोतीं-हिरे, तरवारी, तांब्यापितळेचीं भांडीं, धनुष्यें, तारा वगैरे नानाविध प्रकारचा माल परदेशांतून इंग्लंडमध्यें येत असे. या व्यापारामुळेंच इंग्लंडची अतिशय भरभराट झाली. या व्यापारी कंपन्यांस राजाकडून व्यापारी सनदा मिळत असत. तसेंच त्यांना संकटाचे काळीं राजाकडून संरक्षण मिळे. त्यांना सर्व प्रकारची मुभा देण्यांत आलेली असे. यामुळेंच वसाहतींची स्थापना करणें, राज्य मिळवून साम्राज्य वाढविणें, निरनिराळ्या बाजारपेठा काबीज करून इंग्लंडची पत वाढविणें वगैरे बाबतींत या कंपन्यांनीं इंग्लंडवर अनेक प्रकारचे उपकार करून ठेवले आहेत.

८. सराफकट्ट्याची स्थापना :—इंग्लंडचा व्यापार जसजसा वाढूं लागला, तसतशी परराष्ट्रीय देवघेव, हुंड्या वगैरेची स्थिति सुधारणें आवश्यक होतें. यापूर्वी बेलजममधील अँटवर्पला आंतरराष्ट्रीय व्यापाराचें केन्द्रस्थान समजण्यांत येई. नाना देशचे अनेक व्यापारी हजारों रुपयांची उलाढाल या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शहरीं करीत असत; त्यामुळें त्या शहराला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालें होतें. त्याचा आणखी एक विशेष म्हणजे तेथील व्यापारी परदेशच्या



सराफकट्टा

व्यापारावर अपरंपार संपत्ति मिळवीत. ते परकीय राजांना व व्यापाऱ्यांनाही जबर व्याजानें पैसे कर्जाऊ देत. हुंड्यांचा व्यवहारही पूर्णावस्थेला तेथें गेला होता. हीं सर्व कामें अँटवर्पला जो एक सराफकट्टा होता त्याच्यामार्फत तेथील व्यापारी करीत असत. असा एक सराफकट्टा इंग्लंडमध्यें लंडन शहरीं स्थापन केला तर इंग्लंडचा व्यापार व इंग्लंडची परराष्ट्रीय पत वाढण्यास मदत होईल असें टॉमस ग्रेशॅम या एलिझाबेथकालीन श्रीमंत व्यापाऱ्यास वाटलें. त्याची कल्पना एलिझाबेथला पटली व तिच्या साहाय्यानें सन १५७१ मध्यें लंडनला त्यानें एका सराफकट्ट्याची स्थापना केली. या ठिकाणीं अनेक दुकानेंही स्थापन करण्यांत येऊन त्या दुकानांतून नानाविध प्रकारचा नाना देशांहून आलेला माल विकण्यांत येऊं लागला. या सराफकट्ट्याच्या स्थापनेमुळें इंग्लंडचा व्यापार वाढण्यास अतोनात मदत झाली; लहानसहान व्यापाऱ्यांस आर्थिक मदत मिळूं लागून वेळेनुसार सरकारला कर्जही पुरविण्यांत येऊं लागलें. या सराफकट्ट्याची पुढें इतकी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसिद्धी झाली कीं, त्याचा संस्थापक सर टॉमस ग्रेशॅम याचा सल्ला विचारांत घेऊन आपलें आर्थिक धोरण एलिझाबेथही ठरवूं लागली. पुढें पुढें अँटवर्पचें महत्त्व कमी कमी होऊं लागलें. आंतरराष्ट्रीय व्यापाराचें प्रमुख केन्द्र म्हणून लंडन शहर ओळखलें जाऊं लागलें; व तेथें अनेक राष्ट्रांतील लोक व्यापाराकरितां येऊं लागले.

अभ्यास

१. मिरासदार शेतकरी, पट्टेदार व शेतमजूर यांसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

२. शेतांचीं कुरणें करण्याच्या पद्धतीचीं कारणें सांगा. यामुळें कोणाचें नुकसान झालें? कां? ही पद्धति नाहींशी करण्याकरितां राजांनीं कोणकोणते उपाय केले? शेवटीं ही पद्धति कशी नष्ट झाली?

३. व्यापारीमंडळांसंबंधीं सर्व हकीकत थोडक्यांत सांगा.

४. ट्यूडर काळीं इंग्लंडांत कोणकोणते धंदे सुरू होते? त्यांचें प्रमुख केन्द्र कोठें होतें? तेथें असण्याचें कारण काय?

५. इंग्लंडच्या आयात व निर्यात व्यापारासंबंधीं थोडक्यांत हकीकत सांगा.

६. सर हेन्री ग्रेशॅमसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.

७. इंग्लंडचा नकाशा काढून त्यांत व्यापार व उद्योगधंद्यांचीं केंद्रें व औद्योगिक महत्त्वाचीं गांवें भरा.

८. त्यावेळीं कोणकोणत्या व्यापारी कंपन्या स्थापन झाल्या होत्या? त्यांनीं कोणकोणत्या देशांशीं व्यापार सुरू केला? या कंपन्यांमुळें इंग्लंडचा फायदा काय झाला?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४३. ट्यूडर काळांतील लोकांची राहणी

१. पूर्वी व आतां :— ट्यूडर राजांच्या पूर्वी देशांत सर्वत्र अस्वस्थता व धुमाकूळ माजलेला असे. सन १५०० च्या पूर्वी कोणातरी सरदाराचा बिल्ला गळ्यांत लटकवावा व शेजाऱ्यापाजाऱ्यांस उच्छाद द्यावा, अशी सर्वत्र स्थिति होती. यामुळें स्वतःला सुख लाभतें व आपल्या धन्याच्या वशिल्यानें राजाकडून व न्यायासनाकडूनही शिक्षा होत नाहीं, अशी प्रत्येक गुंडाची ठाम समजूत होती. यामुळें सर्वत्र अंदाधुंदीच चालू होती. जाळपोळ, लुटालूट, मारामारी, वाटमारी, घरफोड यांना नुसता ऊत आला होता ! व्यापारही चालत नसे. चोरांचिलटांचा उपद्रव होऊं नये म्हणून अनेक उपाय योजण्यांत येत असत; तरी त्यांचा फारसा उपयोग होत नसे. जे लोक श्रीमान् होते ते मोठ्या बळकट किल्ल्यांमध्यें राहात. प्रत्येक गांवाभोंवतीं उंच बुरूज, गढ्या, बळकट तट व भिंती बांधण्याची वहिवाट सर्वत्र होती. मोठमोठ्या सडका होत्या तरी त्यांवरून प्रवास करणें सुरक्षित नव्हतें. यामुळें व्यापार व जीवित यांचें रक्षण करणें जोखमीचें काम होऊन बसलें होतें.

ट्यूडर काळांत जसजशी शांतता स्थापन होऊं लागली तसतसा वरील परिस्थितींत फरक पडूं लागला. दारूचा शोध लागला, त्यामुळें किल्ले, गढ्या व कोट असलेलीं शहरें निरुपयोगी ठरूं लागलीं. स्टार चेंबरसारखीं कोर्टें स्थापन करण्यांत आल्यानें गुंडांना व चोरांचिलटांनाही वचक बसला. जुने सरदार नामोहरम झाल्यानें गुंडांचा आधार नाहींसा झाला होता; व जीवित व मालमत्ता यांच्या रक्षणाकरितां राजाच्या हातीं सत्ता असणें श्रेयस्कर होय असें लोकमत बनलें होतें. या स्थित्यंतरामुळें लोकांस काम करण्यास फुरसत मिळूं लागली, त्यांनीं नवीन नवीन धंदे सुरू केले, उद्योग-धंदे वाढल्यानें देशांत संपत्ति खेळूं लागली, राष्ट्राची लोकसंख्या वाढली व एकंदरींत इंग्लंडची भरभराट झाली. परंतु या बाबतींत इंग्लंडची थोडी सुधारणा झाली असली तरी इतर अनेक अनिष्ट गोष्टी सुरू झाल्या होत्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यापाऱ्या–व्यापाऱ्यांत स्पर्धा व चढाओढ सुरू झाली. वर्ग–कलह व वर्गभेद तीव्र झाला होता. उच्च वर्गीय लोक खालच्या वर्गातील लोकांस हीन लेखूं लागले होते. व्यापारी व धंदेवाले आपल्या श्रीमंतीच्या जोरावर उच्चवर्गीयांची बरोबरी करूं लागले होते. धर्मगुरूंचा पूर्वीचा बोज नाहींसा झाल्यानें त्यांची सत्ता व श्रीमंती कायमची गेली. लोकांत निर्भयपणा आला. व्यापारीमंडळें व धर्ममठ जप्त झाल्यानें बेकारी वाढली. या बेकाऱ्यांनीं



एलिझाबेथकालीन घर

दंगेधोपे सुरू केले. त्यावेळीं भिकाऱ्यांचा कायदा सरकारला पास करावा लागला. एकंदरींत पाहतां ट्यूडर अंमलामुळें देशाचा फायदा झाला, यांत शंका नाहीं. या काळांत इंग्रज लोक कसे राहात होते तें आपण आतां पाहूं.

२. घरें बांधण्याची पद्धति :— खेडेगांवच्या राहणींत फारसा फरक पडलेला नव्हता. शेतकरी बहुधा आपल्या खोपट्यांमधूनच राहत असत. शेतकरी फारच श्रीमंत असला तर तो लहानसें घर बांधीत असे. हीं घरें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बहुधा सागवानाचीं असत. दगड, विटा अगर चुना फारच क्वचित् वापरण्यांत येत असे. शेतकरी स्वतःच आपलें लाकडी घर बांधी. कधीं कधीं गांवचा सुतार त्यास मदत करीत असे. या घरांची उंची फार तर सात–आठ फूट असे. घरें हवाशीर नसत व त्यांस खिडक्याही थोड्याच असल्यानें घरांमध्यें अंधाराचें राज्य बहुधा पुष्कळच असे. असल्या घरांतून फर्निचर फारच थोडें असे; व असे तेंही अगदीं जुन्या प्रद्धतीचें. धूर जाण्याकरितां धुरांडीं नसत. धुराकरितां घरांच्या भिंतींना भोकें ठेवण्याची पद्धति त्या वेळीं रूढ होती. धुरामुळें थंडीवाऱ्यापासून अपाय होत नाहीं अशी लोकांची खुळी कल्पना होती! खेड्यांतील पद्धतीपेक्षां शहरांतील घरें बांधण्याच्या पद्धतींत ट्यूडर काळांत बराच फरक पडलेला होता. शहरांत श्रीमंत लोकांचा भरणा पुष्कळ होता. श्रीमंत व्यापारी व श्रीमंत लोक सुंदर घरें बांधूं लागले होते. माती व लाकूड यांचीं घरें बांधण्याची पद्धति मागें पडूं लागून दगड व तांबड्या पक्क्या विटा यांचीं मजबूत घरें बांधण्यास शहरांतून सुरुवात झाली होती. या घरांना खिडक्याही पुष्कळ असत. धुराकरितां धुरांडीं बांधण्याची पद्धति सुरू झाली होती. यामुळें प्रकाश व हवा उत्तम मिळत असल्यानें हीं नवीन प्रकारचीं घरें चांगलीं हवाशीर असत. त्यांची उंचीही दोन–तीन मजले असे. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास जिने बांधण्यासही या वेळीं सुरुवात झाली होती. पूर्वीच्या खिडक्यांस लाकडी जाळ्या बसवीत असत. त्या ऐवजीं आतां काचेच्या तावदानांचा उपयोग होऊं लागला होता. शहरांतील श्रीमंतांचीं घरें सोडल्यास बाकीचीं घरें खेड्यांतील घरांप्रमाणेंच गलिच्छ व घाणेरडीं असत. यामुळें रोगराईचें फावे. प्लेगचें ठाणें कोठें ना कोठें सदैव असेच!

३. रस्ते व सडका:—ज्या गांवांत असलीं घरें होतीं तेथील रस्ते कसे असतील हा प्रश्नच आहे! गांवांतील व शहरांतील रस्ते अत्यंत अरुंद, अस्वच्छ व घाणेरडे असत. रस्त्यांकरितां फरशांचा फारसा उपयोग करण्यांत येत नव्हता. यामुळें धुरळ्याचा उपद्रव नेहमीं होई. अशा रस्त्यांतूनच सर्व प्रकारच्या खाण्याच्या पदार्थांचीं दुकानें असत. त्यामुळें ते पदार्थही वाईट होत. एका गांवाहून दुसऱ्या गांवीं जाण्यास ज्या सडकांचा उपयोग कर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्यांत येत असे, त्यांची दुर्दशा न विचारलेलीच बरी! या सडकांवर चिखल अतोनात असे; व अंधाऱ्या रात्रीं सडक ओळखणेंही मुष्कीलीचें असे! यामुळें हिंवाळ्यांत या सडकांवरून जाणाऱ्या गाड्या चिखलांत रुतून बसत; व त्या तशा रुतून बसल्या म्हणजे शेजारच्या गांवीं जाऊन घोडे आणीत व त्यांच्या साहाय्यानें या रुतलेल्या गाड्या बाहेर काढीत! कधीं कधीं मोठ्या पावसानें सडका इतक्या धुऊन निघत कीं, त्यावरून प्रवास करणें अशक्य



ट्यूडर कालची वाहतुक

होई. सडकांच्या आजूबाजूला असणाऱ्या शेतकऱ्यानें त्या सडकेची निगा राखिली पाहिजे, असा दंडक असे. पण तो क्वचितच पाळला जाई. यामुळें या सडकांची दुरुस्ती क्वचितच होई. ट्यूडर काळांत व्यापार जसजसा जास्त जास्त वाढूं लागला तसतशी या सडकांबद्दल ओरड होऊं लागली. तेव्हां सरकारनें या बाबतींत सुधारणा करण्याचा थोडासा प्रयत्न केला; पण तो फारसा उपयुक्त ठरला नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. प्रवास :—अशा सडकांवरून प्रवास व व्यापार कितपत आरामशीर व व्यवस्थित होत असेल तें वर्णन न करणेंच चांगलें! प्रवाशाचा प्रवास चौचाकी घोड्यांच्या गाडींतून होत असे. ही गाडी एलिझाबेथच्या वेळीं प्रथमतः उपयोगांत येऊं लागली. या गाड्या डौलदार-



ट्यूडरकालीन गाडी

असल्या तरी त्यांतला प्रवास आरामशीर होत नसे. कारण या गाड्या अवजड व ओबडधोबड असूनही त्यांतून प्रवास करणें अत्यंत श्रीमंतीचें लक्षण समजण्यांत येई. ऊन, पाऊस व वारा यांच्यापासून संरक्षण करण्याकरितां गाडीच्या चारी बाजूंनीं पडदे बांधीत. गाडीवान गाडीला जोडलेल्या घोड्यावर बसून गाडी हाकीत असे. अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगींच अशा गाड्यांतून प्रवास करण्याची त्या वेळीं श्रीमंतांची पद्धत होती. गरीब लोक घोड्यावर बसून सडकेच्या कडेकडेनें हिरवळीवरून अगर दगडांच्या पाऊलवाटेवरून रखडत रखडत जात असत. हे घोडे भाड्याचे असत. दिलेल्या पैशाचें पुरेपूर काम करून घेणारा प्रवासी भेटला म्हणजे तो घोड्याला जीव नकोसा करी! व्यापारी लोक आपला माल घोड्यांच्या पाठीवरून नेत असत. व्यापारी काफिले त्या वेळीं अनेक असत. या सडकांवर वाटमारी व लुटालूट नेहमीं होत असल्यानें प्रवास नेहमीं धोक्याचा असे. यामुळें श्रीमंत लोक आपल्याबरोबर नेहमीं हत्यारें बाळगीत. यांत आपली श्रीमंती दाखविणें हा एक हेतु असला तरी चोरांपासून आत्मसंरक्षण करणें हाच त्यांचा मुख्य हेतु होता. चोरांच्या भीतीमुळें एकटें–दुकटें प्रवास करणें धोक्याचें असल्यानें अनेक प्रवासी एकाच वेळीं प्रवास करीत. मुख्य सडकांवर प्रवाशांच्या सोयीकरितां एलिझाबेथच्या काळापासून ठिकठिकाणीं खानावळी व गुत्तेही सुरू झाले होते. या ठिकाणीं प्रवाशास आसरा व अन्न मिळे. तेथेंही धोक्याच्या भीतीनें निजते वेळीं प्रत्येकजण आपला कसा आपल्या डोक्याखालीं घेऊन व हत्यारें जवळपास ठेवून आरामशीर झोंप घेई. खानावळवाल्यानें कितीही हमी दिली तरी त्याजवर फारसा विश्वास नसे. या सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोष्टींवरून त्या वेळचा प्रवास कितीसा सुखप्रद असेल याची योग्य कल्पना येते! अशा स्थितींत पत्रें व टपाल कितीसें सुरक्षित पोंचत असेल याची कल्पना करणेंच योग्य. सरकारनें टपालाची व्यवस्था केलेली नव्हती. लोक खासगी रीतीनें पत्रें पाठवीत; परंतु तीं नेहमीं योग्य काळीं व योग्य स्थळीं त्या त्या माणसास पोंचतच असें नाहीं.

फेरीवाला

५. खेडेगांवचें जीवन :—रस्ते वाईट असल्यानें व त्यांवरून प्रवास करणें धोक्याचें असल्यानें खेडेगांवांतील लोक प्रवास फारसा करीत नसत. त्यामुळें ते अत्यंत अज्ञानी राहिले. पुढारलेल्या लोकांशीं त्यांचा फारसा संबंध येत नसल्यानें त्यांना नव्या नव्या कल्पना कळत नसत; व त्यामुळें जुन्या परंपरेस चिकटून राहण्याची प्रवृत्ति खेडेगांवांतील लोकांमध्यें अधिक होती. आपापल्या गरजा भागविण्यापुरतें उत्पादन करून शेतकरी सुखी राहण्याचा प्रयत्न करीत असे. शहरांतून अनेक फेरीवाले निरनिराळ्या प्रकारचा माल खेडेगांवांतील लोकांना पुरवीत असत. या फेरीवाल्याजवळ अनेक प्रकारच्या सुंदर सुंदर वस्तु व नाना प्रकारची ताजी व नवी माहिती असल्यानें तो गांवकऱ्यांचा अत्यंत आवडता असे. त्यामुळें त्याचें सर्वत्र स्वागत होई. खेडेगांवांतील लोकांना अत्यंत उपयुक्त अशी आणखी एक संस्था म्हणजे निरनिराळ्या गांवीं भरणाऱ्या जत्रा होत. या जत्रा वर्षाकांठीं राजाच्या परवानगीनें निरनिराळ्या गांवीं भरत असत. या जत्रा केवळ करमणुकीकरितां भरत असत, असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. त्यांत कांहीं सत्य असलें तरी या जत्रांतून बरीच मोठी देवघेव व व्यापार होत असे, यांत शंका नाहीं. ज्या गांवीं जत्रा भरे त्या गांवाच्या आजूबाजूचे लोक त्या जत्रेकरितां जात. जत्रेंत माल स्वस्त मिळतो अशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांची समजूत असल्यानें तेथेंच ते बरीच खरेदीही करीत. परकीय व्यापारी आपला माल स्वस्त दरानें या जत्रांतून विकीत. यामुळें शहरच्या व्यापाऱ्यांचें नुकसान होत असे. प्रत्यहीं लागणारा माल शेजारच्या मोठ्या शहरांतून गांवचे लोक दर आठवड्याला जाऊन विकत आणीत. खेडे-गांवच्या लोकांचा मुख्य धंदा शेतकीचा. या कामाला साधारणतः ऑक्टो-बरपासून सुरुवात होत असे. शेतीच्या कामीं बैलांचाच त्या काळीं उपयोग होत असे. शेताची नांगरणी झाल्यावर मुलें–मुली व बायकामाणसें गव्हाची पेरणी करीत. हिंवाळ्यांत शेतीचें काम जरा मंदावे व त्यामुळें घरगुती धंद्याकडे लोकांचें लक्ष लागत असे. मार्चच्या सुमारास पावटा, बार्ली, वाटाणा वगैरे धान्यें पेरलीं जात. 'मे' महिन्याच्या पहिल्या दिवशीं 'वसंत दिन' मोठ्या समारंभानें साजरा करण्यांत येई. जूनमध्यें मेंढ्यांवरील लोकर कापीत, व नंतर कुरणांतील गवत कापण्यास सुरुवात होई. अशा तऱ्हेनें खेडेगांवच्या शेतकऱ्याचा नित्यक्रम होता. त्यांत सहसा बदल होत नसे. गुरांना चांगलें पोसण्यांत येत असे; परंतु हिंवाळ्यांत त्यांना योग्य व भरपूर चारा नेहमींच मिळे असें नाहीं. प्रथम प्रथम या काळांत मनुष्यास पुरेशींच पिकें निघत; परंतु पुढें पुढें तीं जास्त निघूं लागलीं. शेतीमध्यें निरनिराळ्या सुधारणा होऊं लागल्या. एलिझाबेथच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं शेतकऱ्यांची स्थिति चांगलीच सुधारली होती. झोंपड्यामधूनही उत्कृष्ट प्रकारचें अन्न मिळत असे. खेड्यांपाड्यांतील घरेंही सुंदर होऊं लागलीं होतीं. फावल्या वेळीं व सुटीच्या दिवशीं अनेक प्रकारचे करमणुकीचे खेळ खेडेगांवांत चालत. छापील पुस्तकांचा–विशेषतः पोवाडे–खेडेगांवांत प्रसार होऊं लागला होता. या वेळीं खेड्यांपाड्यांतून उडाणटप्पू व भुरट्या चोरांचा मात्र सुळसुळाट असे. भीक मागावयाची व साधल्यास लहान मोठ्या चोऱ्या करावयाच्या हा त्यांचा मुख्य धंदा. तोंडाला रंग फासून, वेड्याचें सोंग घेऊन अगर इतर कोणत्याही अन्य उपायानें ते लोकांना फसवीत व त्यांच्या मनांत स्वतःबद्दल कोणत्या ना कोणत्या उपायानें दया उत्पन्न करून घेऊन त्यांस लुबाडीत. अशा भामट्यांना सुळीं देत. उडाणटप्पूंचा सुळसुळाट बंद करण्याकरितांच भिकाऱ्यांसंबंधीं कायदे पास झाले. खुद्द लंडन शहरांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दरसाल सुमारें तीनशें चोरां-भामट्यांना फांसावर लटकावलें जात असे, असें म्हणतात. यावरून त्यांचा लोकांना किती उपद्रव होत असे, याची योग्य कल्पना येईल.



ट्यूडर कालीन घर

६. **शहरांतील जीवन** :-खेडेगांवच्या लोकांची स्थिति फारशी समाधानकारक नव्हती. कष्ट पुष्कळ व मिळकत थोडी यामुळें त्यांचें जीवन दुःखद असे. त्याच्या उलट शहरांतील लोकांची स्थिति होती. शहरी व खेडेगांवी जीवनाचें चित्र समोर धरलें तर मानसिक उन्नति, शिक्षण, आचार-विचार, घरांची पद्धति, धंदे, करमणुकीचे खेळ वगैरे अनेक बाबतींत त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोहोंमध्यें आपणांस पुष्कळ फरक आढळून येईल. जसजसा व्यापार वाढूं लागला व नवीन नवीन कारखाने सुरू झाले, तसतसें शहरांना महत्त्व प्राप्त होऊं लागलें. शहरांची वस्ती वाढूं लागली. मोठमोठे व्यापारी शहरांतून राहात व आपला व्यापार करून गबर होत. लंडन शहराला फारच महत्त्व प्राप्त झालें होतें. त्याची सन १६०० च्या सुमारास दोन लाख वस्ती होती. तेथें अनेक देशचे लोक प्रत्यहीं येत व नाना प्रकारच्या उलाढाली करीत. लंडनसारख्या मोठमोठ्या शहरांतील रस्तेही अत्यंत अरुंद व अस्वच्छ असत. त्यांतूनच व्यापारी व लोक मोठ्या लगबगीनें जात–येत. सर्व शहर-भर हांका, गाणीं व विक्यांच्या आरोळ्या यांचा नुसता गोंगाट चाले! या रस्त्यांवरील घरांकडे नजर फेकली तर तीं फारच सुंदर व शोभिवंत दिसत. तीं दोन-दोन तीन-तीन मजल्यांचीं असत. प्रत्येक घराचा दुसरा मजला रस्त्यावर इतका पुढें येई कीं, थोडेंसें वांकल्यास समोरच्या घराच्या घर-मालकाशीं हस्तांदोलन सहज करतां येई! यावरूनही रस्ते किती अरुंद, घाणेरडे व अंधारमय होते, याची कल्पना येईल. घरांत शिरल्यास सुशोभितपणा व श्रीमंती यांकडे भरपूर लक्ष दिलेलें दिसत असे. खालच्या मजल्यावर दुकानें मांडलेलीं असत; दुसऱ्यावर घरमालक स्वतः राहत असे. सुंदर जिने व मोठमोठे दिवाणखाने दुसऱ्या मजल्यावरच असत. भिंतीवरून बुट्टीदार व सुंदर पडदे नेहमीं सोडलेले असत; खुर्च्या, मेजें, स्टुलें, कोचें यांची रेलचेल असे. जमिनीवर गालिचे आंथरण्याची वहिवाट यावेळीं पडूं लागलेली होती. फुलदाण्यांतून सुंदर सुंदर फुलें प्रत्येक खोलींत असत. प्रत्येक खोलींत शेगड्यांवर धुरांडीं बांधण्यांत येऊं लागलीं होतीं. शय्यागृह हें प्रत्येक घराचें वैशिष्ट्य होय. त्यावरून मालकाची श्रीमंती अजमावली जात असे. नक्षीदार पलंग, जाळीदार मच्छरदाण्या, पराच्या गाद्या, उशा–गिरद्या, पांघरुणें, पलंगपोस या सामानांत गृहिणी सदैव दक्षता ठेवीत व आपली सर्व श्रीमंती तेथेंच खर्च करीत. लंडनशिवाय इतर शहरें लहान असलीं तरी लंडनची नक्कल करण्याकडेच तेथील लोकांचा कल असे. आपल्या घरांतून श्रीमंत लोक मोठ्या ऐटींत व मिजाशींत राहत असत. शहरांतून सोनें, त्याचे निरनिराळे दागिने, साखर, सुंठ, कातडीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तंबाकू वगैरे माल नेहमीं मिळे. यामुळें शहरीजीवन अत्यंत सुखाचें वाटे. त्याच्याशिवाय शहरांतून निरनिराळे उत्सव, यात्रा, मिरवणुकी, करमणुकींचे



ट्यूडर पलंग

खेळ सदैव होत असल्यानें शहर म्हणजे सामाजिक जीवनाचें केन्द्रस्थान होय असें श्रीमंतांस वाटत असे; व त्याची झळ अशिक्षितांसही थोडीफार जाणवूं लागली होती. इतके दिवस शहरांभोवतीं कोट, तटबंदी, भिंती वगैरे असत व त्याच्या आंतच लोकांची वस्ती असे; परंतु ट्यूडर काळांत शांतता नांदूं लागल्यानें कोटाबाहेरही वस्ती वाढूं लागली. तेथील घरें शहरांतील घरांपेक्षां जास्त पद्धतशीर, आरोग्यकारक व हवाशीर असल्यानें कोटाबाहेर राहणें जास्त सुखाचें होऊं लागलें होतें. बहुतेक सर्व मोठ्या शहरांतून पंचायती स्थापन झालेल्या होत्या. या पंचायतीच्या अध्यक्षाची—मेयरची—निवडणूक शहरचे लोक करीत. या मेयरकडे सर्वांचें लक्ष लागलेलें असे. मेयरला पंचायतींतील इतर सभासद नेमण्याचा अधिकार देण्यांत आला होता. यामुळें मेयरचें स्थान अत्यंत मानाचें समजण्यांत येत असे. या पंचायतींना न्याय-निवाड्याचेंही काम करावें लागे. पंचायती आपल्या हक्कांकरितां नेहमीं जाग-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करू असत. शहरच्या रस्त्यावरच सर्व बाजार-हाट भरे. खेड्यांप्रमाणेंच शहरांतूनही चोरांचिलटांचा फार उपद्रव होई. एखादा चोर सांपडला म्हणजे त्याला कडक शिक्षा देण्यांत येत असे. फटके मारणें, खोड्यांत अडकविणें, मानखोडा देणें व वेळेनुसार फांसावर चढविणें वगैरेसारख्या कडक शिक्षा,

मानखोडा



पायखोडा

शिव्या देणें, विष घालण्याचा प्रयत्न करणें, व्यापारांतील लबाडी, वगैरे-सारख्या किरकोळ गुन्ह्यांबद्दलही करण्यांत येत असत. शहरांतून भामट्यांवर लक्ष ठेवण्याकरितां व रात्रीं गस्त घालण्याकरितां कांहीं माणसें नेमलेलीं असत. तीं सध्यांच्या पोलिसांसारखीं कामें करीत. त्यांच्याजवळ एक दिवा, एक काठी, एक कुत्रा व हातांत एक घंटा असे. झोंपी जाणाऱ्या लोकांस घंटा वाजवून रात्रींच्या वेळीं चोरांपासून सावध राहण्याचा इशारा देण्याच्या कामीं या लोकांचा फार उपयोग होई. रात्रींच्या वेळीं संशयित माणसास उभें राहण्यास सांगून गस्तवाल्याला त्यास पकडतांही येई. सर्व गस्तवाल्यांवर एखाद्या नाईकाची नेमणूक होत असे. एकंदरींत पाहतां शहरी जीवन आरामशीर, ऐषारामाचें, श्रीमंतीचें होतें. लंडनसारख्या मोठ्या शहराची वाढ खुंटविण्याकरितां एलिझाबेथनें कायदे करूनही त्याची वाढ खुंटली नाहीं. लंडननें इंग्लिश लोकांसच नव्हे, तर परकीय लोकांसही चटका लावला होता !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. ऐषारामी राहणी :—ट्यूडर काळांतील लोक – विशेषत: शहरांतील लोक – अत्यंत शोकीन व ऐषारामी बनले होते. सुंदर घरें, फर्निचर, गालिचे, जाळीदार व नक्षीदार व बुट्ट्यांचे पडदे वगैरे ऐषारामाचीं अनेक साधनें या वेळीं निर्माण झालेलीं होतीं; व त्यावांचून जीवित सुखमय होणार नाहीं, असें श्रीमान लोकांस वाटूं लागलें होतें. सुखमय जीवनाचें हें लोण खेड्यां-पर्यंतहि पोंचूं लागलें होतें. हातांनीं जेवण्यापेक्षां काटे, चमचे व सुऱ्या यांनीं जेवण्याची पद्धति ट्यूडर काळांतच पडली; ती अजूनही कायम राहिली आहे. निरनिराळ्या प्रकारचे खाद्य पदार्थ व रुचकर व स्वादिष्ट जिन्नस या वेळीं शहरांतून मिळूं लागल्यानें लोकांचें जिव्हालौल्य वाढूं लागलें होतें. निरनिराळ्या प्रकारची उत्तम व ऊंची दारू या वेळीं मिळूं लागली होती. भपकेदार पोषाख घालावा व गांवांतून भटकत राहावें असें लोकांस वाटूं लागलें होतें. विड्या ओढणें व पंख्यांनीं वारा घेणें हा एक श्रीमंती शोक होऊन राहिला होता. नाच–तमाशा–नाटकें पाहण्याची एकसारखी धडपड होऊं लागली होती. एकंदरीनें पाहतां त्या वेळीं चैन व विलास खूपच वाढल्यानें सुखलोलुप माणसांची त्या वेळीं फारशी वाण नव्हती. हातीं पैसा खेळत होता व तो चैनीकरितां उडवून ऐषारामाचीं निरनिराळीं साधनें मिळविण्याची हौस लोकांत दिसूं लागली होती. परराष्ट्रांत विशेषतः इटली-मध्यें प्रवास करणें हें श्रीमंतीचें एक मोठें गमक मानण्यांत येत असे; व असा प्रवास करणारास समाजांत मोठा मानही मिळे.

८. अन्न व खाद्यपेयें :—लोकांच्या राहणीप्रमाणेंच त्यांच्या अन्नांतही पुष्कळ फरक पडला होता. नानाविध रुचकर पदार्थ बनवून दररोजच्या जेवणांत त्यांचा उपयोग होऊं लागला होता. व्यापार वाढल्यामुळें व नव्या वसाहती स्थापन झाल्यामुळें अनेक प्रकारचीं फळें व पदार्थ इंग्लंडमध्यें येऊं लागले होते. फळांमध्यें स्ट्रॉबेरी, पीच, केळीं, नारिंगें, द्राक्षें, सफरचंद यांचा समावेश होऊं लागला व भाज्यांमध्यें मुळा, काकड्या, भोपळे, कोबी वगैरेंचा उपयोग होऊं लागला होता. यांपैकीं बऱ्याचशा भाज्या हॉलंड-मधील डच लोकांनीं इंग्लंडमध्यें आणल्या होत्या. फळांची लागवड दक्षिण इंग्लंडमध्यें होऊं लागली होती. सर वॉल्टर रॅलेनें अमेरिकेहून आणलेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बटाटे जेवणामध्यें नुकतेच शिरले होते व त्यांची लागवड इंग्लंड व आयर्लंडमध्यें होऊं लागली होती. या काळीं बटाटा अत्यंत लोकप्रिय होऊं लागला होता. आइस्लंड व न्यूफाउंडलंड येथून उत्तम उत्तम मासे इंग्लंडमध्यें येऊं लागले होते. फ्रान्स व पोर्तुगाल या देशांहून इंग्लंडमध्यें उत्तम प्रकारची दारू येत असे. यांशिवाय बीयर, सायडर वगैरे मादक पेयें इंग्लंडमध्यें होत असतच. श्रीमंत लोक गव्हाच्या व गरीब लोक बार्ली व ओटस् यांच्या भाकऱ्या व रोट्या खात. शेतकऱ्यांजवळ डुकरें असत. त्यांचें मांस लोकांना फारच आवडे. कोंबड्यांच्या अंड्यांचा उपयोग जेवणांत सर्रास होत असे. हातांनीं जेवण्यापेक्षां काट्या–चमच्यानें जेवण्याची पद्धति ट्यूडर काळांत रूढ झाली होती. लाकडाच्या ताटाऐवजीं ज़स्ताच्या ताटांचा उपयोग होऊं लागला होता. श्रीमंतांच्या घरीं चांदीचे चमचेही असत. मिठाचा उपयोग जेवणांत होत असला तरी तिखट मुळींच वापरण्यांत येत नसे. मुरंबे, पाकवलेलीं फळें, जेली, आलेपाक वगैरेंचाही उपयोग करण्यांत येत असे. जेवणाच्या वेळाही ठरलेल्या असत; व त्या दोनच असत. सकाळीं अकरा वाजतां पहिलें जेवण व संध्याकाळीं पांच वाजता दुसरें जेवण. खाण्यापिण्यामध्यें चहाचा अजून शिरकाव झाला नव्हता. इंग्लंडमध्यें हिंवाळा कडक असल्यानें त्या ऋतूमध्यें गवतपाला मिळत नसे. अर्थात् माणसाला अन्नाचा व गुरांना चाऱ्याचा पुरावठा पुरा नसे. त्यामुळें योग्य काळीं मांस मिठांत मिसळून ठेवल्यानें तें ताजें राही. तेव्हां गुरें उन्हाळ्यांत मारून त्यांचें मांस खारवीत व त्याचा हिंवाळ्यांत जेवणांत उपयोग करीत. तेंही अपुरें पडलें तर बदकें, डुकरें, बैल मारून लोक आपली उपजीविका करीत. वसंतागमनामुळें सर्वांस हर्ष होई; कारण त्यावेळीं फळें, भाज्या वगैरे मिळून गुरांचें मांसही मिळूं लागे. यामुळेंच 'वसंतदिन' मोठ्या उत्साहानें व आनंदानें साजरा करण्याची चाल पडलेली होती. ती ट्यूडर काळांत होती व अजूनही रूढ आहे.

९. पोशाख व कपडेलत्ते :—घरांच्या रचनेंत व खाण्या-पिण्यांत जो छानछोकीपणा दिसत होता त्यापेक्षां कपड्यांमध्यें तो फार दिसत असे. स्त्री-पुरुषांचे कपडे झगझगीत, भपकेदार व कधींकधीं भरजरीही असत. या बाबतींत राजा अगर राणी यांचें अनुकरण करण्याची प्रथा पडलेली होती. राजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समाजाचा नेता मानण्यांत येत असल्याकारणानें तो जसा पोषाख घाली तसा पोषाख पुरुष वापरीत व राणीच्या पोशाखाची नक्कल स्त्रिया करीत. आठवा हेन्री व एलिझाबेथ यांचें पोशाखाचे बाबतींत सरदारांनीं अनुकरण केलें व त्यांचें अनुकरण आपल्या पद्धतीनें खेड्यांपाड्यांतील लोकांनींही केलें. मध्ययुगीन काळांतील लोकांपेक्षांही ट्यूडर काळांतील सामान्य लोकांचा पोषाख त्यावेळच्या उमरावांच्या पोशाखाइतका मौल्यवान् असे, असें मानण्यांत येत होतें. श्रीमंत लोक जरीचे, लोकरीचे व रेशमी कपडे वापरीत. सैल व डौलदार कपडे वापरण्याऐवजीं तंग व कडक इस्त्रीचे कपडे लोक वापरूं लागले होते. एलिझाबेथजवळ अत्यंत सुंदर व मौल्यवान असे सुमारें तीनशें कपडे होते. तिच्या दरबारी स्त्रिया नेहमीं तिचें अनुकरण करीत असल्यानें त्यांनींही अनेक सुंदर व मौल्यवान कपडे वापरण्यास सुरुवात केली. रेशमी पायमोजे, हातमोजे, गंगावनें वगैरे जिन्नस वापरण्याची यावेळीं प्रथा पडली. एलिझबेथनें सन १५६० सालीं प्रथमच रेशमी पायमोजे घातले. केसांच्या सुंदर सुंदर वेण्या घालाव्या, अंगांत तंगदार पोलकीं, त्यावर मानेपासून कंबरेपर्यंत येणारा अत्यंत तंग असा 'स्टमकर' नांवाचा आंखूड झगा, व त्यावर फुग्या–फुग्याचा व अत्यंत सैल असा झगा वापरावा अशी स्त्रियांच्या पेहरावाची पद्धति होती. गळयाभोंवतीं चुणीदार व कडक इस्त्रीच्या कॉलरी वापरण्याची पद्धत स्त्रियांमध्येंही सर्रास चालू होती. या कॉलरी जाळीच्या कापडाच्या करीत. कधीं कधीं लेसचाही उपयोग करीत असत. निरनिराळ्या टोप्याही स्त्रिया वापरीत असत. कपड्याला इस्त्री करून ते कडक कसे करावे हें शिकविण्याकरितां एका पाठाला साठ साठ रुपये फी देऊनही अनेक स्त्रिया ते पाठ घेत असत! यावरून कडक इस्त्री वापरण्याचा मोह स्त्रियांस किती होता हें दिसून येईल. कपड्यांचे बाबतींत राणी एलिझाबेथ हीच स्त्रियांची आदर्श होती. ती ज्या प्रकारचा पोशाख करीत असे, तसा पोषाख इतर स्त्रिया करीत. ती केसांना रंग देते म्हणून स्त्रियाही आपल्या केसांना रंग देत! ती कडक इस्त्रीचे कपडे वापरते तेव्हां स्त्रियाही तसे वापरूं लगल्या. ती मौल्यवान हिरे–माणकें वापरते तेव्हां स्त्रियाही वापरूं लागल्या! गंगावनांना त्यावेळीं इतका भाव असे कीं, गरीब स्त्रिया आपले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लांब केस कापून घेऊन पैशाकरितां ते विकीत! मेलेल्या स्त्रियांच्या लांब सडक केसांनाही मागणी फार असे. हातांत अनेक तऱ्हेच्या मौल्यवान आंगठ्या वापरण्याची पद्धत त्यावेळीं रूढ होती. तोंडाला रंग लावण्याचा अनिष्ट प्रकार यावेळीं सुरू झाला होता.

स्त्रियांच्यापेक्षां पुरुषांचा पोषाख मौल्यवान व लोकविलक्षण असे. गळ्याभोंवतीं चुणीदार, भरजरी व कडक इस्त्रीचे गळपट्टे, अंगांत रेशमी अगर मखमली तंगदार कोट, त्याखालीं कंबरेपाशीं फुगीर व मांडीपासून खालीं तंगदार असलेला मांडचोळणा, त्याखालीं तंगदार पायमोजे व कपड्याच्या रंगाला विसंगत दिसणार नाहीं अशा रंगाचे बूट व डोक्यास टोपी असा पुरुषाचा एकंदर पोषाख असे. बाहेर जावयाचें झालें तर एक मोठा फुगीर अंगरखा घालण्याची त्यावेळीं पद्धत होती. पुरुषांच्या कपड्यांत नाना ढंग व नाना तऱ्हा दिसत असत. टोप्यांत तऱ्हेतऱ्हेचीं पिसें घालून नटण्याची हौस पुरुषांना फार होती. आवडेल त्या प्रकाराची व आकाराची दाढी प्रत्येक पुरुष ठेवी. दाढीला निरनिराळे रंग लावण्याची पद्धतीही त्यावेळीं होती. दाढीवरूनही पुरुषाचा धंदा कधीं कधीं ओळखला जाई. आपल्या केसांना कुरळें वळण देण्याचा लोकांस छंदच असे. मांडचोळणा, पायमोजे, झगे वगैरे रजईसारखे भरून व ते फुगीर करून घेतल्यानें आपल्या सौंदर्यांत भर पडते अशी प्रत्येकाची समजूत असे. एकंदरींत त्या काळचा पुरुष मोठा ऐटबाज व रुबाबदार दिसे. प्यूरिटन लोकांना ऐषारामाची राहणी आवडत नसे. त्यांस साधी राहणीच फार पसंत असे.

१०. करमणुकीचीं साधनें व **खेळ**:—ट्यूडर काळांतील रंगेल स्त्री-पुरुष आपलें मन उल्हसित करण्याकरितां अनेक प्रकारचे खेळ खेळत असत. टेनिस हा खेळ फार लोकप्रिय होता. आठव्या हेन्रीला हा खेळ फारच आवडत असे. त्या खेळाला राजाश्रय मिळालेला पाहून सरदार व जनता यांनाही तो जास्त आवडूं लागला. टेनिसप्रमाणेंच हॉकी, गोल्फ, बिलियर्डस्, फुटबॉल वगैरे खेळ उन्हाळ्यांत खेळण्यांत येत. क्रिकेटचा खेळ खेळण्यास कोठें कोठें सुरुवात झाली होती. कुस्तीचा खेळ लोकांना आवडत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे. याकरितां प्रत्येक मोठमोठ्या बगीच्यांतून गवताळ भाग राखून ठेवण्यांत येत असे. पत्ते, बुद्धिबळें व ड्राफ्ट हे सर्व खेळ घरबसल्या खेळण्यासारखे होते; व हिंवाळ्यांत त्या खेळांस ऊत येई. अस्वलें, बैल, कोंबडीं, कुत्रीं, यांच्या झुंजी लावण्यांत येत. त्यांत लोकांचें क्रौर्य दिसून येत असूनही लोकांना त्या फार आवडत! अस्वल एखाद्या खांबाला बांधण्यांत येई व मग त्याला चाबूक अगर काठ्या मारमारून चवताळवीत; त्यानंतर त्या जनावरावर सात–आठ कुत्रे सोडीत, व ते त्याला मरेपर्यंत सतावून सोडीत. असल्या निर्दयपणानें चालविलेल्या खेळापासूनही त्या वेळच्या माणसास मोठा आनंद होई! शिकारीचा नाद राजापासून रंकापर्यंत सर्व लोकांना

अस्वलाची झुंज

होता. बहिरीससाण्याच्या मदतीनें पक्षी मारण्यानें लोकांना फार आनंद होई. हरणें, रानटी डुकरें वगैरेंची शिकार करणें श्रीमंतांस फार आवडे. ख्रिसमस, ईस्टर, मायकेलमस, वसंतदिन वगैरे सण मोठ्या आनंदानें व उत्साहानें पाळण्यांत येत असत. गाणीं गाणें, नाचरंग, कुस्त्या वगैरे अनेक प्रकार या सणांचे दिवशीं नेहमीं होत. त्या वेळचा लोकांचा उत्साह अमूप असे. वसंतदिनाचे दिवशीं 'मॉरिस डान्स' नांवाचा एक विशिष्ट नाच स्त्रीपुरुषांकडून नाचला जात असे. या नाचांत भाग घेणाऱ्या प्रत्येकाच्या पायांत मंजूळ आवाजाच्या घागऱ्या बांधीत व आंगाखांद्यावर निरनिराळ्या फिती लावून आनंदानें नाचत. वसंतदिनाचे दिवशीं खेडेगांवांतून तरुण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलें व मुली मोठ्या पहांटे गांवाबाहेर पडत व रानावनांतून ' हॉथॉर्न ' नांवाच्या झाडाचा मोहोर घरीं आणून त्यांनीं घरें सुशोभित करीत. नंतर सर्वजण गांवाच्या सार्वजनिक मैदानावर जमत व त्याच्या मधोमध एक खांब पुरीत. त्या खांबाभोंवतीं ' मॉरिस डान्सर्स ' घेर धरीत व नाचत. जी मुलगी सर्वांत सुंदर असेल तिला त्या दिवसाची ' राणी ' म्हणून निवडण्यांत येई व तिच्या अध्यक्षतेखालीं त्या दिवसाचे खेळ होत. एकंदरींत सर्व सण आनंदोत्सवाचे असत. एलिझाबेथच्या वेळीं या सर्व प्रकारांना नुसता ऊत आला होता ! शांतता, स्वस्थता, भरभराट यामुळें लोकांना आनंदाचें भरतें आलें होतें. गाणें–बजावणें त्या वेळीं लोकांस फारच आवडे. किंबहुना वाद्य वाजविणें अगर गायन येणें या आवश्यक गोष्टी मानण्यांत येत असत. ' व्हर्जिनल ' नांवाचें पियानोसारखें एक वाद्य त्या वेळीं अत्यंत लोकप्रिय झालेलें होतें. राणी एलिझाबेथलाही तें वाजवितां येत असे. पावे, मँडोलिन, ऑर्गन वगैरे वाद्यें त्या वेळीं लोकांना फार आवडत. लोकगीतें म्हणण्याचा त्या वेळीं परिपाठ असे. त्याशिवाय मोर्ले, बर्ड, शेक्सपियर वगैरे लेखकांनीं रचलेलीं पद्यें आनंदानें म्हटलीं जात. नाटकें, प्रहसनें पाहण्याकरितां लोकांची नुसती झुंबड उडे. याकरितां स्वतंत्र जागा असत. शेक्सपियरच्या वेळीं नाटकगृहें बांधण्यांत आलीं. त्याचीं सर्व नाटकें ' ग्लोब ' नामक नाटकगृहांत होत. त्याच्यापूर्वी उघड्या मैदानावर, अगर खाणावळीच्या पटांगणांत होत. पैसे देऊन नाटकें पाहण्याचा शोक त्या वेळींही लोकांना होता. ग्लोब नाटकगृहाची अंतर्रचना कौशल्यपूर्ण होती. मध्यंतरीं नाटकाची जागा असे व त्याच्याभोंवतीं लोकांना बसण्याकरितां वर्तुळाकार जागा असत. स्त्रियांचीं कामें त्यावेळीं तरी मुलें अगर पुरुषच करीत असत; व नाटकें दिवसा होत. फावल्या वेळांत स्त्रिया विणण्याचें काम करीत. कशिदा काढणें, शिवणें–टिपणें वगैरे कामें करणें हें स्त्रियांच्या करमणुकीचें घरगुती साधन समजण्यांत येई. एकंदरींत लोकांचा करमणुकीचे खेळ खेळण्यांत पुष्कळच वेळ जात असे. मर्दानी खेळांची आवड त्यांच्यांत पुष्कळ उत्पन्न झालेली होती.

११ **शिक्षण : शाळा :**—ट्यूडर काळांत रंगेलपणा उतास आला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असला तरी लोकांच्या शिक्षणाची आबाळ करण्यांत येत नसे. विद्येच्या पुनरुज्जीवनामुळें विद्येची खरी किंमत लोकांस कळून चुकलेली होती. पूर्वी शिक्षणाचें पवित्र कार्य धर्ममठ व धर्मसंस्था यांच्याकडून होत असे. ट्यूडर काळांत धर्ममठांचा विध्वंस झाला, धार्मिक संस्थांवरील लोकांचा विश्वास उडाला व यामुळें शिक्षणाचें कार्य मागें पडेलसें वाटत होतें. परंतु तसें झालें नाहीं. शिक्षण देणाऱ्या नवीन नवीन संस्था या काळांत स्थापन झाल्या व त्या शिक्षणाचें कार्य करूं लागल्या. तसेंच शिक्षण सार्वजनिक असावें व तें वाटेल त्यानें घ्यावें अशी कल्पना रूढ होऊं लागली होती धर्मगुरूंच्या ऐवजीं गृहस्थही शिक्षणकार्यांत पडूं लागले होते व त्यांनीं नवीन शाळा स्थापण्यास सुरुवात केली होती. या वेळीं 'व्याकरण पाठशाळा' स्थापन होऊं लागल्या होत्या. त्यांतून सर्व वर्गांतील लोकांना उदार शिक्षण मिळत असे. ट्यूडर काळापूर्वी ईटन व विंचेस्टर येथील 'पब्लिक स्कूल्स' स्थापन झालीं होतीं. ऑक्सफर्ड व केंब्रिज येथील विश्वविद्यालयें आपलीं कामें करीत असत. ट्यूडर काळांत अनेक नवीन शाळा स्थापन झाल्या. जॉन कॉलेटनें सेंट पॉल्स या नांवाची शाळा सन १५०८ मध्यें स्थापन केली; वूल्सेनें क्राइस्ट चर्च या नांवाचें एक महाविद्यालय ऑक्सफर्ड येथें सुरू केलें; व केंब्रिजला ट्रिनिटी महाविद्यालयाची स्थापना आठव्या हेन्रीनें केली. एलिझाबेथच्या काळांत जॉन लायन यानें हॅरो येथें व लॉरेन्स शेरीफनें रग्बीला 'पब्लिक स्कूल' स्थापिलें. याशिवाय तिच्या काळांत अनेक शाळा



हॅरो शालागृह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थापिल्या गेल्या. प्रॉटेस्टंट पंथाचा इंग्लंडमध्यें प्रसार होऊं लागला; तेव्हां प्रॉटेस्टंट पंथाचीं तत्त्वें शिकवून त्यांचा प्रसार करण्याकरितां प्रॉटेस्टंटांनीं अनेक शाळा स्थापिल्या होत्या. या काळांत सर्व धर्मतत्त्वांचें शिक्षण मिळत असेच; पण त्याबरोबरच लॅटिन व ग्रीक भाषांचें शिक्षण देण्यांत येत असे. इग्नेशस लायोला व जॉन नॉक्स यांनींही शिक्षणप्रसारार्थ खूपच खटपट केली. लायोलाच्या जेसुइटांनीं शिक्षणप्रसारार्थ अनेक शाळा स्थापन केल्या. प्रत्येक खड्यांत शाळा असावी, असें ध्येय स्वीकारून नॉक्सनें आपला प्रयत्न चालू ठेवला होता; व त्या कार्यांत त्यालाहि पुष्कळच यश मिळालें.



हॅरो शाळेचा जुना वर्ग

या सर्व शाळांतून साधारणतः पांच वर्षांखालील मुलें घेतलीं जात नसत. शाळा दोन वेळां भरत. सकाळीं ७ ते ११ व दुपारीं १ ते ५. विद्यार्थ्यांनीं आपल्या गुरूबरोबर सौजन्यानें व सालसपणानें वागून अत्यंत व्यासंगपूर्वक आपला अभ्यास केला पाहिजे असा त्या वेळीं दंडक होता. शाळा सुरू होण्यापूर्वीं व शाळा सुटतांना, तसेंच दर रविवारीं व सुट्यांच्या दिवशीं होणाऱ्या प्रार्थनेच्या वेळीं प्रत्येक विद्यार्थ्यानें हजर राहिलें पाहिजे, अशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सक्ति असे. या शाळांतून लॅटिन, ग्रीक, थोडें हेब्रू भाषेचें व्याकरण वगैरे शिकविलें जाईच; तथापि गणित, भूगोल, जगदुत्पत्तिशास्त्र वगैरे विषयही शिकविले जात. भाषेचें व्याकरण, भाषांतर व धर्मशिक्षण यांवर शाळांतून विशेष भर देण्यांत येत असे. त्या वेळचें विद्यार्थीजीवन फारसें सुखाचें नव्हतें. दर शुक्रवारचा दिवस मुलांना घातुक ठरे; कारण त्या दिवशीं सर्व आठवड्यांत केलेल्या चुकांबद्दल शिक्षक विद्यार्थ्यांस कडक शिक्षा करीत. एकंदरींत पाहतां शिक्षणाची व्यवस्था उत्तम होती. राजेलोक या बाबतींत जातीनें लक्ष घालीत असल्यानें ते विद्वानांना राजाश्रय व ग्रंथकारांना उत्तेजन देत. यामुळें शिक्षणाचें पाऊल पुढें पडे. या सर्व गोष्टींमुळें मध्यम व सामान्य वर्गांतही ज्ञानाची गोडी उत्पन्न झाली होती, व त्या वर्गांत शिक्षणाचा प्रसार होऊं लागला होता. राजेही स्वतः विद्वान असत. अनेक भाषा त्यांस अवगत असत. त्यामुळेंही शिक्षणाकडे लोकांचा ओढा विशेष होता. स्त्रियाही शिक्षणाकरितां जात असत. अनेक स्त्रिया त्या वेळीं सुविद्य होत्या. छापण्याच्या कलेनें शिक्षणप्रसाराचें कार्य उत्तम रीतीनें चालविलेलें होतें. अनेक प्रकारचीं पुस्तकें छापलीं जात व त्यामुळें लोकांच्या ज्ञानांत भर पडत असे.

१२. लोकांच्या भोळ्या व भ्रामक कल्पना :—या वेळच्या लोकांमध्यें अनेक प्रकारची सुधारणा व प्रगति दिसून येत असूनहि कांहीं खुळ्या व धर्मभोळ्या समजुती लोक उराशीं बाळगून होते. भुतांखेतांवर लोकांचा अतोनात विश्वास होता. चेटुक करणाऱ्या बायका ऊर्फ चेटक्या लोकांना छळतात, अशी कल्पना त्या वेळीं रूढ होती. अति वृद्ध बायकांना चेटक्या समजून त्यांना जिवंत जाळण्याची निर्दय व क्रूर चाल यावेळीं कांहीं कांहीं ठिकाणीं दिसून येत असे. ही चाल पुढें पहिल्या जॉर्जच्या वेळेपर्यंत तुरळकपणें चालू होती. अनेकांनीं या भ्रामक कल्पनेस आळा घालण्याच्या हेतूनें पुस्तकेंही लिहिलीं; परंतु त्यांवर लोकांचा विश्वास बसत नसे. धार्मिक भोळ्या कल्पनाही रूढ होत्या. पापमुक्ततेचा पास विकत घेतल्यानें अगर चर्च बांधण्यास पैसा पुरविल्यानें मुक्ति मिळणें वगैरे अनेक कल्पना अशाच तऱ्हेच्या होत्या. लोकांच्या या खुळ्या कल्पनांचा अनेकांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भरपूर फायदाही करून घेतला. भुतांखेतांची व देवादिकांची भीति दाखवून ढोंगी लोक मोठ्या लोकांकडून पैसा लुबाडीत असत. भविष्यकथनावर पुष्कळ लोकांचा विश्वास होता. मोठमोठे पंडित व मुत्सद्दीही ज्योतिषांना मान देत व त्यांच्याकडून आपलें भविष्य वर्तवून घेऊन त्यांना भरपूर पैसाही देत. लोखंडाचें अगर तांब्याचें सोनें बनविण्याचा कित्येकांना मोह होता; व त्यापायीं पैसा, वेळ व शक्ति निष्कारण खर्च केली जात असे. अमृतासारख्या वस्तूचा शोध लावण्याचाही त्या वेळीं लोकांना नाद होता. अमृत निर्माण झाल्यास आपण अमर होऊं व मग या सुंदर जगांत आपल्याला सुंदर सुंदर वस्तूंचा अखंड उपभोग घेतां येईल असें लोकांस वाटे.

अभ्यास

१. ट्यूडर काळांतील सडकांवरून आपण प्रवास करतों आहों, असें समजून आपल्या प्रवासांतील अडचणी वर्णा.
२. शहरी–आयुष्यक्रम व खेडेगांवी–आयुष्यक्रम यांतील साम्य व फरक सांगा. तुम्ही शहरांत राहिलां असतां कीं खेडेगांवांत ? कां ?
३. त्या वेळच्या घरें बांधण्याच्या पद्धतीसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.
४. या काळच्या स्त्री-पुरुषांच्या भपकेदार पोषाखासंबंधीं माहिती द्या. स्त्री-पुरुषांच्या पोषाखाची नक्की कल्पना येण्याकरितां त्यांचीं चित्रें काढा. अशा तऱ्हेचे पोषाख तुम्हांस आवडले असते का ? कारणें द्या.
५. ट्यूडर काळांत तुम्ही एखाद्याचे घरीं जेवावयास गेलां आहांत, अशी कल्पना करा. घराच्या मालकानें तुम्हांस कोणकोणतीं खाद्यें व पेयें दिलीं असतीं ?
६. टिपणें करा व जरूर तेथें त्या त्या गोष्टींचें चित्र काढा :—
   शय्यागृह, मानखोडा, गस्तवाला, व्याकरणपाठशाळा, वसंतदिन, किमया, तत्कालीन विद्यार्थि, शहरचा मेयर, ग्लोब नाटकगृह, मॉरिस नाच, जत्रा, टपाल.
७. त्या वेळच्या लंडन शहरांतून आपण चालत आहोंत, अशी कल्पना करून त्यावेळीं तुम्हांस दिसून येणाऱ्या सर्व चमत्कारिक व चांगल्या गोष्टींचें वर्णन करा. या काळीं लंडनला महत्त्व येण्याचें कारण काय ?
८. ट्यूडर काळीं लोक कोणकोणते खेळ खेळत ? करमणुकीचीं इतर साधनें कोणतीं होतीं ? त्या वेळच्या खेळांपैकीं तुम्हांस कोणते खेळ आवडतात ? कां ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. वंशवृक्ष—स्टुअर्ट घराणें—१६०३–१७१४.

पहिला जेम्स—सन १६०३–२५

- हेन्री मृ. १६१२
- **पहिला चार्ल्स**–१६२५–४९
  - **दुसरा चार्ल्स** –१६६०–८५
  - **दुसरा जेम्स** १६८५–८८
    - जेम्स एडवर्ड जुना तोतया. मृ. १७६४.
      - चार्ल्स एडवर्ड तरुण तोतया मृ. १७८८
    - **ॲन** १७०२–१४
    - **मेरी** १६८८–९४ × **तिसरा विल्यम** १६८८–१७०२
  - मेरी
    - **तिसरा विल्यम** १६८८–१७०२
- एलिझाबेथ × फ्रेडरिक, पॅलॅटाइनचा राजा
  - रूपर्ट
  - मॉरिस
  - सोफिया × हॅनोव्हरचा राजा
    - पहिला जॉर्ज– १७१४–२७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

इंग्लंडच्या व्यापाराची वाढ—इ. स. ४१०—१६०३

अँग्लो-सॅक्सन काळ

१ अंतर्गत व्यापारावर भर

२ नॉर्वे-स्वीडनशीं व्यापार

३ लोकरीचा व्यापार

इ. स. ४१०—१०६६

नॉर्मन काळ

१ अंतर्गत व्यापारावर भर

२ परदेशांशीं व्यापारास सुरुवात

३ नॉर्मंडी व फ्लँडर्स या देशांशीं व्यापार सुरू

४ धर्मयुद्धामुळें व्यापार-वृद्धि

५ सरंजामी पद्धति

इ. स. १०६६—११५४

अँजेव्हिन काळ

१ अंतर्गत व्यापारावर भर

२ धर्मयुद्धामुळें वृद्धी

३ मॅग्नाकार्टानें परकीयांस व्यापारी सवलती

४ लोकरीच्या निर्गत व्यापारास प्रतिबंध (१२५८—१३३७)

५ धान्याच्या निर्गतीस मनाई (१३६०)

६ सोनें—चांदी यांच्या निर्गतीस मनाई (१३८१)

७ धान्याच्या निर्गतीस परवानगी (१३९४)

८ व्यापारी मंडळांकडून व्यापार नियंत्रणें

इ. स. ११५४—१३९९

लँकॅस्टर व यॉर्क काळ

व्यापारी मंडळांचें प्राधान्य

१ परकीयांवर निर्बंध (१४२३)

२ धान्याच्या निर्गतीस परवानगी (१४३७)

३ रेशमी मालाच्या आयातीवर निर्बंध (१४५५)

४ बाल्टिक समुद्रामध्यें व्यापारास सुरुवात (१४७४)

५ इटली, पोर्तुगाल, बेल्जम वगैरे देशांचें व्यापाराच्या उन्नतीसाठीं हरप्रयत्न. सर्व व्यापार परकीयांच्या हातांत असल्यानें व्यापारांत इंग्लंड मागासलेलें होतें.

६ मेंढपाळांच्या धंद्याची वाढ लोकरीच्या धंद्याची वाढ

इ. स. १३९९—१४८५

ट्यूडर काळ

१ परकीय व्यापाऱ्यांच्या हातांतील व्यापार, इंग्लंडच्या व्यापाऱ्यांकडे खेचून आणण्याचे यशस्वी प्रयत्न, शेतीची, दुःस्थिति; लोकरीचा व्यापार

२ नौका कायदा. इंग्लिश जहाजांच्या वाहतुकीच्या व्यापारास उत्तेजन (१४८५)

३ नॉर्वे-स्वीडन—डेन्मार्क—आइस्लंड—वगैरे देशांशीं व्यापारास मोकळीक (१४९०)

४ सातव्या हेन्रीचे व्यापाराच्या उन्नतीकरितां परकीय देशांशीं व्यापारी तह

५ आठव्या हेन्रीनें नाण्यांत भेसळ केल्यानें व्यापारी मंदी

६ मच्छीमारीच्या धंद्याची वाढ (१५४९)

७ नौका कायदा रद्द (१५५३)

८ चांचेगिरी सुरू. गुलामांचा व्यापार

९ नौका कायदा पास व वाहतुकीच्या व्यापारास उत्तेजन (१५५८)

१० व्यापारी कंपन्यांची स्थापना. मस्कोव्ही कंपनी (१५५५), लीव्हंट कंपनी (१५८१), ई. इं. कंपनी (१६००)

११ वसाहतींची स्थापना व व्यापारवृद्धी

१२ स्पेनचा पराभव—व्यापारवृद्धी

इ. स. १४८५—१६०३

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रिटिश राजघराणीं

नॉर्मन राजे

विजयी विल्यम—पहिला
जन्म १०२७—मृत्यु १०८७



दुसरा विल्यम [मृत्यु ११००
जन्म १०६०—शिकारींत असतां बाण घुसून

पहिला हेन्री
जन्म १०६८—मृत्यु ११३५



स्टीफन
जन्म १०९४—मृत्यु ११५४

अँजेव्हिन उर्फ प्लँटजेनेट घराणें

दुसरा हेन्री
जन्म ११३३—मृत्यु ११८९



पहिला रिचर्ड [मृत्यु ११९९
जन्म ११५७—समरांगणावरील जखमांमुळें

जॉन [यामुळें मृत्यु १२१६
जन्म ११६७—दगदग, मनस्ताप, अती खाणें



तिसरा हेन्री
जन्म १२०७—मृत्यु १२७२



पहिला एडवर्ड
जन्म १२३९—मृत्यु १३०७



दुसरा एडवर्ड—पदच्युत—
जन्म १२८४—खून १३२७

तिसरा एडवर्ड
जन्म १३१२—मृत्यु १३७७



दुसरा रिचर्ड—पदच्युत १३९९
जन्म १३६६—खून १४००

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रिटिश राजघराणीं

लँकेस्टर राजे	चौथा हेन्री जन्म १३६६–मृत्यु १४१३	
	पांचवा हेन्री जन्म १३८८–मृत्यु १४२२	
	सहावा हेन्री–पदच्युत १४६१ जन्म १४२१–खून १४७१	
यॉर्क राजे	चौथा एडवर्ड जन्म १४४१–मृत्यु १४८३	
	पांचवा एडवर्ड जन्म १४७०–भावासह खून १४८३	
	तिसरा रिचर्ड जन्म १४५०–समरांगणीं मृत्यु १४८५	
ट्यूडर राजे	सातवा हेन्री जन्म १४५६–मृत्यु १५०९	
	आठवा हेन्री जन्म १४९१–मृत्यु १५४७	
	सहावा एडवर्ड जन्म १५३७–मृत्यु १५५३	
	मेरी जन्म १५१६–मृत्यु १५५८	
	एलिझाबेथ जन्म १५३३–मृत्यु १६०३	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श १४८५—१६०३

राजे	लढाया	कायदे	धार्मिक गोष्टी	प्रमुख व्यक्ती	महत्त्वाच्या गोष्टी	युरोपियन
सातवा हेन्री १४८५–१५०९	बॉसवर्थ १४८५ स्टोक १४८७	पॉयनिंग्जचा कायदा १४९४ भडक गणवेश व सांभाळ यांच्या विरुद्ध कायदा १४८७	कॉलेटचीं धर्म-सुधारणेसंबंधीं व्याख्यानें १४९७–९८	कोलंबस १४९२ वास्कोडगामा १४९८ कॅबट १४९७	स्टारचेंबर १४८७	मॅक्झिमीलियन १४९३
आठवा हेन्री १५०९–१५४७	टापांची लढाई १५१३ फ्लॉडन १५१३	धार्मिक श्रेष्ठत्वाचा कायदा १५३४ सहा कलमी कायदा १५३९	मठजप्ती १५३६-३९ धर्मसुधारणा १५२९–१५३६.	इरॅस्मस, वूल्से, टॉमसमूर, कॉलेट, कॉमवेल, क्रॅन्मर, ल्यूथर, कॅलव्हिन,	आरमाराची वाढ धर्मसंरक्षक जथा १५३६	मॅक्झिमीलियनचा मृत्यु १५१९ पांचवा चार्ल्स बादशहा १५१९ सुवर्णवस्त्रभूमी १५२० कॅथॉलिक संघटनेची चळवळ १५४०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजे	लढाया	कायदे	धार्मिक गोष्टी	प्रमुख व्यक्ती	महत्त्वाच्या गोष्टी	युरोपियन
सहावा एडवर्ड १५४७–१५५३	पिंकी १५४७	एकरूपतेचा कायदा १५४९	प्रार्थना पुस्तक १५४९	सॉमरसेट, क्रॅन्मर, कॅलव्हिन, जेन ग्रे नार्दबरलँड	केटचें बंड १५४९ नाण्यांची भेसळ १५५१	
मेरी १५५३–१५५८	फ्रान्सशीं युद्ध १५५७ कॅलेचें हरण १५५८	पाखंडी लोकां-विरुद्ध कायदे	कॅथॉलिक धर्माची पुन्हां स्थापना १५५४	विलोबी, हूपर, लॅटिमर, क्रॅन्मर, गार्डिनर	वॅटचें बंड १५५४	स्पेनचा राजा दुसरा फिलिप १५५६
एलिझाबेथ १५५८–१६०३	आरमारी युद्ध १५८८	धार्मिक श्रेष्ठ-त्वाचा कायदा १५५९ एकरूपतेचा कायदा १५५९ भिकाऱ्यांचा कायदा १६०१	धर्मसुधारणा १५५९ राणीवर धर्मबहिष्कार १५७०	बेकन, मार्लो, सेसिल शेक्सपियर, ड्रेक, हॉकिन्स रॅले, बेन, जॉनसन, स्पेन्सर, गिलबर्ट फ्रॉबिशर, चान्सेलर	स्कॉटलंडची राणी मेरी–वध १५८७ ई. इं. कंपनी १६०० हाय कमिशन १५५९	दुसरा फिलिप १५५६–९८ डच ई. इं. कंपनी १६०२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आधारभूत ग्रंथांची यादी

1. A New History of Great Britain—R. B. Mowat.
2. A Middle School History of England, Vols. I & II—R. M. Rayner.
3. History of England—A. D. Innes.
4. An Advanced History of Great Britain, Parts I & II,—T. F. Tont.
5. Concise History of the World—Sir John Marriott.
6. History of England, Parts I & II—G. M. Trevelyan.
7. A Text-book of Modern English History—Book I—C. W. Southgate.
8. Economic History of England—Lipson.
9. Groundwork of British History, Part I–Warner & Marten.
10. The Piers and Ploughman Social and Economic Histories–Books I, II, III & IV–General Editor, E. H. Spalding.
11. Short History of England—Ransome.
12. Cambridge School Histories—Books I and II.
13. Blackie's Senior Histories–Books I and II–Alfred Flavell.
14. Collin's Biographical Histories—Vol. III—H. K. Prescot.
15. Bell's Modern School Histories—Vol. II–R. B. Mowat.
16. Marten and Carter's Histories—Books I, II, III—Marten and Carter.
17. Britain and her Neighbours–Book V—Blackie & Sons.
18. Economic History of England—Waters.
19. Social History of England—Frederick Bradshaw.
20. English History from original Sources—Books I, II, III—Norgan & Bally.
21. Outlines of British Social History—Dance.
22. English People of the Past–Vols. I & II–M. J. Whicher and M. S. Mitchel.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

23. A History of English Life—Vols. I & II—A. William Eillis & Fisher.
24. A Source Book of English Social History—Jones.
25. Source Book of English History—Kendall.
26. A History of England for Schools, Part I,—Keatinge & Frazer.
27. Our English Towns and Villages—Wilton Hall.
28. Oxford History of India–V. Smith.
29. A Note Book of English History–Margaret Rollestone.
30. Notes on British History–Vols. I & II–William Edwards.
31. Teaching of History–Jarvis.
32. The Learning of History—Forth.
33. History in Schools—Drummond.
34. Teaching of History in Schools—F. R. Worts.
35. Graphic Charts of British History—Newman.
36. History Time Charts-–H. G. Wood.
37. Philips New School Atlas of Universal History—Ramsey Muir.
38. Historical Atlas of the British Empire—Macmillan & Co.
३९. हिंदुस्थानचा इतिहास—प्रो. शं. रा. कानिटकर.
४०. इंग्लंडचा अर्वाचीन इतिहास––रा. प. ह. वर्वे.
४१. इंग्रजांचें स्वराज्य––रा. अ. वा. मराठे.
४२ इंग्लंडचा इतिहास—रा. गो. अ. मोडक.
४३. महाराष्ट्र सांवत्सरिक—प्रो. श्री. म. माटे.
४४. अर्वाचीन इंग्लंड–ट्यूडर अमदानी—रा. वि. के. पानसे.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूची

अ

अजिंकूर १९७.

अमेरिका ३२, २३९, २४०, २४२, २५३, ३५५, ३५६, ३५७, ३५८, ३६०, ३६१, ३६२, ३९१.

अँग्लो-सॅक्सन लोक २१, २२, २३, २५, २६, २९, ५७, ५८, ५९, ६१, ६२, ६३, ६४.

ॲग्रिकोला ११, १२, १३, १६.

आ

आनसेम ७८, ८१, ८२, ९९.

आयबेरियन लोक ४, ६, १६.

आयर्लंड ७, २७, १००, २५८,२५९, २६७, ३०७, ३८१, ३८२, ३९०.

आर्कची जोन, २००, २०१, २०२, २०९, २१०.

आर्थर (राजा) २२.

आर्थर (राजपुत्र) ११३, ११४.

आल्फ्रेड १९, ३४, ३५, ३६, ४१ ४२, ६१.

ऑक्सफर्डची सभा १२५.

इ

इग्नेशस लायोला २८८, ४३८.

इरॅस्मस २३३, २४६, २४७, ३२७.

ई. इं. कंपनी ३६२, ३९०, ४१७.

ईटन (पब्लिक स्कूल) २२९, ४३७.

उ

उद्योग-धंदे ९१, १८५, २२०, २२१, २६४, २८०, ३९२, ३९८, ४०९, ४१४, ४१५.

ए

एकरूपतेचा कायदा ३१७, ३२२, ३४०.

एग्बर्ट १९, २५, ३१

एडमंड १९, ३७, (वज्रदेही) ४५, ४६.

एडगर १९, ३७, ३९.

एडवर्ड (धर्मशील) १९, ४९, ५०, ५१, ५२, ५३.

एडवर्ड (पहिला) १२९, १३०, १३१, १३२, १३३, १३४, १३५, १३६, १३७, १३८, १३९, १४०, १४१, १७७.

एडवर्ड (दुसरा) १४२, १४३, १४४.

एडवर्ड (तिसरा) १४७, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १५३, १५४, १५५, १५६, १५७, १६१, १७७.

एडवर्ड (चौथा) २०८, २१३, २१४, २१५, २१६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एडवर्ड (पांचवा) २१६.
एडवर्ड (सहावा) ३१०, ३१४, ३१५, ३१६, ३१७, ३१८, ३१९, ३२०, ३२१, ३२२, ३५५.
एडविन २३, २४, ३०.
एथलरेड १९, ३४, (मूर्ख) ४३, ४४, ४५.
एथलफ्लेडा १९, २७.
एन्जेलो (मायकेल) २२५, २९५.
एलिझाबेथ ३१०, ३३१, ३३२, ३३६, ३३७, ३३८, ३३९, ३४०, ३४१, ३४२, ३४३, ३४४, ३४५, ३४६, ३४७, ३४८, ३४९, ३५०, ३५१, ३५२, ३५३, ३५४, ३५५, ३५६, ३६३, ३६४, ३६५, ३६६, ३६७, ३६८, ३६९, ३७४, ३७५, ३७६, ३७८, ३८१, ३८२, ३८३, ३८४, ३८५, ३८६, ३८७, ३८८, ३८९, ३९०, ३९२, ३९३, ४०४, ४०५.

क

कन्यूट ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१.
कपडे (पोशाख) ६१, ९६, १८५, २२४, २२५, ४३१, ४३२, ४३३, ४३४.
करमणूक ९७, १९०, १९१, २२४, ४३४, ४३५, ४३६.
कुंपणें १५५, २१९, २२०, ३१९, ३२०, ३२५, ४११, ४१२.
केट ३१९, ३२०.
केड (जॅक) २०४, २०५.
केल्टिक ६, २७, २८.
कोपरनिकस २३५, २५०.
कोलंबस १८९, २३०, २३९, २५१, २५२, २५३, २५४, २५५.
कृष्णकुमार १५०, १५१, १५२, १५३, १५७, १७९.
क्रेसी १५०, १५४, १८०, २४२.
कॅक्स्टन २१५, २४९, २५०.
कॅथराइन २६६, २७८, २७९, २८०, २९२, २९३, २९४, ३२७.
कॅबट २४२.
कॅरॅक्टेकस १०, १६.
कॅलव्हिन २८५, २८६, ३४५.
कॉलेट २३३, २४७, २४८, २९१.
क्रॅन्मर (टॉमस) २९२, २९३, ३०३, ३०४, ३१६, ३१७, ३२२, ३३२, ३३३.
क्रॉम्वेल २९८, २९९, ३००, ३०१, ३०२, ३०३, ३०४, ३०५.
क्लॅरेंडन (घटना) १०५, १०६.
क्यूरिया रेजिस ८२, ८३, १०२, १०६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख

खेडेगांव ५७, ५८, ५९, ६३, ९०, ९२, ९३, १८२, २१९, २२०, ४०९, ४१०, ४११, ४१२, ४१४, ४१५, ४२१, ४२२, ४२५, ४२६.

खेळ ९७, १९०, ४३४, ४३५, ४३६.

ग

गथ्रम ३४.

गिलबर्ट ३६१, ३९१.

गुलाबांचीं युद्धें २०७, २०८, २१३.

गॅव्हस्टन १४२, १४३.

गॅलीलियो २३५, २५१.

गॉडविन (अर्ल) ४६, ५०, ५१, ५२.

गॉंटचा जॉन १५७, १६३, १६४.

ग्रेनव्हिल ३६०, ३६२.

च

चार्ल्स (पांचवा) २७५, २७७, २७९, २८५, ३०६, ३२८.

चॉसर २२६, २२७.

चॅन्सेलर ३६१, ३६२, ३९०.

छ

छापण्याची कला २१५, २२९, २३०, २३४.

ज

जत्रा १८४, १८५, २२३, २२४.

जेसुइट २८८, ३५२, ३८१, ४०४, ४०५, ४३८.

जॉन (राजा) १०८, ११३, ११४, ११५, ११६, ११७, ११८.

ज्यू लोक ७२, ९२, १३६.

ज्यूट लोक २१, २३.

ज्यूरी पद्धति १०६.

ट

टनेज २६५.

टापांची लढाई २७४.

टायलर (वॅट) १६२

टॉस्टिग ४९, ५३, ५४.

ट्यूटन लोक १४, २०, २१, २९.

ड

डन्स्टन ३७, ३९. ४०, ४४.

डार्नले ३४९, ३५०, ३५१, ३५६.

डिस्पेन्सर १४४, १४५, १४६.

डेन्जेल्ड ४४, ७१.

डेन्लॉ ३४.

डेन्स लोक २५, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३७, ३९, ४३. ४४, ४५, ४६.

डेव्हिड ब्रूस १४८, १५०

ड्रुइड लोक ८, ११.

ड्रेक ३५७, ३५८, ३६८, ३६९, ३७०, ३७३, ३७५, ३७६, ३९०, ३९१, ३९३.

डॉमिनिकन १७३, १७४.

द

दळणवळण ६१, १८८, १८९, २२३, ४२२, ४२३, ४२४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दारू (बंदुकीची) १८०, २३०, २४२, २४३, ४२०.
देशमुख ८८, ९४, १३५, १८३, १८४, २१९, २२०, ४०७, ४०९, ४१०.
देशमुखी कोर्टे ८४, १३५, १८३, ४०९.

ध

धर्ममठ २६, ४६, ६४, ९५, ९६, १७२, १७३, २२८, २७७, २८२, २८३, २८७, २९८, २९९, ३००, ३०१, ३०२, ३१५, ३२९.
धर्मयुद्ध ७७, ७९, १०६, १११, ११२, १७०, १७१.
धर्मसुधारणा १५७, २८२, २८३, २८६, २८७, २८८, २९१, २९२, ३१५.
धार्मिक श्रेष्ठत्वाचा कायदा २९४, २९७, ३२९, ३४०, ३४२.

न

नोंदणी पुस्तक ७०, ७१, ७४, ७५
नॉक्स ३४५, ३४७, ३४८, ४३८.
नॉर्दंबर्लंड ३२१, ३२२, ३२३, ३२४, ३२९.
नॉर्दंब्रिया २३, २४, २७, ३७, ५३.
नॉर्मन लोक ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ८१, ८७, ८८.

प

पर्किन वॉरबेक २५८, २५९.
पार्कर (मॅथ्यू) ३४१, ३४४.
पार्मा (ड्यूक) ३६७, ३७०.
पार्लमेंट १२६, १३७, १४०, १४९, १५३, १५४, १६१, १६३, १६४, १७५, १७६, १९३, १९४, १९७, २०३, २०४, २०७, २५६, २६१, २६३, २६४, २६५, २७७, २९३, २९४, ३११, ३४०, ३४२, ३५३, ३८३, ३८४, ३८५, ३८६, ३८८, ३९९, ४००, ४०१.
पिक्ट ७, २०.
पोप २७, २८, ४७, ६९, ७२, ७८, ७९, ८२, ८६, ९५, १०५, ११५, ११७, १५५, १५६, १६८, १६९, १७०, २२८, २३०, २४१, २४२, २४३, २४४, २६६, २६७, २७२, २७३, २७९, २८३, २८४, २८५, २८६, २८७, २८८, २९०, २९१, २९२, २९३, २९४, ३२९, ३३०, ३४०, ३४२, ३५६, ३६९.
प्लेग १५४, १५५, १५९, १६१, २१९, २२०, २३०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रार्थना पुस्तक ३१६, ३१७, ३२२, ३२९, ३४०, ३८२, ४०४.
प्रेसब्रिटेरियन ३४४, ३४७, ४०४.
प्रिव्ही कौन्सिल २६५, २७०, ३०३, ४०१, ४०२.
प्यूरिटन लोक २८६, ३४४, ३४५, ३४५, ३४८, ३८६, ४०४, ४३४.
पॉयनिंग्जचा कायदा २६७.

फ

फिलिप दुसरा ३२८, ३३०, ३३१, ३३३, ३५६, ३६५, ३६६, ३६८, ३६९, ३७०, ३७३, ३७४, ३७५.
फ्रॅन्सिस (साधु) १७२.
फ्रॉबिशर ३६१, ३६९, ३७०, ३७६, ३९०, ३९३.

ब

बर्ले (लॉर्ड) ३३७.
बेकन (लॉर्ड) ३३८, ३९३.
बेकन (रोजर) १८०, १८१, १८२.
बेकेट १०२, १०४ १०५, १०६, १०९, ११०.
बोडेशिया ११, १७, १८.
बेलियल १३२, १३८, १४७.
बॅनॉक्बर्न १४३.
बॉथवेल ३५०.
ब्रिटन लोक ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १६, १७, २०, २२.
ब्रूस (रॉबर्ट) १३२, १३८, १४३, १४६, १४७.
ब्रेटिनी १५१, १५३.

भ

भडक गणवेष २२६, २६०, २६९.
भिकाऱ्यांचा कायदा ३८३, ३८४, ४०७.

म

मक्ते ३८५, ३८८, ३९९, ४१५.
मर्शिया २३, २५.
मार्लो ३९३, ३९४.
मार्को पोलो १८९, १९१, २४२.
मूर (टॉमस) २३३, २४८, २४९, २९१, २९५, ३२७, ३९५.
मेरी (पहिली) ३१०, ३२१, ३२७, ३२८, ३२९, ३३०, ३३१, ३३२, ३३३, ३३४, ३५५.
मेरी (स्कॉटलंडची राणी) ३०६, ३१७, ३१८, ३४५, ३४७, ३४८, ३४९, ३५०, ३५१, ३५२, ३५३, ३५४, ३६६, ३६९.
मेदिना सिडोनिया ३७०, ३७३.
मेगॅलिन २३९.
मॅग्ना कार्टा ११६, ११७, १२४, १३७, १३८, १७६, १७८.
मॅटिल्डा ८१, ८३, ८४, ८५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मॉर्टिमर १४४, १४५, १४६, १४७, १४९.
मॉर्टन २६३.

य

यात्रा १७४.
यात्रेकरू १७४.

र

रस्ते ६१, १८८, १८९, २२३, ४२२, ४२३, ४२४.
राज्ञावज्ञेचा कायदा १५५, २८०.
रिचर्ड (पहिला) १०७, १११, ११२, ११३, १२०, १३०.
रिचर्ड (दुसरा) १६१, १६२ १६३, १६४.
रिचर्ड (तिसरा) २१६, २१७.
रेनार्ड ३२८, ३३०.
रीसियो ३५०.
रोमनलोक ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६.
रॅले ३६०, ३६८, ३९०, ३९१, ३९३.

ल

लेस्टरचा ड्यूक ३३८, ३३९, ३६७.
लोलर्ड १५६, १६१, १६२, १९४, २९१, ३३०.
लॅनफ्रँक ७१, ७३, ७६, ७७, ७८.
लँबर्ट सिमनेल २५८.
लँग्टन (स्टीफन) ११५, ११६.
ल्यूथर २३०, २३३, २८३, २८४, २८५, २९२.

व

वास्को-ड-गामा २३०, २४०, २५३, २५४.
वितन २६, ६२, १७६.
विक्लिफ १५६, २२७, २९१.
विद्येचें पुनरुज्जीवन २३२, २३३, २३४, २३५, २९१.
विद्यापीठें १८०, १८१, १८६, ४३७.
विलोबी ३६२.
विल्यम (विजयी) ५३, ५४, ५५, ६५, ६६, ६९, ७०, ७१, ७२, ७३.
विल्यम (दुसरा) ७६, ७७, ७८, ७९, ८०.
वूल्से २७१, २७२, २७३, २७४, २७५, २७६, २७७, २७८, २७९, २८०, २८२, २९५.
व्यापार ९१, ९२, १८४, २२१, २२२, २६४, ४११, ४१२, ४१४, ४१५, ४१७.
व्यापारीमंडळें १८७, १८८, २२०, २२१, ३१८, ३१९, ३९२, ४१२, ४१४, ४१५.
वॉलेस १३३, १३४, १४६.
वॉरबेक (पर्किन) २५८, २५९.
व्हार्टिजर्न २०.
व्हिटबी २८, ३०.
व्हिटगिफ्ट ३८२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श

शतसांवत्सरिक युद्ध १४८, १४९, १५०, १९६, १९७, २०२, २०३, २३०.
शहरें (सॅक्सन) ५९, ६०, ७२, (नॉर्मन) ९०, ९१ (अँजेव्हिन) १८२, १८३, २२०, २२१, ट्यूडर ४१५, ४२२, ४२७, ४२८, ४२९, ४३०.
शार्लमान २५, ३०.
शाळा–शिक्षण ४०, ६४, १८६, १८७, २२८, २२९, २७७, ४३६, ४३७, ४३८, ४३९.
शिलेदारी ८८, १७७, १७८, १७९.
शेक्सपियर ३९३, ३९४, ३९५.

स

सरंजामी पद्धति ७०, ९२, ९४, १०४, १७७, २१९.
सहा कलमी कायदा ३०३, ३०४, ३२९.
सांभाळ २२६, २६०, २६१.
सायमॅन-ड-मॉटफर्ड १२५, १२६, १२७, १३७, १४६, १७६.
सिमनेल (लँबर्ट) २५८.
सिडने (सर फिलिप) ३६७, ३९३, ३९४.
सीझर ९, १०, १६, १७.
स्कूटेज कर १०२, १०४, ११७, २१९
स्टार चेंबर कोर्ट २६१, २६२, ४०६.
स्टीफन ८३, ८४, ८५, १०१, १०२
स्टॅफर्डब्रिजची लढाई ५४.
स्पॅनिश आरमारी युद्ध ३६८, ३६९; ३७०, ३७१, ३७२, ३७३, ३७४, ३७६.
स्पेन्सर ३९३, ३९४.
स्वातंत्र्याची सनद ११६, ११७, १२४, १३७, १३८, १७६, १७८.
स्वेन ४४, ४५.
सॉमरसेट ३१४, ३१५, ३१६, ३१७, ३१८, ३१९, ३२०, ३२१.

ह

हिंदुस्थान १, २३७, २३९, २४०, २४१, २४२, २४३, २५३, २५४, ३६२, ४०८, ४१७.
हेन्री (पहिला) ८०, ८१, ८२, ८३, १७१.
हेन्री (दुसरा) १०१, १०२, १०३, १०४, १०५, १०६, १०७, १०८, १७१.
हेन्री (तिसरा) ११८, १२२, १२३, १२४, १२५, १२६, १२७.
हेन्री (चौथा) १६५, १९२, १९३, १९४, १९५.
हेन्री (पांचवा) १९५, १९६, १९७
हेन्री (सहावा) २००, २०१, २०२,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२०३, २०४, २०५, २०६, २०७, २१३, २१४, २१५.
हेन्री (सातवा) २१७, २२६, २५६, २५७, २५८, २५९, २६०, २६१, २६२, २६३, २६४, २६५, २६६, २६७, २६८, २६९, २९५.
हेन्री (आठवा) २६६, २७०, २७१, २७२, २७३, २७४, २७५, २७६, २७७, २७८, २७९, २८०, २९०, २९१, २९२, २९३, २९४, २९५, २९६, २९८, २९९, ३००, ३०१, ३०२, ३०३, ३०४, ३०५, ३०६, ३०७, ३०८, ३०९ ३१०, ३११, ३१२, ३५५.
हेस्टिंग्ज ५४, ५५, ६७, ६९.
हेंजिस्ट २९.
होर्सा २०.
हॅरो (पब्लिक स्कूल) ४३७, ४३८.
हॅरोल्ड ५३, ५४, ५५.
हॅड्रियन १३, १६.
हॉकिन्स ३५६, ३५७, ३६८, ३७०, ३७६, ३९०, ३९१, ३९३.
हॉवर्ड (लॉर्ड) ३७०, ३७२, ३७५, ३७६.

४१म/१२ क

LIBRARY,
GURUKULA KANGRI.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुलनात्मक — कालादर्श—इ. स. १४८०-१६०५. स्केल—एका इंचास पंचवीस वर्षें

प्रसिद्ध व्यक्ती	वर्ष	इंग्लंड—महत्त्वाच्या गोष्टी	यूरोप—महत्त्वाच्या गोष्टी	हिंदुस्थान—महत्त्वाच्या गोष्टी
	१४८०			
		१४८५-१५०९ सातवा हेन्री.		१४८८ बहलोल लोदीचा मृत्यु
कोलंबस		१४९२ कोलंबस-वेस्ट इंडीजचा शोध	१४९३ मॅक्झिमीलियन—जर्मन बादशाह.	१४९३ बहामनी राज्याचे सुभेदार—स्वतंत्र
वास्को-ड-गामा		१४९४ पॉयनिंगजचा कायदा.	१४९८ वास्को-ड-गामाचा शोध	
कॅबट		१४९७ कॅबटचा उत्तर अमेरिकेचा शोध.	१५०० पोर्तुगीज—ब्राझीलचा शोध	
राफेल	१५०५			
		१५०९ सातव्या हेन्रीचा मृत्यु		
		१५१३ फ्लॉडन फील्डची लढाई.		
इरॅस्मस			१५१५ पहिला फ्रॅन्सिस-फ्रान्सचा राजा.	
कॉलेट			१५१६ पांचवा चार्ल्स जर्मन बादशाह.	१५१७ शिकंदर लोदीचा मृत्यु
मूर				
ल्यूथर		१५२० सुवर्ण वस्त्रभूमी.	१५२१ ल्यूथरवर धर्मबहिष्कार	१५२६ पानिपतचें पहिलें युद्ध
कॅलव्हिन		१५२५ पेव्हियाची लढाई		
लायोला	१५३०	१५२९ धर्मसुधारणेस सुरवात.		१५३० बाबराचा मृत्यु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाबर		१५३४ धार्मिक श्रेष्ठत्वाचा कायदा.	१५३९ जेसुइटपंथाची स्थापना	१५३४ हुमायून गुजराथ जिंकतो
हुमायून		१५३६ मठजप्ती (लहान)		
शेरशहा				
		१५३९ मठजप्ती (मोठे)		
		१५४७ आठव्या हेन्रीचा मृत्यु.	१५४५ ट्रेंटची धर्मपरिषद	१५४५ शेरशहाचा मृत्यु
		१५४९ पहिलें प्रार्थना पुस्तक.		
	१५५५	१५५२ दुसरें प्रार्थना पुस्तक.		
सॉमरसेट, नॉर्दंब-लँड		१५५६ क्रॅन्मरला जिवंत जाळलें.		१५५६ अकबर बादशाह होतो
			१५६० दुसऱ्या फ्रॅन्सिसचा मृत्यु	
क्रॅन्मर		१५५८ कॅलेचें हरण.		१५६५ तालिकोटची लढाई
		१५६२ एकुणचाळीस कलमी प्रार्थना.		
		१५६५ ड्रेकचें पहिलें पर्यटन.	१५७२ डच लोकांचें बंड.	
ड्रेक, हॉकिन्स, रॅले		१५७० एलिझाबेथ धर्मबहिष्कृत.		१५७६ हळदीघाटची लढाई
कॉबिशर, गिलबर्ट		१५७७ ड्रेकची पृथ्वीप्रदक्षिणेस सुरवात		१५८२ दिने–इलाहीची स्थापना
शेक्सपियर, बेकन	१५८०	१५८० ड्रेकचें इंग्लंडांत स्वागत.	१५८४ ऑरेंजच्या विल्यमचा खून	
मार्लो, हूकर, नॉक्स				
अकबर, राणा प्रताप		१५८७ स्कॉटलंडच्या मेरीचा वध		
तानसेन, तोडरमल		१५८८ स्पॅनिश आरमाराचा पराभव		
राजा मानसिंग,				१५९६ चांदबिबीचा पराक्रम
चांदबिबी		१६०० ई. इं. कंपनीची स्थापना	१५९८ दुसऱ्या फिलिपचा मृत्यु	१५९८ रामदासाचा जन्म
		१६०३ एलिझाबेथचा मृत्यु	१६०२ ड. ई. इं. कं.—कंपनी-स्थापना	
	१६०५			१६०५ अकबराचा मृत्यु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

KPH

किंमत १॥ रु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar